म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १४९

REFBK-006132

मनोहर-ग्रंथमाला प्रकाशन २२ वें

# संस्कृति-संगम

६१३२

लेखक

प्रा. दत्तात्रय केशव केळकर

REFBK-0006132

१५ सप्टेंबर १९४१

किंमत ४ रुपये

प्रकाशक
मनोहर महादेव केळकर,
मनोहर ग्रंथमाला,
टिळक रोड, पुणें २.

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु
राजगुरु प्रेस, कॉमनवेल्थ कॉलनी,
४०५ नारायण पेठ, पुणें २.

# प्रस्तावना

संस्कृति या शब्दाइतका व्यापकअर्थबोधक शब्द क्वचितच असेल. या शब्दानें कोणत्याहि समाजाच्या सर्व आचार-विचार-व्यवहाराचें, त्याच्या आर्थिक व्यापाचें, त्याच्या शास्त्र व कला यांच्या उपासनेचें, त्याच्या समाजधारणेनें प्रवर्तित केलेल्या धर्म व नीति, कायदेकानू यांच्या नियमकलापांचें व त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचें, अशा सर्व अंगोपांगांचें एकसमयावच्छेदेंकरून दिग्दर्शन होतें. कोणत्याहि वस्तूवर स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा संस्कार वठविणें यांतच मानवाचें मानव्य साठलेलें आहे. मुळांत मानवप्राणी हा आपल्या इतर जातभाई प्राण्यांप्रमाणें निसर्गानें आपल्याला दिलेल्या सिद्धवस्तूंनींच व्यवहार करीत असावा. पण प्रत्येक वस्तूवर संस्कार करणाऱ्या कल्पकतेची जी देणगी मानवास प्राप्त झाली आहे, तिच्या साहाय्यानें त्यानें भोंवतालची कठोर भासणारी भौतिक सृष्टि आणि स्वतःच्याच अन्तःकरणांतील रागद्वेषादींनीं हटवादीरूप धारण करणारी अन्तःसृष्टि या दोन्हीवर आपल्या व्यक्तित्वाचा, आपल्या मानव्याचा संस्कार करून दोन्हींचेंहि रूप कांहीं मर्यादेंत आपल्या हुकमतीखालीं आणलें आहे. **अर्थात् अन्तःसृष्टि आणि बाह्यसृष्टि यांतील ज्या ज्या गोष्टींवर त्यानें आपल्या मानव्याची संस्कारमुद्रा ठोकली आहे, त्या त्या सर्व गोष्टींचा कलाप म्हणजे त्याची संस्कृति.** इतर प्राण्यांनाहि बुद्धीचें देणें अगदींच मिळालेलें नाहीं असें नाहीं. स्वसंरक्षणाकरितां कळप करून राहणें, निवाऱ्याची जागा शोधणें, आगोटीच्या तोंडीं खाद्याचा साठा करून ठेवणें, घरटीं व वारुळें बांधणें, अपत्यसंवर्धन करणें, उपकारकर्त्याशीं इमान जागविणें व अपकारकर्त्याचा दंश धरून

सूड उगविणें इत्यादि प्रकार त्या त्या प्राण्यांत आढळून येतात. पण मानवाशीं तुलना केली असतां, इतर प्राण्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास इतका अत्यल्प आहे, कीं तो जमेस न धरला तरी चालेल. इतर प्राण्याला मिळाली तीच सृष्टि मानवालाहि मिळाली आहे; पण तिच्या स्वभावांतील मर्म नीट ओळखून त्यानें तिला आपली सेवादासी करून सोडली आहे. झाडावरून पडलेलीं आयतीं फळें न खातां धान्य पेरून हुकमी अन्न तो पिकवूं लागला. वणव्याच्या आगीनें भेदरून जाण्याऐवजीं त्याच अग्नीवर तो अन्न शिजवूं लागला. अंगावर चालून आलेल्या हिंसकांवर नुसता धोंडा उचलून न फेकतां, तो धोंडा घासून अणकुचीदार करूं लागला. सगळया जमावानें शिकारी धुंडीत न बसतां, नरांनीं शिकार करावी व नारींनीं रांधावी असा श्रमविभाग करूं लागला. हातांच्या खुणाऐवजीं आवाजाच्या खुणांनीं भाषा बोलूं लागला. आकाशांतील चंद्र-सूर्यादिकांच्या दर्शनानें नुसतें स्तंभित न होतां त्यांचीं स्तोत्रें रचूं लागला. तेव्हांच आपल्या मानव्याचे ठसे वा संस्कार तो सर्वत्र वठवूं लागला. या त्याच्या अनंत संस्कारांचा एकलित संभार म्हणजे त्याची संस्कृति. तिच्या विकासाची सामान्य दिशा सर्वत्र एकच असली तरी गति भिन्न भिन्न असल्यानें, भिन्न भिन्न समाज हे एकाच कालखंडांत भिन्न भिन्न अवस्थांतून जात असतांना आढळतात आणि परिस्थितिभिन्नत्वामुळें संस्कृतीच्या विविध अंगांतील कोठें एक विशेष पोसलें गेलें असतें तर कोठें दुसरें पोसलें गेलें असतें. यामुळें भिन्न समाजांच्या संस्कृतीला भिन्न घाट येत असतो. दळणवळणानें वैशिष्ट्याचे हे कंगोरे झिजून एकरूपतेकडे घाट झुकूं लागतो. पृथ्वीच्या चारी खंडांवर पसरलेल्या समाजांत दळणवळण फार प्राचीन काळापासून सुरू आहे. पण आजवर त्याची गति मंद होती, आतां मात्र असा समय येत चालला आहे, कीं ज्या वेळीं सर्व मानवसमाजाच्या संस्कृतीला एकच मानवसंस्कृतीचा घाट यावा. असो.

पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति यांची घसट आपल्या देशांत सध्यां चालू आहे. ही घसट पाश्चात्यांच्या राजकीय आक्रमणामुळेंच केवळ निर्माण झालेली आहे असें मात्र नाहीं. जपान हा देश पाश्चात्यांच्या राजकीय आक्रमणाच्या बाहेर असूनहि तेथें ही घसट सुरूच आहे. किंबहुना तशी ती सर्व जगभरच आहे. कारण पाश्चात्य संस्कृति ही चालू काळांतील प्रभावी संस्कृति असून जुन्या संस्कृतीशीं ती सर्वत्र सामना देत आहे. फार काय खुद्द पाश्चात्य देशांतहि ती जुन्या संस्कृतीशीं लढत आहे! कारण आज पाश्चात्य संस्कृति म्हणून जी ओळखली जाते ती खुद्द पाश्चात्य देशांतहि नवी आहे! तिला खऱ्या नांवानें संबोधावयाचें, तर तिचा उल्लेख भौतिकशास्त्र-प्रधान संस्कृति असा केला पाहिजे.

अशा या शास्त्रीय संस्कृतीशीं शास्त्रीय विज्ञानाच्या पूर्वीच्या अवस्थेंत असलेल्या आपल्या संस्कृतीची प्रस्तुत घसट चालू आहे. या घसटीमुळें आपल्या संस्कृतीला कालांतरानें कोणता घाट येणार आहे तें कालपुरुष ठरवीलच; पण कोणता आला असतां हितावह होईल याची चर्चा करणें निष्फळ होणार नाहीं.

आवडो वा न आवडो, पण शास्त्रीय शोधांनीं सुसाध्य केलेली आगगाडी, छापखाना, रेडिओ, विजेची रोशनाई, बोलपट, असलीं सुखसाधनें आपण सर्रास वापरूं लागलों आहोंत. शास्त्रीय दृष्टीच्या प्रगतीमुळें जीवनांत व साहित्यांत वास्तवता व ऐहिकता बद्धमूल होऊं लागलीं आहेत. आणि औद्योगिक क्रांतीच्या मंथनांतून घुसळून वर येणारीं समाजरचनेंतील साम्यवादाचीं तत्त्वेंहि प्रसार पावत आहेत. या सर्व गोष्टी एखाद्या महापुरांतील पाण्याच्या लोंढ्याप्रमाणें अप्रतिहत गतीनें येत आहेत; व त्या लोंढ्याखालीं आपल्या संस्कृतींतील परंपरेनें चालत आलेल्या साधी राहणी, जन्मजात श्रेष्ठत्व, परलोकनिष्ठा, संसाराविषयीं विरक्ति, समाधानी वृत्ति वगैरे गोष्टी वाहून जातील असा रंग दिसत आहे.

अशा परिस्थितींत विवेकानें कोणती भूमिका स्वीकारावी ? हें सर्व होत आहे तें अनिष्ट होत आहे असें मानून, हा प्रवाह डोकीवरून कालांतरानें निघून जाईल म्हणत बुडी मारून, कानांत बोटें घालून कुरं-गटून बसावयाचें ? कीं येणाऱ्या प्रवाहाबरोबर घरदार वाहून गेलें तरी फारा शतकांची जुनी घाण निघून गेली म्हणून वाहून गेलेल्या वास्तूवर आनंदानें गुढ्यातोरणें उभवावयाचीं ? किंवा याच लोंढयाचें पाणी घेऊन त्यानेंच आपला जुना मळा शिंपून त्यांत नवीन पीक काढावयाचें ? असे तीन पक्ष संभवतात. पैकीं तिसरा हा हितकारक होय. ह्या भूमिकेवरून मीं या पुस्तकांत विवेचन केलेलें आहे.

परक्याच्या नव्या गोष्टी स्वीकारण्यास मन स्वाभाविकच प्रथम तयार होत नाहीं, आणि होत नाहीं तें एका अर्थी रास्तहि आहे. कारण नवी गोष्ट स्वीकारावयाची ती विवेचकबुद्धीला नीट पटवल्या-वरच स्वीकारली गेली तर उत्तम. त्यांतून ज्यांच्याकडून या गोष्टी स्वीकारावयाच्या ते जेते म्हणून आपणांस उर्मटपणें तुच्छतेनें लेखीत असले, तर प्रथम तरी मनोवृत्ति अधिकच आवळून बसावी आणि परक्याच्या तुच्छतेच्या भावनेला तितक्याच तुच्छतेच्या भावनेनें प्रति-कार करण्यास सज्ज व्हावी हें साहजिक आहे. हा प्रकार कसा घडतो याचें पहिल्या तीन प्रकरणांत दिग्दर्शन केलें आहे. हे आघात-प्रत्याघात चालू असतां पाश्चात्यांतील कांहीं विचारवंत स्वतःच्याच संस्कृतीची निंदा करतांना आढळून येऊं लागले म्हणजे तर मन अधिकच गोंधळून जातें. त्याचें चित्र चवथ्या प्रकरणांत काढलें आहे. या गोंधळलेल्या मनःस्थितींतून पुढील मार्ग दिसूं लागावयाचा असल्यास, विवेकदृष्टीवर आलेलीं पूर्वग्रहाचीं कांहीं पटलें दूर करणें जरूर पडतें. पैकीं एक जबरदस्त पूर्वग्रह हा कीं, पौर्वात्य संस्कृति व पाश्चात्य संस्कृति ह्या मूलतः, स्वभावतः, प्रकृतितः भिन्न होत. यामुळें कांहीं मनोवृत्ति अशी धास्ती घेतात कीं, पाश्चात्य संस्कृतींतील कांहीं गोष्टींचें आमच्या संस्कृतीवर कलम केलें तरी येथें तें पोसणार नाहीं आणि

अट्टाहासानें रुजवावयाचें ठरविलें तर आपल्या पूर्वपरंपरेला तें उच्छिन्न केल्याविना राहणार नाहीं. दोन्ही संस्कृतींचें हें मानीव भिन्नत्व, पाश्चात्य संस्कृति ही आधिभौतिक असून भारतीय ही आध्यात्मिक होय अशा सूत्रमय वाक्प्रचारांत रूढ होऊन बसलें आहे. पण तें कसें निराधार आहे व ऐतिहासिक दाखल्यानें याच्या नेमकें उलट तऱ्हेचें चित्र रेखाटणें झालें तर तें कसें शक्य आहे हें प्रकरण पांच व सहा यांत दर्शविलें आहे. पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृति या मूलतः भिन्न होत ही समजूत रूढ होण्याचें मुख्य कारण आपल्या संस्कृतीच्या प्राचीन इतिहासाविषयीं हेळसांड हें होय. आपली अशी समजूत होऊन बसलेली असते कीं, गेल्या हजारबाराशें वर्षांत आपल्या संस्कृतीला जो घाट आला आहे तेंच तिचें अनन्यरूप होय. पण दुर्दैवानें याच आपल्या संस्कृतीला स्थिरावस्था प्राप्त झालेली असून तिचें प्रवाही प्रगतिपर रूप नष्ट झालेलें आहे. त्या तिच्या जागत्या कर्तबगारीच्या स्वरूपाची ओळख करून घ्यावयाची झाली तर, तत्पूर्वीच्या कालाचा चित्रपट पाहिला पाहिजे. तो पाहिला म्हणजे आपली संस्कृति पाश्चात्य संस्कृतीहून भिन्नस्वरूपी होय ही समजूत लयास जाईल. म्हणून सातव्या, आठव्या व नवव्या प्रकरणांमध्यें आपल्या संस्कृतींतील दुर्लक्षित व उपेक्षित असे जे भाग, म्हणजे तिच्यांतील आपल्या पूर्वजांची ऐहिक ऐश्वर्याची उपासना, त्याचा जगभर अनिर्बंध संचार आणि शासनसंस्थेंतील त्याचा लोकशाहीचा प्रयोग यांचें धावतें चित्र रेखाटलें आहे. आपले पूर्वज पूर्वी जगभर संचार करीत असल्यानें शास्त्र, विद्या, कला, धर्म, तत्त्वज्ञान या सर्व बाबतींत परक्यांना आपल्या विद्या शिकविणें व जरूर तेथें त्यांच्या स्वीकारणें हे प्रयोग मोकळ्या मनानें करीत. म्हणजे संस्कृतिसंगम आजच प्रथम होत नसून पूर्वीहि प्रवाह अनेकदा एकमेकांत मिसळलेले आहेत. आणि आपल्या संस्कृतीला मिश्र संकीर्ण स्वरूप आलेलें आहे. या प्राक्कालीन संगमावर व्यवहार व विद्या यांची देवाण-घेवाण कशी झाली व ती

चालू असतां आपल्या पूर्वजांनीं संग्राहक वृत्ति कशी पोसली याचा त्रोटक आढावा प्रकरण दहामध्यें घेतला आहे. पण बाहेरच्या संघर्षापेक्षांहि आपल्या संस्कृतीचें स्वरूप संमिश्र व गंगाजमनी बनलें तें येथीलच वैदिक व वेदबाह्य यांच्या संघर्षामुळेंच. आपली संस्कृति ही आज वैदिक म्हणून बाह्यतः मिरवत असली तरी, वेदबाह्यांच्या अनेक गोष्टींचा समावेश तिच्यांत कसा केला गेला व तो करीत असतां सहिष्णुता व संग्राहकता या वृत्ति तिच्यांत कशा पोसल्या गेल्या याचें दिग्दर्शन अकराव्या प्रकरणांत केलें आहे. संस्कृतीचा प्रवाह हा जिवंत खेळता राहण्यास संग्राहकता व सहिष्णुता यांच्या जोडीला विचारस्वातंत्र्य व सत्याचा आग्रह धरण्याचा कणखरपणा हाहि उसळत राहावा लागतो. तो न राहिल्यामुळें आपल्या संस्कृतीला कालांतरानें स्थिरावस्था प्राप्त झाली. या स्थिरावस्थेंतलि मनोवृत्तीनें राजकारणाला कसें दुर्बल केलें हें बाराव्या प्रकरणांत दाखवून, तेराव्या प्रकरणांत याच दुर्बल मनोवृत्तीनें शास्त्र, विद्या, कला, समाजशासन या सर्व क्षेत्रांत स्वतंत्र मूलगामी विचाराची धमक कशी खचली व त्यामुळें आम्ही जगाच्या शर्यतींत कसे मागें पडलों याचें विवेचन केलें आहे. आणि शेवटच्या प्रकरणीं आपली आजची मागसलेली अवस्था संपावयाची असल्यास पाश्चात्य संस्कृति ही आसुरी संस्कृति म्हणून तिच्यापासून दूर न पळतां, आपल्या संस्कृतीच्या प्राचीन प्रगतिपर व उत्साही स्वरूपाचें स्मरण ठेवून पाश्चात्यांच्या बरोबरीनें आपणहि भौतिकशास्त्राची जोपासना केली पाहिजे, समाजरचनेंत सर्वांना समान संधि या रूपानें प्रकट होणारा साम्यवाद स्वीकारला पाहिजे आणि परलोकनिष्ठधर्म ही वैयक्तिक बाब समजून, समाजाच्या सुखसोईच्या वर्धनाचे आणि आपत्तीच्या निराकरणाचे प्रयत्न लौकिक, ऐहिक व्यावहारिक दृष्टीनें केलें पाहिजेत असें प्रतिपादन केलें आहे. वरील सर्व विवेचनांत विवेचनाची फोड करण्याकरितां म्हणून जागोजाग ऐतिहासिक दाखले दिले आहेत; व त्यांचीं

साधनें लक्षांत यावीं इतपत त्याचे संदर्भहि दिले आहेत. मात्र इतिहास देण्याचा येथें इरादा नसून मुख्य भर आहे तो विवेचनावर आहे हें वाचकांच्या ध्यानीं येईलच.

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकरण सहा व आठ यांतील कांहीं भाग चित्रमयजगत् व केसरी यांतून मागें प्रसिद्ध झाला होता. बाकीच्यापैकीं कांहीं प्रकरणें अर्धीमुर्धी लिहून पडलेलीं होतीं. प्रकाशकांनीं नेट धरला नसता तर तीं तशींच अपुऱ्या अवस्थेंत पडून राहिलीं असतीं. आज तीं सर्व पुस्तक रूपानें प्रसिद्ध होत आहेत याचें श्रेय 'वाङ्मयशोभा' या मासिकाचे संपादक व 'मनोहर ग्रंथमाला' हिचे चालक यांनाच सर्वस्वीं आहे. त्यांनीं दर महिन्यास माझ्याकडून प्रकरणें लिहून घेण्याचा आग्रह धरला व युद्धमान परिस्थितीमुळें कागद महाग झाला असतांहि प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली म्हणूनच पुस्तक मला आज वाचकांच्या हातीं देतां येत आहे.

पुस्तकाच्या छपाईंत व बाह्य सजावटींत आपुलकीनें लक्ष घातल्याबद्दल पुण्याच्या राजगुरु प्रेसचे व्यवस्थापक व मुंबईच्या आर्ट कॉर्नरचे मालक यांचाहि मी फार आभारी आहे.

रुइया कॉलेज, मुंबई.
१ सप्टेंबर १९४१

दत्तात्रय केशव केळकर

# प्रकाशकाचें पान

आपल्या 'काव्यालोचन' या एकाच ग्रंथानें पहिल्या दर्जाच्या विद्वान् लेखकांमध्यें ज्यांनीं स्थान मिळविलें त्या प्रा. द. के. केळकर यांचा तिसरा ग्रंथ 'संस्कृति-संगम' मराठी वाचकांच्या हातीं देतांना मला अत्यंत आनंद होत आहे.

संस्कृति हा शब्द आपण अनेक वेळां ऐकतों व उच्चारतों. पण खरोखर त्याचा अर्थ व व्याप्ति हीं काय आहेत याची योग्य कल्पना फारच थोड्यांना असेल. त्याचप्रमाणें भारतीय संस्कृति ही आध्यात्मिक संस्कृति व पाश्चात्य संस्कृति ही आधिभौतिक संस्कृति आहे, अशा कांहीं अर्धवट कल्पना अनेकांच्या डोक्यांत घर करून बसलेल्या आहेत. या सर्व कारणांकरितां संस्कृति म्हणजे काय, भारतीय संस्कृति व पाश्चात्य संस्कृति यांत फरक काय, आमचा व त्यांचा पूर्वीचा इतिहास काय, व आमची संस्कृति जर सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ तर आम्ही पददलित आणि गुलाम कां आणि जीवनकलहांत आमच्या राष्ट्रानें टिकाव धरण्याकरतां आम्हीं काय केलें पाहिजे, वगैरे गोष्टींचें साधार विवेचन करणारा एखादा चांगला ग्रंथ आपल्या भाषेंत असणें अवश्य होतें. दिवसेंदिवस हिंदुस्थानच्या राजकारणास जो एक निराळाच रंग भरत आहे त्या दृष्टीनेंहि आपल्या डोक्यांतील संघटनेबद्दलचे विचार साफसूफ होणें व त्यांची नवीन परिस्थितीला तोंड देण्यास योग्य अशी मांडणी होणें अवश्य झालें आहे.

या दृष्टीनेंहि हें पुस्तक विचारवंतांना निःसंशय उद्बोधक वाटेल. प्रा. केळकरांनीं आपल्या अनेक वर्षांच्या व्यासंगाला व विचारांना जें हें मूर्त स्वरूप दिलें आहे त्याचें योग्य तें चीज करण्याची जबाबदारी आतां मराठी वाचकांची आहे.

—प्रकाशक

# अनुक्रमणिका


१ प्रास्ताविक पृ. १ ते ७

युरोपियनांच्या आक्रमणामुळें युरोपियन संस्कृति व भारतीय संस्कृति यांचा संघर्ष—त्यांचा प्रारंभीं संग्राम पण परिणामीं संगम—आजची युरोपियन संस्कृति ही शास्त्रप्रधान संस्कृति असून जागतिक होय. तिच्यांतील इष्ट भाग पचनीं पाडणें आवश्यक व इष्टहि आहे—ही मनोभूमिका तयार होण्यास आपल्या संस्कृतीची प्राचीन संग्राहक वृत्ति उमगली पाहिजे. प्रथम संग्राम पाहूं या.

२ संगमावरील आघात पृ. ८ ते २८

युरोपियन संस्कृति ही जेत्यांची संस्कृति—जेत्यांची जितांच्या संस्कृतीकडे पाहण्याची विकृत दृष्टि—अभ्यासू पंडित देखील दुराग्रहानें पछाडलेले—हेटाळणीचे उद्गार—बुरसलेले भारतीय—त्यांच्यांत वाङ्मय नाहीं, कला नाहीं, शास्त्रें नाहींत— त्यांना अध्यात्म व नीति यांची तोंडओळख नाहीं—त्यांच्यांतील विधवा ह्या सनदी स्वैरिणी—संस्कृत वाङ्मयाच्या अध्ययनानंतर हा पवित्रा बदलला—वैभव नाकारितां येईना तेव्हां तें ग्रीकांच्या घरून उचललेलें, उसने म्हणून हिणवण्यास सुरुवात झाली—कालदृष्ट्या तेंहि टिकेना. तेव्हां बुद्ध, चाणक्य, व्यास ह्या विभूति काल्पनिक वा परकी असें प्रतिपादन सुरू झालें !

३ प्रत्याघात पृ. २९ ते ४८

जेत्यांच्या उपमर्दाला जितांचा अहेर—आगरकर व लजपतराय यांचीं बाणेदार प्रत्युत्तरें—पाश्चात्य हे द्विपाद पशु—विवेकानंद-टागोर-गांधी यांचा विधायक प्रत्याघात—मनूचा शिष्य नीत्शे !

४ विचारांचे भोवरे पृ. ४९ ते ६१

आघात-प्रत्याघात हे जितजेत्यांमध्येंच तेवढे नाहींत--परस्परांमध्यें व आपआपसांतहि आहेत--यामुळें मतमतांतरांची गल्लत--स्वतःच्या संस्कृतीची निंदा करणाऱ्या व भारतीय संस्कृतीचीं स्तोत्रें गाणाऱ्या पाश्चात्य लेखकांचीं मतें पारखून घेतलीं पाहिजेत--दोन्ही संस्कृति भिन्नस्वरूपी हा मिथ्याग्रह--युरोपियन हे आध्यात्मिक असें चित्र काढतां येईल.

५ आध्यात्मिक युरोप पृ. ६२ ते ८९

पाश्चात्य मठांतील कर्मठपणा--स्त्रियांचें केशवपन--ब्रह्मचर्य--देहदंडन--गवत खाऊन राहणारा हठयोगी--शहाण्यानें विवाह करूं नये! -- साक्षात्कारी साधुसंत-- प्रयोगशाळेंत अखंड ज्ञानोपासना करणारे नवे तपस्वी!

६ आसुरी भारत पृ. ९० ते ११९

पाश्चात्य हे आध्यात्मिक व भारतीय हे आसुरी असें रूढ समजुतीविरुद्ध चित्र काढणें अशक्य नाहीं--चाणक्याच्या ग्रंथांतील अघोरी उपाय--अघोरी वर्तनाची राजतरंगिणींतील व हर्षचरितांतील ऐतिहासिक उदाहरणें.

७ भारतीयांची ऐश्वर्योपासना पृ. १२० ते १४९

आपल्या संस्कृतींतील विस्मृत अंगाचें दिग्दर्शन--विस्मृतीचें कारण इतिहासाची हेळसांड--इतिहास वाचल्यास ऐहिक जीवन सुखी करण्याचा भारतीयांचा व्याप दिसून येईल--हौशी नागरिकांचें विलासी जीवन--ज्योतिष, गणित, रसायनादि शास्त्रांची जोपासना.

८ भारतीयांचा विश्वसंचार पृ. १५० ते १८१

प्राचीन इतिहासाचा आणखी एक विसरलेला भाग म्हणजे भारतीयांची जगभर मुशाफरी--नौकानयनांतील नैपुण्य--इंग्लडचीं

जहाजें हिंदुस्थानांत बांधलीं-- चीनमध्यें धर्मोपदेशक या नात्यानें जाणारे काश्यप, कुमारजीव वगैरे— पूर्वद्वीपकल्पांतील ब्राह्मणांच्या वसाहती—अमेरिकेंतील वसाहतीकरणाविषयीं मेक्सिकन सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याचा पुरावा.

**९ प्राचीन भारतांतील लोकशाही पृ. १८२ ते १९८**

श्रीकृष्ण हा राजा नसून अधंकवृष्णि संघाचा लोकनियुक्त अध्यक्ष— ग्रीक ग्रंथकारांनीं वर्णिलेलीं गणराज्यें— बुद्धसंघांतील गुप्तमतदान पद्धति— द्वैराज्यादि इतर शासनपद्धति.

**१० प्राचीन संगमावरील देवाण-देवाण पृ. १९९ ते २३०**

फार प्राचीन कालापासून भारतीयांचें जगाशीं दळणवळण—ग्रीसमध्यें हिंदु धर्म—बायबलांतील बुद्धकथा—हिंदी व्यापारामुळें रोमच्या सुवर्णाला गळती—बगदादच्या सरकारी रुग्णालयाचा हिंदु चालक—जर्मनींत वेदाभ्यास—ज्ञान दिलें तसें घेतलेंहि—ग्रीकांचें ऋण—म्लेंच्छ ऋषि !

**११ भारतीय संस्कृतीचें गंगाजमनी स्वरूप पृ. २३१ ते २७६**

परकयांच्याकडून विद्येमध्यें कांहीं उसनवारी केली असली तरी भारतीय संस्कृतीला गंगाजमनी स्वरूप आलें तें मुख्यतः भरतखंडांतीलच वैदिकेतरांच्या संघर्षामुळें— गंधर्व, पिशाच,राक्षस, वानर, नाग, हे लोकसमुदाय होत—या प्रत्येकांतून कांहीं गोष्टी उचलल्या— द्रविड व आदिद्रविड यांचें ऋण—महाराष्ट्रांत आर्यद्रविडांचें एकीकरण— एकीकरणांतील संग्राहकता व सहिष्णुता या मनोवृत्तीची जोपासना— सहिष्णुतेचे ऐतिहासिक दाखले—दैवतांचें व धर्मपंथाचें एकीकरण.

**१२ संस्कृतीचा राजकीय तट कोसळूं लागला पृ. २७७ ते ३१६**

राजकारण हें संस्कृतीचें संरक्षक कवच— राजनीतींतील चाणक्य

परंपरेचा लोप—शत्रुसर्पाला दयादुग्ध पाजणारे बालादित्य व पृथ्वीराज—देशद्रोह—सामान्य जनतेची राजकारणापासून फारकत हा मुख्य दोष.

१३ विचारदौर्बल्याचें शेवाळें पृ. ३१७ ते ३४५

सातव्या आठव्या शतकानंतर विचारस्वातंत्र्याचा लोप–दैववादाची पकड घट्ट आवळते—ग्रहणाची शास्त्रीय उपपत्ति मांडल्याबद्दल आर्यभट्टांलें दूषण—भाष्यावर भाष्यें लिहिण्याची प्रवृत्ति—स्वतःच्या विद्येचा फाजील अहंकार— शाक्तपंथ— पुष्टिमार्ग— काव्यांतील शृंगारातिरेक— जगाचें अज्ञान—शास्त्रीय ज्ञानाचा लोप.

१४ संस्कृतिगंगेचा पुनश्च जोरकस प्रवाह पृ. ३४६ ते ३६४

आजहि जगाला देण्यासारखें कांहीं आपणाजवळ आहे; पण पारतंत्र्य नष्ट झाल्याविना आपल्या वाणीला तेज येणार नाहीं—तें दूर होण्यास पाश्चात्यांची विद्या आणि शिस्त घेतलीं पाहिजेत— तीं आपल्या परंपरेशीं विरुद्ध नाहींत हें दर्शविण्याकरितां आपल्या संस्कृतींतील उपेक्षित भागांचें धावतें दर्शन मागील प्रकरणांतून करविलें आहे—परकीयांचे गुण घेण्यास परकीयांच्या आक्रमणाची आवश्यकता नाहीं—आणि त्यांच्याइतकी प्रगति करण्यास तितका कालहि नको, हें जपानच्या उदाहरणावरून दिसेल—त्यांची विद्या घेऊन तिचा आज युरोपांत चालला आहे तसा दुरुपयोग न करतां, तिच्या साहाय्यानें नवा सामर्थ्यसंपन्न व चारित्र्यसंपन्न असा देश निर्माण करून दाखविला तर जागतिक संस्कृतींत भर टाकण्याचें श्रेय मिळेल !

# संस्कृति-संगम

## प्रकरण पहिलें

# प्रास्ताविक

दोन संस्कृतींचा संगम हा अनेक दृष्टींनीं दोन नद्यांच्या संगमासारखा असतो. संगमस्थानीं जेथें दोन प्रवाह प्रथमच एकमेकांस भेटतात तेथें ते एकमेकांवर जोरानें आदळून मोठी तुफानी खळबळ होत असते. त्यानंतर कांहीं काल दोन्ही प्रवाह एकमेकांशीं घासून-घसटून पण अलग रीतीनें वाहतांना दृष्टीस पडतात. आणि शेवटीं दोन्ही एकस्वरूपी होऊन, अंतीं एकाच नांवानें ओळखले जातात. संस्कृतींच्या संगमासहि हीच गोष्ट लागू आहे. दोन संस्कृति जेव्हां एकत्र येतात तेव्हां त्या तुल्यबल असल्यास प्रथम दोन्हींतील आचारविचारांचे एकमेकांवर जोराचे आघात-प्रत्याघात होतात. तुल्यबल नसल्यास राजकीय दृष्ट्या वरचढ असलेली संस्कृति ही जित राष्ट्राच्या संस्कृतीला शक्य तर नामशेष करूं पाहते. जित राष्ट्राची संस्कृति मुमूर्षु असल्यास ती या आक्रमणाच्या रथाखालीं चिरडली जाऊन नष्ट होते. पण ती जोमदार असल्यास दोन्ही संस्कृतींत देवाण-घेवाण होऊन एकंदर मानवी संस्कृतीचें पाऊल पुढें पडतें.

पाश्चात्य संस्कृतीच्या व आर्य संस्कृतीच्या संगमावरहि असाच मनोहर देखावा दिसूं लागेल अशी आशा व्यक्त करणें अस्थानीं होणार नाहीं.

हा देखावा मनोरम ठरेल असें म्हटलें खरें, पण तें त्या देखाव्याच्या उत्तररूपाला अनुलक्षून होय हें सांगावयास नको. प्रथमारंभीं संस्कृतींचा संगम हा प्रीतिसंगम नसून वैरसंग्रामच ठरत असतो. आणि त्याचा प्राथमिक लढा शस्त्रास्त्रांच्या खणखणाटांनीं रणांगणावरच लढला जातो. या रणांगणावरील लढ्याचा निकाल तारतम्यानें थोड्या कालांत लागतो. पण नंतरचा सांस्कृतिक लढा हा दीर्घकालपर्यंत चालूं राहतो.

साता समुद्रांपलीकडून येऊन वास्को-ड-गामानें कालिकतच्या झामोरिनच्या श्रीमुखांत जेव्हां लगावली तेव्हांच पाश्चात्य संस्कृतीनें भारतीय संस्कृतीला अर्वाचीन कालांतील पहिलें असें खडखडीत आव्हान दिलें. झामोरिननें हा अपमान निमूटपणें सोसला त्याच वेळीं असें ठरून चुकलें, कीं राजकीय क्षेत्रांत भारतीय संस्कृति ही पाश्चात्य संस्कृतीपुढें दुबळी ठरणार. तेव्हांपासूनच पाश्चात्यांचें शस्त्रास्त्र-वर्चस्व व राजकारणपटुत्व यांनीं भारतीय संस्कृतीच्या राजकीय इमल्याला हदरून सोडण्यास सुरुवात केली आणि शेवटच्या पेशव्यानें इंग्रजांच्या हातावर राजकारणाचें उदक सोडलें तेव्हां पौर्वात्य-पाश्चात्य संस्कृतींच्या झगड्यांतील पहिला राजकारणाचा अंक समाप्त झाला.

पहिला अंक समाप्त झाला हें अशाकरितां म्हटलें आहे, कीं या राजकीय झगड्याचे पुढील अंक अद्याप खेळले जावयाचे आहेत. यापुढील अंकांतून राजकीय दौर्बल्य झिंझाडून टाकून जागतिक राष्ट्रमालिकेंत स्वतंत्र राष्ट्र म्हणून मिरविण्याचा मान भारतीय संस्कृति पुनश्च स्थापन करील हें भविष्य भारतीय संस्कृतीच्या पूर्वेतिहासाचें परिशीलन करणाऱ्या कोणालाहि निःसंदिग्धपणें वर्तवितां येईल. पण ते पुढील अंक कालपुरुष पाहणार आहे.

राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्यावर संस्कृतीच्या संग्रामावरील एका राजकीय क्षेत्रांतील उसळत्या लाटा थांबतील; पण बाकीच्या क्षेत्रांतील लढा तेवढ्यानेंच संपणार नाहीं. भरतखंड हें राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाल्यावरहि भारतीय संस्कृतीला पाश्चात्य संस्कृतीशीं दीर्घकाळ झगडावेंच लागेल. कारण येथें हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं आजच्या पाश्चात्य संस्कृतीचें जें आक्रमण जगभर पसरत चाललें आहे तें केवळ राजकीय दृष्ट्या पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या राष्ट्रांवरच तेवढें होत चाललेलें नसून, स्वतंत्र व परतंत्र अशा सर्वच राष्ट्रांवर होत चाललें आहे. आशिया खंडांतील आपला पूर्वेकडील शेजारी व आपल्याच भगवान् बुद्धाला ईश्वरी विभूति मानणाऱ्या जपान देशाचेंच उदाहरण घ्या; तो देश तर आज राजकीय दृष्ट्या सर्वस्वीं स्वतंत्र आहे ना? स्वतंत्र आहे इतकेंच नव्हे, तर पाश्चात्यांनाच व्यापार व राजकारणाच्या दोन गोष्टी त्यानें शिकवाव्या असें त्याचें तेज दिवसेंदिवस वृद्धिंगत होत चाललें आहे. पण या जपाननें पाश्चात्य संस्कृति जितकी आत्मसात् केली आहे तितकी पाश्चात्यांच्या दास्यांत खितपत पडलेल्या राष्ट्रांनींहि केलेली आढळून येणार नाहीं. आज जपान राष्ट्रमालिकेंत इतरांच्या बरोबरीनें, मानानें, मरातबानें बसूं शकतो याचें कारणच हें आहे, कीं त्यानें पाश्चात्य संस्कृतींतील महत्त्वाचा भाग आत्मसात् केला आहे, पचविला आहे. तो तसा पचविल्याशिवाय जीवनकलहांत टिकून, तगून राहणेंच कोणत्याहि राष्ट्राला दुर्घट होत चाललें आहे.

जी इतरांची गत तीच हिंदुस्थानची. हिंदुस्थाननें कितीहि आव आणला कीं जगाला पूर्वीं अज्ञात आणि अपूर्व असें सांस्कृतिक तत्त्वज्ञान आपण इतरांना शिकवूं, राजकीय स्वातंत्र्य संपादण्याचे व टिकविण्याचे अभूतपूर्व असे अभिनव प्रयोग खेळून दाखवूं, तरी हे प्रयोग यशस्वी होण्याचा काल कल्पनेच्या क्षितिजावरहि अद्याप दिसूं लागला नसल्यानें जीवनकलहांत टिकून राहण्याकरितां म्हणून तरी पाश्चात्य संस्कृतींतील अवश्य भाग हिंदुस्थानालाहि आत्मसात्

करावाच लागेल. म्हणजेच पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति यांच्या भेटीचें प्राथमिक स्वरूप झगड्याचें झालें असलें तरी, पाश्चात्य संस्कृतींतील कांहीं गोष्टींना भारतीय संस्कृतीला आपल्या घरीं नांदवून घ्याव्याच लागतील म्हणजे अंतीं तें तडजोडीचेंच ठरेल. आणि या गोष्टी दूर दृष्टीनें पाहिल्यास परिणामीं रमणीय अशा ठरतील असें वाटत असल्यानें संस्कृतींच्या भेटीचें हें झगड्याचें स्वरूप लोपून त्याला संगमाचें मनोहर रूप प्राप्त होईल असें त्याचें वर्णन करणें अस्थानीं होऊं नये.

पाश्चात्य संस्कृतीचें स्वरूपदर्शन आज आपणांस घडत आहे तें ती संस्कृति राजकीय वर्चस्वाच्या तोऱ्यानें ताठून उद्दामपणें मिरवत असलेल्या अवस्थेंत घडत आहे. यामुळें या संस्कृतीचें खरें स्वरूप समजून घेण्याच्या बाबतींत मोठी नाजुक परिस्थिति उत्पन्न झाली आहे. पाश्चात्यांची कोणतीहि गोष्ट स्वीकारणें म्हणजे आज आपल्या संस्कृतीच्या सरणांत एक एक गोवरी रचणें होय, अशी अढी अशा स्थितींत परतंत्रतेच्या मनांत उत्पन्न झाली तर नवल कसलें? आणि तशी ती उत्पन्न झाली म्हणजे आपली संस्कृति रक्षण करावयाची असेल तर परक्या संस्कृतीची सावलीहि तिच्यावर पडणार नाहीं अशा रीतीनें तिला जपलें पाहिजे अशी वृत्ति जोरावूं लागते. ती जोरावूं लागली म्हणजे स्वतःच्या संस्कृतीचें व परक्याच्या संस्कृतीचें खरें स्वरूप पारखण्याची जिज्ञासा आणि पात्रता हीं कोळपून जातात, चिकित्सक दृष्टीवर तिमिर वाढतो आणि प्रगतीचा मार्ग रुद्ध होतो.

दृष्टीवरील हें पटल दूर करावयाचें असेल व मनाच्या या अढी मोडून काढून साफ करावयाच्या असतील तर आपल्या व परक्यांच्या दोन्ही संस्कृतींचें खरें स्वरूप समजावून घ्यावें लागेल. तें तसें नीट समजावून घेतलें म्हणजे कांहीं महत्त्वाचे गैरसमज नष्ट होतील; व परकी संस्कृतींतील इष्ट भाग आत्मसात् करण्याविषयीं वाटणारा

बुजरेपणा जाऊन परक्यांच्या आहारीं न जातांहि त्यांचे गुणविशेष आपण पचनीं पाडूं शकूं असा आत्मविश्वास उत्पन्न होईल.

त्या महत्त्वाच्या गैरसमजांपैकीं पहिला गैरसमज म्हणजे भारतीय संस्कृति व पाश्चात्य संस्कृति या मूलतः भिन्नस्वरूपी होत हा होय. वस्तुस्थिति अशी कीं या दोन्ही संस्कृति जातितः भिन्न होत ही समजूत चुकीची आहे. या दोन्ही संस्कृतींचीं गेल्या दोन-तीन हजार वर्षांतील स्थित्यंतरें डोळ्यांखालीं घातलीं, तर या दोन्ही संस्कृति स्वभावतःच भिन्न होत हा गैरसमज तात्काळ आपलें बहुत दिसांचे मनांतील घर सोडून बाहेर पडेल.

पाश्चात्य संस्कृतीला आज घाट आला आहे, तो सर्वस्वीं नवा असा आहे. तो गेल्या शतकांतल्या शास्त्रीय व औद्योगिक क्रांतीनंतर आलेला आहे. पण त्याच्या पूर्वीचें पाश्चात्य संस्कृतीचें ध्यान नीट पाहिलें तर कोणी म्हणेल, कीं भारतीय संस्कृतीची ही जुळी बहीण तर नाहीं ? या बुड्या बहिणीच्या घरून उचलण्या शिकण्यासारखें फारसें नाहींहि; पण गेल्या शतक दोन शतकांत पाश्चात्य संस्कृतीनें जो नवा संसार थाटला आहे त्यांतून मात्र कांहीं चिजा अवश्य उचलण्यासारख्या आहेत.

त्या उचलण्यास मन साफ व्हावयाचें असेल तर एक गोष्ट प्रथम ध्यानीं ठसवून घ्यावी, कीं पाश्चात्य देशांत गेल्या शतक दोन शतकांत जी संस्कृति अवतरलेली आहे ती संस्कृति ही वस्तुतः नवी अभूतपूर्व अशी संस्कृति होय, अथवा संस्कृतीचें स्थित्यंतर होय. या संस्कृतीचें खरें नामकरण करावयाचें तर तिला **शास्त्रीय संस्कृति** म्हणूनच संबोधिली पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रांत तिचा उदय झाला म्हणून तिला पाश्चात्य संस्कृति म्हणावयाचें इतकेंच. पण या नव्या संस्कृतीचा जुन्या रूढ भारतीय संस्कृतीशीं जसा नात्या-गोत्याचा संबंध नाहीं, तसा औद्योगिक व शास्त्रीय क्रान्तीपूर्वीच्या पाश्चात्य संस्कृतीशींहि नाहीं. शास्त्रीय संस्कृति ही नवी अभिनव संस्कृति असून ती मानवी संस्कृती-

च्या विकासावस्थेंतील पुढारलेली अवस्था होय. तिची जोपासना कोठें कमी कोठें जास्त होत असली व तिचा उगम कोठेंहि झाला असला तरी ती आतां अखिल जागतिक संस्कृति झाली आहे. हें तिचें खरें स्वरूप ओळखलें म्हणजे आपल्या जेत्यांची संस्कृति म्हणून तिला स्वीकारण्यांत मनाला जो संकोच वाटतो तो दूर होईल.

परक्यांचीच नव्हे तर कोणतीहि नवी गोष्ट स्वीकारण्यास मन प्रथम कचरतेंच. अशा वेळीं त्याची समजूत पाडण्याचा एक मार्ग म्हणजे पूर्वीं अनेक प्रसंगीं त्यानें नवीन गोष्टी स्वीकारल्या आहेत या दाखल्याची आठवण त्याला करून देणें हा होय.

प्राचीन काळीं जशा परक्या राष्ट्रांना आपण अनेक गोष्टी शिकविल्या आहेत तशाच परक्यांपासून कांहीं गोष्टी उचलल्याहि आहेत हें इतिहासाच्या दप्तरीं असलेल्या पुराव्यावरून जर दाखवून दिलें, तर नव्या गोष्टी स्वीकारतांना मन कच खाणार नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या आपण चांगल्या पचवूंहि शकूं असा आत्मविश्वासहि उत्पन्न होईल.

हा आत्मविश्वास उत्पन्न होण्याकरितां दोन संस्कृतींच्या संगमावरील मत्सर, दुराग्रह, अज्ञान, अहंकार वगैरेच्या उसळणाऱ्या लाटा आधीं थोड्या स्थिरदृष्टीनें अवलोकन करूं या. कारण दोन्ही संस्कृतींच्या यथार्थदर्शनानें नवी दृष्टि प्राप्त होणारी असली व परक्या वाटणाऱ्या संस्कृतींतील इष्ट भाग आत्मसात् करण्याची मनोभूमिका तयार होणार असली तरी आज ही परकी संस्कृति आमचें स्वातंत्र्य अपहार करणाऱ्या परक्याच्या मुखानें बोलते आहे हें केव्हांहि विसरणें शक्य नाहीं. नव्या शास्त्रीय संस्कृतीची व जुन्या भारतीय संस्कृतीची गाठ जी पडली ती एक जेती व दुसरी जिता अशा नात्यानें पडली आहे. या विशिष्ट परिस्थितीमुळें या दोन संस्कृतींच्या उपासकांमध्यें परस्परांविषयीं जे दुराग्रहमूलक गैरसमज उत्पन्न झाले त्यांचें स्वरूप प्रथम अवलोकन केलें पाहिजे. तेव्हां जेते जे पाश्चात्य त्यांनीं आपल्या

भारतीय संस्कृतीची अवहेलना, उपहास कसा आणि किती रीतींनीं केला, त्यांच्या आहारीं जाऊन आपल्यापैकींच कांहींनीं त्यांच्या सुराशीं आपला सूर कसा मिळवून दिला, या प्रकाराची प्रतिक्रिया म्हणून आपणांपैकीं कांहींनीं परकीयांना उलट अहेर कसा केला व पाश्चात्यांतील कांहींनीं तो अहेर कसा योग्य म्हणून स्वीकारला; ह्या सर्व चित्रपटावरून क्षणभर नजर फिरवूं या म्हणजे मनाची मळमळ कमी होऊन मन साफ, शुद्ध व धीट होण्यास मदत होईल.

# प्रकरण दुसरें

# संगमावरील आघात

पाश्चात्य संस्कृतीचें जें आक्रमण गेलीं शें-दीडशें वर्षें सुरू आहे त्यांत भारतीय संस्कृतीला पहिली जबरदस्त ठोकर बसली ती तिचें राजकीय स्वातंत्र्य नष्ट होण्यांत बसली.

जो स्वातंत्र्यहरण करूं शकतो त्याला दुरुत्तरें बोलण्याचा अधिकार प्राप्त होतोच, आणि तो गाजविण्याचें अवसानहि पण चढतेंच. तेव्हां त्यानें भारतीयांच्या पराक्रमाबद्दल व पौरुषाबद्दल हेटाळणीनें उल्लेख न केला तरच आश्चर्य. त्यांतहि विशेष हें कीं, अहंकार, गर्व, उद्दामपणा हीं व्यक्तींत एकपट असलीं तर राष्ट्रांत शतपट असतात. यामुळें एका राष्ट्रानें दुसऱ्याला रणांगणावर जिंकलें म्हणजे जेत्या राष्ट्राच्या मनांत जित राष्ट्राविषयीं पराकाष्ठेची तुच्छताबुद्धि उत्पन्न व्हावी हें स्वाभाविक होऊन बसतें. व्यक्तीला आपला अहंकार व दुसऱ्याविषयीं तुच्छबुद्धि मिरविण्याला जनलज्जेची व मनलज्जेची थोडी तरी मर्यादा असते; पण एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राची निंदा करूं लागलें म्हणजे तें इतकें बेताल होऊं शकतें, कीं लज्जेलाच तेथें उभें राहण्याची लाज वाटावी. हा बेतालपणा कोठवर जाऊं शकतो हें कांहीं वर्षांपूर्वी मेयोबाईनीं एक पुस्तक लिहून हिंदुस्थानांतील शेंकडा नव्वद पुरुषांचें पौरुषत्व तीस वर्षांच्या आंतच संपुष्टांत येतें, व येथील स्त्रियांना आठव्या वर्षी मुलें होतात असलीं आचरट विधानें केलीं होतीं त्यांवरून प्रत्ययास चांगलें आलें होतें. मेयोबाई ह्या प्रवृत्तीचें एक अतिरिक्त उदाहरण होय. म्हणून मेयोनें हिंदु संस्कृतीला मोजलेल्या शिव्या ह्या उद्धृत करण्याच्याहि योग्यतेच्या नाहींत. पण जित राष्ट्रांच्या

संस्कृतीच्या हरएक अंगोपांगाविषयींची हीनबुद्धि ही जेते राष्ट्रांच्या रक्ताशीं इतकी एकजीव होते, कीं विचारवंतांवरहि तिचा पगडा बसल्याशिवाय राहत नाहीं, स्वतःची व्यक्तिविषयक थोरवी गातांना विचारवंतांना थोडा तरी संकोच उत्पन्न झाल्याविनां राहत नाहीं; पण व्यक्तीऐवजीं व्यक्तिसमूहाची अथवा राष्ट्राची थोरवी गातांना जित राष्ट्राचा उल्लेख हेटाळणीनें करण्यांत विचारवंताचीहि बुद्धि ढळूं शकते. **किंबहुना व्यक्तिविषयक अहंकार मिरविण्याविषयींची जी वासना नैतिक कल्पनांनीं दडपून टाकलेली असते ती वासना सामुदायिक अहंकाररूपानें पुरविली जाते, असेंहि म्हणतां येईल.**

या वासनेचा आविष्कार पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतीच्या झगड्यांत रांगडेपणानें वावरत असलेला पाहावयास सापडतो.

हेटाळणीच्या भावनेनें प्रथम राजकारणाला झपाटावें हें स्वाभाविक. जितांना रणांगणावरच प्रत्यक्ष जिंकल्यानें जितांच्यामध्यें स्वातंत्र्य-भावनाच हीन दर्जाची असली पाहिजे असें अनुमान सकृद्दर्शनींच सुचूं शकतें आणि तें स्पष्ट शब्दांत मांडलेंहि गेलें आहे. 'Political Theories of the Ancient World' या पुस्तकाचा कर्ता वुलोबी हा लिहितो कीं, "व्यक्ति-स्वातंत्र्याची चळवळ भरतखंडांत कधींच झालेली नाहीं. इतकेंच नाहीं तर या कल्पनेचा उदयहि भरतखंडांत कधीं झालेला नाहीं." सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता हेगेल यानेंहि लिहिलें कीं, ज्यामुळें बंड करण्याची प्रवृत्ति अंतःकरणांत उद्भूत होते त्या स्वातंत्र्य-कल्पनेची जाणीवच हिंदु लोकांना झालेली नाहीं. मॅक्समुल्लरचाहि हाच ग्रह झालेला होता. मॅक्समुल्लर हा एरवीं भारतीय संस्कृती-कडे सहानुभूतीनें पाहणारा विद्वान् होय. पण त्यानेंहि उद्गार काढले आहेत कीं, "भारतीय लोक म्हणजे नुसते तत्त्वज्ञ, ते तत्त्वज्ञानांत इतके गढून गेलेले असतात, कीं ज्या व्यावहारिक गुणांनीं राष्ट्राचा दर्जा वाढतो त्या गुणांची जोपासना करण्याकडे त्यांनीं लक्षच दिलें

नाहीं. आत्म्याच्या उन्नतीवर लक्ष देऊन व्यवहाराला इतकें पारखें झाल्याचें उदाहरण जगांत क्वचितच आढळेल."

आणि ज्याला व्यवहार साधत नाहीं, राजकारण सिद्धीस नेतां येत नाहीं, रणांगणावर पराक्रम गाजवतां येत नाहीं, तो जगाच्या बाजारांत एकंदरीनें मागसलेला, रानटी समजला न गेला तरच नवल. शिक्षण-शास्त्राचा इतिहासकार ग्रेव्ह्ज यानें हिंदु लोकांवर असाच शेरा मारला आहे. तो लिहितो कीं, "हिंदूंचीं एकंदर बौद्धिक व आध्यात्मिक प्रवृत्ति कितीहि आश्चर्यकारक असली तरी हिंदु लोक हे मासलेवाईक रानटीच होत (Typically barbarious). आश्चर्यकारक बौद्धिक प्रगति करणारे लोक हे रानटी कसे असूं शकतात हें शिक्षणशास्त्रज्ञ साहेबमजकूरच जाणूं शकोत. पण हिंदूंचा व्यवहार फसला ना? त्यांना स्वातंत्र्य टिकवितां आलें नाहीं ना? मग त्यांनीं रानटी हें एवढेंच विशेषण काय, पण याहीपेक्षां कटुतर विशेषणेंहि ऐकून घेतलीं-च पाहिजेत. हाच ग्रेव्ह्ज पुन्हा लिहितो कीं, "हिंदूंच्या शिक्षणांत मानसिक उन्नति किंवा जीवनाची तयारी यांचा विचारच केलेला नाहीं. व्याकरण, अलंकार, गणित, ज्योतिष वगैरे शास्त्रांत ब्राह्मणांनीं बरीच प्रगति केली होती हें खरें; पण साकल्यानें पाहतां ऐहिक ऐश्वर्य व सुधारणा या कल्पनांना ते पारखेच होते." (to the Hindus prosperity, progress are foreign ideas.)

ग्रेव्ह्जनें शिक्षणाचा इतिहास लिहितांना हिंदूंच्या पदरीं बौद्धिक प्रगतीचें तरी पुण्य बांधलें आहे. पण हिंदुस्थानांतील शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरविणाऱ्या मेकॉलेला ही प्रगतिहि बिलकूल मान्य नव्हती. मनगटाच्या जोरावर हिंदूंना जिंकलें असल्यामुळें, बंगाली लोकांविषयीं ते सुस्त, बसे, नामर्द लोक होत असे उद्गार तर त्यानें काढलेच; पण हिंदु लोकांच्या एकंदर वाङ्मयासंबंधानें जें मत ठोकून दिलें, तसलें अज्ञानमूलक, दुराग्रस्त आणि निरर्गल मत ऐकून मेकॉलेच्या दर्जाच्या कोणाहि साहित्यिकाला लाजेनें मान खालीं घालवीशी वाटेल. पण

मेकॉलेच्या डोळ्यांवर जेतृत्वाची धुंदी चढलेली होती. आणि धुंद माणसासारखेंच तो बरळलाहि पण आहे. हिंदुस्थानांतील लोकांना शिक्षण द्यावयाचें तें कोणतें द्यावें, जुन्या परंपरेचें संस्कृतमधील शिक्षण द्यावें, कीं नवीन पाश्चात्य धर्तीचें द्यावें असा मेकॉलेपुढें प्रश्न होता. त्या प्रश्नावर रिपोर्ट लिहितांना जुन्या भारतीय शास्त्रकला, वाङ्मय यांविषयीं त्यानें जीं मुक्ताफळें उधळलीं तीं मोठीं मासलेवाईक आहेत. तो लिहितो, "आपणांपुढें आज प्रश्न आहे तो हा, कीं युरोपियन विद्येसारखी विद्या व वाङ्मय लोकांस उपलब्ध करून देण्याचें व तेंहि इंग्रजीसारख्या संपन्न भाषेच्या द्वारें हातीं असतां, ज्या भाषेंत आमच्या ग्रंथांसारखे ग्रंथ नाहींत व ज्या भाषेंतील ग्रंथांची किंमत त्याच्या कागदाइतकीहि नाहीं, त्या भाषेंतील बाष्कळ ग्रंथ आपण शिकवीत बसवावें कीं काय ? आर्यवैद्यकशास्त्र घ्या. सामान्य इंग्रज नालबंदहि त्याहून चांगलें वैद्यक जाणतो आणि आर्यज्योतिष-शास्त्राविषयीं म्हणाल तर, आमच्या शाळेंतील परकर नेसणाऱ्या पोरीहि या ज्योतिषशास्त्रांतील सिद्धान्त ऐकून फिदीफिदी हसतील. असली ही बाष्कळ विद्या मुलांना पढविण्याला जर आम्हीं सरकारी पैसा खर्च केला तर धिक्कार असो आमच्या सुधारणाप्रियतेला !" आहे कीं नाहीं मासलेवाईक अभिप्राय? ज्या ग्रंथांवर मेकॉलेनें हा अभिप्राय झोडला आहे त्या ग्रंथांचीं मुखपृष्ठें तरी त्यानें अवलोकन केलीं होतीं कीं नाहीं येशू जाणे! पण उर्मट अहंकारालाच न्यायासनावर बसविलें तर तो वरीलपेक्षां निराळा निर्णय देणार कसा ?

मेकॉले हा कोठल्याच शास्त्रांतला तज्ज्ञ नव्हता. तेव्हां सर्वच शास्त्रांवर अभिप्राय देण्यास त्यानें प्रवृत्त होणें म्हणजे शुद्ध रांगडें धाडस होतें. म्हणूनच बेछूट अज्ञान व उर्मट अहंकार काय बरळूं शकतात हें दर्शविण्याइतकीच मेकॉलेच्या अभिप्रायाची किंमत. पण मेकॉलेसारखा भरमसाट लेखक सोडला व त्या त्या विषयांतील अभ्यासू लेखक घेतले, तरी त्यांच्यांतहि अज्ञान आणि अहंकार यांचा खेळ कमी पाहावयास

सापडतो असें नाहीं. रस्किन हा एक अव्वल दर्जाचा कलाकोविद म्हणून प्रख्यात आहे. त्यानेंहि भारतीय कलेविषयीं जो शेरा दिला आहे तो युरोपियनांना इतर देशांविषयीं वाटणाऱ्या तुच्छबुद्धीला साजेसाच आहे. 'व्हेनिसचें शिल्प' या ग्रंथांत तो लिहितो कीं, "हिंदूंचें मूर्तिशिल्प म्हणजे विक्षिप्त, भेसूर व रानटीपणाचा अर्क होय. या मूर्तींपेक्षां अधिक रानवट मूर्ति पॅसिफिक बेटांतील अगदीं जंगली लोकांतच काय त्या सापडतील." रस्किननें हा शेरा दिला तो भारतीय-शिल्पकलेचे जे चार वेडेवाकडे नमुने ब्रिटिश अजबखान्यांत मांडलेले असतील तेवढे पाहूनच दिला असावा. सांची, भारहूत, अजंठा वगैरेंतील शिल्पाचा रस्किनच्या काळीं बोलबाला झालेला नव्हता. पण ज्यांनीं भारतीय शिल्पाचे नमुने पाहिले होते अशा बर्डवुडनेंहि रस्किनसारखाच अरसिक अभिप्राय दिला आहे हें आश्चर्य! हिंदु देवतांच्या मूर्तींचें ध्यान दाखवावयाचें तें ध्यानस्थ व नासाग्रदृष्टि असलेलें असें दर्शविण्याची पूर्वपरंपरा आहे. या प्रकारांतलें मर्म न ओळखून बर्डवुड लिहितो कीं, शून्य दृष्टीनें नाकावरून खालीं हाताकडे पाहणाऱ्या या मूर्ति म्हणजे शुद्ध अर्थशून्य निर्बुद्धतेच्या प्रतिमा होत. निर्विकार पावित्र्य आणि अगाध शांति, येवढेंच या शिल्पकारांना दिग्दर्शित करावयाचें होतें तर शिलेवर खोदकाम करण्याचे श्रम तरी त्यांनीं कशाला घेतले कोणास ठाऊक! नुसता शिजवलेल्या उकडीचा गोळाच मूर्ति म्हणून स्थापला असता तरीहि भागलें असतें. निर्विकारताच हवी असेल तर अशा गोळ्यांत निर्विकारता मूर्तिमंत आढळेल. (A boiled suit pudding would serve equally well as a symbol of passionless purity and serenity of soul.)

ज्यांची कला इतकी हीन दर्जाची त्यांना कलाविषयक सौंदर्यदृष्टि असेल, किंवा त्यांनीं या सौंदर्याची मीमांसा केली असेल हें सुतराम् अशक्य. एतद्विषयक मॅक्समुलर लिहितो कीं, 'चित्रकलेंत किंवा शिल्पकलेंत हिंदूंनीं चमक अशी कधीं दाखविली नाहींच. पण हरएक प्रकारच्या

तात्त्विक वादाचा कीस काढण्यांत रंगणाऱ्या भारतीयांनीं सौंदर्याच्या तात्त्विक मीमांसेंत मुळींच लक्ष दिलेलें नसावें हें आश्चर्य नव्हे काय?'

हिंदुस्थानची विशेष ख्याति कशाविषयीं असेल, तर ती वेदान्त अथवा तत्त्वज्ञानाची जी सुंदर प्रणाली हिंदु ऋषींनीं निर्माण केली तीबद्दल. या क्षेत्रांत तरी त्यांना धन्यवाद मिळावे ना? पण अज्ञान आणि दूषितग्रह यांनीं दोन्ही बाजूंनीं गळा दाबल्यावर धन्योद्‌गार बाहेर पडावे कसे? शुद्ध ज्ञानविज्ञान प्रथम कोठल्या भूमींत अवतरलें असेल तर तें फक्त ग्रीसमध्यें. ईजिप्त, हिंदुस्थान, चीन वगैरे राष्ट्रें ग्रीसपेक्षां वृद्ध अशीं राष्ट्रें आहेत खरीं. धर्म, तत्त्वज्ञान वगैरेसंबंधीं विचारहि त्यांनीं केलेला आढळतो हेंहि खरें. पण तात्त्विक विचारसरणीला खरा रेखीव शास्त्रीय घाट प्रथमच प्राप्त झाला तो फक्त ग्रीसमध्यें. अशा प्रकारची विचारसरणी सर्वसामान्यपणें पाश्चात्य विद्वानांमध्यें रूढ आहे. याचें उदाहरण म्हणून तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिणारे अमेरिकन विद्वान् प्रो. ब्रॅकथिली यांचे उद्गार देतां येतील. हे ग्रीसबाहेरील, भारतीय, चिनी वगैरे तत्त्वज्ञानाविषयीं काय उद्गार काढतात तें पाहा. ते लिहितात कीं, "तत्त्वज्ञानाचा जागतिक स्वरूपाचा इतिहास लिहावयाचा तर तो सर्व देशांतील तत्त्वज्ञानाचा लिहावा लागेल; पण सर्व देशांत पद्धतशीर विचारसंपदा निर्माण झालीच कोठें? कांहीं देशांत दैवतवादापलीकडे विचाराची परिणति गेलेलीच नाहीं. हिंदुस्थान, ईजिप्त, चीन ह्या प्राच्य देशांतील तत्त्वज्ञान हें मुख्यतः दैवतविषयक नैतिक कल्पनांच्या स्वरूपाचेंच आढळतें. **त्यामुळें त्यांना तत्त्वज्ञानांतील तर्कशुद्ध दर्शनें म्हणतां येणार नाहीं.** त्यांच्या तत्त्वज्ञानांत काव्य आणि शब्दप्रामाण्य यांची भेसळ फार आहे. त्यामुळें आम्ही आमच्या इतिहासांत ग्रीस-पासून सुरू होणाऱ्या पाश्चात्य तत्त्वज्ञानाचाच तेवढा विचार करणार आहों." आहे कीं नाहीं धाष्टर्य! पौर्वात्य तत्त्वज्ञानाविषयीं आपलें अज्ञान झाकण्यासाठीं या बहाद्दरानें पौर्वात्य तत्त्वज्ञानावर अशास्त्रीय असा शेरा ठोकून दिला आहे.

वरीलपेक्षां अधिक अर्वाच्य मत पाहावयाचें असल्यास उपनिषदांचें भाषांतर करणाऱ्या डॉक्टर गो (Gough) या विद्वानाचें पाहा. उपनिषदांविषयीं तो लिहितो कीं, "हीं उपनिषदें म्हणजे मागासलेल्या काळच्या, बुरसलेल्या आणि प्रगतिविन्मुख अशा लोकांचे ग्रंथ होत." (They are the works of a detereorated race and a barbarious unprogressive community.)

धार्मिक बाबतींत तरी हिंदूंच्याविषयीं चार चांगले उद्गार काढतां येतील का? छे! नांव कशाला. हिंदु ही जातच मुळीं रानटी. या रानटी माणसाच्या मगजांत कोणताहि उच्च विचार उद्भवणेंच कठीण. हिंदूंच्या धार्मिकतेबद्दल कांहींनीं उगीचच हूल उठविली आहे. कारण हिंदु हे मनानें, वृत्तीनें धार्मिक आणि आध्यात्मिक होत वगैरे समजुती म्हणजे शुद्ध थोतांड होय असा निर्वाळा एका बहाद्दरानें दिला आहे. हे बहाद्दर म्हणजे बर्नार्ड शॉ साहेबांचे एक मित्र व इंग्लंडांतील एक नांवाजलेले पत्रपंडित वुइल्यम आर्चर हे होत. यांनीं हिंदुस्तानविषयक एक पुस्तक लिहिलें आहे (India and The Future). पुस्तक फार जुन्या काळीं लिहिलेलें आहे असें नाहीं. सुमारें पंचवीस वर्षेंच झालीं. म्हणजे हिंदूंच्या धर्म-तत्त्वज्ञान वगैरेचा चांगला परिचय युरोपियनांना झाल्यानंतर लिहिलेलें आहे. पण जितराष्ट्रांमध्यें कोणताच गुण असूं शकत नाहीं अशी अढी मनांत बसल्यानें हा लेखक हिंदूंच्या धार्मिकतेबद्दल बेफिकीरपणें लिहितो कीं. "हिंदूंची दानत कोठल्या विषयांत विशेष खालावलेली असेल, हिंदु संस्कृतीचें कोणतें अंग विशेष विकल झालेलें असेल, तर तें धर्मविषयक होय. हिंदूंनीं पराक्रम गाजविला असेल तर तो आध्यात्मिक प्रवृत्तीचा विकास करण्यांत नसून शुद्ध व सकस अशा अध्यात्मतेच्या गळ्याला नख लावण्यांतच गाजविला आहे. म्हणून माझें तर असें स्पष्ट मत आहे कीं, हिंदु हे मोठे आध्यात्मिक प्रवृत्तीचे आहेत असें प्रतिपादणें म्हणजे शुद्ध धादान्त वदतोव्याघात होय. (I hold it the acme of paradox

to claim for the Hindus an exalted spirituality.)

हिंदूंच्या व विशेषतः हिंदु स्त्रियांच्या नीतिमत्तेबद्दलहि कुत्सित टीका करण्याची हौस कांहींनीं भागवून घेतली आहे. अशा एका साहेब-बहादुरांचें नांव अॅशबर्नर होय. पुनर्विवाहाच्या कायद्याविषयीं लोकांत वादविवाद चालू असतां या साहेबांनीं नॅशनल रिव्ह्यूमध्यें लेख लिहून असें प्रतिपादलें होतें कीं, पुनर्विवाहाचा कायदा हिंदु विधवांनाच मान्य होणार नाहीं. कारण वैधव्यदशेंत त्यांना व्यभिचाराचा जो सदर परवाना मिळालेला असतो तो गमावून पुनश्च विवाहाच्या बंधनांत त्या पडतीलच कशाला? **हिंदु विधवा म्हणजे बोलून चालून सनदी स्वैरिणी** " (Chartered Libertines). हे स्वैरोद्गार वाचून सुधारकाग्रणी आगरकर तळतळून लिहितात— "आमच्या हतभाग्य हिंदु विधवांवर अॅशबर्नर यांनीं जे असभ्य, खोडसाळ व असत्यप्रचुर आरोप लादले आहेत ते लादण्याइतक्या नीचतर पदावर साहेब-मजकूर घसरतील असें कोणासहि वाटलें नसेल. अलीकडील चळ-वळीपासून आपल्यावर मोठा अनर्थ कोसळेल म्हणून वेडावून जाऊन नेटिव्हांवर अद्वातद्वा आरोप आणणारे इंग्रजबहाद्दर आमच्या पाहण्यांत पुष्कळ आहेत. परंतु या द्वेषामुळें हिंदु स्त्रियांची विटंबना करण्यास प्रवृत्त झालेले फारसे आढळत नाहींत... गुलामांचा व्यापार सुरू ठेवण्याविषयीं आस्था बाळगणाऱ्या कांहीं इंग्रज मुत्सद्द्यांनीं काळ्या कातड्याचे लोक गोऱ्यांच्या सेवेकरितांच ईश्वरानें सृजिले आहेत म्हणून जसें एक महातत्त्व शोधून काढलें होतें तसें सुधारलेल्या गोऱ्या लोकांच्या थट्टेकरितांच ईश्वरानें हिंदु स्त्रियांस वैधव्य आणलें आहे असें एखादें अपूर्व तत्त्व हिंदुद्वेष्ट्यानें नवीन शोधून तर काढलें नाहीं ना? नाहीं तर हिंदु विधवांस वाटेल तसा अनाचार करण्यास समाजानें पूर्ण सनद दिली असल्यानें असलीं अत्यंत स्पृहणीय व अप्रतिबंध अशी स्वच्छंदपणाची आयती मिळालेली वृत्ति सोडून

देऊन पुनर्विवाहाच्या कायद्याचा आश्रय त्या कां म्हणून करतील असे शब्द साहेबमजकुरांच्या लेखणींतून खचित निघाले नसते.”
--( आगरकर-निबंध, भाग २ )

हिंदु स्त्रियांची खोटी नालस्ती करणारा दुसराहि एक साहेब आगरकरांना आढळला. त्याचा उल्लेख त्यांनीं केला आहे तोच ‘आणखी एक शहाण्याचा कांदा’ अशा शेलक्या शब्दांनींच. हा साहेब एक लष्करी अमलदार असून गायनविद्येचा षोकी होता. त्याचें नांव वुइलियर्ड. यानें ‘हिंदुस्थानचें संगीत’ या नांवाचा ग्रंथ लिहिलेला आहे. त्यांत वस्तुतः गायनविद्येचीच तेवढी चर्चा यावयास पाहिजे. पण जातां जातां हिंदूंना दोन टोले लगावण्यासारखी कांहीं संधि प्राप्त झाली असतां, तो ती काय म्हणून टळून देईल? आणि तशी संधि त्याला सापडलीहि. या गायकी चिजा बहुधा सर्व शृंगारपर असून त्यांचा एकंदर थाट लावणीच्या स्वरूपाचा असतो हें सुशिक्षितांस सांगावयास नकोच. आतां प्रत्येक देशांत आणि प्रत्येक कालांत उत्तान शृंगारपर लावणी-वाङ्मयाची निपज होतच असते. आणि समाजाच्या कांहीं थरांतून त्याचा विशेष प्रचारहि असतो. पण त्या चिजांमधून वर्णिलेली परिस्थिति ही सर्व समाजाची प्रातिनिधिक म्हणून कोणी समंजस मानीत नाहीं. पण वरील ‘शहाण्याच्या कांद्यानें’ नेमकें हेंच केलें आहे. नायकिणीच्या तोंडीं असणाऱ्या हिंदुस्थानी संगीतांतील शृंगारिक चिजांवरून त्यानें असा सिद्धान्त बांधला आहे कीं हिंदुस्थानांतील स्त्रिया या अत्यंत कामलोलुप असल्या पाहिजेत आणि जावा-नणंदांचा डोळा चुकवून वल्लभाची संकेतस्थळीं गाठ घेण्यांत मोठ्या निष्णात असल्या पाहिजेत! येवढा महत्त्वाचा शोध हातीं लागल्यामुळें या लष्करी सुभेदाराला आपण समाजशास्त्रज्ञ म्हणूनहि मिरवूं शकूं असें वाटून त्यानें वरील परिस्थितीची कारणमीमांसाहि दिली आहे, कीं हिंदु स्त्रिया कामातुर होऊन व्यभिचार करण्यास प्रवृत्त होतात, त्या हिंदुस्थानांतील सामाजिक अत्यवस्था, अनेक बायका करण्याची चाल, व

स्त्रियांचें गाढ अज्ञान या कारणत्रयीमुळें होत असाव्यात. आगरकरांनीं साहेबांना एवढेंच उलट खडसून विचारलें आहे कीं, 'मिस्टरीज ऑफ दि कोर्ट ऑफ लंडन' या रेनॉल्ड्सच्या कादंबऱ्यांवरून इंग्रजांच्या नीतिमत्तेविषयीं कोणी अनुमान बांधलें तर साहेबांना तें न्याय्य वाटेल काय? आगरकरांच्या वेळीं अमेरिकन न्यायाधीश लिंडसे यांचीं तरुण-तरुणींच्या अनैतिक लीला वर्णन करणारीं पुस्तकें निर्माण झालीं नव्हतीं; नाहीं तर त्यांनीं त्यांतील व्यभिचाराचे शेलके मासले वुइलियर्डच्या तोंडावर मोजून मारण्यास कमी केलें नसतें. वस्तुतः गायनकलेच्या इतिहासावर वुइलियर्डनें पुस्तक लिहावयास घेतलेलें, त्यांत हिंदूंच्या चालीरीतींचा ऊहापोह पाहिजेच कशाला? पण आपल्या जातीच्या वर्चस्वाचा अहंकार ही एक नशा आहे. ती चढली असली म्हणजे हरकोणा विषयांत परकीयांविषयीं तुच्छतेनें गरल ओकल्याशिवाय ती राहत नाहीं.

व्याकरण हा विषय तर तुम्ही सोवळा समजाल ना? पण एका व्याकरणकारालाहि हिंदूंना कोपरखळी मारण्याची लहर आलेली दाखविली तर काय म्हणाल? हा व्याकरणकारहि असा तसा नव्हे तर आधुनिक आर्यभाषांचें तौलनिक व्याकरण लिहिणारा सुप्रसिद्ध बीम्स हा होय. ओरिया भाषेचा अभ्यास करतांना त्या भाषेत त्याला कांहीं मराठी शब्द आढळले. आणि ते शब्द निघाले तेहि मराठ्यांचा दरारा प्रगट करणारे. झालें! येवढ्यावरून साहेब गरम झाले व त्यांनीं प्रवचन झोडलें कीं, " हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्य जारी होऊन आज ७० वर वर्षें होऊन गेलीं तरी मराठ्यांनीं केलेल्या लुटारूपणाच्या आणि जुलमाच्या खाणाखुणा ओरिसाच्या भाषेत अद्यापीहि नष्ट झालेल्या नाहींत. भोसल्यांनीं बांधलेले तलाव, बंधारे, पूल, रस्ते अजूनहि शाबूत आहेत आणि त्या सर्वांची बांधणी ऐश्वर्यसंपन्न राजाधि-राजाला शोभेल अशा थाटाची आहे." हें वाक्य वाचून तुम्हांला वाटेल, बीम्स हा तर भोसल्यांची स्तुति करतो आहे. पण थांबा;

असा भलताच प्रकार बीम्स करील असें समजूं नका. कारण तो पुढें काय लिहितो तें ऐका. तो म्हणतो— “पण भोसल्यांचीं कामें ऐश्वर्य-संपन्न नसायला झालें काय? कारण सर्व कामें वेठीनें करून घेऊन कामगारांच्या हातीं नरोटी ठेवणें, ही तर त्यांची पद्धत; मग थाटाचीं कामें उडवून दिलीं तर नवल कसलें? आमच्या ब्रिटिशांचीं सार्वजनिक कामें हलक्या दर्जाचीं म्हणून नाक मुरडणारांनीं हा लहानसा मुद्दा ध्यानीं धरावा. आम्ही जीं कामें करून घेतों त्यांची पैन् पै चुकती करतों.”— (**राजवाडे ज्ञानेश्वरी प्रस्तावना**)

हिंदूंची नालस्ती करण्याची ही लाट एकीकडे उसळत असतां दुसरीकडे एक अशी महत्त्वाची घटना घडून येत होती कीं, त्यामुळें या नालस्तीवाल्यांना आपला पहिला मोकळ्या मैदानावरील पवित्रा बदलून गनिमी काव्यानें हिंदूंना नामोहरम करण्याचा नवा पवित्रा स्वीकारावा लागला. ही महत्त्वाची घटना म्हणजे संस्कृत वाङ्मयाचा युरोपमध्यें दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाणारा पद्धतशीर अभ्यास ही होय. या वाङ्मयाचा आस्थापूर्वक अभ्यास करण्याकडे प्रवृत्ति होण्याचें कारण म्हणजे हें वाङ्मय उपलब्ध वाङ्मयांत प्राचीनांतील प्राचीनतम आहे हें होय. भारतीयांचे वेदग्रंथ हे अखिल जगांतील जुन्यांतील तें जुनें वाङ्मय होय. हें उमगल्याबरोबर मानवी संस्कृतीचा प्राचीन इतिहास रचण्यांत या वाङ्मयाचा बिनमोल उपयोग होईल हें ध्यानीं येण्यास वेळ काय लागणार? शिवाय जर्मन, लॅटिन, ग्रीक या भाषांतील कांहीं महत्त्वाच्या शब्दांचीं पूर्वरूपेंहि संस्कृतमध्यें सापडतात, हा शोध लागतांच भाषाशास्त्राच्या दृष्टीनें ही संस्कृत वाङ्मयाची थोरवी फार श्रेष्ठ दर्जाची ठरली गेली आणि संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासास जोरानें चालना मिळाली. या वाङ्मयाचा वरवर अभ्यास करणाराच्या तोंडूनहि मेकॉलेनें काढले तसले आचरट उद्गार निघणें शक्य नव्हतें. मग ज्यांनीं खोल अभ्यास केला ते तर विस्मित व्हावेत यांत नवल कसलें?

आधुनिक भाषाशास्त्राचें बीजारोपण तर संस्कृत भाषेच्या अभ्यासा-

नंतरच झालें. त्या भाषेंतील पाणिनीच्या व्याकरणाचें शास्त्रीय स्वरूप अवलोकून युरोपिअन व्याकरणकारांनीं तोंडांत बोटें घातलीं. भाषेला इतकें नियमबद्ध रूप देतां येईल याची त्यांना त्यापूर्वी कल्पनाहि नव्हती. भारतीयांची नुसती वर्णमाला घेतली व तिच्यांतील अक्षरांची कंठतालव्य वगैरे स्थानभेदानें केलेली शास्त्रशुद्ध मांडणी पाहिली तरीहि युरोपांत प्रचलित असलेली केवळ सव्वीस अक्षरांची पांगळी रोमन वर्णमाला व तिच्यांतील अक्षरांची हेंगाडी मांडणी याबद्दल युरोपियन पंडितांना मान खालीं घालण्याचा प्रसंग आला. संस्कृत वाङ्मयाचा इतिहासकार मॅक्डोनेल लिहितो कीं, "भारतीयांची वर्णमाला पाणिनीच्या पूर्वींच पूर्णत्वास पोंचलेली होती, तर आम्ही युरोपियन लोक, पाणिनीला पंचवीस शतकें लोटलीं तरी अद्याप रोमन वर्णमालेला– कीं जिच्यांत सर्व उच्चार प्रगट करण्याचें सामर्थ्य नाहीं आणि जिच्या मांडणींत कोणतीहि पद्धति नाहीं अशा तीन हजार वर्षांपूर्वी ग्रीक लोकांनीं सेमिटिक लोकांकडून घेतलेल्या वर्णमालेलाच चिकटून आहोंत!"

संस्कृत वाङ्मय हें एक अमोलिक रत्नभांडार आहे याची एकदां कल्पना आल्यावर अमेरिकेंतील सुवर्णाच्या खाणींवर युरोपियन व्यापारी जसे तुटून पडले तसे युरोपियन पंडित संस्कृत-सुवर्ण आत्मसात् करण्याकरितां बद्धपरिकर झाले. त्यांनीं धर्मशास्त्राचा अभ्यास केला, तत्त्वज्ञान पालथें घातलें, काव्य-नाटकांत अवगाहन केलें, वैद्यक-ज्योतिषादि शास्त्रांचा आढावा घेतला. मेकॉले म्हणे कीं, युरोपियन भाषेंतील एखादें साधें चोपडेंहि संस्कृतमधील या वाङ्मय-प्रपंचाच्या श्रीमुखांत देऊं शकेल. मेकॉलेनें संस्कृत वाङ्मयाचें मुख अवलोकन केलेलेंच नसावें म्हणून तो असें बरळूं शकला. पण आस्थेवाईक पंडित व अभ्यासू या गीर्वाण वाङ्मयाच्या मुखाकडे पाहूं लागले तेव्हां त्यांना यशोदेला श्रीकृष्णाच्या मुखांत दिसला त्याप्रमाणें विश्वाला व्यापणारा वाङ्मय-विस्तार दिसूं लागला. संस्कृताचा अभ्यास

प्रथम इंग्रज पंडितांनीं सुरू केला असला तरी या सारस्वताचें महोदरत्व कळून येतांच जर्मन-फ्रेंचादि इतर देशांतील विचारवंतांच्याहि त्याच्यावर उड्या पडूं लागल्या. १८२३ सालींच जर्मन पंडित श्लेजेलनें लिहिलें कीं, "संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासाचा मक्ता फक्त इंग्रज पंडितांकडेच राहील म्हणतां? मुळींच नाहीं. लवंगा-वेलदोड्याचा मक्ता त्यांनीं वाटल्यास आपल्या हातचा सोडूं नये; पण संस्कृत सारस्वत हें आतां कोणाच्या मिरासदारीचें उरलें नसून सर्व सुशिक्षित जगाच्या मालकीचें झालें आहे."

श्लेजेलचें हें भविष्य शब्दशः खरें ठरलें. यापुढें भारतीय संस्कृतीचा अभ्यास इंग्लंडपेक्षां अन्यत्रच अधिक फोफावला. तो इतका कीं श्लेजेलनंतर ऐंशी वर्षांनीं "बुद्धकालीन भारत" या ग्रंथाचा कर्ता व प्रसिद्ध पाली पंडित ऱ्हिस डेव्हिड याला आपल्या प्रस्तावनेंत मोठ्या खेदानें लिहावें लागलें आहे कीं, "पॅरिस, बर्लिन, व्हिएन्ना, सेंट पीटर्सबर्ग वगैरे स्थळीं पौर्वात्य संस्कृतीच्या अभ्यासाकरितां मोठमोठ्या संपन्न संस्था स्थापन झालेल्या आहेत, तर इंग्लंडमध्यें मात्र या विषयाची गोडी असणारा कोणी निघाला तर त्याला पोट बांधून काम करावें लागतें. इंग्लंडमध्यें संस्कृतच्या प्राध्यापकांच्या जागा दोन आहेत. तर जर्मनीमध्यें अशा सरकारी जागा चांगल्या विसांवर आहेत. हें आश्चर्य नव्हे काय? आमच्यापेक्षां जर्मनीचे हितसंबंध भरतखंडांत अधिक गुंतलेले आहेत असें तर नव्हे?"

संस्कृत वाङ्मयाच्या या वाढत्या मोहिनीमुळें प्रतिनिविष्ठ पंडितवर्ग डोळे चोळूं लागला. रानटी म्हणून ज्यांना आपण लेखीत आलों त्या लोकांमध्यें उत्तम वाङ्मय, उत्कृष्ट कला आणि प्रौढ शास्त्रें आढळावीं म्हणजे काय? या विचारानें पंडितांचीं डोकीं सुन्न झालीं. प्रज्ञेचें आणि प्रतिभेचें देणें कोणत्या संस्कृतीला मिळालें असेल तर तें फक्त युरोपिअन संस्कृतीला. इतर संस्कृतींना त्याचें दर्शनहि घडलें नाहीं. अशा पूर्वग्रहानें मनामध्यें पक्कें ठाणें दिलेलें. मग भारतीयांच्या बौद्धिक

थोरवीची उपपत्ति लावावी तरी कशी असें या पंडितांना मोठें कोडें पडलें. भारतीय संस्कृतीचा निकट परिचय झाल्यावर तिचें ऐश्वर्य आणि वैभव नाकारण्याची सोयच उरली नाहीं. तिच्या अंगावरील अलंकार शंखशिंपांचे नसून हिऱ्यामोत्यांचे आहेत हें मान्य करणें नशिबींच आलें. पण मोकळेपणानें तें कबूल करणें जिवावर आलें, जीभ घोटाळूं लागली.

## उसनें वैभव

पूर्वग्रह तर चैन पडूं देईनात. शेवटीं क्लृप्ति सुचली! भारतीय संस्कृतीच्या अंगावरील जडजवाहीर तेजस्वी व पाणीदार आहे यांत शंका नाहीं. पण तें तिच्या स्वतःच्या कमाईचें, तिच्या मालकीचें आहे असें म्हणाल तर मात्र फसाल! अहो, हें सर्व उसनें मागून आणलेलें आहे! तिच्या अंगावरील एक एक नग जरा न्याहाळून पहा, एक एक पोत जरा पारखून बघा, म्हणजे ताबडतोब तुमच्या लक्षांत येईल कीं त्यांतील हरएक चीज भारतीय संस्कृतीनें शेजारच्या ग्रीक संस्कृतीच्या जामदारखान्यांतून उसनी मागून आणलेली आहे किंवा तिच्या धर्तीवर नकली तयार केलेली आहे. बुद्धिमत्तेचें देणें दयामय परमेश्वरानें एकाच राष्ट्राला दिलें. तें राष्ट्र म्हणजे ग्रीस. सर्व कला, सर्व शास्त्र, सर्व विद्या यांचें आदिपीठ म्हणजे ग्रीस. जगांत अन्यत्र कोठेंहि शास्त्रकलादिकांचा प्रपंच आढळला तर खुशाल समजावें कीं, तो प्रपंच ग्रीक संस्कृतीला विचारून थाटला गेला असला पाहिजे.

या समजुतीच्या आहारीं जाऊन भारतीय वाङ्मय, कला, शास्त्रें हीं सर्व ग्रीकांच्या अनुकरणानें तयार झालीं असलीं पाहिजेत असें प्रतिपादण्यास सुरुवात झाली. शिकंदरानें हिंदुस्थानवर स्वारी केली हा ऐतिहासिक पुरावाहि हाताशीं होताच. तेव्हां या पंडितांनीं अशी खूणगांठ बांधली कीं, आपणांस जिंकावयास आलेल्या या जेत्यापासून धूर्त व कावेबाज अशा भारतीय ब्राह्मणांनीं त्यांच्या शास्त्रकला चोरून

नेल्या असल्या पाहिजेत. या ब्राह्मणांना स्वतंत्र प्रज्ञा लाभली नसली तरी दुसऱ्याचें अनुकरण करण्यांत ते मोठे वाकबगार असावेत.

उपपत्ति एकदां मनाशीं ठाम झाल्यावर तिच्या समर्थनार्थ सापडतील ते सबळ-दुर्बळ आधार शोधले गेले आणि मांडले गेले. संस्कृतमध्यें नाटकांतील पडद्याला 'जवनिका' असें नांव आहे. जवनिका म्हणजे यवनिका. यवनिका म्हणजे यवनापासून घेतलेली किंवा त्यांच्यांत रूढ असलेली. यवन कोण तर आयोनियन ग्रीक. बस्! आणखी कोणता पुरावा पाहिजे? तस्मात् भारतीयांनीं रंगभूमीची सजावट ही यवनांपासूनच उचलली असली पाहिजे. इतकेंच नव्हे तर समग्र नाट्यकला सुद्धां त्यांनीं यवनांच्या पायापाशीं बसूनच आत्मसात् केली असली पाहिजे. संस्कृत नाटकांत विदूषकाचें पात्र असतें तें ग्रीक विदूषकाची नक्कलच असावें. आंबटतोंड्या भारतीयांना विनोदी पात्र कोठून सुचणार? विंडीश नामे विद्वान् लिहितो कीं, विट, शकार, विदूषक हीं सर्व पात्रें ग्रीक नाट्यांतूनच भारतीय वाङ्मयांत प्रविष्ट झालेलीं असावीं. रंगभूमीवर खून, मारामारी असले देखावे दाखवूं नयेत असा भारतीय नाट्यांतील दंडक, पण मृच्छकटिकांत पाहावें तो वधस्तंभाचा देखावा दाखविलेला. तेव्हां या नाटकावर ग्रीक नाट्याची सावली अवश्यमेव पडलेली असली पाहिजे. बाणभट्टाची कादंबरी हा एक संस्कृत कथानकी गद्याचा दैदीप्यमान अलंकार आहे. इतक्या मोलाचा अलंकार भारतीय संस्कृतीच्या स्वतःच्या जामदारखान्यांत घडला गेला असेल? छे! नांव कशाला? या ग्रंथाचे इंग्रजी संपादक पीटरसन सांगतात कीं, कादंबरीची मूळ कल्पना ग्रीक वाङ्मयांतून आली असली पाहिजे. कारण कादंबरींत नायिकेच्या सौंदर्याचें ज्या तऱ्हेचें वर्णन आहे तसेंच ग्रीक वाङ्मयांतहि आहे! भारतीय लोक वाल्मीकीला आद्यकवीचा मान देतात. या कवीचें रामायण हें एक रम्योज्ज्वल महाकाव्य आहे हें निःसंशय. पण महाराज तें आलें कोठून? तर ग्रीक कवि होमर याच्या इलियडवरून. हेलन

राणीला सोडविण्याकरितां म्हणून ट्रोजन युद्ध झालें त्याची नक्कल म्हणून सीतेला सोडविण्याकरितां राम-रावण युद्ध वाल्मीकीनें वर्णिलें इतकेंच काय तें. आतां तुमच्या पतिव्रता सीतेला रावणानें पळवून नेली तर आमची हेलन पतीला कंटाळून स्वतःच पाहुणा म्हणून आलेल्या पारिस नामक युवकाचा हात धरून पळून गेली इतकाच काय तो फरक! हिंदूंचा पवित्र ग्रंथ भगवद्गीता हा एक अव्वल दर्जाचा धार्मिक ग्रंथ होय, पण तो चांगला उतरला कां तर या ग्रंथाचें जर्मन भाषांतरकार लारिन्सरसाहेब सांगतात कीं, तो बायबलवरून बनविला म्हणून. बायबलांत येशू म्हणतो कीं, जो माझ्यावर प्रीति करतो त्यावर मी प्रीति करतों! आणि गीतेंतील कृष्ण सांगतो कीं, 'प्रियोहीं ज्ञानिनोत्यर्थं अहं सच मम प्रियः।' अर्थात् कृष्णाच्या स्फूर्तीचा उगम बायबलांत असला पाहिजे. कृष्णाच्या तोंडचीं वचनेंच नव्हे तर कृष्णचरित्र हेंहि येशूच्या चारित्र्यावरूनच रेखाटलें असलें पाहिजे.

ललित व तात्त्विक वाङ्मय यांच्याविषयीं हे अभिप्राय, मग ज्योतिष, वैद्यक वगैरे व्यावहारिक शास्त्रांची तर गोष्टच बोलावयास नको. भारतीय लोक म्हणजे नाक मुठींत धरून फुरंगटून बसणारे लोक. संसाराविषयीं उत्साहच त्यांच्यांत नाहीं, मग शास्त्रीय विचारसरणीचा उदय त्यांच्यांत होईलच कसा? एक हुशारी मात्र त्यांच्यांत होती, ती म्हणजे लोकांचें ज्ञान उसनें घेण्याची. या हुशारीवर त्यांनीं आपलीं सर्व शास्त्रें थाटलेलीं आहेत.

## उसनें ज्योतिषशास्त्र

व्यावहारिक शास्त्रांपैकीं ज्योतिषांत हिंदूंची प्रगति पुष्कळच झाली होती. पण मूळ ज्योतिष हिंदूंनीं कोठून तरी बाहेरून आणलें असावें अशी युरोपियन पंडितांनीं समजूत करून घेतलेली. मग तें खाल्डियांतून घेतलेलें असो, ईजिप्तमधून असो किंवा ग्रीसमधून असो. भारतीयांच्या मनोभूमींत तें मूलतः उत्पन्न होणें अशक्य हा ठाम ग्रह.

एतद्विषयक सूर्यसिद्धान्ताचें इंग्रजी भाषांतर करणारा व्हिटने काय म्हणतो तें पाहा, " आमचें मत असें आहे कीं, ख्रिस्ती सनाच्या आरंभानंतर लवकरच हिंदु-ज्योतिषशास्त्र हें ग्रीक शास्त्रापासून उत्पन्न झालें आणि पांचव्या-सहाव्या शतकांत पूर्णतेस पोंचलें. **कारण कीं, हिंदु लोकांचा कल आणि स्वभाव यांसंबंधीं जी माहिती आहे तीवरून पाहतां सत्यनिष्ठ असें ज्योतिषशास्त्र हिंदूंचें असेल अशी अपेक्षाच करतां येत नाहीं.** अवलोकन करणें, सत्य गोष्टींचा संग्रह करणें, आणि त्यावरून अनुमानें बांधणें, या गोष्टींकडे त्यांच्या मनाचा कलच नाहीं. हिंदूंची पद्धति मूळची त्यांचीच असेल तर ती पुष्कळ काळ चाललेल्या वेधावरून स्थापित झाली असली पाहिजे. असें आहे तर तिनें तें आधारच न सांगतां आपलें शास्त्र सनातन असून त्यांत फेरबदलास जागाच नाहीं असें सांगणें कसें संभवेल ? " वगैरे. 'केंब्रिज हिस्टरी ऑफ् इंडिया' या सुप्रसिद्ध ग्रंथांतहि हीच मनोवृत्ति दिसून येते. त्यांतील लेखक लिहितो कीं, " भारतीयांनीं नक्षत्रें हीं बाबिलोनियांतून उचललीं असावीं असाच संभव फार. मात्र बाबिलोनियन लोकांना नक्षत्रें माहीत होतीं याविषयीं साक्षात् पुरावा अद्याप उपलब्ध झालेला नाहीं." आहे कीं नाहीं मौज ! बाबिलोनियनांना नक्षत्रें माहीत असतील वा नसतीलहि पण भारतीयांनीं ती बाहेरून कोठून तरी घेतलीं असलीं पाहिजेत हें मात्र ठाम !

रसायनशास्त्र हें भारतीयांनीं अरबांपासून घेतलें असावें अशी युरोपिअनांनीं आपली समजूत करून घेतलेली. ही समजूत किती दुराग्रहाची असूं शकते हें बार्नेलच्या उद्गारावरून चांगलें लक्षांत येतें. रससार नांवाच्या ग्रंथाच्या कर्त्यानें ग्रंथाच्या शेवटीं स्वच्छ लिहिलें आहे कीं, " बौद्धमतं तथा ज्ञात्वा रससारः कृतो मया " पण तंजावर ग्रंथालयांतील या पोथीविषयीं लिहितांना बार्नेलनें चक्क शेरा मारला आहे कीं, 'ग्रंथकाराचे बौद्ध म्हणजे बहुधा मुसलमान

असावे!' स्वतंत्र बुद्धि कोठें चमकली कीं तें ज्ञान बाहेरून आलें असावें ही कल्पना करावयाची. कारण बुद्धि ही हिंदुस्थानच्या मनोभूमींत रूजूच शकत नाहीं ही ठाम समजूत. क्षारपाकावरील ( Alkalies ) सुश्रुतामधील विवेचन इतकें आधुनिक शास्त्राशीं जुळतें आहे कीं, बर्थ-लॉट (Berthlot) याला तें भारतीयांचें अस्सल असेल हें खरेंच वाटेना. म्हणून त्यानें भाष्य केलें आहे कीं, हा भाग प्रक्षित असून युरोपिअन रसायनशास्त्राशीं परिचय झाल्यावर कोणी तरी घुसडलेला असावा; पण अकराव्या शतकांतील चक्रपाणी नांवाच्या ग्रंथकारानें सुश्रूतांतील हा उतारा जसाच्या तसा घेतला आहे आणि जुन्या जखमा क्षारानें जाळण्याच्या क्रियेचा उल्लेख ख्रिस्ती शकपूर्व दुसऱ्या शतकांतील मिलिंदपन्हो ग्रंथाइतका जुना आहे. तात्पर्य काय, कीं भारतीय वाङ्मय, कला, शास्त्रें यांना प्रौढ स्वरूप आलेलें दिसतें खरें; पण मूळ बियाणें सर्व ग्रीसमधून आणलेलें असावें असें ठासून प्रतिपादन करून युरोपियनांनीं आपली वर्चस्वबुद्धीची तळमळ शान्त केली.

## हाहि डाव उलटला

पण हाहि डाव कालांतरानें कोलमडूं लागला. संस्कृत वाङ्मयाचा सखोल अभ्यास वाढूं लागला तसें संस्कृत वाङ्मयाचें कालदृष्ट्या प्राचीनत्वहि सिद्ध होऊं लागलें आणि जीं साम्यस्थलें पूर्वी भारतीयांच्या उसनवारीकरितां मांडलीं गेलीं होतीं, तींच आतां भुतासारखीं उलट मानगुटीवर बसूं लागलीं. बुद्ध आणि कृष्ण हे ख्राइस्टाच्या पूर्वी शेंकडों वर्षें होऊन गेले हें स्वतंत्र निःसंदिग्ध निर्णयात्मक पुराव्यानें सिद्ध होऊं लागल्यावर उसनवारी उलटी गळ्याशीं येऊं लागली. शेवटीं आणखी एक क्लृप्ति विद्वानांनीं काढली. ती म्हणजे भारतीयांनीं थोर मानलेल्या बुद्ध-कृष्ण वगैरे विभूति या मुळीं काल्पनिकच होत असें प्रतिपादणें ही होय. त्यांनीं असें प्रतिपादण्यास सुरुवात केली कीं, प्राचीन भारतांतील ह्याच महान् विभूति या निव्वळ कल्पनिक होत. कौरव-पांडव

काल्पनिक, बुद्ध काल्पनिक, चाणक्य काल्पनिक, व्यास काल्पनिक, श्रीकृष्ण काल्पनिक, सारांश थोर व्यक्ति इथून तिथून साऱ्या काल्पनिक! राम व कृष्ण या थोर विभूति भरतखंडांत पूर्वी अशा होऊन गेल्या कीं, त्यांच्या यशोगंधानें भरतखंडांतील सर्व वाङ्मय दरवळून गेलें आहे. आणि बुद्धाची थोरवी निर्बुद्धालाहि पटविण्याकरितां भरतखंडभर जागोजागीं स्तूप आणि विहार उर्ध्वबाहू करून उभे आहेत. पण पंडितांना याचें काय? बुद्धाविषयीं ओटोफ्रँक लिहितो कीं, "माझी तर खात्री आहे कीं, बौद्धग्रंथांत वर्णिलेले बुद्धाचे सहा पूर्वज जितके काल्पनिक तितकाच **गौतमबुद्ध हाहि शुद्ध काल्पनिक होय.** बुद्ध ही एक कदाचित् एखादी वृक्षदेवताहि असूं शकेल." सेनार्त व बार्थ या पंडितांनींहि आपला असाच ग्रह करून घेतला होता. साधी गोष्ट अशी आहे कीं, कोणत्याही शास्त्राची किंवा धर्मस्थापनेची पूर्वपीठिका देण्याचा प्रसंग आला असतां गौरवास्तव ती पीठिका कोणत्या तरी देवतेपर्यंत नेऊन भिडवावी अशी रूढि पडून गेली आहे. पण तेवढ्यावरून तें शास्त्र वा तो धर्म आकाशांतून खालीं पडला असें कोणी मानीत नाहीं. तेव्हां बुद्धाचे पूर्वज काल्पनिक असले म्हणजे बुद्धहि काल्पनिक असला पाहिजे ही तर्कसरणी निखालस अशास्त्रीय होय. पण भारतीय परंपरेविषयीं अज्ञान आणि तिच्या योग्यतेविषयीं दुराग्रहमूलक हीन भावना मनीं रुजलेली असली म्हणजे तर्काला तर्कटांचे फाटे फुटूं लागतात. बुद्धासंबंधीं सांगावयाचें म्हणजे बुद्ध ही एक ऐतिहासिक अवतारी विभूति होऊन गेली अशी समजूत फार प्राचीन काळापासून म्हणजे अशोकाच्या वेळेपासून रूढ आहे. बुद्धाची जन्मभूमि जी कपिलवस्तु तिचें दर्शन घेण्याकरितां अशोक तेथें जातिनिशीं गेला होता व त्यानें आपल्या यात्रेच्या स्मरणार्थ जवळच नेपाळी गांव पेदरिया येथें एक स्तंभ उभारला होता. त्यावरील शिलालेखांत लिहिलें आहे कीं, राजा पियदशी हा राज्यावर बसून वीस संवत्सर झाल्यावर शाक्यकुलांतील बुद्ध याची जी ही जन्मभूमि तिचें समक्ष दर्शन घेण्याकरितां येथें येऊन गेला. कपिलवस्तूच्या जवळच पिप्रावा या

गांवीं बुद्धाच्या अस्थींचा एक करंडकाहि सापडलेला आहे. आतां बुद्धाच्या पूर्वजांत कांहीं काल्पनिक असतील. पण त्यांची जन्मभूमि अमुक असें मानून त्यांची यात्रा कोणी करीत नाहीं. सारांश, गौतमबुद्ध ही काल्पनिक व्यक्ति होय असें मानण्याला कोणताच पुरावा देतां येण्यासारखा नाहीं.

बुद्धाप्रमाणेंच अलौकिक अशी अन्य क्षेत्रांतील व्यक्ति म्हणजे अर्थ-शास्त्र या ग्रंथराजाचा कर्ता आर्य चाणक्य हा होय. यानेंच नंदांचा समूळ उच्छेद करून चंद्रगुप्ताला गादीवर बसविला अशाविषयीं विष्णु-पुराण, दशकुमारचरित, कामंदकीय नीतिसार अशा अनेक जुन्या ग्रंथांनीं ग्वाही दिलेली आहे. पण इंग्रज पंडित कीथ यानें ठरविलें आहे कीं, चाणक्य हा काल्पनिक असावा. कां? तर त्याच्या चरित्रांत अद्भुत गोष्टींचा उल्लेख येतो म्हणून! 'स्थविरावलि चरितां'मध्यें हेमचंद्रानें चाणक्याचें वर्णन केलें आहे कीं, "तो जन्माला आला तेव्हां त्याच्या दातांची संपूर्ण कवळी तयार झालेली होती आणि अवतारसमाप्तीनंतर त्यानें स्वतःला जाळून घेतलें व नंतर तो देवतारूप पावला." असल्या अद्भुत कथा कोणत्या थोर विभूतीभोंवतीं गोळा होत नाहींत? तशा त्या झाल्या म्हणून मूळ विभूतीच खोटी मानणें ही विचारसरणी तर्कदुष्ट नव्हे काय?

अशाच प्रकारच्या विचारसरणीनें कौरव-पांडव, राम-कृष्ण, व्यास-वाल्मीकि हे सर्व कल्पनेचे खेळ होत असें कांहीं युरोपियन पंडितांनीं ठरविलें आहे. पण त्यांनीं ठरविलें म्हणून ऐतिहासिक सत्य थोडेंच नष्ट होतें! शतकानुशतकें अबाधित चालत आलेला पुरावा अमान्य करावयाचा झाला तर त्याला तसाच उलट बाजूचा सबळ पुरावा उभा करतां आला पाहिजे. तसा कोणताच पुरावा या पंडितांना सादर करतां आलेला नाहीं. यामुळें काल्पनिक उपपत्तीचें त्यांचें शरसंधान हें आकाशाच्या पोकळींतील शरसंधानासारखें फुकट गेलें आहे.

काल्पनिकतेचा बाण फुकट गेल्यावर आणखी एक बाण त्यांनीं भात्यांतून काढिला. तो म्हणजे बुद्ध, चंद्रगुप्त, राम वगैरे थोर पुरुष हे

मूळचे परकीय असावे. बुद्धाच्या वंशांत सूर्योपासना होती तेव्हां तो बहुधा पर्शियन असावा. आणि त्याचें कुल लिच्छवी, हें इराणांतील बंदर निसबिस येथलें असावें. निसबिसचे निच्छवी व नंतर लिच्छवी अशीं रूपें झालीं असावींत. दुसऱ्या कांहींच्या मतें तो तिबेटी असावा किंवा सिथियन असावा. भारतीय मात्र निश्चित नसावा. कारण एवढी थोर विभूति भरतखंडाच्या नाठाळ भूमींत जन्मास येईल कशी ? राम हाहि ईजिप्तमधून आला असावा आणि चंद्रगुप्त इराणांतून अवतरला असावा.

सारांश, युरोपच्या बाहेर कोठें प्रगल्भ संस्कृति असूं शकेल हें मान्य करतांना केवढे आढेवेढे या पंडितांना घ्यावे लागले, केवढे आवंढे गिळावे लागले हें पाहिलें म्हणजे मौज वाटते. आधीं भरतखंडांत कोणत्याहि शास्त्रकलेंतील प्रतिभावान् पुरुष जन्मास येणेंच अशक्य असें म्हणावें, पुढें शास्त्रकलादिकांतील प्रगति मान्य करावीच लागली तर ती ग्रीसमधून उसनी घेतली असें म्हणावें, तेंहि अंगलट येण्याचें चिन्ह दिसतांच प्रतिभावान् समजलेल्या विभूति काल्पनिक आहेत असें म्हणून पाहावें, आणि तितक्याउपर त्या ऐतिहासिक आहेत असें मान्य करण्याचें नशिबीं आलेंच, तर त्या परदेशांतून आल्या असाव्यात असें ठरवितां येईल का पाहावें ! इसापनीतीमधील वाघोबा शेळीशीं असाच वाद घालीत नव्हता का ? तूं पाणी गढूळ केलें नसलेंस तर तुझ्या बापानें केलें असेल ? म्हणून असल्या अवास्तव, बिनबुडाच्या व मत्सरी अवहेलनेची प्रतिक्रिया होणें क्रमप्राप्तच होतें. तशी ती झालीहि. कशी तेंच आतां पुढील प्रकरणीं पाहूं.

# प्रकरण तिसरें

# प्रत्याघात

अहंकारानें पछाडलेले जेते हे जित राष्ट्रांचा कसा व किती निरनिराळ्या तऱ्हेनें पाणउतारा करितात तें मागें पाहिलें. आतां त्याच्या प्रतिक्रियेकडे थोडी नजर टाकूं या.

जित राष्ट्राची संस्कृति ही अगदींच दुर्बल असली तर ती परक्यांच्या सर्वस्वीं आहारीं जाते. पण तीच सबल असली तर कांहीं काल मान खालीं घालून अपमानाचे प्रहार तिनें शिरीं घेतले, तरी थोडक्या अवधींत भानावर येऊन स्वत्वाची खूण पटून परकीय: अवहेलनेला जशास तसा अहेर करण्यास बद्धपरिकर झाल्याविना राहत नाहीं.

प्रतिक्रिया सुरू होण्यापूर्वीं कांहीं काल मात्र स्तिमितावस्थेंत किंबहुना दिङ्मोहांत जातो. या अवस्थेंत विचारवंतांनाहि भूल पडल्याविना राहत नाहीं. हळूहळू आत्मनिरीक्षणानें स्वतःचे दोष दिसूं लागतात, पण प्रथम प्रथम त्या दोषांचें आविष्करण ते इतक्या त्वेषानें करितात कीं, त्यामुळें सद्गुणापेक्षां दुर्गुणच आपल्यांत जास्त आहेत अशी निरुत्साहकारक कल्पना रूढ होऊं लागते. रणांगणावर जेव्हां भारतीयांचा पराभव झाला त्या वेळीं ईश्वरच बोलून चुकला कीं, तुमच्यांत दौर्बल्याचा दोष उत्पन्न झाला आहे म्हणून; पण हा दोष राष्ट्राच्या सर्व व्यवहारांना ग्रासून टाकणारा असला व याच्या सान्निध्यांत सर्व सद्गुण कांहीं काल लोपून गेले तरी ते कायमचे नष्ट होतात असें थोडेंच आहे? ज्या राष्ट्रांत कोणताच गुण शिल्लक उरला नाहीं त्याला पुनरुद्धाराची आशाच करावयास नको. म्हणून

अवगुणांचें दिग्दर्शन करतांनाहि राष्ट्राच्या तेजोभंग होणार नाहीं याबद्दल खबरदारी घ्यावी लागते.

हा विवेक संस्कृतींच्या लढ्याच्या प्राथमिक अवस्थेमध्यें जागविणें दुस्तर असतें. व्रणावर टोच मारावी त्याप्रमाणें दोषांचा चिचका करून दाखविण्यास परकीय तर टपलेलेच असतात. अशा वेळीं आपल्या संस्कृतींतील अभिमानास्पद गोष्टींची जाणीव राखल्यानेंच परकीय टीकाकारांच्या डोळ्याशीं डोळा भिडवितां येईल. हें करीत असतांना आपल्यांतील खऱ्या दोषांकडे डोळेझाक करावयाची असेंहि नव्हे. पण दोषांचीं बांडगुळें छाटीत असतांना गुणांचा बुंधा छाटला जाणार नाहीं अशी सावधगिरी बाळगलीच पाहिजे.

पण ही सावधगिरी कांहींनीं बाळगिली नाहीं. इंग्रजांचें राज्य सर्वांआधीं बंगालमध्यें स्थिर झालें आणि त्या प्रांतीं परकी संस्कृती-विषयीं अवास्तव आदर आणि स्वतःच्या संस्कृतीविषयीं अमर्याद अनादर यांचें पीक पहिल्या पिढींत जोमानें आलें. शाक्तपंथानें आचारभ्रष्टता आधींच आलेली होती. त्यांत नव्या इंग्रजी शिक्षणाची भर पडली. तेव्हां कांहीं उल्लूंनीं आपण पूर्वपरंपरा तुच्छ समजतों हें दर्शविण्याकरितां मद्य-मांस उघडपणें खाण्यास व स्तोत्राऐवजीं इलियड पाठ म्हणण्यास सुरुवात केली! परकीयांच्या धर्मकारणाचें स्तोम माजविणारे हरीचे लालहि निघाले. ख्रिश्चन मिशनऱ्यांची छाप बंगालवर सर्वांत अधिक बसली. त्या प्रांतांतील ब्राह्मो समाजाचे संस्थापक यांनीं असे उद्गार काढले कीं,— 'धर्म-तत्त्वांचें मीं जें सतत पुष्कळ वर्षें संशोधन केलें त्यांत ख्रिस्तानुशासन हेंच साऱ्या धर्मांत विशेष— नीतिसंवर्धक व बौद्धिक जगास अधिक उपयोगी असें मला आढळलें.' याच पंथांतील भावनाप्रधान पुढारी केशवचंद्र हे तर एवढ्यावरच न थांबतां म्हणतात कीं, "खरोखरच ही मोठी आमच्या भाग्याची गोष्ट कीं, ख्रिस्ती मिशनरी जगदुद्धाराकरितां ख्रिस्तधर्म शिकविण्यास निघाले तेव्हां हिंदुस्थानचा त्यांना विसर पडला

**नाहीं, आम्हां नेटिवांचें अंतःकरण अत्यंत संकुचित व स्वार्थी असून भावना व आकांक्षा खुरट्या होत.”**

आपल्या संस्कृतींतील दोष काढून टाकण्यासाठीं परकीयांचे पाय धरण्यांतील आपल्या वाकबगारीबद्दल कांहीं बंगाली लोक अभिमानहि बाळगतात असें दिसतें. त्यांच्या ब्राह्मो समाजाचें मुखपत्र जें Indian Messenger त्याच्या ९-५-२६ च्या अग्रलेखांत संपादक लिहितात, “धर्मकल्पनांचें जोखड सहज झुगारून कोणी देत असेल तर बंगालीच! सेन राजांचा ब्राह्मणीधर्म जेव्हां त्यांना जुलमी व अप्रागतिक वाटूं लागला तेव्हां बंगाली बौद्धानुयायांनीं पठाण राजांना राजे म्हणून पाचारण केलें, व नंतर एकटाकी बहादुरीसारख्या ब्राह्मण जहागिर-दारांची व या पठाणांची सोयरीकहि सुरू झाली. नंतर मोंगलांचें राज्य जेव्हां निर्जीव वाटूं लागलें तेव्हां हिंदु बंगाल्यांनीं नव्या तरतरीत रक्ताच्या इंग्रजांचें स्वागत केलें. मराठेहि त्यांचें दार ठोठावीत होतेच, पण त्यांनीं त्यांच्याशीं संगनमत केलें नाहीं आणि यांत त्यांची दूरदृष्टिच दिसून येते. कारण बंगाल्यांनीं इंग्रजांचें स्वागत केलें, राज्यकारभारांत त्यांस हरएक प्रकारची मदत केली आणि त्यांच्या संस्कृतीचा अंगीकार करण्यास आपणांस वाहून घेतलें, म्हणूनच अभिनव व अभूतपूर्व अशा पाश्चात्य संस्कृतीचा सर्वत्र फैलाव झाला. ह्या महद्भाग्याबद्दल बंगालला अभिमान वाटला पाहिजे!”---( **नवयुगधर्म**, पृष्ठ ७६५ ).

## अरे तर कारे

पण परकीयांना आपल्यांत कोणताच गुण दिसत नाहीं, व आपल्यांत नसलेल्या दोषांचेंहि कुभांड ते आपल्यावर रचताहेत आणि अहंकारानें ताठून जाऊन भलभलते प्रलाप काढूं लागले आहेत, हें पाहिल्यावर पहिल्या क्षणांत सुप्त व सुन्न झालेला अभिमान हा डवचल्यानें जागा होऊन फणा काढल्यावांचून कसा राहील? कोणत्याहि राष्ट्रांतील अभिमानाचें मर्मस्थान म्हणजे त्या राष्ट्राची नीतिमत्ता व चारित्र्य!

आणि त्यांतल्या त्यांत स्त्रियांचें चारित्र्य ! त्यांच्या चारित्र्यावर कोणी निष्कारण शिंतोडे उडविले तर राष्ट्राचें अत्यंत नाजुक असें मर्मस्थान दुखावलें जातें आणि मग तें राष्ट्र दलित असलें तरी मुंगीनें चावा घ्यावा त्याप्रमाणें अपशब्दांचा कडकडून चावा घेतल्याशिवाय राहत नाहीं. ह्या संबंधांत मासलेवाईक दाखला सुधारकाग्रणी आगरकर ह्यांचा देतां येईल. आपल्यांतील अनेक दुर्गुणांची त्यांना योग्य जाणीव होती आणि अप्रियता स्वीकारूनहि तें दुर्गुण वेशीवर टांगण्यांतच उभा जन्म त्यांनीं आपली लेखणी झिजविली. पण नसती नालस्ती आपली कोणी करूं लागला तर आगरकरांसारखा मानी माणूस हा ह्या नालस्ती करणाराची उलटी पूजा शेलक्या शब्दांनीं बांधल्याशिवाय कसा राहील? 'अशबर्नर'साहेबानें हिंदु स्त्रियांची नालस्ती त्या सनदी स्वैरिणी होत अशा विषारी शब्दांनीं कशी केली होती ह्याचा उल्लेख मागें येऊन गेलाच आहे. त्यावर आगरकरांनीं जो उलट अहेर केला तो आतां पाहा. अशबर्नर आणि त्याचे जातभाई ह्यांना उद्देशून अगरकर लिहितात, " कोणत्याहि देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचें धाडस करूं नये. म्हणून आम्ही इंग्लिश लोकांच्या व्यभिचाराविषयीं कांहींएक म्हणत नाहीं. तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचारानें लादूं लागतील **तर तुमच्या मडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें इतक्या त्या पवित्र आहेत, असें म्हणण्यास आम्ही कधींहि सोडणार नाहीं.**"

परकीयांनीं निष्कारण, अन्याय व असत्य असा आघात केला म्हणजे दुसऱ्या बाजूनें आघात करणाऱ्याच्या पायांखालीं काय जळत आहे हें दाखवून देणें ओघानेंच येतें. कांहीं वर्षांपूर्वी मिस् मेयो नांवाच्या एका प्रौढ अमेरिकन कुमारीनें हिंदुस्थानच्या नालस्तीनें पान अन् पान बरबटलेलें असें एक गलिच्छ चोपडें प्रसिद्ध केलें. त्या वेळीं आगरकरांच्या प्रमाणें दुसरे एक सर्वश्रेष्ठ पुढारी लाला लजपतराय हे प्रतिकाराकरितां

बद्धपरिकर झाले. त्यांना ह्या प्रकाराची अतिशय चीड येऊन त्यांनीं "भारतमाता" नांवाचें चोपडें लिहिणाऱ्या या मिस् मेयोच्या खुद्द मायदेशांत सामाजिक अन्यायांचा केवढा उकिरडा माजलेला आहे हें तो उकिरडा उपसून चव्हाट्यावर मांडूनच दाखविला. लजपतरायांनीं मेयोच्या मायभूमींत म्हणजे अमेरिकेंत कांहीं वर्षें साक्षात् वास्तव्य केलें होतें, आणि स्वातंत्र्याच्या पायघोळ गप्पा मारणाऱ्या या अमेरिकेंत तेथील जित व दलितवर्ग जो नीग्रो त्याच्यावर किती आणि कोणत्या प्रकारची अन्याय्य बंधनें घातलीं गेलीं होतीं हें समक्ष डोळ्यांनीं पाहिलें होतें. तसेंच नीग्रोंच्या असहाय स्थितीचा इतिहासहि त्यांनीं अभ्यासला होता. यामुळें भारतीयांच्या नीतिमत्तेवर निष्कारण कुभांड रचणाऱ्या गोऱ्या लोकांना लजपतरायांनीं खण-खणीतपणें असें बजावलें कीं, स्वातंत्र्याच्या, सामाजिक नीति-मत्तेच्या, आणि समाजसुधारणेच्या वल्गना निष्कारण तुम्ही आमच्या-पुढें करूं नका. इंग्लिश इतिहासकार लॉर्ड ब्राईस यानें तुम्हांला मोठें शिफारसपत्र दिलें आहे कीं, सामाजिक नीतिमत्तेच्या प्रांतांत सम्राट् म्हणून कोणत्या राष्ट्रास मिरवितां येईल तर तें अमेरिकेस (America is the moral giant of History). या 'अहोरूपां'तील खरा ध्वनि आम्ही जाणून आहोंत. प्रत्यक्ष व्यवहारांत ही सामाजिक नीति तुमच्यांत कितीशी उतरली आहे ह्याचें एकच उदाहरण सांगतों तें ऐकून ठेवा. १९२०-२१ सालची गोष्ट. फार जुनीहि नव्हे. ह्या सालीं तुमच्यांतील दोन फार बड्या अंमलदारांना सरकारी पैसे खाल्ल्याबद्दल कोर्टांत शिक्षा ठोठावण्यांत आल्या होत्या. आणि हे अंमलदारहि असे तसे नव्हते तर दोन प्रांतांचे दोन गव्हर्नर होते! हा प्रकार तुम्ही विसरलात तरी आम्हांस अवगत आहे. आतां पैसे खाणें हेंच नीति-मत्तेचें लक्षण असेल तर गोष्ट वेगळी!

दुसरें, अस्पृश्यांना आम्ही अन्याय्यरीतीनें वागवीत आलों आहोंत हें आम्ही कबूल करतों. पण या आमच्या पापाची जाणीव तुम्हीं मात्र

आम्हांला करून देण्याचें कारण नाहीं. कारण आम्हीं अस्पृश्यांवर एकपट नियंत्रणें घातलीं असलीं तर त्याच्या दसपट नियंत्रणें तुम्हीं तुमच्या देशांतील अस्पृश्यांवर म्हणजे नीग्रो लोकांवर घातलीं आहेत याची वाट काय ? या नीग्रोंवरील जुलमाचें पाप जोंवर तुम्हीं धुऊन काढलें नाहींत तोंवर वर मान करून आम्हांला उपदेश करण्याचा अधिकार तुम्हांला काडीमात्र प्राप्त होत नाहीं. तुम्हीं विसरला असलांत तरी या नीग्रो लोकांचा जो अनन्वित छळ तुम्हीं केलांत आणि अद्यापिहि करीत आहांत त्याची नोंद इतिहासाच्या दप्तरीं रुजू आहे.

गेल्या शतकाच्या सुरुवातीस बहुतेक नीग्रो जनता दास्यांत खितपत पडली होती; पण जे दास्यांतून मुक्त झालेले होते अशांच्यावरहि अनेक निर्बंध लादलेत. त्यांनीं गहूं विकतां कामा नये, औषधें विकतां कामा नये, नावा चालवूं नयेत कीं तंबाखूचा व्यापार करूं नये आणि इतके निर्बंध सोसून त्यांनीं बेकारहि राहतां कामा नये. नीग्रोंनीं गोऱ्या लोकांशीं शरीरसंबंध जोडूं पाहणें हें तर महापातकच गणलें जात असे. १९१० सालीं अमेरिकेंतील ५२ संस्थानांपैकीं निम्म्यांनीं एतद्-विषयक कायदे पास करून घेतले व वरील महापातकाबद्दल दहा वर्षें तुरुंगवास एवढी जबर शिक्षा ठेवलीत. या गोष्टीचा आधीं जाब द्या, आणि मग नाक वर करून आम्हांस उपदेशामृत पाजा !

निष्कारण 'अरे' म्हणून कोणी म्हटलें तर अनेक बाबींत त्याला 'कां रे' म्हणून असेंच हटकतां येईल. प्रतीक म्हणून आम्ही लिंगाकृतीची पूजा-अर्चा करतों म्हणून तुम्हीं आमची मोठी हेटाळणी करीत असतां. तसें पाहिलें तर शिवलिंगाच्या दर्शनानें आमच्या स्वप्नींहि कधीं गलिच्छ भावना स्फुरली नाहीं; पण लिंगपूजेचीच गोष्ट काढलीत तर तो प्रकार तुमच्याकडेहि आमच्याइतकाच जारी होता, असें तुमचें इतिहास-कारच सांगतात. पाहा–In Flanders and in France ithyphallic saints were not uncommon such as St. Giles in Brittany, St. Rene in Anjou,

St. Greluchon at Bourges-(*Sex in civilisation* page 40 ). आमच्या भक्तिपंथांतील मधुरपंथांत भक्त आणि देव यांतील नातें हें पतिपत्नीच्या नात्यासारखें मानलें जातें, व कृष्ण-गोपींच्या रासक्रीडेंत हाच प्रकार चालतो याचा उल्लेख करून तुम्हीं नाकें मुरडतां; पण तुमच्या बायबलांतील सालोमनचें गाणें किती अश्लील आहे हें तुम्हीं लपविलेंत तरी आम्हांस माहीत आहे. आमच्या वंशशुद्धतेच्या अभिमानाची तुम्हीं आजवर टवाळी करीत आलांत, पण आज जर्मनीमध्यें शुद्ध नार्डिक रक्तच तेवढें जर्मन राष्ट्राच्या नाडींतून वाहिलें पाहिजे याविषयीं जो कडकडीत सोवळेपणा माजून राहिला आहे व नार्डिकेतर म्हणजे ज्यू लोकांना जें सक्तीनें हद्दपार केलें जात आहे त्याची तरफदारी कशी करणार? आम्हीं मिश्रविवाहाला विरुद्ध होतों तें आतां अनुकूल होत चाललों आहोंत पण तुमच्या ब्रिटिश दक्षिण आफ्रिकेंत तीन वर्षांपूर्वींच बिल आलें होतें ना कीं, मिश्रविवाह बेकायदेशीर मानावा म्हणून?

## पाश्चात्य द्विपाद

प्रत्याघाताचा हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार म्हणजे आपल्या संस्कृतीची अवास्तव स्तुति आणि परकीय संस्कृतीची निंदा हा होय. हिंदुसंस्कृतींतील वाङ्मय, धर्म, शास्त्र, कला ह्या सर्वच उसन्या आणि हीन होत अशी निरर्थक हेटाळणी परकीयांनीं सुरू केली म्हणजे दुसऱ्या बाजूनें आम्हीं दुसऱ्यांपासून कधींच कांहीं उसनवारी केली नसून आजहि आम्हांस पाश्चात्यांपासून शिकण्यासारखें नाहीं, इतकेंच नव्हे तर आजच्या शास्त्रीय युगांत जे जे नवीन शोध म्हणून लोकांना दिपवून सोडीत आहेत तेहि सर्व आपणांस शेंकडों वर्षांपूर्वींच अवगत होते अशी भाषा सुरू होणें निसर्ग-प्राप्तच होय. या प्रवृत्तीचें एक उदाहरण म्हणजे आर्यसमाजी वाङ्मय होय. या पंथानें असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, आजच्या युगांतील झाडून सारे शोध

हे वेदकालींहि अवगत होते. त्यांच्या मतें वेदांत नाहीं अशी गोष्टच नाहीं. तोफा, तारायंत्र, विमानें सर्व कांहीं वैदिक लोकांना अवगत होतें. इतकेंच नव्हे तर कांहीं बाबतींत उदाहरणार्थ, लोहाचें सुवर्ण करण्यांत ते आजच्या भौतिक शास्त्राच्याहि पलीकडे गेलेले होते.

सनातनी वृत्तीच्या दृष्टीनें पाश्चात्यांची समाजव्यवस्था म्हणजे नागड्या स्वैरचाराचा धुमाकूळ! त्यांची यांत्रिक सुधारणा म्हणजे अनर्थावह दारिद्र्याला प्रसवणारी साक्षात राक्षसी! त्यांचें वैद्यक शरीराला निःसत्त्व करणारें, त्यांचा धर्म पोटपूजेचा, त्यांचें राजकारण परस्वापहरणाचें, त्यांची भूमि ही भोगभूमि, त्यांचा आहार तामसिक, आचरण भ्रष्ट, एवंच त्यांची सर्व संस्कृतीच हीन. या प्रवृत्तीचा नमुना म्हणून 'आधिभौतिक सुधारणा व आध्यात्मिक धारणा' या पुस्तकांतील एक-दोन उतारे नजरेखालीं घालण्यासारखे आहेत. आपल्या प्राचीन शास्त्रीय शोधांविषयीं गौरवानें उल्लेख करतांना ग्रंथकार लिहितो कीं, " दक्षिण हैदराबादचे डॉ. रुप्यम काशीम जहागिरदार यांच्या ग्रंथसंग्रहालयांत ताडपत्रावर लिहिलेले अनेक शास्त्रीय ग्रंथ आहेत, कीं त्यांतील शोध पाहून पाश्चात्य शोधांनीं थक्क होण्याचें कांहींच कारण उरणार नाहीं. प्रेतें कित्येक दिवस सुरक्षित कशीं ठेवावीं, दोन विशिष्ट दगडांच्या जात्यांच्या साहाय्यानें हवेंतून बातम्या कशा पाठवाव्या, उष्ण प्रदेशांत हिमवृष्टि कशी करावी, हलक्या धातूपासून सोनें कसें करावें, शक्ति कमी न होतां सहा-सहा महिने उपवास कसा करावा, पर्वत जमीनदोस्त कसा करावा, अल्प श्रमांत समुद्र बुजवून जमीन कशी करावी, वगैरे अनेक चमत्कारिक शास्त्रीय शोधांचे त्यांत ग्रंथ आहेत. ('स्वधर्म'–जून १९२६; पृ. ३२.) कलाकौशल्याच्या सर्वच अंगांत भारतीयांचा हातखंडा होता. शतघ्नी म्हणजे तोफा, अग्निरथ शस्त्रें अस्त्रें, विमानें, इत्यादि युद्धसामुग्री पूर्वीं होती याबद्दल पुराणें साक्ष देत आहेत. विषारी धुराऐवजीं पाशुपतास्त्र, वज्रास्त्र, निद्रास्त्र, अशीं अनेक प्रकारचीं अस्त्रें होतीं. रुद्रयामल ग्रंथांत विमानाचे

चौदाशें प्रकार सांगितले आहेत, त्यावरून विमानांची कला आपणांत किती पूर्णत्वाला गेली होती पाहा. पशुविद्या, कृषिविद्या, वृक्षविद्या इत्यादि आधिभौतिक विद्यांची पायाशुद्ध माहिती आपल्या लोकांना इतकी होती कीं, त्यापुढें हल्लींचे शोध कांहींच नाहींत! चाणक्याच्या अर्थशास्त्रांतील बारीकसारीक नियमांविषयींची दक्षता पाहिली म्हणजे असें वाटूं लागतें कीं, सर्व प्रकारच्या सुधारणांना आर्यभूमि हेंच गुरुघर आहे आणि त्याच्यापुढें पाश्चिमात्य सुधारणा कवडीमोल होत!

अंगाला रंग लावून कातडी पांघरून निर्वाह करणाऱ्या रानटी पाश्चात्यांचे आजकाल काय नशीब फळफळलें असेल तें यांत्रिक कलेवर! त्यांचें शौर्य, धैर्य, कौशल्य सर्व यांत्रिक कलेवर! केवळ यंत्रांच्या जोरावर आजकाल ते सुधारणेचे शिरोमणि म्हणून गणले जात आहेत. याशिवाय खऱ्या मानवी अत्युच्च स्वभावाची वाढ त्यांच्यांत अद्याप झालेली नाहीं." (पृ. २९५–९६).

ग्रंथकार पुढें लिहितो–'डार्विनच्या उत्क्रांतितत्त्वाप्रमाणें पाहिलें तर पाश्चिमात्य लोक हें माकड आणि माणूस यांच्या मधल्या स्थितींत अद्याप असावेत. मनुष्याची पूर्ण वाढ अद्याप त्यांच्यांत झालेली नाहीं असें म्हणावें लागतें. त्यांचा एकलकोंडेपणा, उच्छृंखल वर्तन, रानांत वस्ति, उलट्या हातानें अंग खाजविणें इत्यादि हालचाली कित्येक आसुरी तर कित्येक मानवी! **या सर्व लक्षणांवरून पाश्चिमात्य लोक हें माकड, दानव आणि मानव यांच्या मधल्या कोणत्या तरी स्थितींत आहेत असें म्हणावें लागतें.** त्यांच्या मूळ जातीला केल्ट असें म्हणतात, आणि कोंकणांतहि वानर-माकडें यांना केल्टी म्हणतात'. (पृष्ठ ७२).

पाश्चात्य संस्कृतीची अशी हजेरी घेतल्यावर आपल्या संस्कृतीच्या वैशिष्ट्याचें उत्तान चित्र तें कसें रेखाटतात तें पाहा, "आत्मज्ञानाला जशा प्रकारच्या अंतःकरणाची, मनाची, बुद्धीची ठेवण पाहिजे तशी मनुष्यप्राण्यांवाचून इतरांची नाहीं हें जसें नरदेहाचें वैशिष्ट्य, तसेंच भरतभूमीचें भाग्य आहे कीं, तिच्यांतच असे अध्यात्मवेत्ते निर्माण

व्हावे. इतर सर्व योनि या भोगयोनि आणि मानवयोनि येवढीच मात्र मोक्षयोनी. त्याचप्रमाणें **इतर सर्व देश ही भोगभूमि असून भरतभूमि ही मोक्षभूमि होय.** मोक्षप्रवृत्ति व प्राप्ति होण्याला अवश्य लागणारी परिस्थिति, सोय, राहाणी या सर्वांची अनुकूलता भरतभूमीवांचून इतरत्र नाहीं. येथें दैवी प्रकृति वास करते. इतर देशांत राक्षसी महत्त्वाकांक्षा वसते. आपल्या शास्त्रकारांनीं परदेशगमनाला प्रतिबंध करण्याला अनेक कारणें दिलीं आहेत. त्यांपैकीं मुख्य हें कीं या मोक्षभूमींतून त्या भोग-भूमींत गेलें असतां बुद्धिभ्रंश होईल तो न व्हावा." (पृ. १७) भारतीयांचा बुद्धिभ्रंश तर झाला नाहींच; उलट त्यांच्या उत्कर्षकाळांत त्यांनीं व्यापार धर्मप्रसार राजकारण या निमित्तानें केवढ्या मोठ्या प्रमाणावर दर्यावरील मुशाफिरी केली याचें दिग्दर्शन पुढील एका प्रकरणांत येणार आहे.

युरोपियन संस्कृतीच्या निंदेचा आणखी एक मासला पाहावयाचा असल्यास गो. म. जोशीकृत 'हिंदूंचें समाजरचनाशास्त्र' उघडा. हें पुस्तक म्हणजे युरोपियन संस्कृतीच्या निंदेचा कोशच होय. त्यांतील केवळ वानगीदाखल खालील वाक्यें पाहा. "युरोपांतील द्विपादपशूला त्यांतल्या त्यांत रशियाला पोटाची खळगी भरण्याकडे मानव म्हणून कांहीं असतो ही कल्पनाच शिल्लक उरलेली नाहीं (पृ. ५७). पुत्रैषणा, दारैषणा, वित्तैषणा या तिहींच्या तडाक्यांतून सुटलेला मानवप्राणी विरळाच आणि आधुनिक युरोपच्या संस्कृतींत तर नाहींच नाहीं (पृ. ६९). आज सुधारणेच्या जाहिराती घेऊन चारी खंडांत वाटीत सुटणारा पाश्चात्य हा तामसिक पशुस्थितींतून फारसा वर आलेला नाहीं (पृ. ८०)." भारतीयांमधील तामसी वृत्तीच्या लीला पुढें वाचकांस सादर करण्यांत येणार आहेत!

## विधायक प्रत्याघात

वरील प्रत्याघात हा शेपटीवर पाय दिल्यानें फणा काढून टवकारणाऱ्या

नागाच्या फूत्काराच्या स्वरूपाचा होय. तो जहरी असतो पण टिकाऊ नसतो. अधिक परिणामकारक प्रत्याघात म्हणजे आपले गुण प्रतिपक्षांस मान्य करावयास लावणें हा होय. चाणक्याच्या मुत्सद्देगिरीवर कळस केव्हां चढला तर प्रतिपक्षी जो अमात्य राक्षस त्याला चाणक्यानें चंद्रगुप्ताचें अमात्यपद स्वीकारण्यास लावलें तेव्हां! राजकारणांत चाणक्यानें हा जो अद्वितीय विजय मिळविला तसा आजच्या काळीं, राजकारणांत नव्हे, पण धर्मकारणांत मिळविणारा एक सत्पुत्र भारतीय संस्कृतीला लाभला. तो म्हणजे स्वामी विवेकानंद हा होय.

विजयी पाश्चात्यांनीं हिंदु धर्मांतून पुष्कळांना आपल्या कळपांत ओढावें ह्यांत नवल नाहीं. पण हिंदु धर्मानें आजच्या पडत्या काळांत पाश्चात्य राष्ट्रांत आपले मठ स्थापावे ही कौतुकास्पद गोष्ट नाहीं का? पाश्चात्यांचा धर्म हा धर्मांतरास प्रोत्साहन देणारा, त्यांच्या धर्मोपदेशकांस सरकारचें व साधनांचें भरपूर पाठबळ, आणि ज्यांच्यांत धर्मांतरांची चळवळ करावयाची ते दारिद्र्यानें गांजलेले व जेत्यांच्या लखलखाटानें दिपलेले. अर्थात् कांहीं भारतीयांनीं कृष्णाला सोडून ख्राईस्टच्या पायीं लोटांगण घातलें तर नवल नाहीं. प्रथम प्रथम तर ख्रिस्ती धर्मोपदेशकांना असें वाटत असे कीं, सर्व भारतवर्ष पुढें मागें आकाशांतील बापाच्या कुटुंबांत समाविष्ट झाल्याविना राहणार नाहीं. पण हीं सुखस्वप्नें आतां फोल ठरलीं असून, दीड-दोन शतकांच्या जारीच्या प्रयत्नानंतरसुद्धां पसतीस कोटी लोकसंख्येच्या या अजस्र देशांत अर्ध्या कोटीपेक्षां जास्त लोकसंख्या ख्रिस्तानुयायी झालेली नाहीं. आणि त्यांतहि जुलूमजबरदस्तीनें, दारिद्र्यानें, अगतिकत्वानें, अज्ञानानें बाप्तिस्मा स्वीकारलेली संख्या थोडी नाहीं हें वेगळेंच. उलट भारतीय संस्कृतीला सरकारचें कोणतेंहि पाठबळ नाहीं. जित राष्ट्राची मृत संस्कृति म्हणून तिच्याकडे पाहाण्याची रूढि पडलेली. अशा प्रतिकूल स्थितींतहि तिनें धर्म आणि तत्त्वज्ञान यांनीं पाश्चात्यांवर आपली छाप बसवावी हें नवल!

सर्वधर्म-परिषदेमध्यें स्वामी विवेकानंदांनीं जेव्हां आपलें पहिलेंच

अजरामर वक्तृत्व गाजविलें तेव्हांच विधायक प्रत्याघाताची मुहूर्तमेढ रोवली गेली. या प्रसिद्ध परिषदेमध्यें जगांतील सर्व प्रसिद्ध राष्ट्रांतील नामांकित धर्मोपदेशक उपस्थित होते व त्यांनीं आपापल्या धर्मांविषयीं उद्बोधक व्याख्यानेंहि दिलीं. पण परिषदेचें वृत्त प्रसिद्ध करणाऱ्या सर्व परकीय वर्तमानपत्रांनीं एकमुखानें निर्णय दिला कीं, त्या परिषदेंत अत्यंत परिणामकारक भाषण असें कोणाचें झालें असेल तर स्वामी विवेकानंदांचें! विवेकानंदांचें हें संस्मरणीय भाषण म्हणजे उत्कापात होय असें इतर धर्मोपदेशकांस वाटलें असल्यास नवल नाहीं. त्यांचे चरित्रकार रोमाँ रोलाँ लिहितात कीं, 'स्वामींच्या या अभूतपूर्व यशानें ख्रिश्चन धर्मोपदेशकांचा जळफळाट झाला व स्वामीजींना हाणून पाडण्यासाठीं त्यांनीं सामदामादि सर्व उपायांचा अवलंब केला.' पण स्वामीजींचें निष्कलंक चारित्र्य आणि उज्ज्वल बुद्धिवैभव यांनीं स्वामीजींच्या भोंवतीं लवकरच एक निष्ठावंत शिष्यमंडळ तयार केलें. आणि तेव्हांपासून आतांपर्यंत अमेरिकेमध्यें अनेक वेदांत-मठ स्थापन झाले व स्वामीजींच्या अनेक संन्याशी शिष्यांना तिकडे मुद्दाम बोलवण्यांत आलें.

स्वामीजी अमेरिकेंतून इंग्लंडमध्यें गेल्यावर तेथेंहि त्यांना असेंच अपूर्व यश मिळालें; त्यांचीं एकदोन व्याख्यानें ऐकल्यावरच कॅप्टन व मिसेस सेव्हायर या पतिपत्नींनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें, व नंतर स्वामीजींबरोबर हिंदुस्थानांत येऊन हिमालयांतील मायावती आश्रम स्वतःच्या खर्चानें स्थापन केला व चालविलाहि. अमेरिकेंत तर विवेकानंदांच्या स्फूर्तीनें वेदांताचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झाला. त्या सर्वांचा परिणाम इतका झाला आहे कीं, कांहींना हें एक नवें संकटच अमेरिकेवर येऊं पाहत आहे असें वाटूं लागलें आहे. निदान ते तसा बहाणा करीत आहेत. याची प्रचीति पाहावयाची असल्यास हिंदु धर्माची अमेरिकेवरील स्वारी (Hinduism invades America) अशा भडक नांवाचें डॉ. वेंडेल, एम. ए., पीएच. डी. या गृहस्थानें एक पुस्तकच लिहिलें आहे तें नजरेखालीं घालावें.

त्याच्या पुस्तकावरून असें दिसून येतें कीं, अमेरिकेंत वेदांततत्त्वज्ञाना-विषयीं जिज्ञासा तर वाढत आहेच, पण हे जिज्ञासू मनाप्रमाणें हातानें-हि सढळ आहेत. इतकें कीं, वेदान्तोपदेशकांच्या या धंद्यांत तोतयेहि उत्पन्न झाले आहेत! राजे राममहाराज म्हणून असाच कोणी एक अमेरिकन तोतया स्वतःस हिंदु संन्याशी म्हणून व तिबेटांत आपण २० वर्षें तपश्चर्या केली वगैरे सांगून लोकांकडून पैसे उकळीत आहे असें वेंडेल लिहितो.

हा ग्रंथकार 'हिंदु स्वारीच्या' या काल्पनिक भीतीनें गांगरलेला असल्यामुळें चिडून लिहितो कीं, "हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यास आम्हांस आमच्या खिशांतून येथून पैसा पाठवावा लागतो. आणि या हिंदु संन्याशांकडे पाहावें तो ते येथें येऊन हिंदु धर्माचा प्रसार करितात तो आमच्याच पैशांनीं!" वेंडेलसाहेबांनीं चिडून लिहिलें असलें तरी त्याचा अर्थ एवढाच कीं, वेदान्ताचा अमेरिकेंत प्रसार होत आहे तो वेदान्ताच्या स्वतःसिद्ध तेजानें होत आहे, सत्तेच्या आणि मत्तेच्या जोरावर नव्हे. हिंदु संन्याशी अमेरिकेंत जातो तो प्रथम त्यांनींच आग्रहाचें निमंत्रण दिल्यावर, तेथें गेल्यावरहि उपदेश देतो तो मिशनऱ्यांप्रमाणें आपण उठून जाऊन बाजारांत व्याख्यानें देण्याच्या रीतीनें नव्हे, तर शिष्य समित्पाणी होत्साता गुरूकडे आला पाहिजे या पौर्वात्य भावनेस अनुसरून शिष्य त्याच्या घरीं येईल तेव्हांच. पुनः पैशाच्या बाबतींत विरक्त! असें असतांहि आज अमेरिकेंत न्यू यॉर्क, बोस्टन, पोर्टलँड, सॅन फ्रॅन्सिस्को वगैरे ठिकाणचे मठ हे आर्थिकदृष्टया चांगल्या सुस्थितींत आहेत.

हा सर्व प्रकार पाहून ख्रिश्चन मिशनरी पाद्यांचा जळफळाट व्हावा नाहीं तर काय व्हावें? आपण करावयास आलों एक आणि होत चाललें भलतेंच हें पाहून त्यांचें डोकें भणभणावयास लागल्यास नवल नाहीं. हिंदूंच्या कळपांतील कोंकरें येशूच्या पाठीमागून येण्याचें बाजूसच राहिलें. उलट युरोपियनांना हिंदूंच्या तत्त्वज्ञानाची मोहिनी पडत चालावी

यापरतें ख्रिस्ती धर्मावर मोठें संकट तें कोणतें ओढवायचें राहिलें ! वरील वेंडेलप्रमाणें ह्या संकटाची घोषणा हिंदुस्थानांतच वीस-पंचवीस वर्षें घालविलेल्या रे. ए. एच्. बोमन यांनींहि केली आहे. 'ख्रिस्तमत आणि हिंदुतत्त्वज्ञान' या नांवाच्या पुस्तकांत ते लिहितात कीं, "हिंदुस्थानांत बरींच वर्षें काढून इंग्लंडांत परत आल्यावर मी हिंदुतत्त्वज्ञानाच्या इकडील लोकांवर पडत चाललेल्या मोहिनीचें जेव्हां निरीक्षण करूं लागलों तेव्हां अमेरिका, जर्मनी व खुद्द इंग्लंड या देशांतहि ही मोहिनी इतकी दाट पडत चाललेली आढळली कीं, मी आश्चर्यानें दिङ्मूढ झालों ! या भयंकर प्रकारास वेळींच आळा न बसल्यास या पिढीवर नाहीं तरी पुढील पिढीवर मोठें संकट ओढवणार आहे. खरोखर त्याची यथार्थ कल्पना करून देण्यास मजपेक्षां अधिक बुद्धिवंत आणि अधिक कुशल असाच लेखक हवा. पण हें अत्यंत निकडीचें कार्य आहे आणि तें विलंब न करतां केलेंच पाहिजे."

पाद्रीबोवांनीं एवढी हाय खाल्ली ती अगदींच निष्कारण नव्हे. कारण हिंदुतत्त्वज्ञानांतील कांहीं प्रमेयें फारच आकर्षक ठरलीं. उदाहरण म्हणून हिंदुतत्त्वज्ञानांतील एक प्रमुख प्रमेय जें पुनर्जन्म त्याचा उल्लेख करतां येईल. पुनर्जन्मवाद हा प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यांपैकीं पायथागोरस, एम्पीडोक्लीयस् वगैरेंना मान्य होता. ख्रिश्चन-धर्माला तो सर्वस्वीं अमान्य. पण हिंदुतत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू झाल्यावर अलीकडे युरोपांतील अनेक विचारवंतांनीं तो मान्य केला आहे. या विचारवंतांमध्यें शेलिंग, लायब्निटझ, शोपेनहाउरसारखे तत्त्वज्ञ व गटे, हर्डर लेसिंगसारखे कलावंत यांचा समावेश होतो हें सांगितलें म्हणजे वरील पाद्रीबोवांच्या तळव्याची आग मस्तकास कां पोंचली ह्याचें मर्म लक्षांत येईल. निदान ख्रिश्चन धर्माचार्यांत तरी या पाखंडी मताचा स्वीकार करण्यास कोणी पुढें आला नसावा असें समाधान बोमन साहेबांना मिळावयास हवें होतें, पण छे! तेवढेंहि सुदैव ह्यांच्या वांट्यास आलें नाहीं. कारण पुनर्जन्म मान्य करणारांचीं वर नांवें

दिलीं आहेत तीं ज्या ग्रंथांतून घेतलीं आहेत तो एका रेव्हरंड डब्लू. आर. आल्जर नांवाच्या धर्माचार्यानेंच लिहिलेला आहे. "पुनर्जन्मवादाचा चिकित्सक इतिहास" हा तो ग्रंथ ! आल्जरसाहेबांनीं हा ग्रंथ प्रथम १८६० मध्यें लिहिला, त्या वेळीं पुनर्जन्मवादाची रेवडी उडविण्याच्या उद्देशानेंच लिहिला, पण पंधरा वर्षांनंतरच्या याच ग्रंथाच्या नवीन आवृत्तींत शेवटीं त्यांनींच या मताचा उघडपणें स्वीकार केला !

मोठमोठ्या नामांकित ग्रंथकारांचें मत हिंदी धर्म व तत्त्वज्ञान यांकडे झुकूं लागावें हें पाहून कांहींना सुचेनासें झालें आहे. एच्. जी. वेल्ससारख्या सुप्रसिद्ध ग्रंथकाराच्या 'God the invisible king' या पुस्तकावर टीका करतांना वुइल्यम आर्चर चिडून लिहितो कीं, ग्रंथकाराची व हिंदुस्थानांतील धार्मिक प्रवृत्तींची बरीच जानपछान झालेली दिसते. कारण स्वारीनें या पुस्तकांत आशियांतील तत्त्वज्ञानालाच युरोपीय भाषेचा पोषाख चढविला आहे. **आशियांतील धार्मिक प्रवृत्तींची मोठी सांथच आतां इकडे पसरणार असें दिसूं लागलें आहे.**--( Is India Civilised, p. 276 )

## दोन विभूति

विवेकानंदांच्या जोडीला आणखी दोन महनीय विभूति वाचकांच्या मनश्चक्षूंपुढें उभ्या राहतील. त्या म्हणजे कविवर्य टागोर आणि महात्मा गांधी. चालू युगांतील एक प्रमुख सांस्कृतिक चळवळ म्हणजे राष्ट्राराष्ट्रांतील वैमनस्य व गैरसमज दूर करून शांतता प्रस्थापित करणें ही होय. आणि अशा प्रकारचें एकमेकांच्या संस्कृतीचें अध्ययन करण्याचें विद्यापीठ आज जर कोठें असेल तर तें हिंदुस्थानांतील रवींद्रबाबूंचें विश्वभारती विद्यापीठ हें होय. राजकीयदृष्ट्या दुबळ्या असलेल्या हिंदुस्थानांत हा संस्कृतिसमागम-मठ स्थापन व्हावा ही गोष्ट अभिमानस्पद नव्हे काय ? या विश्वभारतीचे पुरोध टागोरबाबू यांनीं भारतीय संस्कृतीचा प्रसार जेवढ्या प्रमाणावर केला तेवढा करण्याचें एका व्यक्तीच्या वांट्यास

क्वचितच येत असेल. रुबाबदार देहयष्टि, पाणीदार चेहरा, नादगंभीर आवाज, काव्यमय भाषा, आणि उत्तुंग विचार यांनीं मंडित अशा या भारतीय महर्षीनें आपल्या संस्कृतीची कावड लंडनपासून टोकिओपर्यंत व कोलंबोपासून मास्कोपर्यंत अखिल पृथ्वीतलावर फिरवून आणली आहे. रवींद्रबाबूंचें नांव कानांवर आलें नाहीं असा सुशिक्षित माणूस आज जगांत कोठेंहि आढळणार नाहीं.

या सर्वांपेक्षां अखिल जगाचें लक्ष आपल्याकडे ओढणारी व्यक्ति म्हणजे विद्यमान लोकनायक महात्माजी हे होत. हिंदु धर्म व तत्त्वज्ञान यांतील अहिंसा, परसहिष्णुता, सर्वात्मभाव वगैरे तत्त्वांची छाप पाश्चात्य तत्त्वज्ञांवर आधींच बसली होती. ख्रिश्चन धर्माची ही उभारणी याच तत्त्वज्ञानावर झालेली आहे. पण हीं तत्त्वें व्यवहारांत उतरवून दाखविणारा महापुरुष अद्यापि अवतरला नव्हता. तो अवतरून त्यानें आपल्या अहिंसा तत्त्वाचा प्रयोग पसतीस कोटी लोकसंख्येच्या प्रचंड वेदीवर सुरू केल्यावर अखिल ख्रिश्चन जग स्तिमित व्हावें ह्यांत नवल कसलें? प्रामाणिक ख्रिस्तानुयायांवर तर या प्रयोगाचा परिणाम विलक्षण झाला. ख्रिस्ताचीं तत्त्वें पिढ्यान्‌पिढ्या ते पढत होते; पण तीं तत्त्वें प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याची पाळी आली तेव्हां ख्रिस्तानंतर थोड्याच काळांत त्यांतून त्यांच्या पूर्वजांनीं अनेक पळवाटा काढल्या, संहारक लढायांचें समर्थन केलें व गुलामांच्या व्यापारास पाठिंबा देण्यासहि कमी केलें नाहीं. पण ख्राईस्टचीं तत्त्वें प्रत्यक्ष व्यवहारांत उतरवणारा असा एक आधुनिक धर्मवीर हिंदुस्थानांत अवतीर्ण झालेला पाहून प्रामाणिक ख्रिस्ती त्यांना उघडपणें आधुनिक कालांतील पुण्यश्लोक पुरुषश्रेष्ठ म्हणावयास तयार झाले. किंबहुना अखिल जगांत आजच्या काळीं एकच एक नांव घेण्यासारखी विभूति कोणती असा प्रश्न टाकल्यास ती विभूति महात्माजी होय असें निःसंदिग्ध उत्तर देणारेहि पुष्कळ विचारवंत पाश्चात्यांमध्यें सापडतील. मात्र महात्माजींचा हा

गौरव ते खाइस्टमान्य अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार करीत आहेत या कल्पनेनें मुख्यतः होत आहे हें आपण विसरूं नये.

भारतीय संस्कृतीकडे नुसत्या कौतुकानेंच नव्हे तर थोड्या आशावादीत्वानें बघण्याचें एक कारण म्हणजे पाश्चात्य संस्कृतींत शास्त्रीय प्रगतीमुळें उत्पन्न झालेला निस्सीम जडवाद व सामाजिक जीवनांत उद्भूत झालेला असंतोष हें होय. यांत्रिक प्रगतीनें खेडीं उजाड केलीं, शहरें कोंदटलीं, बेकारी व दारिद्य वाढविलें वगैरे प्रकार पाहून आपली खरोखरच प्रगति होत आहे काय याविषयीं पुष्कळांना शंका येऊं लागली. कांहीं ह्या देखाव्यानें घाबरून गेले व त्यांनीं या सर्व आपत्तींचें खापर भौतिक सुधारणांच्या माथीं मारलें. अशा स्थितींत मनाला शांति कशानें मिळेल याच्या शोधांत असतां उच्च प्रकारच्या भारतीय तत्त्वज्ञानाकडे त्यांची नजर गेली व हरपलेलें श्रेय गवसल्याचा आनंद त्यांना झाला, आणि मग पाश्चात्यांनीं भारतीय संस्कृतीचे गोडवे गाण्यास प्रारंभ केला.

संस्कृतीच्या संग्रामांत जेत्यांनीं जित्यांच्या संस्कृतीचा गुणगौरव करावा हा देखावा अपूर्वच! या गुणगौरवाचें श्रेय भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वास आहे हें तर खेंरच; पण आनुषंगिकरीत्या नवोदित यांत्रिक भौतिक सुधारणेनेंहि या गुणगौरवास हातभार लावला आहे हें कबूल केलें पाहिजे. पाश्चात्यांनीं आफ्रिका-अमेरिका काबीज केली तेव्हां त्यांना तेथें जे नीग्रो व इंडियन लोक आढळले ते पाश्चात्य संस्कृतीपेक्षां फारच हलक्या दर्जाचे होते. इतके कीं अंगाला रंग फासून नग्न हिंडावें, नाका-कानांतून हाडांचे दागिने घालावे व कच्चें मांस खाऊन खोपटांत वस्ती करावी. आशियाखंडाहि याच जातीचें असेल अशी अजाणत्या पाश्चात्यांची कल्पना असे व अजूनहि हिंदुस्थानांत गांधी व वाघ राहतात एवढीच हिंदुस्थानविषयक माहिती असणारे इसम थोडे नाहींत. अजूनहि हिंदु हा रानटी ही आपली मानीव कल्पना उगाळीत बसण्यांत आनंद मानणारीं इंग्रजी मासिकें अर्धनग्न भिल्ल-

कातकऱ्यांचे व झाडांला उलटें टांगून घेणाऱ्या 'साधूं'चीं चित्रें हिंदूंचें प्रतीक म्हणून कुचेष्टेनें नित्यशः छापीत असतात. पण हिंदु संस्कृतीचा अभ्यास सखोल होऊं लागल्यावर कुचेष्टा कोळपली आणि गौरवाची प्रभा फाकूं लागली. रस्किनसारख्या तज्ज्ञानें हिंदुकलेचा उल्लेख केला तो नुसत्या तुच्छतेनें ! पण अजिंठा वगैरे ठिकाणच्या कलेचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर हॅविलसारख्यांनीं जो अभिप्राय दिला त्यानें रस्किनचें दुष्टमताचें पुरेपूर उसनें फेडलें. अजिंठ्याविषयीं हॅवेल लिहितो कीं, 'अखिल जगांतील कलांचा विचार केला तरी असेंच म्हटलें पाहिजे कीं चित्र, शिल्प व वास्तु या तिन्ही कलांचा मोहक संवाद अजिंठ्यामध्यें परिणतावस्थेस गेलेला आढळतो; तसा तो इतरत्र क्वचित्‌च पाहावयास सापडतो.

संस्कृत काव्य व शास्त्रीय वाङ्मय यांनीं अनेक सहृदय पाश्चात्यांच्या हृदयाची पकड फार अल्प काळांत घेतली. शाकुंतल वाचून गटेनें उद्गार काढले ते सर्व सुशिक्षितांना परिचित आहेत.- तो उद्गारला कीं, " अनेक सुखांच्या पक्वान्नांचें ताट एकत्र वाढलेलें मिळाल्यानें जो आनंद होतो तो मला शाकुंतल वाचल्यानें झाला. नूतन वर्षाच्या तारुण्यागामीं प्रगट होणारें वृक्षलतांचे मोहोर व फुलोरे आणि त्याच वर्षाच्या उतारपणांत उतरलेलें परिपक्व फळांचे घोस व लेंगर हे कधीं एकत्र पाहावयास मिळतील काय ? नेत्रांना सौंदर्य, अन्तःकरणाला आनंद, रसिक रसवंतीला मेजवानी, आणि ज्ञानक्षुधेला पौष्टिक अन्न हीं एकाच वेळीं एकाच पदार्थापासून लाभलेलीं कोणाला कोठें कधीं पाहावयास सापडतील काय ? तसेंच स्वर्ग आणि पृथ्वी येथें मिळणारीं भिन्न सुखें एकत्र कधीं गवसतील ? पण तीं खरोखरच मला एकत्र गवसलीं. कोठें म्हणून थोडें अश्रद्ध आश्चर्यानें तुम्हीं विचाराल तर सांगतों कीं शाकुंतल नांवाचें नाटक आहे ना ? तें वाचा म्हणजे हीं सर्व सुखें तुम्हांला एकत्र आढळतील. या सर्व सुख-संमेलनाचा एकत्र निर्देश करावयाचा म्हणजे शाकुंतलाचें नुसतें नांव घेतलें म्हणजे पुरें."

## ब्राह्मणशिष्य प्लेटो

मनुस्मृति वाचून नित्सेचीहिं अशीच अवस्था झाली. समाजाला कडक शिस्त लावून देणारा पुरुषश्रेष्ठ हा जो त्याचा आदर्श तो मनूच्या रूपानें भरतखंडांत साक्षात आवतरला होता असें मनुस्मृतींतील वर्णाश्रमधर्मांची कडक शिस्त पाहून नित्सेला वाटलें. तो लिहितो, "मनुस्मृति वाचून माझा तर असा ग्रह झाला आहे कीं, आमच्याकडील नीतिशास्त्राचे नियम हे भारतीय नियमांची नुसती प्रतिकृति होत, किंवा विकृति म्हटली तरी चालेल. ते वाचून खुद्द ग्रीक प्लेटोदेखील एखाद्या ब्राह्मणाचा चुणचुणीत चेला असावा असें वाटूं लागतें. आणि ज्यू लोकांविषयीं म्हणाल तर, मनुस्मृतीच्या अभ्यासकांना ते शुद्ध चांडाल आहेत असें म्हणावेसें वाटेल."

(Even Plato strikes me as a well-schooled chela of a Brahman, while from the stand point of Manu's law book the Jews seem to be a chandal race.)

शोपेनहाउर या जर्मन तत्त्वज्ञाला उपनिषदांचा पार्शियनमधून लॅटिनमध्यें केलेला तरजुमा वाचावयास सापडला. तेवढा वाचूनच त्याला हरपलेलें श्रेय गवसल्याचा आनंद झाला. त्यानें धन्योद्गार काढले कीं, "संसारांत माझ्या मनाला शांति मिळाली असेल तर उपनिषदांनींच आणि अंतीं मरणकालीं शांति मिळणार असली तर ती त्यांनींच मिळेल."

(It has been the solace of my life. It shall be the solace of my death.)

मॅक्समुल्लरचेहि उद्गार असेच उत्कट आहेत. तो लिहितो कीं, "तत्त्वज्ञानाचा अर्थ सुखमय मृत्यूचें साधन असाच असेल तर मला, वाटतें कीं, ही सिद्धावस्था प्राप्त करून देण्यास वेदान्ताइतकें दुसरें कोणतेंच तत्त्वज्ञान समर्थ नाहीं. काळ्याचे पांढरे केस होईपर्यंत मीं अनेक धर्मांचा आणि तत्त्वज्ञानांचा अभ्यास केला परंतु इतकें तेजस्वी व आत्मारामाला सुखविणारें दुसरें धर्मतत्त्व मला आढळलें नाहीं."

समाजव्यवस्थेसंबंधीं तरी हिंदूंत पाश्चात्यांना कांहीं गुण दिसला नसावा असें कदाचित् वाटेल. कारण हिंदूंची नालस्ती करतांना त्यांच्या समाजरचनेंतील दोष हीं मर्मस्थलें समजलीं जातात. पण भारतीयांच्या समाजरचनेची वाहवा करणारेहि आढळतात. मेरिया स्ट्रोप्स म्हणते कीं, हिंदु ऋषींनीं आपलीं सामाजिक तत्त्वें अत्यंत कसोशीनें पाळून त्यांवर समाजरचना घडवून आणली.

स्त्रीपुरुषांतील वैवाहिक संबंधहि पाश्चात्यांत चिंताजनक झाला आहे. तेव्हां त्यावरहि भारतीय समाजशास्त्राकडून कांहीं तोडगा सापडेल अशा आशेनें कांहीं पाश्चात्य लेखक पाहूं लागले आहेत. उदाहरणार्थ, स्त्रियांच्या चळवळीसंबंधीं लिहिणारा मेरिक बूथ लिहितो कीं, सध्यां समाजापुढें जो महत्त्वाचा प्रश्न आहे कीं, वैवाहिक जीवनाविषयीं अरुचि तर उत्पन्न न व्हावी; पण अर्थिक स्वातंत्र्य तर स्त्रियांना लाभावें या बाबतींत आर्यावर्त कांहीं उपाय सुचवील अशी अशा आहे–( गो. म. चिपळूणकर यांच्या 'Basik Education' या पुस्तकास प्रस्तावना. )

संतांना मारहाण करण्याकरितां येतांना यावें आणि त्यांच्या प्रभावानें मोहित होऊन त्यांचा अनुग्रह म्हणून माळ घालून परत जावें असे चमत्कार संत-चरित्रांत आपण वाचतों. तसाच कांहींसा प्रकार येथेंहि झालेला दिसतो. कुचाळी करण्याकरितां आले आणि स्तोत्रें गात गेले असा प्रकार भारतीय संस्कृतीच्या निंदकांत घडून आला आहे !

पण संगमावरील हा देखावा नुसत्या निंदास्तुतींच्या उसळत्या लाटांनीं परिपूर्ण होत नाहीं. पाश्चात्यांतील कांहीं विचारवंत हे अलीकडे स्वतःच्या संस्कृतीची निंदा करूं लागले आहेत ! हे निंदेचे सूर कानीं पडले कीं, विचारप्रवाहांत भोंवरे उत्पन्न होतात. तिकडे आतां नजर देऊं या.

---

# प्रकरण चवथें

# विचारांचे भोवरें

जेते आणि जेते यांमधील भावनोद्रेकाच्या या विलक्षण आघात-प्रत्याघाताकडे पाहत असतां विवेकानें कोणती भूमिका स्वीकारावयाची? आघातप्रत्याघाताचे हे उलटसुलट तडाखे पाहून साहजिकच मन गोंधळून जातें. संगमावरील या लाटा अवलोकीत असतां प्रवाह जाणार तरी कोणत्या दिशेला याची कल्पनाच बांधतां येईनाशी होते. वर चर्चिलेल्या संगमावर तर अनेक निरनिराळ्या विचारप्रवाहांची गर्दी उसळलेली दिसते. हिंदु संस्कृतीची निंदा करणारे पाश्चात्य आहेत. हिंदु संस्कृतीची निंदा करणारे हिंदुपुत्रहि आहेत. हिंदु संस्कृतीचे पोवाडे गाणारे हिंदुपुत्र आहेत आणि हिंदु संस्कृतीचे पोवाडे गाणारे पाश्चात्यहि आहेत. पाश्चात्य संस्कृतीची निंदा करणारे भारतीय आहेत आणि पाश्चात्य संस्कृतीची निंदा करणारे पाश्चात्यहि आहेत. पाश्चात्य संस्कृतीचें गुणगान करणारे पाश्चात्य आहेत आणि पाश्चात्य संस्कृतीचें गुणगान करणारे पौर्वात्यहि आहेत. अशी ही मतमतांची मोठी गल्लत माजलेली आहे.

भारतीय संस्कृति ही एकजात रानटी, सडलेली, बुरसलेली आहे असें मिस मेयो किंवा विल्यम आर्चरसारखे भाडोत्री लेखक एका बाजूस शिरा ताणून सांगत आहेत, तर दुसऱ्या बाजूस गटे, शोपेनहारसारखे कवि आणि तत्त्वज्ञ हिंदी संस्कृतीमधील अमृत पिऊन आपणांस अलौकिक समाधान झाल्याची ग्वाही देत आहेत. मानवी संस्कृतीला सध्यां पाश्चात्य राष्ट्रांत जें स्वरूप आलें आहे तें तिचें उच्चतम स्वरूप असून त्याचा फैलाव सर्व जगभर जितक्या लवकर होईल

तितका पृथ्वीवरील देवाच्या राज्याचा काळ जवळ येईल असें प्रतिपादन करीत पाश्चात्य राष्ट्रांचे शेंकडों, हजारों धर्मोपदेशक 'रानटी' देशांतून फिरत आहेत, तर मॅक्स नॉर्डू, कार्पेंटर स्पेंग्लरसारखे कांहीं पाश्चात्य विद्वान् हे पाश्चात्य संस्कृति ही मरणाचे पंथास लागली आहे असें गंभीरपणें बजावीत आहेत. पाश्चात्यांचें हिंदुस्थानवर राज्य सुरू झालें आणि पाश्चात्य संस्कृतीचा प्रसार येथें जारी होऊं लागला ही केवळ त्या दीनवत्सल दयाघन प्रभूची कृपा होय असें कांहीं ब्राह्मो पंडित प्रवचन करीत आहेत, तर पाश्चात्य संस्कृति ही केवळ आसुरी—राक्षसी संस्कृति असून तिच्या छायेंतून भारतीय जितके लवकर सुटतील तितका त्यांचा भाग्योदय नजीक येईल असा मंत्रजागर सनातनींमंदिरांतून चालू आहे.

या हेलावणाऱ्या सागरावर भारतीय भाग्योदयाचें तारूं हाकारावयाचें, तर या परस्परविरुद्ध विचारसरणींच्या खालीं लपलेले खडक पारखून टाळले पाहिजेत, आणि वर्धमान मानवी संस्कृतीच्या स्थिर ताऱ्यावर दृष्टि रोखून मार्ग आक्रमण केला पाहिजे.

पाश्चात्य संस्कृतीशीं जी आज आपली गाठ पडली आहे ती ही संस्कृति आपलें राजकीय स्वातंत्र्य हिरावून घेणारांची संस्कृति अशा नात्यानें पडली आहे. तशी ती पडती ना तर या संस्कृतीची योग्य ती पारख करणें आजच्यापेक्षां पुष्कळच सुलभ झालें असतें. पण आज पाश्चात्य संस्कृति ही जेत्यांची म्हणून येथें नांदावयास आली असल्यानें तिच्या गुणावगुणांची खरी पारख करणें अवघड होऊन बसलें आहे. कांहीं नातींच अशीं असतात कीं, त्यांमध्यें खुलेपणा, मनमोकळेपणा, उत्पन्न होऊंच शकत नाहीं. सासू-सुनेचें नातें व मालक-मजूर हीं नातीं अशींच होत. या दोहींपेक्षांहि कठीण नातें म्हणजे जित आणि जेते यांचें. या नात्यांत दोघांनाहि एकमेकांच्या हृदयाची ओळख होऊं शकत नाहीं. गुलामाच्या दंडाला साखळीचें एक टोक बांधलें गेलें कीं तिचें दुसरें टोक मालकाच्या मनगटाला बांधलें जातें असें म्हणतात. जित आणि जेते हा संबंधच असा आहे कीं, या संबंधानें

बांधलेल्या दोन्ही पक्षांना स्वतःचा पक्ष व परपक्ष हे दोन्ही विकृत रूपांत दिसूं लागतात. अशा वेळीं स्थिर, विवेकी दृष्टीनें निरीक्षण केलें पाहिजे.

जित आणि जेते यांच्यामध्यें आघात-प्रत्याघात कसे नानाप्रकारचे होतात तें आपण पाहिलें. पण ते एका बाजूनें निंदा आणि दुसऱ्या बाजूनें त्या निंदेला प्रत्युत्तर अशा स्वरूपाचे असल्यामुळें ते दोन्ही एकमेकांवर आदळून फुटून नष्ट होतात. ही निंदा आणि तिची प्रतिक्रिया यांच्यामुळें विचारसरणींत भोवरे किंवा आवर्त उत्पन्न होत नाहींत. विजयी पाश्चात्य आपली निंदा करितात तेव्हां त्यांचे निंदेचे बोल हे विजयाच्या उन्मादांतून निघालेले म्हणूनच उन्मत्ततेचे असतात हें आपण गृहीत धरूनच चालतों. तसेंच याची प्रतिक्रिया म्हणून आपल्या संस्कृतीचा अवास्तव बडेजाव जेव्हां आपण गाऊं लागतों तेव्हां तो निंदक उन्मत्तांच्याहि चांगला कानांत शिरावा म्हणून मुद्दाम तार स्वरांत गावा लागतो याची जाणीवही आपणांला असते. म्हणूनच या परकीय निंदेच्या आणि स्वकीय स्तुतीच्या लाटा कितीहि जोरानें उसळल्या तरी त्या एकमेकांवर आपटून स्वतःच विलीन होतात.

पण विजयी असे जे परकीय ते जेव्हां आपल्यासारख्या जित संस्कृतीचा गुणगौरव गाऊं लागतात, तेव्हां त्या गुणगौरवाकडे चिकित्सक दृष्टीनें पाहणें जरूर होतें. या गौरवापैकीं आपल्या संस्कृतींतील खऱ्या गुणांबद्दल केलेला गौरव निःसंकोचपणें स्वीकारण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं. किंबहुना तो स्वीकारून त्याचा अभिमान न बाळगणें करंटेपणाचें ठरेल. उदाहरणार्थ, आपल्या तत्त्वज्ञानांतील व ललितवाङ्मयांतील सुंदर स्थलांच्या दर्शनानें मोहित होऊन शोपेन-हार व गटे यांनीं जे गौरवोद्गार काढले ते निःसंकोचपणें स्वीकारण्यास हरकत नाहीं. पण नीत्शे जेव्हां मनुस्मृतींतील समाजधारणाविषयक नियमांचीं स्तोत्रें गातो त्या वेळीं त्याचा आशय नीट समजून घेणें आवश्यक होतें. नीत्शेनें मनुस्मृतीची वाखाणणी केली ती मनुस्मृतीचे सर्व नियम त्याला पसंत होते म्हणून नव्हे, तर त्या

नियमांची कडक अंमलबजावणी करण्याबद्दल मनुस्मृतींत जो कटाक्ष दिसून येतो त्याबद्दल. सर्वच बाबींत नीत्शे हा मनूशीं सहमत आहे म्हणून नव्हे. मनूच्या स्वप्नींहि नसतील अशा कांहीं गोष्टींचा नीत्शेनें उघड पुरस्कार केला आहे. त्यांपैकीं एक प्रमुख गोष्ट म्हणजे प्रायोगिक विवाह ( Trial Marriage ) किंवा अलीकडच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे सहवासोत्तर विवाह ही होय. तसेंच संस्कृत वाङ्मयाचें माहात्म्य पाश्चात्य पंडित जे गातात तें माहात्म्यहि पुष्कळ वेळां या वाङ्मयाच्या ऐतिहासिक उपयुक्ततेला अनुलक्षून असतें; त्यांतील विचारसम्पदा आजच्या काळीं उपयोगी पडणारी आहे या भावनेनें नसतें हेंहि ध्यानांत वागविलें पाहिजे.

भारतीय संस्कृतीच्या या स्तुतीबरोबर पाश्चात्य लेखक जेव्हां स्वतः-च्या संस्कृतीची निंदा करूं लागलेले आढळून येतात तेव्हां तर विचारांत विलक्षण भोवरे उत्पन्न होतात. वर उल्लेखलेल्या नीत्शेनें नुसते मनूचे गोडवे गाइले आहेत इतकेंच नव्हे, तर त्याचा स्वतःचा धर्म जो खिस्तीधर्म त्याची त्यानें निंदा केली आहे, आणि तीहि अगदीं गाळीव शेलक्या शब्दांत. " ख्रिस्तीधर्म हा मानवी संस्कृतीवरील एक कलंक होय " हे त्याचे शब्द. असले उद्गार बेतालपणाचे असतात हें सांगावयास नकोच. पण दुसरे कांहीं गंभीरपणें लिहिणारे तत्त्वज्ञ आहेत त्यांचेहि विचार पारखूनच घेतले पाहिजेत. हे ग्रंथकार म्हणजे शें-दीडशें वर्षांपूर्वी अवतीर्ण झालेल्या यांत्रिक व शास्त्रीय युगाविरुद्ध हाकाटी करणारे ग्रंथकार होत. या यांत्रिक युगांत शहरांत राहणाऱ्या लोकसंख्येची बेसुमार वाढ झाली, त्यांतील राहणी गलिच्छ व आरोग्यविघातक झाली, त्यांतील नीतिमत्ता खालावली, बेकारी वाढली वगैरे दोष कोणालाहि दिसण्यासारखे आहेत. पण या दोषांचा उगम यंत्रांत नसून मनुष्याच्या लोभी मनोवृत्तींत आहे हें विसरून सर्व दोषांचें खापर यंत्राच्या माथ्यावर फोडण्याचेंच व्रत या ग्रंथकारांनीं स्वीकारलेलें असतें. गिरण्यांतील

धुरानें शहरें काळींकुट्ट झालेलीं पाहून इंग्रज कलाकोविद रस्किन यानें पाऊणशें वर्षांपूर्वीच वैतागाचे उद्गार काढले होते. तथापि याच गिरणीच्या काळ्याकुट्ट धुरांतून आर्थिकदृष्ट्या सोन्याचा धूर निघूं लागल्यामुळें रस्किनसारख्याच्या तक्रारीकडे कोणी फारसें लक्ष दिलें नाहीं. किंबहुना पाश्चात्य राष्ट्रें हीं प्रगतिपथावर वेगानें आक्रमण करीत आहेत असाच सूर सर्वत्र लावला गेला.

पण चौदा सालच्या महायुद्धानें कांहीं विचारवंतांना आपला हा सूर विसंवादी आहे याची तीव्र जाणीव झाली. आणि मग ते, लंबक दुसऱ्या टोकास जावा त्याप्रमाणें पश्चात्तापदग्ध स्वरांत म्हणूं लागले, "प्रगतीच्या पुष्पोद्यानांतून आमचा रथ चालला आहे अशा भ्रमांत आम्ही होतों, पण अवनतीच्या काट्याकुट्यांतून चाललों आहोंत हें आतां जितकें लवकर उमगूं तितकें चांगलें."

हा सूर लावणाऱ्यांचा प्रतिनिधि म्हणून इंग्लंडमधील एक नामांकित साहित्यिक व धर्माचार्य डीन ईंग यांचा निर्देश करतां येईल. महायुद्धाच्यापूर्वी ते एक धर्मनिष्ठ गूढवादी म्हणून प्रसिद्ध होते, व त्यांचें लिखाण अध्यात्म व धर्म या विषयांना अनुलक्षूनच असे. यापूर्वी सामाजिक जीवनाकडे त्यांनीं लक्ष दिलें नव्हतें—देणें त्यांना आवश्यक वाटलें नव्हतें. महायुद्धाच्यापूर्वी एकंदर मानवी संस्कृतीची प्रगति होत आहे अशीच इतरांप्रमाणें त्यांचीहि भावना होती. पण युद्धानें जेव्हां अनेक कटुसत्यें उघडकीस आलीं तेव्हां आचार्य ईंग हे खडबडून जागे झाले, आणि मग आपल्या समाजाचा रथ भलत्याच मार्गावर जात चालला आहे याकडे लोकांचें लक्ष वेधण्याकरितां त्यांनीं दोन-तीन वर्षें सतत लेखणी चालविली आणि आपले हे नवे विचार, निर्भीड बोल (Outspoken Essays) या नांवानें दोन खंडांमध्यें प्रसिद्ध केले. युद्धांतील संहारक हत्यारें व भीषण प्राणहत्या यांनीं पूर्वीच्या प्रगतीच्या मानीव कल्पनेला चांगलाच धक्का दिला. मनुष्यस्वभावामधील पाशवी अंश कोणत्याहि तऱ्हेनें कमी झालेला नसून

उलट वाढत चाललेला नाहीं ना अशी शंका डिवचूं लागली. या सर्व परागतीचें कारण भौतिक शास्त्रांची व यांत्रिक कलेची वाढ हें होय असें धर्माचार्य ईंग यांनीं प्रतिपादन केलें. ते लिहितात कीं, 'यांत्रिक शक्तीचा हा रोग समाजशरीराच्या आतां अगदीं हाडापर्यंत जाऊन पोंहोचला आहे, आणि म्हणूनच कदाचित् तो आतां निर्मूलन झालेला पाहावयास सापडेल असें वाटूं लागलें आहे. शें-दोनशें वर्षें लागतील या गोष्टीला; पण त्यानंतर मात्र आजचीं कोंदटलेलीं शहरें नाहींशीं होऊन पुन्हा आपले वंशज पूर्वींप्रमाणें शेतीभातीवर निर्वाह करूं लागतील.' याच सुमारास ऑस्टिन फ्रीमन् यानें 'समाजाची अधोगति आणि पुनरुज्जीवन' या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. या फ्रीमननें तर यंत्रनिष्ठ औद्योगिक विकासांतील जितके म्हणून दोष दाखवितां येतील तितक्यांची मोठी थोरली यादीच्या यादी केली आहे. पण या सर्वांवर त्यानें उपाय सुचविला आहे तो मात्र इतकाच कीं, कांहीं थोड्या शहाण्या लोकांनीं आपली एक संस्था स्थापावी आणि त्यांनीं आजच्या औद्योगिक सुधारणेवर कडक बहिष्कार घालून प्राचीन काळांतल्याप्रमाणें एकमेकांच्या सर्व गरजा अंगमेहनतीनें कष्ट करून भागविण्याचें ठरवावें ! आचार्य ईंग यांनीं यावर असें मत दिलें आहे कीं, खुद्द इंग्लंडमध्यें अशा प्रकारची संस्था आजमितीस चालणें शक्य नाहीं. पण ऱ्होडेशिया, टास्मानिया अशा ठिकाणीं जरूर तेवढी जागा खरेदी करून वरील वृत्तीनें राहणाऱ्या लोकांची वसाहत स्थापन करण्याचा प्रयोग अवश्य करून पाहावा. ईंगसाहेबांनीं आजच्या अनैसर्गिक राहणीविरुद्ध स्वतः जो उपाय सुचविला आहे तो म्हणजे घरोघरीं चरखा फिरविण्याचा होय. उद्योगी आणि चुणचुणीत जपाननें पाश्चात्यांच्या पावलांवर पाऊल टाकून त्यांच्या तोलाची औद्योगिक सुधारणा आपल्या राष्ट्रांत घडवून आणली, या जपानच्या अधःपाताबद्दल आचार्य ईंग यांना फार खेद होत आहे. ते लिहितात, 'जपाननें आपली पूर्वींची सुंदर आणि रम्य अशी संस्कृति सोडून देऊन पाश्चात्यांच्या अनुकरणानें

गलिच्छ आणि पाशवी रूप आपणांस प्राप्त करून घेतलेलें आमच्या डोळ्यांपुढें दिसत आहे.' (The ancient culture of Japanese so pretty and gracious is being vulgarised and brutalised before our eyes.) पण शास्त्रज्ञांना वश झालेल्या यांत्रिक शक्तीला आतां टाकून देणेंहि शक्य नाहीं याची जाणीव ईंगसाहेबांना आहे म्हणूनच या विषयावरील आपल्या निबंधाला 'प्रगतीचें कोडें' (Dilemma of Civilization) असें अन्वर्थक नांव त्यांनीं दिलें आहे.

दुसरा एक ग्रंथकार एडवर्ड कार्पेंटर यानें अशाच विचारसरणीचा ग्रंथ लिहिला असून, ग्रंथाला नांव दिलें आहे तेंच मुळीं 'सुधारणा, तिचें कारण व तीवरील उपचार' असें दिलें आहे. अर्थात् त्याच्या मताप्रमाणें आज ज्याला आपण सुधारलेली संस्कृति म्हणतों ती सुधारणा नसून तो एक प्रकारचा रोग होय. जर्मन इतिहास-मीमांसक स्पेंग्लर यानें तर चक्क असें भविष्यच वर्तविलें आहे कीं, पाश्चात्य संस्कृति ही आतां साफ मृत्युपंथाला लागली आहे. त्याच्या ग्रंथाचें प्रमेयच असें आहे कीं, प्रत्येक संस्कृति ही स्थित्यंतरांतून जात जात अंतीं नाश पावत असते. स्पेंग्लरच्या मतें युरोपमध्यें यांत्रिक सुधारणा जारी झाली त्याच वेळेला तिच्या शेवटच्या म्हणजे नाशाच्या अवस्थेस प्रारंभ झाला.

पंधरा-वीस वर्षांपूर्वीचे हे ग्रंथ झाले. अलीकडच्या एखाद्या ग्रंथकाराचा नामनिर्देश करावयाचा झाल्यास रशियन-अमेरिकन समाजशास्त्रज्ञ सोरोकिन् याचा करतां येईल. त्यानें 'Social and Cultural Dynamics' या नांवाचा मानवी संस्कृतीची मीमांसा करणारा एक बडा ग्रंथ चार खंडांत नुकताच दोन वर्षांपूर्वीं प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत पाश्चात्य संस्कृतीविषयीं तो लिहितो, "युरोपियन संस्कृतीच्या अंगाखांद्यावरच मी खेळलों असल्यामुळें तिच्यांतले दोष मला दिसत असले तरी मला तिच्याबद्दल आपुलकी वाटते.

पण ती पक्क होत होत तिला आतां वास मारूं लागला आहे, यामुळें ती कदाचित् अवनतीच्याहि पंथाला लागेल हें कबूल करण्याचीहि माझी तयारी आहे." मात्र तो पुढें लिहितो—"या अवनतीच्या रात्रीनंतर कदाचित् अधिक उज्ज्वल अशा संस्कृतीची प्रभातहि आपणांस दिसूं लागेल."

तात्पर्य, पाश्चात्य संस्कृतीचें पुढें काय होणार याविषयींचें भविष्य कांहीं असलें तरी, आज तिच्यांत चिंता वाटण्यासारखे दोष उत्पन्न झाले आहेत असें कांहीं पाश्चात्य लेखकच आपणांस सांगत आहेत. हे दोषहि पाश्चात्य संस्कृतींत यांत्रिक व औद्योगिक सुधारणेमुळें निर्माण झालेले आहेत. म्हणजेच पाश्चात्य संस्कृतीच्या ज्या अवस्थेशीं आपली गाठ पडत आहे त्या अवस्थेंतच निर्माण झालेले आहेत. तेव्हां या असल्या संस्कृतीशीं आपणांस टक्कर द्यावयाची आहे हें पाहिलें म्हणजे विचारांत गोंधळ उडून जावा यांत नवल काय !

आमच्या संस्कृतीवर काळें फासण्याचा उपद्व्याप करीत असतां पाश्चात्यांनीं स्वतःच्या तोंडासच काळें लागलेलें आहे हें कबूल केलेलें पाहिलें म्हणजे ।आम्हांस आमच्या संस्कृतीविषयीं वाजवीपेक्षां फाजील अभिमान वाटूं लागण्याचा संभव असतो. त्यांत आणखी आमच्या संस्कृतीचीं उघडपणें स्तोत्रें गाणारे पाश्चात्य आढळले म्हणजे तर आम्हांला अभिमानाचे कढावर कढ येऊं लागतात. हा अभिमान अयोग्य नसला तरी, त्याच्या लोंढ्यांत आमची कर्तव्यबुद्धि पार वाहून जाणार नाहीं याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. आमच्या संस्कृतीची निष्कारण निंदा करणाराविषयीं जसें जपलें पाहिजे, तशी स्तुति करणाराची भूमिकाहि पारखून घेतली पाहिजे. पाश्चात्य संस्कृतीनें दिपून जाऊन आपल्या संस्कृतींतील प्रत्येक गोष्ट चुकीची, असें ओरडत सुटणाऱ्या घाबरट मनोवृत्तीस जसें दटावलें पाहिजे, तसेंच पाश्चात्यांनीं केलेल्या स्तुतीनें हुरळून जाऊन आम्हांला नवें शिकावयाचें असें

कांहींच उरलें नाहीं असा फुकटा तोरा मिरविणाऱ्या मिजासखोर वृत्तीलाहि दोन विवेकाचे वळसे दिले पाहिजेत.

जेत्यांच्या संस्कृतींतील गुण उचलणें हा प्रश्न एकंदरींत फार नाजुकच असतो ! तो प्रश्नच आज भारतीयांना सोडवावयाचा आहे !

तो सोडवावयाचा म्हणजे दोन्ही संस्कृतींचें खरें यथार्थ स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पाश्चात्य संस्कृति व भारतीय संस्कृति यांच्या स्वरूपांविषयीं आज कांहीं छापीव ठशाच्या कल्पना रूढ झालेल्या आहेत. उदाहणार्थ, भारतीय संस्कृति ही आध्यात्मिक व पाश्चात्य ही आधिभौतिक होय अशी एक कल्पना आज बरीच रूढ आहे. असल्या कल्पना ह्या वर वर्णिलेल्या क्रियाप्रतिक्रियेच्या हेलकाव्यांतून निर्माण झालेल्या आहेत. हेलकाव्यांत तरंगाच्या पृष्ठभागावर फक्त फेस व पानपाचोळा तेवढा तरंगत राहतो. तो बाजूला सारून त्याच्याखालील जलाशयाची परीक्षा केली पाहिजे.

पाश्चात्य संस्कृतीची व आपली घसट सुरू झाली आहे. पाश्चात्यांतील अनेक कल्पना, विचार, आचार आपल्या घरींदारीं येऊन स्थिर होऊं लागले आहेत. त्यांतील सर्वांवर बहिष्कार घालणें शक्यहि नाहीं व इष्टहि नाहीं. तेव्हां पाश्चात्यांतील इष्ट व प्रगतिपर असे आचारविचार तेवढेच आपल्या पचनीं कसे पाडतां येतील व ते पाडूनहि आपलें सत्त्व व वैशिष्ट्य कसें शाबूत राखतां येईल याचा विचार झाला पाहिजे.

ह्या विचाराला आपल्या मनोभूमीवर योग्य अशी जागा करून द्यावयाची, तर त्या मनोभूमीवर दोन्ही संस्कृतींविषयीं माजलेल्या गैरसमजांचीं काटेरी झुडुपें काढून टाकणें अगत्याचें आहे. अनेक झुडुपांना कात्री लावावी लागेल. पैकीं एक काटेरी कल्पना म्हणजे पाश्चात्य संस्कृति आणि भारतीय संस्कृति या सर्वस्वीं भिन्न होत. त्यांचें अधिष्ठान वेगळें, त्यांची विकासदिशा वेगळी, किंबहुना त्यांचें बीज अथवा मूलभूत प्रकृति हीच भिन्न आहे ही ती कल्पना होय. दुसरी कल्पना

म्हणजे भारतीय संस्कृति ही स्वयंपूर्ण एकजिनसी असून, तिचीं पानें, फळें, मुळें हीं सर्व भरतखंडाच्या पार्थिव व बौद्धिक मनोभूमींतच रुजलीं आहेत, फुललीं आहेत, पुष्ट झालीं आहेत; तिचा विकास आज हजारों वर्षें तिच्यांतील आंतरजीवनशक्तीनें होत आलेला आहे व पुढें होईल तोहि तिच्या मूल प्रकृतीच्या प्रेरणेनेंच होईल; तिच्या जीवन-शक्तीला धक्का पोंचलेला नसून अन्य संस्कृतीचें रक्त तिच्यांत संक्रमित करण्याचें आचारविचाररूपी कांहींच प्रयोजन नाहीं. तिसरी कल्पना म्हणजे भारतीय संस्कृतीची प्रकृतीच आध्यात्मिक असून आज राजकीय दृष्ट्या ती कोळपलेली दिसली तरी तिला पुन्हा दैदीप्यमान् करायचा उपाय म्हणजे तिचा अध्यात्मिक स्फुलिंग पुनश्च चेतविणें हाच होय.

ह्या कल्पना रूढ असल्या तरी त्यांचा पाया किती भुसभुशीत आहे हें पाहणें अगत्याचें आहे. संस्कृतिसंगमावरील भोवऱ्यांत बुडून न जातां तरून वर यावयाचें असेल तर असल्या कल्पनांचीं गाठोडीं नीट सोडून, त्यांतील अडगळ फेकून देऊन, मनाच्या नौकेवरील निष्कारण असलेलें दडपण हलकें केलें पाहिजे. याकरितां पुढील प्रकरणांतून पूर्वोक्त कल्पना कशा एककल्ली आहेत, भारतीय हे मोक्षवादी व पाश्चात्य हे भोगवादी ही कल्पना कशी उथळ आहे, भारतीय संस्कृति ही एकजिनसी नसून निरनिराळ्या समाजसंघांतील आचारविचार एकत्र गुंफून कशी बनलेली आहे, भारतीय संस्कृतीच्या सत्पुत्रांनीं आध्यात्मिक जीवनाची उच्चतम जोपासना केली असली तरी त्यांचें ऐहिक भोगवादी जीवन हें इतर राष्ट्रांच्यापेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें कसें निराळें नव्हतें, तिचा नंदादीप आज हजारों वर्षें तेवत असला तरी त्यावर काजळी कशी धरली आहे व ती मुद्दाम झाडून टाकणें अवश्य कसें आहे, वगैरे प्रश्नांची चर्चा करून मनावरील रूढपूर्वग्रहांना रजा देण्याची दिशा दाखविण्याचा मी प्रयत्न करणार आहे. हे पूर्वग्रह दूर झाले, आपल्या संस्कृतीचें पूर्व-चरित्र ध्यानीं ठसलें, तिनें अनेक भिन्नभिन्न आचारांना, विचारांना

पूर्वी आपल्या घरीं नांदवून घेतलें आहे व पुढेंहि नवीनांना समाविष्ट करण्याची धमक आहे असा विश्वास पटला, म्हणजेच पाश्चिमेकडील नवोदित शास्त्रीय संस्कृतींतील खरे गुण आपणांस आत्मसात् करतां येतील. तरी आतां पूर्वोक्त मिथ्याग्रहांची गाठ घेऊन त्यांना परिस्थिति समजावून सांगून आपलें बाडबिऱ्हाड आमच्या मनोभूमींतून हलविण्यास सांगण्याच्या प्रयत्नास लागूं या.

जातां जातां पाश्चात्य व भारतीय संस्कृतींतील जे देखावे वाचकांच्या पुढें मांडण्यांत येणार आहेत ते कोणत्या कालखंडांतील व कोणत्या स्थित्यंतरांतील घ्यावेत याविषयींहि दोन शब्द लिहिले पाहिजेत.

भारतीय संस्कृतीची आणि पाश्चात्य संस्कृतीची तुलना करतांना या संस्कृतींच्या कोणत्या कालखंडांतील स्वरूपाची तुलना करावयाची ? पाश्चात्य संस्कृति ही ग्रीक संस्कृतींतून उदय पावली असल्यामुळें ती दोन-तीन हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडांतून परिणत होत होत आलेली आहे. भारतीय संस्कृतीचीं स्थित्यंतरें तर कमींत कमी पांच-सहा हजार वर्षांवर पसरलेलीं आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि एवढ्या प्रदीर्घ कालखंडांतून जात असतांना या दोन्ही संस्कृतींमध्ये विचार आणि आचार या दोन्हींचींहि अनेक स्थित्यंतरें झालेलीं आढळून येतात. त्यागवृत्तीची, वैराग्याची, कर्मठपणाची लाट दोन्ही संस्कृतींमध्यें येऊन गेली. भोगवादाची, सुखलोलुपतेची, स्वतंत्र विचाराची अशीहि लाट दोन्ही संस्कृतींत येऊन गेली आहे; आणि म्हणूनच ह्या दोन्ही संस्कृति मूलतः भिन्न होत. एकीला दैवी व दुसरीला आसुरी अशी त्यांना दिलेली छापील ठशाचीं विशेषणेंहि निर्मूल होत हेंच पुढें आपणांस पाहावयाचें आहे. कांहीं गुणावगुण, कांहीं वैशिष्ट्यें, या दोन्ही संस्कृतींत उत्पन्न झालेलीं आहेत, त्यांचेंहि दिग्दर्शन पुढें येईलच. पण हीं वैशिष्ट्यें, या दोन्ही संस्कृति मूलतः, स्वरूपतः, प्रकृतितः भिन्न होत यांचीं दर्शक नसून बदलतीं स्थित्यंरें व बदलती परिस्थिति ह्यांचीं दर्शक होत. ग्रीसच्या

भरभराटीच्या काळांत विचारस्वातंत्र्य, सौंदर्याची आवड, आशावादित्व या प्रवृत्तींना वसंतकालचा बहर आलेला होता. रोमच्या काळांत शिस्त आणि कायदा यांची त्यांत भर पडली; पण साम्राज्याच्या उत्तरकालीं सुखलोलुपता आणि सामाजिक वैकल्य यांचा अतिरेक होऊन अवनतीचे ढग आकाशांत फिरूं लागले. पुढें रोमन साम्राज्य नष्ट झालें, वर्षाकाल प्राप्त झाला, स्वतंत्र विचार, स्वतंत्र कल्पना, यांचे किरण लोपले आणि कर्मठपणाची, वैराग्याची, नैराश्याची कुंद हवा सर्वत्र पसरली. कित्येक शतकें या दुर्दिनांचा काल टिकला. त्यानंतर पुनश्च ज्ञानवृद्धीचे, स्वतंत्र कल्पनांचे व विचारांचे किरण फाकूं लागले; वर्षाकालचे दुर्दिन संपून शारदीय ज्योत्स्ना पुन्हा मिरवूं लागली. प्रथम ह्या नवीन विज्ञानाचा प्रकाश ज्योत्स्नेच्या प्रकाशाप्रमाणें परावर्तित स्वरूपाचा होता. मधल्या दुर्दिनांच्या कालखंडांत जें ज्ञान लुप्त झालें होतें तेंच पुन्हा पुनरुज्जीवित करण्यांत आलें. तें आत्मसात् झाल्यानंतर आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा सूर्य पाश्चिमात्य संस्कृतींत उदय पावला. अशा निरनिराळ्या अवस्थांतून ही संस्कृति गेलेली आहे. भारतीय संस्कृतीहि अशाच निरनिराळ्या अवस्थांतून गेली आहे. वैदिककाळीं तिच्यामध्यें आशावादित्व आणि निःसंकोच सुखलोलुपता वावरत होती. पुढील काळांत तिच्यामध्यें दुःखवाद व वैराग्य यांचा जोर झाला. विचारस्वातंत्र्यहि वाढलें. कालांतरानें विचारस्वातंत्र्य आणि वैराग्य या दोहोंनाहि विकृत अवस्था प्राप्त झाली आणि इस्लामी आक्रमणाच्या प्रारंभीं भारतीय संस्कृतीला स्थिरावस्था प्राप्त झाली. ती साधारणपणें गेलीं हजार वर्षें चालू आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे फेरफार या कालखंडानें पाहिलेले नाहींत. ही शिलावस्था संपून नवीन विचारांची हालचाल तिच्यांत अलीकडे सुरू झाली आहे व पाश्चात्य संस्कृतीला जो नवा घाट आला आहे तशाच प्रकारचा घाट आपल्या भारतीय संस्कृतीलाहि येणार आहे. तेव्हां या दोन्ही संस्कृति निरनिराळ्या अवस्थांतून गेल्या आहेत व जात

आहेत हें ध्यानीं घेतलें म्हणजे या दोन्ही संस्कृतींच्या स्वरूपांविषयींच्या दैवी, आसुरी वगैरे रूढ कल्पना कशा निराधार आहेत, किंबहुना या रूढ कल्पना उलटसुलटहि कशा लावून दाखवितां येतील हें समजण्यास अडचण पडणार नाहीं.

तरी आतां पाश्चात्य संस्कृतीचें आध्यात्मिक संस्कृति म्हणून कसें वर्णन करतां येईल हें पाहूं या.

# प्रकरण पांचवें

# अध्यात्मिक युरोप

संस्कृतींच्या वर्णनांतील एक चिररूढ असा वाक्प्रयोग म्हणजे भारतीय संस्कृति ही अध्यात्मिक आणि पाश्चात्य ही आधिभौतिक असें प्रतिपादन करणें हा होय. जें जें कांहीं अध्यात्मिक, सात्त्विक, दैवी तें सर्व भारतीय व जें जें कांहीं आधिभौतिक, तामसी, आसुरी तें सर्व पाश्चात्य असें वर्णन करण्याची एक रूढि पडून गेली आहे. जणों कांहीं ब्रह्मदेवाच्या दरबारीं दैवी संपत्ति व आसुरी संपत्ति यांचें वाटप झालें तेव्हां पूर्वोक्त सगळेच्या सगळे गुण हे भारतीयांना बहाल करण्यांत आले, व उत्तरोक्त सगळेच्या सगळे पश्चिमेकडे धाडण्यांत आले. आपल्या पुराणांत मोहिनीची कथा प्रसिद्ध आहे. सागर-मंथनांतून अमृत व विष जेव्हां बाहेर पडलें तेव्हां त्याच्या वाटपा-विषयीं देव-दानवांत तंटा माजला असतां विष्णूनें मोहिनीचें रूप घेऊन पूर्वेस बसलेल्या देवांच्या पानीं अमृत वाढलें व पश्चिमेस बसलेल्या दानवांच्या पानीं विष वाढलें. चालू काळीं नवीन पुराण रचण्यास कोणी नवपुराणकार बसला तर तो या कथेच्या धर्तीवर अध्यात्मिक व आधिभौतिक प्रवृत्तींच्या या वाटपावर अशीच सुंदर कथा रचूं शकेल.

रूढ कल्पनेप्रमाणें दोन्ही संस्कृतींचें मनश्चक्षूंपुढें चित्र रंगवूं लागलें म्हणजे त्या पुढीलप्रमाणें दिसूं लागतील : एक शुभ्र वस्त्र ल्यालेली, तर दुसरी छचोरपणें नटलेली; एक धीरगंभीर मुद्रेनें, शालीनतेनें पदर साव-रीत मंदमंद पावलें टाकीत जाणारी, तर दुसरी खाडखाड बूट वाजवीत बरोबरच्या कुत्र्याची साखळी धरून उर्मटपणें तोंडांतील सिगरेटचा

धूर सोडीत चाललेली; एक सुप्रभातीं उठून तोंडानें भूपाळी म्हणत सडासंमार्जन करणारी, तर दुसरी पहाटच्या साखरझोपीं चूळ भरूनहि न टाकतां अथरुणांतच प्रभातचहा पिणारी; एक पतीच्या निधनानंतर त्याच्या चितेवर आरूढ होणारी, तर दुसरी त्याच चितेवर दुसऱ्या लग्नाचे मांडे भाजणारी; एक कंदमुळेंफळें खाऊन उपासतापास करणारी, तर दुसरी मांसाशनाचें अजीर्ण रिचविण्याकरितां मद्याचे घट रिक्त करणारी; एक मृत्युलोकच्या दोन घटका सारून टाकण्यास अधीर झालेली, तर दुसरी शेवटची घटका भरत आली असतांहि नव्या संसाराचा हव्यास धरणारी !...

ही रूढ कल्पना नुसत्या कल्पनासाम्राज्यांतच आहे तोंवर ठीक; पण तिच्याकडे जरा धिटाईनें पाहून तिचें खरें स्वरूप निरखून पाहूं लागलांत, तर मात्र पाहतां पाहतां ढगांतील आकृति नाहींशी व्हावी तशी ती विलीन पावेल. वस्तुस्थितीची साक्ष या कल्पनेच्या बाजूनें पडते का हें पाहिलें पाहिजे. ती साक्षच घेतली तर ज्या लक्षणांमुळें भारतीय संस्कृति ही अध्यात्मिक असें तिच्या स्वरूपाचें वर्णन केलें जातें त्याच लक्षणांनीं पाश्चात्य संस्कृतीचें अध्यात्मिक असें वर्णन करणें मुळींच कठीण नाहीं हें सहज दाखवितां येईल.

प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं अध्यात्मिक आणि आधिभौतिक हे शब्द जेव्हां संस्कृतीचे निदर्शक म्हणून वापरले जातात, तेव्हां त्या शब्दांनीं सूचित केलेल्या कल्पना स्पष्ट असतात असें नाहीं. तेव्हां भारतीय संस्कृतींतील कोणत्या अंगाकडे पाहून अध्यात्मिक हा शब्द योजिला जातो हें सांगणें कठीण आहे. पण अध्यात्मिक म्हणजे हव्यकव्यजपजाप्यादि कर्मकांडाचें प्रस्थ माजविणारी असें समजायचें काय? अध्यात्मिक म्हणजे धर्मभोळेपणानें मुहूर्त व शकुन पाहिल्याशिवाय पाऊल न टाकणारी असें मानावयाचें काय? अध्यात्मिक म्हणजे देहदंडन करून वैराग्यवृत्ति स्वीकारणारी असें जाणावयाचें काय? अथवा आध्यात्मिक म्हणजे साक्षात्कारानें द्वंद्वातीत अशी ब्राह्मी

अवस्था प्राप्त करून घेणारी असें उमगावयाचें काय ? यांपैकीं कोणती-हि कसोटी लावलीत तरी पाश्चात्य संस्कृतीच्या दोन-तीन हजार वर्षांच्या चित्रपटांत या सर्व कसोट्यांना उतरणाऱ्या आचार विचारांची भरपूर सामग्री तुम्हांस मिळेल. कशी ती पाहा :

## कर्मठ युरोप

युरोपियनांचा कर्मठपणा तुम्हांस अवलोकन करावयाचा आहे ? तर मग रोमन कॅथॉलिक पंथाच्या एखाद्या मंदिरांत वा मठागारांत सहज जाऊन चार प्रहर काढा, म्हणजे कर्मकांडाच्या संभाराचे जेवढे प्रकार तुम्हांला अवगत असतील तेवढे सर्व किंवा अधिकहि तुम्हांला तेथें पाहावयास सापडतील. आपल्याकडील आश्रमांत जसे अष्टौप्रहर स्नान-संध्या जपजाप्य चालू असतें तसें त्यांच्या मठमंदिरांत पहाटच्या काकड-घंटेपासून मध्यरात्रीच्या शेजेपर्यंत प्रत्येक प्रहराला प्रार्थना चाललेली आढळून येईल. देवळांत मूर्ति नसली तरी तसबिरीपुढें पूजेअर्चेचे सर्व षोडशोपचार तुम्हांस आढळून येतील. निरांजनांच्या जागीं मेणबत्त्या दिसतील; लहान लहान घंटा-झांजांच्या ऐवजीं मोठी नारोशंकरी घंटा सारखी टाणटाण करीत असलेली आढळेल; व्यासपीठावर बसून पुराणसंकीर्तन चालण्याऐवजीं उभें राहून शुभवर्तमानप्रसार सुरू असलेला दिसेल येवढाच फरक !

मठांतील दिनक्रमहि कडकडीत आढळेल. ब्रह्मचर्य हें या मठ-वासीयांचे मुख्य व्रत म्हणून समजलें जातें. त्याला आवश्यक म्हणून आहार-निद्रादिकांविषयीं कटाक्ष ठेवावा लागतो. कनक आणि कांता हीं कलीचीं मुख्य आयुधें होत असें समजण्यांत येऊन ब्रह्मचर्य व निष्कांचनता यांची शपथच मठवासीयांना घ्यावी लागते. स्त्री-पावित्र्यावर एवढी करडी नजर असते कीं, मठांतील जोगीण एकदां मठवासी झाली कीं, मठाच्या बाहेर ती सूर्याच्याहि नजरेस पडावयाची नाहीं. उपासतापासांची यादी पाहिलीत तर ती हेमाद्रिलाहि कृतकृत्य

वाटेल अशी असते. अहोरात्र जपाकरतां मोठी थोरली रुद्राक्षांची माळ कमरेला लटकलेली असते. आणि धार्मिक वृत्तीला व वैराग्याला पोषक म्हणून मठांतील पुरुषांप्रमाणें **स्त्रियांचेंहि मुंडन** आवश्यक गणलें जातें.

आतां रोजच्या नित्याच्या व्यवहारांत हरघडीं, पदोपदीं, नवससायास, शकुनमुहूर्त पाहून पाऊल टाकणें ही धार्मिक वृत्तीची खूण म्हणत असाल, तर असल्या समजुतीचें जाळें आपल्यासारखेंच पाश्चात्यांच्याहि सर्व व्यवहारांभोंवतीं गुंडाळलेलें आढळून येईल. यःकश्चित् जेवायला बसलें असतां काटे-चमचे सरळ न ठेवतां एकमेकांवर ठेवलेले पाहून, किंवा चमच्यावर घेतलेलें मीठ खालीं पडलेलें पाहून पोटांत भीतीचा गोळा उठलेला व चर्या घाबरट झालेली आजीबाई तुम्हांस घरोघरीं पाहावयास सापडेल. कोणत्याहि एखाद्या सभेंत जमलेल्या मंडळींची संख्या चुकून तेरा भरली तर झाला अपशकुन! देवदेवस्की, कौल लावणें, वगैरे प्रकार आपल्यांत आहेत ना? तसेंच ते पाश्चात्यांतहि तुम्हांस भरपूर सापडतील. मन संशयग्रस्त झालें असतां अथवा भविष्यकालांत वाकून पाहण्याकरितां देवाला कौल लावणें, अंगांत आलेल्या अवसराला प्रश्न करणें, हे ग्रीस देशांत पूर्वीं फार जारी होते व धूर्त लोक त्याचा फायदाहि घेत. कित्येक वेळेला दोन बलिष्ठांपैकीं कोणाला जय मिळेल असा पेचप्रश्न उपस्थित झाला असतां देवावरहि 'नरो वा कुंजरो वा' करण्याची पाळी येई! Romans the Greek shall conquer ही प्रसिद्ध नरोकुंजरी सुशिक्षितांना सुपरिचितच आहे.

सरकारी कामकाजांतहि शकुन-मुहूर्त, अरिष्ट-शांति यांचें प्राबल्य आपल्याकडे आढळतें, तसेंच युरोपच्या इतिहासांतहि नमूद आहे. आपल्याकडे मंत्रिमंडळांत पुरोहिताला बरेंच महत्त्व असे व त्याचीं जीं कामें याज्ञवल्क्य व कौटिल्य यांनीं वर्णिलीं आहेत त्यांत राजावरील विघ्नें टाळण्याकरितां व दुष्काळ, रोगराई इत्यादि आपत्तींच्या निवारणार्थ होमहवन करणें हीं मुख्य वर्णिलीं आहेत— 'पुरोहितं दैव-

मानुषीणां आपदां अथर्वभिः उपायैः प्रतिकर्तारं कुर्वीत' (कौ. अ. ९). रोमन दरबारांतहि शकुनादिकांचें बंड असेंच होतें. कोठेंहि नुसती वीज पडली कीं, खुद्द दरबारचें काम बंद करण्यांत येई. आणि वीज प्रत्यक्ष पडण्याचीहि आवश्यकता नसे. नुसतें ती पडली एवढी नुसती बातमी कोणी तरी येऊन दरबारांत सांगितली म्हणजे पुरे होई! ग्रहण लागणें ही सर्व देशांत आपत्ति समजली जात असे. रोमन लोकांची समजूत होती कीं, अशा वेळीं झांजा वाजवून ढोलकें पिटलें असतां चंद्राचें बिंब पूर्ववत् तेजस्वी होईल! मेघांचा गडगडाट व विजांचा चमचमाट हा नेहमींच भीतीचा विषय असे. मेघांचा गडगडाट सुरू झाला म्हणजे त्यापासून रक्षण करण्याकरितां ऑगस्टस् हा राजा घाबरून Seacalf चें कातडें पांघरून बसत असे आणि कालीगुला हा राजा तर भीतीनें अंथरुणांत डोकें खुपसून बसे. वीज डाव्या बाजूला चमकली तर शुभ व उजव्या बाजूला चमकली तर अशुभ अशी समजूत असे. शिवाय 'वाताय कपिला विद्युत्' या आपल्या म्हणींत चार प्रकारच्या विजेचा विचार आहे तर रोमन लोकांत विजेचे अकरा प्रकार मानीत; व त्यांचीं निरनिराळीं शुभाशुभ चिन्हें बसविलीं होतीं! धूमकेतु हा तर आकृतीनेंच भयानक. ज्यूलियस सीझरच्या मृत्यूनंतर त्याच्या नांवानें सार्वजनिक खेळ चालू असतां असाच एक धूमकेतु सात दिवस सारखा दिसत असे. त्याला पाहून लोकांनीं तो सीझरचा आत्मा समजून त्याच्या गौरवार्थ एक मंदिरहि उभारलें. भूकंपाचे धक्के बसूं लागले म्हणजे परमेश्वरी कोप समजून त्याच्याकरतां मोठीं होम-हवनें केलीं ज़ात. आणि ही सर्व माहिती त्या वेळचा बुद्धिमान् असा इतिहासकार जो प्लिनी त्यानेंच लिहून ठेविलेली आहे.

पाश्चात्यांतील प्रायश्चित्ताचें बंड पाहावयाचें असल्यास आगरकरांनीं 'अथ आचार-प्रकरणं' या निबंधांत उद्धृत केलेलें पुढील अवतरण पाहा : सेंट कोलंबेनस याची अशी आज्ञा आहे कीं, "जो कोणी मंतर-

लेला पाव गमावील त्याला एक वर्षाचें प्रायश्चित्त, जो त्यास डोंगळा किंवा मुंगी लागूं देईल त्याला सहा महिन्यांचें, जो त्यास लाल होऊं देईल त्यास वीस दिवसांचें, जो त्याला अवमानानें पाण्यांत बुडवून देईल त्याला चाळीस दिवसांचें, आणि ज्याकडून तो ओकून पडेल त्याला वीस दिवसांचें! तसेंच जो कोणी आशीर्वचन होत असतां 'तथास्तु' म्हणण्यास चुकेल, किंवा जो जेवतांना बोलेल, किंवा जो चमच्यावर क्रूस काढण्यास विसरेल त्याला सहा फटके दिले जातील!"

## आधुनिक कर्मठपणा

धर्मभोळेपणाच्या बाबतींत रोमच्या काळाइतकें लांब जावयास नको. राजाच्या स्पर्शानें त्वग्रोग बरे होतात ही समजूत इंग्लंडमध्यें खुद्द जॉन्सनच्या वेळेपर्यंत म्हणजे नुकतीं दोन शतकांपूर्वीपर्यंत जारी होती. इतकी कीं, हा राजस्पर्शाचा सुप्रसिद्ध विधि कोणत्या दिवशीं व्हावयाचा हें प्रीव्ही कौन्सिलच्या बैठकीमध्यें ठरविण्यांत येई, व त्याची वर्दी लोकांना जाहीर करण्यांत येई! या दिवशीं भोळसटांच्या झुंडींच्या झुंडी राजप्रासादाकडे कशा आशाळभूतपणें लोटत याचें मेकॉलेनें आपल्या इतिहासांत मोठें सुरस वर्णन केलें आहे. धर्मगुरु व महामहोपाध्याय यांची या प्रकाराला संमति असेच, पण चांगले चांगले नाणावलेले डॉक्टरलोकहि ह्या फासावर आपला विश्वास आहे असें सांगत! स्पर्शविधीचा देखावा मोठा भव्य करण्यांत येई. जाहीर केलेल्या वेळेची घटिका भरतांच राजाच्याभोंवतीं अनेक धर्मगुरु मंडलाकार उभे राहत व तोंडानें मंत्रघोष सुरू करीत. नंतर बायबलांतून मंत्र वाचण्यांत येई व मग राजेसाहेबांच्या हस्तस्पर्शाचा विधि सुरू होई. जनतेचा विश्वास इतका दांडगा होता व या समारंभास गर्दी इतकी मनस्वी उसळे, कीं नुसत्या दुसऱ्या चार्लस राजाला एकट्यालाच एक लक्ष रोग्यांवर स्पर्शाचा अनुग्रह करावा लागला! आणि एकदां तर रुग्णसंमर्द एवढा चिकार लोटला कीं त्या गर्दीत सहा सात लोक पायांखालीं चेंगरून मेले असें मेकॉलेनें लिहून ठेवलें आहे!

धर्मभोळेपणाची ही प्रथा अद्यापहि अविच्छिन्न चालू आहे. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी संस्कृत भाषापंडित डॉ. गुणे हे युरोपांत प्रवास करून आले. त्या प्रवासाचें जें वृत्त त्यांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे त्यामध्यें पाश्चात्यांच्या धार्मिकविधींचें आणि कर्मकांडाचें अनेक ठिकाणीं वर्णन आलेलें आहे. रोमच्या एका देवळांतील त्यांनीं पाहिलेल्या लहान मुलांच्या नामकरणविधीचें वर्णन पाहा : ते लिहितात, " दुपारीं जेथें बाप्तिस्मा देतात तें देऊळ जाऊन पाहिलें. मुख्य गाभाऱ्याच्या उजव्या हाताला जो एक गाभारा होता त्याच्यापुढें 'बाप्तिस्मा करण्याचा झरा' नांवाचें मोठें पवित्र पाण्याचें एक उथळ कुंड आहे. मी जातों तोंच पांच लहान लहान अर्भकांचा नामकरणविधि चालला होता. प्रथम उपाध्यायांनीं मोठी थोरली जळती मेणबत्ती घेऊन ती प्रत्येक मुलापुढें धरून मंत्र म्हटले. मग जवळील बटूनें हातांत धरलेल्या पविल अंजनाच्या करंड्यांतून अंजन घेऊन प्रत्येक मुलाच्या हनुवटीखालीं, कपाळावर व टाळूवर लावलें. नंतर उपाध्ये-बुवांनीं झऱ्याचें झाकण काढून त्याला दिवा-दाखविला व गळयांतील उपरण्यासारख्या तांबड्या पट्ट्याचें अपसव्य करून मुलाचें उघडें डोकें झऱ्यावर धरण्यास सांगितलें. मग त्यांतलें थंडगार पवित्र पाणी त्यांनीं मुलाच्या डोक्यावर तीन वेळां ओतीत 'इन नोमे पात्रीसी' वगैरे मंत्र म्हटले. शेवटीं डोकें पुसून, मूल गुरवाला घ्यावयास सांगून, त्याच्या आईला मंत्र म्हणत म्हणत जळती मेणबत्ती पुढें धरण्यास लावलें."

देवळांतील पूजा-अर्चेचा प्रकार पाहावयाचा असल्यास फ्लॉरेन्स-मधील एका देवळाचें त्यांनीं दिलेलें वर्णन पाहा : " मीं पाहिलेल्या कॅथॉलिक देवळांत मला असें दिसलें कीं, मुख्य गाभाऱ्याशिवाय आणखी एक कोणत्या तरी बाजूचा मेरीचा गाभारा विशेष पूजला जाऊन त्यापुढें गुडघे टेकून जपत बसलेले लोक हमेशा दृष्टीस पडतात. तसेंच ह्या देवळांतहि होतें. विशेषतः तो दिवस रविवारचा असल्यामुळें गाभाऱ्यांत व समोरील बाकांवर बरीच गर्दी जमली

होती. वेळ पूजेची होती असें मला वाटतें. म्हणून एक बटु काळा झगा व कमरेपर्यंत पडणारी पांढरी झालर घालून घंटा व बायबल घेऊन गाभाऱ्यांत गेला व मंत्रतंत्र मोठ्यानें पुटपुटूं लागला. या गुणगुणण्यानेंच माझें लक्ष तिकडे वेधलें. मुंबईला बाबुलनाथच्या देवळांत श्रावणी सोमवारीं गेलें असतां दर्शन घेणारास दिडकीचा बेल बळेंच देणारीं गुजराथी भटांचीं मुलें जशीं हेल काढून 'कैलास गौरं' वगैरे श्लोक बडबडत असतात तसा मला प्रथम भास होऊन मी तिकडे वळलों. आधीं तो बटु कांहीं म्हणे. मागून भाविक मंडळी री ओढीत. नंतर तो एकादी ओळ हेल काढून म्हटल्यासारखें करी. कांहीं वेळानें हातांतील घंटा वाजवून बायबलांतील मंत्र वाची. अशी तालीम बराच वेळ चालली होती. मीं तितका भाविक नसल्यानें लवकरच तेथून पाय काढला."

किंवा ईस्टरचा सण रशियांतील खेड्यापाड्यांतून कसा पाळतात याची प्रो. गुणे यांनीं दिलेली पुढील हकीकत वाचा: "रशियांत खेड्यापाड्यांतून व शहरांतूनहि पुनरुज्जीवनाच्या रात्रीं म्हणजे शनिवारीं रात्रीं बारा वाजतां देवळांत माणसें जमावयास लागतात. आधीं जमलेलीं माणसें मागाहून येणारांना म्हणतात, 'ख्रिस्त मृतांतून उठला आहे' त्यावर 'खरेंच का तो पुन्हा जिवंत झाला आहे' असा प्रतिसवाल मागाहून येणारे करतात. अशा रीतीनें जितकीं माणसें येतील तितक्यागणिक प्रश्नोत्तरें झाल्यावर प्रार्थना व पूजा होते व सर्वजण आपापल्या घरीं जातात. दुसऱ्या दिवशीं खेड्यापाड्यांतले सर्व लोक माणसागणिक दोन दोन रंगविलेलीं अंडीं घेऊन उपाध्येबुवांच्या झोळींत टाकतात!"

आतां अध्यात्मिक वृत्तीचा आणखी एक प्रकार पाहा. अपराधाची शाबिती-नाशाबिती करण्याकरितां अपराध्यास दिव्य करण्यास सांगण्याची आपल्याकडे प्रथा होती व त्याचे विधि कांहीं असत. त्यांचीं वर्णनें आपल्याकडील याज्ञवल्क्य वगैरे स्मृति-ग्रंथांत आढळतात. या

दिव्य करण्याच्या आचारांत ईश्वरी न्यायावर श्रद्धा अतएव अध्यात्मिकता मानल्यास असले प्रकार पाश्चात्यांतहि मध्ययुगांत राजमान्य समजले जात. हातांत तापलेल्या लोखंडाचा गज धरणें किंवा पाण्यांत बुडून राहणें अशा प्रकारचीं दिव्यें (Dooms) दहाव्या शतकांतील अथेल्स्टन राजाच्या कायदेकानूंतच कशीं मान्य केलेलीं होतीं हें मॉर्गनकृत 'इंग्लंडचा सामाजिक इतिहास' या ग्रंथांत वाचावयास सापडेल. भुतेंखेतें, अंगांत येणें, अंगांत आलेल्याच्या द्वारें मृतात्म्याशीं सुखसंवाद करणें, प्लँचेट नाचविणें, वगैरे प्रकार हे पाश्चात्य देशांत केवढ्या प्रमाणावर आजहि चालतात हें मुद्दाम सांगण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. भविष्य व गूढविद्या यांना आज अमेरिकेंत केवढी तेजी आहे हें मागील एका प्रकरणांत ढोंगी साधु-संन्याशांचें अमेरिकेंत कसें पीक आलें आहे याची जी हकीकत दिली आहे त्यावरून कळून आलेंच असेल. हिंदुस्थानांत अलीकडे विशेष गाजलेला गूढवादी पंथ जो थिऑसॉफी पंथ त्याचे प्रणेते व प्रवक्ते पाश्चात्यच आहेत. तात्पर्य, अदृश्य, अतर्क्य, गूढ शक्तीवर श्रद्धा ठेवणें हें जर अध्यात्मिकतेचें लक्षण मानलें तर युरोप हा हिंदुस्थानच्या मागें आहे असें कांहीं तुम्हांस म्हणतां यावयाचें नाहीं.

## देहदंडन व मनोमुंडन

हें झालें धर्मभोळेपणाचें अथवा गूढवादाच्या विचारसरणीचें. आचार पाहिला तर देहदंडन व वैराग्य यांना अध्यात्मिक पंथांत महत्त्वाचें स्थान दिलें जातें. जितकें देहदंडन उग्र तितकी अध्यात्मिक प्रगति उच्च प्रतीची असें समजण्यांत येतें. हिंदुस्थानांत पंचाग्निसाधन करणारे, देहाला वस्त्राचा विटाळहि होऊं न देणारे, कनक व कांता यांना विष्टेप्रमाणें टाळणारे, खिळ्यांच्या शय्येवर निजणारे, हात उंच ठेवून वाळूं देणारे, उपासतापासांनीं इंद्रियांना मारून काढणारे हठयोगी क्षेत्राच्या ठिकाणीं तुम्हीं पाहिलेच असतील, व असल्या विक्षिप्त

गोसाव्यांचें वर्णन रामदासस्वामींनीं आपल्या 'जनस्वभाव गोसावी' या स्फुटपद्यांत 'पहा गोसावी आमचा। गुखाडींत लोळे।' वगैरे मोठें रेखीव केलें आहे तें वाचलें असेल. भागवतांत ऋषभदेवाचें वर्णन आहे कीं, त्यानें जेथें जेवावें तेथेंच मलविसर्जन करावें; व लोमहंस जातकांत एका यतीचें वर्णन आलें आहे कीं, तो दिवसा भर उन्हांत उभा राही, रात्रीं पाण्यांत बसे आणि खाई काय तर गाईचें शेण! अशा प्रकारें विषयवासनांना मारणें ही उग्र तपश्चर्या व अध्यात्मिक जीवनाचें एक प्रमुख अंग समजण्यांत येतें.

ह्या अंगाचीहि जोपासना तुम्हांस युरोपमध्यें केलेली आढळेल. पाश्चात्यांचा मुख्य धर्मग्रंथ जो बायबल त्यांतील वचनें पाहाल तर संन्यास आणि निष्कांचन राहणीवर येशूचा फार कटाक्ष असल्याचें तुम्हांस आढळून येईल. 'सुईच्या नेढ्यांतून एक वेळ उंट आरपार जाईल, पण धनवान् प्राणी हा स्वर्गाच्या दारांतून कधींहि आंत जाऊं शकणार नाहीं' अशी येशूची मोठी खणखणीत उक्ति आहे. आणि हें नुसतें कोरडें ब्रह्मज्ञान नव्हतें तर येशूचा हा उपदेश तंतोतंत जीवनांत आणणारे अनेक धर्मपंथहि पाश्चात्यांच्या इतिहासांत गाजलेले आहेत. पाश्चात्य म्हणजे नुसते भोगाचे उपासक अशी ज्यांनीं समजूत करून घेतली असेल त्यांनीं जेसुइट पंथासारख्या निष्कांचन व फकिरी वृत्तीनें राहणाऱ्या पंथाचा इतिहास चाळावा. या पंथाची स्वार्थत्यागी वृत्ति टिळकांना आदर्शभूत वाटून त्यांनीं आपल्या शिक्षणसंस्था या पंथाच्या धर्तीवर चालवाव्या असें प्रतिपादन केलें होतें. सत्ताधिष्ठित धर्मपंथाला ख्रिस्ताच्या या खऱ्या निष्ठावंत अनुयायीपंथाचा निष्कांचनपणा सोसवेना, तेव्हां त्यानें त्यांचा छळ केला तरीहि त्यानें आपला वैराग्याचा बाणा सोडला नाहीं. वैराग्यप्रधान दुसरा एक प्यूरिटनांचा पंथ होय. त्या पंथाच्या ताब्यांत इंग्लंडमधील राजसत्ता कांहीं काल आली होती. त्या अमदानींत नाच-तमाशे, गाणें-बजावणें, वगैरे करमणुकीच्या व चैनीच्या सर्व साधनांवर कायद्यानेंच असा कडक

बहिष्कार घातला कीं, उभ्या पंधरा-वीस वर्षांत देशाच्या या टोका-पासून त्या टोकापर्यंत कोठेंहि डफ कडाडला नाहीं कीं कोठेंहि तुणतुणें कुचमलें नाहीं !

वैराग्य हें अध्यात्मिक संस्कृतीचें लक्षण समजलें तर ह्या वैराग्याचे विवेकी, अविवेकी असे सर्व प्रकार युरोपांतहि भरपूर आढळून येतात. 'न जातुकामः कामानां उपभोगेन शाम्यति' म्हणजे विषयतृष्णा ही विषयोपभोगानें कधींच तृप्त होत नाहीं, उलटी वाढतच जाते; अर्थात् सुखाचा खराखरा मार्ग म्हणजे इंद्रियदमन होय, एवढीच वैराग्याची मूळ कल्पना. पण या कल्पनेचा विकृत विकास झाला म्हणजे इंद्रियदमनाचें देहदंडनांत रूपांतर होतें आणि मग देहदंडनाचे शोधतां येतील तेवढे विक्षिप्त प्रकार शोधून काढण्यांत अहमहमिका सुरू होते. या देहदंडनावरून अध्यात्मिकता मापावयाची असल्यास युरोपला आपलें माप भरपूर पटवून देतां येईल.

युरोपचा मध्ययुगांतील इतिहास चाळला असतां भरतखंडांत सापडणारा देहदंडाचा कोणता प्रकार युरोपांत सापडत नाहीं म्हणून सांगावें ? पंचाग्निसाधन आहे, एका पायावर उभें राहणें आहे, एक हात उंच करून वाळूं देणें आहे, घाणींत लोळत राहणें आहे, खिळ्यांवर निजणें आहे; सर्व कांहीं आहे. या कालांत 'वनवासी संत' ( Saints of the desert ) म्हणून जे संत होऊन गेले त्यांचीं चरित्रें त्यांच्या भक्तांनीं मोठ्या भक्तिभावानें लिहून ठेविलीं आहेत. तीं वाचीत असतां तुम्हांला भरतखंडांतीलच वैराग्यांचें वर्णन आपण वाचीत आहों असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. सेंट जेरोमनें असल्या पुष्कळ साधूंच्याविषयीं लिहून ठेवलें आहे. एक म्हणे सतत तीस वर्षें सातू व गढूळ पाणीच फक्त पीत असे; दुसरा एक भुयारांत पडून असे व फक्त पांचच फळें रोज खाई; तिसऱ्यानें अंगावर एकदां कफनी चढाविली कीं ती फाटून गळून पडेपर्यंत तो ती बदलीत नसे, मग धुण्याधिण्याची तर गोष्ट बोलावयासच नको ! अलेक्झांड्रिया

येथें मसेरियस् नांवाचे एक साधु राहत असत. ते नेहमीं दलदलीत राहत आणि तेथील बुभुक्षित डांसांना आपल्या अंगाचे चांगले चावे घेतां यावे म्हणून आपलें अंग उघडें टाकीत! त्यांचा शिष्य युसेबियस यानें देहदंडनास्तव दीड-दीड मणाच्या बेड्या आपल्या पायांत ठोकून घेतल्या व अशा स्थितींत तीन वर्षें एका कोरड्या झालेल्या विहिरीच्या तळाशीं राहून घालविलीं! दुसरे एक साधु कुजलेल्या धान्याशिवाय दुसऱ्या कशाचाहि आपल्या जिव्हेला विटाळ होऊं देत नसत! दुसरे कांहीं आठ-आठ दिवस कडक उपास करीत व आठ-आठ दिवस आलोचन जाग्रणेंहि काढीत. कांहींजण जंगलांतील हिंस्र पशूंच्या गुहेंत राहत, कांहीं स्मशानांत वास्तव्य करीत, तर कांहीं आटलेल्या विहिरीच्या बुडाशीं ठाण मांडीत. जॉन् नांवाचा साधु तर सतत तीन वर्षें एका खडकाला टेकून उभा होता. या तीन वर्षांत तो एकदांहि बसला नाहीं कीं निजला नाहीं; व रविवारच्या नैवेद्याशिवाय त्यानें कांहीं खाल्लेंहि नाहीं असें म्हणतात! मेसापोटेमिया व सीरिया या देशांत असे साधु होते कीं ते नेहमीं डोंगरांवर भटकत व गुरांप्रमाणें फक्त गवत खात!

गलिच्छपणा हा ह्या साधूंचा अत्यंत अभिमानास्पद विषय दिसतो. पुरुष तर हातपाय धुणें हें पाप मानीतच; पण बायकाहि तत्त्वपालनाकरितां म्हणून पाण्यास स्पर्श करीत नसत! सिल्हिया नांवाच्या एका जोगिणीनें साठ वर्षांत हाताशिवाय शरीराचा कोणताहि भाग धुतला नाहीं म्हणे! त्यामुळें तिला रोग जडले, पण तिनें आपलें व्रत सोडलें नाहीं. ह्या गलिच्छपणाची सीमा कोठपर्यंत जाई याची कल्पना हवी असली तर सेंट सायमन स्टाइलिटस् याचें चरित्र पाहावें. या साधूनें आपल्या कमरेभोंवतीं एक दोर घट्टपणें आवळून बांधला होता. तो फार घट्ट झाल्यामुळें मांसांत रुतून तें मांस कुजूं लागलें होतें तें इतकें कीं, त्याच्याजवळ जाणाऱ्याला उग्र दुर्गंधीचा भपकारा सहन करावा लागे, व तो इकडे तिकडे वळूं लागला कीं त्याच्या कुजणाऱ्या

जखमांतून पटापट अळ्या जमिनीवर पडत! ह्या अळ्या जमिनीवर पडल्या कीं त्यांना पुन्हा उचलून पूर्वींप्रमाणें जखमेंत ठेवाव्या अशी त्याची त्याच्या भक्तगणांना ताकीद होती व त्याप्रमाणें तें त्यांना पुन्हा जखमांत ठेवीत व साधुवर्य म्हणे कीं, "खा, बाबांनो, खा. देवानें दिलें आहे तितकें खा."

धनसुतदारांचा मोह सोडणें हाहि प्रकार भरपूर आढळतो. मठांत कोणालाहि मठवासी म्हणून प्रवेश मिळण्यापूर्वीं त्यानें वा तिनें आपल्या नातेवाइकांचे पाश पूर्णपणें तोडून टाकिलेच पाहिजेत असा दंडकच असे. थीब येथील एकजण ॲबट सिसोकडे मठवासी होण्याकरितां आला तेव्हां त्याला ॲबट म्हणाला, 'तुझें निकटचें नात्याचें असें कोण आहे?' 'माझा एक लहानगा मुलगा आहे महाराज.' 'तर मग आधीं परत जा आणि प्रथम त्याला अग्नीस अर्पण कर व मग मठांत ये कसा!' ही आज्ञा ऐकतांच तो बिचारा खराच परत गेला व त्यानें आपल्या मुलास अग्नीस अर्पण करण्याची खरोखरीच तयारी चालविली म्हणे! एकदां संन्यासाश्रम स्वीकारल्या-वर पूर्वाश्रमीची आपली मातोश्री जरी मरणोन्मुख असली तरी तिचेंहि तोंड पाहणें पाप समजलें जाई. सेंट मार्कसवर असा प्रसंग आला होता. त्याची आई मृत्युशय्येवर पडली असतां तिनें मार्कस ज्या मठांत राहत होता त्या मठाधिपतीची विनवणी करून त्याच्या-कडून आपणाला भेटण्याविषयीं मार्कसला आज्ञा करविली. मार्कसला मोठें संकट पडलें. आज्ञाभंग करणेंहि अशक्य व आईचें तोंड पाहण्याचें पाप करणेंहि अशक्य. शेवटीं त्यानें एक शक्कल काढली. त्यानें केलें वेषांतर, बांधले डोळे आणि नंतर आईची भेट घेतली. यामुळें आईनें मुलाला ओळखलें नाहीं व मुलानें आईला पाहिलें नाहीं! इतिहासकार लेकी यानें आपल्या 'युरोपियन नीतिमत्तेचा इतिहास' या ग्रंथांत असले अनेक प्रकार वर्णिलेले आहेत.

बाराव्या शतकांतील आल्बिजेन्शियन पंथ हा तर एक मोठा कट्टर

वैराग्यपंथ होता. शरीर हें सर्व अनर्थांचें मूळ असें तो मानी, आणि आत्महत्या पुण्य समजून कांहीं जोगी, कोणी शिरा कापून, कोणी विषप्राशन करून, कोणी प्राणांतोपवास करून, शरिराचा त्याग करीत व आत्म्याला शरिराच्या तुरुंगांतून सोडवीत! ऐहिक सुखाविषयीं दुर्दम तिटकारा हा स्टोइक् नांवाचा जो पंथ होता त्यांतहि भरपूर पाहावयास मिळतो. ह्या पंथाचा संस्थापक डायोजिनस हा वीस वर्षें एका टबांत बसून राहिला होता. याच पंथांतील एपिक्टेटस् हा एका अत्यंत क्रूर खुनशी धन्याचा गुलाम होता व त्याचें जिणें अत्यंत उद्वेगकारक होतें. तरीहि त्याची वृत्ति अत्यंत शांत होती. त्याचा धनी एकदां त्याला दंडुक्यानें मारूं लागला तेव्हां तो म्हणाला, "असें माराल तर माझा पाय मोडून जाईल." धनी थोडाच ऐकतो! त्यानें पाय मोडलाच. पण त्यावर गुलाम एवढेंच शांतपणें बोलला, "मीं नव्हतं सांगितलं कीं, पाय मोडेल म्हणून बरं?" या स्टोइकपंथानें सर्व प्रकारच्या ऐहिक तृष्णांवर विजय मिळविला होता. आणि येथें कष्ट भोगले तर परलोकांत तरी ऐश्वर्य मिळेल अशी आशा न धरितांहि त्यांनीं वैराग्यवृत्ति अंगीं बाणवली होती ही गोष्ट त्यांच्या तत्त्वनिष्ठेची द्योतक नव्हे काय?

## शहाण्यानें विवाह करूं नये

संसाराविषयींच्या उदासीनतेचें स्वरूप गृहस्थाश्रमाविषयींच्या तिटकाऱ्यांत चांगलेंच प्रत्ययास येतें. त्याच्या आचरणाचें येथवर दिग्दर्शन केलें. आतां त्याच्या विचारसरणीचा एक नमुनेदार मासला म्हणून चौथ्या शतकांतील संत थिओफ्रास्टस् याचें पुढील प्रवचन ऐका. प्रवचनाचा विषय **शहाण्यानें विवाहाच्या फंदांत पडूं नये** असा आहे. थिओफ्रास्टस् उवाच :

"शहाण्या माणसानें एकंदरींत संसाराच्या फंदामध्यें न पडणेंच चांगलें. पहिलें म्हणजे असें कीं भार्या ही अध्ययनाच्या आड येते. भार्या आणि विद्या या दोघींची सारखीच सेवा करणें कोणालाच

शक्य नाहीं. विवाहित स्त्रीला नको काय? तिला उंची वस्त्रें काय, जडजवाहिर काय, दासदासी काय, पालखी-मेणा काय--आणि नको काय? शिवाय रात्रभर तिची पिरपिर सुरूच--"ती शेजारची ठमाबाई कशी झकपक पोषाक करून मिरविते पाहिलं का? सगळीं-जणं तिला वाखाणतात, आणि मला बटकीला मेली मान खालीं घालून बसावं लागतं. तुम्हीहि पण आज त्या बाईकडे कां हो निरखून पाहत होतां? आणि इश्श, मोलकरणीशीं काय बोलत बसलां होतां? बरं, आज बाजारांतून काय आणलंत?" वगैरे वगैरे. कोणा मित्राकडे वगैरे जाण्याचीहि सोय नाहीं. नाहीं तर बाईसाहेबांना संशय आलाच म्हणून समजावें. तिला वाटतें आम्ही तिचा नेहमीं द्वेष करतों म्हणून. शहरांतल्या एखाद्या चांगल्या प्रवचनाला जावें म्हणावें तर हिचा खोडा आहेच. बरें, हिला बरोबर न्यावी म्हणावें तर तिला अक्षराचा नाहीं गंध! गरिबींत असलों तर हिला पोसायची पंचाईत आणि दोन पैसे बाळगून असलों तर मग हिचें समाधान कधींच व्हावयाचें नाहीं. बरें, बायकोची निवड करावयाची तरी मुभा आहे? छेः! जी पदरांत पडेल ती पवित्र म्हणून स्वीकारावी लागते. ती कशी आहे हें लग्नाच्या आधीं मुळीं कळतच नाहीं. रागीट आहे कीं मूर्ख आहे कीं कुरूप आहे कांहीं कळावयाचें नाहीं. आणि सुरूप असली किंवा कुरूप असली तरी दोन्हीकडून त्रास. सुरूप असली तर तिच्यावर अनेकांचा डोळा राहिल्यानें तिला नीट ठेवणें कठीण, आणि कुरूप असली तर जिच्याकडे कोणी ढुंकून पाहत नाहीं असलें लोढणें बाळगण्याचा नसता उपद्व्याप! त्यांतल्या त्यांत विचार केला तर कुरूप असलेलीच बरी म्हणावयाची. कारण सर्वांचा जिच्यावर डोळा आहे अशीला सुरक्षित कशी समजावयाची? कोणी आपल्या सौंदर्यानें तिच्यावर मोहिनी घालणार, कोणी विद्वत्तेनें, कोणी शहाणपणानें, कोणी औदार्यानें. आणि अशा रीतीनें किल्ल्याच्या सगळ्या बाजूंनीं हल्ला सुरू झाला, कीं तो केव्हां तरी कोसळावयाचाच!

आणि लग्न करावयाचें तरी कशाकरितां ? घर सांभाळायला, आजारी-पणांत शुश्रूषा करावयाला आणि एकलकोंडें वाटूं नये एवढ्या-साठींच ना ? मग मी म्हणतों कीं हीं सर्व कामें पैका देऊन ठेवलेला नोकरच अधिक चांगली व बिनतक्रार करील. बायकोला वाटतें कीं नवऱ्याच्या इच्छेविरुद्ध वागलों तरच आपण घराच्या मालकीण खऱ्या ! आतां मुलांबाळांकरितां लग्न करावें म्हणाल तर हाहि मूर्खपणाच नाहीं का ? आपला वंश वाढावा, म्हातारपणीं पाणी घालावयास कोणी तरी असावें म्हणून लग्न करावयाचें असें म्हणतां, तर असें समजा कीं आपण मेलों, जग बुडालें ! आपण मेल्यावर मुलगा आपलें नांव चालवितो कीं नाहीं याची नसती चिंता वाहाच कशाला ? आणि म्हातारपणीं तो उपयोगी पडेल याची तरी काय खात्री ? आपल्या देखतच पोरें मरणार नाहींत हें तरी कशावरून ? आणि जगलीं तरी चांगलीं निघतील कशावरून ? तेव्हां वारस म्हणून कोणी हवाच असेल तर मित्रमंडळींतूनच कां निवडून न घ्या ? उत्तम मार्ग म्हणजे आपल्यामागून कोणाच्या तरी हातीं आपला पैसा ठेवण्यापेक्षां हयातींतच खर्चणें हा होय. सारांश, संसार मांडण्याच्या फंदांत पडूं नये हा उत्तम मार्ग." (*Life in the Middle Ages*, Vol. 4, By Coulton ).

अध्यात्मिकतेची यापुढची पायरी म्हणजे योगी व साक्षात्कारी ब्रह्मवेत्त्यांची. त्यांच्या शोधार्थ युरोपकडे वळलांत तर साक्षात्कारी विभूतींनीं त्याहि देशाला अलंकृत केलेलें तुम्हांस आढळून येईल. "सोळाव्या शतकांतील जेसुइट पंथाचा संस्थापक इग्नेशियस लोयोला हा योगमार्गांत चांगला प्रवीण होता. त्याच्या पंथांत देहदंडन आणि ध्यानधारणा या दोन्हींवर भर असे. तो रोज स्वतः सात तास प्रार्थनेंत घालवी आणि देहदंडनास्तव रोज रात्रीं तीनदां चाबकानें आपल्या देहावर कोरडे ओढून घेत असे ! मठांत प्रवेश होतांना भिक्षूला एक कफनी मिळे. ती जी एकदां अडकवावयाची ती थडग्यांत

दफन होईपर्यंत काढावयाची नाहीं! मग तिला दुर्गंधि येवो किंवा तिच्या चिंध्या होवोत. ग्रंथवाचनाची वेळ सोडून भिक्षूनें खोलींत नेहमीं अंधारांत बसलें पाहिजे, त्याच्या तोंडावर हास्य चुकून देखील दिसतां कामा नये, कायिक भावना मारण्याकरितां त्यानें नेहमीं अंगावर फटके ओढून घेतले पाहिजेत अशा प्रकारचे नियम लोयोलानें घालून दिलेले होते. देहदंडनाच्या जोडीला योगमार्गहि त्यानें आखला होता. ध्यानधारणेच्या ज्या सात अवस्था त्यानें वर्णिल्या आहेत त्या आपल्याकडील यौगिक अवस्थांशीं जुळत्या आहेत. दोलायमानता, स्थिरता, ध्यानधारणा, पवित्रता, एकात्मता, एकरूपता, सायुज्यता या त्या अवस्था होत. इतर अनेक धर्मपंथांप्रमाणें या पंथांत उत्तर-कालीं अनेक वामाचार शिरले. पण प्रारंभीं हा योगमार्गी पंथा-सारखाच पंथ होता. पंथाचा संस्थापक लोयोला हा प्रथम एक लष्करी सरदार होता. पण एका लढाईंत जखमी झाल्यामुळें त्याला उपरति झाली आणि नंतर बराच काल तीर्थाटन करून आल्यावर शेवटीं त्यानें जेसुइट पंथाची स्थापना केली." (अड्यार पत्रक ९१.)

## साक्षात्कारी साधुसंत

ब्रह्मसाक्षात्कारी संतसाधूंची टीप घेतली तरीहि असेंच आढळून येतें कीं, ब्रह्मानंदीं टाळी लागून परमेश्वरस्वरूपीं तल्लीन होण्याचा अनुभव हा कांहीं फक्त भारतीयांसच बहाल झालेला आहे असें नव्हे. ह्या भागाचा वाटा भारतीयांप्रमाणें पाश्चात्यांनाहि लाधलेला आहे. आपल्या-कडे जसे ज्ञानेश्वर-तुकारामादि साक्षात्कारी संत होऊन गेले तसे पाश्चा-त्यांतहि प्लोटिनस्, ऑगस्टाइन, सेंट फ्रान्सिस वगैरे साक्षात्कारी महात्मे होऊन गेले. श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या आयुष्यांत सोज्ज्वळ साधुत्व आणि घटपटादि तत्त्वज्ञान यांचा जसा सुंदर मेळ घालून दाखविला तसाच तो प्लोटिनस् यानेंहि दाखविला. तत्त्वज्ञानाच्या जोडीला ज्ञानेश्वरींत जें सुंदर काव्य विलसत आहे त्याला पाश्चात्यांतील तोड

तुम्हांस पाहावयाची असल्यास इटालियन कवि व तत्त्वज्ञ डांटे याच्या ग्रंथांकडे वळा. आपल्याकडे मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा वगैरे साक्षात्कारी स्त्रिया होऊन गेल्या त्यांचे पश्चिमेकडील नमुने अवलोकावयाचे असल्यास नाखुइचची ज्यूलियन, साएनाची कॅथराइन, व सेंट टेरेसा यांचीं चरित्रें चाळा. 'सावधान' शब्द कानांवर पडतांच सावध होणाऱ्या रामदासांचा पाश्चात्य जोडीदार अवलोकावयाचा असल्यास विवाहाच्या पहिल्या रात्रींच शय्येवरून निघून जाणाऱ्या संत अलेक्झिस याचें चरित्र पाहा. आणि अस्पृश्य चोखामेळा याच्या पाश्चात्य बंधूची गाठ घ्यावयाची असल्यास चांभार भोम (Bohme) च्या घराकडे वळा.

आपल्याकडे साक्षात्कारी साधुसंतांचे जे निरनिराळे प्रकार आढळून येतात तसले पाश्चात्यांतहि सापडतात. कांहीं संत 'ज्ञानियांचे राजे' जे ज्ञानेश्वर त्यांच्याप्रमाणें ज्ञानप्रधान असतात, कांहीं भक्तिमंदिराचे कळस जे तुकोबाराय त्यांच्याप्रमाणें भक्तिप्रधान असतात आणि कांहीं समाजाला समर्थ करणाऱ्या समर्थ रामदासांप्रमाणें क्रियाप्रधान असतात. पाश्चात्य साधुसंतांतहि हे सर्व प्रकार नजरेस येतात. या दृष्टीनें पाहूं गेलें असतां तुकारामाच्या अभंगांतील हर्षमर्षादि त्या त्या मानसिक अवस्था सुसोमध्यें वाचावयास सापडतात. आणि रामदासाप्रमाणें संघटना, सामर्थ्य, चळवळ यांचा खटाटोप उभारणारे साधुश्रेष्ठ पाश्चात्यांमध्यें पायथॅगोरस, लोयोला वगैरेंच्या रूपांत आढळून येतात. रामदासांनीं जसा आपला एक स्वतंत्र रामदासीपंथ निर्माण केला, तसाच प्रयत्न पायथॅगोरसनेंहि केला. रामदासांनीं धर्मकारण आणि राजकारण यांचा जसा समन्वय केला, तसाच लोयोला यानेंहि केला.

या साधुसंतांचीं चरित्रें सोडून त्यांची शिकवण पाहिली तरीहि पौर्वात्य व पाश्चात्य यांमध्यें एकच सूर आढळून येतो. आत्मा आणि परमात्मा यांचा संबंध बिंब-प्रतिबिंबाप्रमाणें आपले साधु वर्णन

करितात व दोन्हीहि मूलतः एकरूपच आहेत असें प्रतिपादन करितात. तेंच प्रमेय पाश्चात्यांतहि आढळतें. उदाहरणार्थ, प्लोटिनस् लिहितो कीं-- 'If a Man sees himself become one with the One, and if he passes out of himself as an image to its archetype, he has reached the end of the journey.'

साम्यावस्था व द्वंद्वातीत अवस्था यांचें आपल्याकडे जें वर्णन आढळतें त्याच्या तोडीचें प्लोटिनस्चें पुढील वर्णन पाहा, 'Nothing stirred up within him when he had gained the summit, not even reason was left, nor any intellection, nay himself was not present to himself. नामजपावर आपल्याकडे जोर दिला जातो तसाच तो तिकडेहि आढळतो. 'Virtues of The Holy Name of Jesus' चा कर्ता Rolle लिहितो, 'O Jesus, thou dost save man, therefore Jesus is the name Ah, Ah that wonderful name! Ah that delectable name! This is the Name that is above all names without which no man hope for salvation.' ध्यानधारणा व साक्षात्कार यांच्या मार्गांत असतां अनेक सिद्धि प्राप्त होतात. पण परमेश्वरप्राप्तीची हाव बाळगणारांनीं या सिद्धींत गुरफटून जाऊं नये असा इशारा जसा आपल्या ग्रंथांत आढळतो तसाच पाश्चात्यसाधुश्रेष्ठांच्याहि ग्रंथीं सापडतो. सेंट जॉन ऑफ क्रास म्हणतो, 'We must fly from all mystical phenomena without examining whether they be good or evil. Visions are at best childish toys. The fly that touches honey cannot fly. ( रानडे, 'मिस्टिसिझम इन् महाराष्ट्र' ).

## आधुनिक तपस्वी

अध्यात्मिकतेचें कोणतेंहि अंग तपासलें तरी त्यांत पाश्चात्य हे अनध्यात्मिक ठरत नाहींत हें वरील माहितीवरून लक्षांत आलें असेल. मानवाचें सर्व व्यावहारिक जीवन अदृश्य शक्तींनीं गुरफटलेलें आहे, त्या शक्तींचें स्मरण ठेवून त्यांना अनुलक्षून, त्यांना कौल लावून, त्यांना नवससायास करून, शुभाशुभ मुहूर्त पाहून, प्रत्येक पाऊल टाकणें ही वृत्ति जर अध्यात्मिक असेल तर ती वृत्ति पाश्चात्यांत भरपूर होती व आजहि आहे. आयुष्याचें एकमेव ध्येय परमेश्वरप्राप्ति व त्याचें साधन म्हणून देहदंडन, तपस्या, वैराग्य यांची कांस धरणें ही जर अध्यात्मिकता असेल तर पाश्चात्यांचे मध्ययुगांतील वनवासी साधु हे भरतखंडांतलि प्राचीन तपस्व्यांना हार जाणार नाहींत. आजहि रोमन कॅथॉलिक पंथांत नैष्ठिक ब्रह्मचर्य व निष्कांचनत्व यांचा वसा घेऊन आमरणान्त मठांत वावरणारे जे स्त्रीपुरुष आढळतात ते, भरतखंडांतील मठांतून आणि गुहांतून राहणाऱ्या तडीतापशांपेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें कमी दर्जाचे लेखतां येणार नाहींत.

## नवे ऋषिवर्य

पण याहीपेक्षां एक अगदीं निराळा तपस्व्यांचा वर्ग पाश्चात्यांमध्यें सध्यां अवतीर्ण झाला आहे, त्याच्याकडे मुद्दाम लक्ष वेधलें पाहिजे. अहर्निश चिंतन, अजस्त्र उद्योग, ध्येयसाधनासाठीं प्राणांचीहि आहुति देण्याची तयारी हीं जर अध्यात्मिकतेचीं लक्षणें असतील, तर तीं या नवतपोनिष्ठांमध्यें तुम्हांस अवश्य आढळतील. मग कोणते हे नवे तपोनिष्ठ ? तर दुसरे तिसरे कोणते नसून विद्यामंदिरांत, प्रयोगशाळेंत, वेधशाळेंत, जंगलांत, आणि गिरिकंदरांत ज्ञानविज्ञानाची अव्यभिचारी भक्तीनें व निष्ठेनें सेवा करणारे शास्त्रज्ञ! काय तुम्हांला हसूं आलें ? कोठें आजचे पाश्चात्य शास्त्रज्ञ आणि कोठें पूर्वींचे भरतखंडांतील

तपोनिष्ठ महर्षि! या दोहोंना तुळेपुढें एकत्र उभे करणेंच हास्यास्पद आहे असें तुम्हांस वाटतें? होय वाटेल. कारण पूर्वसंस्कार तसाच जबर आहे. तपोनिष्ठ म्हटला म्हणजे तो गिरिकंदरांत जाऊन पद्मासन घालून नासाग्र दृष्टि लावून बसलेला, असेंच चित्र आपल्या मनःश्चक्षूंपुढें उभें राहतें. प्रयोगशाळेमध्यें तासन् तास अत्यंत एकाग्र चित्तानें एखादें विज्ञानाचें गूढ उकलण्याचा प्रयोग करीत बसणें ही तपश्चर्या आहे ही कल्पनाच मनाला लवकर पटत नाहीं. पण जरा विचार करून सांगा कीं, वाग्देवतामंदिरांतील व प्रयोगशाळेंतील तपश्चर्या ही गिरिकंदरांतील तपश्चर्येपेक्षां कमी उग्र आहे का?

उदाहरणाकरितां फार लांब जावयास नको. भारतीय व युरोपीय संस्कृतीची जी माहिती प्रस्तुत निबंधास आधारभूत झाली आहे, ती जमविण्याकरितां पाश्चात्य विद्वानांचे केवढे परिश्रम व केवढी तरी तपश्चर्या खर्ची पडली आहे! अशोकाचे शिलालेख व त्यांतील धर्मघोष आज सर्वांना परिचित झाला आहे. पण कित्येक शतकें या लेखांच्या लिपीचें ज्ञानच लुप्त झालें होतें. ही रुष्ट झालेली लिपि पुन्हा प्रसन्न होऊन बोलूं लागली ती विद्वानांच्या निरलस उपासनेमुळें. हिला प्रसन्न करण्याचें श्रेय जेम्स प्रिन्सेप याचें आहे. कलकत्त्याच्या सरकारी टांकसाळीवर हा अधिकारी होता. दोन भाषांत मजकूर असलेलीं पुष्कळ जुनीं ग्रीक नाणीं त्याच्या नजरेखालून गेलीं होतीं. त्यावरून त्यानें कांहीं अनुमान बांधलें. सांची येथील स्तूपावरील अक्षरें तपासीत असतां त्याला असें आढळून आलें कीं, प्रत्येक लेखाचा शेवट दोन अक्षरांनीं होई. तेव्हां हा शब्द 'दानम्' हा असावा असा त्यानें कयास बांधला. मागचा शब्द षष्ठ्यन्त म्हणून तो 'सा' असावा अशी सुरुवात करून व ग्रीक नाण्यांचें साहाय्य घेऊन मोठ्या परिश्रमानें व चिकाटीनें त्यानें सर्व लिपि हस्तगत केली. ईजिप्तमधील जुनी चित्रलिपि व असीरियांतील कीलाकृति लिपि या साध्य होण्याकरितां विद्वानांनीं वर्षानुवर्षे परिश्रम घेतले म्हणूनच

मानवी संस्कृतीचा पुराण इतिहास आज थोडाबहुत रेखाटतां येऊं लागला आहे. कोणत्याहि शास्त्रांतील गुंतागुंतीचा एखादा प्रयोग चालू असतां किंवा त्याचें गणित चालू असतां मनाची विलक्षण एकाग्रता व्हावी लागते हें सांगावयास का पाहिजे? सुप्रसिद्ध गणिती न्यूटन हा आपल्या गणितांमध्यें इतका गर्क असे कीं शेजारीं टेबलावर आचाऱ्यानें आणून ठेवलेलें भोजनाचें ताट कित्येक तास तसेंच वाट पाहत पडे हें तुम्हांस माहीत आहेच. विजेचे दिवे हे आज लहान मुलांचीं खेळणीं झाले आहेत, पण या दिव्यांच्या आंतील प्रकाशणारी नाजुक तार साध्य करण्याकरितां एडिसनला दिव्य करावें लागलें होतें. प्रथम ही तार तो कार्बनची बनवी. मोठ्या प्रयासानें ही तार बनवावी आणि ऐनवेळीं ती ठिसूळ ठरून मोडून जावी असें तीन-चारदां झालें. शेवटीं एडिसननें आपणास एका खोलींत कोंडून घेतलें आणि सतत चोवीस तास एकाग्र मनानें खपून प्रयोग सिद्ध झाल्यावरच त्यानें अन्नग्रहण केलें! आर्किमिडिजच्या एकाग्रतेची कथा प्रसिद्ध आहे. राजाच्या सुवर्ण-मुकुटांतील सुवर्ण अस्सल आहे कीं नकली आहे हें शोधून काढण्याच्या प्रश्नांत स्वारी गर्क असतांच आंघोळीच्या टबांत उतरली आणि प्रश्न सुटतांच 'सापडलें! उत्तर सापडलें!' असें म्हणत टबांतून बाहेर पडून नागवीच रस्त्यानें ओरडत सुटली. अशा प्रकारची देहभान हरपविणारी एकतानता ही योग्याच्या एकतानतेहून निराळी आहे काय? वेध-शाळेंत रात्रीच्या रात्री आलोचन जाग्रणें करून ताऱ्यांचे वेध घेत बसणारे ज्योतिषी तुम्हीं पाहिले असतील. दिवसानुदिवस, मासानुमास, वर्षानुवर्षे हे वेध घेण्याचें काम सतत अव्याहत चाललेलें असतें. गणितावरून नवीन पंचांगें तयार करण्याचें काम तर अनेक देशांतलि वेधशाळांतून वाटलेलें असून, त्या सर्वांच्या परिश्रमाचें फल एकत्रित करून तें पूर्णत्वास येत असतें. अनेक देशांतील विद्वानांच्या परिश्रमानें तयार होणारें व कलाविकलांचाहि दोष राहूं न देणारें हें

पंचांगकार्य अनेक ऋत्विजांच्या साहाय्यानें दीर्घकाल चालणाऱ्या व पदपदाक्षराचीहि चूक न होऊं देण्याइतक्या दक्षतेनें चालविलेल्या मोठ्या यज्ञसत्राच्या तोडीचेंच नाहीं का? नुसते तारे मोजण्याची गोष्ट घेतली तरी दुर्बिण आणि छायाचित्र यांच्या साहाय्यानें लाखों तारे शास्त्रज्ञांनीं निरलसपणें मोजले आहेत. पशुपक्षी, कृमिकीटक यांचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ घेतले तरी त्यांचीहि तपश्चर्या अशीच उग्र आहे. कीटक किती प्रकारचे आहेत असें तुम्हांस विचारलें तर तुम्ही दहा-पांच किंवा फार तर पांचपन्नास कीटकांचीं नांवें सांगाल. पण शास्त्रज्ञांनीं कष्टाळूपणें किती कीटकांची मोजदाद केली आहे असें तुम्हांस वाटतें? शेंपन्नास किंवा दहापांच हजार नव्हे, तर अडीच लाख! या नुसत्या संख्येवरूनच त्यांची चिकाटी, कष्टाळूपणा, ज्ञानलालसा म्हणजेच अर्थात् तपस्या कोणत्या दर्जाची आहे याची कल्पना यावी.

ज्ञानोपासनेच्या पायीं प्राणार्पण करण्याची तयारी असणें यास तरी तप म्हणण्यास तुम्ही तयार आहां काय? असलात तर कैलास पर्वतावर आरोहण करण्याकरितां प्रतिवर्षी आपल्या प्राणांचे बळी देत आलेल्या नरवीरांचें नुसतें स्मरण करा म्हणजे या नव्या त्यागमूर्तींची योग्यता तुमच्या ध्यानीं येईल. वैद्यक शास्त्रानें मानवावर अनंत उपकार केलेले आहेत. या शास्त्रांतील ऋषिवर्यांचें उदाहरण पाहिजे असल्यास अमेरिकन गोल्डबर्गर ह्याचें देतां येईल. या संशोधकानें पेलाग्रा नांवाच्या रोगासंबंधीं संशोधन करण्यांत जीवितहि धोक्यांत घातलें. ह्या रोगांत त्वचा फाटली जाऊन कात्रे पडतात व कित्येक वेळां रोग्याला वेड लागण्यांत त्याचें पर्यवसान होतें. हा रोग संचारी नाहीं हें सिद्ध करण्याकरितां या संशोधकानें रोग्याचें रक्त आपल्या शरीरांत टोंचलें आणि एवढ्यानेंहि समाधान होईना म्हणून त्याची विष्ठा कोळून सात वेळां प्राशन केली!

असली· प्राणांचीहि पर्वा न करतां ज्ञानाची अखंड उपासना चालू ठेवणारे शास्त्रज्ञ हे भोगवादी आहेत काय हें आपल्या मनास विचारून पाहा. पतीच्या चितेवर आरूढ होणाऱ्या सतीस तुम्ही महासाध्वी मानता, तर विमानविद्या हस्तगत करण्याकरितां प्राण अर्पण करणाऱ्या शास्त्रज्ञाला महान् साधु म्हणावयास कां तयार होऊं नये? विद्येची, ज्ञानाची अव्यभिचारी उपासना हिला तपश्चर्या म्हणावयाचें नाहीं, तर कशास म्हणावयाचें? या प्रश्नाला एकदम निश्चित असें उत्तर आज आपलें मन देत नाहीं, पण त्याचें कारण पूर्वसंस्कार एवढेंच होय. तप, तपश्चर्या, अध्यात्मिक जीवन, ध्यानधारणा वगैरे शब्द उच्चारले म्हणजे एक विशिष्ट प्रकारची तपश्चर्या तेवढीच आपल्या डोळ्यांपुढें उभी राहते. तितक्याच उग्र स्वरूपाची दुसऱ्या प्रकारची तपस्या असूं शकते याचें आकलनच लवकर होत नाहीं. असा प्रकार संस्कृतीच्या संक्रमणांत नेहमीं घडत असतो. प्राचीन काळीं यज्ञकल्पनेच्या बाबतींत असाच प्रकार नाहीं का झाला? वैदिक काळीं यज्ञ म्हणजे होमहवनयुक्त यज्ञ, व तोच काय तो स्वर्गप्रद मार्ग अशी कल्पना रूढ होती. कालांतरानें अध्यात्मिक जीवनाचे अनेक मार्ग अस्तित्वांत आले आणि तीळ, तांदूळ, तुपाचे डबे अग्नीस समर्पण करणें हें जसें पुण्यकर्म, तसें तें गोरगरिबांस दान करणें हेंहि पुण्यकर्म अशा कल्पना उदयास आल्या. पण या नव्या मार्गांना यज्ञमार्गाचें पुण्यशीलत्व देण्यास रूढ मन प्रथम तयार नसावें. अशा वेळीं सर्व नव्या मार्गांचा समन्वय करण्याचें उत्कृष्ट कार्य करण्यास गीताकार पुढें आले आणि त्यांनीं अधिकारयुक्त वाणीनें प्रतिपादिलें कीं, "द्रव्ययज्ञाः तपोयज्ञाः योगयज्ञाः तथाऽपरे। स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः। सर्वेऽप्येते यज्ञविदः यज्ञक्षपितकल्मषाः॥" म्हणजे कोणी द्रव्यरूप यज्ञ करितात, कोणी तपोरूप करितात, कोणी योगरूप, तर कोणी स्वाध्यायरूप, तर कोणी ज्ञानरूप यज्ञ करितात आणि या सर्व यज्ञवेत्त्यांच्या कल्मषाचा अथवा पापाचा क्षय होतो. अर्थात् हे

सर्व तपाचेच मार्ग होत. यामध्यें ज्ञानाची उपासना हेंहि तप होय, असें गीताकारानें प्रतिपादलें आहे त्याकडे आपलें लक्ष गेलेंच असेल. ज्ञानोपासना ही निःसंशय तपश्चर्याच होय, असा गीताकारांचा स्पष्ट अभिप्राय आहे. गीतेसारखाच दुसरा महत्त्वाचा अभिप्राय हवा असल्यास मनुस्मृति उघडा. मनूनेंहि अध्ययन किंवा ज्ञानोपासना हेंच ब्राह्मणांचें तप होय असा लख्ख अभिप्राय दिला आहे. तो म्हणतो,

वेदमेव सदाभ्यसेत्तपस्तप्यन् द्विजोत्तमः
वेदाभ्यासोहि विप्रस्य तपः परमिहोच्यते ॥ ( अ. २ )

मनूच्या वेळीं सर्वच ज्ञानाचा अंतर्भाव वेदांत केला जात असे म्हणून वेदाभ्यास असा शब्द त्यानें वापरला आहे, तर गीताकारांनीं ज्ञानयज्ञ असा सर्वव्यापी शब्द योजिला आहे. बौद्धधर्म आणि योग-मार्ग या दोहोंनींहि अरण्यांत जाऊन देहदंडनादि तपश्चर्या करण्याचा पुरस्कार चालविला होता, अशा वेळीं मनूनें प्रतिपादलें कीं, तपश्चर्येला देहदंडन व अरण्यवास हीं अत्यावश्यक नाहींत; तर वेदांचें अध्ययन करणें हें तपश्चर्येइतकेंच पुण्यकारक कर्म होय. ध्यानधारणेच्या पाठी-मागेंच सर्व विप्र धावले असते, तर विप्रांचें जें मुख्य सामाजिक कर्तव्य वेदाध्ययन अथवा ज्ञानोपासना तें उत्सन्न झालें असतें. अर्थात् समाजोपकारक कर्में अव्यभिचारी भक्तिभावनेनें करीत राहणें ही तपश्चर्याच होय असाच मनूचा अभिप्राय आहे. आणि गीताकारानें यज्ञमार्ग, योगमार्ग, ज्ञानमार्ग यांच्या जोडीला तुल्यबळ म्हणून दान-मार्गाला जें स्थान दिलें आहे त्याचाहि हेतु हाच नाहीं का ? मनू-प्रमाणें श्रीकृष्णाचीहि दृष्टि लोकसंग्राहक होती. म्हणूनच जनसेवारूपी दानमार्ग यज्ञाइतकाच पुण्यप्रद होय असें त्यानें प्रतिपादलें. आजच्या पाश्चात्य शास्त्रज्ञांची ज्ञानोपासना ही सुद्धां समाजहितवर्धक असल्यानें अशीच पुण्यप्रद तपश्चर्या नव्हे का ?

तुम्ही म्हणाल “ज्ञानोपासना यांतील ज्ञान या पदाचा अर्थ अध्यात्मज्ञान एवढाच फक्त घेतला पाहिजे. वाटेल त्या ज्ञानाची उपासना करणाराला तपस्वी कसें म्हणावें? उपनिषद्कारांनीं सर्व विद्येचें परा आणि अपरा असें वर्गीकरण करून ‘अथ परा यथा तद् अक्षरं अधिगम्यते’ म्हणजे जिनें अक्षर अशा ब्रह्माचें स्वरूप कळतें ती परा विद्या होय. बाकी झाडून सर्व विद्या या अपरा अथवा खालच्या प्रतीच्या विद्या होत असें बजावलें आहे तें विसरलांत वाटतें?”

नाहीं. विसरलों नाहीं. परा-अपरा विद्येचें वर्गीकरण उपनिषद्-कारांनीं केलेलें आहे खरें. पण गीताकारांनीं दान, योग, स्वाध्याय व ज्ञान या सर्वांना तुल्यबल मानलें आहे त्यावरून गीताकारांना तरी ज्ञान याचा अध्यात्मिक ज्ञान एवढाच अर्थ अभिप्रेत असेल असें मला वाटत नाहीं. निदान ज्ञानाच्या जोडीला दान बसविल्यानें सर्व लोकोपकारक ज्ञान लोकसंग्रहकार गीताकाराला अभिप्रेत असण्याचा जास्त संभव आहे. ब्रह्मज्ञानाला राजविद्या म्हणून गीतेनें विशेष गौरविलें असलें तरी समाजहितवर्धक ज्ञानाला ती यज्ञतुल्य मानते. मनूचा अभिप्राय तर निःसंदिग्ध आहे. त्यानें वेदाभ्यास हा शब्द वापरला आहे आणि त्याचा अर्थ ब्रह्मज्ञान एवढा संकुचित नाहीं. कारण उपनिषद्कारांच्या प्रक्रियेप्रमाणें पाहतां वेदाभ्यास हाहि अपरा विद्येचाच प्रकार. त्यांच्या मतें वेदवेदांगें, इतिहासपुराण सर्वच अपरा विद्या. अर्थात् वेदाभ्यास करणें हीच विप्राची तपश्चर्या हा मनूचा अभिप्राय निःसंदिग्ध आहे. तो म्हणजे लोकोपकारक अशा ज्ञानाची उपासना हा होय. नुसता पराविद्येची उपासना हा नव्हे. या मनूच्या दृष्टीनें पाहिलें असतां, देहाचीहि तमा न धरितां विद्येची एकनिष्ठपणें उपासना करणाऱ्या पाश्चात्य शास्त्रज्ञांना तुम्ही तपस्वी म्हणणार कीं नाहीं?

आतां तुम्ही म्हणाल कीं, पाश्चात्य शास्त्रज्ञांची ज्ञानोपासना मान्य, परंतु या ज्ञानाचा उपयोग ते काय करीत आहेत हें नको का

पाहायला ? मनुष्यसंहाराची अजस्र अशीं साधनें निर्माण करणें हेंच ना या त्यांच्या तपश्चर्येचें फल ? नाहीं. एवढेंच खास नाहीं. शास्त्रज्ञांनीं समाजजीवन अनेक मार्गांनीं ऐश्वर्यसंपन्न केलें आहे, त्यांनीं मानवाचे काबाडकष्ट आणि दुष्काळ, रोगराई वगैरे अनेक आपत्तींचें परिहरण करण्याचीं साधनें निर्माण केलीं आहेत हें विसरूं नका. प्राचीन शास्त्रकारांनीं अन्नछत्रें घालणें, पाणपोया स्थापन करणें वगैरे समाजाच्या आर्ति दूर करणारीं कामें हीं यज्ञाच्या तोडीचींच मानलीं आहेत. या धर्मदायकृत्यांना पूर्त म्हणत व यज्ञाला इष्टि म्हणत व हे दोन्ही शब्द इष्टापूर्त या समासांत जोडीनें वापरण्यांत येत. अर्थात् समाजाच्या आपत्ति दूर करणाऱ्या व त्याचें जीवन निरामय व सुखमय करणाऱ्या ज्ञानविज्ञानाची उपासना ही तपश्चर्याच नव्हे का ?

आतां शास्त्रीय शोधांनीं सुखसाधनांची लयलूट करून भोगतृष्णा वाढविली आणि संहारक अस्त्रें निर्माण करून पापांच्या राशी रचल्या; अतएव पाश्चात्य शास्त्रोपासकांना आसुरी म्हणणेंच योग्य असा वाद घालाल तर भारतीयांनाहि आसुरी हेंच विशेषण तितक्याच यथार्थतेनें तुम्हांस लावावें लागेल. कारण भारतीयांनींहि सामाजिक जीवनांत आनंद व सुख ओतणाऱ्या व भोगलालसा वाढविणाऱ्या शास्त्रकलांची पाश्चात्यांच्या इतक्याच उत्साहानें, जोमानें व हौसेनें एके काळीं जोपासना केली होती तेंच आतां पुढील प्रकरणीं पाहणें आहे. आणि संहारक शास्त्राबद्दल म्हणाल, तर कोणत्याहि विद्येचा जसा उपयोग होतो तसा दुरुपयोगहि होत असतो. तो जसा पाश्चात्यांत आढळतो तितक्याच प्रमाणांत भारतीयांतहि आढळतो. अगदीं वेदकाळापर्यंत दृष्टि पोंहोचवलीत तरी अथर्व वेदांतील ऋचांपैकीं अर्ध्याअधिक ऋचा जारण, मारण, वशीकरण मंत्रांनींच भरलेल्या तुम्हांस आढळतील. आणि अथर्ववेद सोडून सोवळा ऋग्वेद उघडलात तरी 'हे इन्द्रा, आमच्या शत्रूचें निर्दालन कर व त्याचें धन लुटून आम्हांस दे' असल्या प्रार्थना हव्या तेवढ्या तुमच्या नजरेस पडतील. तेव्हांपासून

आतांपर्यंत केव्हांहि झालें तरी सुखोपभोगांचा हव्यास व सत्ताधीशांचें आसुरी चाळे हेच भरतखंडांतहि तुम्हांस प्रामुख्यानें आढळून येतील. ते पाहूनहि पाश्चात्य हा आसुरी आणि भारतीय हा दैवी हें पालुपद कायम ठेवावयाचें असल्यास ठेवा !

पण तत्पूर्वी भारतीयांच्या आसुरी लीला आपणांपुढें मांडतों त्या आधीं थोड्या नजरेखालीं घाला.

# प्रकरण सहावें

# आसुरी भारत

दैवी संस्कृति आणि आसुरी संस्कृति हे शब्दप्रयोग प्राच्य आणि पाश्चात्य संस्कृतींना अनुलक्षून वापरण्याची रीत पडली आहे ती गैरवाजवी आहे, हें दर्शविण्याकरितां पाश्चात्य संस्कृतीला दैवी, सात्त्विक, अध्यात्मिक हीं विशेषणें कशीं लावतां येतील हें मागील प्रकरणीं दिग्दर्शित केलें. आतां उलट बाजूनें आसुरी संस्कृति हा शब्दप्रयोग हिंदुसंस्कृतीलाहि कसा लावतां येईल याचीहि थोडी दिशा दाखवितों.

प्रारंभीं एक मुद्दा स्पष्ट केला पाहिजे तो हा कीं, कोणत्याहि संस्कृतीचें मूल्यमापन करतांना त्या संस्कृतीनें मांडलेलीं ध्येयें जशीं लक्षांत घ्यावीं लागतात, त्याप्रमाणेंच तिची प्रत्यक्ष व्यावहारिक वर्तणूकहि लक्षांत घ्यावी लागते; आणि ही व्यावहारिक वर्तणूक जी लक्षांत घ्यावयाची ती सत्ताधीशांची घेणें हा उत्तम पक्ष. व्यक्तीच्या सात्त्विक, राजस, व तामस मनोवृत्तींच्या स्वच्छंद आविष्कारास जी अनुकूल परिस्थिति लागते ती सत्ताधीशांनाच विशेषतः साध्य असते. ज्याच्या हातीं सत्ता नाहीं त्याची वृत्ति सात्त्विक असली तरी तिला सात्त्विक म्हटली न जातां दुर्बल म्हणवून घेण्याचाच अपमान सोसावा लागतो. तेव्हां तामसी अथवा आसुरी लीला खेळण्याचें सामर्थ्य ज्यांच्या मनगटांत असतें अशा सत्ताधीशांनीं, सिंहासनस्थ राजांनीं आपली वृत्ति कशी राखली हें पाहणें महत्त्वाचें आहे; आणि या दृष्टीनें प्राचीन हिंदु राजांच्या लीलांचा चित्रपट पाहूं लागलों तर त्या लीलांना दैवी हें विशेषण उच्चारतांना जिभेला लाजच वाटेल.

## लटपटीत समर्थन

हिंदुस्थानचे प्राचीन राजे म्हणजे केवळ धर्मावतार, ऋषिमुनींनीं घालून दिलेल्या धर्माप्रमाणें प्रजापालन करणारे, साक्षात् राजर्षि अशी आपली समजूत असते. आणि जोंपर्यंत आपण शाकुंतल, रघुवंश इत्यादि काव्यनाटकेंच फक्त वाचीत असतों तोंपर्यंत ही समजूत जोमांत टिकतेहि. पण या ललित-वाङ्मयावरून दृष्टि काढून कौटिल्याच्या अर्थशास्त्रासारख्या व्यावहारिक ग्रंथाचीं पानें उलटूं लागलों अथवा राजतरंगिणीसारख्या इतिहासग्रंथाची साक्ष पुसूं लागलों म्हणजे मात्र वरील समजूत पार ठार होऊन जाते. पूर्वसंस्कार एवढे जबर असतात कीं हें कटुसत्य गिळवत नाहीं. यामुळें प्राचीन कालीन राजे हे खरोखरीच राजर्षि होते ही समजूत शक्य तर व शक्य तोंवर टिकवावी व जेथें न टिकतां फाटूं लागेल तेथें कांहीं तरी लटपटीत समर्थनाचें ठिगळ द्यावें हा मोह आवरत नाहीं. या विषयासंबंधीं भारताचार्य वैद्य यांचें उदाहरण देतां येईल. महाभारतोपसंहारांत ते लिहितात, "मगधाचें जें साम्राज्य सुरू झालें तें परराज्यास नुसतें जिंकूनच नव्हे, तर काशी व कोसल हीं राज्यें खालसा करून!" परकीयांचीं राज्यें खालसा करणें हा प्रकार गैरच; तेव्हां तो आमच्या राजर्षींच्या हातून कसा घडला याची रुखरुख टाळण्यासाठीं भारताचार्य म्हणतात, "हा प्रकार पर्शियन साम्राज्याच्या अनुकरणानें झाला अशी आमची समजूत आहे" (पृ. २८४). तसेंच भेदनीति, कणिकनीति ही महाभारतकाळींहि रूढ होती. तेव्हां त्याविषयीं भारताचार्य लिहितात, "परराज्यांतील अधिकाऱ्यांना लालूच देऊन वश करून घेण्याची युक्ति पूर्वीं राजरोस चालू होती ही गोष्ट, युद्धिष्ठिरास नारदानें जो प्रश्न केला आहे कीं, 'शत्रुसैन्यांतील अग्रणी पुरुषांस वश करून घेण्याकरितां रत्नादिकांच्या गुप्तभेटी तूं पाठवितोस ना?' यावरून स्पष्ट दिसतें." यावर भारताचार्यांचा शेरा असा आहे कीं, "मात्र भारतकाळीं हे प्रकार फारच थोडे अपवादादाखल होत असले

पाहिजेत" (पृ. ३१८). कणिकनीतीविषयीं तर त्यांच्या मनाची द्विधा वृत्ति झाली आहे. ते लिहितात, "कणिकनीतीचीं तत्त्वें भारतीय आर्यांनीं बहुधा ग्रीक लोकांपासून उचललीं असावीं, किंवा त्यांच्यांतच अशीं कुटिल राजनीतीचीं तत्त्वें उत्पन्न झालीं, हा प्रश्न सोडविण्यास कठीण आहे. चंद्रगुप्ताच्या वेळेपासून मात्र पूर्वीची सरळ नीति लोपून कुटिल नीति सुरू झाली" (पृ. ३२०). मला वाटतें, असलें लटपटीत समर्थन करण्याचा मोह टाळणें हेंच एकंदरींत श्रेयस्कर.

आपल्या देशाच्या आजच्या अवनतावस्थेमध्यें प्राचीन वैभवाची स्मृति जगविणें हें आवश्यक होऊन बसतें हें खरें. पण ही स्मृति ऐतिहासिक सत्यावर जितकी अधिष्ठित असेल तितकीच ती खरी उपकारक आणि उत्साहजनक ठरेल. गतकालचें काल्पनिक चित्र रेखाटून त्यांत रंगून जाण्याची संवय एकदां लागली म्हणजे मग ऐतिहासिक सत्याच्या प्रखर प्रकाशाशीं नजर भिडविण्याचें आपलें सामर्थ्य नष्ट होतें.

आज युरोपांत युद्धाचे काळेकुट्ट ढग सर्वत्र वावरत आहेत; केव्हां कोठें कोसळतील याचा नेम नाहीं. बॉंबगोळ्यासारख्या आसुरी शस्त्र-संभारानें भीषण भेसूर झालेली आजची रणभूमि म्हणजे शुद्ध यमपुरी! युरोपचें राजकारण म्हणजे सर्व आसुरी, तामसी, सैतानी राजकारण! हें पाहून प्राचीन कालाविषयींचा अभिमान मनांत गुणगुणूं लागतो. "आजच्या कालापेक्षां पूर्वीचें राजकारण खात्रीनें जास्त सात्त्विक होतें; निदान आपल्या आर्यावर्तांत तरी तें तसें खास होतें. पूर्वीचे राजे म्हणजे राजर्षि असत. रघुवंशांतील पुण्यश्लोक राजांचें कालिदासानें काढलेलें चित्र किती सात्त्विक आणि विलोभनीय आहे. शैशवांत विद्या संपादावी, यौवनामध्यें सुखोपभोग घ्यावा, वार्धक्यं आलें म्हणजे मुनीवृत्तीनें काळ कंठावा आणि अन्तकाळीं योगबलानें देह ठेवावा असें रघुवंशीय राजर्षींचें जीवन-चरित्र असे! आणि

प्रजेशीं वागणूक म्हणजे केवळ प्रेमळ पित्यासारखी– किंबहुना त्याहून मायेची. माता-पितरांनीं फक्त जन्म द्यावा, पण पुढील शिक्षण, भरण, पोषण ह्या सर्वांची काळजी वाहण्याचें काम राजानें करावें. हे आदर्श आज राहिले नाहींत.”

पण विवेकाला याची साथ करतां येत नाहीं. प्राचीन भारतामध्यें अभिमान बाळगण्यासारखे कांहीं राजर्षि होऊन गेले यांत शंका नाहीं. त्यांचा अभिमान जगविणें हें आपलें कर्तव्य होय. धर्माची ध्वजा अखिल भरतखंडभर फडकवून मानवांनाच नव्हे, तर पशुपक्ष्यांनाहि शोकाचा संपर्क लागूं नये याविषयीं काळजी वाहून, आपलें नांव सार्थ करणारा अशोक याचा अभिमान बाळगावयाचा नाहीं तर कोणाचा? हर्षवर्धन हा दर पांच वर्षांनीं आपली सर्व संपत्ति दान करीत असे, ही परक्या चिनी प्रवाशानें लिहून ठेवलेली हकीकत वाचून अभिमानाचें भरतें आलें तर नवल कसलें? आणि शक, यवन, हूण आदि परकीयांना देशाबाहेर पिटाळून लावून, देशांत स्वातंत्र्यदीप तेवत ठेवणाऱ्या मौर्य, गुप्त, सातवाहनादि राजकुलांचें स्मरण ही तर भावी स्वातंत्र्य संपादनाची जागती ज्योत. पण या योग्य अभिमानामुळें प्राचीन काळचें भरतखंडांतील राजकीय वातावरण हल्लींच्यापेक्षां अधिक शुद्ध व सात्त्विक होतें अशी जर आपण कल्पना करून घेतली तर, ती मात्र आपणांला टिकविणें कठीण जाईल. कशी तेंच आतां पाहूं.

ऐतिहासिक ग्रंथांचें अध्ययनच होत नव्हतें तोंवर धर्मशास्त्रांतून किंवा काव्यांतून वर्णिलेलें राजचरित वाचून प्राचीन राज्यें हीं रामराज्यें होतीं अशा समाधानांत डुलत राहण्यास जागा होती. चिपळूणकरांच्या वेळेपर्यंत ऐतिहासिक ग्रंथ फारसे उपलब्ध नव्हते व त्या ग्रंथांकडे फारसें लक्ष नव्हतें. त्यांनीं संस्कृत कविपंचकांतील बाणभट्ट कवीवरील आपल्या निबंधांत चक्क लिहिलें आहे कीं, आपण बाणभट्टाचें हर्षचरित पाहिलें नाहीं म्हणून! चाणक्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ तर १९१० मध्यें प्रथमच उपलब्ध झाला. आणि मंजुश्रीमूलकल्प उजेडांत

आल्याला दहा वर्षेंहि लोटलीं नाहींत. हे अर्धवट ऐतिहासिक ग्रंथ किंवा राजतरंगिणीसारखा केवळ इतिहासाला वाहिलेला ग्रंथ यांना पुसलें असतां प्राचीन राजचरितांविषयीं ते अगदीं निराळीच साक्ष देतील. ती ऐकून घेतली असतां प्राचीन काळांतील मानीव रामराज्याविषयीं आपल्या कल्पना बदलाव्या लागतील.

## अर्थशास्त्रांतील अघोरी उपाय

या ग्रंथांपैकीं अर्थशास्त्र, हर्षचरित आणि राजतरंगिणी ग्रंथांतून राजशाहीचें दृश्य कसें दिसतें तें पाहूं या.

अर्थशास्त्राचा कर्ता चाणक्य याला काल्पनिक आदर्श राजर्षीचें चित्र रेखाटावयाचें नसून, प्रत्यक्ष व्यवहारांत राजकारण कसें दुष्ट असतें व त्यापासून राजानें स्वतःचें रक्षण कसें करावें हें सांगावयाचें होतें. राजाला सर्वांत मोठें भय दुर्व्यसनी पुत्रापासून. त्याचा बंदोबस्त कसा करावा याविषयीं चाणक्यानें अनेक ग्रंथकारांचीं मतें दिलीं आहेत तीं वाचलीं असतां, तत्कालीन परिस्थिति आजच्याहून भिन्न नव्हती हें ध्यानीं येण्यास वेळ लागणार नाहीं.

सतराव्या अध्यायाचें नांव 'राजपुत्ररक्षण' असें आहे. त्यांत ग्रंथकार लिहितो : " जन्मापासूनच राजपुत्रावर देखरेख करीत असावें. कारण राजपुत्र हे खेकड्याप्रमाणें आपल्या जन्मदात्याचा नाश करितात. भारद्वाज म्हणतो कीं, राजपुत्राच्या अन्तःकरणांत पित्याविषयीं स्नेह उत्पन्न न झाला तर त्याचा गुप्तपणें वध करावा. विशालाक्षाच्या मतें वध करणें राक्षसी असल्यानें राजपुत्राला अंतःपुरांतील बंदिखान्यांत ठेवावा. पाराशरमतें अंतःपुरांत ठेवणें म्हणजे घरांत साप बाळगण्यासारखें असल्यानें सरहद्दीवरील किल्ल्यांत ठेवावा. वातव्याधी म्हणतो कीं, सर्वांत बिनधोक्याचा मार्ग म्हणजे त्याला क्षुद्रविषयोपभोगांचा नाद लावावा व बंदिवासांतच सुख वाटेल असें करावें. पण कौटिल्याच्या मतें योग्य उपचार म्हणजे राजपुत्रास चांगलें शिक्षण देणें हा

होय." शेवटल्या कौटिल्याच्या मतावरून तो उरफाट्या काळजाचा मुत्सद्दी होता ही समजूत नाहींशी होईल. मात्र व्यावहारिक सृष्टीकडे पाठ फिरवून काल्पनिक सृष्टींत रंगणारा तो नव्हता. ज्यांना राज्यकारभार यशस्वी रीतीनें हाकावयाचा आहे त्यांना लौकिक व्यवहारांतील दुष्टपणा आणि निष्ठुरपणा नीट उमगून घ्यावा लागतो व कांटा काढावयास कांटाच हातीं घ्यावा लागतो. कौटिल्यानें ह्या व्यावहारिक दृष्टीनें आपला सर्व ग्रंथ लिहिलेला आहे.

त्याच्या ग्रंथांतील १२ वा अध्याय 'कोषसंग्रह' असा आहे. त्यांत अनपेक्षित खर्चाचे प्रसंग उपस्थित झाले असतां कोषसंग्रह कसा करावा हें सांगितलें आहे. त्यांत ग्रंथकार लिहितो, " सोनें, रुपें, हिरे, हत्ती, घोडे यांचा व्यापार करणाराकडून उत्पन्नाचा ५० वा भाग परवान्यादाखल कर घ्यावा. वेश्यागृहें चालवणारांनीं राजाच्या नोकरींतलि अत्यंत सुंदर व तरुण वेश्यांच्या मदतीनें अपार द्रव्य मिळवावें. कराची मागणी पुन्हा करावयाचा प्रसंग उपस्थित झाला असतां, वसुली अधिकाऱ्यानें लोकोपयोगी कार्याची सबब सांगून पौरजनांपासून वर्गणी जमवावी. सरकारच्या बगलबच्चांनीं सर्वांआधीं खूप मोठ्या रकमा द्याव्या. मग त्यांचें उदाहरण दाखवून खुद्द राजानें पुन्हा लोकांच्याजवळ पैशाची याचना करावी. पाखंडी लोकांच्या संघांचें द्रव्य व श्रोत्रियांखेरीज इतरांच्या उपयोगाकडे जाणारें देवद्रव्य याचा, ज्या माणसाकडे तें ठेवलें होतें तो मरून गेला असें सांगून अधिकाऱ्यांनीं राजाकरितां अपहार करावा. अथवा रात्रीच्या वेळीं एखादें भूमींतून निघालेलें स्वयंभू लिंग निर्माण करून तत्प्रीत्यर्थ यात्रा किंवा उत्सव करण्याच्या निमित्तानें द्रव्य गोळा करावें. तसेंच, साध्वी स्त्रियांचें सोंग घेतलेल्या स्त्रीहेरांनीं राजद्रोही माणसांस नादीं लावून आपल्या घरीं आणावें व मग त्यांच्यावर खोटे आळ घेऊन त्यांना सर्वस्व ओकावयास लावावें. मात्र याप्रमाणें राजद्रोही व अधार्मिक लोकांशींच वागावें."

कौटिल्याच्या वरील उताऱ्यावरून प्राचीन भारतांतील कपटी राज-

व्यवहाराची सामान्य कल्पना येईल. आता कपटाचीं आणि विश्वासघाताचीं प्रत्यक्ष ऐतिहासिक उदाहरणें अवलोकन करण्याकरितां आपण बाणभट्टाच्या हर्षचरित या ग्रंथाकडे वळूं. हर्षाचा पिता वारल्याची खबर कळतांच माळव्याच्या राजानें हर्षाच्या मेहुण्याचा खून केला आणि याचा सूड घेण्याकरितां हर्षाचा बंधु चाल करून गेला असतां गौडदेशाच्या राजानें त्याला विश्वासघातानें गारद केलें. या दुहेरी दुःखानें व अपमानानें चिडून हर्षानें आपला हस्तिदलावरील सेनापति स्कंदगुप्त यास सैन्य सज्ज करण्यास आज्ञा केली. त्या प्रसंगीं संधि साधून स्कंदगुप्तानें हर्षास सावधगिरीनें वागण्याविषयीं विनंति केली व विश्वासघाताचीं पूर्वीचीं उदाहरणें दाखवून दिलीं. यावरून कपट व विश्वासघात कसा होत असे याची कल्पना येईल.

## विश्वासघाताचीं ऐतिहासिक उदाहरणें

स्कंदगुप्त म्हणतो, 'गैरसावधपणाचा कसा फायदा घेतला जात असे तो नीट ध्यानीं घ्या. पद्मावतीचा नागसेन याचें अर्धें राज्य त्याच्या मंत्र्यानें बळकावलें होतें. तें त्याच्या हातून परत घेण्याची मसलत चालली असतां, ती पिंजऱ्यांतल्या सारिकेनें ऐकली व सारिकेच्या करवीं मंत्र्याच्या कानांवर जाऊन मंत्र्यानें राजालाच गारद केलें. श्रावस्तीचा राजा श्रुतवर्मा याची हीच हकीकत. त्याची मसलत एका पोपटानें ऐकली आणि या गाफिलपणाबद्दल त्याला राज्य गमवावें लागलें. मृत्तिकावतीचा सुवर्णचूड याचें मरण ओढवलें तें तो आपली मसलत स्वप्नांत बरळला म्हणून. मथुरेचा राजा बृहद्रथ हा अंधाऱ्या रात्रीं कोठें गुप्तधन खणीत असतां तेथेंच मारला गेला. वत्स देशचा राजा उदयन याला पकडण्याकरितां अवन्तीच्या चण्डमहासेनानें लाकडी हत्तीचा उपयोग केला. सुमित्र राजा नेहमीं नटांमध्यें रमलेला असे. त्याचा फायदा मित्रदेव नांवाच्या त्याच्या शत्रूनें घेतला तो असा कीं, मित्रदेवानें नटाचें सोंग घेतलें आणि संधि साधून एखादें कमळ तोडावें तसें सुमित्राचें शिरकमल

कापून काढलें. अश्मक देशचा राजा हा गायनवादनाचा षोकी होता. तेव्हां त्याच्या शत्रूंनीं काय केलें, कीं गायकमंडळी त्याच्याकडे पाठवून दिली. ह्या मंडळींतील प्रत्येकजण कडवा शिपाई होता व तंबोऱ्याच्या पोकळ दांडींत त्यांनीं आपल्या तरवारी गुप्तपणें ठेवल्या होत्या. त्यांचा उपयोग कसा केला हें सांगावयास नकोच. सेनापति पुष्पमित्र यानें राज्य कसें बळकावलें ? तर राजेसाहेबांना सैन्याची पाहणी करण्याची त्यानें विनंति केली आणि राजा गैरसावध असतां त्याचा वध केला. चंडपति राजाला नाद होता जादूचा; तर त्याच्या शत्रूंनीं काय केलें, कीं त्याच्या पदरच्या यवन गुलामाकडून एक विमान तयार करविलें. मग राजा त्यांत आरूढ झाल्यावर विमान जें उडालें तें परत आलेंच नाहीं ! शुंग घराण्याचा शेवटचा देवभूति याला कटिशूळाची व्यथा होती. या मर्माचा फायदा त्याचा अमात्य वसुदेव यानें घेतला व एका सुरूप दासी-करवीं त्याचा खून केला. विदेहाच्या एका राजाला औषधी रसायनांचा छंद होता. हें ओळखून त्याच्या शत्रूंनीं एका वैद्याच्या हस्तें त्याच्या पुत्राला असें रसायन दिलें, कीं त्याला क्षयरोग जडला. स्त्रीजनावर विश्वास ठेवल्यानें कलिंगेश्वर भद्रसेन हा अंतःपुरांतील भिंतींत लपून बसलेल्या भावाच्या तरवारीस बळी पडला. करुण देशचा राजा दध्र यानें एका पुत्राला युवराज करण्याचें ठरविल्यावरून दुसऱ्या पुत्रानें आपल्या आईच्या गादीखालीं लपून बसून आपल्या बापाला कंठस्नान घातलें. मौखरी राजा क्षत्रवर्मा हा आपल्या स्तुतिपाठक भाटांवर फिदा असे. तो शेवटीं एका तोतया भाटाकडूनच मारला गेला. शकपति हा कामिनीसक्त असून चंद्रगुप्ताची भावजय ध्रुवदेवी हिच्यावर आसक्त होता. तेव्हां चंद्रगुप्तानें ध्रुवदेवीचा वेष घेऊन शत्रूच्या गोटांत जाऊन शकपतीचा वध केला. वगैरे वगैरे."

बाणभट्टानें दिलेलीं हीं उदाहरणें काल्पनिक नसून परंपरेनें ऐतिहासिक म्हणून समजत गेलेलीं अशींच दिलीं आहेत. अन्तः-पुरांतील खुनासंबंधानें जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांना

मेग्यास्थेनिसचाहि पाठिंबा आहे. तो लिहितो कीं, आपल्यावर गुप्त हल्ला होऊं नये म्हणून राजेलोक रात्रींतून अनेकदां आपला बिछाना बदलत असतात. (पृ. ७० ). चंद्रगुप्तानें स्त्रीवेषानें शकपतीचा वध केला ही काल्पनिक कथा असावी असा व्हिन्सेंट स्मिथनें संशय प्रगट केला होता; पण नंतर उपलब्ध झालेल्या नाट्यदर्पण नांवाच्या ग्रंथांत देवीगुप्त नांवाच्या नाटकांतील जे उतारे दिले आहेत त्यांवरून वरील प्रकार ऐतिहासिक म्हणूनच परंपरेनें चालत आला असावा असें दिसतें. या उदाहरणाप्रमाणें इतरहि ऐतिहासिक असावींत आणि तीं लक्षांत घेतलीं म्हणजे भरतखंडांतील पूर्वीचें राज्य हें रामराज्य नसून आजच्यापेक्षां फारसें भिन्न नव्हतें हें लक्षांत येईल.

## राजतरंगिणींतील राक्षसी मगर

आतां राजतरंगिणी या खास इतिहास-ग्रंथाकडे वळूं या. संस्कृत वाङ्मयाच्या अफाट विस्तारांत खास इतिहासाला वाहिलेले ग्रंथ अत्यल्प आहेत. जे आहेत त्यांत राजतरंगिणीचा दर्जा फार मोठा आहे. या ग्रंथाचा कर्ता कल्हण हा अमात्याचा पुत्र असल्यानें त्याला राजकीय व्यवहाराची पूर्ण माहिती होती. पूर्व ग्रंथांचा, दंतकथांचा, शिलालेख, ताम्रपट, शासनें यांचा त्यानें अभ्यास केला होता; व याहूनहि विशेष म्हणजे इतिहासकाराच्या अंगीं अवश्य असणाऱ्या निरीक्षणशक्ति, विवेचकपणा व निःस्पृहता ह्या तिन्ही गुणांचें वास्तव्य त्याच्या ठायीं होतें. यामुळें राजतरंगिणींतील शेवटच्या भागाइतका विश्वसनीय इतिहास संस्कृत वाङ्मयांत हाच होय. या ग्रंथांत काश्मीरचा इतिहास थेट कौरव-पांडवांपासून सुरुवात करून बाराव्या शतकापर्यंत आणून सोडला आहे. पैकीं इ. सनाच्या सहाव्या शतकापूर्वीचा इतिहास दंतकथांवर उभारलेला असला तरी नंतरचा ऐतिहासिक साधनांवर उभारलेला आहे. तरी ह्या पुढील काळच्या इतिहासपटा-वरून विहंगदृष्टि टाकूं म्हणजे या कालांतील राजेलोकांचें चरित्र ध्यानीं

येईल. हें चरित्र म्हणजे वैषयिक आणि तामसी लीलांचें साक्षात् प्रदर्शन होय!

इ. स. ५९९ मध्यें कर्कोटक वंशाचा पहिला प्रतापादित्य हा राजा गादीवर बसला तेथून पुढचा इतिहास विश्वसनीय असा आहे. प्रतापादित्यानंतर त्याचा पुत्र राजा दुर्लभक गादीवर आला. तो आपल्या राज्यांतील नोनक नांवाच्या सावकाराच्या घरीं एक दिवस मेजवानीस गेला असतां, सावकाराची लावण्यवती स्त्री नरेंद्रप्रभा हिला पाहून अत्यंत मोहित झाला. पुढें कामकाजावरचें त्याचें लक्ष उडालें व तो मनांत झुरूं लागला. सावकाराला ही गोष्ट कळल्यावर त्यानें राजाकडे जाऊन विनंति केली कीं, "महाराज, आपली प्राणांतिक अवस्था झाली असतां धर्माधर्माच्या अडचणी कसल्या घेऊन बसला आहांत? हरकत वाटत असली तर नरेंद्रप्रभेस मी देवदासी म्हणून मंदिरांत अर्पण करितों. तेथून तिचा आपण स्वीकार करावा."

यानंतरचा ललितादित्य मोठा पराक्रमी होता. त्यानें अनेक दिग्विजय करून सर्व पृथ्वी जणों सुवर्णमय करून सोडली. पण हा राजा इंद्राहूनहि श्रेष्ठ असतां कल्हण लिहितो कीं, त्याच्या हातून एक फार अनुचित गोष्ट घडली. गौड देशाचा राजा हा सर्व सैनिकांसह एकदां शारदेच्या दर्शनास आला होता व ललितादित्यानें परिहासकेशवाच्या भव्य मूर्तीच्यापुढें उभें राहून गौड राजाच्या रक्षणाची हमी घेतली होती. पण शेवटीं विश्वासघात करून त्यानें गौड राजाला मारेकऱ्यांकरवीं ठार केलें! गौड सैनिकांनीं माल मालक मारला गेलेला व परत जाण्याचा मार्ग अतिशय दूर, अशा बिकट परिस्थितींतहि शौर्यानें लढून धारातीर्थीं देह अर्पण केले. कल्हणाच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांच्यासारख्या स्वामिनिष्ठेचें दुसरें उदाहरण विधात्यालासुद्धां क्वचितच दाखवतां आलें असतें.

यानंतरचा वज्रापीड हा क्रोधी व विषयलंपट होता. त्याच्या अंतःपुरांत असंख्य स्त्रिया असून त्यांच्याशीं तो सारखा रममाण

झालेला असे. त्यानें पुष्कळसे लोक धरून गुलाम म्हणून म्लेंच्छांस विकण्यासहि कमी केलें नाहीं! पुढें पृथ्व्यापीड व नंतर ललितादित्याचा नातू जयापीड हे सिंहासनारूढ झाले. जयापीड दिग्विजय करीत दूरदेशीं गेला असतांना त्याचा शालक जज्ज यानें विश्वासघात करून गादी बळकावली. पण तीन वर्षांनीं जज्ज मारला गेल्यावर जयापीडानें पुन्हा राज्यसूत्रें हातीं घेतलीं, विनयादित्य असें नांव धारण केलें व अनेक साहसी पराक्रम करून दिग्विजय केला. पण पुढें, कल्हण सांगतो कीं, प्रजेच्या दुर्भाग्यामुळें तो अनान्वित जुलूम करूं लागला. तो इतका लोभी बनला कीं, तीन वर्षेपर्यंत शेतकऱ्यांनीं पैदा केलेली झाडून सारी संपत्ति त्यानें जबरदस्तीनें हरण केली! या लोभमूर्तीला परस्व हरण करणारे व त्यांतील अत्यल्प सरकारांत भरणारे नीच कामगार हे हितकर्ते वाटूं लागले. या राजाच्या त्रासाला कंटाळून पुष्कळ ब्राह्मण देशांतराला निघून गेले व पुष्कळांनीं आक्रोश करून प्राण सोडले! पण राजाला त्याची फिकीर नव्हती. त्यानें बेपर्वाईनें एवढीच आज्ञा केली कीं, नव्याण्णव ब्राह्मण प्राण टाकतील तेव्हां मला वर्दी देत जावी!

याच्यानंतर गादीवर बसलेला त्याचा पुत्र ललितापीड हा तर बापसे बेटा सवाई निघाला. बापानें पापकर्मानें मिळविलेली सर्व संपत्ति त्यानें वारांगना व नट यांच्यावर उधळली. थोडक्याशा स्त्रियांवर तृप्त राहणाऱ्या आपल्या बापाला तो वेडा लेखी! उनाड स्त्रियांनीं कुरतडलेले केस व त्यांच्या नखांनीं व्रणित झालेलें वक्षस्थळ हें त्याला किरीट-कटकाहूनहि भूषणास्पद वाटे. ग्राम्य थट्टा करण्याची त्याला मोठी दुष्ट खोड होती. तो दरबारांत जातांना गणिकांना बरोबर घेऊन जाई व त्यांच्यासमोर वृद्ध मंत्र्यांना बायकी झगे घालावयास लावी!

या राजानंतर सात वर्षें संग्रामपीडानें राज्य केल्यावर ललितादित्याच्या एका नाटक-शाळेच्या पुत्र बृहस्पति हा गादीवर आला. तो तरुण असतांना त्याचे उत्पलादि पांच मामा कारभार पाहत असत.

भगिनीच्या सौंदर्यबळावर केवळ त्यांना चैन भोगावयास मिळाली होती. भाचा वयांत येतांच त्यांनीं अभिचार करवून त्याचा प्राण घेतला; व त्यानंतर वज्रादित्य नांवाच्या राजकुलांतील एकाला उत्पलानें जबरदस्तीनें गादीवर बसविलें. तो नुसता नामधारी राजा असून राज्याचें सारें उत्पन्न उत्पलादि बंधु गडप करीत. कल्हण लिहितो, अरण्यांत मरून पडलेल्या वनमहिषाच्या कलेवरावर लांडगे झगडत ताव मारीत असतात तसे ते बंधु राज्याचा फडशा पाडीत होते.

लवकरच कर्कोटकवंशीय राजे नष्ट होऊन इ. स. ८५५ मध्यें राजा अवंतिवर्मा हा सिंहासनारूढ झाला. येथपासून पुढची हकीकत कल्हणानें सविस्तर व संगतवार वर्णिलेली आहे. या भागांतील इतिहासाचीं साधनें भरपूर उपलब्ध होतीं; व शेवटच्या कांहीं वर्षांतील घडामोडी तर ग्रंथकर्त्यानें आपला पिता अमात्यचंपक यांजकडून ऐकलेल्या व कांहीं प्रत्यक्ष पाहिलेल्या होत. अर्थात् या कालखंडांतील इतिहास विश्वसनीय मानण्यासारखा आहे. पण तो असा आहे कीं, तो वाचीत असतांना आपल्या संस्कृतीच्या अभिमान्यांना क्षणोक्षणीं मान खालीं घालावी लागेल.

या तीनशें वर्षांच्या विश्वसनीय इतिहासांत पहिला राजा अवंतिवर्मा एवढाच मुख्यतः कर्तबगार व प्रजाहितदक्ष राजा आढळतो. त्यानें आपल्या सापत्नबंधूला युवराजाचे अधिकार अर्पण करून कुटुंबांतील लोकांना खूष केलें. काश्मीर-मंडलांत विद्येचा प्रसार विच्छिन्न झाला होता, त्याचें यानें पुनरुज्जीवन करून विद्वानांना असें ऐश्वर्य दिलें कीं, ते राजेलोकांना योग्य अशा शिबिकांतून दरबारांत येत. महापद्मसरोवराचें पाणी वाहून पिकांची नासाडी होत असे; त्याची सुय्य नांवाच्या एका चतुर कारागिराला हाताशीं धरून त्यानें पाट फोडून व्यवस्था केली. अशा रीतीनें अनेक वर्षें राज्य केल्यावर प्राणांतिक रोग झालेला पाहून त्रिपुरेश पहाडावरील ज्येष्ठेश्वराच्या देवालयांत

तो जाऊन राहिला व आषाढ शुद्ध तृतीयेच्या दिवशीं त्यानें तेथेंच आनंदानें देहत्याग केला !

यानंतरचा काश्मीरचा इतिहास म्हणजे अन्याय, मत्सर, दुराचार यांचाच जणूं इतिहास होय. तो वाचीत असतां चाणक्यानें वर्णिलेले आसुरी उपाय हे प्रत्यक्ष कसे अमलांत आणले जात याची खात्री पटेल. अवंतिवर्म्यानें देह ठेवतांच पूर्वींच्या उत्पल घराण्यांतील अनेक राजपुत्रांनीं गादीसाठीं उचल केली; व एका मंत्र्यानें शंकरवर्मा याला गादीवर बसविलें तर दुसऱ्यानें सुखवर्म्याला युवराज केलें. यामुळें राजा व युवराज यांच्यामध्येंच लढाया सुरू झाल्या. शंकरवर्म्यानें लवकरच युवराजाचा पराभव केला व अनेक दिग्विजय केले; पण स्वतःच्या प्रजेसच पिळून काढण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. कल्हण लिहितो कीं, कीर्तिरूप विमल निर्झरोदकांत अवगाहन केलेल्या राजांनीं गजांचें अनुकरण करून व्यसनासक्तिरूपी धुळीनें स्वतःला पुनः मलिन करावें हें किती चमत्कारिक! पण हा चमत्कारच या इतिहासांत सर्वत्र भरलेला दिसतो.

शंकरवर्म्यानें नाना तऱ्हेच्या युक्त्या योजून पुष्कळशा देवमंदिरांतून पैसे उकळण्याचा सपाटा चालविला. या अधम चोरानें दोन नवे कर वसूल करण्याकरितां अट्टपतिभाग व गृहकृत्यभाग नांवाच्या कचेऱ्या स्थापन केल्या. तसेंच देवालयांतून लागणाऱ्या धूप, चंदन, तेल वगैरेच्या किंमती अन्यायानें वाढवून त्यांच्या विक्रींतून आलेला सर्व नफा आपला राजभाग म्हणून तो स्वतः घेऊं लागला. त्यानें चौसष्ट मंदिरें लुबाडलीं व त्यांना कांहीं नगदी नेमणुका करून दिल्या. तसेंच प्रत्येक गांववाल्याकडून वेठ करविण्याची व त्याच्याऐवजीं नगदी दंड वसूल करण्याची पद्धति या काश्मीर मंडलांत प्रथम त्यानेंच सुरू केली. त्यांच्यामुळें सर्व गांव दरिद्री झाले. प्रजेला होत असलेलें दुःसह दुःख पाहून युवराज गोपालवर्मा याचें मन फार कळवळलें व तो राजाला म्हणाला, "महाराज, हे नवे कर प्रजेला अत्यंत प्राणहारक होत

आहेत; तरी ते महाराजांनीं रद्द करावेत असें महाराजांजवळ माझें नम्र मागणें आहे." त्यावर राजानें उत्तर केलें, "मी लहान असतांना तुझ्याप्रमाणेंच माझेंहि अंतःकरण दयार्द्र होतें. **पण गर्भवासांतील पीडेचा प्राण्याला विसर पडतो त्याचप्रमाणें, गादीवर बसतांच राजाला पूर्वींच्या सर्व विचारांचें पार विस्मरण होतें.** तेव्हां तूंच मला असें वचन दे कीं, तूं गादीवर बसलास म्हणजे प्रजेला मजपेक्षां अधिक त्रास व पीडा देणार नाहींस!" हा राजा उत्तरापथांत गांवें उध्वस्त करीत चालला असतां शेवटीं एका चांडालानें सोडलेल्या तीराला बळी पडला. मंत्र्यांनीं त्याचें सैन्य परकीय देशांतून मोठ्या शौर्यानें संभाळून परत आणलें. सहाव्या दिवशीं तें आपल्या हद्दीच्या गांवीं पोंहोचलें. तोंपर्यंत त्यांनीं राजाच्या मरणाची बातमी युक्तिप्रयुक्तीनें गुप्त ठेवली होती. ती अशी कीं, वाटेंत मांडलिक राजे दर्शनाला येत तेव्हां त्या राजाच्या निर्जीव मस्तकाला दोऱ्या बांधून वरखालीं करून प्रतिप्रणाम करवीत! राजाच्या मृत्यूची घटका ही त्या कालीं बहुशः बंडाळीची मुहूर्तघटिकाच ठरत असे. कल्हणाच्यापूर्वी हजार दीड हजार वर्षे होऊन गेलेल्या चाणक्यानेंहि राजाच्या मृत्युसमयीं अशीच दक्षता बाळगावी असाच इशारा दिला आहे. ९६ व्या अध्यायांत तो लिहितो कीं, "राजाचा अन्तकाळ होण्याचा संभव आहे अशी भीति वाटूं लागण्याच्या आधीं-पासूनच राजाच्या मित्रमंडळास वश करून अशी पद्धति सुरू करावी कीं, प्रजाजनांस राजाची भेट महिन्यांतून किंवा दोन महिन्यांतून एकदांच होत जाईल. भेटीचा प्रसंगच येईल तेव्हां तोतया राजाचें दर्शन देत जावें. त्याच्याबरोबर संभाषण करण्याचा प्रसंग येऊन पडलाच तर अमात्यमुखानें भाषण करावें." चाणक्याच्या या इशाऱ्यावरून हजार दीडहजार वर्षांत तरी या बाबतींत स्थिति एकच दिसते. असो.

## कामांध राजेराण्या

शंकरवर्म्यानंतर त्याचा अल्पवयी पुत्र गोपाळवर्मा गादीवर बसला

व त्याची आई राणी सुगंधा ही त्याची पालक म्हणून कारभार पाहूं लागली. ही राणी दुर्वर्तनी असून कोषाध्यक्ष प्रभाकरदेव याच्याशीं लागू होती. त्याच्या चरणीं तिनें सर्व संपत्ति अर्पण केली. बालराजाला या गोष्टी कळूं लागतांच त्यानें चौकशी आरंभिली. पण प्रभाकरदेवानें अभिचार करवून बालराजाला ठार करविलें! पुढें त्याचा भाऊ संकटवर्मा याला गादीवर बसविलें. पण तोहि लवकर मरण पावल्यामुळें राणी सुगंधा हिनें स्वतः मुकुट धारण केला. पण पुन्हा एकदां आपल्या तंत्रानें वागणाऱ्या निर्जितवर्मा या राजकुमाराला गादीवर बसविण्याचा विचार चालविला. पण मंत्रिमंडळानें निर्जितवर्म्याऐवजीं त्याचा अल्पवयस्क पुत्र पार्थ याला गादीवर बसविलें. अशा रीतीनें पितापुत्रांतच लढाई जुंपली; आणि जयापजयान्वयें कधीं पार्थानें राजा व्हावें तर कधीं त्याचा पिता निर्जित-वर्मा यानें व्हावें असा लपंडावाचा खेळ सुरू झाला. शिवाय निर्जित-वर्म्याच्या राण्याहि दुर्वर्तनी निघाल्या. कल्हण लिहितो कीं, सुगंधादित्य नांवाचा एक मंत्री या राण्यांशीं लागू असे. गाढालिंगनाच्या द्वारें तो बप्पटदेवीला खूष करी व तीहि त्याला अगणित द्रव्य पुरवी. दुसरी राणी मृगावती हीहि सुगंधादित्याच्या गळीं पडून त्याची रखेली बनली होती. तो या दोघां राण्यांची कामना आळी-पाळीनें पुरवीत असे. आपआपल्या पुत्रांना राज्य मिळवून देण्याच्या स्पर्धेनें सुगंधादित्याला स्वशरीरभोग व पैसा देण्यांत त्या दोघां राण्यांची जणों चढाओढ लागली होती. शिवाय निरनिराळ्या मंत्र्यांची चढाओढ असे ती निराळीच. या एकंदर घालमेलीचें वर्णन करतांना कल्हण लिहितो कीं, **नदींतील तिमी मासा इतर तिमींना खातो, त्याला ध्यानी बगळा गट्ट करतो, त्याची शिकार व्याध करतो, असा हा प्रकार होता.**

शेवटीं बप्पटदेवीचा पुत्र चक्रवर्मा याला गादी मिळाली. दुर्वर्तनी आईचाच मुलगा तो! त्याच्या विक्षिप्त लीलांचें वर्णन काय करावें?

कल्पनेलाहि न सुचणारे असे गुण यानें उधळले. रंग नांवाच्या एका डोंबाऱ्याच्या हंसी नांवाच्या मुलीवर तो इतका फिदा झाला कीं, त्यानें तिला पट्टराणी केलें. ही हलकट राणी अंग धुतल्यावर आपलीं आर्तवानें अंकित झालेलीं वस्त्रें मंत्र्यांना इनाम देई! व कल्हण सांगतो कीं, असलीं गलिच्छ वस्त्रें डौलानें अंगावर मिरवून मंत्री-मंडळी राजसभेंत येत!! इतकेंच नव्हे तर त्या श्वपाकीचें उष्टें खाण्यासहि ही मंत्रीमंडळी तयार असत. या नतद्रष्ट राजानें आपल्या मातंगीगमनाच्या प्रायश्चित्ताबद्दल एकदां विटांचें मत विचारलें. त्यावर खुषमस्कऱ्यांनीं सांगितलें कीं, हिमानें हिम शमतें तसें एका पापानें दुसऱ्या पापाचा परिहार होतो! हें ऐकतांच खूष होऊन राजानें आपल्या पापाचें प्रायश्चित्त म्हणून महिनाभर उपोषित व व्रती असणाऱ्या एका विप्राच्या पतिव्रता पत्नीवर बलात्कार केला! शेवटीं हा दैत्य त्या मातंगीच्या महालांत असतांनाच पूर्वीं ज्याचा त्यानें विश्वासघात केला होता त्याच्याकडून मारला गेला.

पण काश्मीरचें नष्टचर्य एवढ्यानेंच संपलें नव्हतें. दुराचाराचें माप पुरेपूर भरलें नव्हतें म्हणूनच कीं काय, याच्यानंतर गादीवर बसलेला अवंतिवर्मा हा त्याहूनहि क्रूर निघाला. कल्हण लिहितो कीं, या अवंतिवर्म्याच्या पापमय कथेच्या विटाळाची माझ्या काव्यसरस्वतीलाहि भीति पडली आहे; पण तिला एखाद्या बिचकलेल्या घोडीप्रमाणें मी कशी तरी चुचकारून धरीत आहे. पाण्यापासून निघणारा वडवाग्नि पाण्यालाच खातो तसें या राजानें पितृकुलच खाऊन टाकिलें. टकरा मारून, नाकानें, खांद्यांनीं, कांखांनीं व डोक्याच्या कवचीवर आघात करून सूर काढणाऱ्या हलकट लोकांना त्यानें आपले मंत्री नेमले. या मंत्र्यांमध्यें ज्या मंत्र्यावर राजाची बहाल मर्जी होती तो पर्वगुप्त नांवाचा मंत्री भरसभेंत नागवा नाचे!! या पर्वगुप्तानें राजाकडून आपला पिता पार्थ याचें सर्वस्व हरण करविलें व राजकुलांतील बहुतेक मंडळींना ठार मारविलें. पुढें राजाच्या विश्वासांतील कांहीं मंत्र्यांनीं

राजपिता पार्थ ज्या विहारांत जाऊन राहिला होता त्या विहाराला वेढा देऊन पार्थालाहि मारून टाकिलें. हें वर्तमान ऐकून राजाला फार हर्ष झाला व तो तें दृश्य पाहण्यासाठीं समक्ष तेथें गेला व तें पाहून मोठ्यानें हसला. हा राजा म्हणजे क्रूरपणाची जणूं मूर्तिच होती! कामकरी मजुरांची सहनशक्ति अजमविण्यासाठीं तो त्यांचे अवयव तोडी, गर्भांची स्थिति पाहण्यासाठीं तो गर्भिणीचें पोट चिरून पाही व निशाणबाजीचा अभ्यास करतांना नागड्या-उघड्या स्त्रियांच्या स्तनमध्यभागीं जंबियानें निशाण मारी!!

पुढील राजा यशस्कर याच्या कारकीर्दीचीं पहिलीं कांहीं वर्षें प्रजेला सुखाचीं गेलीं. कल्हण लिहितो कीं, त्याच्या अमलांत चोरांचें नांव नाहींसें झालें. त्याच्या राज्यांत विप्र गुरूंनीं सामगायनप्रसंगीं मदिरापान सोडलें; तपस्वी लोकांनीं पुत्र, दारा, धनधान्याचा त्याग केला; मूर्ख गुरूंनीं मत्स्यादिकांनीं यज्ञ करणें व स्वतःच प्रक्षित श्लोक रचून परंपरागतशास्त्रांचें संशोधन करणें सोडून दिलें; भोंदू गुरूंकडून दीक्षा घेतलेल्या गृहिणी स्त्रियांनीं स्वतः देवता बनून मस्तक हलवीत आपल्या भर्त्यांच्या उज्ज्वल शीलाचा निषेध करणें सोडून दिलें. पण पुढें अनेक पाप्यांनीं भ्रष्ट केलेल्या काश्मीरच्या गादीचा गुण याच्यांतहि उतरूं लागला. वैद्यानें रोग्याला पथ्य सांगावें व स्वतः कुपथ्य करावें, तद्वत् लोकांचा न्याय करणारा हा राजा स्वतःच अन्यायानें वर्तूं लागला. त्याचा वडील भाऊ एकाएकीं वारला व राजाला हर्ष झाला. यावरून राजानें स्वतः शोधून काढलेल्या विषाचा प्रयोग भावावर झाला असावा अशी विचारवंतांना शंका आली. एका वेलावित्ताचें त्याच्या राणीशीं सूत जमलें होतें त्याच्याकडे डोळेझाक करून उलट त्या वेलावित्ताला त्यानें सचिव केलें. तसेंच लल्ला नांवाच्या एका वेश्येला प्रमुख राणीच्या पदावर बसविलें. या लल्लेचा रात्रीं पहाऱ्यावर असणाऱ्या एका पहारेकऱ्याशीं वाकडा संबंध होता. या राजाला

शेवटीं उदर झालें; पण तो लवकर मरेना म्हणून त्याचें राज्य हरण करण्यास उत्सुक झालेल्या त्याच्या आप्तांनीं त्याला विष दिलें.

## अन्तःपुरांतील अभिचार

पुढील क्षेमगुप्त याच्या लीलांचें वर्णन कल्हणानें असें केलें आहे कीं, तो जवळ राहणाऱ्या वृद्ध लोकांच्या दाढीवर थुंके, त्यांना अश्लील शिव्या देई व त्यांच्या डोक्यावर थापड्या मारी. स्त्रिया त्याच्याशीं कटिसंघटन करून, शिकारी राना-वनांत त्याच्याबरोबर एकटे-दुकटे हिंडून व लबाड विट चावटपणा करून त्याची कृपा संपादीत असत. हे निर्लज्ज विट आपल्या स्त्रियांचा त्या राजाच्या कामवासनेला बळी देऊन कोणाची स्त्री अधिक पसंत पडते असें निर्लज्जपणें विचारीत. हा राजा देवीच्या सांथीला इ. स. ९५८ सालीं बळी पडल्यावर त्याच्या अल्पवयी मुलांना गादीवर बसविलें तरी खरी सत्ता त्याची राणी दिद्दा हिच्या हातीं गेली. **ही दिद्दा राणी म्हणजे काश्मीरच्या भ्रष्ट व आसुरी राज्यश्रीची चालती बोलती मूर्तिच होती.** तिनें अभिचार व इतर मार्गांनीं आपल्या अधिकाराच्या वाटें-तील अनेक मंत्र्यांचे काटे दूर केले. तिचा अल्पवयी पुत्र मेल्यावर तिनें आपल्या नातवाला गादीवर बसविलें. थोड्याच दिवसांत त्याला मारून दुसऱ्या एका नातवाला गादीवर आणलें. पुढें त्याचाहि गळा चिरून तिसऱ्या एका नातवाला गादी दिली. अभिचार करणें व प्राण घेणें हा तिच्या हातचा मळ होता! विषप्रयोगनिष्णात रोमन ल्यूक्रीझिया बोर्जिया व आपल्या वल्लभांचा घात करणारी स्कॉटलंडची मेरी यांची दिद्दा राणी ही हिंदुस्थानांतील प्रतिमा होय. एकदां तुंग नांवाच्या गुराख्याला वाड्यांत आलेला सहज पाहिल्याबरोबर तिचें त्याच्यावर मन बसलें. तत्काळ तिनें त्याला दासीमार्फत गुप्तपणें बोलावून आणलें व लवकरच तो तिचा प्रमुख वल्लभ बनला, आणि नंतर मंत्रीहि झाला. अनेक राण्यांच्या या स्वैरवर्तनानें विटून कल्हण लिहितो कीं,

'मोठ्या कुलांत उत्पन्न झालेल्या स्त्रियांची महानद्यांसारखी उपजतच नीचगामी प्रवृत्ति असते याला काय म्हणावें हेंच कळत नाहीं! साऱ्या जलाचा राजा सागर त्याच्यापासून निघालेली लक्ष्मी क्षुद्र पल्वलांत पैदा झालेल्या कमलाशीं संसक्त होते, तद्वत् उच्च कुलीन स्त्रिया नीचांशीं रममाण होत असतात.' या राणीनें पुढें पुष्कळ मठ बांधले व धर्मादायहि केला. पण कल्हण लिहितो कीं, दुष्ट माणसांचीं धर्मकृत्यें आणि पापाचरण यांचा कांहीं ताळमेळच घालतां येत नाहीं.

ही दिद्दा राणी इ. स. १००३ या वर्षी वारल्यावर तिचा भाचा संग्रामराज हा गादीवर बसला. तो स्वतः ऐषआरामांत राहून सर्व कारभार मंत्री तुंग याच्यावर सोपवी. पुढें तुर्कांच्याशीं झालेल्या लढाईत तुंग मारला गेल्यानंतर एका दुष्ट इसमाला त्यानें मंत्री नेमलें. या राजाची राणी श्रीलेखा ही स्वैरिणी होती. तिनें पति मरतांच स्वतःला राज्याभिषेक करविण्याची तयारी करवून ती स्नानालाहि गेली. पण परत येण्यापूर्वीच मंत्रिमंडळानें तिचा अल्पवयी पुत्र अनंत याला अभिषेक करूनहि टाकला. अनंतदेवानंतर कलश राजा आला. त्यानें एक फिरता तमाशेवाला व अलगुज वाजविण्यांत निपुण असणाऱ्या इसमाला मंत्री नेमलें व त्याच्या प्रोत्साहनानें तो निर्लज्ज व मनसोक्त वर्तन करूं लागला. कल्हण म्हणतो कीं, याच्या दुर्वर्तनाच्या उच्चारानें जिव्हा विटाळणेंहि योग्य नव्हे. तरी ओघानेंच आलें म्हणून थोडें दिग्दर्शन करणें भाग आहे. या नराधमानें वृद्ध अनंतदेव राजाची बहीण व तिची कन्या असल्या आप्त स्त्रियांवरहि हात टाकण्यास कमी केलें नाहीं. अश्लील नर्मवाक्यें म्हणजे विनोद, प्रजापीडन हेंच न्याय्यकर्म, निर्लज्जपणा हीच ओजस्विता, अगम्यांगनागमन हीच खरी रसिकता व लुच्चा-लफंग्यांनीं दिलेल्या शिव्या निमूटपणें सोसणें म्हणजेच ऋजुता असें मानणाऱ्याला कोणती गोष्ट वाईट व त्याज्य असणार? वृद्ध राजाराणीनें सुवर्णतुला करविली व इतरहि रीतीनें

दानधर्मांत द्रव्य खर्चिलें, हें पाहून त्या नष्ट व पापी कलशराजानें एका रात्रीं त्यांच्या वस्तीला आग लाविली. आंतील लोक गडबडीनें उठून दिगंबरावस्थेंतच बाहेर आले. त्यांना त्या स्थितींत पाहून व अग्नीच्या भयंकर ज्वाळा आपल्या गच्चीवरून पाहून कलश राजा आनंदानें टिऱ्या पिटूं लागला ! या राजानें एका विहारांतील ताम्रस्वामी नांवाची सूर्याची फार प्राचीन तांब्याची मूर्ति होती ती फोडविली व इतरहि अनेक पितळेच्या बुद्धाच्या मूर्ति फोडून टाकिल्या. मासिक दरबार, इंद्रोत्सव व मोठ्या पर्वण्यांच्या दिवशीं उत्सव करण्याची पद्धत असे. या उत्सवप्रसंगीं द्वंद्वयुद्धाचे खेळ करवून हा राजा पुष्कळ शूर वीरांना परस्पर कंठस्नान घालवी. कल्हण लिहितो कीं, राजवाड्यापुढील पटांगणांत अशीं द्वंद्वयुद्धें होऊन रक्तपात झाला नाहीं व हाहाःकार उठला नाहीं असे उत्सवप्रसंग क्वचितच दृष्टीस पडत. उत्सव पाहण्यास आलेल्या पौरजनांना उत्सव-समाप्तीनंतर आपल्या तरण्याबांड शूर नातेवाइकांना जखमी व घायाळ स्थितींतच परत घेऊन जाण्याचा प्रसंग येई. आपला शूर पति राजवाड्यांत गेला म्हणजे जिवानिशीं परत आलेला पाहीपर्यंत कुलीन स्त्रियांच्या जिवांत जीव नसे. त्यानें आपल्या सुनांपैकीं कांहींना त्या जणों शत्रूच्या स्त्रिया होत असें मानून भ्रष्ट केलें. त्यांतील एकीनें सासऱ्याचें प्रेम संपादन केल्यावर नवऱ्याला विष घालण्याचा प्रयत्न केला !

## नंदनवनांतील नरक

याच्यानंतर कांहीं काळ उत्कर्ष व नंतर हर्ष हा राजा झाला. ह्या हर्ष राजाच्या कारकीर्दींतच कल्हणाचा पिता चंपक हा महामंत्री होता. याच्या कारकीर्दीविषयीं कल्हण लिहितो कीं, ती प्रारंभीच्या धार्मिक कृत्यांच्यामुळें जितकी मनोहर वाटते, तितकीच शेवटच्या पापाचरणाच्या अतिरेकामुळें गर्ह्य वाटते. कारकीर्दीच्या प्रारंभीं या राजाविषयीं कल्हण वर्णन करितो कीं, त्याला कोणाचा हेवा वाटत

नसे. पूर्वीचे चांगले रिवाज त्यानें कायम राखले; व कांहीं नव्यांची प्रथा सुरू केली. पूर्वी राजांशिवाय इतर सर्व लोक केश मोकळे सोडीत व डोक्यावर उष्णीश अथवा कानांत कुंडलें घालीत नसत. पण या राजानें राजोचित वेष सर्वसामान्य सुरू केला. तो स्वतः काव्यें करी व कविजनांना बहुमानपुरःसर वागवी. पण पुढें याच्या बुद्धीला भ्रंश होऊन त्यानें अंतःपुरांत कसल्या तरी तीनशें साठ स्त्रिया आणून कोंडल्या. सैन्यावर अतोनात खर्च करण्याचें तर त्याला व्यसनच लागलें होतें. त्यापायीं अनेक मंदिरांतील संपत्ति त्यानें लुटली व देवतांच्या मूर्ति भ्रष्ट केल्या. या मूर्तींवर नग्न भिक्षूंच्याकडून तो मलमूत्र विसर्जन करवीत असे, व मलांनीं भरलेल्या त्या सोन्यारुप्याच्या मूर्ति रस्त्यांतून लाकडाच्या ओंड्याप्रमाणें ओढविल्या जात असत! कल्हण म्हणतो, 'साऱ्या जगाला हेवा वाटण्याजोगी संपात्ति प्राप्त झाली असूनहि अधिक मिळविण्याच्या लोभाला बळी पडलेले लोक कोणतेंहि दुष्कर्म करण्यास कसर करीत नाहींत.' तो प्रजेवर नानाप्रकारचे कर बसवून पैसा उकळी व मूर्ख खुषमस्कऱ्यांना वाटेल तसा देई. एका मृदंगवादनपटूवर खूष होऊन त्यानें त्याला हत्ती-हत्तिणीची जोडी बक्षिस दिली. कर्नाटक देशाच्या राजाची अप्रतिम लावण्य-खनि अशी चंद्रलेखा नांवाची राणी होती. तिची तसबीर पाहतांच या राजाला मदनबाधा झाली. असल्या उल्लू राजाला लुबाडावयाला काय प्रयास? अर्थात् त्याच्या एका मूर्ख मंत्र्यानें या चंद्रलेखेची तसबीर कोठून तरी मिळवून आणून, तिच्या जोरावर राजाचा अगणित पैका लुबाडला. या राजानें सौंदर्यप्राप्तीसाठीं जे लाजिरवाणे उपाय योजले त्यांचें वर्णन करणें किंवा ऐकणें याचीसुद्धां, कल्हण सांगतो कीं, भल्या गृहस्थाला इच्छा होणार नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं त्याला आपल्या अन्तःपुरांतील स्त्रियांच्या चारित्र्याचा भ्रष्टाकार दिसून आला तेव्हां त्यानें पुष्कळ स्त्रियांना ठार केलें. पण स्वतः मात्र तो आपल्या बालपणीं त्याच्या पित्याच्या ज्या पत्न्यांनीं त्याला वाढविलें व खेळविलें होतें,

त्यांच्याशींच रममाण होई. त्यानें या बाबतींत आपल्या भागिनीवर्गालाहि कलंकित केल्याशिवाय सोडलें नाहीं. याबद्दल त्याची आतेबहीण त्याला एकदां टाकून बोलली असतां त्यानें तिलाच पकडून आणून तिच्यावरच बळजबरी केली. रात्रीं उल्हास व जागरण आणि दिवसा निद्रा, क्रौर्य व हलकटपणा असले दुर्गुण या राजाच्या अंगीं भरपूर होते असें तत्कालीन लोकांनीं लिहून ठेवलें आहे. अंतीं या राजाला चोराप्रमाणें एका खोपटांत लपून बसून मारेकऱ्यांच्या हातीं इ. स. ११०० मध्यें मरण आलें.

राजतरंगिणीच्या लेखनकालापर्यंतचा म्हणजे पुढील ५० वर्षांचा इतिहास कल्हणानें फारच सविस्तर लिहिला आहे. पण वाचक हो! येथवर दिला आहे येवढाच इतिहास वाचून तुम्ही विटला असाल. तेव्हां पुढील भाग देत नाहीं. कोळसा उगाळावा तेवढा काळाच! प्राचीन भारतांतील नररूपानें वावरणाऱ्या महती देवतेचें चित्र हें असें आहे! तें रेखाटण्यांत पदरचा काळा रंग मीं मुळींच भरलेला नाहीं. उलट, चित्र यथार्थ वठावें म्हणून चांगला भाग आढळला तोहि दिला आहे. पण चित्र मूळचेंच काळें आणि भेसूर आहे, त्याला काय करणार? थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, निसर्गानें काश्मीरला नंदनवनाचें सौंदर्य दिलें पण तेथलि क्रूरकर्म्या सत्ताधीशांनीं त्याचें स्मशानवन बनविलें.

## बौद्ध ग्रंथांची साक्ष

वर वर्णिलेल्या आसुरी लीलांनीं काश्मीरांत म्हणजे हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यांतच तेवढा नंगा नाच घातला असेंहि नव्हे. वर हर्षचरित्रांतील उतारा दिला आहे त्यांत ज्या राजांच्या लीला वर्णिल्या आहेत ते हिंदुस्थानांतील अनेक प्रांतांतले आहेत. बरें, अमुक एका काळींच या लीलांना ऊत आला होता असेंहि नाहीं. चाणक्य-बाणभट्ट-कल्हण यांच्या ग्रंथांपासून तों पुतण्याच्या खुनानें व नाटकशाळांच्या

विलासानें विटलेल्या पेशवाईपर्यंत ह्या लीला तुम्हांस अविच्छिन्न धुडगूस घालतांना आढळतील.

बौद्ध ग्रंथांना विचाराल तर तेथेंहि असलाच प्रकार तुम्हांस ऐकावयास सापडेल. बुद्धाच्या आगें मागें उत्तर हिंदुस्थानांत चार मोठीं राज्यें होतीं. त्यांच्या राजधान्या--मगधांत राजगृह, त्याच्या उत्तर-पश्चिमेस श्रावस्ती, त्याच्या दक्षिणेस यमुनातीरावर कोसांबी, आणि त्याच्याहि दक्षिणेस उज्जैन या होत्या. येथील राजांचा एकमेकांशीं शरीरसंबंध असे. उदाहरणार्थ, श्रावस्तीच्या राजाची बहीण कोसलदेवी ही राजगृहाच्या बिंबिसार राजाला दिलेली होती. या बिंबिसाराला त्याच्याच दुसऱ्या एका राणीपासून झालेला पुत्र जो अजातशत्रु यानें अन्न तोडून, हाल करून जिवें मारलें, तेव्हां या अमानुष कृत्यानें हाय खाऊन कोसलदेवीनें प्राण सोडला! तिचा भाऊहि संतापला आणि त्यानें आपल्या बहिणीच्या चोळी-बांगडीकरितां दिलेलें काशी शहर जबरीनें परत घेतलें. त्यावरून अजातशत्रूची आणि कोसलदेवीचा पिता प्रसेनजित यांची, म्हणजे नातू आणि आजा यांची लढाई जुंपली! तीमध्यें नातवाला पूर्णपणें चीत केल्यावर आजानें सोडून दिलें व आपली एक कन्याहि त्याला अर्पण केली. ह्या प्रसेनजित राजाला अशी इच्छा झाली कीं, बुद्धाच्या शाक्य कुळाचा व आपला आप्तसंबंध घडावा. या हेतूनें शाक्य कुळांतील एका कन्येविषयीं त्यानें मागणी घातली. पण शाक्यांनीं राजकन्येऐवजीं एक दासी राजाकडे लावून दिली. तिच्या पोटीं राजाला एक पुत्र झाला. पण त्याला जेव्हां आपलें जन्मरहस्य कळून आलें तेव्हां त्यानें आपल्या बापाविरुद्ध बंड उभारलें आणि शाक्यांच्यावर सूड उगविण्याकरितां त्यांच्यावर स्वारी करून अनेकांना बायकामुलांसकट कंठस्नान घातलें! दुसरीं दोन राजघराणीं म्हणजे कोसांबी आणि अवंती येथील. त्यांचाहि शरीरसंबंध असे, आणि नेहमीं कटकटीहि चालू असत. पैकीं कोसांबीच्या उदयन राजाला अवंतीच्या राजानें खोट्या हत्तीच्या

युक्तीनें कसें पकडून बंदिवासांत टाकलें, व बंदिवासांत असतां उदयनानें अवंतीपुत्री वासवदत्ता हिचें मन वळवून तो तिच्यासह कसा बंदिवासातून निसटून गेला, ही धाडसी प्रणयकथा संस्कृत वाचकांना सुपरिचित आहे.

आतां बौद्ध जातकांतील नमुना म्हणून महापिंगल नांवाच्या राजाविषयींची पुढील गोष्ट पाहा. जातक लिहितो, "हा राजा अत्यंत जुलमी होता. तो मरण पावला त्या वेळीं वाराणशी शहरांतील सर्व नगरवासीयांना मोठा आनंद झाला. पण त्या राजवाड्याच्या देवडीवरील द्वाररक्षक मात्र रडूं लागला. बोधिसत्त्वानें त्याला विचारलें, "तूं कां रे बाबा रडतोस?" त्यानें उत्तर दिलें, "मी रडतों आहे तो राजेसाहेब वारले म्हणून नव्हे. ते ज्या ज्या वेळीं राजवाड्यांतून बाहेर जात किंवा बाहेरून परत येत त्या त्या वेळीं माझ्या मस्तकावर घणांनीं मारावें तशा जोरानें आठ तडाखे देत! आतां राजेसाहेब यमलोकीं गेले आहेत म्हणतां; तेव्हां तेथें यमाच्या मस्तकावरहि ते असेच तडाखे देतील आणि मग यम ही ब्याद नको म्हणून त्यांना पुन्हा परत इहलोकीं पाठवील व माझ्या नशिबीं पुन्हा तडाखे खाण्याचें येईल, म्हणून रडतों!" असो.

राजेलोकांच्या विकृत चरित्राचा हा चित्रपट हवा तेवढा लांबवितां येईल. पण प्रस्तुत प्रबंधाची भूमिका इतिहासाची नसून विवेचनाची आहे. आणि त्या विवेचनाला उपोद्बलक म्हणून वर दिलेले नमुने पुरेसे आहेत. त्यांतहि फार जुना काळ हा पौराणिक काळ म्हणून व अर्वाचीन कालांतील मराठ्यांचा काळ हा सुपरिचित म्हणून सोडून, प्राचीन भारतांतील ऐतिहासिक काळ म्हणून जो संबोधिला जातो, त्यांतीलच उदाहरणें प्रामुख्यानें घेतलेलीं आहेत. म्हणूनच शिरक्यांचें शिरकाण करणारा व सावत्रमातेस भिंतींत चिणून मारणारा संभाजी, दौलतराव शिंद्याकडून दारूच्या निशेंत हुकूम घेऊन एका रात्रींत बत्तीस सरदार व मुत्सद्दी यांना तोफेच्या

तोंडीं देणारा सर्जेराव घाटगे, पुतण्याचा खून करणारा राघोबा, आणि विठोबा शिंद्याला हत्तीच्या पायीं देणारा रावबाजी वगैरे अर्वाचीन कालांतील असुरांच्या लीलांनीं पानें अडविलीं नाहींत. अर्वाचीन कालांतील इकडचें टोक सोडून प्राचीन काळांतील पलीकडचें पौराणिक काळांतील टोक घेतलें तर त्यांतहि अहल्येला आणि गुरुपत्नीला भ्रष्ट करणारे इंद्र-चंद्र, लाक्षागृहांत आपल्याच बांधवांना जाळूं पाहणारे कौरव, खांडववन जाळून नाग-तक्षकांची ससेहोलपट करणारे पांडव, आपआपसांत प्राणांतिक लढा लढून यादवी हा कलंकभूत शब्द भाषेस अर्पण करणारे यादव, वगैरेंच्या लीलांनाहि स्थळ दिलेलें नाहीं. तसेंच वैदिक अथवा प्राग्वैदिक कालांतील व अश्वमेधादि यज्ञकृत्यांतील लैंगिक नीतीचें, इतिहासाचार्य राजवाडे यांनीं जें अगदीं फटकळ— किंबहुना नागड्या-उघड्या भाषेंत चित्र रेखाटलें आहे, आणि जें वाचकांच्या रोषामुळें मागें 'चित्रमय जगत्'ला एक हप्त्यानंतर बंद करावें लागलें; पण जें अलीकडे धुळ्याच्या संशोधन मासिकानें छापलें आहे, त्यांतीलहि उतारे घेतलेले नाहींत. या सर्वांचा नामनिर्देशहि येथें येवढ्याचकरितां करीत आहे कीं, भरतखंडाच्या प्राचीन वा अर्वाचीन इतिहासांतील कोणताहि कालखंड तुम्हीं निरखलात तरि सत्ताधीशांच्या आसुरी लीलांचें तांडव तुम्हांस सर्वत्र आढळून येईल!

## दारू आणि जुगार

आतां या लीला सर्व राजेलोकांच्याच वर्णन केल्या आहेत; कारण सैतानी लीला खेळण्याचीं साधनें त्यांनाच साध्य असतात. हें पाहून तुम्ही म्हणाल कीं, राजांचें एक असो, पण सामान्य जनतेची नीतिमत्ता तर इतकी आसुरी नव्हती ना? तर त्याहि बाबतींत मोठी स्पृहणीय स्थिति होती असें नव्हे. या बाबतींत येवढेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, मद्यपान, वेश्यागमन व जुगार हीं तीन व्यसनें वैदिक

कालापासून आजतागायत अखंड सुरू आहेत. वैदिक कालांतील सोमरस पिणारे इंद्रोपासक, आणि पौराणिक काळांतील माधवीप्राशनानें झिंगून स्त्रियांसह जलक्रीडा करणारे बलरामाचे अनुयायी यादव, हे वाङ्मयांत गाजलेले आहेत. कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरून पाहतां त्याच्या काळीं शहरांत दारू-गुत्ते असत व त्यांना सरकारी मान्यता असे. अबकारी खातें ही एक उत्पन्नाची बाब होती. या खात्याच्या अध्यक्षाला सुराध्यक्ष म्हणत. मेदक, प्रसन्न-आसव, अरिष्ट, मैरेय, मधु वगैरे दारूचे प्रकार असत. गुत्त्यांत निजण्याची सोय असे, आणि तेथें रूपवान् दासीहि असत ! कुलधर्माकारितां वगैरे खाजगी दारू तयार करण्यासाहि परवानगी मिळे. या दारूस श्वेतसुरा म्हणत ( अध्याय ४६ ). दारू पिऊन झिंगण्याच्या प्रसंगांपैकीं मर्तिकाचा वा प्रेतयात्रेचा प्रसंग हा मुद्दाम सांगण्यासारखा आहे. या प्रसंगीच्या दारूस नैषेच-निक म्हणत व त्याचे शेंकडों घट अशा प्रसंगीं रिकामे होत. याचा फायदा घेऊन या दारूंत मदनरस नांवाचें विष मिसळून कलाल-रूपानें वावरणाऱ्या गुप्त हेरांनीं शत्रु-सैनिकांचा फडशा पाडावा असें कौटिल्यानें सुचविलें आहे–“ नैषेचनिकमिति मदनरस युक्तान् कुंभान् शतशः प्रयच्छेयुः ” ( अ. १३५ ). वामाचारी तांत्रिकांनीं धर्मकृत्यांत देखील मद्याचा अन्तर्भाव केला होता हें सांगावयास नकोच. बौद्धांच्या जातककथांमध्येंहि मद्यप्राशनाचे उल्लेख अनेक ठायीं आढळतात. काशीच्या राजानें पांचशें संन्याशांना एकदां एक मोठी मेजवानी दिल्याचें वर्णन एका जातकांत आलें आहे. या मेजवानीच्या प्रसंगीं मद्याच्या नद्या वाहवल्या. उंची मद्य संन्याशांना नेहमीं कोठून मिळणार ? म्हणून या मेजवानीच्या प्रसंगीं त्यांनीं तें मनसोक्त पिऊन घेतलें व त्याच्या तारेंत तें गाऊं-नाचूं लागले. उत्तर हिंदुस्तानांत मद्याचा प्रचार इतका जारी होता कीं, माधवाचार्यांना असें प्रतिपादन करावें लागलें आहे कीं, ‘यस्मिन् देशे यदाचारः’ या न्यायानें उत्तरे-कडे मद्यप्राशन हें पापच नव्हे !

मद्याप्रमाणेंच दुसरें व्यसन द्यूताचें अथवा जुगारीचें. या व्यसनाची फार दाट अशी कृष्णच्छाया प्राचीन भारतीय वाङ्मयावर पडलेली आहे. पुण्यश्लोक नलराजा आणि शांतिब्रह्म युद्धिष्ठिर अशा महात्म्यांनीं या व्यसनापायीं आपलीं राज्यें गमावलीं. 'आहूतो न निवर्तेत द्यूतादपि रणादपि' अशी क्षत्रियांच्यांत महाभारतकालीं म्हणच रूढ झाली होती. वैदिक सूक्तापासून तों मृच्छकटिक नाटकापर्यंत या जुगारीचें बंड दिसून येतें. ऋग्वेदांतील दहाव्या मंडलांत एका पश्चात्तापदग्ध जुगाऱ्याचें एक स्वतंत्र सूक्तच आहे. कौटिल्याच्या काळीं दारूच्या गुत्त्यांप्रमाणें जुगारीच्या अड्ड्यांनाहि सरकारी परवाना देण्यांत येई व त्यांवर सरकारची देखरेख असे. लष्करी छावणींत मात्र जुगारीला बंदी करावी असें कौटिल्यानें मुद्दाम बजावलें आहे.

तिसरें व्यसन वेश्यागमनाचें. अर्थशास्त्रांत वेश्या-व्यवसायाच्या नियंत्रणाची व देखरेखीची व्यवस्था वर्णिलेली आहे. याचें एक स्वतंत्र खातेंच असे व त्यावरील मुख्यास गणिकाध्यक्ष हें नांव असे. हें खातेंहि उत्पन्नाची बाब होती. प्रत्येक गणिकेला महिन्यांतून दोन दिवसांचें भोगद्रव्य सरकारांत भरावें लागे. या वेश्यांपैकीं कांहीं गायन-वादन-नृत्यादि कलांत निष्णात असत; आणि त्यांच्या घरीं श्रीमान् नागरिकांच्या नेहमीं बैठकी होत. त्यांचें वर्णन वात्स्यायनानें आपल्या कामशास्त्रांत दिलेलें आहे. कामशास्त्रावर अनेक ग्रंथ रचिले जावे यावरूनहि समाजाचा रंगेलपणा अजमावतां येईल. वेश्यां-संबंधींचा ग्रंथ तर पाटलिपुत्रांतील गणिकांच्या खास विनंतीवरून दत्तक नांवाच्या आचार्यानें स्वतंत्र लिहिला असें वात्स्यायन सांगतो. पण कामशास्त्रांतील उतारे आपणांस वाचावयास लावण्याचा इरादा नाहीं. भारतीय संस्कृतींतील आसुरी गणला जाईल असा अंश नजरेस यावा याकरितांच या व्यसनांचा उल्लेख केला आहे. म्हणून आतां फक्त जैन ग्रंथांतील एक मासलेवाईक उतारा उद्धृत करून आटोपतें घेतों.

## बोके संन्यासी

जैनांच्या निर्युक्तिमधील पुढील विनोदी संवाद पाहा :

"यतिमहाराज, तुमच्या कफनीला झोळ फार पडलेला दिसतो."

"हो, खरें आहे, आणि मासे पकडण्याच्या वेळेला जाळ्यासारखा त्याचा उपयोगहि मला चांगला होतो."

"काय म्हणतां ! तुम्ही मासे खातां ?"

"होय, मद्याच्या बरोबर थोडेसे खातों."

"म्हणजे आपण मद्यहि पितां वाटतें ?"

"हो, तसें म्हटलें तर पितों थोडेंसें वेश्येच्या घरीं."

"तर मग आपण वेश्येच्याहि घरीं जातां वाटतें ?"

"शत्रूंना झोडपून काढल्यानंतर जातों."

"म्हणजे आपल्याला शत्रूहि आहेत वाटतें ?"

"तसे फार नाहींत; पण ज्यांचीं मीं घरेदारें लुटलीं तेवढे मात्र आहेत."

"तर मग तुम्ही चोरहि दिसतां."

"होय, झालों खरा, पण त्याला कारण म्हणजे जुगारीचा नाद !"

"भले ! म्हणजे आपण जुगारहि खेळतां वाटतें ?"

"अहो बोलून-चालून मी एका हलक्या स्त्रीच्या पोटीं जन्मास आलेला दासीपुत्र ना ?"

## भ्रमनिरास

वरील मासले वाचून तुम्ही म्हणाल, "आपल्या स्वतःच्या संस्कृतीचें असलें हें ओंगळ चित्र रेखाटण्यांत भूषण तें काय ? आणि दोष-स्थळेंच टिपून घ्यावयाचीं म्हटलीं, तर पाश्चात्य संस्कृतीचें नाहीं का असेंच किंवा याहीपेक्षां अधिक ओंगळ असें चित्र रेखाटतां येणार ?" तुमचा मुद्दा अगदीं रास्त आहे. कोणत्याहि संस्कृतीचें असें चित्र रेखाटतां येईल; आणि हेंच मला मुख्यतः दाखवावयाचें आहे.

म्हणूनच मी म्हणतों कीं, पाश्चात्य हे आसुरी आणि भारतीय हे अध्यात्मिक हें समीकरण आपण सोडून दिलें पाहिजे. तें देण्यास मनाची तयारी व्हावी एतदर्थ, दोन्ही संस्कृतींचें स्वरूप रूढ समजुतींपेक्षां सर्वस्वीं निराळें दिसेल असें साधार कसें रेखाटतां येईल हें मुद्दाम दिग्दर्शित केलें आहे. तें करण्यांत व विशेषतः स्वतःच्या संस्कृतींतील कलंकभूत भागाकडे लक्ष वेधण्यांत फाजील कठोरपणाचा वास क्वचित् येईल. पण ही जी कठोर वृत्ति स्वीकारली आहे, ती दोषस्थळें मान्य करूनहि स्वतःच्या संस्कृतींतील अभिमानास्पद कामगिरीची योग्यता पटवून देतां येईल याची खात्री आहे म्हणूनच. तो अभिमान मानीव व पोकळ न होतां ऐतिहासिक सत्यावर अधिष्ठित व्हावयाचा असेल तर गुणांप्रमाणें दोषांकडेहि निर्भीड दृष्टीनें पाहण्याची तयारी पाहिजे. खरी गोष्ट अशी आहे कीं, सत्ताधीशांच्या आसुरी चाळ्यांचें जें वर्णन वर केलें आहे तें मानवतेच्या दृष्टीनें लज्जास्पद असलें तरी, त्यामुळें पाश्चात्य वगैरे परकीयांच्या समोर त्यासाठीं आपणास मान खालीं घालावी लागेल असा मुळींच प्रकार नाहीं. कारण सत्ताधीशांचे वर वर्णिल्यासारखे चाळे हे कमी-अधिक प्रमाणांत सर्व देशांत, सर्व काळीं दाखवून देतां येतील. मग पाश्चात्यांचे असले चाळे दिग्दर्शित न करितां आपलेच तेवढे कां केले ? तर त्याचें कारण असें कीं, पाश्चात्य हे आसुरी आहेत हें रूढ समजुतीनें गृहीतच धरलेलें आहे. पण आपण भारतीय हे मात्र मोठे धार्मिक व पापभीरु आहोंत, निदान होतों, अशी जी समजूत असते ती कशी भोळसटपणाची असते हें ध्यानीं ठसलेलें नसतें. तें एकदां नीट ध्यानीं ठसलें म्हणजे मग आपल्या संस्कृतींतील अभिमानास्पद कामगिरीचें खरें मोल पारखण्याची भूमिका तयार होईल.

आणि ही कामगिरी म्हणजे नुसती तत्त्वज्ञानांतील अथवा वेदान्तांतील नव्हे ती तर जगन्मान्यच आहे, तर ऐहिक जीवनांत रस आणि गोडी उत्पन्न करणारे शास्त्र, साहित्य, कला इत्यादि जे बौद्धिक व्यापार

आहेत त्यांची निरलसपणें, उत्साहानें, आशावादित्वानें जी जोपासना भारतीयांनीं केली तद्विषयक होय. इतिहास कंठरवानें सांगेल कीं, कित्येक शतकें मोठ्या जोमानें आपल्या पूर्वजांनीं शास्त्र व कला यांची जोपासना केली, विचार-स्वातंत्र्य जागविलें, आणि बौद्धिक व व्यावहारिक क्षेत्रांत दिग्विजयामागून दिग्विजय संपादन केले. पण आपली संस्कृति ही केवळ आध्यात्मिक होय या भ्रामक कल्पनेचें तिमिर दृष्टीवर आल्यानें आपल्या संस्कृतींतील अभिमानास्पद अशा ऐहिक दिग्विजयाचें आपणाला विस्मरण पडलें आहे. तें तिमिर नाहींसें व्हावें म्हणून आपल्या संस्कृतींतील आसुरी भागाच्या झोंबऱ्या अंजनाचें बोट, ऐतिहासिक सत्याला धरून, पण कठोरपणें फिरवावें लागलें आहे. तें कटु कर्तव्य उरकल्यावर आतां आपल्या पूर्वजांच्या ऐहिक व्यापांकडे वळूं या. या व्यापाचा इतिहास येथें द्यावयाचा नाहीं हें सांगावयास नकोच. तर ज्या भागाचें आपणांस विस्मरण पडलें आहे त्या भागाकडे लक्ष वेधण्याचें काम मुख्यतः करावयाचें आहे. तें केल्यावर मग पुनश्च आपल्या संस्कृतींत उत्पन्न झालेल्या दोषांकडे वळूं. तरी आतां आपल्या पूर्वजांनीं शास्त्र-कलादिकांची उत्साहानें जोपासना करून तत्कालीन जगताचें गुरुस्थान कसें मिळविलें व आपल्या संस्कृतीचा प्रसार उत्साहानें कसा केला याचें ओझरतें दर्शन घेऊं या.

# प्रकरण सातवें

# भारतीयांची ऐश्वर्योपासना

संस्कृतींच्या वर्णनप्रसंगीं पाश्चात्य संस्कृति ही आधिभौतिक, जडवादी, भोगप्रधान, आसुरी; आणि भारतीय संस्कृति ही आध्यात्मिक, आत्मवादी, त्यागप्रधान, दैवी अशीं विशेषणें या संस्कृतींना उद्देशून प्राच्य व पाश्चात्य अशा दोन्ही लेखकांकडून निरनिराळ्या गर्भित अर्थानें वापरलीं जात असतात. पण दोन्ही संस्कृतींचें हें वर्णन नुसतें वरवरचें व उथळ एवढेंच नव्हे, तर असत्य असतें हें दर्शविण्याकरितां पाश्चात्य संस्कृतीलासुद्धां दैवी, त्यागप्रधान व आध्यात्मिक हीं विशेषणें कशीं लावतां येतील याचें दिग्दर्शन केलें; आणि उलट आसुरी, भोगप्रधान व आधिभौतिक हीं विशेषणें भारतीय संस्कृतीलाहि तशाच अर्थानें कशीं लावतां येतील याचीहि कल्पना आणून दिली. आतां हिंदु-संस्कृतीचें दुर्लक्षित असें जें अंग त्या ऐहिक वैभवोपासनेची ओळख करून घेऊं या.

## इतिहासाविषयीं उदासीनता

होय ! ऐहिक दृष्ट्या, नुसत्या आध्यात्मिक दृष्ट्या नव्हे, तर ऐहिक दृष्ट्या— अत्यंत वैभवशाली अशी ऐतिहासिक परंपरा आपल्या या भरतभूमीस लाधलेली आहे. वस्तुतः ज्यांनीं मोठमोठीं साम्राज्यें चालविलीं ते लोक ऐहिक वैभवाचे भोक्ते व उपासक होते हें मुद्दाम सांगण्याचेंहि कारण नाहीं; पण उज्ज्वल इतिहास लाधला असूनहि ज्या देशानें इतिहासलेखनाची कधींच पर्वा बाळगली नाहीं असा एकटा एकच करंटा देश जगाच्या पाठीवर कोठें असला तर तो आपला हा

हिंदुस्थान देश होय! म्हणून त्याच्या प्राचीन ऐहिक वैभवाचें वर्णन करण्यापूर्वी आधीं या अनास्थेची थोडी कल्पना आणून देणें जरूर आहे. या आपल्या देशांत दिगंत दिग्विजय करणारे अशोक, समुद्रगुप्त, हर्षवर्धन यांच्यासारखे चक्रवर्ती सम्राट् होऊन गेले, कालिदास भवभूत्यादि जगद्वंद्य कवींनीं त्यावर ललितवाङ्मयाचीं लेणीं चढविलीं, चरक, सुश्रुत, नागार्जुन, आर्यभट्ट, भास्कराचार्य वगैरेंनीं भौतिक शास्त्राच्या अनेक शाखांची जोपासना केली, अजंठा-वेरूळसारख्या स्थलीं अप्रतिम कारागिरी करून ठेवणारे कलावंत चमकले. पण यांपैकीं एका तरी विभूतीचें विश्वसनीय चरित्र उपलब्ध आहे काय! चरित्र तर राहोच, पण त्यांच्या नुसत्या कालाचीहि नोंद आमच्या वाङ्मयांत नाहीं. कालनिर्णायक जो कांहीं महत्त्वाचा असा पुरावा सापडतो तो मुख्यतः परकीय प्रवाशांनीं पुरविलेला! या परकीय अशा चिनी, ग्रीक, इस्लामी वगैरे प्रवाशांनीं आपल्या प्रवासवृत्तांत हिंदुस्थान-विषयक माहिती देतांना ती जितकी तपशीलवार व बारकाईनें दिली आहे, त्याच्या चौथ्या हिश्शानें सुद्धां, ती माहिती अभिमानास्पद असतांहि, खुद्द आमच्या वाङ्मयांत सापडूं नये यावरून भारतीयांनीं इतिहासाची हेळसांड केली याशिवाय दुसरें काय म्हणावें?

या बाबतींत लो. टिळकांसारख्या स्वाभिमानी पुरुषालाहि हीच नाउमेदकारक कबूली द्यावी लागली आहे, ती कबूलीसुद्धां बाणभट्टा-सारख्या लेखकाच्या बाबतींत आणि हर्षवर्धनासारख्या प्रतापशाली चक्रवर्तीच्या चरित्राला अनुलक्षून! या चक्रवर्तीच्या राज्यासंबंधीं माहिती आपणाला दोन ठिकाणांहून मिळते. एक या राजाच्या पदरीं असलेला राजकवि जो बाणभट्ट त्याकडून, व दुसरी या राजानें सन्मानिलेला चिनी यात्रेकरू जो ह्युएनत्संग याच्या प्रवासवृत्तावरून. दोघांनींहि वस्तु-स्थितीचें वर्णन प्रत्यक्ष पाहून केलें असल्यानें, एकमेकांना पोषक असेंच तें वर्णन आहे. पण बाणापेक्षां चिनी प्रवाशास ऐतिहासिक दृष्टि अधिक असल्यानें या परकीय प्रवाशाचें वृत्त हें स्थानिक चरित्रकारा-

पेक्षां कांहींसें अधिक उपयुक्त ठरलें आहे. राजाच्या चरित्रांत त्याचा काल, त्याचे दिग्विजय, त्याचा राज्यविस्तार वगैरेपेक्षां अधिक महत्त्वाची माहिती ती कोणती असणार? पण बाणकृत हर्षचरित्र वाचून या ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या बाबींत वाचक अज्ञानांतच राहतो. तें अज्ञान दूर करण्यास त्याला शेवटीं चिनी प्रवाशाचा प्रवासदीप उपयोगी पडतो. एतत्संबंधीं 'बाणभट्ट व श्रीहर्ष' या निबंधांत टिळक लिहितात, "बाणकवीनें आपलें हर्षचरित्र नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें श्लेषादि अनेक अलंकारांनीं सुशोभित केलें आहे. पण मौज अशी कीं, सबंध हर्षचरित्र वाचलें तरी श्रीहर्ष केव्हां झाला, त्याचें साम्राज्य कोठून कोठपर्यंत होतें, त्यानें कोणकोणते राजे जिंकले याबद्दल प्रत्यक्ष अशी हर्षचरित्रांत कांहीं माहिती मिळत नाहीं. कोठें कोठें राजास जीं विशेषणें दिलीं आहेत, त्यांतील श्लेषांवरून कांहीं माहिती मिळते. पण श्लेषांवरून इतिहासाचें ज्ञान हर्षाच्या काळीं जरी होत असलें तरी ती परंपरा पुढें राहणें अशक्य होतें. सारांश, ह्युएनत्संग याच्या प्रवासाचें वर्णन जर आपणांस मिळालें नसतें तर हे श्लेष समजले नसते, इतकेंच नव्हे तर बाणानें वर्णन केलेला श्रीहर्ष हा सातव्या शतकांतील चक्रवर्ती होता हे देखील समजण्याची मारामार पडली असती!" हे टिळकांचे उद्‍गार. अर्थात् ऐतिहासिक दृष्टीची अनास्था याशिवाय या परिस्थितीचें कोणत्या शब्दांनीं वर्णन करावयाचें?

ज्या राजाचें चरित्र वर्णन करण्याचा सुयोग बाणास लाभला होता तो राजाहि सामान्य असा तसा नव्हता. त्याच्या कारकीर्दीतील अनेक गोष्टी वर्णितांना भाषेस अभिमानानें स्फुरण चढावें या मोलाच्या त्या गोष्टी होत्या. राज्यांत पशूंकरितांहि दवाखाने होते, पाटबंधाऱ्यांचें काम उत्तम होतें, शांतता व सुरक्षितता चोख होती पण या माहितीकरितां वाचकाला चिनी प्रवाशाच्या तोंडाकडेच पाहावें लागतें. बाणाच्या ग्रंथांत तिचा पत्ता नाहीं. फार काय सांगावें, हा

राजा दर पांच वर्षांनीं आपलें सर्व द्रव्य प्रयाग येथें मांडलिक राजांसमक्ष ब्राह्मण, बौद्ध आणि गोरगरीब यांस वाटून देत असे ह्या अभिमानास्पद माहितीचीसुद्धां बाणभट्टाच्या ग्रंथांत 'सकलभुवनकोशश्चाग्रजन्मनां विभक्तः' या एका विशेषणावरून काय बोध होईल तेवढाच !

## परंपरेचें विस्मरण

इतिहासाच्या हेळसांडीचें आणि प्राचीन परंपरेच्या विस्मरणतेचें दुसरें एक इतकेंच महत्त्वाचें उदाहरण म्हणजे प्राचीन भारतीयांनीं भरतखंडाबाहेर वसविलेल्या वसाहतींचें. जे आपण आजचे हिंदु लोक समुद्रयान हें शास्त्रनिषिद्ध आहे असें मानतों, त्याच आमच्या पूर्वजांनीं एके काळीं आफ्रिका, अमेरिका येथवर दर्यावरील मोठमोठ्या सफरी केल्या होत्या. इतकेंच नव्हे तर जावा, सुमात्रा, बाली वगैरे ठिकाणीं वसाहती स्थापल्या होत्या व त्या थोडीं-थोडकीं नव्हे तर कित्येक शतकें टिकविल्या होत्या. पण आपल्या प्राचीन वाङ्मयांत या पराक्रमाचा ठाव-ठिकाणाहि नाहीं. हा सर्व अभिमानास्पद असा इतिहास लिहून ठेवला कोणी ? तर चिनी प्रवाशांनीं ! आणि तो आम्हांस उपलब्ध कोणी करून दिला ? तर या चिनी लेखांचें भाषांतर करणाऱ्या डच व फ्रेंच पंडितांनीं !

प्राचीन इतिहासाच्या हेळसांडीचा व अज्ञानाचा आणखी एक असाच मासला म्हणजे प्राचीन भरतखंडांतील प्रजासत्ताक राज्या-विषयींचें अज्ञान हा होय. 'ना विष्णुः पृथिवीपतिः' असा जप करणाऱ्या भरतखंडांत अनेक लहानमोठीं प्रजासत्ताक राज्यें होऊन गेलीं व कांहीं तर कित्येक शतकें टिकलीं, या राजकीय इतिहासाचा निबंधमाला-कारांच्याहि वेळेपर्यंत पत्ता नव्हता. वक्तृत्वावरील निबंधांत ते लिहितात, 'ग्रीक, रोम वगैरे जुन्या राष्ट्रांतून जे जे प्रकार आढळतात ते ते सर्व आमच्या देशांत होते. पण नव्हते असे मात्र दोन. एक इतिहास आणि दुसरें वक्तृत्व. आणि वक्तृत्वाच्या अभावाची उपपत्ति

अशी कीं, आमच्या देशांत राज्यांचा प्रकार काय तो साम्राज्यांचाच होता. म्हणजे सगळी सत्ता एका राजाच्या हातीं असून सर्व प्रजा त्याची केवळ अंकित. अशीच राज्यरीति अगदीं प्राचीन काळापासून तों आजपर्यंत चालत आलेली आहे. यास्तव वक्तृत्वाची उपपत्ति येथें कधीं झाली नाहीं ती ठीकच.' या शास्त्रीबोवांच्या उद्‌गारांवरून एतद्विषयक अज्ञानाची कल्पना येईल.

इतिहास लिहून ठेवण्याविषयीं प्राचीन भारतीयांमध्यें फार उदासीनता होती हा एक प्रकार झाला. दुसराहि एक तितकाच उद्वेगकारक प्रकार आढळतो तो म्हणजे जुन्या ग्रंथांचें रक्षण करण्याबाबतींतील औदासीन्य हा होय. इतिहासाविषयीं प्राचीनांनीं जरी आस्था दर्शविली नाहीं तरी निरनिराळ्या शास्त्रकलादिकांवर भारतीयांनीं प्रचंड वाङ्मय निर्माण केलें. पण संस्कृतीला अवनतावस्था सुरू झाल्यावर धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकीं अर्थ आणि काम या पुरुषार्थांना वाहिलेल्या ग्रंथांची दखलगिरी पंडितांनींहि फारशी बाळगिली नाहीं. अर्थशास्त्रा-वरील केवळ अद्वितीय अशा चाणक्यप्रणीत अर्थशास्त्र ग्रंथाचीच जेथें विस्मृति पडली तेथें इतर वाङ्मयाचा काय पाड ! इतक्या अव्वल दर्जाच्या ग्रंथाला पारखें होण्याच्या या विस्मृतीला जगांत अन्यत्र क्वचितच तोड सापडेल. पेशवाईंत नारायणरावाला राज्यशास्त्र शिकविण्याकरितां पुस्तक मिळेना तेव्हां नाना फडणविसाला 'अमात्यशासन' म्हणून एक भिकार चोपडें लिहून घ्यावें लागलें. नाना तरी काय करणार ? चाणक्याच्या ग्रंथाची परंपरा पार तुटली होती. तो ग्रंथ कोठें तरी, कोठल्या तरी ग्रंथसंग्रहांत जीव धरून कालाची वाट पाहत राहिला होता. 'राजतरंगिणी' या अव्वल इतिहासग्रंथाची हकिकत ही अशीच अरसिकत्वदर्शक आहे. संस्कृत वाङ्मयांत इतिहासग्रंथ आधींच अल्प. जे हाताच्या बोटांवर मोजण्याएवढे आहेत त्यांत राजतरंगिणी हा एक अव्वल दर्जाचा इतिहासग्रंथ आहे. या ग्रंथाचा परिचय प्राचीन भारतांतील राजेलोकांच्या विक्षिप्त

लीला वर्णन करीत असतां मागील प्रकरणीं झालाच आहे. ह्या ग्रंथाचा शोध स्टीन याला लागला, तो केशवराम नांवाच्या काश्मिरी पंडिताच्या वाड्यांत. पाहतो तों पोथीचा फक्त तिसरा हिस्साच काय तो या पंडिताच्या वाडांत. केशवरामाला तीन पुत्र होते. त्यांनीं पित्याच्या पश्चात् जिंदगीची वाटणी केली तेव्हां राजतरंगिणी ग्रंथ तिघांत समसमान वाटून घेतला! या तिन्ही भावांच्या कडचे तीन भाग एकत्र केले तेव्हां समग्र ग्रंथ तयार झाला. वाटणींत कांहीं पानें खराबहि झालीं होतीं हें सांगावयास नकोच.

या असल्या घोर अज्ञानामुळें प्राचीन भारतीय संस्कृतीच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान लोपून गेलें. म्हणूनच संसार सुखाचा करण्याकरितां आपल्या पूर्वजांनीं जे आस्थापूर्वक परिश्रम केले त्याची मुद्दाम ओळख करून घेण्याचा प्रसंग आला आहे. व्याकरण, वेदान्त, रामायण, भारत, भागवत, काव्य, नाटकें यापलीकडील वाङ्मयाशीं पंडितांचाच संबंध दुरावला आणि प्राचीन भारतीयांच्या अनेक उलाढालींचें, अचाट उद्योगाचें, ऐहिक वैभव व विलास यांना पोषक अशा शास्त्रकलांवरील परिश्रमाचें स्मरण पार बुजालें! नाना प्रकारच्या उपयुक्त व ललितकलांत भारतीयांनीं स्वतंत्र व प्रौढ प्रगति केलेली होती हें पटवून देण्याकरितां आगरकरांना 'वेद व स्मृति' या ग्रंथांतून अनेक कलांची मोठी यादीच सादर करावी लागली होती. पण तेहि लिहितात कीं, 'ग्रीस व रोमन लोकांच्या इतिहासाइतका आमचा इतिहास आनंदजनक, उत्साहजनक नाहीं हें कबूल केलें पाहिजे.'

खुद्द आमचीच ही गत तर परकीयांनीं आम्हांला या बाबतींत हिणवावें यांत नवल कसलें? मॅक्स मुल्लरचें हिंदुसंस्कृतीविषयीं एकंदरीनें अनुकूल मत होतें. पण तें तिच्या तत्त्वज्ञानाच्या उंचीबद्दल; तिच्या ऐहिक वैभवाविषयीं नव्हे. तो लिहितो, " हिंदुलोक म्हणजे नुसते तत्त्वज्ञ. ते तत्त्वज्ञानांत इतके गढून गेलेले असत, कीं ज्या

व्यावहारिक गुणांनीं राष्ट्राचा दर्जा वाढतो त्या गुणांची जोपासना करण्याकडे त्यांनीं कधीं लक्षच दिलें नाहीं." दुसऱ्या एकानें तर लिहिलें आहे कीं हिंदूंचा तत्त्वज्ञानांतील आनंद हाहि अळणीच. उर्कुहार्ट हा आपल्या उपनिषदांवरील ग्रंथांत लिहितो, 'उपनिषदांत आनंदमीमांसा आढळते हें खरें, पण हिंदुलोकांचा हा आनंद ख्रिश्चन लोकांच्या आनंदासारखा मात्र नव्हे हो! हिंदूंचा आनंद निराळा, ख्रिश्चनांचा निराळा. ख्रिश्चनांचा भावात्मक तर हिंदूंचा केवळ नकारात्मक.' (रानडे–'कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे'). म्हणजे हिंदुलोकांना आनंद या भावनेची खरी कल्पनाच नाहीं इतके हिंदुलोक हे विटलेल्या वृत्तीचे, अशी या पाश्चात्य पंडितांची कल्पना. फ्रेंच पंडित सेनार्त यानेंहि असाच दोष दिला आहे. 'हिंदुस्थानांतील जाति' हा त्याचा ग्रंथ-१८९७ मध्यें प्रसिद्ध झाला. त्यांत त्यानें लिहिलें आहे कीं 'मध्यवर्ती शासनसंस्था किंवा मातृभूमि या कल्पना हिंदुस्थानांत कधींच उदय पावत नाहींत. परंपरा पाळण्यांत हिंदूंनीं विलक्षण चिकाटी दाखविली आहे. पण ऐहिक उन्नति आणि उदंड उद्योग यांतील आनंद याविषयीं त्यांनीं अत्यंत बेफिकिरी बाळगलेली आहे.' सेनार्तच्या बाबतींत विशेष खोचक गोष्ट अशी आहे कीं, आपल्या ग्रंथाची तीस वर्षांनंतर म्हणजे १९२७ सालीं जी नवीन आवृत्ति त्यानें काढली आहे त्यांतहि, त्यानें वरील विधानें कायमच ठेविलीं आहेत. एवढेंच नव्हे तर तीं बदलण्याचें कारणच नाहीं असा वर आणखी प्रस्तावनेंत शेरा मारला आहे!

अलीकडील पन्नास-पाऊणशें वर्षांत हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचें संशोधन हें शिलालेख, ताम्रपट, नाणीं, लुप्त ग्रंथ, परकीय प्रवासी-वृत्त, उत्खनन वगैरे अनेक अंगांनीं सुरू आहे आणि त्याच्या पोटीं प्राचीन भारतीयांच्या ऐहिक व्यापांचा व वैभवाचा उज्ज्वल संभार प्रगट झाला आहे. तो परकीयांस न दिसो वा ते न पाहोत. पण तो आपला आहे तो आपण पाहूं या, अभिमानानें पाहूं या. तो पाहिला असतां आपल्या पूर्वजांना ऐहिक ऐश्वर्याची, वैभवाची किंमत कधींच

कळली नव्हती हें मत यापुढें कोणी ठोकून देईल तर तें फक्त दुराग्रहच देऊं शकेल याविषयीं संशय राहणार नाहीं.

थेट वैदिक कालपासून तों मुसलमानी अमदानीच्या सुरुवातीपर्यंतच्या दोन-तीन हजार वर्षांतील भारतीयांच्या विविध वाङ्मयावर, नुसत्या धार्मिक नव्हे, तर अर्थशास्त्र, कामशास्त्र, वैद्यक, ज्योतिष, गणित, रसायन, नाट्यशास्त्र, वार्ताशास्त्र, काव्यशास्त्र, संगीतशास्त्र, शिल्पशास्त्र वगैरे वाङ्मयावर, नजर टाकली तर असें आढळेल कीं, भारतीयांनीं कोणत्याहि काळीं सर्वस्वीं आध्यात्मिक जीवनांत गुरफटून जाऊन ऐहिक वैभवाकडे पाठ फिरवली नव्हती. भारतीयांचें प्राचीनांतील प्राचीन वाङ्मय म्हणजे जे वेद ते उघडून वाचा. हो, उघडून वाचा. मंत्रजागराच्या वेळीं म्हटलेलें नुसतें अर्थशून्यमनानें ऐकूं नका, तर डोळे उघडून वाचा. म्हणजे तुम्हांस आढळून येईल कीं, वेद हे प्रपंच नेटका करण्याविषयीं हव्यास बाळगणाऱ्या, विजिगीषु, आक्रमणशील, अचाट उत्साही आणि उद्योगी अशा आपल्या पूर्वजांचें वाङ्मय होय. अनार्योंशीं झुंजून, त्यांना जिंकून, दास करून वा गिरिकंदरांत पिटाळून लावून 'कृण्वंतो विश्वमार्यं' असा जयघोष करीत, वसाहती स्थापन करीत चाललेल्यांच्या व 'पृथिव्याः समुद्रपर्यंतायाः एकराट्' होण्याची मनीषा बाळगणारांच्या उत्साहानें रसरसलेलें असें तें वाङ्मय आहे. ते होम करीत, हवन करीत, इंद्रादि देवांना प्रार्थना करीत. पण त्या प्रार्थनांचा सूर म्हणजे 'हे इंद्रा, आमच्या शत्रूंचा नायनाट कर व त्यांची अपार संपत्ति लुटून आम्हांस दे' असा असे. क्वचित् एखादा नासदीय सूक्तकारासारखा ऋषि तत्त्वज्ञानांत गढलेला असे. पण बाकीचे सर्व, (यज्ञांनीं देवांना संतुष्ट करून त्यांच्याकरवीं ऐहिक जीवन सुखी कसें करतां येईल याविषयींच्या उद्योगांत चूर असत.)

राजेलोक शस्त्रास्त्रांनीं लढत आणि त्यांचे पुरोहित ऋषी मंत्रतंत्राच्या योगानें देवतांना प्रार्थना करून त्यांना साहाय्य करीत. शत्रूंचें निर्दालन झालें म्हणजे मोठमोठे यज्ञ करीत. यज्ञकुंडें पेटलेलीं

असतां, मंत्रघोष चालू असे, पण सर्व कशासाठीं? तर आम्हांला धन मिळूं दे, सुंदर स्त्रिया मिळूं देत, उत्तम अश्व लाभूं देत, वीर्यशाली पुत्र होऊं देत— यासाठीं! सुप्रसिद्ध असा जो रुद्राध्याय त्यांतील 'घृतं च मे मधु च मे गोधूमश्च मे सुखं च मे शयनं च मे' ही ऐहिक सुखवादी प्रार्थना सर्वांच्या परिचयाची आहे.

## वेदकालीन व्यापव्यवहार

वैदिक काळांतील भारतीयांचा उद्योग, आकांक्षा, विद्या यांचें यथार्थ स्वरूप लक्षांत घ्यावयाचें तर ऋग्वेदाच्या व यजुर्वेदाच्या जोडीला अथर्ववेदाकडेहि दृष्टि टाकली पाहिजे. आणि या वेदाचे दोन भाग असून, एकांत म्हणजे अथर्वसूक्तांत शांति, पुष्टि वगैरेचे शुभकारक मंत्र असून, दुसऱ्यांत जारणमारणादि अभिचार व घोर असे मंत्र आहेत. अर्थात् या दोन्ही अंगांनीं सजलेला अथर्ववेद म्हणजे भारतीयांच्या त्या काळच्या अनेक सुष्टदुष्ट उद्योगउपद्यापांचा कोशच म्हणावयास हरकत नाहीं. या कोशांत काय काय चिजा आहेत हें पाहावयाचें असेल, तर या वेदांतील विषयांची कौशिक सूत्रकारानें जी जंत्री दिली आहे ती उघडून पाहा. अथर्ववेदांतील मंत्रांच्या योगानें काय काय गोष्टी साध्य होतात याची कौशिक सूत्रकारानें जी यादी दिली आहे त्यांत पुढील प्रकार आहेतः— या मंत्रांनीं काय साध्य होईल? तर बुद्धि तरतरीत होईल, ब्रह्मचाऱ्याचे गुण अंगीं येतील, ग्राम, नगर, दुर्ग, राज्य, धनधान्य, दारासुत, राजअश्व-रथादिकांची प्राप्ति होईल. जनतेंत ऐकमत्य व संतोष नांदेल, शत्रूंच्या हत्तींना उधळून लावतां येईल. शस्त्रास्त्रांचें निवारण करतां येईल, युद्धात जय मिळेल, स्वतः सैन्याचें रक्षण व उत्साहवर्धन करतां येईल. युद्धाचें भविष्य वर्तवितां येईल. शत्रूंच्या सैन्यास दिङ्मूढ करणें, घाबरून सोडणें, आणि नायनाट करणें साधेल. शत्रूंच्या गोटांत मंतरलेली तरवार अथवा पाश टाकितां येईल. रणदुंदुभि मंतरतां येतील, राज्याभिषेकाचा विधि कळेल. पापांचें प्रायश्चित्त समजेल, शाप देतां

येईल, गोवर्धन व धनधान्यादींची समृद्धि करणाऱ्या तंत्रताइतांचें ज्ञान होईल, जन्मांतर्गत पाप नाहींसें होईल, असाध्य अशा रोगांची चिकित्सापद्धति कळेल. ताप, हगवण, मधुमेह हे रोग बरे करतां येतील. शस्त्रानें झालेला रक्तस्राव थांबवितां येईल. भूतपिशाचादिकांनीं झपाटलेल्यांची सुटका करतां येईल. वात, पित्त, कफ, तसेंच क्षय, जलोदर व गाई, घोडे यांच्या पोटांतील जंतु व निरानिराळीं विषें यांचें निवारण करतां येईल. ब्राह्मणाचा शाप आणि राजाचा कोप घालवितां येईल. व्यापारांत अमूप नफा मिळेल. युद्धांत, वादांत, द्यूतांत जय मिळेल. स्त्रियांचीं कुलक्षणें थांबवितां येतील. निषिद्ध दान घेतल्याचें किंवा निषिद्धाचें पौरोहित्य केल्याचें पाप धुऊन टाकतां येईल. अशुभ स्वप्नें, अशुभ ग्रह, अशुभ लक्षणें यांची शांति करतां येईल. शत्रूचे अभिचार मंत्र उलटवितां येतील. नामकरण, चौल वगैरे संस्कारांची माहिती पटेल. सूर्यचंद्रादिकांचीं ग्रहणें, धूमकेतु, भूकंप इत्यादि अरिष्टांची शांति करतां येईल वगैरे वगैरे...

वरील यादीवरून भारतीयांच्या इच्छा, आकांक्षा व संसाराकडे पाहण्याची दृष्टि याची चांगली कल्पना येईल.

वैदिक कालाच्या शेवटीं आरण्यककालीं व उपनिषत्कालीं भारतीयांची विजिगीषु इच्छा मंदावलेली दिसते. मुलूखगिरी आणि यज्ञ यांची एक प्रकारची सांगडच होती. उपनिषत्कालीं यज्ञावरचा विश्वास उडत चालला आणि विजिगीषु वृत्ति थंडावून अरण्यांत जाऊन संन्यासी वृत्तीनें राहण्याची प्रथा सुरू झाली. ही प्रवृत्ति ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन्ही जातींत बळावली. क्षत्रियांत थोडी अधिक बळावली म्हटली तर चालेल. कारण आत्मविद्येचें रहस्य समजावून घेण्याकरितां ब्राह्मण तत्त्वजिज्ञासु क्षत्रिय तत्त्ववेत्त्यांच्याकडे जातांना उपनिषदांत आढळतात. बौद्ध धर्म आणि जैन धर्म हेहि याच प्रवृत्तींतून उद्भूत झाले. ह्या काळांत तत्त्वज्ञानाला उज्ज्वल बहर आला.

पण राष्ट्रांतील अव्वल दर्जाची बुद्धिमत्ता केवळ तत्त्वज्ञानांत गुरफटून

जावी किंवा राजेलोकांनीं रणांगण सोडून अरण्यांत चालतें व्हावें ही परिस्थिति समाजाच्या स्थैर्याला व उत्कर्षाला सर्वथैव प्रतिकूल होती. म्हणून या प्रवृत्तीविरुद्ध मन्वादिस्मृतिकारांनीं ज़ोरानें व नेटानें चळवळ केली. त्यांनीं मुख्य प्रमेय मांडलें तें हें कीं, माणूस जन्माला येतो तो तीन ऋणें घेऊनच येतो. या ऋणांचें अपाकारण केल्याशिवाय, गृहस्थाश्रम यथासांग पार पाडल्याशिवाय, मोक्षमार्गाला लागणें हें पाप होय. ह्या चळवळीचा इष्ट परिणाम झाला असावा. कारण उपनिषत्कालानंतरच्या काळांत तत्त्वज्ञानाच्या जोडीला ऐहिक जीवन सुखमय, ऐश्वर्यमय करणाऱ्या अनेक शास्त्रविद्याकला यांची जोपासना झाली. अर्थशास्त्र, कामशास्त्र, शिल्प, आलेख्य, वास्तु, संगीत, नृत्य, नाट्य वगैरे अनेक विषयांत भारतीयांची बुद्धि या कालांत रममाण होऊन गेली. तत्त्वज्ञानामध्येंहि स्वतंत्र प्रतिभा जागृत राहिली. तिनें अनेक दर्शनांना जन्म दिला. याच काळांत परकीयांनीं कांहीं काळ धुमाकूळ घातला पण शेवटीं त्यांना हाकून लावून यज्ञकुंडें धडाडूं लागलीं, आणि दिग्विजयाकरितां अश्वमेधाचा घोडा चारी दिशांना पळूं लागला. गुप्तांच्या काळीं या वैभवाचा कळस झाला आणि पुढेंहि कित्येक शतकें टिकला.

## कलाकौशल्य

या कालांतील भारतीयांच्या कलांच्याकडे नजर फिरविली तर भारतीयांनीं संसारोपयोगी हरएक कलांची जोपासना केलेली आढळून येईल. त्यांच्या चौदा विद्या व चौसष्ट कलांची यादी प्रसिद्धच आहे. त्यांत जीवन सुखमय करणाऱ्या, संसाराच्या वनाचें उपवन करणाऱ्या व ऐहिक व्यवहारांतील कंटकांचें रोमांचांत रूपांतर करणाऱ्या अनेक कलांचा अंतर्भाव केलेला दिसून येतो. या कलांपैकीं भंगुर, नाशिवंत साधनांचा उपयोग करणाऱ्या कांहीं कला आज स्मृतिशेष झाल्या असल्या तरी, त्यांचें वर्णन ग्रंथांतरीं टिकून आहे; आणि पाषाणासारखें अभंग साधन वापरणाऱ्या तर साक्षात् उभ्या आहेत.

संसारोपयोगी कलांतील एक अति प्राचीन व महत्त्वाची कला म्हणजे विणण्याची कला ही होय. या वस्त्रें विणण्याच्या कामांत भरतखंडाइतका कोणताच देश प्राचीनकाळीं पुढारलेला नव्हता. मिसर देशांत थडग्यांत पुरलेल्या प्रेतांभोंवतीं वस्त्रें गुंडाळलेलीं जीं आज उपलब्ध झालीं आहेत तीं भरतखंडांतलीं असून पन्नास-साठ नंबरच्या सुताचीं आहेत असें म्हणतात. सर्व देशांना कापसाचीं, रेशमाचीं व लोकरीचीं तलम वस्त्रें पुरविण्याचें काम प्राचीनकाळीं भरतखंडांतील कारागीरच करीत. या वस्त्राच्या तलमपणाविषयीं अनेक आख्यायिका व साक्षी आहेत. नवव्या शतकांतील सुलेमान व्यापाऱ्यानें लिहिलें आहे कीं, येथील वस्त्रें इतकीं तलम असतात कीं, मोहोरेच्या अंगठींतून एक सबंध वस्त्र जावें! हंटर वर्णन करितो कीं, कलिंग देशाच्या राजानें औधच्या राजाला एक रेशमी वस्त्र पाठविलें होतें तें इतकें तलम होतें कीं, राजकन्येनें जेव्हां तें परिधान केलें तेव्हां ती नग्नावस्थेंत आहे कीं काय याचा संशय पडला. डाकाच्या मलमलीची प्रसिद्धि तर सर्वश्रुत आहे. १८४६ सालीं टेलर नांवाच्या साहेबानें एक सूत पाहिलें तें १३४९ वार लांब होतें पण वजनांत २२ ग्रेनच भरलें. म्हणजे आजच्या हिशेबानें त्या सुताचा नंबर ५२४ लागतो! काश्मीरच्या शालीची एवढी ख्याति आहे कीं १८४६ सालच्या तहांत एक कलम असें घातलेलें आहे कीं, काश्मीरदरबारनें दरवर्षी इंग्लंडच्या राजाला एक शाल नजर करावी. या शालीची किंमत सुमारें आठ हजार असते.

शिल्प व धातूचें ओतकाम यांची साक्ष घ्यावयास तर वाङ्मयांचे जुने रुमालहि सोडावयास नको. त्यांचे अवशेष ठिकाठिकाणीं अद्यापहि उभे आहेत व ते व्यासाप्रमाणें हात वर करून आक्रोश करीत आहेत कीं, 'भारतीय कलावैभव आम्हांला विचारा.' अशा प्रकारचे असंख्य अवशेष ठिकठिकाणीं दऱ्याखोऱ्यांतून विखुरलेले आहेत. म्हैसूर संस्थानांमध्यें श्रावण बेळगोळ येथील एका गिरिशिखरावर उभा ठाकलेला ६०० फूट उंचीचा भव्य पुतळा; जयपूर, उज्जैनी येथील

वेधशाळेंतील प्रचंड शिलायंत्रें; दिल्ली येथील धातूचा स्तंभ; नालंद, सारनाथ, सांची येथील स्तूप; अजिंठा वेरूळ, कार्लें येथील भव्य लेणीं हीं भारतीयांच्या अजस्र व्यापाचीं स्मारकें आजहि उभीं आहेत.

चित्रकलेचें जीवित शिलाप्रमाणें टिकाऊ नव्हे; तरीहि या बाबतींत भारतीयांनीं चुन्याच्या ओल्या गिलाव्यावर आलेख काढण्याची जी युक्ति योजिली होती व टिकाऊ रंग कमाविण्यांत जी आश्चर्यकारक प्रगति केली होती, त्यांमुळें दोन हजार वर्षांपूर्वीं आपल्या पूर्वजांनीं आपल्या हातांनीं काढलेलीं चित्रें जणों काल काढलेल्या चित्रासारख्या टवटवीत रंगांत आजहि आपणांस अजिंठा दाखवीत आहे.

कलांचे जे विशेष नष्ट होण्यासारखे होते व जे रांगडेपणाला बळी पडले त्यांची साक्ष संस्कृत ग्रंथांतून व परकीय प्रवाशांच्या प्रवासवृत्तांतून काढण्यासारखी आहे.

हिंदूंच्या क्षेत्रांतील घाट व तीर्थकुंडें ह्यांची उत्कृष्ट रचना पाहून अल्बेरुणी लिहितो कीं, 'आमचे लोक ( मुसलमान ) जेव्हां ही कारागिरी पाहतात तेव्हां ते इतके आश्चर्यमूढ होतात कीं, तिचें वर्णन कसें करावें हेंहि त्यांना समजत नाहीं! असलीं कामें प्रत्यक्ष करण्याची तर गोष्टच नको. या कुंडांतून सर्व बाजूंनीं खालवर उतरत गेलेल्या इतक्या पायऱ्या असतात कीं, असंख्य लोक स्नानाकरितां उतरले तरी गर्दी होत नाहीं' ( प्र. ५६ ). भारतीयांचें नगररचनाकौशल्य पाहाल तर, त्यांत सुखसोयी, आरोग्य, व सौंदर्यदृष्टि यांचा कसा सुंदर मिलाफ आढळून येईल. ह्युएनत्संग कनोजचें वर्णन करितो कीं, 'शहर पांच मैल लांब व मैलभर रुंद असून त्यांत ठिकठिकाणीं रम्य उपवनें, स्वच्छ पाण्याच्या टाक्या व पदार्थसंग्रहालयें आहेत.' ह्युएनत्संगनें दक्षिणेंतील एका मठाचें वर्णन केलें आहे त्याची इमारत मोठी टोलेजंग होती. इमारत एकंदर पांच मजली होती आणि प्रत्येक मजल्याला निरनिराळा आकार दिलेला होता. तळमजला हत्तीच्या

आकाराचा असून त्यांत ५०० दालनें होतीं दुसऱ्या सिंहाकृतींत ४००, तिसऱ्या अश्वाकृतींत ३००, चवथ्या वृषभाकृतींत २०० व शेवटच्या हंसाकृतींत १०० दालनें होतीं! ( मिस् डुबाश—'हिंदु आर्ट'). शुक्रनीतीमध्यें मंदिरांना आकाराप्रमाणें मेरु, मंदर, चंद्रशेखर, रत्नशीर्ष, पुष्पहास वगैरे नांवें दिलेलीं असून, त्यांना शंभरांवर मजले व शेंकडों शिखरें असावीं असें वर्णन केलें आहे (४।४).

विजयानगर वैभवानें तळपत होतें त्या काळाचें परकीय प्रवाशांनीं लिहून ठेवलेलें वर्णन पाहतां, तेव्हां त्याची लोकसंख्या तीस लाख असावी. हें नगर तुंगभद्रेच्या कांठीं वसलेलें असून त्याची लांबी १४ मैल व रुंदी १० मैल होती. तट, राजवाडे, पाण्याचे कालवे, देवालयें, विद्यामंदिरें, शृंगारलेले तंबू, बाजार, क्रीडाभवनें, सभागृहें, दिवाणखाने इत्यादींमुळें शहराचा हा भव्य विस्तार गजबजून गेलेला होता. जवळच्या उंच टेकडीवर उभें राहिलें असतां सर्व शहराचा फारच मनोहर देखावा दिसे. नागरिकांच्या घरांसमोर बगीचे सुंदर फुललेले आहेत, नगरांतून इतस्ततः वृक्षांचीं उपवनें पसरलेलीं आहेत, कोठें कोठें विस्तीर्ण रम्य तलाव आहेत, राजवाड्यामध्यें व शहराच्या मध्यभागीं चकचाकित दिसणारे पाण्याचे पाट वाहत आहेत व उत्तरेकडे तुंगभद्रा संथपणें वाहत आहे हा देखावा मोठा मनोरम दिसे!

वास्तुशिल्प व नगरशृंगार यांप्रमाणेंच जीवन हें आनंद, उत्साह व रमणीयता यांनीं भारून टाकणाऱ्या ज्या दुसऱ्या ललितकला म्हणजे गायन, वादन, नृत्य, नाट्य, काव्य त्यांकडे भारतीयांनीं उपेक्षा बुद्धीनें तर पाहिलें नाहींच; पण या सर्वांचीं अनन्यभावानें, उत्सुकतेनें, हौसेनें जोपासनाच केली. भारतीयांच्या वैभवकाळीं या सर्व कलांबद्दल लोकांमध्यें फार आदर वसत असला पाहिजे. राजा भर्तृहरीचें वचन सुप्रसिद्ध आहे कीं, 'साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः' साहित्य-संगीताची ज्याला गोडी नाहीं त्याच्यांत आणि पशूंत अंतर असेलच

तर त्याला शिंग आणि शेपूट नसतें एवढेंच, बाकी तो साक्षात् पशुच! पुरुषच नव्हे तर स्त्रियाहि नृत्य, संगीत वगैरेंत निष्णात असत. कविकुलगुरु कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रां'त राजस्त्रियांना शिकविण्याकरितां गणदास नांवाच्या एका नाट्याचार्यांची नेमणूक केलेली होती, असें वर्णन आहे. या गणदासाच्या नेतृत्वाखालीं 'छलित' नांवाचें एक नवीन नाटक बसविण्याचें काम सुरू होतें आणि त्यांत मालविका, इरावती वगैरेसारख्या तरुण मुली काम करणार होत्या. गणदासानें मालविकेला अभिनय व त्याचीं पांच उपांगें हीं सर्व शिकविलीं होतीं व मालविकेनें तीं कितपत आत्मसात् केलीं होतीं याची परीक्षा राजाराणी व कौशीतकी नांवाची पोक्त विद्वान् बाई यांच्यासमोर घेतली जाणार होती असें एकंदर वर्णन आलेलें आहे. कुलीन स्त्रियांनीं नाटकांत अभिनय करणें व पोक्त स्त्रियांनीं तो निःसंकोच मनानें पाहणें यावरून त्या काळच्या लोकरुचीची कल्पना येईल. नाट्याविषयीं त्या काळचें मत कालिदासानें नाट्याचार्य गणदासाच्या तोंडून वदविलें आहे. गणदास म्हणतो, 'ज्याला त्याला आपल्या विद्येचा अभिमान असतोच, पण माझा अभिमान यथार्थ आहे.' खुद्द भरतमुनींचेंच असें वचन आहे कीं, 'भिन्न भिन्न रुचीच्या व्यक्तींना सारखेंच रिझविण्याचें कोणतें एक उत्कृष्ट साधन असेल, तर तें नाट्य हें होय.' या अद्वितीय साधनाची भारतीयांनीं कसून सेवा केली होती. या विषयावरील मौलीभूत ग्रंथ जो भरतमुनीचा नाट्यशास्त्र तो एक प्रचंड नाट्यकोश असून त्यांत नाट्य, नृत्य, अभिनय, नाट्यगृह वगैरे नाट्याच्या हरएक अंगोपांगांचें मोठें सविस्तर व सांगोपांग विवेचन केलेलें आहे.

नाट्याशीं संबंध असलेल्या गायन आणि नृत्य या कलांनाहि भारतीयांनीं फार उज्ज्वल स्वरूप आणलें होतें. रामायणांत रावण हा गायनवादनांत कुशल असा वर्णिलेला आहे. त्यानें शंकराला संतुष्ट केलें तें आपल्या गायनानेंच केलें ही कथा गायनाची थोरवीच वर्णन

करणारी आहे. कृष्णाच्या मुरलीरवाचें वर्णन हें भागवतपंथीय कवींनीं मुक्तकंठांनीं गायिलें आहे. मृच्छकटिकांतल्या चारुदत्तासारख्या दारिद्य्र प्राप्त झालेल्याच्या घरींहि वीणादि वाद्यांचा इतका संभार होता कीं, आपण चुकून नाटकवाल्याच्या घरांत तर शिरलों नाहीं ना अशी शर्विलक चोराला शंका आली! गायन-नाट्यादि ललितकलांचें मुख्य आश्रयस्थान म्हणजे राजेलोक. या राजेलोकांपैकीं कांहीं स्वतः जातीनें नृत्यनाट्य-गायनादि कलांत प्रवीण होते. भासाच्या नाटकांतील सुप्रसिद्ध उदयन राजा, कालिदासाचा अग्निमित्र, तसेंच इतिहासप्रसिद्ध समुद्रगुप्त, भोजराज, रत्नावली नाटकाचा कर्ता श्रीहर्ष वगैरे राजे हे ललितकलांचे नुसते भोक्तेच नव्हे, तर उपासक म्हणून प्रसिद्ध आहेत. राजाप्रमाणें पट्टाभिषिक्त राण्याहि गायन-नृत्यादि कलांत प्रवीण असत इतकेंच नव्हे, तर उघड समाजांत बसून आपलें कौशल्य प्रकट करण्यांतहि त्यांना वावगें वाटत नसे! याविषयीं एका दानपत्राच्या आधारें डॉ. भांडारकर लिहितात कीं, 'इसवी सनाच्या बाराव्या शतकांतील सोम नांवाच्या राजाची राणी सबलदेवी ही गायनांत अत्यंत निपुण होती. एके प्रसंगीं भर मोठ्या सभेमध्यें अनेक गायनवादनकुशलांच्यासमोर राजाच्या समक्ष तिनें इतकें उत्कृष्ट गायन केलें कीं, राजा अतिशय खूष होऊन तिच्या इच्छेप्रमाणें त्यानें तिला जमीन इनाम दिली, (जर्नल मु. ए. सो. १८९२). गायनकलेचा अभ्यास वैदिक कालांतील सोमगायनापासून हजारों वर्षें चालू होता. गायनाचे आर्चिक, गाथिक, सामिक आणि स्वरांतर असे चार भेद असून तीव्र, कोमल सुरांच्या मिश्रणानें बनणाऱ्या रागरागिण्यांचे अनेक प्रकार बांधून वर्षाच्या कोणत्या ऋतूंत व दिवसाच्या कोणत्या प्रहरीं कोणता राग म्हणावा याचेहि सूक्ष्म नियम बसविले होते.

संगीताचें नृत्य व अभिनय यांशीं साहचर्य आहे. या नृत्य अभिनयाचीहि भारतीयांनीं कसोशीनें जोपासना केली होती. वैदिक कालांत अतिरात्र व सात्रायण या यज्ञांच्या प्रसंगीं नृत्य करण्याचा प्रघात

होता. शंकराचें तांडवनृत्य अनेक कथांत विख्यात असून शंकराला नटराज ही पदवी आहे. कृष्णाची रासक्रीडा हीसुद्धां नृत्याचीच आवड दर्शविते. रासक्रीडेवर आध्यात्मिक रूपकांचीं अनेक पुटें देण्याचा प्रयत्न भागवतादि पुराणकारांनीं केला असला, तरी अनेक उपपत्त्या त्यांना मांडाव्या लागल्या यावरूनच मूळ ही रासक्रीडा म्हणजे स्त्रीपुरुषांच्या मिश्रणाचाच प्रकार असावा असेंच वाटूं लागतें. गायनाप्रमाणें नृत्यांतहि राजघराण्यांतील स्त्रिया प्रवीण असत. रुद्रायण राजा साथ करीत असतां चंद्रावती राणीनें नृत्य केलें, सिंहलदेशचा राजा जो पराक्रमबाहू त्याची राणी रूपावती नृत्यकुशल होती, राजा शिलादित्य यानें जीमूतवाहन काव्य संगीताच्या चालीवर बसवून नृत्यप्रयोग करविला, अकराव्या शतकांतील चोल राजांच्या दरबारीं ४०० नर्तिका होत्या; अशा प्रकारचे उल्लेख सापडतात. नृत्यांत शरिराच्या त्या त्या अवयवांच्या विक्षेपांचा सूक्ष्म विचार केला असून हातांच्या बोटांनीं भ्रमरमुख, हंसवदन, अर्धचंद्र, उत्फुल्लपद्म वगैरेसारख्या अनेक मुद्रा कशा दर्शवाव्या वगैरेचा खोल विचार केलेला होता. निरनिराळ्या चलनवलनांनीं शरिराच्या होणाऱ्या स्थितींचे १०८ प्रकार कल्पिले आहेत. या १०८ पैकीं ९३ करणांचीं चित्रें चिदंबर देवालयाच्या सभामंडपांतील कनकसभेच्या दालनांत कोरलेलीं आहेत. या सर्वांचें वर्णन नाट्यशास्त्रांत आलें आहे.

या लुप्त झालेल्या कलेचा उदयशंकर या गुजराथी कलावंतानें अलीकडे उद्धार केला असून पाश्चात्यांनाहि त्यानें मोहून सोडलें आहे. विख्यात रशियन नर्तकी पावलोव्ह व अमेरिकन नर्तकी रागिणीदेवी यांनीं भारतीय नृत्य आत्मसात् केलें असून युरोप-अमेरिकेंत त्याचा प्रसार केला आहे. सर्व शरिरांत मार्दव व चपलता निर्माण करून शरिरांत आनंदाच्या लहरी उसळविणारी अशी ही कला आहे. 'आयुष्य विषाचा प्याला' असें रडगाणें गाणाराची व परलोकाकडे दृष्टि लावून बसणाराची नव्हे.

आतां काव्यकलेकडे नजर द्या व मग सांगा कीं प्राचीन भारतीय हे नुसती अध्यात्माचीच कास धरीत, कीं ऐहिक व्यवहारांतील अनेक सुखदुःखांचे रंग वाङ्मयांत भरीत तें. अध्यात्माची वाङ्मयावर छाप बसली ती बाराव्या शतकानंतर, म्हणजे भारतीय संस्कृतीच्या पडत्या काळीं. त्या काळाच्या पूर्वीच्या वाङ्मयाकडे आपण नजर टाका व मग भारतीय वाङ्मयाचें वैशिष्ट्य ठरवा. या कालानंतरहि फरक झाला तो प्राकृत वाङ्मयांत. संस्कृत वाङ्मयांत पूर्वींचीच प्रणालिका चालू राहिली. ती व पूर्वींचें वाङ्मय यांचा सूर पाहिला असतां त्यांत टाळ, मृदंग व वीणा यांचा सूर न आढळतां तरुणींच्या हास्यलहरी व नूपुरांची रुणझुण हीच आढळून येईल. वेदान्तावर मोठमोठीं भाष्यें अस्तित्वांत आलीं पण तीं विद्वानांच्याकरितां होत. काव्यनाटकादि बहुजन-समाजाच्या तोंडीं खेळणारे व भिन्नरुचीचें आराधन करणारें वाङ्मय हें त्या काळीं वेदान्ताची साथ करीत नव्हतें.

या वाङ्मयाचें ध्येय व स्वरूप काय होतें याची कल्पना काव्य-शास्त्रावरूनहि चांगली येते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मोक्ष-मार्गाची व ललितवाङ्मयाची इतकी फारकत झाली होती कीं, वाङ्मयाचा आत्मा जो रस त्या रसाच्या विविध स्वरूपांत संसारा-विषयीं विरक्ति उत्पन्न करणारा रस जो शांतरस त्याचा अंतर्भाव करण्यासच कित्येक काव्यमीमांसक तयार नव्हते. उलट सर्व रसांत मुख्य मानाचा नारळ शृंगारालाच देण्यांत येई व कांहीं तर शृंगारा-व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याच भावनेला रसाची पदवी देण्यास तयार नव्हते. ज्यांना इतर रस मान्य होते त्यांनींहि उत्तम काव्याचीं म्हणून उदाहरणें दिलीं आहेत तीं एकजात शृंगारिक, आणि त्यांतील पुष्कळ तर पति-पत्नीविषयक नसून परस्त्रीविषयक !

संस्कृत वाङ्मयांत अलीकडील काळांतल्यासारखें संसाराचें हुबेहूब चित्र रेखाटण्याचा संप्रदाय नव्हता. बहुतेक काव्य-नाटकें पौराणिक, ऐतिहासिक किंवा काल्पनिक अद्भुत स्वरूपाचींच असत. विद्वान्

लोकांना आश्रय मिळे तो राजे लोकांकडून. त्यामुळें दरबारी लोकांना आवडेल अशा प्रकारचें वाङ्मय निर्माण होई. या लोकांना मुख्य आवड शृंगार व वीर या दोन रसांचीच. बाणभट्टानें कादंबरीमध्यें हिमालयांतील गंधर्वलोकांत वस्ती करणाऱ्या महाश्वेता, कादंबरी अशा अलौकिक स्त्रिया निर्माण केल्या आहेत पण त्यांच्या आयुष्यांतील मुख्य सूत्र कोणतें म्हणाल तर तें प्रेम-विव्हलता ! पुंडरीकासारखा तपोधनहि कामविकारानें इतका वेडा होतो कीं युवतीचे कटाक्षबाण हृदयांत रुतल्यापासून कांहीं घटिकांचे अवधींत त्याचे प्राण त्याला सोडून जातात. हाच शृंगाराचा सूर सर्वत्र ऐकूं येतो. कालिदासाचा ऋतुसंहार घेतला तर सर्व ऋतूंचें जें वर्णन दिलें आहे तें म्हणजे निरनिराळ्या ऋतूंत कामीजनांवर काय परिणाम होतात त्याचें ! जणों कांहीं कामीजन हा एवढाच काय तो काव्य-विषय होऊं शकतो ! पाश्चात्यांतहि शृंगार हाच काव्याचा मुख्य विषय आहे; पण भारतीयांच्याइतका तो एकच एक विषय त्यांनीं घोटलेला नाहीं. कालिदासाचें ऋतुसंहार व इंग्लिश कवि टॉमसन् याचें ऋतुसंहार ( Seasons ) हीं एकाच विषयाला वाहिलेलीं भारतीय व पाश्चात्य अशीं दोन काव्यें पाहा म्हणजे भारतीय कवीला शृंगार सर्वत्र कसा सुचतो तें कळून येईल.

बहुतेक कवि राजेलोकांच्या आश्रयानें काव्य करीत हें वर लिहिलें आहे. हे राजेलोक म्हणजे पट्टीचे विलासी असत. राजाच्या भोंवतीं नेहमीं सुंदर तरुण स्त्रियांचा गराडा असावयाचा. मग राजा अंतः-पुरांत असो वा मृगया करीत असो. कालिदासाचा दुष्यंत मृगया-वेषानें रंगभूमीवर प्रविष्ट होतो तो यवनीभिर्दत्तहस्तः असाच येतो. 'पौर्णिमेसि तारांगणिं जसा बाई चंद्र उदेला। मध्यभागीं आपुण भोंवत्या नाटकशाला ' हें होनाजीकृत बाजीराववर्णन प्राचीन राजांना सामान्यतः लागू करण्यास हरकत नाहीं. बाराव्या शतकांतील राजा सोमेश्वर याच्या नांवावर प्रसिद्ध असलेल्या मानसोल्लास नांवाच्या

ग्रंथांत राजानें दिवसाच्या कांठीं कोणकोणते भोग भोगावे याचें तपशीलवार वर्णन दिलें आहे. ते भोग म्हणजे गृहोपभोग, स्नानभोग, पादुकाभोग, ताम्बूलभोग, विलेपनभोग, वस्त्रोपभोग, माल्योपभोग, भूषोपभोग, आसनोपभोग, चामरभोग, आस्थानभोग, पुत्रभोग, अन्नभोग, पानीयभोग, पादाभ्यंगभोग, यानोपभोग, छत्रभोग, शय्याभोग, धूपभोग व योषिद्भोग हे होत (विंशति २). योषिद् म्हणजे स्त्रिया यांची संख्या जेवढी मोठी असेल तेवढें राजाचें वैभव अधिक. राजाचे भाट ही संख्या फुगवून सांगण्यांत एकमेकांवर ताण करीत. सर्वांवर कडी जैन ग्रंथकारांची. त्यांपैकीं एकानें चक्रवर्तीला किती स्त्रिया असाव्यात याचें गणित करून असा निर्णय दिला आहे कीं चक्रवर्तीच्या अन्तःपुरांत सर्व ऋतूंत सुखस्पर्श अशा एकंदर एक लक्ष ब्याण्णव हजार स्त्रिया असाव्यात! (कोसंबी—'हिंदु संस्कृति').

## हौशी नागरिकाचें जीवन

हें झालें राजेलोकांविषयीं. आतां प्राचीन कालच्या ऐश्वर्यसंपन्न नागरिकाचें गृहजीवन आणि दिनचर्या कशा प्रकारची असेल याची कल्पना वात्स्यायनानें चौथ्या अध्यायामध्यें 'नागरकवृत्तम्' या मथळ्याखालीं जी वर्णिली आहे त्यावरून येईल. या नागरकाचें घर म्हणजे एक प्रशस्त वाडा असे. त्यांत सर्व प्रकारच्या सुखसोयी असत. मागें एक प्रशस्त अंगण, अंगणामध्यें विहीर किंवा पुष्करिणी व तिच्याभोंवतीं सुंदर फुलझाडांची बाग व पाठीमागच्या परसूंत भाजीपाला, औषधि वनस्पति अशी एकंदर मांडणी असे. प्रातःकाळीं उठून मुखमार्जन झाल्यानंतर नागरकानें चंदनाची किंवा तशाच दुसऱ्या सुवासिक सुगंधि द्रव्याची उटि अंगाला चर्चावी. नंतर सुगंधि धूपानें धूपविलेलीं वस्त्रें अंगावर घ्यावीं, गळ्यांत पुष्पांच्या माळा घालाव्या, डोळ्यांत अंजन घालावें, ओठ अलक्तक रंगानें तांबडेलाल रंगवावे, हातांत अंगठ्या

घालाव्या आणि नंतर वेषभूषा नीट साधली कीं नाहीं हें दर्पणांत पाहून बाहेर पडावें. कामधाम पाहून बाहेरून परत आल्यावर स्नान-गृहांत जावें. त्याच्या आधीं दर दिवसाआड अंगमर्दन करून घ्यावें. दर तीन दिवसांनीं स्नान करितांना अंगाला फेनक किंवा साबू लावावा. दर चार दिवसांनीं 'आयुष्यकम्' अथवा श्मश्रू करावी. हाताचीं नखें नेहमीं स्वच्छ ठेवावीं व तीं कातरून त्यांना निरनिराळे आकार द्यावे. दुपारीं भोजनोत्तर थोडीशी वामकुक्षी करावी. नंतर पिंजऱ्यांतील शुक-सारिकांचीं गोड भाषणें ऐकावींत किंवा कोंबड्यांची व एडक्यांची झुंज लावून गंमत पाहावी. सायंकाळीं मित्रमंडळीसह क्लबांत जावें. या क्लबांना 'गोष्ठी' किंवा 'समाज' असें म्हणत. गांवांत सरस्वतीचें मंदिर असे. तेथें दर पंधरवड्याला नेमलेल्या तिथींस गांवांतील सर्व हौशी नागरक एकत्र जमत आणि गायनवादनांच्या मैफलींचा आस्वाद घेत. गोष्ठी म्हणून जो प्रकार असे त्याच्या बैठका बहुधा गणिकांच्या घरीं भरत. या गणिका निरनिराळ्या शास्त्रकलादिकांत चांगल्या पारंगत आणि अस्खलित संस्कृत बोलण्यांत व काव्यसमस्या करण्यांत मोठ्या पटाईत असत. असल्या बैठकीमध्यें चटकदार विनोद व विद्वत्तापूर्ण संभाषणांची मोठी स्पर्धा चाले. ह्या सभेंत मानाचें स्थान मिळायचें तर शीघ्रकवित्व, समस्यापूरण, अनेक प्रांतीय भाषांचें ज्ञान, अनेकार्थी शब्दांचा कोष, निरनिराळीं वृत्तें अलंकार वगैरेचें ज्ञान, नागरकास असावें लागे. असे अनेक व्युत्पन्न नागरक एके ठायीं जमले असतांना संभाषणांत कसा रंग भरत असेल, कोटि-प्रतिकोटीच्या कशा चकमकी झडत असतील, आणि विनोदाची आतषबाजी कशी चमकत असेल, याची वाचकांना सहज कल्पना करतां येईल. कवितांच्या भेंड्या लाव-ण्याचाहि नाद तर या लोकांना फार असे. वात्स्यायनकाळीं या भेंड्यांना प्रतिमाला असें म्हणत असत. शिवाय असल्या बैठकींत चित्रकलेंतील व गायनकलेंतील सामने होत. समाज व गोष्ठी यांशिवाय पानमंडळें आणि उद्यानयात्रा असत. गांवाच्या बाहेर मोठमोठीं उद्यानें असत,

त्या ठिकाणीं नागरकजन मधूनमधून सहल करण्याकरितां जात. सकाळीं उठून, उत्तम पोषाक करून, घोड्यावर बसून, बरोबर नोकरचाकर व जिवलग मैतरिणी घेऊन उद्यानांत जावें; किंवा जलक्रीडा करावयाची असल्यास सरोवराकांठीं जावें. दुपारचें भोजन तेथेंच करावें. भोजनोत्तर निरानिराळे खेळ खेळावेत, आणि संध्याकाळीं सावल्या फिरल्या म्हणजे उद्यानांतील पुष्पांचे गुच्छ हातांत घेऊन नगरांत परत यावें! असा हा सुखवस्तु हौशी घरंदाजाचा जीवितक्रम वात्स्यायनाच्या काळीं या प्रकारचा होता.

तुम्ही विचाराल प्राचीनकाळीं सर्वच नागरकांचा जीवनक्रम असा होता कीं काय? अध्यात्मचिंतनांत गढून गेलेले पुण्यात्मे त्या काळीं नव्हते कीं काय? होते तर! वात्सायनकालींहि होते. पण भारतीय संस्कृतीचें आख्यान सुरू झालें कीं सामान्य जनसमूहाचा ऐहिक जीवनपट गुंडाळून ठेवण्यांत येतो. त्याचें दर्शन घडावें म्हणून तो येथें मुद्दाम उलगडून मांडला आहे.

रंगेल व विलासी अशा कलांची उपासना एकीकडे चालू असतां ज्या कलेवर विश्वास टाकून विलास भोगावयाचा ती युद्धकलाहि भारतीयांनीं जागती राखलेली होती. भारतीय संस्कृतींतील अग्नि धगधगत होता तोंवर या युद्धकलेंत भारतीयांनीं केवढी सिद्धि प्राप्त केली होती ह्याची साक्ष शिकंदराच्या शिपायांनींच बोलून ठेवली आहे. पारसी साम्राज्य धुळीस मिळविणाऱ्या या जगज्जेत्याच्या सैनिकांनीं कोणापुढें कच खाल्ली असेल, तर भारतीय सैनिकांपुढेंच. पोरस राजाचा पराभव झाला खरा, पण त्यानंतर शिकंदराला लवकरच येथून परत फिरावें लागलें हेंहि तितकेंच खरें आहे. एरियन या ग्रंथकारानें लिहून ठेवलें आहे कीं, बियास नदीच्या कांठीं आल्यावर तीपलीकडील भारतीयांच्या प्रचंड सेनेस तोंड द्यावें लागेल या कल्पनेनें शिकंदराचें सैन्य गारठलें, आणि आपण साफ पुढें पाऊल टाकणार नाहीं असें त्यांनीं शिकंदरास कळविलें ('शिकंदर-स्वारी'—मॅक क्रिंडल). ग्रीक, कुशान,

हूण वगैरे परकीयांनीं स्वाऱ्या करून कांहीं काल सत्ताहि गाजविली; पण त्यांना पिटाळून लावणारेहि प्रतापी राजे निघाले व आठव्या शतकापासून इस्लामी टोळधाडी येऊं लागल्या त्यांनाहि तीन शतकें सीमेवर थोपवून धरण्यांत आलें. युद्धकलेंतील आणि राजकारणांतील हें प्रावीण्य पुढें लोपलें, आचारविचारांत भोंगळपणा शिरला हें सांगावयास नकोच. तें लोपलें नसतें तर आजचा आपला इतिहास निराळाच झाला असता. तें असो. येथें हें मुख्यतः दाखवून द्यावयाचें आहे कीं, आत्म्याच्या उन्नतीवर लक्ष दिल्यानें आम्ही व्यवहाराला पारखे झालों असें जें पाश्चात्य पंडित आम्हांस सांगतात तें खरें नव्हे.

संस्कृतीची जागृतावस्था होती तोंवर, राजकारणाच्या हरएक अंगोपांगांची चोख उपासना आपल्या पूर्वजांनीं केली. ती किती कसोशीनें केली हें दाखवून देण्यास महाभारत, चाणक्याचा अर्थशास्त्र, कामंदकाचा नीतिसार, शुक्राचा नीतिसार, सोमेश्वराचा मानसोल्लास वगैरे अनेक ग्रंथ सज्ज आहेत. हत्ती आणि घोडे हीं सैन्याचीं प्रमुख अंगें त्या काळीं असत; तर हत्ती व घोड्यांच्या निरनिराळ्या जाती, त्यांना पकडण्याचे प्रकार, त्यांचे रोग व औषधोपचार यांवरहि पालकाप्य शालिहोत्र वगैरेंनीं स्वतंत्र वाङ्मय निर्माण केलें. व्यापार व कृषिविषयक शास्त्राला वार्ता हें संस्कृत नांव आहे. या वार्ताशास्त्रावरहि बहुमोल वाङ्मय अस्तित्वांत आलें. याच्याचबरोबर गणित, खगोल, रसायन, वैद्यक वगैरे श्रेष्ठ शास्त्रांतहि भारतीय प्रज्ञा रममाण झालेली होती. या भौतिकशास्त्रांच्या उपासनेकडे थोडे विशेष लक्ष देऊं या.

## भौतिक शास्त्रांची जोपासना

प्राचीन भारतांत शास्त्र व कला यांची अशी एकहि शाखा नव्हती कीं ज्यांत भारतीयांनीं अव्वल दर्जाचे शोध लावले नाहींत. सर्व शाखांत अत्यंत रेखीव असें शास्त्र जें गणितशास्त्र त्यांतील त्यांचे शोध हे त्यांच्या

कुशाग्रबुद्धीचे अक्षय्य स्मारक होत. अंकगणिताचा मूलाधार जो अंक व त्यांची दशममानपद्धति हीं भारतीय गणितज्ञांचीं विजयपताका होत. भारतीयांनीं योजलेले अंकच आज सर्वत्र योजिले जात आहेत. सॅरेसिन अरबांनीं ते हिंदूपासून उचलले व युरोपियनांनीं अरबांपासून ग्रहण केले. तत्पूर्वीं ते जे अंक वापरीत ते रोमन अंक होत. ते घड्याळावर अजूनहि पाहावयास सापडतात. भारतीयांचे नवे सुटसुटीत अंक मिळतांच जुने बोजड रोमन अंक साहजिकच मागें पडले. दशममानपद्धति हा तर अंकगणितांतील एक अव्वल दर्जाचा शोध होय. ही पद्धति आज आपल्या इतकी अंगवळणीं पडली आहे कीं, त्या पद्धतीनें संख्यागणन करण्यांत केवढी क्रांति एके काळीं केली असली पाहिजे ह्याची आपणांस कल्पना करणें देखील कठीण झालें आहे. आंकड्यांचीं नुसतीं स्थानें बदलून केवळ दहा आंकड्यांनीं लक्ष, कोटि, अब्ज अशा प्रचंड संख्यांचें दिग्दर्शन करणें हा अव्वल दर्जाचा शोध होय. ही पद्धति पुढें सर्व राष्ट्रांनीं उचलली. चिनी लोक पूर्वीं आपले अंक वरून खालीं लिहीत ते भारतीय पद्धतीचा परिचय झाल्यावर डावीकडून उजवीकडे असे लिहूं लागले. दशममानपद्धतीविषयीं प्रसिद्ध ज्योतिर्विद ला प्लास यानें लिहिलें आहे कीं, "आर्किमिडीज् व अपोलोनियस् अशा अव्वल दर्जाच्या गणितज्ञांच्या बुद्धीलाहि स्फुरला नाहीं असा हा महत्तम दशमपद्धतीचा शोध ज्यांनीं लावला त्या भारतीयांचे आपण किती म्हणून धन्यवाद गावे!" (डॅनझिग— 'नंबर द सायन्स ऑफ लॅंग्वेज.')

आठव्या शतकांतील खलीफ वलिदाच्या कारकीर्दीपर्यंतहि सारासिनांना आंकडे माहीत नव्हते. यापूर्वीं ते आंकड्याऐवजीं अक्षरेंच वापरीत. या शतकाच्या अंतीं सिंधमधून कांहीं शास्त्रज्ञ मनसुराच्या दरबारीं गेले व त्यांनीं प्रथम भारतीय गणितपद्धति व सारण्या अरबांना शिकविल्या व त्यावरून पुढें खलीफ मामुन याच्या पदरीं असलेला इब्न मुसा यानें गणित-ग्रंथ तयार केले. अरबांनीं पुढें स्पेन जिंकलें व दहाव्या

शतकांत युरोपियनांना भारतीय गणितपद्धतीची प्रथम तोंडओळख झाली.

बीजगणितांत भारतीयांनीं द्विघातसमीकरण सोडविलें होतें; व त्याच्याहि वरील घातांचीं समीकरणें सोडविण्याचा प्रयत्न केला होता. तसेंच ज्या समीकरणांत अनेक अज्ञातें धरावीं लागतात असलीं-हि समीकरणें चवथ्या शतकांतल्या आर्यभट्टानें सोडविलीं होतीं. त्याच काळचा ग्रीक गणिती डायोफँटस याची आणि आर्यभट्टाची तुलना करून कोलब्रुक लिहितो कीं, डायोफँटस हा भारतीय गणितज्ञांच्या पुष्कळच मागें होता (निबंध-खंड २). भूमितीची सुरुवात तर वेदाच्या काळापासूनच दिसून येते. बौद्धायन व आपस्तंभ यांच्या शुल्वसूत्रांत यज्ञाची वेदी बांधण्याच्या कामीं भूमितीच्या सिद्धांताचा प्रथम उपयोग केलेला आढळतो. भूमितीमध्यें वर्तुळाच्या व्यासाचें त्रिज्येशीं प्रमाण बसविणें हें एक अत्यंत कठीण कोडें मानण्यांत आलें आहे. या प्रमाणास युरोपीय गणितांत ग्रीक अक्षर पाय् या नांवानें संबोधतात व त्याची संख्या ३·१४१६ अशी आजच्या गणितज्ञांनीं ठरविलेली आहे. पांचव्या शतकांतील आर्यभट्टानें हीच संख्या दिलेली आहे. ती काढण्याकरतां त्यानें वर्तुळामध्यें ३८४ समभुजांची एक आकृति काढली व त्यावरून 'पाय्'ची किंमत ३·१४१६ हीच म्हणजे तंतोतंत आजच्याइतकी बसविली ! युरोपियन लोक पायथागोरसचा सिद्धान्त म्हणून ज्याला संबोधतात तो, काटकोन त्रिकोणाच्या बाजूंवरील चौरसाचा सिद्धान्त, भारतीयांना पूर्ण अवगत होता इतकेंच नव्हे, तर भास्कराचार्यानें तो सिद्ध करण्याच्या एक सोडून दोन पद्धति दिल्या आहेत. त्यांतील दुसरी ही सोळाव्या शतकापर्यंत युरोपीयांस माहिती नव्हती. कोन, सिलिंडर वगैरेचें घनफळ काढणेंहि त्यांना अवगत होतें. त्रिकोणमितींतील त्यांची प्रगति इंग्रजी Sine हा शब्दच सांगेल. हा शब्द पाश्चात्यांनीं अरबांपासून घेतला पण अरबांनीं तो संस्कृत 'शिंजिनी' या शब्दावरून उचलला

त्यांच्या ज्योतिर्गणितावरून गोल त्रिकोणमितीचे सिद्धान्त त्यांना अवगत होते हें स्पष्ट दिसून येतें. सॉलिड जॉमेट्रीचा जनक, युरोपियन लोक सतराव्या शतकांतला डेकार्ट हा मानतात, पण आठव्या शतकांतील नैय्यायिक वाचस्पति यानें आकाशांतील स्थान मोजण्याकरितां तीन आंस घेऊन मोजण्याची कल्पना मांडली आहे. एक आंस क्षितिजावरील सूर्योदयबिंदूपासून सूर्यास्तापर्यंत जाणारी रेषा, दुसरी पहिलीशीं काटकोन करणारी आडवी समपातळींतील रेषा व तिसरी त्यांच्या छेदबिंदूपासून सूर्याच्या मेरीडियनपर्यंत. भास्कराचार्यांनीं प्रतिक्षण बदलणारी तात्कालिक गति मानली आहे. 'यदा आसन्नः तिथ्यंतः तदा तात्कालिकया गत्या तिथिसाधनं कर्तुं युज्यते.' यावरून सतराव्या शतकांतल्या न्यूटनच्यापूर्वी पांच शतकें होऊन गेलेल्या भास्कराचार्यांना शून्यलब्धीची कल्पना होती असें दिसतें.

खगोलविद्येंत प्राचीन सर्व राष्ट्रांची प्रगति दिसून येते त्यांत भारतीयांचा क्रमांक फार वरचा आहे. पांचव्या शतकांतील आर्यभट्टानें पृथ्वी सूर्याभोंवतीं भ्रमण करते असें प्रतिपादन केलें असून ग्रहणांची शास्त्रीय मीमांसा बिनचूक दिली आहे. ग्रहांच्या गति, संपाताची गति, संपाताचें चलन वगैरे विषयांत त्यांनीं चांगली प्रगति केली होती. या विषयाची तपशीलवार माहिती जिज्ञासूंना दीक्षितकृत 'भारतीय ज्योतिष' या बहुमोल ग्रंथांत सापडेल. त्यांतील धूमकेतूसंबंधानें चार वाक्यें वानगीदाखल उद्धृत करतों. सध्यां एक धूमकेतु आकाशांत लोक पाहत आहेत. तेव्हां आपल्या पूर्वजांनीं धूमकेतूंचे वेध घेतले होते व अनेकांचा भ्रमणकाल ठरविला होता हें वाचून कौतुक वाटेल. वराहमिहिराच्या बृहत्संहितेवरील टीकाकार उत्पल यानें धूमतेकूविषयीं पराशर, देवल वगैरे प्राचीन ग्रंथकारांचीं वचनें दिलीं आहेत त्यांत तो लिहितो : "पैतामहकेतु एकदां दिसल्यावर ५०० वर्षांनीं पुन्हा उदय पावतो. उद्दालककेतु ११० वर्षें प्रवास करून उदय पावतो. शूलाग्रासारखी शिखा धारण करणारा काश्यपश्वेतकेतु

१५०० वर्षें प्रवास केल्यावर पूर्वदिशेस उदय पावून, ध्रुव व सतर्षि यांस स्पर्श करून अपसव्य मार्गें जातो. विश्वावसूचा रश्मिकेतु हा १०० वर्षें प्रवास करून आवर्तकेतूच्या मागाहून कृत्तिका नक्षत्रीं उदय पावतो." ( दीक्षित, पृ. २४२. )

पदार्थविज्ञानशास्त्रांतील परमाणूंची कल्पना नैय्यायिक वैशेपिकांनींच प्रथम मांडलेली आढळते. आणि परमाणूंचें मापन करण्यास सूक्ष्म उपकरणें उपलब्ध नसतांहि त्यांनीं जीं मापें दिलीं आहेत तीं निव्वळ आश्चर्यकारक होत. भास्कराचार्यांच्या सिद्धान्तशिरोमणींतील कोष्टकाप्रमाणें कालाचा अत्यंत सूक्ष्म भाग जो त्रुति तो सेकंदाचा $\frac{१}{३३७५०}$ होतो व वराहमिहिर याच्या गणनेनें सूर्याच्या किरणांत दिसणाऱ्या सूक्ष्म त्रसरेणूंची जाडी इंचाच्या $\frac{१}{३४९८२५}$ इतकी भरते ( सील– पॉझिटिव्ह सायन्सेस ). लोहचुंबक, विद्युत्, लेन्स, नादलहरी वगैरे पदार्थविज्ञानशास्त्रांतल्या हरएक बाबतींत त्यांचें ज्ञान तत्कालीन इतर राष्ट्रांपेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें कमी नव्हतें. काचसामानाविषयीं तर त्यांची ख्याति होती. प्लिनीनें लिहिलें आहे कीं, काच तयार करावी तर हिंदूंनीं. होकायंत्राचा शोधहि त्यांच्या बुद्धीनें लावलेला होता. नौकानयनाचा इतिहास लिहिणारे राधाकुमुद मुकर्जी लिहितात, कीं ख्रिस्ती शतकाच्या आरंभीं जावा बेटाकडे सफरी करणाऱ्या एका जहाजावर होकायंत्र होतें असा उल्लेख आढळतो. हें होकायंत्र म्हणजे लोखंडाचा केलेला एक मत्स्य असे व तो तैलपात्रांत पोहत राहून दिशा दाखवी. त्यास मत्स्ययंत्र असें म्हणत.

रसायनशास्त्रांत भारतीयांची धातुशोधनमारणविद्या प्रसिद्ध आहे. सहाव्या शतकांत ही विद्या त्यांनीं चांगली कमावली होती. पाऱ्याविषयीं भारतीयांनीं विशेष संशोधन केलेलें होतें. इतकें कीं, चौदाव्या शतकांतल्या माधवाचार्यांच्या सर्वदर्शनसंग्रहांत रसेश्वर-दर्शन म्हणून एक स्वतंत्र दर्शनाची पदवी पारदाभ्यासास प्राप्त झालेली आहे. सहाव्या शतकांतच त्यांना पाऱ्याच्या घनीभवनाची

विद्या साध्य झाली होती. लोहविद्येमध्यें त्यांची किती प्रगति होती हें दिल्ली येथील प्रचंड लोहस्तंभ सदैव सांगत उभा आहे. हा शुद्ध लोहाचा असून १५०० वर्षें झालीं तरी त्याला गंज माहीत नाहीं; आणि त्यावर खोदलेला लेख तर काल खोदावा असा स्पष्ट, सुवाच्य आहे. १० टन वजनाचा येवढा स्तंभ ओतणें ही गोष्ट आजहि कौतुकास्पद वाटावी अशीच आहे.

रसायनशास्त्राशीं संबंध असलेलें शास्त्र जें वैद्यक त्यांतहि भारतीयांचें बुद्धिवैभव चमकलेलें आहे. चरक आणि सुश्रुत हीं नांवें औषधिविज्ञान व शस्त्रविज्ञान यांच्या इतिहासांत अजरामर आहेत. सारासिन वैद्यांनीं चरकसुश्रुताचा अभ्यास केला व त्यांचेपासून युरोपियनांनीं बरींच औषधें उचललीं. प्रसिद्ध त्रिफळा हें औषध ग्रीकांच्या निघंटुमध्यें Tryphera perva या नांवानें समाविष्ट झालेलें आढळतें. सारासिनांची गाठ पडेपर्यंत युरोपियन वैद्य खनिज पदार्थ हे मुख्यतः बाह्योपचार म्हणून वापरीत. आठव्या शतकांत सिरापियन हा सारासिनांमध्यें पहिला मोठा निघंटुकार होऊन गेला. त्यानें चरकाचा उल्लेख केला आहे. पाऱ्याचा आंतरउपयोग करून पाहण्याचें धाडस व कल्पकता प्रथमतः भारतीयांनींच दर्शविली. खनिजपदार्थ विश्वासपूर्वक पोटांत देण्याचें त्यांचें धाडस पाहून सारासिनांनीं तोंडांत बोट घातलें. पाश्चात्यांचा आद्य वैद्यराज, जो खिस्तपूर्व चवथ्या शतकांतला हिप्पोक्रेटस त्यालाहि भारतीय औषधें माहीत होतीं. सुंठ, वेलदोडा, मिरीं वगैरे औषधें तो योजीत असे. खनिज पदार्थांचा औषधी उपयोग सोळाव्या शतकापासून पुढें तेवढा सर्रास होऊं लागला. उलट भारतीय ग्रंथांत हीं द्रव्यें सहाव्या शतकापासून बिनधोक सांगितलेलीं आढळतात. पाश्चात्यांत रुग्णालयें स्थापन करण्याची कल्पना निघाली ती प्रथम खिस्ती शतकाच्या चौथ्या शतकांत. भरतखंडामध्यें अशोकाच्या वेळेला म्हणजे सातशें वर्षें पूर्वीं रुग्णालय ही संस्था बद्धमूल झालेली होती, आणि त्यांत परिचर्येचें

काम स्त्रिया करीत. अशोकानें रुग्णालयें स्थापिलीं तीं नुसतीं माणसांकरितांच नसून पशूकरितांहि होतीं.

शस्त्रविद्येतील त्यांचें कौशल्यहि अजब होतें. बौद्धग्रंथांत आलेल्या शस्त्रक्रियाचातुर्याच्या कांहीं गोष्टी फारच आश्चर्यकारक आहेत. शल्यतंत्रांत एकंदर १२७ शस्त्रांचीं वर्णनें सापडतात. या शस्त्रांच्या साहाय्यानें मूतखडा काढणें, मृतगर्भ सोडविणें असले अवघड शस्त्रप्रयोग ते करीत. मेंदूवरहि शस्त्रक्रिया करीत. शस्त्रक्रियेला शवच्छेदनानें साक्षात् मिळविलेलें शारीरज्ञान अवश्य आहे. या साक्षाज्ज्ञानाविषयीं सुश्रुतकार कटाक्षानें लिहितो : 'शरीरे चैव शास्त्रे च दृष्टार्थः स्यात् विशारदः। दृष्टश्च ताभ्यां संदेहं अपोह्य आचरेत् क्रियाः ॥' रुधिराभिसरण हें पाश्चात्यांना सतराव्या शतकांतील हार्वेपर्यंत माहीत नव्हतें. तत्पूर्वी त्यांची कल्पना रुधिराची गति ही पुढेंमागें असावी अशी होती. ही गति चक्राकार आहे हें भारतीयांना माहीत होतें. मेंदु व मज्जातंतुमंडळ याविषयीं भारतीयांत तांत्रिक व योगी हे होऊन गेले, त्यांनीं शोध लावून मेरुदंड, इडापिंगळा, षट्चक्रें वगैरे महत्त्वाचें ज्ञान संपादलें.

भौतिक शास्त्रांत प्रयोगाचें महत्त्व पाश्चात्यांनाच तेवढें कळतें अशी पाश्चात्य घमेंड मारीत असतात. खुद्द त्यांचें प्रयोगविज्ञान गेल्या दोन शतकांतलेंच आहे. रॉयल सोसायटी प्रथम स्थापन झाली तेव्हां तत्त्वज्ञ हॉब्सनें स्थापकांची प्रयोगपंडित म्हणून थट्टा केली होती. आणि या स्थापकांमध्यें मोठा वादाचा विषय होऊन बसला होता कीं, जिवंत मासा वजनानें अधिक भरतो, कीं मेलेला अधिक भरतो! वस्तुतः यांत वाद कसला? कुठल्याहि काट्यांत टाकून वजनाचा प्रयोग केला असतां याचा निर्णय सहज लागला असता. पण प्रयोगाचें महत्त्वच कळलेलें नव्हतें. ही सतराव्या शतकांतील गोष्ट. उलट भारतीय रसायनशास्त्राला प्रयोगाचें महत्त्व यथातथ्य आकलन झालें होतें. तेराव्या शतकांतला रसेंद्रचिंतामणीकार रामचंद्र लिहितो कीं, "पूर्वाचार्यांनीं

सांगितलेल्या ज्या सिद्धान्ताचा पडताळा प्रयोगानें मीं स्वतः घेतलेला नाहीं असा कोणताहि सिद्धान्त मीं माझ्या ग्रंथांत लिहिला नाहीं. ज्यांना प्रयोग करतां येत नाहीं ते रससिद्ध नसून नुसते नट होत." तसेंच 'रसप्रकाश-सुधाकरा'चा कर्ता यशोधर लिहितो कीं, "या ग्रंथांत वर्णिलेल्या एकूणएक रासायनिक क्रिया मीं स्वहस्तें प्रयोग करून पाहिल्या व नंतरच वर्णिलेल्या आहेत. नुसती ऐकीव क्रिया यांत लेशहि नाहीं. 'स्वहस्तेन कृतं सम्यक् जारणं न श्रुतं मया'." या रसायन-शास्त्रांत अनेक तज्ज्ञांची बुद्धि व श्रम खर्ची पडले होते. 'रसरत्न-समुच्चया'च्या कर्त्यानें आपल्या ग्रंथांत २७ सिद्धांना नमन केलें आहे. या विद्येची तपस्या केवढ्या अनन्यभावानें केली जात असे हें नागार्जुनाच्या उद्गारांवरून कळून येतें. तो लिहितो कीं, "हे देवी सरस्वती, तुझ्या मंदिरांत मी सतत बारा वर्षें तुझी आराधना करीत आहे. तूं संतुष्ट झाली असलीस, तर रसायनाचें ज्ञान मला लाभूं दे." (रे–हिंदु रसायन, खंड २).

संस्कृत वाङ्मयांत पडलेलें आपल्या पूर्वजांच्या जीवनाचें हें प्रतिबिंब पाहिल्यावर आपले पूर्वज हे केवळ आशाळभूतपणें आकाशाकडे पाहत बसणारे व ऐहिक संसाराविषयीं उदासीन असणारे असे आंबटतोंडये, हिरमुसलेले लोक होते ही जी कल्पना पाश्चात्य पंडित आपणांपुढें मांडीत आहेत व जिचा उल्लेख मागें केला आहे ती किती धादान्त मिथ्या आहे हें सांगावयास पाहिजे काय ?

परकीयांनाच दोष द्यावयास नको. खुद्द आपणालाच आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचें विस्मरण पडलें आहे. अतएव, आठवण करून देण्याकरितां म्हणून आपल्या संस्कृतींतील दुर्लक्षित झालेल्या कांहीं घटना पुढील एक दोन प्रकरणांत आपणापुढें मांडतों. पैकीं समुद्रावर सफरी करणें हें पाप होय अशी ज्या आपल्या देशांत अलीकडे समजूत रूढ झाली आहे त्याच आपल्या देशांत आपल्या पूर्वजांनीं सर्व जगभर मुशाफरी केल्या होत्या व आपल्या संस्कृतीचा प्रसार केला होता या अभिमानास्पद भागाकडे आतां वळूं या.

# प्रकरण आठवें

# भारतीयांचा विश्वसंचार

आपल्या पूर्वजांनीं ऐहिक जीवनांत नाना रंग भरणाऱ्या हरएक शास्त्रकलांची कशी आणि किती कसोशीनें जोपासना केली हें आपण पाहिलें. आतां त्यांच्या उत्साहाला भरतखंड अपुरें पडून आजच्या पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणें धर्मप्रसार, व्यापारउदीम, वसाहती-स्थापना याकारणें त्यांनीं जग कसें पालथें घातलें याची थोडी माहिती करून घेऊं या.

आपल्या इतिहासाचा हा भाग जितका अभिमानास्पद आहे तितकेंच सुशिक्षितांमध्येंहि त्याचें ज्ञान अल्प आहे. कारण शाळा-कॉलेजांतील इतिहासाच्या क्रमिक पुस्तकांत या विषयाला योग्य तें स्थान अद्याप मिळावयाचें आहे. म्हणून आपल्या संस्कृतीची व परंपरेची यथार्थ कल्पना येण्याकरितां आपल्या पूर्वजांच्या विश्वसंचाराकडे ओझरती नजर टाकूं या. वाईट असें वाटतें कीं, ह्यूएनत्संग, इत्सिंग व फाहायन ह्या परकी चिनी प्रवाशांचीं नांवें चार क्रमिक पुस्तकें पढणाऱ्या पोरालाहि पाठ असतात; पण काश्यप, कुमारजीव, गुणवर्मा वगैरे भारतीय प्रवाशांचीं नांवें आपणांपैकीं फारच थोड्यांना परिचित आहेत. चिनी प्रवासी भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठीं येथें शिष्यवृत्तीनें आले त्यांचीं नांवें आम्हीं कंठगत केलीं, पण भरतखंडांतून चीनमध्यें धर्माचार्य या गौरवपूर्ण नात्यानें जाणाऱ्या आचार्यांच्या नांवांची दखलगिरी मात्र बाळगिली नाहीं. आजहि ह्या आचार्यांचीं नांवें व कामगिरी उपलब्ध झाली आहे ती परकीय चिनी इतिहास-कारांच्या कृपेनें!

## भारतीयांच्या समुद्रावरील सफरी

आक्रमणशीलत्वाला आज आपण इतकें पारखे झालों आहों कीं, आपले पूर्वज प्राचीन कालीं दर्यावरील मोठमोठ्या सफरी करून

आफ्रिका, अमेरिका, युरोप वगैरे सर्व जगभर व्यापाराकरितां, मुलूखगिरी करितां, धर्मप्रसाराकरितां हिंडत असत, असें कोणी मुद्दाम ओरडून सांगितलें तरी तें खरें न वाटावें! दीड-दोनशें वर्षांपूर्वी मराठे गडी सिंधुतीरावरील अटकेपर्यंत दौडत जात त्याची आठवण आपणांला आहे. तेव्हां अटक हीच आपली पराक्रमाची अटक वा मर्यादा होती. पण हिंदुस्थानच्या नैसर्गिक भौगोलिक मर्यादा ओलांडून समुद्रावरील लांबवरच्या सफरी आपण करीत होतों ही कल्पना देखील आज असंभाव्य वाटतें. आणि कां न वाटावी?

'द्विजस्याब्धौतु नौयातुः शोधितस्यापि संग्रहः' म्हणजे द्विजानें समुद्रयान केलें तर त्याचा शुद्धिसंस्कारानें पुनश्च पूर्व जातींत समावेश करणें हें कलिवर्ज्य होय असा आदित्यपुराणाच्या आधारें हेमाद्रीनें स्वच्छ शेरा मारिला आहे. आणि हा शेरा नुसत्या शास्त्रांतच न राहतां त्याची अमलबजावणीहि होई. फार वर्षांपूर्वीची गोष्ट नव्हे. तीस वर्षांपूर्वी म्हणजे १९१० सालीं श्री क्षेत्र काशी येथील रहिवासी व अगरवाल वैश्य जातींतील एक सुशिक्षित सद्गृहस्थ बाबू लक्ष्मीचंद ह्यांनीं उच्चशिक्षणाकरितां विलायतची यात्रा केली तेव्हां या पापाबद्दल त्यांना जातिबहिष्कृत करण्यांत आलें होतें. आणि या बहिष्कारांतून त्यांची सुटका झाली ती त्यांनीं अलाहाबाद हायकोर्टांत बहिष्कारवाद्यांवर अब्रूनुकसानीची फिर्याद केली व समुद्रयान हें शास्त्रनिषिद्ध नव्हे असा निवाडा न्यायासनावरून करून घेतला तेव्हां!

आम्हांलाच जेथें इतकी भूल पडली तेथें परकीयांना फुरंगट्या वृत्तीचे आम्ही जे भारतीय लोक ते लांबलांबच्या मुशाफरी करीत असूं हें खरें कसें वाटावें? सुमारें ४० वर्षांपूर्वी लिहितांना पाली पंडित ऱ्हिसडेव्हिडसचा तरी विश्वास बसेना. अशोकाच्या शिलालेखाचा त्यानें अभ्यास केला होता. या शिलालेखांपैकीं १३ व्या लेखांत लिहिलें आहे कीं, "प्रियदर्शीनें दयाधर्माचा प्रसार सर्वत्र केला आहे. सहाशें योजनें दूर, जेथें ग्रीकांचा राजा अँटिओकस राहतो तेथपर्यंत,

व तेथून त्याच्या उत्तरेला तुरमयो, मक, अंतिकिनी व अलिकसुंदरो हे चार राजे राहतात तेथवरहि केला आहे." अशोकाच्या या लेखावरून भरतखंडाबाहेर ग्रीसमध्यें त्याचे धर्मोपदेशक गेले होते हें स्पष्टच आहे. पण 'बुद्धकालीन भारत' या आपल्या ग्रंथामध्यें व्हिसडेव्हिडस लिहितो कीं, ग्रीकाचा हा उल्लेख म्हणजे नुसती पोकळ बादशाही फुशारकी असावी. त्याचे धर्मोपदेशक खरोखरच ग्रीसमध्यें गेले असतील असा संभव फार थोडा! (पृ. २९८).

पण अलीकडे भारतीयांच्या दर्यावर्दीपणाबद्दल इतका भरपूर पुरावा उपलब्ध झाला आहे कीं, तो आंधळ्यालाहि दिसावा. हा पुरावा वाङ्मय व शिल्पकला यांत ग्रथित असून तो थेट वैदिक काळापासून उपलब्ध होतो! प्राचीन वाङ्मयांत दर्यावरील मुशाफरीचे उल्लेख सर्वत्र विखुरलेले आहेत. वेद, रामायण, बृहत्संहिता, बौद्ध जातकें, रत्नावली, दशकुमार अशा भिन्न वाङ्मयप्रकारांची याबाबत साक्ष काढलीत तर सर्वांची साक्ष अशीच पडेल कीं, भारतीय लोक हे दर्यावर्दीपणांत निष्णात होते. समुद्रयान निषिद्ध ठरलें गेलें तें फार उत्तरकालीं. सर्व धार्मिक वाङ्मयाचें मूलस्थान जें वैदिक वाङ्मय त्यांत समुद्रयानाचा निषेध मुळींच नाहीं; उलट ऐतरेय ब्राह्मण यामध्यें अमुक भूमि पवित्र आणि अमुक अपवित्र असें न सांगतां सर्व पृथ्वी हीच वेदीप्रमाणें पवित्र होय असें वर्णन आलें आहे. एष उर्वी एव स भूम्यन्तः यद् वेद्यन्तः ॥(१-५-१०). खुद्द ऋग्वेदांत तर ७ व्या मंडलामध्यें वशिष्ठ व वरुण हे नावेंत बसून चालले आहेत अशा प्रकारचे उल्लेख आहेत. वशिष्ठं ह वरुणो नाव्याधात्। ऋषिं चकार– स्वपामहोभिः। (सूक्त ८८). तसेंच ऋग्वेदामध्यें तुर्गाचा पुत्र भुज्यु याचें जहाज फुटलें तेव्हां शंभर वल्ह्यांनीं युक्त असलेल्या नावेमध्यें अश्विनांनीं त्याला उचलून घेतले असें वर्णन आहे. उपनिषदांतील 'प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपाः' हा नावेचा दृष्टान्त प्रसिद्ध आहे. रत्नावली नाटकांतील नायिका ही सीलोनची राजकन्या असून ती जहाजांतून सफर करीत

असतां जहाज फुटलें व कांहीं व्यापाऱ्यांनीं तिला आपल्या जहाजांतून भरतखंडांत आणलें असा त्या नाटकाचा कथाभाग आहे. दशकुमार-चरितांत समुद्रावरील सफरीच्या अनेक गोष्टी आहेत. आंध्र लोकांत दर्यावर्दीपणा विशेष पुढारलेला होता. त्यांच्या कित्येक नाण्यांवर जहाजांचीं चित्रें कोरलेलीं आहेत.

जातककथांमध्यें दर्यावर्दीपणाचे उल्लेख अनेक आहेत. बावेरू जातक नांवाच्या जातकांत हिंदी व्यापारी बावेरूला मोर घेऊन चालले आहेत असें वर्णन आहे. बुल्हरच्या मतें बवेरू म्हणजे बाबिलोनिया होय. त्यावरून इराणी आखातांत व्यापारी जहाजें जात असावींत. किनाऱ्याच्या लगतचा प्रवास चालू असतां दिशाकाकांचा (कावळ्यांचा) उपयोगहि करीत असत. लसक जातक, दधिवहन जातक यांमध्यें समुद्रांत जहाजें बुडाल्याचा उल्लेख आहे. सुप्पारक जातकामध्यें एक आंधळ्या दर्यासारंगाची कथा आहे. भरुकच्छच्या श्रेष्ठींनीं त्याला आपल्या जहाजाचा कप्तान नेमलें होतें. या जहाजावर सातशें माणसांची सोय होती! समुद्दवनिज जातकामध्यें सांगितलें आहे कीं, वाराणशीच्या कांहीं सुतारांच्याजवळ कर्ज वारण्यास पैसे नव्हते म्हणून त्यांनीं एक मोठें जहाज बांधलें व आपल्या बायकांमुलांसह त्यांतून प्रयाण केलें. मणिमेखला नांवाची समुद्राची देवताहि मानीत.

## नौकाबंधन

दर्यावरील या मुशाफरी भरतखंडांत बांधलेल्या नौकांतूनच होत. या नौका कशा बांधीत, केवढ्या बांधीत, याची तपशीलवार माहिती देणारा एक ग्रंथहि अलीकडे छापून प्रसिद्ध झाला आहे; तो म्हणजे अकराव्या शतकांतील भोज नृपतीच्या नांवावर असलेला 'युक्तिकल्पतरु' हा होय. या ग्रंथांत नौकांस लाकूड कोणतें वापरावें, लोखंडी खिळ्यांचा उपयोग कसा टाळावा, जहाज शृंगारण्याकरितां सुवर्ण,

रजत व ताम्र या धातूंचाच कां उपयोग करावा, त्याच्या मुखाला सिंह, गज, सर्प, व्याघ्र असे आकार कसे द्यावे, जहाजांना एकपासून चारपर्यंत शिडें असतील त्याप्रमाणें त्यांना निळा, पिवळा, तांबडा व पांढरा हे रंग कसे द्यावे, राजाचा झनाना व खजिना नेण्याकरितां 'सर्वमंदिरा' म्हणजे सर्व छावलेली, जलविहाराकरितां 'मध्यमंदिरा' व लढाईकरितां 'अग्रमंदिरा' नौका कशी वापरीत याची माहिती दिलेली आहे. नौकांचे नदीवरील व समुद्रावरील सफरीच्या अनुरोधानें सामान्य व विशेष भेद करून त्यांच्या लांबी, रुंदी, उंचीचीं प्रमाणेंहि दिलेलीं आहेत. या नौकांना नांवें दिलेलीं आहेत तींहि चपला, गर्भरा, मंथरा, लोला, प्लाविनी अशी अभिजात अभिरुचीचीं निदर्शक आहेत :

क्षुद्राथ मध्यमा भीमा चपला पटलाऽभया।
दीर्घा पत्रपुटाचैव गर्भरा मंथरा तथा।
नौकादशकमित्युक्तं राजहस्तैरनुक्रमम् ॥ ८१ ॥

ग्रंथांतील वर्णनाशीं संवादी अशीं नौकांचीं चित्रेंहि सापडतात. अजिंठा लेण्यांतील कुमारविजय हा सिंहलद्वीपांत नौकेंतून जात आहे हें चित्र सुप्रसिद्ध आहे. याच लेण्यांत अग्रमंदिरा व मध्यमंदिरा पद्धतीच्या नौकांचीं दोन चित्रें आढळतात. सांची येथील स्तूप व कान्हेरी लेणीं येथेंहि नौकांचीं चित्रें खोदलेलीं आहेत. जगन्नाथपुरीच्या देवळांत मध्यमंदिरा-पद्धतीची नाव शिलेवर खोदलेली आहे.

समुद्रनिषेधाचा नियम बऱ्याच उत्तरकालीं रूढ झाला असावा.

मनुस्मृतीचा सुप्रसिद्ध टीकाकार मेधातिथि याच्या काळापर्यंत तरी परदेशगमननिषेधाची पकड भारतीयांच्या मनावर बसलेली दिसत नाहीं. मनुस्मृतीमध्यें मनु प्रतिपादन करतो कीं, हिमालय आणि विंध्य यांच्यामधला प्रदेश जो आर्यदेश त्या देशांतच द्विजातींनीं शक्यतोंवर वस्ती करावी. या मर्यादेबाहेरील देश तो म्लेंच्छदेश

होय. त्या देशांत द्विजातांनीं कदापि जाऊं नये. यावर मेघातिथि लिहितो कीं, मनूच्या आर्यावर्ताच्या वरील मर्यादा भावार्थानेंच घेतल्या पाहिजेत. एखाद्या आर्यराजानें म्लेंच्छांचा पराभव करून तेथें चातुर्वर्ण्य सुरू केलें व तेथील म्लेंच्छांना चंडाळाच्या हीन स्थितिप्रत आणून सोडलें तर तो देशहि यज्ञदेश होईल. कारण कोणताहि प्रदेश मूलतः यज्ञीय किंवा अयज्ञीय असा नसतो. त्या प्रदेशावर ज्याचें राज्य असेल त्याच्या आचाराप्रमाणें तो यज्ञीय किंवा अयज्ञीय ठरेल. ( यदि कश्चिद् क्षत्रियः द्विजातियः राजा म्लेंच्छान् पराजयेत् । चातुर्वर्ण्यं वासयेत् म्लेंच्छां च आर्यावर्ते इव चाण्डालान् व्यवस्थापयेत् तदा सोऽपि स्यात् यज्ञीयो देशः । ) मेघातिथीच्या पूर्वीच्या वाङ्मयांत राजाच्या दिग्विजयाचें वर्णन करतांना ते द्वीपांतरावर स्वाऱ्या करीत असेंच वर्णन आढळतें. रघुवंशामध्यें दशरथ राजाचें वर्णन केलें आहे तें 'अष्टादशद्वीपनिखातयूपः' म्हणजे अठरा द्वीपांत दिग्विजय करून ज्यानें सर्वत्र यज्ञस्तंभ उभारले अशा प्रकारचें केलें आहे.

धर्मशास्त्रकारांनीं पुढील कालांत नौकानयनाच्या निषेधाचा जो नियम घालून दिला आहे तो मुख्यतः ब्राह्मणांपुरताच असावा. नौकानयनविद्या ही अजी लुप्त झाली होती असा प्रकार कोणत्याच कालखंडांत आढळून येत नाहीं. नौकानयनविद्येची परंपरा पाहिली तर, वेदकाळापासून तों तहत् इंग्रजी अमलापर्यंत ती अव्याहत अविच्छिन्न अशी सापडते. पृथिवीप्रदक्षिणा करणारा पाश्चात्य प्रवासी मॅग्डालेन याच्या जहाजावर श्री भोज नांवाचा एक हिंदु होता असा उल्लेख आढळतो. मुसलमानी रियासतींतहि आरमाराकडे दुर्लक्ष झालेलें नव्हतें. अबुलफजल यानें लिहिलेल्या 'ऐने अकबरी' ग्रंथांत आरमार खातें हें एक स्वतंत्र खातें असे असें सांगून, त्याचें सविस्तर वर्णनहि त्यानें दिलें आहे. शिवाजीचेंहि आरमाराकडे दुर्लक्ष नव्हतें. त्यानेंहि विजयदुर्ग, सिंधुदुर्ग अशा ठिकाणीं गोद्या तयार करून स्वतंत्र आरमाराची उभारणी केली होती. मराठ्यांच्या आरमारांत आंग्रे

आणि धुळप यांनीं अव्वल दर्जाचा पराक्रम गाजविलेला प्रसिद्ध आहे. या आरमाराकरितां लागणारीं निरनिराळीं जहाजें हीं सर्व येथल्या येथेंच बांधलीं जात असत आणि तें बांधकाम इतकें खंबीर व टिकाऊ असे कीं, इंग्रजलोकहि एके काळीं आपलीं जहाजें सुरत व मुंबई येथून बांधवून घेत !

१७३५ च्या सुमारास मुंबईस चांगलीशी गोदी नव्हती. तेव्हां जहाजें सुरतेहून बांधून आणीत. सुरतला त्या वेळीं धनजीभाई नांवाचे एक पारशी गृहस्थ या कामांत तरबेज होते. यांच्याच कारखान्यांतील मुख्य कारागीर लवजी नसरवानजी यास मुंबईच्या त्या वेळच्या गव्हर्नरनें मोठी मनधरणी करून बोलावून घेतलें व त्यानेंच नंतर मुंबईस येऊन मुंबईच्या दोन-तीन गोद्या बांधल्या. लवजी १७७४ मध्यें मृत्यु पावला. पण त्याच्या मागून त्याच्या कारखान्याची भरभराट वाढतच गेली. पुढें ह्या कारखान्यांत कॉर्नवॉलिस नांवाचें एक पन्नास तोफांचें लढाऊ जहाज इतकें उत्तम बांधलें गेलें कीं, १८०२ मध्यें इंग्लंडमधील आरमारखात्याच्या प्रधानमंडळानें असें ठरविलें कीं, खुद्द इंग्लंडमधील लढाऊ जहाजेंहि मुंबई येथेंच बांधवावींत! हा कारखाना १८२९ पर्यंत चांगलाच भरभराटींत होता. १८२९ मध्यें मुंबई येथें पहिली स्टीमर बांधण्यांत आली. आणि त्यानंतर आगबोटींचें युग सुरू होऊन सर्व गाडें पालटलें आणि जहाजें बांधण्याची कला लवकरच नामशेष झाली! (इतिहाससंग्रह)

## धर्मप्रसारार्थ परदेशपर्यटन

याहिपेक्षां अधिक अभिमानास्पद बाब म्हणजे परदेशांतील धर्मप्रसाराची व भारतीयांनीं वसविलेल्या वसाहतींच्या इतिहासाची. या वसाहती पृथ्वीवरील सर्व खंडांत पसरलेल्या होत्या; आणि इंग्रजी साम्राज्याच्या वैभवाचें वर्णन करितांना त्याच्यावर सूर्य मावळत नाहीं असें जें वर्णन आज केलें जातें तसेंच नेमकें वर्णन प्राचीन भारताचें

करतां आलें असतें. दुर्दैव मात्र असें कीं, या उज्ज्वल इतिहासाची भारतीय वाङ्मयानें स्मृति जागविली नाहीं !

परकीयांच्या इतिहासांत ही कामगिरी नमूद झाली नसती, तर भारतीय लोक संस्कृतिप्रसारार्थ समुद्र ओलांडीत किंवा अन्य देशांत वसाहत करीत ही कल्पना आकाशपुष्पाप्रमाणें असंभवनीय म्हणून त्याज्य मानावी लागली असती ! सुदैवानें भारतीयांच्या ह्या संस्कृति-प्रसाराची व वसाहतीकरणाची माहिती अलीकडे उपलब्ध झाली आहे. १८८७ मध्येंच म्हणजे सुमारें ५४ वर्षांपूर्वीच डॉ. भांडारकर यांनीं जावा बेटांतील शिलालेखांवरून जावा, कम्बोडिया, पॉलि-नेशिया वगैरे वसाहतींचें वर्णन केलें होतें. त्या वेळीं संशोधन फारच अल्प झालेलें होतें. गेल्या पन्नास वर्षांत या क्षेत्रांत पुष्कळ संशोधन झालें आहे. त्याचें मुख्य श्रेय फ्रेंच व डच पंडित यांना आहे. या भाषांशीं हिंदी सुशिक्षितांचा परिचय अल्प असल्यानें हेंहि संशोधन बहुजन सुशिक्षित वर्गास अज्ञातच होतें. पण अलीकडे बंगालमधील ‘बृहत्तर भारत’ संस्थेनें हें संशोधन इंग्रजींत उपलब्ध केल्यानें तें सामान्य सुशिक्षिताच्याहि आवाक्यांत आलें आहे. या लिखाणाच्या मदतीनें भारतीयांनीं आपल्या संस्कृतीचा प्रसार कसा केला ह्याची थोडी कल्पना आणून घेऊं या.

## चीनमधील धर्मप्रसार

आपल्या पूर्वजांच्या या संस्कृतिप्रसाराच्या कार्यावर नजर फिरविणें मोठें उद्बोधक आहे. हे संस्कृतिप्रसारक दोन तऱ्हेचे होते. एक धर्म-प्रसारक व दुसरे वसाहत करून स्थायिक होणारे नागरिक वा व्यापारी. बौद्धधर्म शिकविण्याकरितां हिंदुस्थानची सफर करणाऱ्या चिनी प्रवाशांचीं नांवें सर्वांच्या परिचयाचीं झालीं आहेत. पण बौद्धधर्माचा प्रसार करण्याकरितां हिंदुस्थानांतून चीनमध्यें जाणाऱ्या धर्मप्रसारकां-च्या नांवांना पुरेशी प्रसिद्धि अद्याप मिळालेली नाहीं. म्हणून प्रथम

चीनमधील ह्या धर्मप्रसारकांचेंच कार्य पाहूं. चिनी ग्रंथकारांनीं यासंबंधीं विस्तृत माहिती लिहून ठेवून आपणांवर मोठे उपकार केले आहेत. त्यांनीं ह्या धर्मप्रसारकांसंबंधानें जी माहिती लिहून ठेविली आहे ती पाहतां उगीच चारदोन धर्मप्रसारक चीनमध्यें गेले असें नसून या धर्मप्रसारकांचा एक अखंड प्रवाह सुमारें दहा शतकें अव्याहत वाहत होता असें आढळून येतें! या प्रवाहास सुरुवात इसवी सनाच्या सुरुवातीस झाली, व तो दहाव्या शतकापर्यंत अखंड वाहतांना दिसतो. त्यानंतर बौद्धधर्माची मायभूमि जी हिंदुस्थान तेथेंच बौद्धधर्म वठूं लागला व त्याचा शाखाविस्तार इतरत्र होणें बंद पडलें.

हे धर्मप्रसारक चीनमध्यें प्रथम गेले ते तेथील राजाच्या विनंती-वरून व सन्मानपूर्वक निमंत्रणावरून गेले. त्याचा प्रकार असा झाला कीं, इ० सनाच्या पहिल्या शतकांतील चीनचा राजा मिंग याला एके रात्रीं एक चमत्कारिक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत त्यानें एक उंच, धिप्पाड व सुवर्णकांतिमान् असा पुरुष आकाशमार्गानें संचार करीत आपल्याच प्रासादांत शिरत आहे असें पाहिलें. सकाळ होतांच राजानें आपल्या प्रधानास विचारलें, "या प्रकाराचा अर्थ काय?" त्यावर प्रधानानें सांगितलें कीं, "भारतवर्षांत फो नांवाचा एक सिद्ध-पुरुष जन्मास आला आहे. त्याचा देह अंतरिक्षांत संचार करीत असतां आपण पाहिला असला पाहिजे." प्रधानाचें हें उत्तर ऐकून राजाला बुद्धधर्माचा अभ्यास करण्याची उत्कंठा लागली, व त्यानें तावडतोब आपल्या पदरच्या कांहीं पंडितांना बौद्धधर्माचा अभ्यास करावयास भारतवर्षांत रवाना केलें. या पंडितांच्या विनंतीवरूनच बौद्धप्रचारक चीनमध्यें जाण्यास प्रारंभ झाला. ही हकीकत अशाच स्वरूपांत निर-निराळ्या तेरा चिनी ग्रंथांत आढळते असें तज्ज्ञांनीं लिहिलें आहे.

## पहिला बुद्धधर्मप्रचारक काश्यप

चिनी राजाचें निमंत्रण स्वीकारून धर्मप्रसारार्थ चीनमध्यें जाणारा

पहिला धाडसी धर्मोपदेशक काश्यप मातंग हा होय. तो मग-प्रदेश-वासी श्रमण असून चीनच्या राजाचें निमंत्रण आलें तेव्हां गांधारांत म्हणजे आधुनिक अफगाणिस्थानच्या प्रदेशांत राहत होता. चीनच्या राजाचें निमंत्रण स्वीकारून अफगाणिस्थान-तिबेटमार्गें चीनकडे प्रवास करणें हें त्या काळीं धाडसाचेंच कृत्य होतें. प्रवासाचीं साधनें त्या काळीं हल्लींच्या मानानें अगदीं अल्प, ज्या मार्गानें प्रवास करावयाचा तो मार्ग डोंगराळ व वाटेंत गोबीचें प्रचंड रण तुडवावयाचें ! दहाबारा मंडळी मिळून निघाली तर मुक्कामास पोंचे-पर्यंत त्यांपैकीं अर्धी मृत्युमुखीं पडत, असें अनेक चिनी प्रवाशांनीं लिहून ठेवलेल्या वृत्तान्तावरून दिसतें. डोंगर चढावे लागत, दऱ्या ओलांडाव्या लागत, नद्यांना पूल नसत, निरानिराळ्या हवामानाचे तडाखे सोसावे लागत. पण काश्यप डगमगला नाहीं. त्यानें हा अवघड प्रवास मोठ्या खुषीनें स्वीकारला व चिनांत बौद्धधर्माचा प्रसार करण्याचा पहिला मान मिळविला ! राजानें त्याचा यथोचित मानसन्मान केला. त्याला राहण्याला एक स्वतंत्र मठ बांधून दिला व अनेक पंडितांना त्याचें शिष्यत्व स्वीकारण्यास सांगितलें.

ज्या देशांत धर्मप्रसार करावयाचा त्या देशाची भाषा हस्तगत करणें ही धर्मप्रसारकाच्या कार्यांतील महत्त्वाची व अवघड कामगिरी होय. त्यांत पुन्हा चिनी भाषा ही सोपी नाहीं असें म्हणतात. पण काश्यपानें थोडक्याच कालांत ती हस्तगत केली व बौद्धग्रंथांतील कांहीं भागांचें चिनीमध्यें भाषांतर करण्यास जोरांत सुरुवात केली. हें काम करीत अनेक वर्षें तो तेथें राहिला व शेवटीं उतारवयांत बौद्ध धर्माची घडी नीट बसलेली अवलोकून सुखासमाधानानें तेथेंच त्यानें देह ठेविला !

काश्यपाच्या मागें प्रसाराचें काम त्याच्याबरोबरच तेथें गेलेला धर्मरक्ष यानें चालू ठेविलें. याची धर्मप्रसारलालसा मोठी तीव्र होती. कारण तो चिनांत गेला तोच मुळीं, ज्या राजाच्या पदरीं तो होता, त्याच्या मर्जीविरुद्ध ! राजाची अनुमति मिळवितां येत नाहीं असें

आढळून आल्यावर त्यानें गुप्त रीतीनें राजधानी सोडली, चीनचा रस्ता धरला व आपली धर्मप्रसाराची मनीषा पूर्ण करून घेतली. काश्यप आणि धर्मरक्ष यांनीं चीनमध्यें जी उत्कृष्ट कामगिरी बजावली त्यामुळें बुद्धधर्मानें तेथें कायमचें मूळ धरलें व भारतवर्षांतील बौद्ध-धर्मप्रचारकांना चीनच्या राजाकडून वारंवार निमंत्रणें येत गेलीं. त्या निमंत्रणानुरूप चीनमध्यें जाणारा एक अखंड प्रवाह सुमारें दहा शतकें अव्याहत राहिला.

काश्यप व धर्मरक्ष हे चीनमध्यें गेले ते मिंग राजाच्या कारकीर्दींत म्हणजे इसवी सनाच्या पहिल्या शतकांत. त्यानंतर तिबेटी ग्रंथां-वरून पाहतां दुसऱ्या शतकांत आर्यकाल, सुविनय, धर्मकाल, महाबल वगैरे अनेक प्रचारकांनीं चीनची यात्रा केलेली आढळते. हिंदुस्थानप्रमाणें तिबेटमधूनहि चीनमध्यें उपदेशक जात, त्यांत एक उपदेशक तेथील प्रधानाचा पुत्र होता. खुद्द राज्यपदावर लाथ मारून श्रमण होणारेहि क्वचित् चमकतात. त्यांत काश्मिरांतील गुण-वर्मा याचें नांव घेतां येईल.

हे उपदेशक चीनमध्यें जाण्यापूर्वीं म्हणजे बुद्धधर्माचा चीनमध्यें संस्थापक होण्यापूर्वीं तेथें कनफ्यूशियसचा जुना धर्म प्रचलित होताच. त्या धर्माच्या आचार्यांना या परदेशांतून येऊन मोठ्या मान्यतेस पाव-लेल्या उपरी बौद्धश्रमणांविषयीं मत्सर वाटावा हें अस्वाभाविक नव्हतें. खुद्द राजघराण्यांतहि दोन तट असत. कधीं जुन्या धर्माचा अभि-मानी राजा तख्तनशीन असे, तर कधीं बौद्धधर्मानुयायी सिंहासनावर असे. अर्थात् सनातनी राजा गादीवर आरूढ झाला कीं, बौद्धगुरूंची राज्यांतून हकालपट्टी होई; व त्यांना पुनश्च राज्यक्रांतीची वाट पाहत आजूबाजूच्या प्रदेशांत कष्टानें कालकंठन करावें लागे. म्हणजे हिंदु-स्थानांतून जातांना कित्येकांना मानसन्मानानें जाण्याचें भाग्य लाधे. तरी तो मानसन्मान कायम टिकेल याविषयीं खात्री नसे. चीनमध्यें राज्यक्रांत्याहि वरचेवर होत. अशा वेळीं परदेशांत मोठ्या मानखंडनेनें

जीवित कंठण्याचा प्रसंग येई. अर्थात् हे जे बौद्धश्रमण चीनमध्यें जात ते त्यांची धर्मश्रद्धा जाज्वल्य होती म्हणून जात; आणि याच कारणानें वरील परिस्थितीची जाणीव असतांहि एकामागून एक जाणाऱ्या प्रवाशांची परंपरा अखंड राहिली.

या उपदेशकांत जे कांहीं विशेष बुद्धिमान् व कर्तबगार होते त्यांत चौथ्या शतकांतील **कुमारजीव** याची गणना होते. हा चीनमध्यें गेला तो मोठ्या अकल्पित दैवघटनेनें. झालें असें कीं, मध्यआशियांतील खोतान प्रांतांत तो राहत असतां चीनच्या राजानें त्या प्रांतावर स्वारी केली व तो प्रदेश जिंकून अनेक बंदिवान धरून चीनला नेले. राजाला कल्पनाहि नसेल, कीं या बंदिवानांत एक असा बंदिवान होता, कीं जो आपणांसच आपल्या धर्मप्रेमानें बंदिवान करून सोडील! हा बंदिवान म्हणजे प्रख्यात पंडित कुमारजीव हा होय. याच्या उपदेशाची पद्धत इतकी मोहक होती कीं, थोड्याच काळांत त्याची शिष्यसंख्या हजारावर गेली! प्रसिद्ध चिनी प्रवासी फाहायन हा याच्या शिष्यांपैकींच एक होय. कुमारजीवानें चिनी भाषेवर इतकें अप्रतिम प्रभुत्व मिळविलें कीं, खुद्द चिनी ग्रंथकार लिहितात कीं, प्रसिद्ध चिनी भाषांतरकार ह्यूएनत्संग यांच्याहीपेक्षां कुमारजीवाचीं भाषांतरें सरस होत. आणि मौज अशी कीं, कुमारजीव याची मातृभाषा पाली किंवा संस्कृत यांपैकीं कोणतीच नसून खोतानी होती.

वर उल्लेख केलेला काश्मीरचा गुणवर्मा हाहि याच शतकांत चीनमध्यें गेला. काश्मीरचा राजा निपुत्रिक निवर्तल्यावर राजाचा नातेवाईक म्हणून गादीवर बसण्याविषयीं प्रधानमंडळानें गुणवर्म्याला विनंति केली. पण आलेली राज्यलक्ष्मी लाथाडून त्यानें श्रमणवृत्तीचा अंगीकार केला. तो प्रथम सीलोनमध्यें गेला. तेथून जावा बेटाकडे त्यानें प्रयाण केलें. जावांतील त्याच्या कामगिरीची कीर्ति ऐकून चीनच्या राजानें त्याला आणण्याकरितां कांहीं श्रमणांचें एक शिष्टमंडळ जावाकडे रवाना केलें.

हें शिष्टमंडळ जावाला पोंचण्यापूर्वीच गुणवर्म्यानें जावा सोडून दुसरीकडे प्रयाण मांडलें होतें. पण दैववशात् त्याची नौका तुफानांत सापडून भरकटली ती नेमकी चीनच्या किनाऱ्यालाच लागली! चीनमध्यें त्यानें एक नवीन उपक्रम सुरू केला. तो म्हणजे भिक्षुणींचा संघ स्थापणें हा होय. त्यानें धर्मप्रसारकाचें काम करीत सर्व शेष आयुष्य तेथेंच वेचलें.

याच्यामागून धर्मरुचि, रत्नमति, बुद्धशान्त वगैरे अनेक श्रमण चीनमध्यें गेल्याचा दाखला आढळतो; व हें प्रयाण अकराव्या शतकापर्यंत अखंड सुरू होतें. पहिल्या शतकांत सुरू झालेल्या व अकराव्या शतकापर्यंत अविच्छिन्न चालू राहिलेल्या या धर्मयात्रेंत जे अनेक धर्मोपदेशक निरनिराळ्या शतकांत सामील झाले त्यांपैकीं कांहीं प्रमुखांचीं नांवें फणींद्र बोस यांनीं दिलीं आहेत, त्यांची संख्याच साठांच्या वर गेली आहे! ( Indian Teachars in China )

## ब्राह्मणांची कामगिरी

कोणी म्हणेल कीं, हे सर्व प्रचारक बौद्ध होत. बौद्धधर्मानें परदेश-गमनाविरुद्ध कधीं नियम घातलेच नव्हते व हिंदु सनातनी धर्माची संकुचित मनोवृत्ति त्यांनीं स्वीकारलीच नव्हती. अर्थात् संस्कृतीची कावड देशांतरांत वाहण्याची बिकट कामगिरी शिरावर घेतली ती सनातनी धर्म झुगारून देणाऱ्या बौद्धांनींच घेतली ना? सनातन्यांना तर यांतील कांहीं श्रेय घेतां येत नाहीं ना? या प्रश्नाचें अभिमानपुरस्सर उत्तर देण्याइतकी ऐतिहासिक माहिती उपलब्ध आहे. तें उत्तर हेंच कीं, सनातनीयांनींहि बौद्धांइतकाच संस्कृतिप्रसाराचा उत्साह जागविला. बौद्धांचें अनुकरण म्हणून नव्हे, तर बौद्धांच्या वेळींच म्हणजे खिस्ती शतकाच्या सुरुवातीपासूनच संस्कृतिप्रसारास त्यांनींहि सुरुवात केली. नुसता धर्मप्रसार करूनच समाधान न पावतां कायमच्या वसाहती स्थापन केल्या. आणि सर्वांत आश्चर्य वाटण्या-

सारखी गोष्ट म्हणजे परदेशगमनाचा निषेध ज्या वर्णास विशेष कडक रीतीनें लागू होता त्या **ब्राह्मण जातीनेंच या वसाहतीकरणांत प्रमुख भाग घेतला!**

## पूर्वेकडील वसाहती

या वसाहती ज्याला पूर्वेकडील द्वीपकल्प म्हणतात त्या व त्याच्या आसपासचा प्रदेश व बेटें म्हणजे जावा, सुमात्रा, बालि, चंपा, कंबोडिया वगैरे देशांतील वसाहती होत. चौदाव्या शतकानंतर हा प्रदेश कांहीं काल इस्लामी संस्कृतीच्या अमलाखालीं होता व अलीकडे ख्रिस्ती युरोपियन अमलाखालीं आला आहे. यामुळें एके काळीं तेथें हिंदी संस्कृति नांदत असेल अशी शंकाहि येण्याचें कारण नव्हतें. पण बाह्यतः नष्टप्राय झालेली ही जुनी संस्कृति शिलालेख व वाङ्मय यांत दडून कसाबसा काळ कंठीत जिवंत राहिलेली होती. प्रभु रामचंद्राच्या आगमनाकडे दृष्टि लावून बसलेल्या अहल्येप्रमाणें ती शिलाबद्ध झालेली होती. सूक्ष्म दृष्टीच्या पंडितांचा रामस्पर्श होतांच तिचें शिलारूप जाऊन ती मूळच्या वैभवांत आतां दिसूं लागली आहे. अद्याप तेथें पुनश्च पूर्वीच्या ऐश्वर्यानें नांदण्याचे दिवस आले नसले तरी, अल्लाउद्दिनाला पद्मिनीचें रूप आरशांत देखतां आलें तसें तिचें पूर्व ऐश्वर्य शिलालेख व वाङ्मय यांच्या दर्पणांत स्पष्ट उमटलेलें आज पाहावयास सापडत आहे. कांहीं अवशेष तर आजहि टिकून आहेत. कंबोडियांत राजाला अभिषेक होता तो आजहि जुन्या वैदिक पद्धतीप्रमाणें होतो. बाकू नांवाचे लोक आजहि आपणांस ब्राह्मण लोकांचे वंशज म्हणवितात. सयाममधील संस्कृति ही ब्राह्मणी संस्कृति म्हणूनच ओळखली जाते. सयामच्या पूर्वेस असलेल्या कम्बोडियांत धार्मिक संस्कार अद्यापिहि ब्राह्मण करतात. गांवांचीं नांवें आजहि अयोध्यापूर, कांचीपुरी, धर्मनगरी अशा स्वरूपांत आढळतात.

पण वैदिक सनातनीयांनीं वसविलेल्या या वसाहतींचें खरें स्वरूप मुख्यतः वाङ्मय व शिलालेख यांच्या तोंडूनच समजून घेतलें पाहिजे. सयामच्या राष्ट्रीय वाचनालयांत पांच हजार संस्कृत ग्रंथ आहेत म्हणे! यावरून साधनवैपुल्याची कल्पना येईल. हें वसाहतीकरण हा प्राचीन भारतीय इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग होय. या वसाहतीकरणाचा व आक्रमणाचा मुख्य विशेष म्हणजे हें आक्रमण, तारतम्यानें बोलावयाचें तर, सांस्कृतिक आक्रमण होतें हा होय. पूर्वेकडील बेटांत व द्वीपकल्पांत वैदिक आर्यांनीं वसाहत केल्यानंतर या वसाहतींचा, व मायभूमि जी भरतभूमि यांचा, फारसा संबंध उरला नाहीं. इतर देशांतील वसाहतीकरण पाहिलें असतां त्याचें पर्यवसान मुख्यतः मायदेशाला पोसण्यांत होत आलेलें दिसून येतें. दुसऱ्या देशांत जावें, तेथील मूळ रहिवाशांना समूळ नष्ट करावें किंवा गुलाम करून सोडावें व व्यापारी रीत्या देश धुऊन लुटून न्यावा ही आजच्या पाश्चात्य वसाहतीकरणाची रीत होय. पण प्रस्तुतच्या वसाहतीकरणाचा प्रकार हा सामान्यतः कन्या सासरीं जाऊन नांदती होण्यासारखा होता. कन्या सासरीं नांदत असलेली पाहण्यांतच आईबापांस आनंद होत असतो. तिच्यापासून ते कांहीं अपेक्षा ठेवीत नाहींत. तिचा संबंध उरतो तो, ती होऊन कधींमधीं माहेरीं येईल व आपल्या भावंडांना खाऊ देईल तेवढाच. असाच प्रकार येथें होता. वसाहतींतील कांहीं राजेंद्रांनीं मायभूमींत कांहीं धर्मादाय केलेला आढळतो. कडार किंवा श्रीभोज येथील अकराव्या शतकांतील चूडामणिवर्मन् यानें चोल राजाच्या परवानगीनें नेगापट्टण येथें एक विहार बांधला व त्याचा पुत्र मार विजयोत्तुंगवर्मन् यानें दोन गांवें विकत घेऊन विहाराला लावून दिलीं असा तामीळ वाङ्मयांत उल्लेख सापडतो. तसेंच नालंद येथील सुप्रसिद्ध विद्यापीठास चंपाधीशानें कांहीं गांवें लावून दिलीं होतीं, अशाविषयीं बंगालचा राजा बालादित्य याचा शिलालेख उपलब्ध आहे. चंपा-

देशचा एक राजा गंगाराज यानें राजपदाचा त्याग करून मायभूमीस येऊन गंगातटाकीं देह ठेविला अशाविषयीं चंपा येथील लेख साक्ष देत आहे.

भरतखंडांतून या वसाहतींत मधून मधून विद्वान् ब्राह्मण व व्यापारी जात व त्यांच्याकरवीं दोन देशांतील दळणवळण चालू राही. हजार दीड हजार वर्षें हें दळणवळण सुरू होतें. एवढ्या दीर्घ कालांत नेहमींच व्यवहार सुरळीत चालणें अशक्यच. अर्थात् एकदोनदां खटके उडालेले दिसतात. वसाहतीचा हा प्रदेश एकीकडे बंगाल व दुसरीकडे मद्रास या प्रांतांशीं निकट आहे. यामुळें या दोन प्रदेशांशीं त्यांचा संबंध विशेष येई. त्याचा परिणाम म्हणून कांहीं कटकटी उत्पन्न होत असाव्यात. उदाहरणार्थ, नेगापट्टण येथें विहार बांधणाऱ्या श्रीभोज देशच्या राजावर उल्लेख केला, त्याच्या पुत्रावर दक्षिणेंतील चोलराजा राजेंद्र यानें स्वारी केल्याचें तामीळ ग्रंथीं नमूद आहे. उलट बंगालमध्यें दिनापूर जिल्ह्यांतील एका मंदिरलेखांत (सन ९६६) कंबोजान्वय गौडराजानें चंद्रमौलीचें मंदिर बांधलें असा मजकूर आहे. त्यावरून कंबोडियाच्या राजानें बंगालचा पूर्वोत्तरभाग जिंकला असावा असें अनुमान काढलें जातें. हे दोन प्रसंग सोडले तर मायलेकींचे संबंध नीट असावेत असें दिसतें. मधून मधून विद्वान् ब्राह्मण या वसाहतींत जात व कधीं कधीं वसाहतीकडून भरतखंडांत वकीलहि येत; पण भरतखंडांतील राजे लोकांनीं या वसाहतीकरणाकडे फारसें लक्ष दिलेलें नाहीं. तिसऱ्या शतकांत कंबोडियाचा राजा चंद्रवर्मा याच्या कारकीर्दींत भरतखंडांतून एक व्यापारी तेथें गेला होता. त्याच्या तोंडून भरतखंडाचें वैभवशाली वर्णन ऐकून चंद्रवर्म्यानें आपला एक वकील भरतखंडास पाठवून दिला. त्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत मुरुंड नांवाचे राजे राज्य करीत होते. वकील त्या राजाच्या दरबारीं पोंहोचल्यावर त्यानें आपल्या देशांत भारतीय संस्कृतीची कशी जोपासना केली जाते याचें सविस्तर वर्णन केलें. मुरुंड राजाला ही स्थिति अपरिचित होती

म्हणून, चिनी बखरकार लिहितो कीं, राजा उद्गारला, 'समुद्राच्या पैलतीरीं असले आपले लोक राहतात तर!' यावरून राजेलोकांनीं या वसाहतींची विशेष दखलगिरी बाळगलेली दिसत नाहीं. वसाहतकारहि वसाहतींतच कायमचे स्थिर झाले. असें असतांहि तेथें त्यांनीं भारतीय संस्कृतीच्या सर्व अंगोपांगांचा प्रसार केला व तो देश भारतमय करून सोडला.

जावा, सुमात्रा, बलि, कम्बुज, चम्पा वगैरे ज्या वसाहती भारतीयांनीं वसविल्या त्या वसाहतींचा सर्व स्थूल इतिहास आतां उपलब्ध झाला आहे त्यावरून, कोणकोणतीं भारतीय राजघराणीं तेथें नांदलीं याची संगतवार व राजांच्या नांवनिशीवार माहिती देतां येण्यासारखी आहे. पण प्रस्तुत आपणांस या तपशिलाशीं कर्तव्य नसून भारतीय संस्कृतीचा प्रसार या द्वीपकल्पांत कसा झाला एवढेंच पाहणें आहे. एतद्विषयक प्रथम दोन गोष्टी नमूद करण्यासारख्या आहेत त्या ह्या कीं, भरतखंडांतून येऊन येथील राज्यसंस्थापक स्थिर झाल्यावर त्यांना मायभूमीकडून कुमक वगैरे तर मिळाली नाहींच, पण तिचा फारसा संबंधहि उरला नाहीं. अशा स्थितींत सामान्यपणें जेतेच बहुधा जितांमध्यें विरून जातात. याचीं कनिष्कादि कांहीं उदाहरणें पुढील एका प्रकरणांत येतील.

इंडो-चायनांतील वसाहतवाल्यांविषयीं दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कीं, त्यांनीं आपल्या संस्कृतीचा प्रसार जो केला तो दुसऱ्या एका संस्कृतीशीं लढून, तीवर मात करून केला ही होय. ज्या प्रदेशांत त्यांनीं वसाहती वसविल्या त्या प्रदेशांतील मूळ रहिवाशांची संस्कृति अगदींच खालच्या दर्जाची नव्हती. चिनी लोकांना ते अनेक वेळा पुरून उरले होते. पण त्याहीपेक्षां विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे इंडो-चायनांतील भारतीय वसाहतवाल्यांना तेथें आधींच घुसण्याचा प्रयत्न करीत असणाऱ्या चिनी संस्कृतीशींहि टक्कर द्यावी लागली. कांहीं काल या प्रदेशांत दोन्ही संस्कृतींचा लढा सुरू होता; पण

चीनला हा प्रदेश जवळ असतांहि म्हणजे मायदेशाची मदत हरघडी मिळण्यासारखी असतांहि व उलटपक्षीं भारतीयांना बाहेरून समुद्र ओलांडून यावें लागत असतांहि या द्वीपकल्पांतील या संस्कृतियुद्धांत विजयश्रीनें भारतीय वसाहतवाल्यांच्याच गळ्यांत माळ घातली व तेणेंकरून भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची पताका उभवून धरली !

चिनी लोकांशीं युद्धाचा प्रसंग असल्यानें भारतीयांचें चिनी द्वीपकल्पांतील वसाहतीकरण अगदींच सामोपचारानें झालें असें म्हणतां येत नाहीं. कांहीं प्रदेशांत तरी त्यांना आपल्या प्रभावशाली शूळाचा उपयोग करावाच लागला असावा. कम्बुज किंवा कम्बोडिया येथें कौंडिण्य नांवाच्या वीरानें प्रथम वसाहत कशी केली याविषयीं चंपा ( अनाम ) येथील ७ व्या शतकांतल्या एका लेखांत जी हकीकत आली आहे तिजवरून वरीलसारखें अनुमान निघतें. शिलालेखकार लिहितो कीं, तत्र स्थापितवान् शूलं कौंडिण्यस्तद्द्विजर्षभः। अश्वत्थाम्नो द्विजश्रेष्ठात् द्रोणपुत्रात् अवाप्यतम्॥ कौंडिण्य हा प्रथम येथें आला व त्यानें द्रोणपुत्र अश्वत्थाम्यापासून मिळालेला शूळ येथें रोवला. सहाव्या शतकांतल्या चिनी ग्रंथांमध्यें फुनान-( अनामचा एक भाग ) विषयीं अशीच कथा आहे. या कथेप्रमाणें फुनानवर राणी राज्य करीत असतां प्रुएन्टीन ( कौंडिण्य ) नांवाचा एक राजपुत्र जहाजांतून तेथें आला. तें पाहतांच राणीनें सैन्याचा जमाव करून युद्धाची तयारी चालविली; पण बंदरावर जमाव जमत असतां कौंडिण्यानें एक तीर सोडून तीरावरील एक सैनिक अचूक मारला. तावडतोब बंदरावर गोंधळ माजला; यावरून तीराचा उपयोग तेथील लोकांना माहीत नसावा असें दिसतें. कारण युरोपियनांची बंदूक पाहून नीग्रोंची जशी गाळण उडाली, तशीच कौंडिण्याच्या शरसंधानानें राणीच्या सैन्याची गाळण उडाली. अर्थात् राणीनें तावडतोब कौंडिण्याचें वर्चस्व मान्य केलें आणि कौंडिण्यानें तिच्याशीं विवाह करून स्नेहग्रंथी दृढ केली ! या कथांवरून येथें भारतीय संस्कृति आली ती कांहीं प्रसंगीं

पाठीशीं बाणांचे तूणीर बांधल्याशिवाय आली नाहीं असा तर्क सहजच निघतो. मात्र एकदां पाय रोवल्यावर तेथल्या लोकांशीं स्नेहसंबंध जोडण्याचा उपक्रम अवलंबिलेला दिसतो तो दोन तऱ्हांनीं. एक म्हणजे, तेथील प्राचीन राजवंशांतील राजकन्यांशीं विवाह करणें; व दुसरा म्हणजे राजशासनाचा व्यवहार संस्कृतप्रमाणेंच तेथील ख्मेर भाषेंत करणें ह्या होत.

## परमुलुखांत संस्कृतीची जोपासना

विवाह व भाषा अशा दोन्ही रीतींनीं ख्मेरसंस्कृति भारतीय संस्कृतींत घुसत असतां भारतीय संस्कृतीचीं सर्व अंगोपांगें या वसाहतवाल्यांनीं हजार वर्षेंपर्यंत मूळच्या अविकृत स्वरूपांत राखलीं हें आश्चर्य होय. देवदैवतें, व्रतनियम, भाषा, पोशाक, कायदेकानू, समाजरचना हीं जीं संस्कृतीचीं अनेक अंगें त्या सर्वांत भारतीय वळण दहा शतकें कायम राहिलें. पहिली गोष्ट म्हणजे संस्कृत भाषेची निष्ठापूर्वक जोपासना चालू राहिली. ख्मेर भाषेशीं नित्य संबंध असतांहि व राजशासनें दोन्ही भाषांतून प्रसृत करण्याची परिपाठी असतांहि या वसाहतवाल्यांनीं संस्कृत भाषेची आराधना मोठ्या श्रद्धेनें चालू ठेवली. चंपा वसाहतींत संस्कृत भाषेंत लिहिलेले अनेक शिलालेख उपलब्ध झाले आहेत. त्यांतील कांहीं मजमुदार यांनीं आपल्या 'चंपा' या ग्रंथांत् उद्धृत केले आहेत. त्यांची भाषा मोठी प्रौढ व अलंकारिक आहे. वर कौंडिण्यविषयक श्लोक दिला आहे. दुसरा एक श्लोक पाहा. हा एका देवीच्या देवळावर कोरलेला असून त्यांत देवीच्या स्थापनेची हकीकत आहे. तो श्लोक असाः—

व्योमांबुराशितनुगे शकराजकाले
देवीमिमां भगवतीं कलधौतदेहाम्
एकादशेहनि शुचेरसितेर्कवारे
सोऽतिष्ठिपद्भुवनमंडलकीर्तिकांक्षी ॥

या मंदिर बांधणाऱ्या राजाचें नांव इंद्रवर्मा असें आहे. इतर राजांचीं नांवें दिलीप, मांधाता, पांडुरंग, यशोवर्मा, राजेंद्रवर्मा अशींच भारतीय वळणाचीं आहेत. संस्कृत वाङ्मयांतील सर्व प्रतिष्ठित ग्रंथांचें येथें अध्ययन होई. खुद्द राजे लोक वाङ्मयाचे भोक्ते किती होते हें वरील इंद्रवर्म्याच्याच उदाहरणावरून लक्षांत येईल. त्याच्या वर्णनपर खालील श्लोक पाहा :

मीमांसाषट्तर्कजिनेंद्रसूर्मिः
सकाशिकाव्याकरणोदकौघः
आख्यानशैवोत्तरकल्पमीनः
पठिष्ठ एवेष्विति सत्कवीनाम् ॥

यावरून या राजानें मीमांसादि षट्शास्त्रें, बौद्धजैनमतें, व्याकरण, आख्यानें, काव्यें वगैरे सर्व विषयांचें अध्ययन केलें होतें असें दिसतें. चंपामध्यें वैदिक धर्माचा विशेष जोर होता. मधून-मधून भरतखंडांतील विद्वत्परिषदेच्या धर्तीवर शास्त्रसभा होत व त्यांत स्त्रियाहि भाग घेत. दैवतें सगळीं भरतखंडांतीलच. शिव हें प्रमुख दैवत. त्याचीं देवळें सर्वांत अधिक. शिवाय गणेश, कार्तिकेय, ब्रह्मा यांचींहि देवळें होतीं. उमा, सरस्वती, गंगा, लक्ष्मी या देवींचीहि आराधना होई. मूळची ख्मेर लोकांचीं देवदेवस्थानें नष्ट करून, नवीन भारतीय देवस्थानें स्थापन केलीं असेंहि नाहीं. तर मूळच्या ख्मेर दैवतांनाच भारतीय वळणाचीं नांवें दिलीं गेलीं. शंकराचें नांव देणें सर्वांत सुलभ. कशाच्याहि पुढें ईश्वर, ईश हीं उपपदें लावलीं कीं काम भागतें. याचा फायदा घेऊन भ्रातकेश्वर, जलागेश्वर वगैरे जुन्या देवस्थानांचें नवीन संस्करण करण्यांत आलें. देवतांप्रमाणें व्रतवैकल्येंहि या वसाहतवाल्यांनीं कायम टिकविलीं. महाभारत-रामायणाचा नित्यपाठ पुष्कळ मंदिरांतून नित्य चालू ठेवला. मधून महाहोम, लक्षहोम, कोटिहोमहि करण्यांत येत.

भारतीयांचा समाजरचनेचा एक प्रमुख विशेष जी वर्णसंस्था, ती अर्थात् येथें रूढ होतीच. चातुर्वर्ण्याचें शुद्ध स्वरूप कायम टिकविणें परमुलखांत फार कठीण असतें. त्यांतून परजातीय लोकांच्या कन्यांशीं विवाह करण्याचा परिपाठ राजेलोकांनींच घालून दिलेला होता. अर्थात् चातुर्वर्ण्यांत बराच घोटाळा उत्पन्न होत असला पाहिजे. पण चातुर्वर्ण्याची संस्था टिकविण्याची इच्छा प्रबल होती म्हणून कंबोडियांतील पांचवा जयवर्मा याच्या कारकीर्दींत व सूर्यवर्मा याच्या कारकिर्दींत पुन्हा एकदां, अशी चातुर्वर्ण्याची दोनदां पुनर्घटना करण्यांत आली असे उल्लेख आढळतात. एक-दोन बाबींत कांहीं थोडें नावीन्य उत्पन्न झालेलें आढळतें. क्षत्रियांना एकंदरींत ब्राह्मणांपेक्षांहि अधिक मान मिळे. चंपा येथील एका शिलालेखांत राजाचें वर्णन आहे तें ब्राह्मणपुरोहिताग्रासनक्षत्रान्यनरपतिवृंदजुष्टचरणारविंदः म्हणजे इतर राजांनीं व ब्राह्मण पुरोहित वगैरेंनीं ज्याचें पादसेवन केलें आहे असा राजा असें आहे. देवालयांत पोषाक घालून जाण्याचा हक्क फक्त राजाचा. देवाला देवालयसंस्थापकाचें किंवा ज्याच्या स्मरणार्थ देवालय बांधलें त्या राजाचें नांव देणें हा एक दुसरा प्रकार आढळतो. उदाहरणार्थ, कंबुजांतील यशोवर्मा राजानें बांधलेल्या दोन देवळांतील मूर्तींना आपला पिता व प्रपिता यांचीं नांवें इंद्रवर्मेश्वर व महापतीश्वर अशीं दिलेलीं आहेत.

चंपा वसाहतींतील राजे दक्षिणेंतून आले असल्यानें (वर्मा हें नांव दक्षिणेंतील राजाचें असतें) दाक्षिणात्यांची भागिनेय वारसाची चाल चंपा येथें चालू होती. भरतखंडांतील सर्व मतमतांतरांकडे लक्ष पुरविलें जाई. मायभूमीशीं थोडाबहुत व्यापार चालूच असावा व कांहीं विद्वान् ब्राह्मण व श्रमण हेहि मधूनमधून वसाहतींत जात. तिसऱ्या शतकांत फुनान (अनामचा भाऊ) राजाचा वकील गंगाकांठीं आला होता. त्याला यायला वर्ष लागलें. प्रवास फार लांबचा. तरी मधून मधून ये-जा असावीच. पांचव्या शतकांत चंपा येथील राजा

गंगाराज हा गादी सोडून गंगाकांठीं देह ठेवण्याकरितां भरतखंडांत आला. उलट आठव्या शतकांत अगस्त्य, दहाव्यांत दिवाकर, बाराव्यात हृषिकेश, चौदाव्यांत सर्वज्ञस्वामी असे विद्वान् वसाहतींत गेल्याचें आढळतें. या विद्वानांच्या द्वारें संस्कृतीची ज्योत पुनः पुन्हा प्रज्वलित होत असावी. कांहीं वेळां तर वसाहतींनीं मायभूमीला धडा द्यावा अशा तोलाचें धर्मग्रंथांचें अध्ययन वसाहतींमध्यें चालू असे. सुवर्णद्वीप अथवा सुमात्रा ह्या वसाहतीनें अकराव्या शतकांत असेंच महनीय पद मिळविलें होतें. कारण विक्रमशिला विश्वविद्यालयांतील प्रसिद्ध आचार्य अतीश हा बौद्ध ग्रंथांचें अध्ययन करण्याकरितां सुवर्णद्वीपांतील आचार्य धर्मकीर्ति याजकडे जाऊन बारा वर्षे राहिला होता. इतक्या आस्थेनें तेथें संस्कृतीचें जतन करण्यांत येत होतें.

भरतखंडांतील कहाण्या, आख्यायिका, समजुती याहि सुमात्रांत रूढ झाल्या होत्या. कंबुजाचा संस्थापक जो कौंडिण्य म्हणून मागें उल्लेखिलेला आहे त्याची कथा रामायणांतील कथेच्या व अर्जुनाच्या कथेच्या धर्तीवर रचलेली आहे. इंद्रप्रस्थाचा राजा आदित्यवंश यानें आपल्या मुलाला वनवासास पाठविलें. भटकतां भटकतां तो राजपुत्र काकभोक येथें आला व तेथील राजाचा त्यानें पराभव केला. एके दिवशीं संध्याकाळीं समुद्रकिनाऱ्यावर तो भटकत असतां समुद्राला भरती येऊन तो चोहींकडून वेष्टिला गेला. पण नागराजानें त्याच्यावर कृपा करून समुद्र पिऊन टाकला. तेथें कंबोजवन निर्माण केलें व आपली कन्या राजपुत्राला अर्पण केली. दुसरी एक कहाणी अशी आहे कीं, सौरिंग व वोरवंग असे दोन राजपुत्र होते. त्यांच्या सावत्र आईनें राजाचे कान भरून त्यांना फाशीची शिक्षा फर्मावली; पण मारेकऱ्यांनीं दया करून त्यांना राज्याबाहेर नेऊन सोडलें. पुढें ते भटकत भटकत दैववशात् दुसऱ्या राज्यांत आले. तेथील राजा निपुत्रिक होता; व नवा राजा ठरविण्याचा समारंभ चालू होता. हे राजपुत्र तेथें जातांच हत्तिणीनें

त्यांच्या गळ्यांत माळ घातली व ते राजे झाले. देवालयांत चित्रें काढीत तीं भरतखंडाप्रमाणें कालियामर्दन, सीताशुद्धि, मारीचमृग, गोवर्धनपर्वत वगैरेचीं; वाद्यें वाजवीत तीं मृदंग, शंखभेरी वगैरे भारतीय.

भिन्नभिन्न धर्ममतांची सांगड घालण्याची भारतीयांची सहिष्णु व समन्वयाची वृत्तीहि वसाहतवाल्यांनीं कायम राखली. मागें इंद्रवर्म्याचें वर्णन आलें आहे त्यांत मीमांसादि दर्शनांप्रमाणें त्यानें जिनेंद्रमुनीच्या मताचेंहि अध्ययन केलें होतें असें आलेंच आहे. शैववैष्णवांतील भांडणें मिटविण्याकरितां हरिहरांच्या मूर्तीची जी कल्पना भरतखंडांत निघाली तीहि येथें सापडते. येथें हरिहरांची मूर्ति करीत व हरिहरांच्या नांवानें लिंगाहि स्थापीत. शंकर-नारायण असें जोड दैवतहि मानीत. गयेला विष्णुपद आहे, सीलोनमध्यें बुद्धपाद आहे, त्याच्या धर्तीवर कंबोडियामध्यें शिवपदाची स्थापना करण्यांत आली. येथील राजाच्या अभिषेकाचे वेळीं येथील ब्राह्मण बाकू राजाचे डोक्यावर अभिषेक करतात व बौद्ध श्रमण प्रार्थना करतात.

दानधर्माची भारतीय परंपरा येथेंहि नजरेस पडते. देवालयाच्या शासनलेखावरून देवालयांतील व्यवस्था व दातृत्व हें लक्षांत येतें. कम्बुजामधील बाराव्या शतकांतील जयवर्मा हा मोठा बुद्धभक्त होता. त्यानें एक विहार बांधला. त्याला ३१४० गांवें लावून दिलीं होतीं. या विहारांत ९७९ स्नातक विद्यार्थी असून सेवकऱ्यांची संख्या ६६,६२५ अशी दिली आहे. याच राजानें १०२ आरोग्यशाला व ७९० मंदिरें बांधलीं व त्यांच्या उत्पन्नाकरितां ८३८ गांवें लावून दिलीं. नवव्या शतकांतील यशोवर्म्यानें एक आश्रम बांधून गणेशाला अर्पण केला. त्याबाबत त्यानें जें शासनपत्र करून दिलें त्यावरून मंदिराच्या व्यवस्थेची कल्पना येते. शासनांतील कांहीं महत्त्वाचीं कलमें पुढीलप्रमाणें आहेत : राजा यशोवर्म्यानें या देवालयास देऊं

केलेलीं मोत्यें, रूपें, सोनें, गाई, अश्व, गज, दासदासी, बाग वगैरेचा राजांनीं किंवा अन्य कोणी अपहार करूं नये. जे जे कोणी अनाथ देवालयाच्या आश्रयाला येतील त्या सर्वांना रोज अन्नवस्त्र, औषधें वगैरे पुरविण्यांत यावीं. तसेंच जे धारातीर्थी पडले असतील व ज्यांना वारस नसतील त्यांच्या नांवें आश्रमांत पिंड तयार करून दर महिन्याला यशोधर तलावाचे कांठीं विधिपूर्वक अर्पण करावेत. शरणागताला आश्रय द्यावा; वेश्यांना देऊं नये. विद्यार्थ्यांना खडू, शाई, भूर्जपत्रें द्यावीं, वगैरे वगैरे...

असो. या त्रोटक वृत्तान्तावरून चीन व पूर्व द्वीपकल्प यांतील हिंदु-संस्कृतीची कांहींशी कल्पना येईल. जपानचा प्रकार असाच असल्यानें निराळा वर्णन करीत नाहीं.

## उत्तरेकडील प्रचार

पूर्वेप्रमाणें उत्तर-पश्चिम वगैरे दिशांनाहि हिंदु-संस्कृतीचा प्रसार झाला होता. उत्तरेकडे मंगोलिया, मांचूरिया, तिबेट, मध्य तुर्कस्तान, वगैरे अनेक ठिकाणीं हिंदु-संस्कृतीचा झेंडा फडकलेला आढळतो. अल्बेरुणीनें लिहिलें आहे कीं "खुरासान, परसिस, इराक, मोसल येथें एके काळीं बुद्धधर्म जारी होता. राजा गुस्तास्प यानें झोरोस्टरचा धर्म स्वीकारल्यानंतर माल बुद्धधर्माचें तेथून ठाणें हललें." मध्य तुर्कस्थानांत ऑरेल स्टीन याला बरीच ग्रंथसामग्री मिळाली आहे. तींत तिबेटी, पाली, प्राकृत वगैरे भाषांतील अनेक ग्रंथ आहेत. त्यांवरून हिंदु-संस्कृतीची छाप स्पष्ट होते. आशिया-मायनरमध्यें बोधाजकोई येथील उत्खननांतील विटांवर अष्ट भाषांत लिहिलेल्या हिटाटी व मिटानी या राष्ट्रांतील तहाच्या अटी सापडल्या आहेत; त्यांवर तहरक्षक म्हणून जीं देवतानामें आहेत त्यांत मित्र, वरुण, इंद्र, नासत्या हीं वैदिक नांवें आहेत व एक, त्रि, पंच ह्या संस्कृत संख्यासंज्ञाहि आलेल्या आहेत.

अफगाणिस्थान, बलुचिस्थान व त्यालगतचा प्रदेश हे आज परकी वाटत असले तरी ते एके काळीं हिंदुस्थानाचेच प्रांत समजण्यांत येत. चंद्रगुप्त व अशोक यांच्या राज्यांत ते साक्षात् अंतर्भूतहि होते. तेव्हां तेथील संस्कृति ही हिंदी असल्यास नवल नाहीं. मात्र आज ते परके म्हणजे इस्लामी बनल्यानें त्यांच्या पूर्वचरिताची आठवण उकरून काढावी लागत आहे. मल्लिनाथाच्या वेळीं ही आठवण बुजली असावी. रघूच्या चवथ्या सर्गांत दिग्विजयाच्या वर्णनप्रसंगीं 'वंक्षुतीर विचेष्टनैः' असा जुना पाठ असतां बॅक्ट्रियांतील वंक्षु हें नांव माहीत नसल्यानें मल्लिनाथानें सिंधु असा पाठ घेतला आहे. ही बुजलेली आठवण उकरून काढण्याचें काम फ्रेंच पुराणसंशोधकांनीं काळजी-पूर्वक बजावलें आहे. यांनीं केलेल्या उत्खननांत बौद्धभिक्षूंचे शेंकडों विहार व बुद्धाच्या मोठमोठ्या सत्तर-ऐंशी फूट उंचीच्या प्रतिमा व खरोष्टी लिपींतील धम्मपदाची प्रत अशा बहुमोल चिजा संशोधकांना सापडल्या आहेत. चिनी प्रवासी याच मार्गानें हिंदुस्थानांत येत. त्यांनींहि लिहून ठेवलें आहे कीं, वाटेंत अफगाणिस्थानांत त्यांना अनेक स्तूप, विहार आढळले म्हणून. सातव्या शतकांत चेनसियांग या चिनी प्रवाशानें अफगाणिस्थान, तुर्कस्थान व इराण या प्रदेशांत प्रवास केला. त्याच्या प्रवासांत त्याला बरेच स्तूप आढळले. अफगाणिस्थानच्या डोंगरांत अशा पुष्कळ प्रचंड शिला सापडतात, कीं ज्यांवर बुद्ध यात्रे-करूंनीं आपले लेख कोरून ठेवले आहेत. लेणीं व गुहा तर शेंकडों आढळतात. एकट्या बनियानच्या डोंगरांत दोन हजार गुहा सापडल्या आहेत. अबुल फाजलनें 'ऐने अकबरी'मध्यें लिहिलें आहे कीं, अफगणिस्थानांतील पहाडांत चांगलीं बारा हजार लेणीं कोरलेलीं आहेत!

आफ्रिका व अमेरिका या खंडांमध्येंहि भारतीयांनीं वसाहती केल्या होत्या याविषयीं कांहीं पुरावा गोळा करण्यांत आला आहे. तो वरील सारखा खणखणीत नाहीं. पण जो आहे तो पहिल्या प्रथम

ईजिप्तकडे दृष्टि वळविली तर हिंदूंनीं ईजिप्तवर राज्यच केलें असावें असें वाडेल नांवाच्या एका पंडिताचें मत ऐकावयाला सापडेल. सगराच्या साठ हजार पुत्रांनीं समुद्र ओलांडून ईजिप्तमध्यें राज्य स्थापलें असावें व पहिला फारोहा अथवा प्रभु अश्वमंज हा खिस्तपूर्व २७०४ मध्यें ईजिप्तच्या गादीवर बसला असावा असें तो म्हणतो (इजिप्शियन सिव्हिलिझेशन). खुद्द आफ्रिका खंडाशीं प्राचीन कालापासून दळण-वळण दाट होतें. 'आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याचा छोटा इतिहास' या ग्रंथामध्यें ग्रंथकार हॉलिंग्स्वर्थ यानें त्याची माहिती दिली असून तो लिहितो कीं, 'हिंदूंचें आफ्रिकेशीं नुसतें व्यापारी दळणवळणच नव्हतें तर तें पूर्व किनाऱ्यावर वसाहती करून राहिले होते.' ग्रीक पेरिप्लस या नांवाच्या ग्रंथांत इसवी सनाच्या पहिल्या शतकांतील सफरीचें वर्णन आहे. त्यानें आफ्रिकेच्या मोंबासा बंदराचें वर्णन करतांना लिहिलें आहे कीं, 'ह्या महासागराच्या पलीकडे असलेल्या हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील मालानें भरलेलीं गलबतें येथें हमेश येत असतात व त्यांतून लोखंड, कापड, गहूं, तांदूळ, तूप व साखर हे पदार्थ येथील किनाऱ्यावर उतरविले जातात.' तेराव्या शतकांतील मार्को पोलो या सुप्रसिद्ध प्रवाशानेंहि मोंबासाचें वर्णन करितांना हिंदु व्यापाऱ्यांचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे.

नुसती व्यापारी बंदरेंच नव्हेत तर आफ्रिकेच्या आंतील भागहि हिंदूंना परिचित होता व त्यांचें वर्णन पुराणांत आलेलें आहे. याविषयीं पूर्व आफ्रिकेची पाहणी करण्याकरितां दहा-बारा वर्षांपूर्वी नेमलेल्या हिल्टन यंग कमिशननें आपल्या अहवालांत लिहिलें आहे कीं, 'हिंदुस्थान व पूर्व आफ्रिका यांचा संबंध अत्यंत प्राचीन आहे. पुराणांतील उल्लेखांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, प्राचीन हिंदु लोकांना येथील भूप्रदेशाची व त्यांत राहणाऱ्या लोकांची बिनचूक माहिती होती'. नाईल नदीच्या उगमाचा संशोधक स्पेक लिहितो कीं, 'पूर्व आफ्रिकेच्या ह्या भागांतील नद्या, तळीं इत्यादि जलाशयांसंबंधीं माझें

पूर्वीचें सर्व ज्ञान प्राचीन हिंदूंकडून प्राप्त झालें होतें. उलट खुद्द इजिप्शियन लोकांचें या त्यांना पवित्र असणाऱ्या नदीच्या उगमाचें ज्ञान निव्वळ काल्पनिक थापेबाजी होती.' हिंदुलोक आफ्रिकेंत बराच काळ वसाहती करून राहिले असले पाहिजेत. याला आफ्रिकेंतील स्वाहिली भाषेचाहि पुरावा मिळूं शकतो. या भाषेवर संस्कृत भाषेचा पुष्कळ परिणाम झालेला आहे. स्वाहिलींतील पुष्कळ शब्दांचें संस्कृत शब्दांशीं विलक्षण साम्य दिसून येतें. उदाहरणार्थ संस्कृत शुक, सिंह, कुक्कुट, तुंड व त्याच अर्थाचे स्वाहिली कुसुकु, सींबा, कुकु, टुंबो हे शब्द पाहा. आफ्रिकेंत वसाहती करणारे हे लोक प्राचीन काळीं वाडेबुली या नांवानें ओळखले जात व ते डेबुली म्हणजे दाभोळ बंदरचे रहिवासी असावेत. त्यांनीं नारळीपोफळींचीं झाडें आफ्रिकेंत नेलीं असावींत असें हॉलिंग्स्वर्थ म्हणतो. (गं. शं. गोखले, महाड–सह्याद्रि, एप्रिल १९३७)

## अमेरिकेंतील वसाहती

आतां शेवटीं वसाहतीकरणाच्या या प्रयोगांतील अतिदूरवरच्या प्रदेशाचा उल्लेख करावयाचा तो अमेरिका खंडाचा होय. प्राचीन भारतीय लोक हे व्यापाराकरितां व वसाहत करून स्थिर होण्याकरितां अमेरिकेसारख्या पृथ्वीच्या दुसऱ्या टोकास असलेल्या खंडांतहि गेले होते याविषयीं तर्क करण्याइतका पुरावा संशोधकांनीं गोळा केला आहे. अमेरिकेंत मध्यअमेरिका, मेक्सिको व पेरू हीं संस्कृतीचीं तीन मोठीं केंद्रें होतीं. आपल्या पुराणांतून या अमेरिका खंडाला किंवा, सबंध खंडाला म्हणण्यापेक्षां, अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील कोंकण-पट्टीसारखा जो भाग आहे त्या भागाला 'पाताळ' असें नांव आहे पुराणांत केवळ दह्यादुधांचे सागर वर्णिलेले आहेत म्हणून त्यांतील सर्व भौगोलिक वर्णन हें काल्पनिक व कुचकामाचें होय अशी एके काळीं त्यांची कुचाळी केली जात असे. पण पुराणांचा

सखोल अभ्यास होऊं लागल्यावर ही कुचाळीची वृत्ति मावळली आहे, व पुराणांतील भौगोलिक वर्णनें हीं कल्पनेनें पुष्कळसा रंग भरलेलीं असलीं तरी, त्या वर्णनांची मूळ उभारणी सत्यसृष्टीवर व साक्षात्-ज्ञानावर केली आहे हें संशोधकांच्या ध्यानीं येऊं लागलें आहे. पुराणांतील पाताळाच्या वर्णनांत तो प्रदेश नागांचा होय असें वर्णन येतें आणि अमेरिकेच्या मेक्सिको वगैरे भागांतहि सर्प फार प्रमाणावर आजहि आढळतात. मेक्सिकोंत राहणाऱ्या या मूळच्या लोकांचा स्पॅनिश लोकांनीं नायनाट केला, ग्रंथ जाळून टाकले, देवळें उध्वस्त केलीं तरी त्यांच्या संस्कृतीच्या अनेक खुणा आजच्या त्यांच्या सामाजिक व धार्मिक जीवनांत आणि पुराणवस्तु खात्यानें जमविलेल्या प्राचीन अवशेषांत आजहि आढळून येतात. युरोपियन लोकांचे पाय अमेरिकेस लागण्यापूर्वीं तेथील मूळचे रहिवासी होते त्यांना त्यांनीं ताम्र भारतीय 'रेड इंडियन्स' असें नांव दिलें. यांतील भारतीय हा शब्द देतांना यदृच्छेनें दिला गेला असला तरी संशोधनानें तो आतां परमार्थीं खरा असल्याचें ठरविलें आहे. कोलंबसानें पंधराव्या शतकांत अमेरिकेचा शोध लावला त्या वेळीं तो मूळ भरतखंडाच्या शोधासाठीं निघाला असल्यामुळें अमेरिका खंड दृष्टीस पडतांच भरतखंडच आपणांस सापडलें या भ्रमानें त्या खंडांतील ज्या भागांत तो उतरला त्या भागाला हिंदुदेश असेंच त्यानें नांव दिलें. पुढें चूक कळून आल्यावर याच प्रदेशाला 'पश्चिम' हें विशेषण जोडून पश्चिम हिंदुदेश म्हणूं लागले. कोलंबसाच्या हातून काकतालीयन्यायानें जी गोष्ट घडली ती आज संशोधनानें सत्यकथा ठरविली आहे. त्याचबरोबर असेंहि सिद्ध झालें आहे कीं, अमेरिका खंड शोधून काढण्याचें श्रेय कोलंबसाचें नसून तें श्रेय भारतीयांचें आहे व त्यांनीं हा शोध ख्रिस्ती शतकापूर्वीं कित्येक हजार वर्षें लावला असावा. यासंबंधीं अमेरिकेंतील मेक्सिकन सरकारच्या पुराण-वस्तुसंशोधन खात्यानें मानवी संस्कृतीच्या प्राचीनतम स्वरूपाचा अभ्यास करणाऱ्या हेविट,

मॅकेन्झी, वगैरे पाश्चात्य विद्वानांनीं जो पुरावा गोळा केला आहे त्यावरून भारतीयांनीं फार प्राचीनकालीं अमेरिकेंत येऊन वस्ती केली असली पाहिजे, व आज अमेरिकेमध्यें ताम्र भारतीय म्हणून ओळखले जाणारे लोक हे ह्या प्राचीन भारतीयांचेच वंशज असावेत असे चमनलाल यांनीं 'हिंदु अमेरिका' नांवाचा ग्रंथ लिहून नुकतेंच दाखवून दिलें आहे.

तीस-पस्तीस वर्षांपूर्वींच रावबहादुर चिंतामणराव वैद्य यांनीं "रामायणाचें गूढ" या नांवाचा जो इंग्रजी ग्रंथ लिहिला होता त्यामध्यें लंकेंतील राक्षस आणि अमेरिकेंतील मेक्सिको प्रदेशांतील रहिवासी हे एकाच वंशाचे असावेत असें मत मांडलें होतें. रामायणांत रावणाची वंशावळ देतांना साल कटंकटा या नांवाच्या राक्षसीशीं विद्युत्कटाचा विवाह होऊन सुकेश हा जन्मास आला व ह्या सुकेशाचा पुत्र सुमालि, त्याचा कैकसी व त्याचा रावण अशी वंशावळ दिली आहे. यांतील साल कटंकटा हा शब्द संस्कृतभाषेंतील नसून परभाषेंतील असावा व मेक्सिकोच्या प्राचीन इतिहासांत ज्या अर्थी या शब्दाशीं समान असा सीकोटेंकटल असा शब्द आढळतो, त्या अर्थी लंकेंतील राक्षस आणि मेक्सिकोंतील रहिवासी हे एकाच वंशाचे असावे असें अनुमान वैद्य यांनीं बांधलें होतें. हें अनुमान अयथार्थ नव्हतें हें ठरविणारा भरपूर पुरावा आतां उपलब्ध झालेला असून, त्यावरून नुसत्या लंकेंतीलच नव्हे, तर भरतखंडांतील लोक मुशाफरी करीत करीत लांब दूरवर अमेरिकेपर्यंत व्यापार वगैरे निमित्तानें जात असत असें सिद्ध झालें आहे.

स्पॅनिश लोकांनीं जेव्हां अमेरिकेंतील रहिवाशांचा नायनाट केला तेव्हां मेक्सिको प्रांताचा शेवटला राजा मॉंटेझूमा यानें स्पॅनिश सेनापति कार्टेझ याला जी स्वतःच्या वंशासंबंधीं हकिकत सांगितली तीमध्यें आपण या देशींचे मूळचे स्थायिक नसून बाहेरून उत्तरेकडून पूर्वेकडून येऊन येथें स्थायिक झालेले आहों असें सांगितलें. पण

सातासमुद्रांपलीकडे राहणारे व शेंकडों वर्षें ज्यांचें दळणवळण साफ तुटलेलें आहे असे भारतीय व अमेरिकेंतील ताम्र भारतीय हे एकमेकांचे जातभाई होत हें कशावरून ठरविण्यांत येतें? तर असलें एकजातीयत्व ठरविण्याचें साधन म्हटलें म्हणजे या दोन जातींचे आचारविचार, धर्मसमजुती, शास्त्रकला, यांतील वेधक साम्य हें होय. या साम्यापैकीं कांहीं बाबी अशा असतात, कीं त्या दोन्ही ठिकाणीं स्वतंत्रपणें निर्माण झाल्या असाव्या अशी उपपत्ति त्यांच्या-विषयीं मांडतां येते. पण दुसऱ्या कांहीं बाबी अशा असतात कीं वरील उपपत्तीनें समाधान होत नाहीं. अमेरिकेमधील ताम्र भारतीयां-मध्ये भरतखंडातल्याप्रमाणें प्रेताचें दहन करण्याची व सतीची चाल होती. चारशें वर्षांपूर्वी शेवटच्या इंका राजाच्या सर्व बायका सती गेल्या. तेथील विद्यार्थीहि आपल्याकडील गुरुकुलाच्या धर्तीवर गुरुगृहीं बरींच वर्षें राहून गुरूची सेवा करीत. त्यांची व्यापारी पेठ बसविण्याची पद्धतहि आपल्यासारखीच असे. गळयांत घालण्याचे सुवर्णाचे हार आपल्याइकडील हारांसारखेच असत. खाणें, पिणें आपणाप्रमाणेंच डाळ, चपाती. आतां हे प्रकार स्वतंत्र रीतीनें उद्भवणारच नाहींत असा आग्रह धरणें वाजवी होणार नाहीं. वरीलपेक्षां अधिक निर्णायक पुरावा म्हणजे दैवतविषयक होय. तो पुरावा म्हणजे अमेरिकेंतील ताम्र भारतीयांमध्यें गणेश व इंद्र हीं दैवतें सापडतात हा होय. आपल्या-प्रमाणें ते चार युगेंहि मानीत व त्या चार युगांचे मानलेले श्वेत, रक्त, पीत, आणि कृष्ण हे वर्णहि त्यांचे आमचे तंतोतंत जुळतात. त्यांच्या शिल्पांत आढळणारा पुरावा तर वरीलपेक्षांहि बळकट आहे. तो पुरावा म्हणजे त्यांच्या शिल्पांत हत्तीच्या प्रतिमा सापडतात हा होय. या बाबतींत विशेष लक्षांत घेण्याची गोष्ट म्हणजे हत्ती हा प्राणी अमेरिकेंत मुळींच सापडत नाहीं ही होय. तेव्हां त्याची प्रतिमा करण्याची कल्पना कोठून तरी बाहेरूनच आली असली पाहिजे हें उघड आहे. बाहेर हत्ती सापडतात ते दोन ठिकाणीं. एक म्हणजे आफ्रिकेमध्यें आणि दुसरे

हिंदुस्थानांत. पण हे दोन्ही ठिकाणचे हत्ती एकाच जातीचे नसून त्यांच्या शरीराच्या ठेवणींत कांहीं फरक आहेत. त्यांतील मेक्सिकोंतील शिल्पांत जो हत्ती सापडतो तो आफ्रिकेंतल्या जातीचा नसून हिंदुस्थानांतल्या जातीचा आहे हें विशेष होय !

पण एवढ्या दूरवर लोक जात असतील कशाला व कसे ? तसेंच कांहीं तरी घबाड सापडत असल्याशिवाय इतक्या लांब कोण प्रवास करील ? तर तसें घबाड होतेंहि पण. ज्या घबाडावर पुढें पंधराव्या सोळाव्या शतकांत युरोपियन लोकांच्या उड्या पडल्या तें घबाड म्हणजे सुवर्णाच्या खाणी हें होय. भरतखंडांतील निरनिराळ्या व्यापारी चिजा तेथें नेऊन भारी किंमतीस विकावयाच्या व तेथील सुवर्ण परत स्वदेशीं आणावयाचें असा प्रकार असावा. अमेरिकेच्या पश्चिम भागांतील समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशाचें हवामानहि भरतखंडांतील हवामानासारखेंच असल्यानें पुष्कळांना तेथें स्थायिक व्हावें असेंहि वाटलें असेल.

आतां हे लोक इतक्या दूरवर गेले असावेत तरी कसे याविषयीं आपणांस अचंबा वाटतो. तेव्हां हें सांगितलें पाहिजे कीं, ते महासागर ओलांडून जात नसत. तर ब्रह्मदेशांतून बाहेर पडून, चीन ओलांडून सैबेरियापर्यंत खुष्कीनें जावयाचें व तेथून पुढें पॅसिफिक महासागरांतून अमेरिकेंतील पश्चिम किनाऱ्यावर उतरावयाचें असा हा मार्ग होता. येथें महासागर ह्या शब्दालाहि बिचकण्याचें कारण नाहीं. कारण सैबेरियापासून कॅनडापर्यंत जो महासागर पसरला आहे त्यांत शेंकडों बेटें विखुरलेलीं आहेत आणि या बेटांच्या आश्रयानें एका बेटावरून दुसऱ्या बेटावर असें करीत जावयाचें म्हटलें तर साध्या होडग्यांतून जाणेंहि अशक्य नाहीं. दुसरा मार्ग म्हणजे मलाया द्वीपकल्पापर्यंत खुष्कीनें जावयाचें व तेथून पुढें पॅसिफिक महासागर ओलांडण्यास आरंभ करावयाचा. ह्याहि भागांत प्राचीन कालीं अनेक

बेटें अस्तित्वांत होतीं. अलीकडच्या काळीं मात्र त्यांतील बरींचशीं पाण्याखालीं लोपलीं आहेत.

सारांश, चीन, जपान, जावा, सुमात्रा, अफगाणिस्थान, इराण, ग्रीस, रोम, इजिप्त, अमेरिका वगैरे त्रिखंड पाऊथे घालणारे होते हे आपले पूर्वज! त्यांनीं आध्यात्मिक जग जसें धुंडाळलें होतें तसेंच ऐहिक जगाचाहि कानाकोपरा तपासला होता. आणि निःश्रेयसाविषयीं त्यांनीं जसा ध्यास घेतला होता, तसाच अभ्युदयाविषयींहि ह्व्यास बाळगला होता. ते धाडसी होते, प्रयत्नवादी होते, 'कृण्वतो विश्वमार्यं' अशा उत्साही, आनंदी, आशावादी वृत्तीचे होते हें आतां निराळें सांगावयास नको. आत्म्यावर लक्ष रोखल्यानें ते व्यवहाराला पारखे झाले होते ही समजूत कशी निराधार आहे हें आतां पटण्यास प्रत्यवाय येणार नाहीं.

पूर्वीं सुचविल्याप्रमाणें आपल्या पूर्वजांविषयीं आणखी एक गैरसमज वावरतांना दिसतो, तो म्हणजे त्यांना लोकशाहीची कल्पना नव्हती हा होय. हाहि कसा निर्मूल होय हें आतां पुढील प्रकरणीं पाहूं या. आणि नंतर विश्वसंचार करणाऱ्या आपल्या पूर्वजांचा परक्या संस्कृतींशीं जो संबंध आला त्याचें फल म्हणून देवाण-घेवाण काय झाली, तसेंच पंजाबांतील कोपऱ्यांतून निघून लंकेपर्यंत भरतखंड व्यापून टाकीत असतां भिन्न भिन्न अवस्थांतील समाजाचे संस्कृतिप्रवाह आपल्यांत कसे समाविष्ट केले वगैरे पाहूं, म्हणजे आपणांस प्राचीन कालच्या संस्कृति-संगमावरील दृश्यें नजरेस पडतील.

## प्रकरण नववें

# प्राचीन भारतांतील लोकशाही

मागील प्रकरणांतील आपल्या पूर्वजांच्या विश्वसंचाराचें वर्णन मीं लिहून पुरें केलें नसेल तोंच शेजारच्या मंदिरांतून मंत्रपुष्पाचा घोष माझ्या कानांवर आदळूं लागला. गंभीरपणें व अत्यंत तारस्वरांत 'ॐ स्वस्ति साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं' असा मंत्रघोष वैदिकवृंद करीत होता. आपण परमेश्वराच्या ऐश्वर्याचें वर्णन करीत आहों, व अनंतकोटिब्रह्मांडनायक अशा प्रभूचें वर्णन करावयाचें तर सूर कितीहि चढविला तरी तो थोडाच, या भावनेनें 'आविक्षितस्य कामप्रेः विश्वेदेवा सभासद इति' हा शेवटचा भाग उच्चारतांना भाविक जन आपल्या स्वराच्या उत्तानतेची पराकाष्ठा करीत होते. हा मंत्रघोष अहर्निश हजारों मंदिरांतून आज हजारों वर्षें अव्याहत सुरू आहे. श्रद्धेनें डोळे मिटून परमेश्वराचें ध्यान करून त्याच्या स्तुतिपर वा प्रार्थनापर हा मंत्र आहे अशा भावनेनें तो गायिला जात असतो. पण तुमच्यापैकीं वैदिक मंत्रांचा अर्थ उमगणारे थोडे सोडले तर बाकीच्यांना अशी शंका तरी आली असेल का, कीं या मंत्रांत अविक्षितपुत्र मरुत्त या राजाच्या वैभवाचें वर्णन आहे आणि मंत्रांत येणारीं साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य हीं पदें निरनिराळ्या राज्यपद्धतींचीं द्योतक आहेत म्हणून? कशी येणार? सर्व धार्मिक कृत्यें, सर्व संस्कार आपण वेदमंत्रांनीं करतों ते या मंत्रांत कांहीं गूढ शक्ति आहे व तिनें आपलें मंगल होईल ह्या आपल्या कल्पनेनें. यामुळें या मंत्राचा अर्थ पाहिला तर त्या मंत्राच्या जोडीला ज्या क्रिया आपण करतों त्यांशीं तो विसंगत आहे कीं काय हेंहि आपणांस कळत नाहीं. पाळण्याला बाशिंग

बांधून लग्नें लावीत असतां तोंडानें मंत्र प्रौढ विवाहालाच शोभतील असे आपण म्हणतोंच कीं नाहीं? तसाच प्रकार या मंत्रपुष्पाच्या मंत्रांचा झाला आहे. या मंत्रांच्या अर्थाकडे लक्ष दिलें तर आपणांस कळण्यास वेळ लागणार नाहीं, कीं या मंत्रांतलें साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य व वैराज्य वगैरे शब्द हे निरनिराळ्या राज्यपद्धतींचे दर्शक आहेत म्हणून; पण परंपरेच्या विस्मरणामुळें राजशाही ही एकच राज्यपद्धति आपल्या देशांत अविच्छिन्न नांदत होती अशी आपली सामान्यतः समजूत असते. ती कशी निराधार आहे हें आपण इतिहासाकडून समजावून घेतलें पाहिजे. आज आपण लोकशाहीची पद्धति पाश्चात्य राष्ट्रांच्या अनुकरणानें आपल्या देशांत सुरू करीत आहों हें खरेंच. कारण अलीकडे कित्येक शतकें ती आपल्या देशांत नामशेष झाली होती; किंबहुना नामहि राहिलें नव्हतें; पण त्याच्यापूर्वी लोकशाहीची पद्धति आपणांत कधींच नांदली नव्हती हें खरें नव्हे. आपल्या संस्कृतीची ऐतिहासिक परंपरा सुदीर्घ कालाची आहे. या अवकाशांत राजकारणांतील अमुक एक प्रयोग आमच्याकडे व्हायचा राहून गेला असें झालें नाहीं.

युरोपियन विद्वान् ऐट मारीत कीं लोकशाहीचें तत्त्व कोठें उदय पावलें असेल आणि नांदलें असेल तर तें फक्त युरोप खंडांत! समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही त्रयी कोठें विजयी झाली असेल तर ती युरोपच्या भूमींत. युरोपच्या बाहेर असलेल्या राष्ट्रांतील राजकीय वातावरण हें समता, स्वतंत्रतेच्या मोकळ्या हवेला खेळण्यास सर्वतोपरी प्रतिकूल! कांहींनीं तर असेंहि प्रतिपादन केलें कीं, लोकशाहीची वल्ली ही थंड हवेंतच तेवढी जोमांत वाढूं शकते, भरतखंडासारख्या उष्ण प्रदेशांतील हवा ही तिच्या वाढीस प्रतिकूल होय. परक्या जित राष्ट्रांतील लोकांकडे तुच्छतेनें पाहणाऱ्या युरोपियन विद्वानांनीं असलीं मतें प्रसृत करावीं हें ठीक! पण भरतखंडांत प्राचीन काळीं अनेक प्रांतांत लोकशाही नांदत होती ह्याची खुद्द आम्हां भरतवासीयांनाच गाढ

विस्मृति पडावी हें इतिहासविषयक उदासीनतेचें कटु फल होय. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या काळांत प्राचीन प्रजासत्ताक राज्यांची स्मृति पार लोपून गेली होती. त्यांनीं लिहिलें आहे कीं, लोकशाहीची कल्पना ही आपणांस सर्वस्वीं नवी आहे व ती आपणांस पाश्चात्यांपासून शिकावयाची आहे.

## प्राचीन गणराज्यें

सुदैवानें आपल्या प्राचीन संस्कृतीविषयींचें हें अज्ञान दूर होत चाललें आहे. विष्णुशास्त्र्यांच्या नंतरच्या गेल्या पन्नास वर्षांच्या काळांत जुन्या संस्कृत ग्रंथांचें जें सूक्ष्म व चिकित्सापूर्वक अध्ययन झालें आहे, त्यावरून असें निष्पन्न झालें आहे कीं, प्राचीन भरतखंडांत लोकशाहीचें, अथवा अगदीं काटेकोरपणें बोलावयाचें तर, महाजनशाहीचें तत्त्व पूर्ण अवगत होतें. इतकेंच नव्हे तर ख्रिस्तपूर्व १००० पासून तों ख्रिस्तोत्तर ५०० येवढ्या प्रदीर्घ कालखंडांत अनेक लहान-मोठीं प्रजासत्ताक किंवा महाजनसत्ताक राज्यें होऊन गेल्याचें प्राचीन वाङ्मयांत नमूद आहे. काशीप्रसाद जयस्वाल ह्यांनीं या विषयाचा विशेष अभ्यास केलेला असून आपल्या ग्रंथांत वेगवेगळ्या थोड्याथोडक्या नव्हे तर चांगल्या ८१ प्रजासत्ताक राज्यांची यादी त्यांनीं दिलेली आहे. यांपैकीं कांहीं प्रजासत्ताक राज्यें शेंकडों वर्षें आजूबाजूच्या राजसत्तेला टकरा देत तगून राहिलेलीं आढळून येतात. ज्या प्रजासत्ताक राज्यांत भगवान् बुद्धाचा जन्म झाला तें शाक्य लोकांचें राज्य जवळजवळ हजार वर्षें लोकशाहीच्या स्वरूपांत नांदत असलेलें आढळून येतें. भगवान् बुद्धाचा पिता यशोधर हा ह्या प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष होता. अध्यक्षाला राजा ही पदवी असे. ह्या प्रजासत्ताक राज्यांना प्राचीन कालीं 'गण' व 'संघ' अशा संज्ञा होत्या. बुद्धाचा पिता ज्या गणाचा अध्यक्ष होता त्या लिच्छवी गणाची राज्यपद्धति लोकशाही स्वरूपाची होती.

बुद्ध धर्मांतील एक विशेष म्हणजे त्यांतील संघ हे होत. पण बुद्धानें धार्मिक संघ जे स्थापन केले ते त्यानें जे राजकीय संघ पाहिलेले होते त्यांच्या धर्तीवर स्थापन केले असावे. संघ ही संज्ञा मूळची नुसती धार्मिक असून ती बुद्धाच्या पूर्वीच्या वाङ्मयांतहि आढळून येते. संघराज्यांचे व गणराज्यांचे उल्लेख प्राचीन वाङ्मयांत ऐतरेय, ब्राह्मण, पाणिनी व पतंजली ह्यांचे व्याकरण ग्रंथ आणि कौटिल्याचा अर्थशास्त्र ग्रंथ ह्यांत अनेक ठिकाणीं विखुरलेले आढळतात. गण हा शब्द प्रजासत्ताक राज्य ह्या अर्थीं रूढ होता एतद्विषयक अवधान जातकांतील उल्लेख देतां देण्यासारखा आहेत. या जातकांत लिहिलें आहे कीं, एकदां मध्य देशांतील कांहीं व्यापारी दक्षिण देशांत व्यापारानिमित्त गेले होते. तेथील राजाची गांठ घेतल्यावर राजानें त्यांना विचारलें कीं, "तुम्ही कोठून आलांत? तुमच्या देशाचा राजा कोण?" यावर व्यापाऱ्यांनीं जें उत्तर दिलें त्यावरून गण शब्द हा राजकीय संघ ह्या अर्थीं वापरला जात असे हें स्पष्ट होतें. व्यापारी म्हणाले, "आम्ही निरनिराळ्या देशांहून आलों आहोंत. त्यांतील कांहींच्यावर राजांची सत्ता आहे व कांहींवर गणांची सत्ता आहे." वणिजः कथयन्ति भो देव, केन्चिद् देशाः गणाधिनाः केन्चिद् राजाधिनाः इति। यावरून गण ही संज्ञा बहुसंख्याक राज्यपद्धति अथवा स्थूल अर्थानें लोकशाही या अर्थीं वापरली जात असे हें स्पष्ट होतें.

## अध्यक्ष कृष्ण

दोन-तीन गणराज्यें एकत्र झालीं म्हणजे त्याला संघ अशी थोडी अधिक व्यापक संज्ञा वापरण्यांत येई. अशा संघाचें एक अतिप्रसिद्ध उदाहरण म्हणजे भगवान् श्रीकृष्ण हा ज्या संघामध्यें होता त्या अंधकवृष्णीसंघाचें होय. श्रीकृष्ण हा राजा होता असें पुराणांत वर्णन येतें. त्या ठिकाणीं राजा याचा वास्तविक अर्थ अध्यक्ष असा असतो.

पण पूर्वीच्या लोकशाहीची स्मृति पार लोपून गेल्यामुळें यादवांचें राज्य हें राजसत्ताक पद्धतीचें होतें अशी आपली समजूत होते. पण महाभारतांतील शांतिपर्वामध्यें अंधकवृष्णीसंघाचें जें वर्णन दिलें आहे त्यावरून हा संघ प्रजासत्ताक पद्धतीचा होता हें स्पष्ट होतें. हा संघ दोन गणांचा मिळून झालेला असल्यामुळें दोन्ही संघ आपापला एक एक अध्यक्ष निवडून देत, व ह्या अध्यक्षद्वयाच्या संमतीनें सर्व कारभार चाले. **भगवान् कृष्ण हा त्या वेळचा वृष्णींनीं निवडून दिलेला अध्यक्ष होता.** तो राजा नसून लोकनियुक्त अध्यक्ष असल्यामुळें विरुद्ध पक्षाची टीकाहि त्याला पुष्कळ वेळां सोसावी लागे. ही अध्यक्षाची जागा मोठ्या मानाची असली तरी, सर्वस्वीं सुखदायकच होती असें नव्हे. कारण अध्यक्ष हा उच्च आसनावर अधिष्ठित झालेला असला तरी, तो लोकांनीं निवडून दिला असल्यामुळें एका अर्थानें लोकांचें दास्यच त्याला स्वीकारावें लागे. भगवान् कृष्णानेंहि आपला अनुभव नारदऋषींजवळ अशाच शब्दानें व्यक्त केला आहे. तो म्हणतो, " तुम्ही मला मोठा ऐश्वर्यवान् समजतां; पण माझ्या ह्या ऐश्वर्याचें खरें स्वरूप म्हणजे मी माझ्या ज्ञातिबांधवांचें दास्य पत्करलें आहे हेंच होय. संयुक्त अध्यक्ष म्हणून मला कांहीं सुखसवलती मिळतात. पण त्याच्याबरोबरच लोकांची दुरुक्तीहि ऐकून घ्यावी लागते." ' दास्यं ऐश्वर्यवादेन ज्ञातिनां वै करोम्यहम् । अर्धं भोक्तास्मि भोगानां वाग्दुरुक्तानि च क्षमे '। अध्यक्ष लोकनियुक्त असल्यानें त्याला गोड बोलूनच कार्यभाग साधावा लागे. याबाबत सभा जिंकण्याला उत्तम शस्त्र कोणतें असें श्रीकृष्णानें नारदास विचारलें असतां नारदानें जें उत्तर दिलें तें मोठें मार्मिक आहे. नारद म्हणाले, "सभा जिंकण्याला कठोर पोलादी शस्त्राचा मुळींच उपयोग नाहीं. त्यापेक्षां फुलाप्रमाणें कोमल पण अमोघ असें एक शस्त्र तुला सांगतों. तें म्हणजे दुसरें-तिसरें कोणतेंहि नसून मिष्टास भाषण हें होय." राजाला असल्या गोष्टींची पर्वा नसते.

## ग्रीकांनीं वर्णिलेलीं गणराज्यें

महाभारताप्रमाणें अलेक्झांडरच्या काळच्या ग्रीक ग्रंथकारांनीं प्राचीन भरतखंडाची जी माहिती लिहून ठेवली आहे तीमध्येंहि प्राचीन प्रजासत्ताक राज्यांचें वर्णन आलेलें आहे. ह्या ग्रंथकारांपैकीं मेग्यास्थेनिस हा चंद्रगुप्ताच्या दरबारीं वकील म्हणून कित्येक वर्षें राहिलेला होता. तो लिहितो कीं, "लोक आपल्या तक्रारी जेथें राजा असतो तेथें राजाच्या पुढें मांडतात; आणि जेथें लोक स्वयंशासित असतात तेथें न्यायाधीशांच्यापुढें मांडतात." ह्या ग्रीक ग्रंथकारांनीं कठ, अरिष्ट, सौभूति, शूद्रक, मालव, अंबष्ठ, पाताल, अशा अनेक गणांचीं वर्णनें दिलीं आहेत. अलेक्झांडरला आपल्या स्वारीमध्यें अनेक प्रजासत्ताक राज्यांशीं झगडावें लागलें. त्यांपैकीं कांहीं चांगलींच बलाढ्य होतीं असें ग्रीक ग्रंथकारांच्या वर्णनावरून दिसतें. बियास नदीच्या कांठीं वसलेलें राज्य फारच प्रबल असावें. कारण याच्या प्रबल सेनेपुढें आपला टिकाव लागणार नाहीं या कल्पनेनें अलेक्झांडरचें सैन्य भेदरून गेलें. आणि हें पाहून अलेक्झांडरनें आपला दिग्विजयाचा पुढील कार्यक्रम रद्द करून परत स्वदेशाची वाट धरली. ह्या प्रजासत्ताक राज्याचें नांव ग्रीक ग्रंथकारांनीं नमूद केलेलें नाहीं. पण त्याचें वैभव मात्र मुक्तकंठानें गायिलेलें आहे. ह्या राज्यांतील लोक कृषिविद्या आणि धनुर्विद्या ह्या दोन्हींतहि सारखेच निष्णात होते असें त्यांनीं लिहून ठेवलें आहे. त्यांच्या राज्यपद्धतीला महाजनपद्धति असें नांव दिलेलें असून त्यांच्या विधिमंडळांत ५००० सभासद असत, व प्रत्येक सभासद सरकारला सभासदत्वाची फी म्हणून एक हत्ती पुरवीत असे, असें ग्रीक ग्रंथकारांनीं लिहून ठेविलें आहे.

ग्रीकांनीं वर्णिलेल्या या गणराज्यांपैकीं कठगण हा एक सुप्रसिद्ध गण होय. उपनिषद्वाङ्मयामध्यें कठोपनिषद् म्हणून एक छोटें उपनिषद् असून त्यांतील नचिकेताची सुंदर कथा तुम्हीं वाचली असेलच.

मृत्यूशीं धिटाईनें संवाद करणारा बाल नचिकेत याच कठगणांतला. या लोकांची यजुर्वेदीय काठक संहिता फार प्रसिद्ध असून तिचा पाठ घरोघरीं चाले असें पतंजली सांगतो. या गणांविषयीं ग्रीकांनीं लिहिलें आहे कीं, ह्या राज्यांतील लोक कडवे लढवय्ये असून रणांगणावर शकटव्यूह रचण्यांत मोठे तरबेज होते. अलेक्झांडरच्या पूर्वी त्यांनीं पोरस राजाचा पराभव केलेला होता. त्यांच्यांतील स्त्रीपुरुष शारीरिक सौंदर्याला फार मान देत आणि विवाह स्वयंवरपद्धतीनें करीत. यांच्यांतील एक विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे स्पार्टन लोकांप्रमाणें मुलें जन्मास आल्याबरोबर सरकारी अंमलदाराच्या तीं हवालीं करण्यांत येत व त्यांपैकीं अशक्त व दुर्बल मुलांची हत्या करण्यांत येऊन सशक्त मुलेंच फक्त वाढविण्यांत येत. तसेंच स्त्रिया पतिनिधनानंतर सती जात. ह्यामुळेंच या राज्यांतील लोकांना मृत्यूचें भय कसलें तें उरलें नव्हतें. ह्या लोकांतूनच मृत्यूच्या डोळ्याशीं डोळा भिडवून त्याच्याशीं धिटाईनें वेदान्तविषयक तात्त्विक चर्चा करणारा सुप्रसिद्ध नचिकेत निघावा हें अगदीं स्वाभाविक नाहीं का?

ग्रीक ग्रंथकारांनीं ज्याचें वैभव गायिलेलें आहे असें एक दुसरें प्रजासत्ताक राज्य म्हणजे क्षुद्रक-मालव संघाचें! क्षुद्रक व मालव मिळून दोन राज्यांचा हा संघ होता. ग्रीक ग्रंथकार लिहितात कीं ह्यांच्याजवळ एक लाख सैन्य तयार होतें. ह्याहि सैन्यास तोंड देण्यास अलेक्झांडरचे शिपाई तयार नव्हते. म्हणून अलेक्झांडरनें त्यांच्याशीं तह ठरविला. त्या तहांतील अटींची वाटाघाट करण्याकरितां क्षुद्रक-मालव संघानें १०० प्रतिनिधि पाठविले होते. ह्या संख्येवरूनहि त्यांच्या लोकशाहीचें स्वरूप लक्षांत येईल. ग्रीक ग्रंथकार वर्णन करितात कीं, हे सर्वच १०० प्रतिनिधि दिसण्यांत भव्य आणि रुबाबदार असून त्यांनीं उंची भरजरी पोषाक घातले होते, आणि ते सर्व रथांत बसून आले होते. अलेक्झांडरनें त्यांना एक बडी मेजवानी दिली. ह्या मेजवानीकरितां सुंदर शामियाना उभारण्यात

आला होता. चहूंबाजूंना भरजरी पडदे सोडलेले होते, आणि ह्या प्रतिनिधींना बसण्याकरितां १०० सुवर्ण-आसनें मांडलीं होतीं.

अलेक्झांडरला त्याच्या स्वारींत भेटलेलीं आणखी दोन महत्त्वाचीं प्रजासत्ताक राज्यें म्हणजे अग्रश्रेणी व अंबष्ठ हीं होत. पहिल्याजवळ चाळीस हजार पायदळ व तीन हजार घोडदळ आणि दुसऱ्याजवळ साठ हजार पायदळ, सहा हजार घोडदळ आणि पांचशें रथ एवढें सैन्य होतें. दोन्ही राज्यांतील लोक फार शौर्यानें लढत व पराभव होणार अशी खात्री झाली कीं, अग्रश्रेणींतील सैनिक आपल्या स्त्रियांचा रजपुतांप्रमाणें जोहार करीत. अंबष्ठांची राज्यपद्धति ही लोकशाही-स्वरूपाची होती. ते सेनापतीहि निवडून देत. अलेक्झांडरशीं सामना देण्याकरितां आपणांतील तीन शूर योद्धयांना त्यांनीं सेनापति निवडलें होतें.

ग्रीक ग्रंथकारांनीं वर्णिलेल्या अनेक प्रजासत्ताक राज्यांपैकीं आणखी एकाचा उल्लेख केला म्हणजे पुरे. तें राज्य म्हणजे ब्राह्मणकजनपद हें होय. अलेक्झांडरचा चरित्रकार प्लुटार्क लिहितो कीं, ह्या ब्राह्मणी तत्त्वज्ञांनींहि अलेक्झांडरला इतरांच्यापेक्षां कांहीं कमी त्रास दिला नाहीं. कारण आजूबाजूचे जे राजे अलेक्झांडरशीं नमतें घेत त्यांची हे तत्त्वज्ञ चांगलीच निर्भर्त्सना करीत आणि पुनश्च चढाईला चिथावून देत. आणि यामुळेंच ह्या ब्राह्मणांपैकीं पुष्कळांना अलेक्झांडरनें चिडून फांसावर टांगलें!

परकीय ग्रंथकारांनीं केलेल्या प्रजासत्ताक वर्णनाशीं जुळते असे अनेक उल्लेख बौद्ध वाङ्मयांत सापडतात. जातक-ग्रंथांमध्यें लिच्छवी रा[illegible]चें बरेंच सविस्तर वर्णन सापडतें. त्यांचे चार मुख्य अधिकारी असत. ते सर्व निवडले जात. हे अधिकारी म्हणजे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेनापति आणि खजिनदार हे होत. पैकीं अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार ह्यांना राजा, उपराजा आणि भंडागारिक अशा संज्ञा असत. त्यांची

राजधानी वैशाली ह्या गांवीं होती. एकंदर राज्यांतील लोकसंख्या १६८००० असून विधिमंडळांत एकंदर ७७०७ सभासद असत व त्या सर्वांनाच राजा किंवा राजक ही संज्ञा असे. उत्तरकालीं लिहिलेल्या 'ललितविस्तार' ह्या ग्रंथामध्यें ह्या सरंग राजुकांची थट्टाहि केलेली आढळून येते. त्यांत लिहिलें आहे, कीं ह्या वैशाली-च्या लोकांमध्यें वृद्ध आणि ज्येष्ठ अशांना मानसन्मान दर्शविण्याची कांहींच चाल नाहीं. कोणी कोणाचें शिष्यत्व पत्करण्यास तयार नाहीं. जो उठला तो म्हणतो, कीं 'मी राजा', 'मी राजा', "एकैक एव मन्यते अहं राजा अहं राजा" इति । ही थट्टा असली तरी त्यावरून तेथें लोकशाही नांदत होती हें स्पष्ट आहे. शांतिपर्वान्तर्गत राजधर्मांत गणराजपद्धतीचें वर्णन आहे, त्यांत 'जात्या च सदृशाः सर्वे कुलेन सदृशाः तथा' म्हणजे गणराज्यांतील सर्व लोक हे कुलानें व जातीनें एकाच समान दर्जाचे असतात असेंच म्हटलें आहे.

आतां या प्रजासत्ताक राज्यांच्या विधिमंडळांतील कारभार आधुनिक लोकशाहीच्या तत्त्वाला सर्वस्वीं धरून कसा चाले हें पाहूं या. याची माहिती बौद्ध ग्रंथांतून मिळते. ती मुख्यतः धार्मिक संघांतील कारभारा-संबंधीं मिळते हें खरें. तथापि राजकीय संघांतील कारभाराविषयीं अटकळ बांधण्यास ती अनुपयोगी नाहीं. खास राजकीय संघांतील कारभार कोणत्या तऱ्हेनें चाले याची माहिती देणाराहि एक उल्लेख आढळतो तो आधीं पाहूं. शाक्यांच्या राजधानीला एकदां कोसल देशच्या बलाढ्य राजानें वेढा घातला. शाक्यांना आपल्या राजधानीचें रक्षण करणें अशक्यच होतें म्हणून कोसलाधिपतीनें वेढ्यांत सापडलेल्या लोकांस निरोप पाठविला, कीं तुम्ही शरण येऊन आपणहून नगराचे दरवाजे खोलावे हें बरें ! निरोप पोंचतांच लोक म्हणाले, कीं आपण सर्वजण एकत्र गोळा होऊन दरवाजे उघडणें इष्ट आहे कीं अनिष्ट आहे हें सर्वांच्या मतानें ठरवूं या. सगळेजण गोळा झाले, पण कांहींजण म्हणाले, दरवाजे उघडावे, दुसरे म्हणूं लागले उघडूं नये!

वादविवादानें निकाल लागेना तेव्हां शेवटीं असें ठरलें, कीं जमलेल्या सर्व लोकांचीं मतें मोजून बहुमतानें होईल तो निर्णय मान्य करावा.

## गुप्त मतदानपद्धति

अधिक तपशीलांत शिरावयाचें तर सभा भरली असतां मतांची मोजणी कशी करीत, मतें देतांना हल्लींच्याप्रमाणें गुप्त मतदानाची पद्धति कित्येक वेळीं कशी अवलंबिली जात असे, मतें नोंदण्याकरितां सभासदांना एकेक शलाका कशी दिली जात असे, सभा कायदेशीर होण्याकरितां उपस्थित असणाऱ्या सभासदांची किमान मर्यादा कशी पाळावी लागे, ठराव कोणत्या पद्धतीनें मांडले जात, त्यांचें त्रिवार वाचन कसें होई, व नंतर ते एकमतानें वा बहुमतानें पास वा नापास कसे केले जात, ह्याची सविस्तर व मोठी मनोरंजक माहिती बौद्ध ग्रंथांतून आढळते. मत आणि ठराव यांना ह्या प्राचीन वाङ्मयांत छंद आणि प्रतिज्ञा असे पर्याय-शब्द होते. बौद्ध वाङ्मयांत हे शब्द जेथें वापरले आहेत तेथें त्यांचे अर्थ, व्याख्या किंवा लक्षणें कांहींच सांगितलेलीं नाहींत; यावरून या संज्ञा पूर्वापार रूढ झालेल्या व लोकांच्या चांगल्या परिचयाच्या असल्या पाहिजेत. बुद्धाच्यापूर्वी धार्मिक संघ अस्तित्वांत नसून बुद्धानें ह्या संज्ञा राजकीय संघांतूनच उचलल्या असल्या पाहिजेत असें जयस्वाल यांनीं प्रतिपादलें आहे. नवा अध्यक्ष नेमण्याच्या वेळेला सर्व नागरिकांचें मत घेण्याचाहि रिवाज असावा असें दिसतें. एका जातकामध्यें वर्णन आढळतें कीं, अध्यक्षाच्या किंवा राजाच्या निवडणुकीकरितां सर्व नागरिकांची सभा बोलावण्यांत आली व त्यांनीं एकमतानें ( एकछंदा भूत्वा ) राजाची निवडणूक केली. या ठिकाणीं नुसत्या विधिमंडळाची सभा बोलाविली असा उल्लेख नसून सर्व नागरिकांची सभा बोलाविली असा उल्लेख असल्यानें रिफरेंडमची किंवा सर्व जनतेचा कौल घेण्याची पद्धतीहि प्रसंगविशेषीं अवलंबिली जात असे असें दिसतें.

विधिमंडळाच्या सभांतून कामकाज कोणत्या पद्धतीनें चाले याची कल्पना बौद्धांच्या धार्मिक संघांतील एतद्विषयक पद्धतीवरून चांगली बांधतां येते. बौद्ध वाङ्मयांतील विनयपिटक ह्या ग्रंथामध्यें बौद्धसंघांतील कामकाजाविषयीं तपशीलवार माहिती दिलेली आहे. त्यांतून एकदोन उदाहरणें दिलीं तरीहि त्या वेळच्या सभा चालविण्याच्या पद्धतीची कल्पना येईल.

एकदां संघांतील ऊवाल नांवाच्या भिक्षूच्या हातून कांहीं आगळीक घडली आणि ती तो बऱ्या बोलानें कबूलहि करीना; तेव्हां त्याच्या-विरुद्ध संघाच्या बैठकींत ठराव मांडून त्याला शिक्षा करणें प्राप्त झालें. त्या वेळचें वर्णन सापडतें तें असें: सर्व सभासद उपस्थित झाल्यावर एका भिक्षूनें सर्वांना उद्देशून पुढील भाषण केलें:—“सभ्य हो, ऐका. या ऊवाल नांवाच्या भिक्षूच्या हातून आगळीक घडलेली आहे, आणि संघा-मध्यें आम्ही त्याची चौकशी करूं लागलों तेव्हां तो भलभलतें खोटेंनाटें सांगूं लागला. म्हणून मी म्हणतों कीं या गोष्टीचा विचार करण्याचा योग्य समय प्राप्त झाला आहे असें संघाला वाटत असेल, तर संघानें ‘तस्य पापीय शिक्षाकर्म’ याची अंमलबजावणी करण्यास तयार व्हावें. माझी ही सूचना ज्यांना मान्य असेल त्यांनीं स्वस्थ राहावें; ज्यांना मान्य नसेल त्यांनीं विरुद्ध बाजू मांडावी.” कोणी विरुद्ध बोलत नाहीं असें पाहून तो भिक्षु पुन्हा म्हणाला, “मी माझी सूचना पुन्हा एकदां सर्वांच्यापुढें मांडतों, ज्यांचें मत विरुद्ध असेल त्यांनीं बोलून दाख-वावें.” कोणीच बोलत नाहीं असें पाहून तो भिक्षु पुनश्च म्हणाला, “मी आपली सूचना आतां तिसऱ्यांदा संघापुढें मांडीत आहे. विरुद्ध कोणी असेल त्यानें बोलावें. सभ्य हो! तुमच्यापैकीं कोणीच बोलत नाहीं, त्यावरून मी असें समजतों कीं ह्या ऊवाल भिक्षूला शिक्षा करण्याची माझी सूचना सर्व संघाला मान्य आहे.”

प्रत्येक सूचनेचा किंवा ठरावाचा त्रिवार उच्चार करावाच लागे आणि तसा न केल्यास ती गैरशिस्त समजली जाई. प्रत्येक सभेला

सर्वच भिक्षूंना हजर राहतां येई असें नव्हे. आजारामुळें किंवा अन्य कांहीं कारणामुळें कांहीं भिक्षूंना सभेला जातां येत नसे. अशा वेळीं मतमोजणी सशास्त्र व्हावी व गैरहजर सभासदांना अन्याय होऊं नये म्हणून गैरहजर सभासदांचींहि मतें मागविण्यांत येत. मतमोजणी-करितां भिन्नभिन्न रंगांच्या शलाका भिक्षूंना देण्यांत येत. नंतर शलाका-ग्राहक म्हणून अधिकारी असे तो शलाका गोळा करी आणि भूयसी पद्धतीनें म्हणजेच बहुमतानें ठरावाच्या बाजूनें किंवा विरुद्ध निकाल देण्यांत येई. मतें देण्याच्या तीन पद्धतींचें वर्णन आढळतें. पहिली उघड: हीमध्यें सभासद आपलें मत उघड बोलून दाखवीत. दुसरी सकर्णज्ञापक: हीमध्यें सभासद आपलें मत अधिकाऱ्याचें कानांत हळूच सांगत. आणि तिसरी गूढ म्हणजे गुप्तमतदानपद्धति: हीमध्यें भिन्न भिन्न रंगांच्या शलाकांचा उपयोग करीत. एखादे वेळीं कायद्याचा किंवा शास्त्रार्थाचा प्रश्न निघाला आणि त्यावर गैरमाहितगाराकडून निष्कारण वाद माजतो आहे असें आढळून आलें, तर त्या विषयांतील तज्ज्ञांची पोटकमिटी स्थापून त्या कमिटीचें मत मागविण्यांत येई. सभेंत जें कामकाज चाले त्याची तपशीलवार लेखी नोंद ठेवण्याचीहि व्यवस्था असे.

बौद्धांच्या धार्मिक संघांतील ही सर्व पद्धति त्यांनीं त्यांच्यापूर्वींच रूढ असलेल्या गणसंघ किंवा लोकशाही स्वरूपाच्या संस्थांतील पद्धतीवरून उचललेली असावी. ह्या मताला पोषक असें खुद्द बुद्धाचेंच एक वचन सापडतें. एकदां बरेचसे भिक्षु आसपासच्या गांवांत भिक्षा मागण्यास गेले असतां एका गृहस्थानें त्यांना विचारलें. "अहो, तुम्ही एकंदर आहांत कितीजण?" भिक्षु गोंधळले. त्यांना नक्की संख्या सांगतां येईना. ग्रामस्थांना चमत्कारिक वाटलें व त्यांनीं सर्व हकिकत भगवान् बुद्धाच्या कानांवर घातली. त्या वेळीं बुद्धानें सर्व भिक्षूंना बजावलें कीं, "गणांमध्यें ज्याप्रमाणें शलाका घेऊन सभासदांची शिरगणती करितात त्याप्रमाणें तुम्हीहि पण दर उपवासाच्या दिवशीं आपली शिरगणती

नक्की करीत जा." बुद्धाच्या ह्या वचनांतील "गणामध्यें करितात त्याप्रमाणें" हे शब्द महत्त्वाचे आहेत. ह्यावरून बुद्धानें ही पद्धति नवी निर्माण केली नसून पूर्वी गण संस्थांमध्यें रूढ असलेल्या पद्धतीचा त्यानें आपल्या धार्मिक संघांत अवलंब केला होता असें दिसतें.

साम्राज्यशाही कल्पनेच्या उदयानंतर वर वर्णिलेल्या लोकशाही स्वरूपाच्या संस्था कालचक्राच्या परिवर्तनांत मागें पडल्या. या पद्धतींतील बहुतेक राज्यें हीं लहान आकाराचीं व लहान प्रमाणाचीं होतीं. बलाढ्य अशा साम्राज्यसत्तेशीं तीं टक्कर देऊं शकत नाहींत हें लक्षांत आल्यानंतर राजशाही आणि साम्राज्यशाही यांचाच पुरस्कार येथून पुढें करण्यांत येऊं लागला. लोकशाही राज्यांपैकीं कांहीं थोडीं राज्यें बरींच बलिष्ठ अशीं होतीं. कांहींतील प्रजेचा तर लढाई करणें हाच मुख्य पेशा होता. तरी हीं अशीं राज्यें बलाढ्य सम्राटापुढें टिकाव धरूं शकत नाहींत असाच अनुभव आला. लोकशाही पद्धतींत निरनिराळे पक्ष उत्पन्न होत, त्यांच्यांत चुरस माजे, फाटाफूट होई व त्यामुळें एकसूत्रीपणाच्या अभावीं तीं एकंदरींत निर्बल ठरत. 'भेदमूलो विनाशो हि गणानां उपलक्षये' असा महाभारतकारानें शेरा मारला आहे. ह्यामुळें प्राचीन ग्रंथांत उल्लेखिलेल्या अनेक प्रजासत्ताक राज्यांपैकीं बहुतेक सर्व नष्ट झालीं; आणि राजशाहीचा आणि साम्राज्यशाहीचा पुरस्कार इतक्या जोरानें आणि उत्साहानें करण्यांत आला कीं प्रजासत्ताक राज्यपद्धति भरतखंडांत एके काळीं मोठ्या प्रमाणावर नांदत होती ह्याची स्मृतिहि नष्ट झाली. साम्राज्यशाहीच्या प्रसारानंतरहि टिकून राहिलेलें एक महत्त्वाचें असें प्रजासत्ताक राज्य म्हणजे लिच्छवी गणाचें तेवढें आढळतें. हें राज्य बुद्धाच्यापूर्वी म्हणजे खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्याहि पूर्वीपासून अस्तित्वांत असून गुप्तांच्या कारकीर्दीपर्यंत म्हणजे खिस्तोत्तर तिसऱ्या-चवथ्या शतकापर्यंत लोकशाही स्वरूपांत टिकून होतें. बाकीचीं बहुतेक प्रजासत्ताक राज्यें साम्राज्यशाहीच्या पुरांत वाहून गेलीं.

# इतर राज्यपद्धति

राज्यपद्धतीचे इतर अनेक प्रकारहि प्राचीन भारतीयांनीं करून पाहिले होते. मंत्रपुष्पांतील स्वाराज्य, वैराज्य वगैरेचा प्रारंभीं उल्लेख केलाच आहे. स्वाराज्य पद्धतींतील अध्यक्षाला स्वराट् म्हणत. तैत्तिरीय ब्राह्मणांमध्यें स्वाराज्य या संज्ञेचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. त्या ब्राह्मणांत असें वचन आहे कीं, "जो कोणी विद्वान् वाजपेय नांवाचा यज्ञ करील त्याला स्वाराज्याची प्राप्ति होईल. तो आपल्या बरोबरीच्या माणसांच्या पुढें जाईल आणि सर्वजण त्याला ज्येष्ठ म्हणून मान देतील." (य एवं विद्वान् वाजपेयेन यजति गच्छाति स्वाराज्यं अयं समानानां पर्येति तिष्ठन्तेऽस्मै जैष्ठयाय). ऐतरेय ब्राह्मणावरून असें कळतें कीं, या प्रकारची स्वाराज्य पद्धति ही सिंधुनदीच्या मुखाजवळील भागांत प्रचलित होती. वैराज्य नांवाची जी राज्यपद्धति होती ती सर्वस्वीं लोकशाही स्वरूपाची होती. ह्या राज्यपद्धतीमध्यें कोणीहि एक व्यक्ति राजा किंवा अध्यक्ष म्हणून निवडली जात नसे, तर सर्वच सभासदांना राज्याभिषेक करण्यांत येई, सर्वच राजे असत आणि सर्वांच्याच संमतीनें राज्यकारभार चाले. लोकशाहीच्या तत्त्वाचा विसर पडल्यामुळें प्राचीन संस्कृत टीकाकारांना वैराज्य या शब्दाचा नीट अर्थच लावतां येतनासा झाला होता; आणि म्हणून ते वैराज्य म्हणजे विशेष प्रकाशमान असणारे (विशेषेण राजते!) असा कांहीं तरी गुळमुळीत अर्थ करीत. बऱ्याच उत्तरकालीं लिहिलेल्या शुक्रनीतीमध्यें सामंत, मांडलिक, राजा, महाराजा, स्वराट्, सम्राट्, विराट्, सार्वभौम अशी चढती श्रेणी दिली आहे, त्यांत विराटाचें वैराज्य हें लोकशाही राज्य नसून राजशाही आहे. चाणक्याच्या अर्थशास्त्रामध्येंहि जेथें हा वैराज्य शब्द येतो (८।२) तेथेंहि जुना टीकाकार माधवयज्वामिश्र हा त्याचा अर्थ परकीय सरकार असा देतो व आधुनिक टीकाकार गणपतिशास्त्री हेहि त्याचा अनुवाद

करितात. पण जयस्वाल यांच्या मतें तो अर्थ चुकीचा असून, वैराज्य म्हणजे राजविरहित म्हणजेच प्रजासत्ताक राज्य असा त्याचा अर्थ केला पाहिजे. जयस्वालांचा हा अर्थ चाणक्यापुरता संशयित आहे असें मला वाटतें. पण वैराज्यराज्यपद्धति ही नुसती काल्पनिक नसून अशा प्रकारची पद्धति उत्तर कुरु व मद्र देशांमध्यें अमलांत होती असें ऐतरेय ब्राह्मणांत लिहिलेलें आहे तेथें लोकशाही हा अर्थ संभवनीय आहे.

प्राचीन भारतीयांनीं राजकारणांत केलेल्या अनेक प्रयोगांपैकीं एक अभिनवप्रयोग म्हणजे द्वैराज्यपद्धति हा होय. ह्या पद्धतीमध्यें एकाच वेळीं दोन राजे सिंहासनावर बसत व दोघांचाहि अंमल एकाच काळीं चालू राही. अशा प्रकारची राज्यपद्धति अवंति येथें अमलांत होती व विंदु आणि अनुविंदु असे दोन राजे एकाच वेळीं संयुक्तपद्धतीनें राज्यकारभार हाकीत होते असें महाभारतावरून दिसतें. तसेंच दुसरा कनिष्क व हुविष्क हे राजेहि एकाच वेळीं राज्य करीत होते. ह्या द्वैराज्यपद्धतीला भरतखंडाबाहेर अन्यत्र जोड क्वचितच सापडेल. हिंदुस्थानांत संयुक्त कुटुंबपद्धतीची कल्पना बद्धमूल झालेली असल्यामुळें द्वैराज्याची कल्पना म्हणजे बंधु-बंधु किंवा पिता-पुत्र अशा दोघांनीं मिळून संयुक्तपद्धतीनें राज्यकारभार हाकण्याची कल्पना हिंदुस्थानांत व्यवहार्य ठरूं शकली. दोन राज्यांचा मिळून संघ निर्माण होईल त्या वेळींहि दोन्ही राज्यांतील लोकनियुक्त अध्यक्ष संयुक्तपद्धतीनें राज्यकारभार हाकीत. अंधकवृष्णीसंघाचा वर उल्लेख आलाच आहे. या संघामध्यें वृष्णींच्या बाजूनें श्रीकृष्ण आणि अंधकाच्या बाजूनें बभ्रु असे दोन अध्यक्ष एकाच वेळीं राज्यकारभार पाहत.

वैराज्य, द्वैराज्य ह्याप्रमाणें शासनपद्धतीचा आणखी एक प्रयोग म्हणजे अराजकपद्धति हा होय. ह्या पद्धतींत राजा तर नसेच पण राज्यकारभार चालविण्यासाठीं अध्यक्ष किंवा कोणी पुढारीहि लोकांनीं

निवडून दिलेला नसे. सर्व व्यवहार लोकांनीं आपण होऊनच स्वतंत्रपणें पाहावयाचे. त्यांच्यावर शासन अथवा नियमन असें कोणाचेंच नसे. ही पद्धति केवळ काल्पनिक किंवा ध्येयभूत म्हणून ग्रंथांतून वर्णिलेली नसून तिचा अनुभव भारतीयांनीं प्रत्यक्ष घेऊन पाहिलेला असावा असें मानावयास जागा आहे. जैनांच्या आचारांग सूत्रामध्यें अरायाणि, गणरायाणि, युवरायाणि, दोराजानि, वैराज्यानि, विरुद्धराज्यानि, अशा भिन्नभिन्न राज्यपद्धतींचा एकत्र उल्लेख आला आहे. त्यांतील गणराज्य व युवराज्य याप्रमाणें अराज्य किंवा अराजक-राज्य हेंहि काल्पनिक नसून खरीखुरी अस्तित्वांत असलेली राज्यपद्धति असावी असें दिसतें. वर दिलेल्यापैकीं कोणतीहि राज्यपद्धति जेथें अस्तित्वांत आहे अशा कोणत्याहि देशांत जैनयतींनीं प्रवेश करूं नये, कारण अशा ठिकाणीं गेल्यास हेर म्हणून त्यांची बिटंबना होण्याचा संभव आहे असें त्या सूत्रांत सांगितलें आहे. ह्यावरून इतर पद्धतीं-प्रमाणें अराजक पद्धतीचीं राज्येंहि साक्षात् अस्तित्वांत होतीं असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. ही राज्यपद्धति चिरकाल टिकणें हें अशक्यच होतें. लोक सुखासुखी गुण्यागोविंदानें नांदतील इतक्या उच्च पदवीला मानव अद्यापि पोंचलेला नाहीं; त्यामुळें ही पद्धति टिकूं शकली नाहीं.

वर वर्णिलेल्या सर्वच पद्धति ह्या शास्त्रसंमत असून त्या सर्वांमध्यें राज्याभिषेकाचा विधि यथासांग करण्यांत येई. राजा आणि युवराज यांचाच तेवढा राज्याभिषेक होई असें नव्हे, तर लोकनियुक्त असा जो अध्यक्ष याच्या बाबतींतहि राज्याभिषेकाचा विधि होई; इतकेंच नव्हे तर विधिमंडळाच्या सर्व सभासदांना अभिषेकविधि करावा लागे. लिच्छवी आणि मल्ल अशा दोन राज्यांमध्यें असले अभिषेक-समारंभ प्रत्यक्ष होत असत असे उल्लेख आढळतात. कालांतरानें द्वैराज्य, वैराज्य, गणराज्य वगैरे सर्वच पद्धति साम्राज्यपद्धतींत बुडून गेल्या.

पाश्चात्य राष्ट्रांच्या इतिहासांतहि असाच प्रकार आढळतो.

त्यांच्यामध्येंहि प्राचीनकाळीं ग्रीसमध्यें लहानलहान एकेक शहराच्या आकाराचीं लोकशाही स्वरूपाचीं अथवा महाजनस्वरूपाचीं राज्यें होतीं. कांहीं काल तीं चांगलीं नांदलीं. पण शकपूर्व चवथ्या शतकांत मॅसिडोनियांतील राजशाही पद्धतीशीं झुंजण्याचा प्रसंग प्राप्त झाला, तेव्हां तीं निर्बल ठरलीं. त्यानंतर युरोपमध्यें लोकशाहीपद्धति जी एकदां गाडली गेली ती अठराव्या शतकांत फ्रान्समध्यें लोकांनीं बॅस्टाइल नांवाचा तुरुंग फोडून तिला गुदमरलेली बाहेर काढीपर्यंत दृष्टीस पडली नाहीं. त्यानंतर मात्र लोकशाहीच्या तत्त्वानें मूळ धरलें आणि युरोपचें पाऊल पुढें पडत चाललें. फ्रान्समधील क्रांतीनंतर प्रतिक्रांत्या अनेक वेळा झाल्या; पण लोकशाहीचें तत्त्व त्यांना पुरून उरलें. आजहि झोटिंगशहांनीं लोकशाहीची गळचेपी केल्याचें दिसत असलें तरी या झोंटिंगशहांच्या पाठीशीं मोठें लोकमत आहे हें विसरतां येत नाहीं.

मध्य युगांत वाळून गेलेल्या लोकशाहीच्या वल्लीला युरोपांत जशी नवी पालवी फुटली तसा आपल्या देशांतहि प्राचीन काळीं टवटवीत असलेल्या पण मध्यंतरीं वठून गेलेल्या या लोकशाहीचा अवतार पुनश्च आजच्या काळीं संस्कृति-संगमावर दिसूं लागणार हें निश्चित होय. असो.

गेल्या व चालू प्रकरणांत आपल्या प्राचीन संस्कृतींतील विस्मृतींत लोपलेल्या दोन अंगांचें म्हणजे विश्वसंचार व लोकशाही यांचें दिग्दर्शन केलें. विश्वसंचारावरून आपले पूर्वज सर्व जगभर कसे हिंडत हें स्पष्ट झालेंच आहे. तसे हिंडत असतांना परसंस्कृतीच्या लोकांशीं त्यांचा संबंध येई, संस्कृति-संगम होई व देवाण-घेवाण होई. तरी आतां संस्कृति-संगमावरील हीं प्राचीन दृश्यें अवलोकन करूं या.

# प्रकरण दहावें

# प्राचीन संगमावरील देवाण-घेवाण

गेल्याच्या मागील प्रकरणीं पाहिल्याप्रमाणें जगभर संचार करणारे आपले पूर्वज हे कूपमंडूकवृत्तीचे नव्हते हें आतां सांगावयांस नकोच. त्यांनीं बाह्यांना आपली विद्या दिली आणि जरूर तेथें त्यांची उचललीहि. मात्र हें प्रारंभींच अभिमानानें सांगितलें पाहिजे कीं, या देवघेवींत देकाराचा भाग फार मोठा असून घेकाराचा अत्यल्प आहे. कारण आज युरोप खंडाला अखिल जगाच्या वर्धमान संस्कृतीचें केंद्र म्हणून जें स्थान प्राप्त झालें आहे तेंच गौरवाचें, अभिमानाचें स्थान एके काळीं हिंदुस्थानास लाधलें होतें. नव्या कल्पना, नवे प्रयोग, नवे आचार नवे विचार, नवी राहणीसाहणी हीं सर्व आज प्रथम युरोपांत जन्मास येतात आणि मग सर्व जगभर पसरतात. तीच स्थिति एके काळीं हिंदुस्थान अनुभवीत होतें. शास्त्र, कला, वाङ्मय, तत्त्वज्ञान या सर्वांचें केंद्र ही भरतभूमि होती. आज उच्च शिक्षणाकरितां जगाच्या सर्व भागांतून विद्यार्थी युरोपमध्यें जातात तसे ते पूर्वी हिंदुस्थानांत येत असत. बुद्धाच्या मायभूमीचें दर्शन घेण्याकरितां व धर्मग्रंथांचा अभ्यास व संग्रह करण्याकरितां आलेल्या युवान च्वंग, फाहायन वगैरे चिनी प्रवाशांचीं नांवें सर्वविश्रुतच आहेत. पण पूर्वेकडील चिन्यांप्रमाणें पश्चिमेकडील ग्रीस, इराण, बगदाद येथूनहि विद्यार्जनाकरितां ज्ञानभिक्षु येथें येत हें सांगितलें पाहिजे.

मागील प्रकरणीं धर्म, व्यापार, राजकारण यांच्या उद्देशानें भारतीयांनीं जग कसें पालथें घातलें याचें दिग्दर्शन झालें. त्यांत आफ्रिका, अमेरिका वगैरे दूरदूरच्या प्रदेशावर भारतीयांनीं आपल्या संस्कृतीचा ठसा

कसा उमटविला होता व आशिया खंडांतील पूर्वेकडील द्वीपकल्पें, चीन, जपान, मध्य आशियांतील तिबेट या सर्व देशांना भारतीय संस्कृतीनें धार्मिक व व्यावहारिक दृष्ट्या कायमचें ऋणी करून कसें ठेविलें हें पाहिलें. पण प्रस्तुत आपल्या संस्कृतीचा संगम युरोपियन संस्कृतीशीं होत असल्यानें युरोपला आपल्या पूर्वजांनीं कोणती देणगी दिली हें समजावून घेणें अधिक अगत्याचें आहे. म्हणून आतां या प्राचीनकालीन संगमावरील देवघेवीचीं दृश्यें पाहूं या. येथेंहि धर्म, तत्त्वज्ञान, शास्त्र, कला वगैरे अनेक विषयांत भरतखंडांतून ज्ञानप्रवाह युरोपांत गेले आहेत याविषयीं इतिहासाच्या दप्तरीं शहाजोग पुरावा नमूद आहे. अर्थात् तो मान्य करण्यास ग्रीस हेंच जगाचें सांस्कृतिक आद्यपीठ होय अशी मनाची अढी बसलेले युरोपियन पंडित प्रथम तयार नसत, आणि त्यांतहि ग्रीसमध्यें ज्ञानकिरण बाहेरून कोठून कांहीं आले असलेच तरी ते आज आपण सर्वस्वीं जित केलेल्या भरतखंडांतून आले असावेत हें मान्य करणें तर त्यांच्या जिवावर येई. याचा उल्लेख पहिल्या प्रकरणीं व अन्यत्र केलाच आहे. जित भरतखंडाचें ऋण विजेत्या युरोप खंडानें मोकळ्या मनानें मान्य करणें ही गोळी गिळण्यास किती कडू होती याविषयीं पाश्चात्यांतीलच एक पंडित मॅक्स मुल्लर एका बंगाली गृहस्थांना लिहिलेल्या एका पत्रांत लिहितो—'मला असें कांहीं आमच्यांतले विद्वान् म्हणविणारे माहीत आहेत कीं, आपल्या तोडीचें किंवा वरचढहि ज्ञान प्राच्य राष्ट्रांत असूं शकेल ही कल्पनाच मुळीं यांच्या डोक्यांत शिरत नाहीं... मागें एकदां भारतीयांची पंचावयवी अनुमानपद्धति ही सर्वश्रेष्ठ होय असें प्रतिपादन करण्याचें मीं धाडस केलें होतें. पण युरोपियन तर्कप्रणालीपेक्षां अधिक शास्त्रशुद्ध असें जगांत अन्यत्र कांहीं असूं शकेल हा प्रकाश आमच्या तर्कतीर्थांच्या डोक्यांत पडेल तेव्हां ना!' (बियॉग्राफिकल् एसेज्)

पण भारतीय संस्कृतीचा परिणाम युरोपियन संस्कृतीवर झाला आहे ही बाब आतां संशोधनानें सिद्ध होत चालली आहे. आणि सगळेच

पंडित प्रतिनिविष्ट नसल्यानें दिलदार वृत्तीच्या व सत्यप्रिय युरोपियन पंडितांनीं ती मान्यहि केली आहे.

हा परिणाम तीन निरनिराळ्या काळीं घडून आलेला दिसून येतो. पहिला म्हणजे प्राचीन ग्रीसच्या भरभराटीच्या काळीं, प्लेटो, ॲरिस्टॉटल, पायथागोरस यांच्या वेळीं. तदनंतर ग्रीस व रोमच्या नाशोत्तर युरोपांत कांहीं काल तमोयुग जें अवतरलें, त्याच्या शेवटीं फिरून ज्ञानाचा उदय झाला तो सारासिनांच्या करवीं. पण हे सारासीन नुसते ज्ञानवाहक असून ज्या ज्ञानगंगेतील उदक ते नेत होते ती गंगा भरतखंडांत वाहत होती. या सारासिनांनीं भारतीयांचें हर विषयांतील ज्ञान भरभरून आपल्या देशांत नेलें आणि पुढें युरोपांत त्याचा प्रसार केला. सारासिनांच्या हस्तें युरोपमध्यें भारतीयांच्या शास्त्रकलांचा प्रसार होण्याचा काल हा दुसरा काल होय. आणि तिसरा म्हणजे शें-दीडशें वर्षांपूर्वी संस्कृत भाषेचें मानवी संस्कृतीच्या इतिहासांतील मौलिक महत्त्व युरोपियनांना कळून आलें तेव्हां सुरू झाला तो. हा तिसरा काळ अद्याप चालूच आहे.

## राजकीय घसट

पहिल्या म्हणजे खिस्ती शकपूर्वकालासंबंधीं प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, फार प्राचीन काळापासून भरतखंडाचें ग्रीस, ईजिप्त आणि बाबिलोनिया या प्रांतांशीं दळणवळण सर्रास सुरू होतें. ग्रीकांचा भारतीयांशीं संबंध आला तो शिकंदराच्या स्वारीच्या वेळींच प्रथम आला असें नव्हे. त्याच्यापूर्वींहि त्यांची चांगली जानपछान होती. व्यापारनिमित्तानें इराणी आखातांतून दर्यानें, आणि अफगाणिस्थानांतून खुष्कीनें भारतीयांची ये-जा नेहमीं सुरू असे. बावेरू ऊर्फ बाबिलोनिया येथें व्यापारास्तव जाणाऱ्या सौदागरांचा उल्लेख गेल्या प्रकरणीं आलाच आहे. शिवाय एकीकडे ग्रीस व दुसरीकडे हिंदुस्थान या दोहोंना एकत्र आणणारी एक विशेष राजकीय घटना म्हणजे पारसी साम्राज्यांच्या

पंखाखालीं ह्या दोन्ही देशांचा कांहीं भाग एके काळीं आला होता ही होय. शकपूर्व ५१०च्या सुमारास इराणांत सम्राट् दरायस हा सिंहासनावर बसला त्या काळीं सिंधु नदीच्या आसपासचा प्रदेश हा त्यानें जिंकून आपल्या साम्राज्यास जोडला होता. श. पू. ४८० मध्यें त्यानें ग्रीसवर स्वारी केली तेव्हां तर त्याच्या लष्करांत भारतीय सैनिक लढत होते. उलट ग्रीसमधूनहि लष्करी आणि मुलकी अधिकारी म्हणून पुष्कळ लोक हिंदुस्थानांत येत. त्यांत आशिया मायनरमधील आयोनिया येथील प्रमुख असत. या आयोनियांतील ग्रीकांनाच संस्कृत भाषेंत यवन किंवा प्राकृत भाषेंत योन ही संज्ञा पडली होती. आणि अष्टाध्यायींत यवनानी हा शब्द असल्यानें ती पाणिनीच्या काळाइतकी म्हणजे शिकंदराच्या पूर्वी चांगलीं चारपांच शतकें रूढ झालेली होती. शिकंदराच्या स्वारीनंतर भारतीयांचा आणि ग्रीकांचा हा संबंध अधिकच बळावला. शिकंदर जेता म्हणून मिरवला तरी शिकंदराचा वारसदार सेल्युकस याला चंद्रगुप्ताशीं नमतें घ्यावें लागलें आणि भारतीयांशीं स्नेहसंबंध जोडावा लागला. त्यानें आपली एक कन्या चंद्रगुप्ताला दिली होती व त्याचा वकील मेग्यास्थेनिस हा पाटलीपुत्र येथें चंद्रगुप्ताच्या दरबारीं पुष्कळ वर्षं होता हें सुशिक्षितांना सांगावयास नकोच. चंद्रगुप्ताच्या नंतर त्याचा पुत्र बिंदुसार हा राज्यारूढ झाला. याच्याहि दरबारीं ग्रीक राजा पहिला ॲंटिओकस याच्याकडून वकील अनेक वेळां आला होता. या वकिलाचें नांव डायमॅकस. या वकिलामार्फत बिंदुसाराचा व ॲंटिओकसचा मजेचा पत्रव्यवहार चाले. बिंदुसारानें लिहिलें होतें म्हणे, कीं आम्हांला ग्रीसमधील उंची मद्य, सुकीं द्राक्षें आणि वादकुशल असा एक सोफिस्ट पंडित पाठवून द्यावा. त्यावर ग्रीक राजानें उत्तर धाडलें कीं, आपल्या विनंतीप्रमाणें द्राक्षें आणि द्राक्षकन्या पाठवून देतों; पण सोफिस्ट पंडितांना पाठवून देणें हें आमच्या चालीरीतीस शोभण्यासारखें नाहीं! याच ॲंटिओकस राजाच्या देशांत अशोकानें आपले धर्मोपदेशक पाठविल्याचा उल्लेख मागील प्रकरणीं आलाच

आहे. याच काळीं अलेक्झांड्रियाचा टॉलमी फिलडेल्फस यानें डायोनिसस यास हिंदुस्थानांत पाठविलें होतें. अशोकानंतर भारतीय साम्राज्य कांहीं काळ दुबळें झालें आणि ग्रीक राजांनीं भरतखंडाचा बराच भाग काबीज केला. शकपूर्व १८० च्या सुमारास डेमिट्रियस यानें सिंध व काठेवाड हे प्रांत बळकावले. तो किंवा त्याच्यानंतर वीस वर्षांनीं येणारा मिनँडर यानें आपल्या राज्याची सरहद्द थेट मथुरेपर्यंत भिडविली होती. त्याच्यानंतर पन्नास-पाऊणशें वर्षांनीं ग्रीक मागें पडून भरतखंडाच्या राजकीय पटावर सिथियन हे परके राजे वावरूं लागले. राजकीय घडामोडींचा हा त्रोटक उल्लेख भारतीयांच्या आणि ग्रीक, सिथियन वगैरे परकीयांच्या या कालांत आलेल्या दाट संबंधाची पार्श्वभूमि म्हणून करीत आहे. येथें चालू मुद्दा म्हणजे या दाट संबंधाचा परिणाम म्हणून भारतीयांच्यापासून कोणत्या गोष्टी परकीयांनीं उचलल्या हें दाखविणें हा होय.

पाश्चात्यांनीं भारतीयांपासून स्वीकारलेल्या गोष्टींत पहिलें स्थान धर्म व तत्त्वज्ञान याना दिलें पाहिजे. पैकीं भरतखंडांतील धर्म हा खुद्द परकीय विजेत्या राजांपैकींच कांहींनीं स्वीकारला. काश्मीरवर राज्य करणारा क्रूरकर्मा मिहिरगुल यानें शैव धर्म स्वीकारला होता. सिथियन राजा 'महाराज राजातिराज देवपुत्र' कनिष्क यानें बुद्धधर्माचा नुसता स्वीकारच केला असें नव्हे तर बौद्ध भिक्षूंची मोठी परिषद् भरवून बुद्धधर्माला संघटित स्वरूप दिलें. या परकीय राजानें बौद्ध-धर्माच्या इतिहासांत अशोकाच्या खालोखाल स्थान मिळविलें आहे. ग्रीक राजा मिनँडर यानेंहि असाच बुद्ध धर्म स्वीकारला. आणि बौद्धाचार्यांनींहि त्याच ऋण स्मरून 'मिलिन्दपन्ह' नांवाचा ग्रंथ रचून त्याचें नांव बौद्धवाङ्मयांत अजरामर करून ठेविलें. मिलिन्दपन्हांत मिनँडरचें नांव गोवलें गेलें येवढ्यावरूनच बौद्धधर्माची मोठी मोहिनी मिनँडरवर पडली होती असें मानण्याचें फारसें कारण नाहीं असें

टॉनबी यानें बजावलें आहे ('स्टडी ऑफ हिस्टरी' ५।१३२). पण दुसराहि पुरावा उपलब्ध आहे, तो प्लुटार्क या ग्रंथकाराचा. मिनँडरच्या मृत्यूनंतर त्याच्या अस्थि कोणाला मिळाव्या याविषयीं तंटा माजला व शेवटीं सर्वांनीं सारखा वांटा घ्यावा व त्यावर स्मारकें उभारावीं असें ठरलें, असें या ग्रंथकारानें जें वर्णन केलें आहे तें बुद्धांच्या स्तूप उभारण्याच्या पद्धतीशीं जुळतें आहे. यावरून बौद्धांनीं मिनँडरला गौरविलें तें निष्कारण नसावें. वैष्णव धर्माची दीक्षा घेणारेहि कांहीं निघाले. त्यापैकीं एकानें आपल्या नांवें गरुडस्तंभ उभारून व त्यावर लेख कोरून आपल्या धर्मांतराचें अखंड स्मरण राहील अशी व्यवस्था करून ठेविली आहे. हा स्तंभ ग्वाल्हेर संस्थानांतील भिलसा या गांवीं आजहि उभा असून, तळाला अष्टकोनी, मध्याला षोडशकोनी व टोकाला बत्तीसकोनी अशा थाटाचा एका अखंड शिलेचा कोरलेला आहे. शतकानुशतकें या स्तंभापुढें, या 'खां बाबा'पुढें मोठी यात्रा भरत आलेली आहे! पण यावरील लेखाची भाषा व मोल हें यात्रेकरूंना समजण्यासारखें नसल्यानें त्यांनीं शेंदराच्या सहस्रपुटांनीं तो माखून काढलेला होता. अशाच स्थितींत तो राहतां तर त्यावरील लेख आणि त्या लेखांत निविष्ट केलेलें स्तंभ उभारणाराचें नांव हीं शेंदूर खाल्ल्यानें मुकींच राहिलीं असतीं! पण ही पुटें मोकळीं होतांच त्यावरील लेखाला तत्काळ वाचा फुटली कीं, 'देवदेवस वासुदेवस गरुडध्वजे अयं कारिते हेलिओडोरेण भागवतेन योनदूतेन... हा गरुडध्वज देवांचा देव वासुदेव याच्याप्रीत्यर्थ तक्षशिलेचा रहिवासी व ग्रीस राजा ॲंटिआल्सीडियस याचेतर्फे राजा भागभद्र याचे दरबारीं वकील म्हणून राहिलेल्या हेलिओडोरस नांवाच्या भागवतानें उभारला आहे.' याच स्तंभानजीक देवदत्तपंत भांडारकर यांना शिक्का असलेल्या २६ विटा सापडल्या. त्यांपैकीं एकावर तिमित्र हें नांव आहे, तें ग्रीक डेमिट्रियस याचें रूपांतर असावें व त्यानें यज्ञ केला असावा असा भांडारकरांचा तर्क आहे. कार्ले व नाशिक येथील

लेण्यांतहि यवनांनीं स्तूप, लेणीं बांधल्याचे उल्लेख सापडतात. नाशिक येथील एक लेणें इंद्राग्निदत्त योनक याचें आहे.

जेत्या राजांनीं जितांचा धर्म स्वीकारण्यांत धार्मिक भावनेच्या जोडीला, किंबहुना क्वचित् अधिकहि राजकीय धोरणाची दृष्टि असूं शकते हें नाकारण्याचें कारण नाहीं. पण असा प्रकार जेथें घडतो तेथें जितांचा धर्म हा प्रबल व जिवट असतो हें मान्य करण्यास तरी आडकाठी नसावी. आतां जेथें येवढीहि सूट घालण्याचें कारण नाहीं असाहि भारतीय धर्म व तत्त्वज्ञानाचा विजय दाखवितां येईल. तो म्हणजे स्वतंत्र अशा ग्रीस देशांत भारतीय धर्माचा व तत्त्वज्ञानाचा झालेला प्रसार हा होय.

## ग्रीसमध्यें हिंदुधर्म

मागें आध्यात्मिक युरोप या प्रकरणांत युरोपांतील कॅथॉलिक पंथीय मठ, त्यांतील संन्यासी, जोगिनी, त्यांचें ब्रह्मचर्य, वैराग्य, देहदंडन, त्यांची आरती, धुपारती, माळ, जपजाप्य, उपासतापास, वगैरेचें वर्णन केलें आहे. प्रस्तुत या सर्वांविषयीं असें सांगावयाचें आहे कीं, हे सर्व प्रकार मूळ युरोपियन धर्माशीं म्हणजे होमरच्या वेळच्या व जुन्या करारांतल्या धर्माशीं विसंगत असून ते सर्व भरतखंडांतून ग्रीस-मध्यें व अलेक्झांड्रियामध्यें आले असावे असें पाश्चात्य विद्वानांनींच प्रतिपादिलें आहे. असें प्रतिपादन करण्यांत संसाराकडे उदासीन दृष्टीनें पाहण्याची दृष्टि ही एकंदरींत विकृत दृष्टि होय व म्हणून ती मूळची युरोपियनांची नसून, बाहेरून आलेली असावी असें मानण्याची अहंकाराची गर्भित भावना असणें अशक्य नाहीं. तें कसेंहि असलें तरी वर उल्लेखिलेल्या कल्पनांनीं कित्येक शतकें युरोपियन मनावर स्वामित्व गाजवलें होतें ही गोष्ट त्यांना मान्य आहे; आणि तत्पोषक उल्लेखहि आढळतात. चौथ्या शतकांतला युसेबियस यानें ॲरिस्टॉ-टलच्या शिष्यापासून चालत आलेली एक दंतकथा दिलेली आहे ती

अशी कीं, 'एकदां एका भारतीय तत्त्ववेत्त्याची अथेन्स येथें सॉक्रेटिसाशीं गाठ पडली. तेव्हां सॉक्रेटिसाच्या तत्त्वज्ञानाची एकंदर फलश्रुति काय असा प्रश्न निघाला असतां सॉक्रेटिस म्हणाला कीं, मानवी व्यवहाराचें गूढ उकलणें ह्याविषयीं माझा प्रयत्न आहे. त्यावर तो भारतीय मोठ्यानें हसला व म्हणाला, कीं दैवी सूत्राचें आकलन जोंवर झालें नाहीं तोंवर आपणास मानवी व्यवहाराचें गूढ कधीं उकलेल का?' ही नुसती दंतकथा असली तरी ही भरतखंडांतून विद्वान् वेदान्ती ग्रीसमध्यें जात येत असत व आपली छाप तेथें पाडीत असत अशी चौथ्या शतकांत समजूत रूढ होती येवढें दर्शविण्यास तर ती पुरेशी आहे.

तत्त्वज्ञानामध्यें पुनर्जन्माची कल्पना ही एक भारतीय कल्पना होय. ही पायथागोरस व प्लेटो वगैरेंनीं भारतीय तत्त्वज्ञानांतून स्वीकारली असली पाहिजे हें कीथसारखे कांहीं सोडले तर बहुतेक पाश्चात्य विद्वानांना—गार्बे, विंटरनिट्झ्, हॉपकिन्स मॅक्डोनेल वगैरेंना—मान्य आहे. पायथागोरसच्या एकंदर पंथाविषयीं रॉलिन्सन हा लेगसी ऑफ इंडियामधील आपल्या निबंधांत लिहितो कीं 'धर्म, वेन्दात, गणित वगैरेमध्यें पायथागोरसनें जीं जीं मतें प्रतिपादन केलेलीं आहेत तीं तीं सर्व मतें हिंदुस्थानांत शकपूर्व सहाव्या शतकांत आधींच प्रचलित होतीं. आणि मतें सोडून आचारकांड पाहिलें तरीहि पायथागोरस व हिंदु, जैन, बुद्ध यांच्यांत विलक्षण साम्य सापडतें. जीवजीवाणूंचीहि हिंसा न करणें, मांसाशन निषिद्ध मानणें, वाटाणे खाणें वर्ज्य समजणें असल्या बाबीहि दोन्हीकडे सारख्या सापडतात. यावरून पायथागोरसच्या विचारसरणीवर मिसरी तत्त्वज्ञानापेक्षां हिंदी तत्त्वज्ञानाचीच अधिक छाप पडलेली दिसते.' मिसर देशाचा उल्लेख येथें आला आहे त्याचें मर्म असें आहे कीं, इलियट स्मिथ, पेरी वगैरे कांहीं विद्वानांचा असा ठाम सिद्धान्त आहे कीं, मानवीसंस्कृतीचीं सर्व अंगोपांगें उदय पावलीं तीं प्रथम मिसर

देशांत उदय पावलीं व नंतर तेथून सर्वत्र पसरलीं. पण मिसरी संस्कृतीच्या अभ्यासकांतील एक प्रमुख तज्ज्ञ सर फ्लिंडर्स पेट्री ह्यांनेंहि रॉलिन्सनसारखाच अभिप्राय दिला आहे. तो लिहितो कीं, 'ग्रीकांबरोबरच्या युद्धांत इराणी सैन्यांत भारतीय सैनिक होते यावरून पश्चिमेचें व हिंदुस्थानचें दळणवळण सिद्ध झालें असतां संन्यासपंथ हा पश्चिमेकडे आला, तो हिंदुस्थानांतून आला असला पाहिजे असें मानावयास कोणताच प्रत्यवाय दिसत नाहीं.' ( 'इजिप्त व इस्राएल' ). आतां हें खरें, कीं सारख्या कल्पना, सारखे विचार भिन्न देशांत उद्भवणें अशक्य आहे असें मुळींच नाहीं. पण एखाद्या देशांत पूर्वविचारांशीं असंबद्ध अशा कल्पना अगदीं अभावितपणें एकदम उठून उभ्या राहिलेल्या आढळूं लागल्या व त्यांच्या तोंडा-वळ्यासारख्या कल्पना ज्या देशाशीं दळणवळण आहे अशा दुसऱ्या देशांत आधींच नांदत असलेल्या आढळून आल्या तर अशा कल्पना त्या दुसऱ्या देशांतून पाहुण्या आल्या असाव्या असें मानणें फारसें तर्कास सोडून होत नाहीं. पुनर्जन्म, मोक्ष, परमा-त्म्याशीं सायुज्यता, वैराग्य, देहदंडन, या कल्पनांचा उदय पश्चिमे-कडे असाच अभावित दिसतो. म्हणूनच पायथागोरसनें त्या पूर्वेकडून उचलल्या असाव्या असें म्हणणें क्रमप्राप्त येतें. ऑरफि-यस या नादब्रह्म निर्माण करणाऱ्या तत्त्ववेत्त्याच्या पंथांतहि पुनर्जन्म, समाधि, आत्म्याची बद्धावस्था, मोक्षावस्था व अमरत्व, ब्रह्मांड, संसारचक्र वगैरे एकच नव्हे तर अनेक कल्पना आढळतात त्या सर्वांतील व भारतीय तत्त्वज्ञानांतील विलक्षण सादृश्य हें केवळ काकतालीयन्यायानें उद्भवलें असें म्हणणें म्हणजे शंकेखोरपणा वाजवीपेक्षां अधिक ताणणें होय. ऑरफियस व पायथागोरस यांच्या पंथांतील भारतीय ऋण मान्य केलें म्हणजे ग्रीसमधील एक प्रमुख तत्त्ववेत्ता व अव्वल दर्जाचा साहित्यिक जो प्लेटो याविषयीं निराळें सांगावयास नको. तो पायथागोरसचा शिष्य होता येवढें सांगितलें

म्हणजे पुरे. त्याच्या लोकशाहीवरील सुप्रसिद्ध ग्रंथासंबंधानें प्रो. अरविक लिहितात कीं, 'त्यांतील बहुतेक कल्पना प्लेटोनें भारतीयांपासून घेतलेल्या असाव्यात.' ('मेसेज ऑफ प्लेटो'). चातुर्वर्ण्याची कल्पना व ऋषींनीं अपरिग्रहवृत्तीनें राहण्याची कल्पना या दोन कल्पना उदाहरणादाखल देतां येतील.

शिकंदराला तर उत्तरकालीन अकबराप्रमाणें सर्व धर्मांचें एकीकरण करण्याचा छंद होता. त्यानें आपला वंसिक्रिटस नांवाचा एक विद्वान् तक्षशिलेला बुद्धया पाठविला होता व त्यानें तेथून एक यती आपल्याबरोबर शिकंदरकडे आणला होता असें स्ट्रॅबो लिहितो. तसेंच महावंश या ग्रंथांत लिहिलें आहे कीं, शकपूर्व १५७ या वर्षीं राजा दुत्तगामिनी यानें एक भव्य स्तूप बांधला त्या प्रसंगीं अलेक्झांड्रिया येथील यवनांचा मुख्य धर्माध्यक्ष आपल्या तीस हजार उपदेशकांसह (आंकड्याचा भावार्थ घेण्यास हरकत नाहीं) हजर होता!

रोमन अमदानींत रोम आणि हिंदुस्थान यांमधील दळणवळण जोरांत सुरू होतें व हिंदु लोक हे तत्त्वज्ञानांत निष्णात असल्याची रोममध्यें या कालीं मोठी ख्याति होती. हें तत्त्वज्ञान साक्षात् गुरूच्या मुखांतून ऐकण्याकरितां पाश्चात्य जिज्ञासु भरतभूमीची यात्रा करीत. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांतील लुशियननें लिहिलें आहे कीं, डेमिट्रियस नांवाच्या एका ग्रीक वेदान्त्यानें वृद्धापकाळीं आपली सर्व जिंदगी वाटून टाकली व उर्वरित आयुष्य ब्राह्मणांच्या संगतींत व्यतीत करण्याकरितां तो हिंदुस्थानास निघून गेला! हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न धर्मपंथांचीहि पाश्चात्यांना माहिती होती. तिसऱ्या शतकांतील क्लेमंटला वैदिक धर्म व बौद्धधर्म यांतील भेदाभेद माहीत होता. शिवाय पायथागोरसविषयीं त्यानें लिहून ठेवलें आहे कीं, त्यानें ज्या अनेक विद्वानांपासून ज्ञान संपादन केलें त्यांत ब्राह्मणाहि होतें. चवथ्या शतकांतील सेंट जेरोमनें बुद्धाचा नांवानें उल्लेख केला आहे व त्याच्या मातेच्या कौमार्याची कथाहि दिली आहे. तिसऱ्या

शतकांतला नवप्लेटोपंथाचा संस्थापक प्लोटिनस हा हिंदुतत्त्वज्ञानाचा अभ्यास करतां यावा म्हणून इराणावर स्वारी करणाऱ्या सेनेसवें तिकडे निघाला होता. पण सेनापतीच्या मृत्यूमुळें त्याला वाटेंतूनच परत यावें लागलें. (राधाकृष्णन्–'ईस्टर्न रिलिजन्स ॲण्ड वेस्टर्न थॉट')

## बायबलांतील बुद्धकथा

संस्कृतीच्या देवाणघेवाणांत बुद्धधर्मांतील बऱ्याच धर्मकथा व अद्‌भुत कथा ख्रिस्तानुयायांनीं उचलल्या असाव्यात असें पुष्कळ विद्वानांचें मत आहे. सेडेल, हेडमन्स, गार्बे या सर्वांना बायबलांतील कांहीं कथा या बौद्धग्रंथांतून उचलल्या असल्या पाहिजेत हें मान्य आहे. ख्राइस्टचा चेला संत पीटर ख्राइस्टवर श्रद्धा ठेवून पाण्यावरून चालतो हा प्रकार व जातकामध्यें वर्णिलेला अशाच प्रकारचा चमत्कार यांमध्यें इतकें विलक्षण साम्य आहे कीं, या दोन्ही कथा स्वतंत्रपणें उद्भवल्या असतील असें मानणें जड जावें. दोन्ही कथांमध्यें ईश्वरावर श्रद्धा असेपर्यंत पाण्यावरून सहज चालतां यावें व अंतःकरणांतली श्रद्धा डळमळली कीं, अश्रद्ध पाण्यांत बुडूं लागावा याचें एकाच पद्धतीचें वर्णन आहे. जातकग्रंथामध्यें, अशाच प्रकारच्या चमत्कारांच्या कथा पुष्कळच आहेत. पण बायबलामध्यें मात्र मॅथ्यूच्या पुस्तकांतील चौदाव्या अध्यायामध्यें एकदांच काय ती पाण्यावरून चालत जाणाऱ्या पीटरची कथा आहे. यावरून जातकांतूनच ती बायबलमध्यें गेली असण्याचा संभव मोठा आहे. त्याचप्रमाणें बौद्धग्रंथांतील असिताची कथा व बायबलांतील सायमिअन याची कथा यांतहि साम्य इतकें भरपूर आहे कीं, विंटरनिट्झच्या मतें बायबलांतील कथेचा उगम बौद्धग्रंथांतच असला पाहिजे.

विंटरनिट्झच्या मतें बायबलांतील ज्या भागावर बौद्धग्रंथांचा ढळढळीत परिणाम झाला असल्याबद्दल पाश्चात्य विद्वानांचें सामान्यतः ऐकमत्य आहे तो भाग म्हणजे बायबलांत दुसऱ्या व तिसऱ्या

शतकामध्यें मागाहून घुसडून दिलेला प्रक्षिप्त भाग हा होय. या भागामध्यें ख्रिस्ताच्या ज्या कथा वर्णिलेल्या आहेत त्या बोधिसत्त्वाच्या कथेशीं विलक्षण रीतीनें जुळत्या आहेत. एके ठिकाणीं असें वर्णिलें आहे कीं, येशूची माता मेरी येशूला घेऊन हिंडत असतांना तहानेनें व्याकुळ झाली. येशूनें तत्काळ आपले चिमुकले हात डोक्यावर असलेल्या ताडवृक्षाकडे पसरले, व चमत्कार असा कीं, त्या ताडवृक्षानें आपलीं फळें मेरीच्या हातांत टाकलीं. अशा प्रकारचे अद्भुत चमत्कार जे बायबलांत आढळतात ते सर्व बौद्धग्रंथांतून घेतले असावेत याविषयीं कट्टर ख्रिस्ती विद्वानांनाहि संशय नाहीं. बायबल सोडून मध्ययुगांत रचिल्या गेलेल्या ख्रिश्चन साधुसंतांच्या कथांकडे आपण वळलों तर तेथेंहि बौद्धग्रंथांचें ऋण अनेक ठिकाणीं दिसून येईल. या संतांच्या तपश्चर्येचा भंग करण्याकरितां सैतान नाना प्रकारचीं रूपें धारण करी. त्यांत कांहीं वेळां तो येशू ख्रिस्ताचेंच रूप धारण करून या संतांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न करी. हा प्रकार गार्बेच्या मतें बौद्धग्रंथांवरूनच उचलला असला पाहिजे. गार्बेची विचारसरणी मात्र पूर्वग्रहदूषित आहे. वरील प्रकारचें वॅलेन्स या संताचें एकच एक उदाहरण देऊन गार्बे लिहितो कीं, सैतानानें देवाचें रूप घ्यावें असली राक्षसी कल्पना ख्रिस्ती वाङ्मयांत वॅलेन्सच्या कथेमध्येंच तेवढी सापडत असल्यामुळें ती बाहेरूनच आली असली पाहिजे. गार्बेच्या लिहिण्याचा झोक असा कीं, त्याच्या मतें असल्या आसुरी कल्पना ख्रिस्तानुयायांच्या दैवी मेंदूतून कधींच निघावयाच्या नाहींत, तेव्हां वॅलेन्सच्या कथेंत एकाच ठिकाणीं ही कल्पना आढळते, ती बौद्धग्रंथांतून घेतली असली पाहिजे. पण दुसरा एक पंडित गुंटर यानें असें दाखवून दिलें आहे कीं, गार्बे ज्याला राक्षसी किंवा आसुरी कल्पना म्हणतो ती सैतानानें देवाचें सोंग घेण्याची कल्पना वॅलेन्सच्या एकुलत्या एक कथेंत दिसून येत नसून दुसऱ्याहि पुष्कळ सोवळ्या ख्रिस्ती कथांमध्यें आढळून येते !

मध्ययुगीन काळांत सर्व ख्रिस्ती जगांत मान्यता पावलेली व लोकप्रिय झालेली दुसरी एक कथा आहे, व ती ललितविस्तार या बौद्ध-ग्रंथावरून घेतली असली पाहिजे याविषयीं विद्वानांना तिळमात्र शंकाहि नाहीं. ती कथा म्हणजे बार्लाम व जोसाफत ( Barlaam and Josaphat ) यांची होय. या कथेचें सर्व वातावरणच बुद्धमय आहे. मूळ बुद्धकथेचें सातव्या शतकांतच पल्हवींत भाषांतर झालें. तेथून अरेबिक, नंतर ग्रीक व तदनंतर युरोपांतील बहुतेक भाषांचे वेष या कथेनें पेहेरले आणि शेवटीं ही कथा इतकी लोकप्रिय झाली कीं, या कथेंत ज्यांचें चरित्र वर्णिलेलें आहे ते बार्लाम व जोसाफत हे कोणी मोठे ख्रिश्चन साधुसंतच होऊन गेले असावेत असें मानण्यांत येऊन कॅथॉलिक पंथाच्या संतमालिकेंतहि ते गोविले गेले! या तोतया ख्रिस्ती संतांविषयीं विंटरनिट्झ आपल्या संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांत लिहितो कीं, या कथेंतील जोसाफत म्हणजे दुसरा-तिसरा कोणी नसून बोधिसत्त्व होय! जोसाफतचें अरबी भाषेंतलें नांव जुडासफ असें आढळतें आणि जुडासफ म्हणजे बुडासफ म्हणजे बोधिसत्त्व होय!!

## लोककथांचा प्रसार

धार्मिक कथांप्रमाणें उपदेशपर अशा लोककथाहि भरतखंडानें परकीयांना पुरविल्या असाव्यात असें विद्वानांचें मत आहे. संस्कृत व ग्रीक वाङ्मयांतील कांहीं लोककथांमध्यें इतकें विलक्षण साम्य आहे कीं, कोणत्या तरी एका राष्ट्रानें ह्या बाबतींत उसनवारी केली असली पाहिजे असें मानणें प्राप्त होतें. भारतीय व ग्रीक ह्या दोघांनींहि तिसऱ्या कोणाची उसनवारी केली असण्याचा तिसराहि एक विकल्प उरतोच, पण जोंवर ह्या विकल्पाविषयीं निश्चित पुरावा उपलब्ध होत नाहीं. तोंवर संस्कृत वाङ्मयांतील कथा जेथें कालदृष्ट्या ग्रीक कथांच्यापेक्षां प्राचीन आहेत असें निश्चित म्हणतां येतें, त्या स्थलीं त्या कथा संस्कृतवाङ्मयांतून ग्रीक वाङ्मयांत गेल्या असाव्यात असें मानणें तर्कास सोडून नाहीं.

भारतीय कथासाहित्यापैकीं पंचतंत्र किंवा त्याचें प्राचीनतम स्वरूप जें तंत्राख्यायिका त्याचें सहाव्या शतकांतच पेहेलवीमध्यें भाषांतर झालें. नंतर अरबीमध्यें व अकराव्या शतकांत ग्रीकमध्यें होऊन या ग्रंथांतील कथा सर्व युरोपभर पसरल्या. पंचतंत्रांतील करटक आणि दमनक हीं कोल्ह्यांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. त्यावरूनच पंचतंत्राच्या अरबी भाषांतराला नांव दिलें तेंच 'कलिलाग व दिम्नाग' असे. पंचतंत्राच्या बरोबरीनें ज्या दुसऱ्या कथासंग्रहाचा युरोपांत प्रवेश झाला तो जातकसंग्रह हा होय. आज इसापनीतींत आढळणाऱ्या गोष्टींपैकीं कांहीं गोष्टी या जातककथांतून बहुधा आल्या असाव्यात. विशेषतः इसापाच्या गोष्टींतील सिंह आणि कोल्हा यांचा जो संबंध दर्शविला आहे त्याची कल्पना ग्रीस देशाच्या बाहेरून आली असावी असें म्हणतात. जातककथांपैकीं महासुपिन जातकांतील सोळा स्वप्नें पडणाऱ्या राजाची कथा, विरोचन जातकांतील सिंहाशीं स्पर्धा करणाऱ्या कोल्ह्याची कथा, इल्लीस जातकांतील अतिधनाढ्य पण अतिकृपण अशा इल्लीसाची कथा, सुवण्णहंस जातकांतील सोन्याचीं पिसें असलेला हंस व सर्व पिसें एकदम हातीं लागावीं म्हणून हावरेपणानें त्याला मारूं पाहणारी ब्राह्मणी यांची कथा, सीहचम्म जातकांतील सिंहाच्या चर्माचें पांघरूण घातलेल्या गर्दभाची कथा अशा प्रकारच्या कित्येक जातककथा युरोपियन कथावाङ्मयांत हिंदुस्थानांतून प्रविष्ट झाल्या असाव्यात. (चिं. वि. जोशी–'जातककथा'.)

## बाजारकट्ट्यावरील देवघेव

धर्म, तत्त्वज्ञान, लोककथा वगैरेसारख्या नुसत्या मानसिक गरजाच तेवढ्या भरतखंडांतून पुरविल्या जात असत असें नव्हे. तर सांसारिक गरजांचाहि ठेकेदार प्राचीन काळीं आपला भारतवर्षच होता. इतक्या प्रमाणावर कीं आज पाश्चात्यांनीं सर्व जगांतील व्यापारपेठा काबीज केल्यामुळें त्यांच्या राष्ट्रांत जसा सुवर्णाचा प्रवाह सर्व दिशांनीं अखंड वाहत येत आहे तसा पूर्वीं भरतखंडांत ग्रीस, रोम वगैरेमधून येत असे.

हिंदुस्थानचा युरोप खंडाशीं असलेला हा व्यापार फार प्राचीन कालापासून सुरू असला पाहिजे. एका जर्मन शोधकास ट्रॉय येथें एक शिसवीचें कोरीव लाकूड सापडलें व तें हिंदुस्थानचें असावें असें त्याचें म्हणणें आहे. म्हणजे खिस्ती शतकापूर्वी सुमारें हजार वर्षे आम्ही भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील शहरांशीं व्यापार करूं लागलों होतों असें अनुमान निघतें. खाल्डिया प्रांतांतील ऊर येथील जुन्या देवालयाच्या पडक्या मालमसाल्यांत हिंदुस्थानच्या सागाच्या तुळया सापडल्या आहेत व त्यासंबंधीं वाद निघाला तो एवढाच कीं, या तुळया हें देऊळ प्रथम बांधलें त्या वेळच्या म्हणजे खिस्तपूर्व दोन हजार वर्षांच्या आहेत, किंवा या देवळाचा जीर्णोद्धार केला त्या वेळच्या म्हणजे खिस्तपूर्व सहाव्या शतकांतील आहेत! खिस्ती शतकाच्या पूर्वी अठराव्या शतकांत ईजिप्त देशांत ज्या घराण्यांतील राजे राज्य करीत होते त्यांच्या थडग्यांत हिंदुस्थानांतील नीळ, कापूर, व चिंचेच्या पेट्या सापडल्या आहेत. हिंदुस्थानांतील मोर हा पक्षी सॉलोमनच्या वेळीं खि. पू. दहाव्या शतकांत युरोपांत गेला असावा. या पक्ष्याचें तामील भाषेंतील मूळचें नांव जें टोक्की तें अपभ्रंशानें निरनिराळ्या युरोपियन भाषांत आढळतें म्हणतात. याच सालोमनचा राजवाडा शृंगारण्याकरितां हिराम राजानें हस्तिदंत, माकडें व मोर आणले असें बायबलाच्या जुन्या करारांत लिहिलें आहे. शके १३० मध्यें जन्मलेला ॲप्युडियस हा ग्रंथकार आपल्या फ्लॉरिडा नांवाच्या ग्रंथांत लिहितो कीं, हिंदुस्थानांतून युरोपांत हस्तिदंताच्या राशी, मिऱ्याच्या गोण्या, दालचिनीचे गठ्ठे, आणि सोन्यारुप्याचे डागच्या डाग येत असत. तसेंच पहिल्या शतकांतील पेरिप्लस् नांवाच्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, केप गार्डाफ्यूच्या आसपासचे लोक हिंदुस्थानांतून तांदूळ, तूप, तीळ, साखर, सुती कापड, रेशमी कापड वगैरे आणीत असत. अरबस्थान व तुर्कस्थान यांतील लोक हिंदुस्थानचे केशर, हळद, निळें कापड, शेवरीचा कापूस, मलमल,

रेशमी कापड आणि अरबी तऱ्हेचे पेहेराव घेऊन जात. इराणांत हिंदुस्थानांतून साग, शिसवी, शिंगें वगैरेचें कोरीव सामान जात असे. बार्बरी संस्थानांतील लोक कराचीशीं व्यापार करीत आणि तेथून पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांतील उत्तम तऱ्हेचें सुती कापड नाना-तऱ्हेचे अंबर, स्फटिकादि मौल्यवान् पाषाण, काचेचीं भांडीं व सोन्या-रुप्याचीं ताटें व तबकें नेत.

युरोप खंडांतील ग्रीस व रोम येथें भारतीय हे अशोकाच्या वेळेपासून व तत्पूर्वीहि जात असत याचा उल्लेख वर आलाच आहे. ज्यूलियस सीझरच्या मागून गादीवर बसलेल्या ऑगस्टस् राजाच्या कारकीर्दीत भारतीय व्यापाऱ्यांचा जम तेथें विशेष बसलेला दिसतो. मोसमाचे दिवस आले कीं, व्हेनिस बंदरांतून अनेक गलबतें त्या काळीं हिंदुस्थानास येत, आणि येथून मसाले, हस्तिदंत, हिरे, माणकें, मोर, पोपट, हत्ती, वाघ, सिंह, गेंडे, सर्प असे अनेक पदार्थ घेऊन जात. ते फार चढ्या भावानें विकले जात असल्यानें रोमच्या सुवर्णाला गळती लागली होती. इतकी कीं, रोमन सेनेटमध्यें या विषयावर मोठे वाद माजत. कांहीं बादशहांनीं या चैनीच्या पदार्थांवर बहिष्कार घालण्याचा प्रयत्न केला पण तोहि निष्फळ झाला. यामुळें ऑगस्टस्-पासून नीरोपर्यंतच्या बादशहांचीं अनेक सुवर्ण-नाणीं हिंदुस्थानांत अव्याहत येत राहिलीं. नुसत्या टायबेरस या बादशहाचीच हजारां-वर नाणीं सांपडलेलीं आहेत. आणखी किती भूमींत दडून असतील हरि जाणे!

चैनीचे पदार्थ सोडून नित्योपयोगी पदार्थांविषयीं पाहतां तुरटीच्या मदतीनें मांजिष्ठादिकांचे बनविलेले पक्के रंग, निळीचा रंग व पोलाद या वस्तूंविषयीं प्राचीन भारताची विशेष ख्याति होती असें सील यांनीं प्रतिपादन केलें आहे. ( पॉझिटिव्ह सायन्सेस, पृ. ६४ ). सुती कापड तर शिवाजीच्या काळींहि इंग्लंडमध्यें येवढ्या प्रमाणावर जाई, कीं त्यानें स्थानिक लोकरीचा व्यापार मारूं नये,

म्हणून प्रेताचें वस्त्र लोकरीचेंच असलें पाहिजे, असा इ. स. १६६६ मध्यें कायदा करण्यांत आला होता !

## बगदादमध्यें हिंदु वैद्यराज !

आतां दुसऱ्या कालखंडाकडे वळूं या. रोमच्या नाशानंतर युरोपांत कांहीं शतकें तमोयुग पसरलें होतें. त्याच्या शेवटीं युरोपांत अरबांनीं ज्या विद्येचा प्रसार केला ती विद्या त्यांनीं मुख्यतः भरतखंडांतून नेली होती. आज युरोप खंडाला व्यावहारिक शास्त्रीय विद्येच्या प्रांतांत सर्व जगाच्या आदिपीठाचें जें स्थान मिळालें आहे तेंच विलोभनीय स्थान प्राचीनकाळीं या भरतखंडांस मिळालें होतें. बुद्धधर्माचा अभ्यास त्या धर्माच्या मायभूमींत येऊन करण्याकरितां चिनी प्रवासी येथें येत हें सुशिक्षितांस सामान्यतः अवगत असतें. पण व्यावहारिक शास्त्रें शिकण्याकरतांहि परकीय लोक हे भारतीय ग्रंथ आणि भारतीय गुरु यांजकडे वळत हें मुद्दाम सांगितलें पाहिजे. आज हिंदुस्थानांत एखादें नवें रुग्णालय उघडावयाचें असल्यास प्रारंभीं तरी युरोप-अमेरिकेहून एखाद्या प्रख्यात डॉक्टराला बोलाविलें जातें. नेमकें हेंच स्पृहणीय पद पूर्वीं भरतखंडांतील वैद्यराजांना मिळे. त्यांपैकीं एक ऐतिहासिक उदाहरण मुद्दाम लक्षांत ठेवण्यासारखें आहे. बगदादचा खलीफा हरून-अल्-रशीद (इ. स. ७८६-८०८) याचें नांव प्रख्यात आहे. हा एकदां फार बीमार झाला. त्याच्या काळीं भारतीय भिषजांची कीर्ति सर्वत्र दुमदुमत होती. तेव्हां त्यानें भरत-खंडांतून एका वैद्यराजाला मुद्दाम पाचारण केलें. या वैद्यराजाच्या हाताला यशहि उत्तम आलें. त्यावर हरूनची एवढी भक्ति बसली कीं, त्यानें त्याला आपल्या सरकारी इस्पितळाचा मुख्य अधिकारी नेमलें ! या वैद्यराजाचें नांव **मंख**. ही आठव्या शतकांतील गोष्ट. आणखी पांच-सहा शतकांत मात्र ही स्थिति सर्वथैव पालटली व पुढें शहाजहान बादशहाच्या मुलीला आणि माधवराव पेशव्याला औषध

देण्यास युरोपियन डॉक्टराची मदत घेण्याची पाळी आली! तो प्रकार पुढे पाहूं.

हरूनच्या पूर्वीचा खलीफा मन्सूर याच्या कारकीर्दीत अरबांचा आणि हिंदुस्थानचा प्रथम राजकीय संबंध आला. याच कारकीर्दीत महंमद कासीमनें सिंध प्रांत काबीज केला. पण परत जातांना या जेत्यानें आपल्याबरोबर येथून कांहीं हिंदु पंडित नेले व त्यांनीं खलीफाच्या आज्ञेनेंच गणित आणि वैद्यक यांवरील अनेक प्रमुख ग्रंथांचीं भाषांतरें केलीं असें १० व्या शतकांतील 'किताब अल् फिरिस्त' या ग्रंथाचा कर्ता अबुल फरज यानेंच लिहून ठेवलें आहे. वैद्यक आणि रसायन पूर्वीं एकत्रच अभ्यासलें जात असे. यामुळें भरतखंडांतील रसायन शास्त्राचेंहि अरबांनीं परिशीलन केलें. आतां रसायनशास्त्राचा इतिहास लिहितांना युरोपियन विद्वान् अरबांच्या परिश्रमाचा सामार उल्लेख करतात; पण अरबांनीं रसायन व वैद्यकशास्त्र भारतीयांपासून उचललें याचा उल्लेख मात्र करीत नसत! 'हिंदु रसायनाचा इतिहास' लिहिणारे प्रफुल्लचंद्र रे लिहितात कीं, 'आरब विद्वान हे भारतीयांचे ऋणी होते, याविषयीं युरोपियनांनीं एक शब्द लिहिला असेल तर शपथ! (खं. १ प्रस्ता., पृ. १२७.) गझनीच्या महमुदाबरोबर हिंदुस्थानांत आलेला सुप्रसिद्ध इस्लामी विद्वान् अल्बेरुणी याच्या ग्रंथाचें भाषांतर करणाऱ्या साचौ यानें मात्र हिंदूंचें ऋण मोकळेपणानें मान्य केलें आहे. अरबांनीं नंतर या शास्त्राचा युरोपभर प्रचार केला.

## जर्मन ब्राह्मण

आतां मध्ययुग सोडून अर्वाचीन युगाकडे वळलें म्हणजे भारतीय संस्कृतीचा परिणाम युरोपियनांच्यावर होण्यास प्रारंभ झाला तो संस्कृत वाङ्मयाच्या मोहिनीमुळें. युरोपांतील अर्वाचीन तुलनात्मक भाषाशास्त्र, दैवतशास्त्र वगैरे शास्त्रें हीं संस्कृत वाङ्मयाच्या अध्ययनाच्या पोटीं निर्माण झालीं येवढ्याचा नुसता निर्देश केला तरी या

परिणामाचें स्वरूप लक्षांत येईल. इंग्रजांचा हिंदूशीं संबंध हा साक्षात् होता तेव्हां त्यांचें संस्कृताकडे लक्ष वळणें स्वाभाविकच होतें. वॉरन् हेस्टिंग्ज्‌च्या वेळेपासूनच संस्कृत ग्रंथांचीं इंग्रजींत भाषांतरें होण्यास सुरुवात झाली. पैकीं पहिला भाषांतरित ग्रंथ सुप्रसिद्ध भगवद्गीता हा होय. त्याचें भाषांतर १७८५ सालींच हेस्टिंग्ज्‌चा एक मित्र विल्किन्सन यानें केलें. पुढें चारच वर्षांनीं म्हणजे फ्रेंच राज्यक्रांति झाली त्याच सालीं जोन्सनें शकुंतलेला इंग्रजी वेषभूषेनें सजविलें. येथून पुढें मात्र संस्कृत ग्रंथांचें खरें आस्थेवाईक परिशीलन कोणी केलें असेल तर तें जर्मन पंडितांनीं. त्यांत प्रारंभीं अग्रपूजेचा मान श्लेजेल बंधूंनीं मिळविला. “ १८०८ सालीं या बंधूंनीं आपल्या देशबंधूंना संस्कृतमधील अनेक ग्रंथांची ओळख करून दिली व संस्कृत वृत्तांत जर्मन श्लोकहि रचून दाखविले ! या बंधूंच्या नंतर पौर्वात्य व पाश्चिमात्य वाङ्मयाचें एकी-करण करणारा रूकर्ट नांवाचा जर्मन पंडित होऊन गेला. याला **‘जर्मन ब्राह्मण’** अशी संज्ञा देतात. त्यानें संस्कृत वाङ्मय जर्मन भाषेंत ओतण्याचा प्रयत्न जन्मभर केला. त्याच्या ग्रंथांत भारत, रामायण, हितोपदेश, पंचतंत्र, कथासरित्सागर, रघुवंश, कुमारसंभव, उपनिषदें, पुराणें, भागवत वगैरेंतील अनेक उतारे आढळतात. याशिवाय चांद्रा-यणव्रत, पंचतपःप्रयोग, चिंतामणीचा सर्वार्थसिद्धकता हा गुण, चंद्र-कमल व सूर्यकमल यांचे धर्म वगैरे अनेक संस्कृत कल्पनांचा उपयोग त्याच्या स्वतंत्र ग्रंथांतून केलेला सापडतो. रुकर्टनें संस्कृतमधील पाद म्हणजे पाय व किरण, बक म्हणजे बगळा व भोंदू, द्विज म्हणजे ब्राह्मण, पक्षी, दांत, असल्या अनेकार्थी शब्दांवरील कोट्याहि जर्मन भाषेंत उतरविल्या आहेत. तसेंच संस्कृत हिमालय व जर्मन Him-mel, संस्कृत माया व जर्मन Megie या शब्दांवर श्लेष करण्याचेंहि त्यानें धाडस केलें आहे. दुसरा एक संस्कृत कविकल्पनांत गढून गेलेला जर्मन कवि म्हणजे हेनरिक हाइन हा होय. चंद्रकमळावर त्यानें एक स्वतंत्र काव्यच केलें असून इतर काव्यांत गंगातीर, मृगांचे

कळप, तमालराजी, मयूर, कोकिळा, वसंत, गंधर्व वगैरे भारतीय कल्पना पेरून दिल्या आहेत." (समग्र केळकर–११-६५) संस्कृत वाङ्मयानें भारून गेलेल्या गटे, नीत्शे यांचा उल्लेख मागें एका प्रकरणीं आलाच आहे.

संस्कृत वाङ्मयाची ही मोहिनी अद्यापहि चालू आहे. हिंदु तत्त्वज्ञान, योगमार्ग, बुद्धधर्म, बुद्धचरित्र यांनींहि अर्वाचीन काळांत पुष्कळ युरोपियनांचीं अंतःकरणें काबीज केलीं आहेत. अमेरिकेंत विवेकानंदांनीं स्थापिलेल्या मठांचें वाढतें वैभव, मत्सर वाटण्याइतकें वैभव, व हिंदु योगी म्हणून मिरविल्यानें पैसा मिळतो हें पाहून निर्माण झालेले तोतये योगी यांचा निर्देश मागें तिसऱ्या प्रकरणांत आलाच आहे. इंग्लंड-अमेरिकेंतील बड्या साहित्यिकांचा उल्लेख करावयाचा तर कार्लाईल, इमर्सन व शेली अशांचा करतां येईल. कार्लाईलनें भगवद्गीतेचें परिशीलन केलें होतें आणि इमर्सन अमेरिकेहून त्याचेकडे पाहुणा म्हणून आला होता तेव्हां कार्लाईलनें त्याला आवडती भेट म्हणून दिली ती भगवद्गीता! इमर्सनवर तिची किती छाप बसली हें इमर्सननें आपल्या एका कवितेचें नांव 'ब्रह्म' हें ठेवलें यावरून कळून येईल. तसेंच शेलीच्या "Life like a dome of many coloured glass, Stains the white radiance of eternity" आणि वर्डस्वर्थच्या "Our birth is but a sleep and a forgetting" या उक्तींतील वेदान्ती प्रतिबिंब आंग्ल सुशिक्षितांना दाखवायला नकोच. संस्कृत वाङ्मयाच्या प्रसारामुळें आजच्या पाश्चात्य वाङ्मयांत ब्रह्म, माया, कर्म, यज्ञ, ब्राह्मण, अवतार असे अनेक शब्द सराइताप्रमाणें वावरूं लागले आहेत. भाषाशास्त्रज्ञांच्या 'गुण', 'वृद्धि' असल्या पारिभाषिक रानटी शब्दांनीं पाश्चात्य सनातनी वैय्याकरण्यांचें प्रारंभीं माथें फिरून गेलें होतें असें जेस्पर्सननें लिहिलें आहे! (पृ. ६६)

बुद्धाचें अलौकिक चरित्र, व उपदेश यांनीं तर अनेकांना मोहिलें आहे. एड्विन आर्नोल्डनें आशियाचा धर्मदीप म्हणून जें बुद्ध-चरित्रपर

महाकाव्य लिहिलें तें कल्पनेबाहेर लोकप्रिय झालें. त्याच्या किती आवृत्त्या इंग्लंडमध्यें निघाल्या असतील असें तुम्हांस वाटतें? दहा-पांच? नव्हे; चांगल्या साठ आवृत्त्या निघाल्या! आणि अमेरिकेंत तर आवृत्त्यांच्या संख्येनें शतकांची मर्यादाहि ओलांडली! बुद्ध-चरित्रावर नाटकें रचण्याची स्फूर्तीहि कांहींना झाली आणि अशा एका नाटकाचा प्रयोग जर्मनींतील म्यूनिक शहरीं सन १९००। मध्यें प्रत्यक्ष करूनहि दाखविला. शोपेनहॉर या जर्मन तत्त्वज्ञान्याला उपनिषदांतील वेदान्तानें कसें अगदीं भारून टाकलें होतें याचा उल्लेख मागें आलाच आहे. बौद्ध तत्त्वज्ञानानें असेंच ज्याला भारून टाकिलें होतें, अशा एका प्रसिद्ध जर्मन व्यक्तीचा उल्लेख करावयाचा तर, संगीतकोविद् रिचर्ड वॅग्नर याचा करितां येईल. १८५९ मध्यें त्यानें आपल्या एका मित्राला लिहिलें कीं, "काय झालें, कसें झालें, कुणाला ठाऊक; पण मी बौद्ध बनलों आहे खरा." दुसऱ्या एका मित्राला त्यानें लिहिलें कीं, "खरें सांगूं का? बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा विचार केल्यानंतर बाकीचे सर्व धर्मपंथ मला क्षुद्र व अपुरे वाटूं लागले आहेत." वॅग्नरच्या यापुढील आयुष्यांत त्यानें जीं जीं पद्यें वगैरे रचलीं त्या सर्वांवर बौद्धिक तत्त्व-ज्ञानाची दाट छाया पडलेली आढळते. जर्मन वॅग्नरप्रमाणेंच डेन्मार्क देशांतील कवि जेलर्प यानेंहि बुद्धचरित्रावर एक नाटक व एक काव्य लिहिलें आहे. इटालीकडे नजर फेकली तर सॉलि यानें १९२४ मध्यें लिहिलेलें बुद्धचारित्र पाहावयास सापडेल. १९३३ मध्यें विंटर-निट्झच्या संस्कृत वाङ्मयेतिहासाचा दुसरा इंग्रजी भाषांतराचा खंड प्रसिद्ध झाला. त्यांत वरील हकीकत देऊन तो लिहितो कीं, "अद्यापहि बौद्धवाङ्मयांत असा पुष्कळ भाग आहे कीं जो युरोपिअन भाषेंत अवतरला जाऊन जागतिक वाङ्मयाचा भाग होण्यास लायक आहे." (पान ४२३)

# परक्यांचें ऋण

येथवर भारतीयांनीं जगाला काय दिलें तें पाहिलें. आतां त्यांनीं इतरांपासून काय घेतलें हेंहि थोडें पाहूं या. प्राचीन भारतीयांनीं बाहेरील जगाला अनेक चिजा पुरविल्या तशा थोड्या बाहेरून स्वीकारल्या आणि परकीयांचें ऋण मोकळ्या मनानें मान्यहि केलें. हिंदुस्थानच्या इतिहासावर व संस्कृतीवर ज्या अनेक परकीय संस्कृतींचा परिणाम झाला त्यांत इराणचें स्थान कालक्रमानें पहिलें होय. इराणवर इस्लामी चांद सातव्या शतकांत फडकूं लागल्यावर पुष्कळ पारसी कुटुंबें संजाणा बंदरावर आश्रयास आलीं ही गोष्ट विश्रुत आहे. पण इराण व हिंदुस्थान यांचा संबंध यापेक्षां फार प्राचीन असून, तो वेदांच्या काळाइतका जुना आहे. इराणी लोकांच्या धर्मगुरूंचा उल्लेख वेदांमध्यें आहे. ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडलांत विश्वामित्र प्रार्थना करतो कीं, 'इंद्रास पायस न देणाऱ्या कीकटांतील मंगदाचें धन लुटून आम्हांस दे.' वेदोत्तरकालीं इसवी शकपूर्व सहाव्या शतकांत इराणचा प्रख्यात सम्राट् दरायस यानें हिंदुस्थानवर स्वारी केली होती हें ग्रीक इतिहासकार हिरोडोटस् यानें लिहून ठेवल्यामुळें प्रसिद्धच आहे. शिवाय दरायसचा बेहिस्तानचा लेख उपलब्ध झाला आहे, त्यांत पेशावर त्यांच्या राज्यांत होतें व त्यास पेशियाहुबाद असें म्हणत असत, अशी माहिती आली आहे. उलट भारतीय वाङ्मयांत सुप्रतिष्ठा पावलेला प्राचीन उदयन राजा, यानें एका इराणी राजाचा पराभव केला असा उल्लेख बृहत्कथामंजिरींत आहे. रघुवंशांतील पारसीकांविषयींचा उल्लेख सुशिक्षित वाचकांच्या परिचयाचा आहेच. तो उल्लेख म्हणजे रघूच्या दिग्विजयांतील 'पारसीकान् ततो जेतुं प्रतस्थे स्थलवर्त्मना' हा होय.

इराणचा हिंदुस्थानशीं अनेक शतकें हा जो संबंध आला त्याची आठवण कायम राहील अशा कांहीं खुणा राहून गेल्या आहेत. या

विषयासंबंधीं डॉ. केतकर यांनीं 'प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथांत पुढीलप्रमाणें अनुमानें मांडलीं आहेत : इराणी लोकांनीं मथुरेजवळच्या भागावर जेव्हां अधिराज्य स्थापन केलें तेव्हां त्यांनीं येथील मूळ भाषा जी शूरसेनी तिच्यावर आपल्या पारसी भाषेचें आक्रमण करून एक नवीन भाषा निर्माण केली तीच 'पैशाची' भाषा होय. याच प्रदेशामध्यें पुढें मुसलमानांनीं अशीच मिश्रभाषा उर्दू निर्माण केली हें अर्वाचीन इतिहासांत प्रसिद्ध आहे. इराण्यांच्या या पैशाची भाषेला येवढें वैभव व महत्त्व प्राप्त झालें कीं, एके काळीं महत्त्वाचे ग्रंथ पैशाचींत लिहिले जात असावेत. निदान असा एक थोर महत्त्वाचा ग्रंथ या भाषेंत लिहिला गेला, तो 'बृहत्कथा' हा ग्रंथ होय. गुणाढ्यानें पैशाचीमध्यें लिहिलेला हा ग्रंथ आज फक्त संस्कृत रूपांतरांत उपलब्ध आहे; पण तो मूळ पैशाची भाषेंत होता असे उल्लेख आहेत. इराण्यांचे धर्मगुरु जे 'मग' ते तर हिंदुस्थानांत फार पूर्वींपासून म्हणजे कदाचित् वेदपूर्वकालापासून असावेत हें वर सांगितलेंच आहे. मगध देशांत त्यांची मुख्य वस्ती असावी. जरासंध असुर हा मगधांतलाच. असुर शब्दावरून तो सुद्धां बाहेरचा असावा. मगांच्या भिन्न संस्कृतीमुळें वैदिकांचें व त्यांचें पटत नसावें. यामुळें मगधांत ताप जावो असा उल्लेख अथर्ववेदांत आहे. पुढें या लोकांना प्रतिष्ठा मिळाली असावी. नंतर ते **शाकद्वीपी ब्राह्मण** म्हणून पुढें प्रसिद्धि पावले व ज्योतिषी, मूर्तिकार व वैद्य म्हणून समाजांत स्थिर झाले. मगांच्या अनेक टोळ्या निरनिराळ्या काळीं हिंदुस्थानांत आल्या असाव्यात. पैकीं एकीला सन्मानपूर्वक मुद्दाम बोलावून आणलें होतें याविषयीं भविष्यपुराणांतील कृष्णपुत्र सांब याची कथा साक्ष देण्यास उभी आहे. या कथेंत असें वर्णिलें आहे कीं, सांबाच्या रूपावर कृष्णास्त्रिया भाळल्या व त्यामुळें कृष्णास राग येऊन त्यानें सांबास तूं कुष्टरोगी होऊन विरूप होशील असा शाप दिला. हा रोग बरा करण्यांत मग ब्राह्मणांचा हातखंडा असल्याची त्या काळीं कीर्ति असावी. म्हणून सांबानें

शाकद्वीपाहून मगांना मुद्दाम बोलावून आणलें व त्यांना गांवें इनाम लावून दिलीं.

> शाकद्वीपं मया गत्वा आनीता मगपुंगवः
> सत्कृत्य पूजयित्वा तु पुरं तेषां समर्पितम् ॥

या मग ब्राह्मणांनीं सांबाचा कुष्टरोग बरा केला. त्यामुळें त्यांना यादवांच्या मुली देऊन त्यांचें हिंदुस्थानांत बस्तान बसवून दिलें. शाकद्वीपाहून आलेल्या ब्राह्मणांत तीन जाती होत्या. त्या मग, भोजक व सोमक या होत. शाकद्वीप म्हणजेच शकस्थान व इराण मिळून होणारा प्रदेश. शकस्थान अथवा सिथिया हा शकलोकांचा प्रदेश इराणच्या उत्तरेस आहे व त्यांतील बल्क शहर हें एके काळीं इराणी साम्राज्याचेंहि प्रमुख स्थान होतें. मग हे उपाध्याय इराणी लोक व शकलोक या दोघांचेंहि उपाध्येपण करीत. उदेपूरचा राणा हा शकवंशीय असावा व त्याचेबरोबर आलेले मग लोक हे पुढें श्रीमाळी ब्राह्मण या नांवानें ओळखले जाऊं लागले. आपणांस शाकद्वीपी ब्राह्मण म्हणणारा वर्ग उत्तर हिंदुस्थान व गुजराथ-कच्छ या ठिकाणीं आहे. मगांनीं भोज अगर भोयी लोकांच्या कन्या केल्या तेव्हां मगांस भोजक हें नांव प्राप्त झालें असावें. अंगिरस ब्राह्मण म्हणूनहि हे कांहीं ठिकाणीं ओळखले जातात. वैद्यक, भविष्य व मूर्तिशिल्प ह्या त्यांच्या धंद्यांचा वर उल्लेख केलाच आहे. नटवर्गांतहि यांचा प्रवेश असावा. भरतकृत नाट्यशास्त्रांत ज्या पूर्वाचार्यांचीं नांवें आहेत त्यांत एक नांव कृशाश्व असें आहे. हें नांव केरशास्प या नांवाचें संस्कृत रूप असावें. हा तर्क खरा असल्यास हिंदुस्थानांत आलेल्या इराणी लोकांनीं भारतीय नाट्यकलेवरहि परिणाम केला असावा असें म्हणावें लागेल. भोजक नांवाचा ज्योतिर्वर्ग हा मूळ मगच होय, याविषयीं हर्षचरित्राचा (चतुर्थ उल्लास) टीकाकार शंकरभट्ट याची साक्ष आहे. तो लिहितो, "भोजका रविमर्चयित्वा पूजका हि भूयसा गणका भवन्ति ये मगाः इति प्रसिद्धाः" ( केतकर,

'प्राचीन महाराष्ट्र'). पंजाबांतील खेरोष्ट्र लिपि आणि शिल्पकलेंतील सिंहशीर्षक या गोष्टीहि इराणांतून आल्या असाव्यात असें पाटलीपुत्राचें उत्खनन करणारे डॉ. स्पूनर यांचें मत आहे.

## ग्रीकांचें ऋण

इराणी लोकांच्याप्रमाणें ग्रीकलोकांचाहि हिंदुस्थानवर कांहीं काल अंमल होता. शिकंदराची हिंदुस्थानवरची स्वारी प्रसिद्धच आहे. ह्या स्वारींत हिंदूंचा राजा पोरस याचा पराभव झाला तरी सिंधू नदीच्या अलीकडे फारसें दूरवर शिकंदराला येतां आलें नाहीं. पोरसाचा पराभव झाला तरी इतर अनेक लहानसहान पण शूर व लढवय्या लोकांचीं राज्यें या प्रांतांत होतीं व त्या सर्वांशीं लढण्याच्या कल्पनेनें शिकंदराच्या सैन्यानें हातपाय गाळले व त्यामुळें त्याला सिंधूतटावरूनच काढता पाय घ्यावा लागला, त्याचा उल्लेख मागें आलाच आहे. शिकंदराच्या नंतर दुसरी महत्त्वाची यवनाची स्वारी मिनँडर याची. शिकंदराच्या स्वारीचा उल्लेख भारतीय वाङ्मयांत सापडत नाहीं. पण मिनँडरच्या स्वारीचा उल्लेख खुद्द पंतजलीच्या महाभाष्यांतच आलेला आहे, तो 'अरुणत् साकेतं यवनः ('पाणिनी, ३. २. ३. भाष्य') म्हणजे यवन राजानें साकेत अथवा मथुरा या नगरीला वेढा घातला अशा स्वरूपाचा आहे. या उल्लेखांतील यवन राजा हा मिनँडर असावा असें सामान्यपणें मानण्यांत येतें. कांहींच्या मतें (रायचौधरी) तो डिमिट्रियस असावा. कोणीहि असला तरी मथुरेला वेढा देण्याइतके यवन आंतवर आले होते हें स्पष्ट आहे. या ग्रीक अमदानीच्या कालांत ग्रीक लोकांचा आणि भारतीयांचा निकट संनिकर्ष झाल्यावर दोन्ही संस्कृतींत जी देवाण-घेवाण झाली तिच्यासंबंधीं युरोपियन ग्रंथकारांनीं प्रथम प्रथम तरी अट्टाहासानें असें प्रतिपादन केलें आहे कीं, येथें भारतीय संस्कृतीनेंच सर्वतोपरी उसनवारी केली असली पाहिजे; शास्त्रविद्या, कला वगैरेपैकीं कोणतेंहि

क्षेत्र घेतलें तरी ग्रीक हे धनको आणि भारतीय हे ऋणको असाच या दोहोंचा संबंध असावा; धर्मतत्त्वज्ञान, दैवतें येथपासून तों वैद्यक, गणित, ज्योतिष, व्याकरण वगैरे शास्त्रें व काव्य, नाटक, वास्तुशिल्प, मूर्तिशिल्प, नाणीं इत्यादि कलांपर्यंत सर्व विषय शिकण्यास भारतीय हेच ग्रीकांच्या पाठशालांत धूळपाटी घेऊन गेले असावे. पुराणवस्तु-खात्यानें प्रथम प्रथम उत्खनन केलें तेंहि पेशावर, गांधार या बाजूला म्हणजे ग्रीकलोकांचा अम्मल ज्या प्रदेशावर जास्तींत जास्त कालावर होता त्या भागांत. हेतु हा कीं, ग्रीकांचें म्हणजे युरोपियन संस्कृतीचें वर्चस्व दाखवून आपल्या प्राचीन संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा अभिमान जागविणाऱ्या भारतीयांना हिणवितां आलें तर पाहावें. यापैकीं बहुतेक क्षेत्रांतील भारतीयांची उसनवारी ही कशी काल्पनिक व असत्य आहे हें गौरांगनाथ बानर्जी यांनीं आपल्या Hellenism in Ancient India या पुस्तकांत सविस्तर दाखवून दिलें आहे.

उलट प्रतिक्रिया म्हणून येशु ख्रिस्त हा तामिळी होता; गुजराथ हा एके काळीं द्रविड देशाचा भाग असून तेथील पालीठाण्यावरून पालेस्टाइन हें नांव दिलें असावें; इंग्लंडांतील हेराड हे मूळचे हिंदुस्थानांतील रेड्डी असावे असें एम्. एस्. रामस्वामी यांनीं व इंग्लंड-मधील जुना ड्रुइडपंथ व तामिळ प्रांतांतील शैवपंथ यांत लिंगपूजादि विषयांत साम्य असल्यानें, इंग्लंडमधील जुने रहिवासी हे तामीळ प्रांतांतले असावे असें गोपाळ चेट्टी यांनीं, आणि ग्रीकांनीं आपली सर्व संस्कृति भारतीयांपासून घेतली असे पोकॉक यानें प्रतिपादलें आहे. पोकॉकनें तर ग्रीक संस्कृति ही भारतीय संस्कृतीची कन्या होय हें मत 'इंडिया इन् ग्रीस' या पुस्तकांत मोठ्या आवेशानें मांडलें आहे. कृष्णाचा बंधु बलराम हा हिमालयांत निघून जाऊन बेपत्ता झाला तो नंतर बहुधा ग्रीसमध्यें गेला असावा असें तो म्हणतो. ग्रीकांचा सूर्य देव अपोलो हा दुसरा कोणी नसून पांडव असावा. कारण अपोलोला ( Kynthius ) कार्यंथियस असें म्हटलें आहे. आणि

कार्यंथियस म्हणजे कोण? तर कौंतेय पांडव! आणि ग्रीक वाङ्मयांत Lacman आणि Lughman हीं नांवें येतात तीं रामाचा बंधु जो लक्ष्मण त्याच्याच नांवाचे अपभ्रंश होत. स्कँडिनेव्हिया म्हणजे नॉर्वे व स्वीडन या प्रातांतहि भारतीय क्षत्रिय वीर गेले होते. कारण स्कॅंडनेव्हिया म्हणजे स्कंदनाभि! असा पोकाकचा सिद्धान्त आहे. काल्पनिक भाषासाम्याच्या ठिसूळ पायावर उभारलेलीं असलीं मतें केवळ मौजेचा विषय म्हणून ऐकून ठेवावयाचीं असतात, हें सांगावयास नकोच.

असले तर्क सोडले तर, नाणीं पाडण्याची कला, पुतळे करण्याची कला व ज्योतिषविद्या या क्षेत्रांमध्यें भारतीयांनीं ग्रीकांच्यापासून कांहीं गोष्टी उचललेल्या आहेत हें मान्य केलें पाहिजे. या तिन्ही विद्यांत ग्रीकांचा संबंध येण्यापूर्वी भारतीयांची गति नव्हती असें नव्हे. या तिन्ही विद्यांत त्यांनीं प्रगति केलेली होती, पण ग्रीक लोकांच्यापासून या विद्यांत शिकण्यासारखें आहे असें पटल्यावर, संग्राहक वृत्तीनें भारतीयांनीं ग्रीकांच्या विद्येंतील उपकारक भाग आत्मसात् केला. ग्रीक व रोमन लोकांचा संबंध येण्यापूर्वी हिंदुस्थानांत रुप्याच्या व सोन्याच्या नाण्यांचा प्रचार होता; पण त्यांचा आकार, त्यांवरील चित्रें व लेख हीं ओबडधोबड असत. ग्रीक व रोमन नाण्यांचा प्रचार हिंदुस्थानांत सुरू झाल्यावर मात्र हिंदुस्थानांतहि त्या तऱ्हेचीं सुंदर गोलदार नाणीं पाडण्यांत येऊं लागलीं. ग्रीकांचा अंमल हिंदुस्थानांतून नष्ट झाल्यावरहि पुढें शेंदोनशें वर्षें हिंदुस्थानांत जीं नाणीं पाडीत त्यांवरहि ग्रीक लिपींत लेख असे यावरून एतद्विषयक ऋण लक्षांत येईल. खुद्द ग्रीक अमलामध्यें एका बाजूला ग्रीक लेख व दुसऱ्या बाजूला हिंदु दैवत जें शिव त्याची प्रतिमा अशा प्रकारचीं नाणीं पाडीत असत. अशीं पुष्कळ नाणीं उपलब्ध झालीं आहेत.

नाणक-कलेच्या जोडीला दुसरी कला म्हणजे शिल्पकला. या कलेंतील ग्रीक लोकांचें प्रावीण्य त्या वेळच्या जगांत अव्वल दर्जाचें

होतें. हिंदु शिल्पकलेचा गांधारशिल्प म्हणून जो एक पंथ आहे, त्या पंथानें निर्माण केलेल्या बुद्धाच्या प्रतिमा या, ह्या ग्रीक शिल्पाच्या अनुकरणानें तयार झाल्या आहेत असें सामान्यतः मानण्यांत येतें. विशेषतः शिल्पामध्यें वस्त्राच्या चुण्या हुबेहूब दाखविण्यांत जें कौशल्य लागतें तें ग्रीक शिल्पाच्या अनुकरणानें आपल्यांत आलें असावें, याविषयीं साधारण एकमत आहे. या गांधारशिल्पाचा विशेष प्रसार मात्र झाला नाहीं. अखिल भरतखंडांत सर्वत्र ज्याचा प्रसार झाला तें शिल्प मथुरेचें होय. बुद्धाच्या प्रतिमेवरहि ग्रीकाचा परिणाम झाला नसावा व ती सर्वस्वीं भारतीयच असावी असें आनंदकुमारस्वामींनीं प्रतिपादलें आहे ('अमे. ओ. जर्नल', जून १९२६.) सारनाथ येथील सुप्रसिद्ध बुद्धाच्या मूर्तीविषयीं स्मिथहि म्हणतो कीं, हिचा घाट ग्रीक नसून अगदीं स्वतंत्र आहे. ( हिस्टरी ऑफ फाइन आर्ट, पृ. १७० ) अर्थात् ग्रीक शिल्पाचा भारतीय शिल्पावर परिणाम झाला तो मर्यादित स्थलकालींच तेवढा झाला असें म्हटलें पाहिजे.

हिंदूंच्या वास्तुविद्येवरहि ग्रीकांच्या शिल्पाचा परिणाम झाला असावा असें पाटलीपुत्राचें उत्खनन करणारे डॉ. स्पूनर यांचें मत आहे. पाटलीपुत्र येथें उत्खननांत जे अवशेष सापडले आहेत त्यांवरून तेथल्या इमारतींत पूर्वीं अनेक खांब असलेला मोठा दिवाणखाना असावा व तो पर्सिपोलिस येथील शतस्तंभी दिवाणखान्याच्या धर्तीवर असावा असें स्पूनरचें म्हणणें आहे. खांबांमधील अंतरहि दोन्ही ठिकाणीं एकच म्हणजे दहा दहा क्युबिटांचेंच आहे.

## ग्रीक ज्योतिष

ग्रीकांच्या ऋणांतील तिसरी व अधिक महत्त्वाची गोष्ट ही ज्योतिषशास्त्रांतील होय. या शास्त्रांतील कांहीं कल्पना भारतीयांनीं ग्रीकांच्याकडून घेतल्या हें खुद्द भारतीयांनींच प्रांजलपणें लिहून ठेवलें आहे. पण या प्रांजलपणाचा गैरफायदा घेऊन कांहीं पाश्चात्यांनीं असा सिद्धान्त

ठोकून दिला होता कीं, सर्व ज्योतिषशास्त्रच भारतीयांनीं ग्रीकांच्यापासून उसनें घेतलें असलें पाहिजे! मागें दुसऱ्या प्रकरणांत सूर्यसिद्धान्ताचा भाषांतरकार व्हिट्नें याचा अभिप्राय उद्धृत केला आहे त्यांत अवलोकनाची व शुद्ध तार्किक विचारसरणीची सवय नसलेल्या भारतीयांच्या मेंदूंतून ज्योतिषशास्त्र निघणेंच अशक्य आहे असलीं मुक्ताफळें आलेलींच आहेत. संस्कृत वाङ्मयाचा इतिहासकार वेबरहि लिहितो कीं, "भारतीय ज्योतिषांत खरा जोम उत्पन्न झाला असेल तर तो ग्रीकांशीं संबंध आल्यावरच; आणि याविषयीं त्यांनींच कबूली दिली असल्यानें बाकीच्या शास्त्रांचीहि हीच स्थिति असावी." (पृ. २५१).

पण या बाबतींत व्हिट्नें, बर्जेस, थिबो वगैरे अनेक पाश्चात्य विद्वानांच्या मतांचें परीक्षण करून 'भारतीय ज्योतिषशास्त्र' या बहुमोल ग्रंथांत दीक्षित लिहितात कीं, 'ग्रीकांपासून आम्हीं कांहीं घेतलें असेल तर तें टालमी व हिपार्कस यांच्यापूर्वींच घेतलें असलें पाहिजे. पण यांच्यापूर्वीं ग्रीकांचें होतें काय? रविचंद्रस्पष्टीकरण आणि पंचग्रह-स्पष्टीकरण ही काय ती ज्योतिषांत महत्त्वाची गोष्ट. हिचें ज्ञान हिपार्कसच्या पूर्वीं पाश्चात्यांस मुळींच नव्हतें असें सर्व युरोपियन कबूल करतात.' (पृ. ५१२). येथें ज्योतिषशास्त्राची स्थापना मूळची हिंदूंचीच येवढें दाखविण्याचाच दीक्षितांचा मानस आहे. भारतीयांच्या ज्योतिषशास्त्रांत ग्रीकांच्या व इतरांच्या ज्योतिषानें कांहींच भर टाकली नाहीं असें त्यांना म्हणावयाचें नाहीं. उदाहरणार्थ, ताजिक हें यवनांपासून घेतलें असें त्यांनींच लिहिलें असून त्यास पुरावा म्हणून 'यवनाचार्येण पारसीकभाषया प्रणीत ज्योतिःशास्त्रैक-देशरूपं ताजिक शब्दवाच्यं' व 'गर्गाद्यैः यवनैश्च रोमकमुखैः सत्यादिभिः कीर्तितं। शास्त्रं ताजिक संज्ञितं'॥ — अशीं अनुक्रमें हायनरत्न व ताजिकभूषणपद्धति या सोळाव्या-सतराव्या शतकांतील ग्रंथांतील वचनें उद्धृत केलीं आहेत (पृ. ४९०). तसेंच सात वारांसंबंधीं ते लिहितात कीं, " सर्व गोष्टींचा विचार करतां मला असें वाटतें कीं,

सात वार हे मूळचे आमचे नसून, खाल्डियांतून आमचेकडे आले.” (पृ. १३८ ). शामशास्त्री यांना हेंहि मान्य नाहीं. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, सप्तग्रह व त्यांशीं संबद्ध असलेलीं सप्त वारांचीं नांवें मूळचीं आमचींच होत. याचें कारण ते असें देतात कीं, ग्रह हा शब्द पूर्वी सोमपात्राला लावीत असत व गणपतीचें प्रतीक म्हणून जशी आपण सुपारीची स्थापना करतों तशीं ग्रहांचीं प्रतीकें म्हणून सोम पात्रांचीं स्थापना करीत असत. हे ग्रह व त्यांशीं संबद्ध असलेले सप्तवार हेहि आमचेच असावेत. ( ‘भांडारकर ॲनल्स, खंड ४’ ).

## म्लेंच्छ ऋषि !

तें कसेंहि असो, मूळ ज्योतिषशास्त्र आमचें स्वतंत्र असलें तरी कांहीं काल ग्रीक ज्योतिषाचें अध्ययन भारतीय पंडित करीत असत याविषयीं या पंडितांनींच लिहून ठेवलें आहे. उदाहरणार्थ त्यांच्या दोन सिद्धान्तग्रंथांना नांवें आहेत तींच मुळीं रोमक सिद्धान्त व पौलिश सिद्धान्त अशीं आहेत. तसेंच पंचसिद्धांतिकेंत एके स्थळीं यवनपुरापासून उज्जयिनीचें अंतर सांगितलें आहे; आणि सूर्यसिद्धांताच्या कांहीं पोथ्यांत तर रोमकनगरांत म्लेंच्छावताररूपानें तुला ज्योतिष ज्ञान देईन असें सूर्यानें मयास सांगितलें अशा अर्थाचा श्लोक आला आहे. ‘मदंश पुरुषोऽयं ते निःशेषं कथयिष्यति। रोमके नगरे ब्रह्मशापान्म्लेंच्छावतारधृक् ।’ ( दीक्षित, पृ. १७८ ). तसेंच आपल्या जातकग्रंथांत अनेक यावनी संज्ञा आढळतात त्यांवरूनहि आपल्या जातकाच्या जोडीला यावनी जातकाचीहि एके काळीं आपल्या देशांत चलती होती हें स्पष्ट दिसून येतें. बृहज्जातकांत सुमारें छत्तीस ग्रीक संज्ञांचा उल्लेख आहे. त्या म्हणजे क्रिय, तावुरी, जितुम, कुलीर, लेय, पाथेन, जूक, कौर्प्य, तौक्षिक, आकोकेर, हृद्रोग व इत्थम या राशींच्या संज्ञा; रिष्फ, द्यून, केंद्र, पणफर, अपोक्लीम, हिबुक, यामित्र, त्रिकोण, मेषूरण, वेशि ह्या कुंडलींतील स्थलांच्या संज्ञा; हेलि, हेम्न, आर,

कोण, आस्फुजित् या ग्रहांच्या संज्ञा; तसेंच होरा, द्रेष्काण, हे राश्यंश, सुनफा, अनफा, दुरुधर, केमद्रुम हे चंद्रापासून ग्रहांचे योग; लिह्या म्हणजे कला आणि ज्यौ व द्युत या होत. या छत्तीसपैकीं मेषादि-बारा राशी, सप्तग्रह व कुंडलींतील बारा स्थानें यांना पर्यायशब्द संस्कृतमध्यें आहेत. पण ग्रीक ज्योतिषाची चलती असल्यामुळें संस्कृत शब्दांच्या जोडीला ग्रीक शब्दहि दिलेले आहेत. होरा, द्रेष्काण, सुनफा, अनफा, दुरुधर, केमद्रुम 'यांस मात्र संस्कृतपर्यायशब्द नाहींत'. हे सर्व शब्द मुख्यतः जातकस्कंधांत येतात. यावरून ग्रीक ज्योतिषाचें जें ऋण आहे तें मुख्यतः फलज्योतिषासंबंधीं आहे असें दिसतें. आपल्या पूर्वजांनीं ग्रीक जातकाचें हें ऋण ज्या निःसंकोच वृत्तीनें मान्य केलें आहे त्यावरून त्यांची उदारदृष्टि स्पष्टपणें नजरेंत भरते. यासंबंधीं वराहमिहिरानें आपल्या बृहत्संहितेंत गर्गाचार्यांचा एक श्लोक उद्धृत केला आहे त्यांत गर्गाचार्य लिहितात :

म्लेंच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रं इदं स्थितम्

ऋषिवत् तेऽपि पूज्याः स्युः किं पुनर्दैववित् द्विजाः ॥

म्हणजे म्लेंच्छ जे यवन त्यांच्यामध्यें हें शास्त्र चांगलें सुप्रतिष्ठित असल्यानें तेहि ऋषिवत् पूज्य होत! गर्गाच्या या उक्तीचें मर्म पूर्णपणें लक्षांत येण्यास हें आणखी सांगितलें पाहिजे कीं, यवनांनीं भरतखंडावर स्वारी करून मथुरेपर्यंतचा प्रदेश ताब्यांत घेतल्यानंतर, गर्गानें वरील उद्गार काढलेले आहेत. परक्यांनीं आपल्यावर आक्रमण करावें याबद्दल गर्गाला खेद वाटत नव्हता असेंहि नव्हे. कारण या आक्रमणशील परकी यवनांबद्दल दुष्ट असा शब्द त्यानें वापरला आहे. 'यवनाः दुष्टविक्रान्ताः प्राप्स्यन्ति कुसुमध्वजम्'. यवनांप्रमाणें शक नांवाच्या परक्यांनींहि हिंदुस्थानावर आक्रमण केलें होतें आणि त्यांच्या राजांचाहि संभावना गर्गानें दुष्ट, पापी, लोभी, अशा शब्दांनींच केली आहे. शकांनाच 'ततो राजाह्यर्थलुब्धो महा-

वल:। दुष्टभावश्च पापश्च विनाशे समुपस्थिते ॥ (कर्न—बृहत्संहिता प्रस्तावना) **अर्थात् परकीयांच्या लोभमूलक आक्रमणाबद्दल तिरस्कार वागवूनहि त्यांची विद्या आत्मसात् करण्याविषयीं जागरूकता राखली पाहिजे** हें धोरण गर्गानें स्वीकारलें होतें. आणि तें आजहि उपयोगी ठरण्यासारखें होतें. हें धोरण कालांतरानें ढिलें झालें. भोंवतालच्या जगांत चाललेल्या चळवळीकडे नजर ठेवण्याची जागरूकता लोपली, स्वतःच्या सामर्थ्याविषयीं भलत्या कल्पना उद्भवल्या आणि त्यामुळें परकीयांच्या आक्रमणाला तोंड देण्यास असमर्थ होऊन जगाच्या मागें आपण कसें पडलों तें पुढें पाहूं.

प्राचीन भारतीयांनीं परकीयांच्या संस्कृतींतून कोणत्या विद्या, कला उचलल्या हें आतांपर्यंत पाहिलें. असल्या किरकोळ परकीय उसन-वारीनें संस्कृतीच्या प्रकृतींत बदल होत नाहीं. तेव्हां आतां अशा भागाकडे वळूं या, कीं जेथें भारतीय संस्कृतीच्या अंतरंगांतील खळबळ दिसूं लागून ती संस्कृति अनेक वंशविचाराचार यांच्या मिश्रणानें कशी गंगाजमनी स्वरूपाची बनलेली आहे हें उमगूं लागेल; आणि हें मिश्रस्वरूप बनत असतां तिच्यांत कोणते गुणविशेष आणि दोषविशेष उद्भूत झाले याचीहि कल्पना येईल.

# प्रकरण अकरावें

# भारतीय संस्कृतीचें गंगाजमनी स्वरूप

गेल्या प्रकरणीं आपण पाहिलें कीं, आपले पूर्वज विद्येच्या बाबतींत संग्राहक वृत्तीचे होते. आतां या प्रकरणांत आपली संस्कृति ही आज बरबर दिसते तशी एकजिनसी, अखंड नसून अनेक ठिकाणच्या मालमसाल्यांनीं त्यांनीं ती कशी बनवीत आणलेली आहे हें पाहावयाचें आहे. आणि हें पाहणें फार अगत्याचें आहे. कारण आज आपल्यापुढें प्रश्न आहे तो बाहेरून कोणकोणत्या कल्पना आपल्या संस्कृतींत नवीन रुजवावयाच्या, किंवा खरें बोलावयाचें तर पूर्वींच्यांचाच जीर्णोद्धार करावयाचा व तिला बळकट आणि जोरकस करावयाची हें पाहण्याचा आहे. आतां नव्या कल्पनांचें किंवा जुन्याच पण आठवण बुजलेल्या कल्पनांचें स्वागत करण्याचा प्रसंग आला कीं, अपरात्रीं दार उघडतांना मन कचरतें तसा प्रसंग! अशा ठिकाणीं पूर्वदाखला मनाला धीर देतो. तेव्हां इतिहासाला विचारूं या.

तो सांगेल कीं, "आज तुम्ही सर्व हिंदुस्थानची मिळून एक संस्कृति अशी भाषा बोलतां ना! पण प्रथम मी तुम्हांला असें सांगतों कीं, आजचा काशीपासून रामेश्वरापर्यंतचा हा सर्व प्रचंड देश फार प्राचीन काळीं सर्वच्या सर्व एका संस्कृतीखालीं नव्हताच मुळीं. कित्येक शतकांच्या संस्कृतीकरणप्रक्रियेनें त्याचे अनेक भाग एकरूप बनत बनत आलेले आहेत. आणि या अफाट देशांतील लोक? तेहि एक प्रकारचे नव्हत. म्हणजे हिंदूंमध्यें अठरापगड जाती आहेत येवढ्याच अर्थीं नाहीं मी हें म्हणत, तर आजच्या हिंदु समाजांत नाना प्रकारच्या वंशांचें रक्त खेळत आहे त्याला उद्देशून. आणि आजचे धार्मिक आणि

लौकिक आचार-विचारहि तुम्ही वैदिक समजतां ना? तर तेंहि खऱ्या स्वरूपानें वर्णन करावयाचें म्हणजे वैदिक व अवैदिक यांचे मिळून बनलेले आहेत. पूर्वीं क्षत्रिय राजे उपाध्यायांचीं गोत्रें लावीत असत; तसें आपली संस्कृति आज आपलें गोत्र वैदिक म्हणून सांगते हें खरें. पण तिचा व्यवहार पाहिला तर तो वैदिक आर्यांच्या बाहेरील द्रविडादिकांच्या आचारविचारांनीं भरपूर भरलेला आढळेल. शिवाय या संस्कृतिवर इराणी, ग्रीक, मोगली या संस्कृतींचाहि थोडाफार परिणाम झाला आहे तो निराळाच. हा सर्व गोतावळा लक्षांत घेतलात म्हणजे आजच्या तुमच्या संस्कृतीचें मिश्र स्वरूप तुमच्या लक्षांत येईल. आणि त्याचें वर्णन तुमच्या गंगाजमनी या रूढ शब्दानेंच उत्तम होतें. गंगेचें शुभ्र जल आणि यमुनेचें नील जल या दोहोंच्या मिलाफानें निष्पन्न होणारें विविधरंगी स्वरूप गंगाजमनी शब्दानें सूचित केलें जातें. तोच प्रकार हिंदु संस्कृतीचा होय. आजच्या या संस्कृतींतील मुख्य एकरूप झालेले दोन प्रवाह म्हणजे श्वेतवर्ण आर्य आणि घनश्याम द्रविड यांच्या कामागिरींचें होय. म्हणूनच तुमची संस्कृति गंगाजमनी होय."

आपल्या संस्कृतीचें हेंच मिश्रस्वरूप आतां थोडें न्याहाळून पाहूं या.

## देशाच्या वाढत्या मर्यादा

आजची अखिल भारतीय संस्कृति हा अनेक शतकांचा परिपाक होय. वैदिक आर्य प्राचीन काळीं केव्हां तरी पंजाबांत राहत असत. तेथून ते पुढें गंगायमुनांच्या कांठीं सरकले, आणि नंतर हिमालयापासून विंध्यपर्वतापर्यंत त्यांनीं आपला संसार थाटला. वरींच शतकेंपर्यंत विंध्यपर्वत हीच त्यांची दक्षिणेकडील अभेद्य सीमारेषा कायम राहिली. त्याच्यापलीकडील दक्षिणापथ या सामान्य नांवानें उल्लेखिला जात असलेला प्रदेश हा अरण्यव्याप्त घोर राक्षसांचा प्रदेश म्हणून गणला जाई. गौतमबुद्धाच्या काळापर्यंत सामान्यतः हीच

स्थिति होती असें दिसतें. त्या वेळेला जीं सोळा महाजनपदें किंवा राज्यें होतीं म्हणून बौद्धग्रंथांत ( विनयपिटकादि ) वर्णन आहे त्यांत विंध्याच्या दक्षिणेकडील एकहि नाहीं. याचा अर्थ विंध्याची मर्यादा ओलांडून कोणीच पलीकडे जात नसत असा नव्हे. शूर धाडसी व वसाहत करण्याची धमक असलेल्या लोकांनीं या मान उंच व ताठ करून वाट रोखून बसलेल्या विंध्याची कधींच पर्वा केली नाहीं. या धाडसी वसाहतकारांपैकीं आद्य वसाहतकार अगस्तिमुनि हा होय. त्यानें विंध्यापलीकडील अज्ञात घनदाट अरण्यांत प्रवेश केला आणि वातापि, इल्वल वगैरे राक्षसांचा निःपात करून वसाहत केली. प्राचीन तामिळ ग्रंथांत वर्णन आहे कीं, विंध्य ओलांडल्यावर अगस्त्यमुनि गुजराथेंत द्वारकेस गेले व तेथून अठरा राजघराण्यांतील राजपुत्र बरोबर घेऊन दक्षिणेंत प्रवेश करिते झाले. त्यांना बारा शिष्य असून प्रत्येकानें तामिळ भाषेचें व्याकरण रचिलें. ( 'रेशल सिंथेसिस'-एस्. व्ही. विश्वनाथ. ) या ऋषिवर्यांचा पराक्रम पुढें राष्ट्राला मान्य झाल्यावर त्यानें विंध्यपर्वताला आपणापुढें दंडवत घालावयास लावलें अशी काव्यमय आख्यायिका पुराणकारांनीं रचिली. आणि त्याहीपेक्षां या धाडसी आद्य वसाहतकाराची स्मृति अक्षय अखंड टिकावी म्हणून दक्षिणे-कडील एका अत्यंत तेजस्वी अशा ठळक ताऱ्याला त्याचें नांव दिलें!

बराच काल हा दक्षिणेकडील सर्व प्रदेश, त्याचप्रमाणें गंगा-यमुनांच्या पूर्वेकडील दूरचा प्रदेशहि वैदिक संस्कृतीच्या प्राकाराच्या बाहेर होता. या प्रदेशावर वैदिक यज्ञकुंडांतून निघणाऱ्या ज्वालांचा प्रकाश पडत नसे. अशा प्रदेशांत जाऊन येणें हें सुद्धां प्रायश्चित्तार्ह समजलें जाई. त्या त्या स्मृतींमध्यें ह्या कल्पना स्पष्ट उमटलेल्या आहेत. एके काळीं फक्त गंगा आणि यमुना यांच्यामधील जो दुआब तेवढाच प्रदेश आर्यावर्त म्हणून गणला जाई. त्या वेळची आर्यावर्ताची संस्कृति ही येवढ्या प्रदेशावर नांदणारी तेवढीच. या पुण्यभूमीच्या पलीकडे प्रवास करणारास प्रायश्चित्त घ्यावें लागे. बौद्धायनानें एक जुनी गाथा

उद्धृत केली आहे कीं, कलिंगाला जाणारा हा पायांनीं पाप करीत असतो. 'पद्भ्यां स कुरुते पापं यः कलिंगान् प्रपद्यते'. पुढें आर्यांचा अग्नि जसा अधिकाधिक प्रदेश व्यापूं लागला तसतशी आर्यावर्ताची मर्यादा वाढूं लागली.

मनुस्मृतीमध्यें चार निरनिराळ्या प्रदेशांचा उल्लेख आहे त्यावरून हा विस्तार कसकसा झाला हें दिसून येतें. मनूनें उल्लेखिलेला पहिला प्रदेश म्हणजे सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांच्या मधील प्रदेश. हा खास देवनिर्मित असून त्याला ब्रह्मावर्त म्हणत. दुसरा प्रदेश कुरुक्षेत्राच्या आसपासचा; याला ब्रह्मर्षिदेश म्हणत. तिसरा हिमालय व विंध्य यांच्यामधील पण फार पूर्वेकडील व फार पश्चिमेकडील भाग सोडून उरलेला; याला मध्यदेश म्हणत. आणि चौथा म्हणजे हिमालय आणि विंध्य यांमधील व पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत पसरलेला सर्व प्रदेश. हा आर्यावर्त होय. एके काळीं गंगा आणि यमुना यांमधील अरुंद पट्टीसच आर्यावर्त म्हणत असत असें बौद्धायनानें जुनें वचन दिलें आहे तें लक्षांत घेतलें म्हणजे ह्या आर्यावर्त संज्ञेचा विकास क्रमाक्रमानें झाला हें स्पष्ट होतें. आर्यांच्या वसाहती जसजशा वाढूं लागल्या तसतशी यज्ञीय भूमीची व्याप्ति वाढूं लागली. तथापि बराच कालपर्यंत विंध्यपर्वत हीच यज्ञीय भूमीची दक्षिणसीमा होती व आपला महाराष्ट्र (दक्षिणापथ) हा या संस्कृतीच्या कक्षेबाहेरील होता. हा सर्व प्रदेश दंडकारण्यानें व्याप्त असा होता. दाशरथी रामासारख्या धाडसी वीरांनीं या प्रदेशांत संचार केला होता व अगस्तीसारख्या मुनींनीं ठिकठिकाणीं आपले आश्रम स्थापले होते. पण आर्यसंस्था येथें मनुस्मृतीच्या कालापर्यंत अद्याप पक्क्या रुजल्या नसाव्या.

पुढें दक्षिणेकडे अनेक प्रतापी राजे निर्माण झाले आणि दक्षिणापथ हा आर्यांच्या दृष्टीनें मागासलेला न राहतां आर्यावर्ताच्या तोडीनें सुधारला, तेव्हां दक्षिणसमुद्रापर्यंतचा सर्व देश हा एक अखंड देश

म्हणून ओळखला जाऊं लागला. आतां उत्तरेकडील गंगायमुना या नद्यांप्रमाणें दक्षिणेकडील नर्मदा-कावेरी या नद्यांनाहि पावित्र्य प्राप्त झालें. त्यांच्या परिसरांत जाणारांना पाप लागतें ही प्राचीन कल्पना लोपून त्यांचा पूजेअर्चेच्या पवित्र मंत्रांत उल्लेख येऊं लागला. साहित्यामध्यें भूमिवर्णनांत 'समुद्ररशना' हा समास रूढ झाला. तीर्थयात्रेमध्यें काशीइतकेंच रामेश्वराचेंहि माहात्म्य वाढलें. चार धामें, बारा ज्योतिर्लिंगें, सप्तपुरी या सर्वांचा समावेश करणारा व उत्तरेस सिंधुनदीपासून खालीं दक्षिणसागरापर्यंत पसरलेला हा एकदेश मानण्यांत येऊं लागला. पण हा सर्व अफाट देश एका संस्कृतीच्या सूत्रांत गोंविला गेला, तें अनेक शतकांच्या एकीकरणाच्या प्रक्रियेचें फल होय.

देशाचा जसजसा विस्तार होत गेला तसतसा वैदिक आर्यांच्या समाजांतहि येथल्या मूळच्या वर्णांच्या लोकांचा प्रवेश होऊन तो समाज शबल स्वरूपाचा बनत चालला. शिवाय या प्रदीर्घ कालांत या भरतभूमींत बाहेरून येऊन अनेक लोक व वंश स्थायिक झाले व येथील पूर्वीं स्थायिक झालेल्या लोकांत पूर्णपणें मिसळून गेले. बाहेरून येणाऱ्या या लोकांपैकीं प्रत्येकाबरोबर त्यांच्या त्यांच्या कला, शास्त्रें, धर्म, आचार, रूढि वगैरे या देशीं येऊन दाखल होत. बाहेरून येणारे लोक बहुधा जेते म्हणून येत. प्रथम प्रथम त्यांचा दरारा व बोलबाला असे. कालांतरानें कांहीं पुन्हा बाहेर हुसकले जात. पुष्कळसे येथील लोकांत मिसळून जात. पण ते मिसळत असतां त्यांच्या संस्कृतीचे कांहीं विशेष मूळच्या संस्कृतींत मिसळत व प्रत्येक वेळीं मूळ संस्कृतीचें स्वरूप थोडथोडें पालटत जाई. पण या बाह्यांची छाप फारच थोडी बसली. संस्कृतीचें अंतरंग जे धार्मिक व लौकिक आचारविचार, त्यांच्यांत ज्या गंगाजमनी छटा उत्पन्न झाल्या त्या भरतखंडांतीलच आधींच स्थानिक झालेल्या निरनिराळया वंशांच्या लोकांच्या संघर्षामुळें उत्पन्न झाल्या.

भारतीय संस्कृति ही संमिश्र आहे या प्रश्नाचे ऐतिहासिक धागेदोरे थेट वैदिक कालांत जाऊन पोंचतात. कारण आजच्या भारतीय संस्कृतीवर ज्या वैदिक संस्कृतीची छाप आहे, त्या वैदिक संस्कृतीचे पुरस्कर्ते जे वेदसूक्तकार आर्यलोक तेच मुळीं अत्रत्य कीं बाहेरून आलेले या प्रश्नापासूनच या संस्कृति-संगमाच्या प्रश्नाला तोंड लागतें. वैदिक आर्य हे मूळचे हिंदुस्थानचे रहिवाशी होते असें प्रतिपादन करणारे कांहीं विद्वान् आहेत. त्यांच्या मतें इराण-आशियामायनर ते थेट उत्तरध्रुवापर्यंत त्यांनीं वसाहती केल्या व हिमयुग सुरू झाल्यावर तिकडे वस्ती करणें अशक्य होऊन त्यांच्या कांहीं टोळया फिरून हिंदुस्थानांत परत आल्या. परंतु दुसरें व अधिक प्रचलित मत असें आहे कीं, वैदिक आर्य हे हिंदुस्थानाबाहेरून कोठून तरी आलेले असावे. मग ते थेट उत्तरध्रुवापासून येवोत; किंवा मध्यआशिया वा कॉकेशस पर्वत येथून येवोत. ते आले ते एकाच काळीं आले व एकाच मार्गानें आले, कीं त्यांच्या भिन्न टोळया भिन्न काळीं, भिन्न मार्गांनीं आल्या याविषयींहि वाद आहे. पण या मतमतांतरांच्या जंगलांत आपणास येथें शिरावयाचें कारण नाहीं. आर्य म्हणून जे आपणास म्हणवीत तेहि सर्व एकवंशाचे होते, कीं भिन्न वंशाचे होते यांविषयींहि वाद आहे. (ऐल, मानव व सौद्युम्न हे तीन भिन्न वंश पार्गिटर मानतो.) तें कसेंहि असो. या आर्यांचा येथील मूळच्या लोकांशीं शेंकडों वर्षे झगडा होऊन या वैदिक आर्यांचा संचार सर्वत्र झाला. येवढेंच स्पष्ट आहे.

ज्या लोकांशीं वैदिक आर्यांचा संग्राम झाला ते लोक कोण होते ? ते लोक अनेक प्रकारचे होते. त्यांपैकीं असुर, द्रविड हे प्रमुख असावेत असें मानलें जातें. हे द्रविड हेहि मूळचे हिंदुस्थानचे, कीं तेहि बाहेरून व दक्षिणेंतून समुद्रमार्गानें किंवा बलुचिस्थानांत द्राविड गोतांतील ब्राहुची भाषा सापडत असल्यानें उत्तरेकडून बाहेरून आलेले असावे याविषयींहि निश्चित माहिती उपलब्ध नाहीं. पण तें कसेंहि

असलें तरी वैदिक आर्यांच्या समाजाबाहेर जे अनेक प्रकारचे लोक होते त्यांची संस्कृति कशा प्रकारची होती ह्याची कल्पना बांधतां येण्याजोगा पुरावा उपलब्ध आहे.

## सिंधु संस्कृति व असुर

पहिला पुरावा मोहेंजोदारो व हराप्पा येथें हजारों वर्षें पुरून राहिलेलीं जुनीं शहरें होत त्यांचा. या ठिकाणीं जें उत्खनन झालें आहे त्यावरून तज्ज्ञांनीं असें अनुमान काढलेलें आहे कीं, हीं शहरें पांच हजार वर्षांइतकीं जुनीं असून येथील संस्कृति ही तत्कालीन मिसरी व सुमेरी संस्कृतीशीं संलग्न पण तिच्यापेक्षां वरिष्ठ दर्जाची असावी. मार्शलच्या मतें ही सिंधु संस्कृति वैदिक संस्कृतीहून अगदीं अलग संस्कृति असावी. वेदांतील वर्णन केलेला समाज हा अर्धवट धनगर, अर्धवट शेतकरी अशा प्रकारचा राहणी. खेड्यांतली, घरेंदारें साधीं झोपडीवजा बांबूचीं असा त्यांचा थाट! उलट मोहेंजोदारो व हराप्पा येथें पाहावें तों दाट वस्तीचीं शहरें, त्यांत मोठमोठ्या हवेल्या आणि स्नानगृहें वगैरे सर्व सुखसोयी, असा प्रकार आढळून येतो. यजुर्वेदामध्यें लोखंडाचा उल्लेख येतो पण सिंधुतटीच्या शहरांत लोखंडाचा मागमूसहि नाहीं. लढाऊ शस्त्रांमध्यें वैदिक आणि सिंधुवासी हे दोन्हीहि धनुष्यबाण, परशु, भाला हीं वापरीत. पण सिंधुवासी गदाहि वापरीत आणि त्यांना शिरस्त्राण व चिलखत हीं माहीत नसावींत (वैदिकांना माहीत होतीं). वैदिकांमध्यें अश्वाचें माहात्म्य फार! पण सिंधुवासियांना तो माहीतहि असलेला दिसत नाहीं. वैदिकांना मांसाशन प्रिय, तर सिंधुवासियांना मत्स्याशन. वैदिकांना गोमाता प्रिय, तर सिंधुवासियांची भक्ति नंदीवर. वैदिक मूर्तिपूजेविरुद्ध, तर सिंधु संस्कृतींत मूर्तींचा सुळसुळाट. वाघाचा उल्लेख वेदांत नाहीं पण सिंधुवासियांना तो परिचित. वैदिकांमध्यें देवीचें माहात्म्य नाहीं; पण सिंधुवासियांमध्यें देवी व शंकर यांचें माहात्म्य

बडें. वेदांमध्यें अग्निपूजा मुख्य, पण मोहेंजोदारोंत अग्निकुंड 'अभावानेंच प्रख्यात आहे.' वैदिकांना लिंगपूजा गर्ह्य वाटे पण सिंधुवासियांत तिचा फार प्रचार! (इंडस सिव्हिलिझेशन—खंड १, पृ. ११० ).

मार्शलनें दाखविलेलें हें वैषम्य अतिरंजित आहे. शंबरदैत्याच्या शंभर अश्ममयी पुरांचा उल्लेख घेतला तरी वैदिक वाङ्मयाला शहरी जीवन अवगत होतें हें लक्षांत येईल. शिवाय रथ, दासदासी वगैरे ऐश्वर्याचे उल्लेख आहेत ते वेगळेच. यामुळें सिंधु संस्कृति ही वैदिक संस्कृतीहून भिन्न होती असें मानण्याऐवजीं सिंधु, सुमेरियन व वैदिक या एकाच संस्कृतीच्या भिन्न शाखा असाव्यात असें मानणें इतिहासाला अधिक धरून होईल.

'असुर इण्डिया' या ग्रंथाचे कर्ते अनंतप्रसाद बानर्जीशास्त्री यांच्या मतें सिंधु संस्कृतीचे लोक हे सुमेरियन असून ते भरतखंडांत इराणच्या आखातांतून जलमार्गानें सिंधू नदीच्या मुखातून आंत आलेले असावे. वेदांत असुर म्हणून ज्यांचा उल्लेख अनेक ठिकाणीं येतो ते हेच लोक असावेत. शब्दांचे अर्थ कसे बदलतात याचें एक सुप्रसिद्ध उदाहरण म्हणून असुर हा शब्द वैदिक वाङ्मयांत गाजलेला आहे. उत्तरकालीं असुर हे सर्वत्र राक्षस, दानव यांच्या बरोबरीनें वैदिक आर्यांचे शत्रु म्हणून उल्लेखिले जातात. पण ऋग्वेदांत असुर हा शब्द मोठा सन्मानदर्शक असून तो अग्नि, वरुण, इंद्र अशा देवतांना लावला जातो! उदाहरणार्थ, 'त्वमग्ने रुद्रो असुरो महोदिवस्त्वं शर्धो मारुतं पृक्ष ईशिषे' (२–१–६ ), अथवा 'महद्देवानां असुरत्वं एकं' ( ३।५५ ) अशा ऋचा पाहा. इराणी लोकांचा देव जो अहुरमज्द त्यांतील अहुर हें असुरचेंच इराणी रूप. पुढें वैदिक आर्य व इराणी आर्य यांचे तंटे सुरू झाल्यानंतर इराण्यांचा असुर हा वैदिकांचा राक्षस बनला. बानर्जीशास्त्र्यांच्या मतें ऋग्वेदांतील सुप्रसिद्ध दाशराज्ञ युद्ध हें देव आणि असुर यांच्यामध्यें लढलें गेलें असावें. सुदास, दिवोदास

हे वैदिक आर्य असून त्यांचे प्रतिस्पर्धी पुरुतृत्सु हे असुर असावेत. शतपथ ब्राह्मणांत पुरूंना असुर म्हटलें आहे. हे असुर दर्यावर्दीपणांत निष्णात होते. वरुण हा त्यांचा देव, विश्वामित्र हा पुरोहित. या युद्धांत असुराचा पराभव झाला. तरी त्यांनीं भरतखंडांत पुढें अनेक दिग्विजय केले असावे असें बाणासुर वगैरेंच्या कथांवरून दिसतें. येथें एक गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे कीं, वैदिक आर्यांनीं दास आणि दस्यू यांचें जसें कुरूप म्हणून वर्णन केलें आहे तसें असुरांचें केलेलें नाहीं. असुर हे 'मृध्रवाचः' होते म्हणजे त्यांची भाषा वैदिक आर्यांना कळत नव्हती असें वर्णन केलें जाई. पण ते कुरूप होते असें वर्णन नाहीं. बाणासुराची मुलगी उषा ही सुरूप असून कृष्णपुत्र प्रद्युम्नाशीं तिचा विवाह झालाही कथा पुराणांत नांवाजलेली आहे. उलट भीमानें हिडिंबेशीं विवाह केलेला असला तरी, हिडिंबा ही सुस्वरूप होती असें भारतकार म्हणत नाहींत. आणि तिच्या पोटीं झालेल्या घटोत्कचाविषयीं कृष्णाची भावना अशी होती कीं, तो भारतीय युद्धांत मृत्यु पावला तेव्हां कृष्णानें उद्‌गार काढले कीं 'हा आपल्या मरणानें मेला नसता तर मीं आपल्या हातानें त्याचा वध केला असता.' तात्पर्य, असुर आणि अनार्य दस्यु अशा दोन भिन्न पण प्रबल शत्रूंशीं वैदिक आर्यांना लढावें लागलें. धार्मिक संस्कारांच्या प्रांतांत वैदिक आर्यांचा विजय झाला पण व्यावहारिक कलाकौशल्याच्या अनेक प्रांतांत या असुरांचें चांगलेंच नांव चमकलें. शिल्पकलेमध्यें असुरांनीं केवढा लौकिक संपादन केला होता हें मयासुराच्या नांवावरून लक्षांत येईल. युधिष्ठिराच्या यज्ञाचा मंडप उभारण्याची कामगिरी त्याच्यावरच सोपविली होती. शिल्पकलेचा आद्य प्रणेता म्हणून त्याचेंच नांव शिल्पशास्त्रावरील ग्रंथांना देण्याचा संप्रदाय आहे. छंदःशास्त्रांतहि त्यांची कामगिरी असावी. शुक्लयजुर्वेदांत गायत्री आसुरी, पंक्ती आसुरी अशा सात छंदांचीं नांवें दिलेलीं आहेत.

# दासदस्यूंची संस्कृति

वेदांमध्यें वैदिक आर्यांचे दुष्मन् म्हणून ज्यांचा विशेष प्रामुख्यानें उल्लेख येतो ते लोक दास किंवा दस्यु हे होत. या लोकांची निनाके (अनासा), काळेरोम, (कृष्णत्वच्) लिंगपूजक (शिश्नदेव), अशा शेलक्या विशेषणांनीं हेटाळणी केल्याचें आढळतें. पण ते सधन असून त्यांचीं मोठमोठीं शहरें होतीं, अनेक प्रकारच्या कलाकौशल्यांत ते निष्णात होते, हे त्यांच्याच उद्‌गारांवरून सिद्ध होतें. शंबर नांवाच्या दैत्याची शतसंख्याक अश्ममयी पुरें होतीं. या लोकांची प्रथम प्रथम वैदिक आर्यांनीं दाणादाणा केली तरी पुढें आर्यांच्याच भिन्न भिन्न टोळयांत जेव्हां भांडणें होऊं लागलीं तेव्हां या अनार्यांची मदत घेण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. ऋग्वेदांत दाशराज्ञ युद्ध म्हणून जें प्रसिद्ध युद्ध आहे त्यांत भरताच्या बाजूनें लढणारांत अनेक अनार्य होते.

आजच्या भारतीय किंवा हिंदु संस्कृतींत या आर्येतर वा अनार्य संस्कृतीचा भाग फार मोठा आहे.

आर्यांनीं आपलें घोडदळ, युद्धप्रावीण्य व उच्चतर समाजसंघटन यांनीं आर्येतरांना जिंकलें असलें तरी, पुढें आर्य आणि आर्येतर यांची जी मिश्रसंस्कृति जन्मास आली त्यांत आर्येतर संस्कृतीचीं अनेक अंगोपांगें समाविष्ट केलीं गेलीं. किंबहुना या मिश्र संस्कृतीचें जोतें व पाया आर्येतर द्राविडादि संस्कृति असून, त्या जोत्यावर आर्यांनीं आपल्या वैदिक वेदीची स्थापना केली असें म्हणतां येईल. या वेदींतील होमहवन व वसाहतीकरणाची क्षात्रवृत्ति या दोन गोष्टीं-वरच आर्यांची भिस्त होती. बाकी कृषि, गोरक्षण, कलाकौशल्य, उद्यम, वाणिज्य ह्या व्यवहाराच्या सर्व बाबी त्यांनीं आर्येतरांवरच सोपविलेल्या होत्या. समाजाच्या पोषणार्थ अत्यंत उपयुक्त असे जे अनेक उत्पादक धंदे होते।ते अनार्यच संभाळीत असत.

प्रथम प्रथम 'नकटे, काळकुटे' म्हणून कितीहि झिडकारलें तरी शेवटीं जीवनकलहाच्या रेट्यांत विजयी होण्याकरितां त्यांच्याशीं शरीरसंबंध करून आर्यांना आपला वंशविस्तार करावा लागला व आपल्या पक्षाचें बळ वाढवावें लागलें. येथें अर्जुन आणि उलुपी, भीम आणि हिडिंबा, पराशर आणि मत्स्यगंधा या जोडयांचा नुसता उल्लेख केला तरी पुरे. महाभारतांतील नहुष-युधिष्ठिर-संवादावरून पाहतां तर एके काळीं संकर येवढ्या प्रमाणावर झाला होता, कीं जाति ओळखणेंच कठीण झालें होतें. 'जातिरत्र महाभाग मनुष्यत्वे महामते। संकरत्वात् सर्व वर्णानां दुष्परीक्ष्येति मे मतिः।' या संकरीकरणांत राजे व लष्करी पेशाचे सरदार यांचा वाटा फार मोठा असतो. जिंकलेल्या शत्रूच्या पट्टराणीशीं लग्न लावणें हा विजयी राजाचा एक अधिकारच आहे असें मानलें जाई. मग शत्रु कोणत्याहि जातीचा का असेना. चंद्रगुप्ताची एक राणी ग्रीक होती याचा उल्लेख मागें आलाच आहे. राजकारण साधण्याकरितां शरीरसंबंध करण्याचीहि वहिवाट असे. यामुळें क्षत्रियांत संकर फार. समुद्रगुप्ताच्या अलाहाबादेजवळील लेखांत अनेक जातींच्या राजांकडून कन्यांचा नजराणा पाठविण्यांत येत असे असें वर्णन आहे. 'शकमुरुडैः सैंहलकादिभिश्च आत्मनिवेदनकन्योपायनदान' वगैरे. मनुस्मृतीच्या काळापर्यंत ब्राह्मणवर्गाला कामतः का होईना पण चारहि वर्गांच्या स्त्रिया विहित मानल्या जात. पुढें याज्ञवल्क्यानें शूद्रा-भार्येचा स्पष्ट शब्दांत निषेध केला, तरीहि ही प्रथा बाणभट्टाच्या काळापर्यंत चालूच होती. कारण बाणभट्टानें आपल्या पारशव बंधूंचा उल्लेख केला आहे. अर्थात् आजच्या हिंदूंतील लोकसंख्येंत आर्य-अनार्य रक्ताची भेसळ पुष्कळच झाली आहे हें सांगणें नलगे.

## यक्ष, गंधर्व, किन्नर

आपल्या प्राचीन वाङ्मयांत आर्यांचा ज्या निरनिराळ्या लोक-संघांशीं संबंध आला व झगडे झाले अशा अनेकांचीं वर्णनें आलीं

आहेत. वेदांतील असुरांचा व दस्यूंचा वर उल्लेख केला. पण त्याखेरीज पुराणग्रंथांत ज्यांचीं वर्णनें येतात ते यक्ष, गंधर्व, किन्नर, नाग, वानर, गरुड, राक्षस, पिशाच ह्यासुद्धां काल्पनिक योनी नसून, त्या त्या नांवांचे ते भिन्नभिन्न लोकसमाजच होते. या प्रत्येक समाजांतून उचललेल्या वा घुसलेल्या कांहीं ना कांहीं गोष्टी हिंदुसंस्कृतींत कायम गोवल्या गेलेल्या आहेत. उदाहरणार्थ, गंधर्व आणि राक्षस या दोन समाजांत रूढ असलेल्या विवाहपद्धतींवरून स्मृतिग्रंथांत उल्लेखिलेल्या अष्ट विवाहपद्धतींतील दोन विवाहपद्धतींना नांवेंच पडलीं आहेत. पिशाच हाहि एक लोकसमुदायच होता. त्या समाजांत जी भाषा रूढ होती तिला पैशाची भाषा म्हणत. त्या भाषेंत अनेक अद्भुत कथांचा ज्यांत संग्रह आहे तो गुणाढ्यकृत 'बृहत्कथा' हा ग्रंथ लिहिला गेला होता हें मागें आलेंच आहे. वानरांचा समाजहि चांगला पुढारलेला होता हें रामायणांतील सुग्रीव व वाली यांची राजधानी जी किष्किंधा तिच्या वर्णनावरून दिसून येतें.

हें झालें आर्यांच्यापूर्वींच येथें स्थायिक होऊन बसलेल्या लोकां-संबंधानें! आर्यांच्यानंतरहि अनेक निरनिराळ्या वर्णांचे लोक मुलूख-गिरी व व्यापार करण्याकरितां येत होतेच. विश्वामित्र वसिष्ठाच्या गाईचें हरण करूं लागला तेव्हां तिनें जे सैनिक निर्माण केले त्यांत पल्लव, द्रविड, शक, यवन, खस, त्रिवुक, पुलिंद, शबर, पौंड्र, चीन, किरात, सिंहल, बर्बर, हूण, केरल असे अठरापगड होते म्हणून महाभारतांत वर्णिलें आहे. यांपैकीं अनेक लोक येथें स्थायिक झाले व हिंदु समाजांत मिसळून गेले. जातिभेदाच्या नियमनामुळें यांपैकीं पुष्कळांच्या स्वतंत्र जाति बनल्या; पण अशा अनेक लोकांशीं नित्य दळणवळण येत असल्यामुळें व यांपैकीं कांहींच्या पाठीमागें राजसत्तेचें पाठबळ असल्यानें त्यांच्या आचारविचारांचा कांहीं ठसा आपल्या संस्कृतीवर अस्पष्ट का होईना कसा उमटला आहे हें आपण मागें पाहिलेंच आहे.

## परकीय सत्राजित

डॉ. केतकर यांचे मतें कांहीं भारतीय म्हणून समजले गेलेले राजे इराणी असावेत असा संशय घेण्यास जागा आहे. असा एक राजा सत्राजित होय. हा परकी असावा असा संशय घेण्याची केतकरांनीं पुढीलप्रमाणें कारणें दिलीं आहेत. सत्राजित याचा संस्कृतमध्यें नीटसा अर्थच होत नाहीं. कोण्या परकी शब्दाचें हें संस्कृत रूप असावें. या शब्दाचें पुढें अधिक चांगलें शुद्धीकरण हरिवंशानें करून त्याला सत्रजित असें रूप दिलें. महाभारतांत अनेक कथांचा संग्रह केला आहे पण त्यामध्यें सत्राजिताची कथा नाहीं. ती हरिवंशांत आहे ( अध्याय ३८ ). या सत्राजितास स्यमंतक मणि कोठून मिळाला याविषयीं दोन कथा एकामागून एक दिलेल्या आहेत. पहिलींत तो समुद्रापासून मिळाला असें वर्णिलें असून, दुसरींत तो सूर्योपासून मिळाला असें वर्णिलें आहे. भविष्यपुराणांत सत्राजिताचें आख्यान आलें आहे तें सांब व मग यांच्या संदर्भांतच आलें आहे. सांबास कुष्ठरोग निवारणार्थ सूर्योपासनेचीं व्रतें व फल नारद सांगतो व त्यांतच सत्राजितानें सूर्योपासनेनें कसें ऐश्वर्य प्राप्त करून घेतलें याचें वर्णन करतो. या वर्णनांत मग-वंशीय भोजकांचीहि स्तुति आहे. या सर्व संदर्भावरून सत्राजित हा सूर्योपासक इराणी राजा असावा असा संशय उत्पन्न होतो, असें केतकर प्रतिपादतात.

श्रीरामचंद्राचा इक्ष्वाकु वंश हाहि इराणांतून आला असल्याचा संभव आहे असें डॉ. केतकर म्हणतात. या वंशांत बृहदश्व, हर्यश्व अशीं नांवें आढळतात व तीं इराणी नांवांशीं जुळतात. रामाची आई कैकेयी ही इराणी असावी. कारण कै हें पूर्वपद कैकोबाद कैखुश्रु अशा इराणी नांवांत आढळतें व मंथरा या नांवांत मंथ्र शब्दाची चेष्टा असूं शकेल अशीं त्यांनीं प्रमाणें दिलीं आहेत. पण हीं खंबीर दिसत नाहींत. अश्वान्त नांवें वेदांतहि सापडतात असें केतकरच

लिहितात. कैकेयीविषयीं म्हणाल तर चंद्रगुप्ताची एक राणी ग्रीक होती तशी दशरथाची कैकेयी ही इराणी असूं शकेल; आणि इक्ष्वाकु वंश जर इराणांतून आला असेल, तर तो मंथरा या पात्रांत आपल्या मायभूमीच्या मंथ्राची थट्टा कशी करील? अर्थात् वरील प्रमाणेंहि रामचंद्राचें कुळ इराणांतून आलें हें सिद्ध करण्यास पुरेशीं नाहींत.

येथें हें स्पष्ट सांगितलें पाहिजे, कीं राम किंवा पूज्य मानली गेलेली दुसरी कोणतीहि अवतारी व्यक्ति हिचें कुल बाहेरून कोठून तरी–इराण, ग्रीस, ईजिप्त, खाल्डिया वगैरेंतून–भरतखंडांत आलें असें उद्यां संशोधनानें सिद्ध झालें, तर त्यामुळें आपल्या संस्कृतीला मोठा कमीपणा आला असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. रामचंद्रासारख्या अवतारी विभूतीचें कुल मूळ बाहेरून कोठून आलें असें उद्यां शहाजोग पुराव्यानें सिद्ध झालें तर तें मोकळ्या वृत्तीनें मान्य करण्यास कचरण्याचें कारण नाहीं. कारण रामाचे पूर्वज मूळ बाहेरून आले असें क्षणभर मानलें तरी, रामचंद्राचें सर्व अवतारकृत्य भरतखंडांतच घडलें ना? अयोध्येपासून लंकेपर्यंतचा भरतखंडाचा दीर्घ उभा पट्टा रामचंद्राच्या चरणांनीं पावन झाला आहे ही गोष्ट जोंवर सिद्ध आहे तोंवर रामचरित्र हा भारतीय संस्कृतीचाच भाग होय हें काय सांगावयास पाहिजे? आणि रामचंद्राच्या चारित्र्याचा आणि पराक्रमाचा अभिमान आपण बाळगावयाचा नाहीं तर कोणी परकीयांनीं बाळगावयाचा? मुधोळची फारसी बखर ही विश्वसनीय असेल, तर छत्रपति शिवाजीनें ज्या वंशाला अलंकृत केलें तो वंश मूळ राजपुतान्यांतून महाराष्ट्रांत आलेला आहे हें मान्य करावें लागेल. पण तसें तें केलें तरी त्यामुळें शिवाजीचा उज्ज्वल पराक्रम हा रजपूत संस्कृतीचा भाग ठरत नाहीं. रायगडच्या सिंहासनावर महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची स्थापना करणारा पुण्यश्लोक शिवाजी हा महाराष्ट्राचाच सुपुत्र होय. मग त्याचे पूर्वज मागें केव्हां कोठूनहि आलेले असोत, राजपुतान्यांतून आलेले असोत, किंवा मूळ रजपूतच भरतखंडाबाहेरून आले हें मत स्वीकारल्यास

आणखी कोणत्या दूरच्या स्थानापासून आलेले असोत. तोच न्याय बाजीरावादि पराक्रमी वीरांना लागू. बाजीराव ज्या चित्पावन जातीला पावन करिता झाला ती जात कोणी म्हणतात त्याप्रमाणें, ईजिप्तमधून आलेली असली तरी, अखिल भरतखंडास ब्राह्मणी दौलतीचा दरारा उत्पन्न करणारा बाजीरावाचा पराक्रम हा ईजिप्त देशाच्या इतिहासाचा भाग ठरत नाहीं. तो हिंदुस्थानच्या इतिहासाचा, महाराष्ट्राच्या इतिहासाचा, कोंकणस्थ जातीच्या इतिहासाचाच भाग होय. असो.

## आदि-द्रविड

आजच्या भरतखंडांतील भिन्न भिन्न वर्णांचा उल्लेख प्रस्तुत आहे. तो आटोपतां घेण्यापूर्वीं आतां फक्त अत्यंत प्राचीनतम अशा लोकांचा उल्लेख करतों. हे लोक म्हणजे आदि-द्रविड होत. आर्य हिंदुस्थानांत आले त्या कालच्या आर्येतर अशा सर्वांना द्रविड या नांवानें संबोधलें तर हे द्रविडहि येथें येण्यापूर्वीं जे लोक येथें नांदत होते त्यांना आदि-द्रविड म्हणतां येईल. या लोकांसंबंधीं विद्वानांची अशी कल्पना आहे कीं, हे भरतखंडांतील लोक, पूर्वद्वीपकल्पांतील लोक व ऑस्ट्रेलियांतील लोक या सर्वांचे फार प्राचीन काळीं एकमेकांशीं दळणवळण असावें. त्यांच्या भाषा एकाच वृक्षाच्या शाखा असाव्यात. या भाषावृक्षाला ऑस्ट्रोएशियाटिक भाषावृक्ष असें संबोधतां येईल. या ऑस्ट्रोएशियाटिक भाषेमधून भरतखंडानें जी उसनवारी केली ती आजहि दाखवितां येण्यासारखी आहे. शिलाखंडांत सांपडून प्रस्तरमय झालेले जुने अवशेष जसे हजारों वर्षें अविकल स्वरूपांत कायम राहतात तसेच दुसरे कोठें ते राहात असतील तर भाषेंतच. तसे ते आस्ट्रोएशियाटिक प्राचीन भाषेंतील अवशेष संस्कृत भाषेंत राहून गेले आहेत असें विद्वानांचें मत आहे. संस्कृत ग्रंथांत कोसल मोसल, अंग वंग, कलिंग त्रिलिंग, अशा शब्दांच्या जोड्या सापडतात. या जोड्यांमध्यें दोन शब्दांत जो फरक आहे तो शब्दाच्यापूर्वीं लावलेल्या आगमांत झालेला

आहे. या बाबतींत विद्वानांचें असें मत आहे कीं, शब्दाच्या पूर्वभागांत फरक करून अर्थभेद दाखविणें ही क्रिया आर्य किंवा द्राविड यांपैकीं कोणत्याच भाषेच्या प्रक्रियेंत ज्या अर्थी सापडत नाहीं व ज्या अर्थी ती मलायाद्वीपांतील भाषांत मात्र सापडते, त्या अर्थी हिंदुस्थानांत ही प्रक्रिया मलायांतून आली असली पाहिजे. भाषेंत नवी प्रक्रिया घुसते ती बराच दाट संबंध आल्याविना घुसत नाहीं. अर्थात् भरतखंडांतील या प्राचीनतम रहिवाशांचा ऑस्ट्रेलिया खंडांतील लोकांशीं व्यापार-निमित्तानें वा अन्य कारणांकरितां पण दाट परिचय असावा. या दाट संबंधांत अनेक वस्तु बाहेरून आल्या असाव्यात. पैकीं हरएक धार्मिक विधींत आवश्यक होऊन बसलेले जिन्नस जे नारळ व सुपारी ते मळायांतून आले असावेत ! कदली, लांगल, लांगूल, जनक, सीता, बाण, कार्पास असे अत्यंत रूढ झालेले शब्द बाहेरून आले असावेत. हे जाडे संस्कृत शब्द सोडून अगदीं व्यवहारांतील शब्द पाहिले तरी, अगदीं प्राथमिक शाळेंतील विद्यार्थ्यांच्या तोंडीं असणारें एक कोष्टकहि असेंच पुरातनकालापासून रूढ असावें. तें म्हणजे 'चार कवड्या म्हणजे एक गंडा' हें सुप्रसिद्ध कोष्टक होय. ( Pre-Aryan and Pre-Dravidian Antiquities by *Levi and Bagchi.* )

## द्राविडांची उच्च कामगिरी

हे अतिप्राचीन आदि-द्राविड सोडले तर, आर्यबाह्यांत द्राविड लोक हे सर्वांत प्रमुख होत. यांचा तर भारतीय संस्कृतीवर फार मोठा ठसा उमटलेला आहे. इतका कीं, 'आजच्या हिंदुसंस्कृतीला आर्यसंस्कृति **म्हणण्यापेक्षां आर्यद्राविडसंस्कृति म्हणणेंच अधिक अन्वर्थक ठरेल.** हा ठसा व्यावहारिक व धार्मिक अशा दोन्ही स्वरूपांचा आहे. आधुनिक कालांत हिंदूंचें दर्यावरील प्रभुत्व नष्ट झालें हें सर्वश्रुत आहे. इतकें कीं, समुद्रयान हें पापकर्म समजण्यांत येऊं लागलें. पण ही संकुचित वृत्ति स्थिर होण्यापूर्वीं शेंकडों वर्षें भारतीय लोक स्वच्छंद-

पण सागराच्या पृष्ठभागावर स्वैरसंचार करीत होते. त्यांनीं नौकानयनाच्या जोरावर उत्तरव्यापार थाटला होता; व पूर्वेकडील द्वीपकल्पांत वसाहतीहि केल्या होत्या हें आपण मागें पाहिलेंच आहे. यासंबंधीं प्रस्तुत हें आवर्जून सांगितलें पाहिजे, कीं वसाहतीकरणामध्यें व एकंदर नौकानयनामध्यें हे दाक्षिणात्य द्रविड लोक अग्रेसर होते. पूर्वेकडलि जावा, सुमात्रा, बोर्निओ ह्यांमधील संस्कृतिप्रसार मुख्यतः ह्या द्रविड लोकांनीं केला. दुसऱ्या एका प्रकरणांत मागें लोकशाहीची हकीकत दिली आहे, ती उत्तर-भारतासंबंधीं आहे. पण दक्षिण-भारतांत म्हणजे द्रविड देशांतहि लोकशाही. संस्था नांदत होत्या हें येथें नमूद केलें पाहिजे. ग्रामपंचायती दक्षिणेकडेच अधिक बद्धमूल होत्या. या पंचायतींतील लोकांची चिठ्या टाकून निवड करण्यांत येई. निवडून आलेल्या सभासदांच्या कामाप्रमाणें पोटकमिट्या नेमण्यांत येत असत.

धार्मिक बाबतींतील त्यांची कामगिरीहि अशीच भरीव आहे. ती किती व कशी भरीव आहे हें शंकराचार्य, मंडनमिश्र, कुमारिलभट्ट, रामानुजाचार्य हे सर्व धर्ममार्तंड द्रविड होते एवढा नुसता उल्लेख केला असतांहि ध्यानांत येईल: बौद्ध, जैन वगैरेंच्या हल्ल्यांनीं वैदिक धर्म जेव्हां जर्जर झाला होता, तेव्हां त्याचें पुनरुज्जीवन करणारे हे सर्व आचार्य द्रविड प्रांतांतूनच निर्माण झाले. फिरून पुन्हा इस्लामी धर्माचा चांद उत्तर हिंदुस्थानांत फडकूं लागल्यावर भारतीय संस्कृतीचें रक्षण करणारी राजकीय सत्ता व सायणमाधव-रूपानें प्रगट झालेली सर्वगामी विद्वत्ता ही द्रविड देशांतील विजयानगरमध्यें चमकली. अशा रीतीनें आजच्या हिंदु संस्कृतींत आर्यांच्या बरोबरीनें द्रविडांचाहि भाग आहे.

## आर्य-द्रविडसंगमावरील पुण्यक्षेत्र महाराष्ट्र

आतां उत्तरेकडील आर्य व दक्षिणेकडील द्रविड या दोन्ही संस्कृतीं-

ऱ्या मिलाफाचें चालतें बोलतें स्वरूप तुम्हांस पाहावयाचें असेल तर आपल्या महाराष्ट्राकडेच वळा. महाराष्ट्राचें भौगोलिक स्थानच असें आहे कीं, तेथें उत्तर आणि दक्षिण अशा दोन्हीकडील विचार व आचार यांचा संगम व्हावा. उत्तर हिंदुस्थानांत आर्यांची सद्दी, तर दक्षिणेंत द्रविडांचा जोर अशी सर्वसामान्य स्थिति आहे. वंशशुद्धि, भाषा, दैवतें, कुलाचार, राहणी ह्या सर्व दृष्टींनीं उत्तर हिंदुस्थानांत आर्यांचा पगडा आहे, तर त्याच सर्व बाबतींत दक्षिणेंत द्रविडांचा आहे. पण उत्तर व दक्षिण यांच्या मध्यभागावर उभें राहणारें जें आपलें महाराष्ट्राचें पठार, त्या पठारावर आर्य व द्रविड यांचा मनोहर मिलाफ झालेला आहे. महाराष्ट्रांतील पवित्र नदी जी गोदावरी ती एके काळीं आर्य व द्रविड यांच्या प्रांतांतील सरहद्द असावी व तिच्या उत्तर-दक्षिण तीरांवरून आर्य व द्राविड एकमेकांशीं लढले असावेत. या लढ्याचे अवशेष लोकाचारांत आजहि तगून राहिले आहेत. गोदेच्या उत्तरतीरावर नाशिक असून दक्षिणेस पंचवटी आहे. नागपंचमीच्या दिवशीं अजूनहि या दोन्ही गांवच्या अशिक्षित स्त्रिया आपआपल्या नदीकांठांवरून परतीरावरच्यांना शिव्या देण्याचा समारंभ साजरा करीत असतात. प्रथम प्रथम आर्य व द्रविड यांच्या झटापटी झाल्या असल्या तरी, पुढें गोदेच्या कांठींच त्यांचें पूर्ण ऐक्य झालें. आजच्या महाराष्ट्रांत आर्य व द्रविड या दोन्ही संस्कृतींचा पूर्ण मिलाफ झालेला आहे. त्यांतहि वाटप असें झालें आहे कीं, तारतम्यानें पाहतां पुरुष-वर्गानें आर्यपरंपरा चालविलेली आहे व स्त्रियांनीं द्रविडपरंपरा राखली आहे. हें वाटप स्वाभाविकच आहे. कारण उत्तरेकडून दक्षिणेकडे वसाहत करण्यास येणाऱ्या लढाऊ आर्यांत पुरुषांचें प्रमाण फार मोठें असावें व त्यांनीं बायका केल्या त्या बहुतेक द्रविडांच्या असाव्यात. या प्रकारामुळें आजच्या महाराष्ट्रीय कुटुंबांत पुरुषांनीं आणलेली उत्तरेकडील आर्यपरंपरा व बायकांनीं आणलेली दक्षिणेकडील द्रविडपरंपरा अशा दोन परंपरांचा गंगाजमनी संगम झालेला आहे. या विषयाचें उद्बोधक

विवेचन भास्करराव जाधव यांनीं विविधज्ञानविस्तारांत (१९३१) 'मराठे आणि त्यांची भाषा' या निबंधांत केलें आहे.

बायकांच्या सौभाग्यालंकाराचा प्रकार हा विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे. महाराष्ट्रांतील मुख्य सौभाग्य-अलंकार मंगळसूत्र हा आहे. हातांतील बांगड्या, कपाळावरील कुंकू वगैरेचाहि सौभाग्य-अलंकारांत समावेश करतात. पण हे अलंकार कुमारीहि वापरतात. खालच्या वर्गाच्या बायका नेहमीं कुंकू लावतातच असें नाहीं. तेव्हां सौभाग्याचें असामान्य चिन्ह म्हणजे मंगळसूत्र हेंच उरतें. ही चाल द्रविडांची आहे. उत्तर हिंदुस्थानांत मुख्य सौभाग्य-अलंकार हातांतील चुडा अथवा बांगड्या हा होय. मंगलसूत्राला जें महत्त्व महाराष्ट्रांत आहे तेंच महत्त्व उत्तरेकडे चुड्याला आहे. बंगालमध्यें चुडा लोखंडाचा घालतात व त्याचीं टोकें पक्की करून वज्रलेप करितात. पतिनिधनानंतर तो चुडा तोडूनच काढावा लागतो इतका तो वज्रचुडा असतो. आपल्यामध्यें चुड्याच्या या महत्त्वाची आठवण राहिली आहे ती फक्त भाषेमध्यें. पतीला जीवदान द्या या अर्थी मंगलसूत्रदान द्या असें न म्हणतां 'चुडेदान द्या' असाच वाक्संप्रदाय रूढ आहे. पण त्या चुड्याचें महत्त्वाचें स्थान मंगलसूत्रानें पटकाविलें आहे. स्त्रियांनीं उत्तरेकडील आर्यांतील जे रिवाज उचलले त्यांत भांगांत सेंदूर घालणें व डोकीवर पदर घेणें हे प्रमुख होत. हे प्रकार द्रविडांना परके असून ते उत्तरेकडून आलेले आहेत.

मराठ्यांचीं जीं प्रख्यात कुलदैवतें आहेत त्यांत आर्य व द्रविड अशा दोहोंनाहि सारखेंच महत्त्व आहे. मराठ्यांची दोन प्रसिद्ध देवस्थानें जोतिबा व खंडोबा हीं होत. पैकीं जोतिबा आर्य असून खंडोबा द्रविड आहे. जोतिबा हें शिंद्यांचें दैवत. तें दैवत घेऊनच शिंदे उत्तरेकडून म्हणजे सिंधमधून महाराष्ट्रांत आले असें कऱ्हाड येथील शिंद्यांच्या कोरीव लेखावरून दिसतें. जोतिबाच्या जयजयकारांत

'चांगभला' असा घोष करतात; तर सिंधमध्यें 'चंगाभला' हें 'कसें काय, ठीक आहे ना?' या अर्थी दोन माणसें भेटलीं असतां एकमेकांना नमस्कार करतांना म्हणतात. जोतिबा म्हणजे ज्योतीचा देव. सिंधमध्यें प्राचीन मंदिरांत देवाच्या स्थानीं ज्योतच असे, मूर्ति नसे. अहोरात्र ज्योत जळत असावयाची व तेंच देवाचें प्रतीक होय. सिंधमधून आलेल्या आर्यांनीं आपल्याबरोबर आणलें तें हें ज्योतीचेंच दैवत असावें. त्याचें नांव जोतिबा पडलें. ज्यांचे बरोबर तें आलें ते सिंधमधून आले म्हणून त्यांचे नांव शिंदे पडलें असावें. पुढें जोतिबाच्या मांदिरांत मूर्ति स्थापन होऊन दिव्याचें रूपांतर नंदादीपांत झालें. दीपपूजेचा प्रकार आपल्यांत आजहि दिव्याच्या अवसेच्या रूपानें शिल्लक आहे.

एवंच, जोतिबा हे उत्तरेकडून आले असावे. खंडोबा दक्षिणेकडून आले असावेत. कारण खंडोबा किंवा स्कंद यांचा संप्रदाय उत्तरेकडे मुळींच नाहीं आणि दक्षिणेंत जारी आहे. जेजुरीचा खंडोबा व द्रविडांतील 'सुब्रह्मण्यम्' हीं दैवतें एकच होत. खंडोबा म्हणजे स्कंदपिता अर्थात् शंकर होय व तो वैदिक होय असें चिंतामणराव वैद्यांचें म्हणणें आहे. पण हा शब्दच्छल दिसतो. खंडोबा या शब्दांतील बा याचा अर्थ पिता असाच घेतला पाहिजे असें नाहीं. चिंतोबा या शब्दांतील 'बा'-प्रमाणें नुसता सन्मानदर्शक असा घेतला म्हणजे झालें. शिवाय खंडोबाची तळी उचलतांना ज्या शब्दाचा गजर केला जातो तो शब्द 'येळकोट' आपण जशाचा तसा द्राविडांपासून घेतला आहे, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. दोन्ही दैवतांतील आणखी एक साम्य म्हणजे दोन्हींच्या परिचारिका वेश्या आहेत हें होय. सुब्रह्मण्याला द्रविड देशांतून महाराष्ट्रांत आणला तेव्हां त्याची देवदासी-पद्धतीहि इकडे आणली व तिला येथें मुरळीचें रूप दिलें. येणेंप्रमाणें महाराष्ट्रांत आर्य-द्रविडांचा संगम झालेला आहे.

आपल्या संस्कृतीचें स्वरूप असें मिश्र असतांहि आपण तिला वैदिक

आर्य-संस्कृति म्हणूनच समजतों. संस्कृतीचा प्रवाह हा नदीच्या प्रवाहाप्रमाणें होय. कडेकपारींतून उगम पावून समुद्रास जाऊन मिळेपर्यंत नदी एकरूप दिसली तरी, या नदीला अंतराअंतरावर अनेक नद्या, ओढे, नाले मिळत असतात. तीच स्थिति संस्कृतिगंगेची होय. अनेक लहानमोठ्या नद्यांची मिळून एक महानदी होत असतांहि, फार दूर प्रदेशाहून येणाऱ्या एका नदीचेंच अभिधान तिला प्राप्त होतें. आपल्या किंवा कोणत्याहि संस्कृतिगंगेची अशीच स्थिति आहे. आज भारतीय संस्कृति ही वैदिक संस्कृति होय अशी आपणांमध्यें भावना आहे ती याच अर्थानें. कारण पांच हजार वर्षें होऊन गेलीं तरीहि आजचे लोक, निदान ब्राह्मण, हे आपले कांहीं संस्कार पांच हजार वर्षांपूर्वीं जसे करीत तसेच आजहि करीत आहेत. इतकेंच नव्हे तर मुखोद्गत वेदपठनाच्या पद्धतीमुळें त्या संस्कारप्रसंगीं म्हटले जाणारे मंत्र हेहि कानामात्रा तर नाहींच, पण कदाचित् उच्चारहि न बदलतां जसेच्या तसेच म्हटले जात आहेत. आणि ब्राह्मणेतरांत जेथें संस्कार पौराणिक पद्धतीनें होतात तेथेंहि पुराणें हीं वेदांचें उपबृंहण करणारीं आहेत अशी समजूत कायम आहे. यामुळें धार्मिक संस्कारांबाबत वैदिक संस्कृतीची छाप सर्व समाजावर कायम आहे. वैदिक यज्ञाचा नभोमंडलव्यापी धूमधडाका नष्ट झाला असला तरी, अग्निहोत्र्यांच्या वेदींत वैदिक अग्नि अजूनहि अल्प प्रमाणांत धुमसत आहे. असली पांच-सात हजार वर्षांची अखंड परंपरा अन्य संस्कृतींना लाभलेली नाहीं. इराकमध्यें इष्टिकालेख सापडले पण तें वाङ्मय मुखोद्गत असणारे तर नव्हेच पण जाणणारेहि लोक आज नामशेष आहेत. क्रीटमध्यें लेख सापडले आहेत त्यांची तर भाषाहि अद्याप नीट समजली नाहीं. ईजिप्तमध्यें पुरातन संस्कृति होती पण तिचे वारसदार आज कोणी नाहींत. पण पांच-सात हजार वर्षांपूर्वींचे वेद मुखोद्गत असणारे व वैदिक संस्कार अखंड परंपरेनें चालविणारे ब्राह्मण हिंदुस्थानांत आहेत.

## एकीकरणाची प्रक्रिया

पण भारतीय संस्कृतीच्या इमल्यावर वैदिक संस्कृतीचा चुन्याचा हात बाहेरून सर्वत्र दिलेला असला व त्यामुळें ती एकजिनसी दिसत असली तरी तिचें अंतरंग पाहूं गेलें असतां ती अनेक स्थळींच्या मालमसाल्यानें बनविलेली आढळून येते. हा मालमसाला कोणत्या प्रक्रियेनें एकरूप, एकसंध सांधला गेला हेंहि थोडें पाहूं या; म्हणजे आपल्या संस्कृतिसंघटनाच्या प्रयोगाचें अंतरंग अधिक स्पष्ट होईल. या प्रक्रियेचें स्वरूप सूत्ररूपानें सांगावयाचें म्हणजे सहिष्णुता व संग्राहकता या दोन वृत्ति या ह्या प्रक्रियेच्या विणींतील ताणा आणि बाणा होत येवढें सांगितलें म्हणजे पुरें. या ताणा-बाण्याचीं सूत्रेंच आतां इतिहासाच्या हस्तानें उकलून पाहूं या.

या दोन्ही प्रवृत्ति थेट सिंधु संस्कृतिकाल व वैदिक कालापासून प्रामुख्यानें दिसून येतात. या प्रवृत्तींच्या जोरावरच भरतखंडासारख्या अफाट देशावर एकजिनसी संस्कृतीचा ठसा आपले पूर्वज उमटवूं शकले. आजच्यासारखीं दळणवळणाचीं साधनें उपलब्ध नसतां, देश भिन्न भिन्न बोलींनीं विभागला असतां, जैन, बौद्ध, तांत्रिक, नास्तिक, शाक्त वगैरे अनेक पंथांनीं धार्मिक बुद्धीला अनेक पंथ फुटले असतां, आसेतुहिमाचल एकच संस्कृतीचें राज्य पसरविण्यास भारतीयांची सहिष्णुता व संग्राहकता हीच कारणीभूत झाली. आणि याच जोडगोळीच्या जोरावर राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, कलात्मक, अशा भिन्नभिन्न प्रांतांत मतभेद व हितविरोध यांची सांगड ते घालूं शकले.

प्रथम सहिष्णुतेचा आविष्कार पाहूं या. सहिष्णुतेच्या कसोटीचें मर्मस्थान धर्म हें होय. या धर्माच्या प्रांतांतच सहिष्णुतेला तिलांजलि देणारी तामसी प्रवृत्ति सर्वांत तीव्रतम स्वरूपांत आढळावी हा एक आश्चर्यकारक प्रकार होय! मनाच्या तामसी व स्वैरवृत्तीचें दमन

करण्याकरितां ज्या मानवी संस्थांनीं श्रेष्ठ कामगिरी बजावली आहे त्या संस्थांत धर्मसंस्थेचें स्थान अग्रपूजेचें आहे. पण मनाच्या वृत्ति मारूं जातां त्या मारल्या न जातां फक्त दडून बसतात असा जो मानसशास्त्राचा सिद्धान्त आहे तो या धर्माच्या प्रांतांत उत्तम प्रत्ययास येतो. तामसी वृत्ति ही एकीकडे मारून टाकण्याचा प्रयत्न करतां करतां, ती एका प्रांतांत नष्ट झालेली दिसली तरी दुसरीकडे कोठें तरी उमटतेच. आणि कांहीं वेळां अशी जोरानें उसळी मारते कीं, ज्याचें नांव तें! धार्मिक वृत्तीचा कर्मठ माणूस तामसी व कोपिष्ट असतो हा अनुभव दुर्मिळ नाहीं. उपासतापास, व्रतेंवैकल्यें, देहदंडन तो अनेक सोशील; पण त्या सोशीत राहतां राहतां त्याची वृत्ति अशी चिडखोर बनत असते कीं, त्याच्या कर्मठपणाच्या रेखीव आयुष्यक्रमांत थोडासा कोठें व्यत्यय आला तरी त्याचें माथें भणाणल्याशिवाय राहत नाहीं. तिन्ही त्रिकाळ आणि बारा मास दडपून ठेवलेल्या मानसिक वृत्ति अशा वेळीं जणों एकदम धडाक्यानें पेट घेतात.

हीच स्थिति समाजाचीहि दिसते. धर्मानें घालून दिलेली नीति-अनीतींची व सत्यासत्यतेची शिस्त समाज पाळतो तो स्वार्थी व सुखलोलुप भावनांना दटावून दडपून पाळीत असतो. पण ही शिस्त पाळीत असतां त्या शिस्तीविषयींच असा एक दुर्दम अभिनिवेश समाजामध्यें उत्पन्न होतो कीं, त्या शिस्तीच्या पलीकडे कोणी पाऊल टाकलें, कीं त्याला शासन करण्याच्या वेळीं आपण सोसलेल्या सर्व बंधनांचा जणूं तो सूडच उगवूं लागतो. व्यक्ति वा समाज शिस्तीचें जूं मानेवर वागवितो तो हौसेनें नव्हे तर नाइलाज म्हणून. जोंपर्यंत आपणाबरोबर इतरांच्याहि मानेला रग लागलेली आहे असें त्याला दिसत असतें, तोंपर्यंत तो फारशी कुरकुर करीत नाहीं. पण कोणी चुकारानें शिस्तीचें जूं मानेवरून जरा फेकून दिलेलें त्याला दिसलें कीं त्याचें माथें फिरलेंच! मग त्याच्या स्वतःच्या मानेला लागलेल्या रगीचा सर्व राग त्या बेशिस्तावर उगवून घेणें हा आपला हक्क

आहे असें तो प्रतिपादन करतो. इतकेंच काय पण पाखंडांना शिक्षा करणें ही देवाची सेवा, भक्ताचें पवित्र कर्तव्य, पुण्याची जोड असेंहि बरळण्यास तो कमी करीत नाहीं!

मनुष्यस्वभाव येथूनतेथून सारखाच असल्यानें सहिष्णुतेचें आख्यान या अध्यायांत लावावयाचें असलें तरीहि हें आधींच सांगून टाकतों कीं, धार्मिक छळाचे प्रकार हिंदुस्थानांतहि अगदींच घडले नाहींत असें नाहीं. पण इतर देशांतील घोर प्रकार ध्यानीं घेतले असतां हिंदुस्थानांतील प्रकार कांहींच नव्हत असें वाटावें असा मात्र प्रकार आहे.

## धर्मच्छलाचीं तुरळक उदाहरणें

इतिहासाला मुद्दाम खोदून खोदून विचारलेंच तर हिंदुस्थानच्या इतिहासांतील धर्मच्छलाचीं कांहीं थोडीं उदाहरणें तो तुम्हांला सांगणार नाहीं असें नाहीं. अगदीं सत्ययुगामधील रामावताराचा काळ घेतला तरी, त्या काळांत तपश्चर्या करणाऱ्या शंबुकाचा रामानें कसा वध केला ही कथा आपणां सर्वांना माहीत आहे. त्या कथेंत धार्मिक जुलमाचा पुरावा आहे असें मानणें कांहीं चूक होणार नाहीं. तसेंच बौद्ध, जैन आणि वैदिक ह्या धर्मांची चढाओढ सुरू झाल्यावर व त्या त्या धर्मांना उचलून धरण्याला राजे मिळाल्यावर जुलूमजबरदस्ती कोठेंच झाली नसती तर तो एक चमत्कारच ठरला असता. या जुलमाचीं कांहीं उदाहरणें इतिहासांत नमूदहि आहेत. पण तीं फार थोडीं हाच खरा चमत्कार! कालिदासकृत 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकांतलि नायक जो अग्निमित्र त्याचा बाप पुष्यमित्र हा शकपूर्व दुसऱ्या शतकांतील मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. याच्या राज्यांत बौद्धांचा छळ झाला असल्याचें वाङ्मयांत नमूद आहे. त्यानें यवनांचा पराभव केला आणि आपलें सार्वभौमत्व जगजाहीर करण्याकरितां अश्वमेध यज्ञ केला. अशा यज्ञामध्यें अनेक पशूंचा संहार होई व त्यावर बौद्ध-

जैनांचा कटाक्ष असल्यामुळें यज्ञविधीच्या ते सर्वस्वीं विरुद्ध असत. अश्वमेधासारख्या प्रसंगीं या विरोधाला तीव्र स्वरूप येत असावें व उलट बाजूनें तीव्र प्रतिकारहि होत असावा. पुष्यमित्राच्या हातूनहि ह्या प्रसंगीं बौद्धांचा छल झाला असावा असें 'मंजुश्रीमूलकल्प' व 'दिव्यावदान' ग्रंथांवरून दिसतें. मंजुश्रीकार लिहितो कीं, 'नाशयिश्यति तदा मूढः विहारान्धातुवरांस्तथा' ( श्लो. ५३१ ) तारानाथाच्या 'दिव्यावदान' ह्या ग्रंथाप्रमाणें वर्णन करावयाचें म्हणजे तर, पुष्यमित्रानें बौद्धांचा अगदीं आसुरी सूड उगविला, मगधापासून पंजाबापर्यंत मठ जाळले, आणि श्रमणांची कत्तल केली, असें वर्णन केलें पाहिजे. तारानाथाचा ग्रंथ अद्‌भुतरसावर उभारलेल्या भारूड कथांनीं बराच भरलेला असल्यामुळें वरील वर्णनांत अतिशयोक्तीबद्दल फार मोठा आंकडा बाद घालावा लागेल. पण तो घातला म्हणजे पिकल्याशिवाय विकत नाहीं या न्यायानें या छळाच्या हकीकतींतहि कांहीं सत्याचा भाग असावा असें इतिहासकार स्मिथप्रमाणें कोणीहि म्हणेल. याच तारानाथानें मारवाडच्या कोणा हर्ष राजानें केलेल्या जुलमाविषयीं लिहून ठेवलें आहे कीं, त्यानें मुलतानजवळ एक लाकडी हवेली बांधली, तीमध्यें बारा हजार विधर्मीयांना फूस लावून आणलें, व मग त्या लाकडी हवेलीला आग लावून आंतील बारा हजार लोक व त्यांचे धर्मग्रंथ यांना अग्नीस अर्पण केलें. हा अत्याचार सहाव्या शतकांत घडला असावा. पुढील शतकांत बंगालचा राजा शशांक यानेंहि आसुरी वृत्ति प्रकट केल्याचें दिसतें. हा राजा शैव असून बौद्ध धर्माचा द्वेष्टा होता. यानें बुद्धगयेंतील परमपवित्र मानला गेलेला वृक्ष उपटून टाकिला, पाटलीपुत्रांतील बुद्धाच्या पादुका फोडून टाकिल्या, नेपाळच्या हद्दीपर्यंत अनेक मठ उध्वस्त केले, व भिक्षूंना देशोधडीस लावलें. याच शतकांत दक्षिणेकडेहि छळाची वावटळ उमटलेली दिसते. पांड्यांचा राजा नेदुमारण हा जैन असून त्यानें शिवभक्त चोलराजाच्या कन्येशीं विवाह केला. पुढें राणीच्या वजनानें

राजानें जैनधर्म टाकून शैवधर्म स्वीकारला. पण धर्मांतर करणाऱ्याच्या अंगांत नवधर्माविषयीं जो अतिरिक्त अभिमान उत्पन्न होतो, तसा त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होऊन त्यानें आपल्या पूर्वधर्मीयांवर शस्त्र धरलें; आणि थोड्याथोडक्या नव्हे तर आठ हजार जैनांना सुळावर चढविलें. ज्या ठिकाणीं हा अनन्वित प्रकार घडला त्या मदुरेंत अद्यापिहि शिवाच्या महोत्सवांत सातवा दिवस हा जैनांच्या सुळाचा दिवस म्हणून पाळला जातो असें म्हणतात.

अग्निकुलोत्पन्न रजपुतांनींहि बौद्धांचा छळ केला असावा असें दिसतें. भविष्यपुराणांतील प्रतिसर्गपर्वांत म्हटलें आहे कीं, चार लाख बौद्धांना दिव्यास्त्रांनीं हाणून काढलें. 'अशोकं स्ववशं चक्रुः सर्वे बौद्धा विनाशिताः । चतुर्लक्षाः स्मृताः दिव्यशस्त्रैः प्रहारिताः ॥' दक्षिणेंत मानभावपंथ स्थापन झाल्यावर कांहीं कटकटी झाल्या असाव्यात. रामदेवरावाच्या राज्यांत मानभावांनीं हिंदूंचीं रुद्रलिंगें उपटून टाकिलीं, व राजाची या कृत्यास फूस असावी अशा संशयावरून राजाला लोकांचा पाठिंबा नाहींसा झाला व ही गोष्ट त्याचा अल्लाउद्दिनाकडून पराभव होण्यास कारणीभूत झाली असावी असें इतिहासकारांचें अनुमान आहे. नंतरच्या कांहीं शतकांत मुसलमानी अंमल जारी असल्यानें हिंदूहिंदूंमधील धर्मच्छलाला वावच नव्हता. किरकोळ ग्रामण्यें वगैरे होत.

धर्मच्छलाचा इतिहास मुद्दाम पाहूं लागलें तर आणखी अशाच प्रकारचीं कांहीं थोडकीं उदाहरणें सापडतील; पण तीं एकंदरींत तुरळकच. युरोपमधील धर्मच्छलाचा वणवा पाहिला, इन्क्किझिशन किंवा अन्वीक्षामंडळ या धार्मिक संस्थेनें घातलेला धुडगूस अवलोकिला, या संस्थेचा उत्पादक तिसरा इनोसंट ( किती सात्त्विक नांव ! ) याच्या एकट्याच्याच हुकुमानें सत्तावीस हजार पाखंड्यांना कंठस्नान घालण्यांत आलें हें ध्यानीं घेतलें, म्हणजे हिंदुस्थानचे लोक धार्मिक बाबतींत इतकें मिळतें कसें घेत याचेंच परकीयांना आश्चर्य

वाटे. यामुळें सहिष्णुतेचेंच शिफारसपत्र ग्रीक मेग्यास्थेनिस, चिनी फाहायन, मुसलमानी अल्बेरुणी आणि युरोपियन स्मिथ या सर्वांनीं एकमुखानें हिंदूंना दिलें आहे.

भरतखंडांत वैदिक, बौद्ध, जैन, लिंगायत, मानभाव, शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त वगैरे अनेक धर्मपंथ होऊन गेले. या पंथांमध्यें चुरस, मत्सरहि नांदत नव्हता असें नाहीं; पण त्या त्या काळीं राजसत्तेचें पाठबळ असतांहि या मत्सराग्नीनें युरोपांतील प्रचंड वणव्याचें स्वरूप धारण केलें नाहीं, ह्यावरून सहिष्णुतेची वृत्ति भारतीय संस्कृतींत उत्पन्न झाली होती याशिवाय दुसरें अनुमान काय निघेल ?

नुसत्या एकाच धर्मांतील अनेक देवतांचें एकीकरण करून ईश्वरैक्याची कल्पना स्थापणें ही गोष्टहि किती अवघड आहे हें परकीय इतिहासाकडे पाहिलें असतां लक्षांत येईल. ईजिप्तमध्यें व पॅलेस्टाइनमध्यें हिंदुस्थानांतल्याप्रमाणें एकेश्वरी कल्पना अमलांत आली होती. पण तिच्याकरितां जुलमाचें अस्त्र पाजळण्यांत आलें होतें. याविषयीं डायसेन लिहितो कीं, "पॅलेस्टाइन म्हणजे ज्यू लोकांच्या देशांत देवतांचें एकीकरण घडवून आणलें खरें; पण तें कसें घडवून आणलें? तर आपला देव जो जेहोवा त्याशिवाय इतर देवतांवर कडकडीत बहिष्कार घालून; आणि इतर देवतोपासकांचा भयंकर छळ करून! परंतु हिंदुस्थानांत एकेश्वरत्व नसलें तरी अद्वैत हें अधिक सात्त्विक अशा तत्त्वज्ञानविचाराच्या मार्गानें म्हणजे नानात्वाच्या झिरझिरीत पडद्यांतून त्यापलीकडे असणारें एकत्व पाहून वैदिक ऋषींनीं सिद्ध केलें. (समग्र केळकर-१२।६२५) आणि छळाविषयीं म्हटलें तर हिंदुस्थानांत भटभिक्षुक आणि यज्ञयाग यांची शेलक्या शिव्यांनीं पूजा बांधणारा व निस्सीम नास्तिक असा जो चार्वाक त्याचाहि छळ झाल्याचें नमूद नाहीं.

आतां हिंदुस्थानांत धार्मिक सहिष्णुता कशी नांदत होती हें, छळ

करण्याची सत्ता व साधनें ज्यांच्या हातीं होतीं त्या राजे लोकांनीं भिन्नधर्मीयांनासुद्धां आपला उदार आश्रय कसा दिला यावरून पाहूं.

## सहिष्णुतेची जोपासना

यासंबंधीं अगदीं प्रथम कोणा सम्राटाचें स्मरण होईल तर तें अशोकाचें. धार्मिक समतेचा पूर्णावतार कोठे झाला असेल, तर तो अशोकामध्येंच. 'पूजेतया एव परपासंडाः' म्हणजे पाखंडाच्या धर्मा-बद्दलहि पूज्यबुद्धि बाळगावी येवढी उदार दृष्टि त्याची होती. इसवी सनाच्या प्रारंभीं राज्य करणारे शातवाहन राजे हे वैदिक धर्माचे अनुयायी होते. त्यांच्यांतील गौतमीपुत्र हा ब्राह्मणांचा रक्षणकर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. पण या राजांच्या कारकीर्दीतहि बौद्धयतींचा योगक्षेम नीट चाले. त्याची साक्ष देण्यास आपल्या महाराष्ट्रांतीलच कार्ले, भाजें वगैरे ठिकाणचीं लेणीं अद्यापहि उभीं आहेत. दुसऱ्या शतकांतील आंध्र राजांनीं अश्वमेध व गवामयन यज्ञ केले; यावरून त्यांची वैदिक धर्मनिष्ठा स्पष्ट दिसून येते. पण त्यांनीं बुद्धभिक्षूंकरितां लेणीं बांधलीं व त्यांना नव्या कफन्या दरवर्षीं देण्याकरितां एका श्रेणीला कायमचा भत्ताहि दिला होता. मलबारच्या प्राचीन राजांनीं याच कालांत ख्रिस्त्यांस व यहुद्यांस आपल्या धर्माप्रमाणें वागण्यास परवानगी दिली व तद्विषयक ताम्रपट दिले. पुढें सहाव्या शतकांतील चालुक्य राजे हेहि वैदिकधर्माभिमानीच होते. या घराण्यांतील सुप्रसिद्ध पुलकेशी यानें तर अश्वमेध यज्ञ केला. पण याच घराण्यांतील दुसऱ्या विक्रमा-दित्यानें एका जैन मंदिराचा जीर्णोद्धार करून जैनपंडिताला देणगी दिली असेंहि इतिहास सांगतो. मगधाचे गुप्त राजे वैदिक धर्माचे अभिमानी असून त्यांनीं अश्वमेधहि केले. ठाणेश्वराचा हर्षवर्धन हा म्हातारपणीं तरी बौद्ध होण्याच्या बेतांत आला होता. तरी या दोन राजांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत येऊन गेलेल्या चिनी प्रवाशांनीं लिहिलेल्या हकीकतींवरून पाहतां दोन्ही रियासतींत धर्मच्छल कोण-

त्याच पंथाला सोसावा लागत नव्हता. फाहायन आणि युवानच्वंग हे चिनी प्रवासी अनुक्रमें चंद्रगुप्त व हर्षवर्धन यांच्या कारकीर्दीत भरतभूमीची तीर्थयात्रा करून गेले. पण दोघांनाहि वैदिक धर्म आणि बौद्धधर्म गुण्यागोविंदानें शेजारीं शेजारीं नांदत असतांना आढळले. गुप्तघराणें वैदिक धर्माभिमानी असतांहि या घराण्यांतील नरसिंहगुप्तानें नालंद येथें बौद्धमठ बांधला. हर्षवर्धनाच्या कारकीर्दींत जनतेमध्यें वैदिक आणि बौद्ध या पंथांत थोडा मत्सर असे. बौद्धधर्मीय युवानच्वांगचा हर्षानें केलेला गौरव वैदिकांना आवडला नाहीं, तरीहि खुद्द राजा हर्ष यानें दोन्ही पंथांविषयीं समतोल वृत्ति राखली होती. हर्षाचा चरित्रकार बाणभट्ट हा वैदिक धर्मीय असून त्यानेंहि बौद्धांविषयीं अनुदार उद्गार कोठेंच काढलेले नाहींत. उलट हर्षचरित्रांतील दिवाकरमित्राच्या आश्रमांत मोठा मेळा जमला होता, त्यांत भिक्षु, भागवत, केशलुंचक, कापालिक, लोकायतिक असे नानापंथी लोक होते असें वर्णन केलें आहे. असल्या याद्या संग्राहक स्वरूपाच्या असतात हें खरें; पण त्यांतहि सहिष्णुवृत्ति दिसून येतेच.

खुद्द हर्षाच्या कुटुंबांत धार्मिक सहिष्णुता फार उच्च दर्जाला गेलेली आढळते. हर्षाच्या कुटुंबांत कोणी कोणत्या देवतेला भजावें किंवा कोणी कोणत्या धर्माची दीक्षा घ्यावी याविषयीं पूर्ण स्वतंत्रता होती. हर्षाच्या पूर्वीच्या तीन पिढ्यांत उपास्यदैवत आदित्य होतें तर खुद्द हर्ष आपणास परममाहेश्वर म्हणजे शिवभक्त म्हणवीत असे आणि हर्षाची बहीण राज्यश्री ही बुद्धसंघांत सामील झाली होती! युवानच्वंगानें वर्णिलेल्या एका प्रसंगावरून तर हर्षाच्या राज्यांतील धर्मसहिष्णुतेचें स्वरूप ठळक रीतीनें नजरेस येतें. सम्राट् हर्ष हा आपल्या अलोट संपत्तीचा दर पांच वर्षांनीं दानधर्म करी. या विश्वाजित् यज्ञप्रसंगीं संपत्ति वाटण्यांत येई, ती धार्मिक पंथापंथांमध्यें कोणताहि भेदभाव न करतां वाटण्यांत येई. हर्षानें हा क्रम सतत वीस वर्षें चालविला होता. चिनी यात्रेकरू हजर होता तो हर्षाच्या

कारकीर्दींतील सहावा प्रसंग होता. (इ. स. ६४३). त्यानें लिहून ठेवलेलें या उत्सवाचें वर्णन हें साक्षात् सहिष्णुतादेवीच्या उत्सवाचेंच वर्णन होय! या महोत्सवाकरितां प्रयाग येथें विस्तीर्ण मंडप घातला होता. एकंदर कार्यक्रम ७५ दिवस चालू होता. सुमारें चार-पांच लाखांचा मेळा जमला होता. त्यांत सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे लोक उपस्थित होते. उत्सवांतील कार्यक्रमहि सर्वधर्मसंग्राहक असाच होता. पहिल्या दिवशीं मंडपांत अग्रभागीं बुद्धाची प्रतिमा स्थापण्यांत आली, दुसऱ्या दिवशीं अग्रभागीं सूर्याची प्रतिमा ठेवण्यांत आली, आणि तिसऱ्या दिवशीं मुख्य मान देण्यांत आला ती प्रतिमा शिवाची होती! चौथा दिवस बुद्धभिक्षूंच्या दानसंतर्पणाकरितां राखून ठेवला असून पुढें वीस दिवस ब्राह्मणांची संभावना करण्यांत आली. यानंतर निर-निराळ्या बारीकसारीक पंथांच्या भक्तांना मुक्तद्वार ठेवण्यांत आलें, आणि शेवटीं अनाथ, अपंग अशांचाहि योग्य परामर्श घेण्यांत आला. धार्मिक सहिष्णुतेचा हा एकंदर प्रकार अपूर्व नाहीं असें कोण म्हणेल?

अलीकडील कालांतील विजयनगरच्या राज्याकडे वळलें तरी तेथेंहि सिंहासनाधिष्ठित राजांनीं सहिष्णुवृत्तीच जागविलेली आढळते. इ. स. १३६८ मध्यें राज्यांत वैष्णव व जैन यांच्यामध्यें तंटा उपस्थित झाला तेव्हां राजानें जाहीर केलें कीं, 'वैष्णव पंथ आणि जैन पंथ यांत कांहींच फरक नाहीं. एकाचें जें नुकसान तेंच दुसऱ्याचें; म्हणून सर्वत्र वैष्णवांनीं असें शासन सुरू करावें, कारण यावच्चंद्रदिवाकरौ वैष्णवपंथ जैनांचें संरक्षण करील.' (त्रिशतसांवत्सरिक ग्रंथ, पृ. ५२९)

## सहिष्णुतेची अमर पताका

सहिष्णुतेचे, सक्रिय सहिष्णुतेचे, असले आणखी पुष्कळ मासले इतिहासाचीं दप्तरें धुंडाळाल तर सापडतील. पण केवळ इतिहासाच्या बाडांत गाडले गेलेले हे दाखले नष्ट होण्याचाहि संभव फार. खुद्द हर्षराजाचें वरील वर्णन हेंहि चिनी प्रवाशानें लिहून ठेवलें म्हणून

आज आपणांस अवगत होत आहे. आणि तेंहि चिनी जाणणाऱ्या पंडितांनीं आमच्या भाषेंत आणले तेव्हां! पण साध्या मुशाफराच्या नजरेलाहि सहज दिसण्यासारखे हिंदु सहिष्णुतेचें चित्र तुम्हांस अवलोकण्यास हवें काय? हवें असलें तर तुम्हांस लांब जावयास नको. आपल्या या महाराष्ट्रांतच तें तुम्हांस आढळेल; आणि तेंहि चिरकाल टिकेल अशा स्वरूपांत. तें म्हणजे वेरूळचीं लेणीं हीं होत! हीं लेणीं म्हणजे भारतीय सहिष्णुतेची अमरपताकाच होय. हीं लेणीं पुष्कळ असून त्यांनीं एक अर्धवर्तुळाकार अशी सबंध टेकडी व्यापली आहे. या टेकडीकडे म्हणजे लेण्यांकडे तोंड करून उभे राहिलांत व उजव्या हातास प्रारंभ करून डावीकडे लेणीं पाहत जाऊं लागलात, तर पहिल्या कांहीं लेण्यांत तुम्हांस बुद्धाच्या प्रतिमा आढळतील. तीं संपलीं कीं, पुढचीं कांहीं लेणीं वैदिक धर्मीयांचीं आढळतील. यांतील सर्वांत मोठ्या लेण्यालाच कैलास हें नांव आहे. आणि तेथून पुढें पाहत गेलांत म्हणजे उरलेल्या लेण्यांतून जैनांच्या तीर्थंकरांचें दर्शन घडेल! व्यापक हिंदु धर्माच्या या तिन्ही शाखा एकत्र गुण्यागोविंदानें कशा नांदत होत्या ह्याचें हें चिरकालिक स्मारकच होय. या बाबतींत मंदिरें उध्वस्त करून मशिदी उभारणाऱ्या मुसलमानांची वृत्ति ध्यानांत आणा म्हणजे हीं तिन्ही लेणीं एकाच डोंगरांत शेजारींशेजारीं नांदविणाऱ्या उदार सहिष्णुतेचें मर्म लक्षांत येईल. मुसलमानांची मशीद उठावयाची म्हणजे ती हिन्दूंचें देऊळ पाडून त्याच्या उरावर पाय देऊन उठावयाची. समूळ जमीनदोस्त करण्यास सवडच सापडली नाहीं तरी निदान छिन्नविच्छिन्न विद्रूप तरी करून सोडावयाचें ही रीत. पण वेरूळचीं लेणीं खोदविणाऱ्या वैदिक, बौद्ध व जैन राजांना ह्या विघातक वृत्तीचा स्पर्शहि झालेला दिसून येत नाहीं; म्हणूनच इतिहासाचे कागदपत्र नष्ट झाले तरी, वेरूळची काळ्या कपारीची अभेद्य टेकडी जोंवर धरणीवर उभी आहे तोंवर ती आपल्या अनेक लेण्यांच्या

मुखांनीं सर्व जगाला ओरडून सांगेल कीं, सहिष्णुता हा हिंदुधर्माचा प्राण होय. काशींतील देऊळ पाडून औरंगजेबानें मशीद बांधली; पण ती पाडण्याच्या विचारांत मल्हारराव होळकर असतां त्याला उपदेश करण्यांत आला कीं, मंदिर बांधणें उत्तम पण मशीद पाडणें पाप! भारतीयांची सहिष्णुतेबद्दलची ख्याती जगभर पसरलेली होती. ती जाणूनच चौथ्या शतकांत इराणांत सस्सानिद राजांनीं ख्रिस्त्यांना धारेवर धरलें तेव्हां, त्यांनीं तेथून पळ काढून कोठला किनारा गाठला असेल तर तो हिंदुस्थानचा किनारा! पुढें आठव्या शतकांत इराणांत मुसलमानी अमलांत पारशांना वाईट दिवस आले तेव्हां तेहि कोणत्या देशाकडे वळले असतील तर हिंदुस्थानाकडे.

## संग्राहक वृत्ति

या सहिष्णुतेच्या जोडीला दुसरें डोळ्यांत भरण्यासारखें वैशिष्ट्य म्हणजे संग्राहकपणा हें होय. नुसती सहिष्णुताच हिंदु समाजांत वावरत असती तर भिन्नभिन्न समाज एकमेकांशेजारीं नांदत राहिले असते एवढेंच, पण त्या सर्वांचें सांस्कृतिक एकीकरण झालें नसतें. तसें एकीकरण झालें ही फार महत्त्वाची कामगिरी होय. त्यांतहि हें एकीकरण त्या त्या पंथाचें आणि समाजाचें वैशिष्ट्य कायम ठेवून करण्यांत आलें हें विशेष होय.

सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांत हें एकीकरण कसें करण्यांत आलें याचें धावतें दर्शन घेणेंहि मनोरंजक आहे. हिंदुस्थानांतील अनेक भिन्न-भिन्न रक्तांच्या समाजांना एका सूत्रांत गोवणें ही क्रिया फारच जिकीरीची होती. खुद्द भारतीय आर्यांच्या टोळ्या हिंदुस्थानांत आल्या त्याच्या-पूर्वींच येथें द्रविड येऊन सुप्रतिष्ठित झाले होते. त्यांच्याहि आधीं येथें मूळचे रहिवासी होते. त्यांना आदिद्रविड म्हणतां येईल. आर्यां-च्या वसाहतीनंतर शक, हूण, यवन, म्लेंच्छ वगैरे अनेक परकीय लोक भरतखंडांत आले व येथल्या अफाट समूहांत मिसळून गेले. शिवाय

प्रथमपासून आर्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून असुर, नाग, राक्षस, दस्यु, वानर वगैरे भिन्न समाज येथें स्थायिक झालेले होतेच. या सर्वांना एका समाजसूत्रांत गोवून त्यांचीं परस्पर-स्थानें एका व्यापक समाजांत निश्चित करणें हें काम विशाल व संग्राहक बुद्धीविना अशक्यच होतें. ही समाजघटना तयार करण्यांत आर्यांनीं जी वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था निर्माण केली ती त्यांच्या समाजसंघटनकौशल्याची द्योतक होय. आज-मितीला ही जातिसंस्था उपयुक्त राहिली आहे कीं नाहीं किंवा जाति-संस्थेपेक्षां कांहीं निराळ्या पद्धतीनें समाजघटना करणें आज शक्य व इष्ट आहे कीं नाहीं हा विचार येथें प्रस्तुत नाहीं हें सांगावयास नकोच. प्राचीनकाळीं ईजिप्त, रोम, ग्रीस, इंग्लंड, चीन वगैरे सर्वच देशांत ज्यांना स्थूलमानानें जाति म्हणतां येईल असे समाजाचे निरनिराळे गट अस्तित्वांत होतेच तसे ते हिंदुस्थानांत होते.

आर्येतर गटांना समाजघटनेंत प्रविष्ट करण्यांतहि ही जातिसंस्था फार सोईची ठरली. म्हणजे एखादा बाहेरील गटच्या गट भारतीय समाजघटनेंत समाविष्ट केला म्हणजे, त्याला रूढ जातींपैकीं ज्या जातीशीं तो गुणकर्मानें जवळचा असेल त्या जातींत त्याला स्थान दिलें जाई. शिवाय मोठा गटच्या गट प्रविष्ट झाल्यानें त्यांची एक पोटजात बने व त्यामुळें त्यांच्या विवाह व अन्नोदक या व्यवहारांना पुरेसें क्षेत्र मिळे. अलीकडे छोटानगर प्रांतांतील मुंड नांवाच्या फार प्राचीन काळापासून येथें स्थायिक असलेल्यांना अशाच रीतीनें कांहीं धार्मिक विधि करून हिंदु समाजांत घेण्यांत आलें आहे. उच्च वर्णीयांत परकीयांना समाविष्ट करून घेतलेल्याचें उदाहरण म्हणजे पारशी मग लोकांचें. हे लोक इराणांतून हिंदुस्थानांत येऊन मिथ्र देवतेच्या उपासनामार्गाचा फैलाव करते झाले. यांचा आचार पुजारीवर्गासारखा असल्यानें त्यांना शक-द्वीपाहून आलेले ब्राह्मण असें लेखून त्यांचा प्रवेश येथील ब्राह्मणवर्णांत करण्यांत आला. आतां मग हे पुजारी म्हणून धंद्यानें ब्राह्मण जातीचे ठरले तरी रक्तानें, भाषेनें, धर्मानें परकीय; तेव्हां त्यांच्याशीं विवाह-

संबंध होणें कठीण होतें. यामुळें त्यांची पोटजात बनली. कालांतरानें या पोटजाति इतर बहुसंख्याक जातींशीं एकरूप होतात त्या वेळीं पुन्हा शरीरसंबंध सुरू केला पाहिजे. ही क्रिया मात्र झाली नाहीं; वाढत जाण्याची क्रिया सुरू राहिली पण त्या मोडण्याची स्थगित झाली.

समाजसंघटनेचा आणखी एक प्रयोग म्हणजे काल्पित वंशावळी तयार करणें हा होय. ऐतरेय ब्राह्मणांतील विश्वामित्राची कथा ह्या बाबतींत बोधप्रद आहे. या कथेमध्यें आंध्र, पुण्ड्र, शबर, पुलिंद, मूतिब वगैरे पांचपन्नास आर्येतर जातींचे लोक हे सर्व विश्वामित्राचे पौत्र म्हणून वर्णिलेले आहेत.

संघटनेची आणखी दिशा म्हणजे त्या त्या लोकांच्या चाली-रितींना मान्यता देणें ही होय. ही पद्धत विवाहाचे गांधर्व, आसुर, पैशाच आदि अष्ट प्रकार कायदेशीर म्हणून मान्य करण्यांत दिसून येते. या अष्ट प्रकारांपैकीं कांहीं प्रकारच प्रशस्त मानले गेले असले तरी, बाकीचे बेकायदेशीर गणले जात नसत, याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. इतर देशांत राजमान्य विवाहपद्धतींशिवाय इतर पद्धति मान्य करीत नसत हें पाहिलें म्हणजे भारतीयांच्या संग्राहक सहिष्णु-तेचें मर्म लक्षांत येईल. उदाहरणार्थ, रोमन साम्राज्यांत गुलामांचीं लग्नें कायदा मानीत नसे. गोव्यांतील ख्रिश्चन राजसत्तेनें तेथील हिंदूंवर विवाहाबाबत कांहीं बंधनें घातलीं होतीं.

इतर समाजांना आपल्या समाजव्यवस्थेंत समाविष्ट करण्यासाठीं कांहीं धर्मविधिहि बसविले होते. अबुर्द पर्वतावर परकीय लढवय्यांना अग्निसंस्कार करून क्षत्रिय बनविण्यांत आल्याची जी कथा भविष्य-पुराणकारानें दिली आहे ती ह्या संग्राहकपणाचीच द्योतक होय. आजचे रजपूत हे त्यांचेच वंशज होत असें मानण्यांत येतें. व्रात्य-स्तोमाविधि हा तर प्रसिद्धच आहे. मुसलमानी व ख्रिस्ती हे समाजहि इतरांना आपल्या गोटांत समाविष्ट करून घेतातच. पण तसें करण्यांत

त्यांची मुख्य अट धर्म स्वीकारणें ही असते. भारतीयांनीं धर्ममत लोकांवर न लादतांहि परकीयांचें स्थान आपल्या समाजांत निश्चित केलें. आणि सामाजिक दृष्ट्या जातीजातींतील उच्च-नीचपणा कायम राखूनहि 'स्वधर्मे निधनं श्रेयः' या तत्त्वानें धार्मिक दृष्ट्या वैषम्याचें विष सौम्य करून टाकलें.

## धार्मिक संग्राहकपणा

संग्राहकपणाची खळबळ कोणत्या प्रांतांत सर्वांत अधिक असेल तर ती धर्माच्या प्रांतांत. या प्रांतांत संग्राहकपणाचा एखादा नवा प्रयोग सुरू झाला कीं प्रथम प्रथम कटकटी होतच. वेदांतील निरनिराळ्या शाखांमध्यें, शैववैष्णवांमध्यें, वैदिक व बौद्ध यांमध्यें अशा कटकटी झाल्या नाहींत असें नाहीं. पण त्या सर्वांना पुरून उरून हिंदूंचा संग्राहकपणाच शेवटीं विजयी ठरला असें इतिहास सांगतो.

हें धार्मिक संग्राहकपणाचें धोरण थेट वैदिक कालापासूनच अवलंबिलेलें आढळून येतें. वैदिक कालामध्यें अवैदिकांना यज्ञ करूं द्यावयाचा कीं नाहीं हा मोठा महत्त्वाचा प्रश्न गाजला होता. यज्ञ करणें हें आर्यत्वाचें मुख्य लक्षण त्या काळीं गणलें जाई. आपल्या शत्रूंना आर्य नेहमीं यज्ञाचे शत्रु म्हणून संबोधीत; पण पुढें कांहीं निषादासारखे अनार्य जेव्हां मित्र बनले व आर्यांचे आचारविचार उचलण्याची मनीषा बाळगूं लागले, तेव्हां आर्यांचा श्रेष्ठतम धर्म जो यज्ञ तो करण्याची अनार्यांना परवानगी द्यावी कीं नाहीं याविषयीं चळवळ होऊन, अंतीं निषादस्थ पतींना रौद्रइष्टि करण्याचा अधिकार देण्यांत आला. खुद्द वैदिक अभिमान्यांत कालांतरानें एकीकरणाची जरूरी उत्पन्न झाली होती. चार वेदांना मान्यताहि कालांतरानें मिळाली. वेदांचा उल्लेख त्रयीनेंच केला जाई. म्हणजे अथर्ववेद बाटगाच समजला जाई. त्रयीमधील सामवेदासंबंधीं तर ' सामवेदः स्मृतः पित्र्यः तस्मात्तस्याशुचिर्ध्वनिः ' असें मनुस्मृतीचें निंदावचन आहे. तेव्हां हे

वेद भिन्नभिन्न समाजांचें असून पुढें सर्वांना मान्यता देण्यांत आली असावी असाहि संभव आहे. वेदांच्या निरनिराळ्या शाखा निरनिराळ्या स्थलीं सुरू झाल्या होत्या. मंत्रतंत्रक्रिया भिन्न भिन्न झाल्या होत्या. प्रथम यज्ञ लहान प्रमाणावर होत असत; व जो तो आपापल्या शाखे प्रमाणें विधि करी. या निरनिराळ्या शाखांच्या एकीकरणाचा प्रयत्न म्हणजे महिनानुमहिने, वर्षानुवर्षें चालणारीं महान् सत्रें हीं होत. हीं मोठमोठीं सत्रें वैदिक काळची अत्यंत महत्त्वाची संस्था होती. या सत्रांत होता, पोता, अध्वर्यु, ब्रह्मा वगैरे अनेक उपाध्याय लागत. ते निरनिराळ्या वेदांचे असावेत असें ठरवून त्या त्या वेदांच्या अनुयायांचें एकीकरण करण्यांत आलें. सोमयागांत ऋत्विजांच्या एकीकरणाचा एक विधीच सांगितलेला आहे. तो तानूनप्त्र हा होय. या विधीप्रमाणें सर्व ऋत्विज एकदिलानें वागण्याची शपथ घेतात. यागसमाप्तीच्या वेळीं सख्य-विसर्जनविधि करीत. हीं सत्रें वर्षानुवर्षें चालत, अनेक ठिकाणचे विद्वान् एकत्र येत, वादविवाद चालत, फावल्या वेळीं नृत्य, गायन, नाट्य, कथाश्रवण वगैरे चाले. उदाहरणार्थ तानूनप्त्र विधीचें महत्त्व बिंबविण्याकरितां देवांत फूट पडली तेव्हां त्यांचा पराभव झाला ही कथा वर्णिली जाई. या सर्वांतूनच हिंदूंचीं शास्त्रोपशास्त्रें व विद्योपविद्या निर्माण झाल्या. कालांतरानें यज्ञविधि फार भानगडींचे झाले, खर्चांचे झाले आणि अप्रिय झाले. तेव्हां अग्नीची उपासनाच नष्ट होण्याचा प्रसंग आला असतां गार्हस्पत्याग्नि ज्यानें त्यानें आपआपल्या घरीं बाळगावा व कांहींनीं अग्निहोत्र स्वीकारावें अशी क्लृप्ति काढून अग्नीची पूजा रक्षण केली.

पुढें उपनिषत्कालीं अग्नीची पूजा करावीच कां? अशी सर्वसाधारण कर्मकांडावरच शंका घेण्यांत येऊं लागली. यज्ञ हे फुटक्या नावेप्रमाणें बेभरंवशाचे असें प्रतिपादन सुरू झालें, आणि अंतिम निःश्रेयसाला कर्मकांडाची आवश्यकताच नाहीं, असा उपनिषद्कारांनीं सिद्धान्त मांडला. अशा वेळीं पूर्वींच सुप्रतिष्ठित होऊन बसलेला यज्ञादि-

कर्ममार्ग आणि नवोदित औपनिषदिक ज्ञानमार्ग यांची सांगड कशी घालावयाची असा प्रश्न उपस्थित झाला. त्यावर अशी तोड काढली कीं, 'ज्ञानान्मोक्षः' हा सिद्धान्त मान्य केला तरी ज्ञानालाहि चित्तशुद्धि अवश्य असते आणि ती कर्ममार्गानें मिळते असें मानावें!

पुढें तत्त्वज्ञानांत अनेक पंथ उत्पन्न झाले. त्यांचाहि मिलाफ करणें प्राप्त झालें. त्या सर्वांचा समन्वय आपल्या पूर्वजांनीं ज्या दोन सुंदर समर्पक तत्त्वांनीं केला, तीं म्हणजे अधिकारभेद आणि अवस्थाभेद हीं होत. या दोन सूत्रांनीं शेंदूर फासलेल्या दगडाच्या म्हसोबापासून तों 'यत्र वाचो निवर्तन्ते' अशा अनिर्वाच्य ब्रह्मापर्यंत सर्वांना एकत्र गुंफण्यांत आलें. हिंदुसमाजाच्या विराट् देहांत संस्कृतीच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर उभे असलेले अनेक समाजघटक होते. त्या सर्वांच्या धार्मिक कल्पना एकसूत्रांत गोवावयाच्या तर, सर्वांना एकच दैवत आणि एकच धर्मग्रंथ लागू करणें यासारखें अप्रयोजक दुसरें कांहींच झालें नसतें. तेव्हां सामाजिक बाबतींत विवाहाचे भिन्नभिन्न प्रकार कायदेशीर मानून जें संग्राहक उदारपणाचें धोरण स्वीकारलें तसेंच धार्मिक बाबतींत हरतऱ्हेचीं देवदैवतें व देवस्की वगैरे प्रकारांना मान्यता देण्यांत दाखविलें गेलें. वृक्षपूजा, नागपूजा वगैरे जे प्रकार रूढ होते त्यांनाहि अव्हेरिलें नाहीं. इतकेंच नाहीं तर, या सर्वांचा समावेश केला तोहि नाकें मुरडत, नाइलाजानें, उपकार करण्याच्या आढ्यतेनें नव्हे, तर तो करीत असतां एका मोठ्या उदार तत्त्वाची प्राणप्रतिष्ठा करून. तें तत्त्व म्हणजे **जेथें जेथें म्हणून कसल्याहि प्रकारचा तेजस्वीपणा चमकला असेल तें तें सर्व ईश्वराचेंच प्रतीक होय.** यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशऽसंभवम्॥ हें सुप्रसिद्ध भगवद्गीतोक्त तत्त्व होय. या तत्त्वानें वृक्षपूजा, पाषाणपूजा, पशुपक्षिपूजा, मानुषपूजा या सर्वांनाच प्रतिष्ठित अशा तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त करून दिली. अगदीं रानटी आणि वन्य, अशा जातींमध्यें प्रत्येक जातीचें एक देवक

(Totem) मानलें जातें. हीं देवकें वृक्ष, पशु इत्यादिकांचीं असत व जातीचें नांव त्या देवकावरूनच ओळखलें जात असे. ह्या देवकांनाहि झिडकारण्यांत आलें नाहीं, तर त्या देवकांचेंच गोत्रांत रूपांतर करण्यांत आलें. बंगालमधील कच्छप देवकाच्या कांहीं जातींचें कश्यप गोत्र बनविलें असावें असें डॉ. केतकर सांगतात.

शैव, शाक्त, गाणपत्य, सौर, पांचरात्र वगैरे धर्मपंथ व सांख्ययोग वगैरे तत्त्वज्ञानपंथ यांचा समन्वय करण्याच्या प्रयत्नाचें ठळक प्रतिबिंब महाभारत आणि भगवद्गीता या दोहोंमध्यें स्पष्ट उमटलेलें आहे. "सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः" या सुप्रसिद्ध भगवदुक्तीची या ठिकाणीं वाचकांना सहजच आठवण होईल. गीता ही या संग्राहक समन्वय-पद्धतीची उज्ज्वल निशाणीच होय. सांख्य आणि योग, कर्ममार्ग, भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग, द्वैत, अद्वैत या सर्वांचा समन्वय करण्याचा गीतेनें प्रयत्न केला आहे. आणि यांतच सर्व पंथांना गीता सारखीच आदरणीय वाटत आली आहे याचें बीज आहे. योगवासिष्ठकारानेंहि असाच समन्वय केला आहे, कीं सांख्यांचा पुरुष, योग्यांचा ईश्वर, शैवांचा शिव, काल हे सर्व एकच होत. 'पुरुषः सांख्यदृष्टीनां ईश्वरो योगवादिनाम्। शिवः शशिकलांकानां कालः कालैकवादिनाम्॥' ब्रह्मा-विष्णु-महेश यांना सृष्टीच्या उत्पत्ति, स्थिति व लय यांच्या देवता कल्पून विष्णु-पुराणकारानें असेंच ऐक्य साधलें आहे. तो लिहितो कीं, 'सृष्टि स्थित्यंतकरणीं ब्रह्माविष्णुशिवाभिधाम्। स संज्ञां याति भगवान् एक एव जनार्दनः॥' वेदांतील पवित्र अक्षर ॐ यांतील घटक जे अ, उ, म ते ब्रह्मा, विष्णु, शिव यांचें प्रतीक होत असें मानण्यांतहि हीच ऐक्यभावना दिसून येते.

## सर्वसंग्राहक महाभारत

तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून गीता, योगवासिष्ठादींनीं जें कार्य साधलें तेंच कार्य महाभारतानें मोठ्या प्रमाणांत कथानकाच्या रूपानें

साधलें. सौतीनें भारताचें महाभारत जेव्हां बनविलें तेव्हां त्याच्या काळीं जे निरनिराळे धर्मपंथ वावरत होते त्या सर्वांची ज्यांनीं एकवाक्यता होईल व ते सर्व एकत्र नांदतील अशा प्रकारच्या कथांचा आपल्या ग्रंथांत संग्रह केला; किंवा क्वचित् नव्या बनवून घातल्या. शांतिपर्व व अनुशासनपर्व हीं दीर्घ प्रकरणें प्रमाणाबाहेर फुगलीं आहेत तीं या संग्राहक-बुद्धीनें. शैव आणि वैष्णव हे जे दोन प्रमुख पंथ त्यांच्यांतील विरोध काढून टाकण्याकरितां अनुशासनपर्वांत उपमन्यूचें आख्यान घातलें आहे. त्यांत शंकराची स्तुति खुद्द श्रीकृष्णाच्या तोंडूनच वदविली आहे, आणि विष्णुसहस्रनामाच्या धर्तीवर शिवसहस्रनामहि या आख्यानांत गोवलें आहे. अर्जुनानें शंकरापासून पाशुपत अस्त्र मिळविलें ही कथा किरातार्जुनाच्या वाचकांस परिचित आहेच. पण द्रोणपर्वांत जयद्रथवधाची प्रतिज्ञा पुरी करण्याकरितां श्रीकृष्णानेंच खुद्द अर्जुनास शंकरापासून पाशुपतास्त्र मिळविण्यास सांगितलें असें दाखविलें आहे. मोक्षपर्वांतील नारायणीय उपाख्यान हें एक शैव-वैष्णव ऐक्यवर्धक प्रयत्नाचें मोठें रोचक उदाहरण आहे. त्यांत असें दाखविलें आहे कीं, नारायण व शंकर यांच्या युद्धांत कोणाचाच पराभव होईना तेव्हां ब्रह्मदेवानें शंकराला विनंति केली कीं, तूं नारायणाचा भक्त हो. तेव्हां नारायण शंकराला म्हणाला, "जो तुझा भक्त तो माझा भक्त. तुझ्या व माझ्यामध्यें कांहीं एक भेद नाहीं. तुझ्या शूलाचें चिन्ह माझ्या वक्षःस्थलावर उमटलेलें असल्यानें मला श्रीवत्स असें म्हणतील आणि माझ्या हाताचें चिन्ह तुझ्या कंठावर उमटलेलें असल्यानें तुला श्रीकंठ म्हणतील !" याचप्रमाणें देवीच्या उपासकांना संतुष्ट करण्याकरितां पांडव विराट्नगरींत शिरले त्या प्रसंगीं त्यांच्या तोंडीं देवीची स्तुतीहि घातली आहे.

महाभारताच्या कालानंतरहि शैववैष्णवांना एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरूच होते. त्यांपैकीं एक विशेष लक्षांत भरण्यासारखा म्हणजे दत्तसंप्रदाय हा होय. दत्तात्रेयाच्या मूर्तींत ब्रह्मा, विष्णु आणि महेश

या तिन्ही देवतांचा एकत्र मिलाफ केला आहे. याच प्रकारचा दुसरा प्रयत्न हरिहराच्या मूर्तीचा होय. शिवविष्णूची मूर्ति एकत्र करण्याचें एक ऐतिहासिक उदाहरण वैद्यांनीं दिलें आहे तें बंगालच्या विजयसेन राजाचें. त्यानें देवालयाला प्रद्युम्नेश्वर असें नांव देऊन त्यांत शिवविष्णूची संमिश्र मूर्ति बसविली (म. भा. ३।६१९). आणखी एक प्रयत्न शंकराचार्यांनीं केला. तो शिव, विष्णु, सूर्य, देवी व गजानन यांच्या पंचायतन-पूजेचा. या प्रयत्नांनीं समाजाच्या फुटीर प्रवृत्तीला आळा घालून भिन्न पंथांना एकत्र नांदणें सुकर केलें. हीच प्रथा पुढें संतसाधूंनीं कायम राखिली. महाराष्ट्रांतील वारकरी पंथ हा विठ्ठलाचा म्हणजे विष्णूचा उपासक. पण त्यांनींहि शिवविष्णूचें ऐक्यच प्रतिपादिलें आहे.

वैदिक धर्माला खरें सामर्थ्यवान् प्रतिस्पर्धी म्हणजे बौद्ध व जैन हे धर्म होत. पैकीं बौद्धपंथ पुढें हिंदुस्थानांतून नामशेष झाला तरी, हिंदुधर्मांत त्यानें महत्त्वाचा फरक घडवून आणला. तो इतका कीं, बुद्धाला दशावतारांत कायमचें स्थान देण्यांत आलें. रामायणांत ज्या बुद्धाला चोर म्हटलें आहे ('यथाहि बुद्धः स तथाहि चोरः) त्याच बुद्धाला गीत-गोविंदांत 'केशवधृत बुद्धशरीर जय जगदीश' अशा शब्दांनीं गौरविलें आहे. हा विरोध लक्षांत घेतला असतां अंतिम समन्वयाचें मर्म लक्षांत येईल. उत्तरकालीं तर सर्व संकल्पांची सुरुवातच 'कलियुगे बौद्धावतारे' अशी होऊं लागली. शंकराचार्यांनीं तत्त्वज्ञानांत या पक्षाशीं इतकें मिळतें घेतलें कीं, प्रच्छन्नबौद्ध हें विशेषण त्यांना लावण्यांत आलें. उलट बौद्धधर्म हिंदुस्थानांत बऱ्याच कालपर्यंत नांदूं शकला तोहि त्यानें वैदिक धर्मांतील बऱ्याच भागांचा स्वीकार केला म्हणून. बौद्धधर्मांत हीनयान आणि महायान असे दोन पंथ आहेत. त्यांतील दुसरा पंथ जो महायान पंथ त्यानें मूळ बौद्धधर्मांतील दुःखवाद काढून टाकला व वैदिक धर्मांतील बऱ्याच गोष्टींचा स्वीकार करूनच आपलें आसन स्थिर केलें. पुढें

हिंदुस्थानाबाहेर चीन-जपानमध्यें ज्या धर्माचा प्रसार झाला तो या पंथाचाच.

जैनांविषयीं बोलावयाचें तर त्यांनीं वर्णव्यवस्थेंत ब्राह्मणांना महत्त्वाचें स्थान दिलें आणि कृष्ण, बलराम, देवकी हीं आपल्या तीर्थंकरांत समाविष्ट केलीं. जैनधर्माचा आणि वैदिक धर्माचा विरोध हा कांहीं ठिकाणीं दोहोंच्याहि उपाध्यायांचा एकाच मंत्रांत समावेश करून काढून टाकिला. याचें एक उदाहरण म्हणजे कोंकणांतील देवस्कीचे मंत्र. या मंत्रांत जैनाब्राह्मणांचा असा नेहमीं सजोड उल्लेख असतो. यापेक्षां अगदीं नित्याचा व सर्वांच्या परिचयाचा दाखला म्हणजे मुलें धुळाक्षरें प्रथम शिकतात त्या वेळीं त्या धुळाक्षरांची सुरुवात करितात तो. ही सुरुवात ओं नमः सिद्धं. श्रीगणेशाय नमः अशी असते. म्हणजे प्रथम जैनांच्या सिद्धांना नमन व नंतर लगेच सनातन्यांच्या गणपतीला नमन अशी सजोड सुरुवात असते!

बौद्धांत कालांतरानें जेव्हां तंत्रपंथाचा उदय झाला तेव्हां वैदिक धर्मांत तंत्रपंथांतील कांहीं गोष्टींचाहि समावेश करण्यांत आला, तो इतक्या प्रमाणांत कीं, ब्राह्मणांच्या नित्यकर्मांतील संध्येंत न्यास, अस्त्रायफट् वगैरे तांत्रिक गोष्टी कायम रूढ होऊन बसल्या. हा तांत्रिकांचा पंथ महाचीन अथवा तिबेट येथून हिंदुस्थानांत आला असावा असें नगेंद्र चौधरी म्हणतात. साधनमालेंतील 'आर्यनागार्जुन पादैः भोटेषु उद्धृतम्' म्हणजे नागार्जुनानें भूतानांतून ही उपासना आणली हें वचन त्यांनीं उद्धृत केलें आहे. या पंथांतील एकजटादेवीला महाचीनतारा असेंहि नांव आहे. शिवाय या पंथाचा मुख्य प्रसार तिबेटाला नजीक असलेल्या आसाम, बंगाल व काश्मीर या प्रांतीं विशेष आहे. त्यांचीं मुख्य पीठेंहि तेथेंच आहेत. (मॉडर्न रिव्ह्यू, ऑगस्ट १९३४.) तारातंत्र नांवाच्या तांत्रिक ग्रंथांतील वर्णन वरील मताला पोषक असेंच आहे. तेथें लिहिलें आहे कीं, महर्षि वसिष्ठांनीं एकदां मोठें उग्र तप सुरू केलें. पण त्यांना आढळून आलें कीं देहदंडन हें निष्फळ

होय. नंतर वसिष्ठानें देवी बुद्धेश्वरीची आराधना आरंभली. तेव्हां देवी प्रकट होऊन म्हणाली, तुझी उपासना चुकलेली आहे. ती वेदांना अज्ञात आहे. ती तुला शिकावयाची असेल तर महाचीनांत विष्णूनें बुद्धाचा अवतार घेतला आहे तिकडे गेलें पाहिजे. वसिष्ठानें तिकडे प्रयाण केलें. येथें युवतींच्या मेळ्यांत बुद्ध सुरा पीत बसलेला त्याला आढळला! (गौडरत्नमाला, २).

## इस्लामचें ऋण

मुसलमानांच्या संघर्षणानंतर त्यांच्याहि कांहीं गोष्टी स्वीकारण्यांत आल्या. त्या धर्मांतील कांहीं गोष्टींचें हिंदुधर्मावर कलम करून जो एक नवीनच पंथ स्थापन करण्यांत आला तो शीखधर्म म्हणून प्रसिद्धच आहे. सर्व धर्मांचें एकीकरण करण्याचा अकबरानें प्रयत्न केला होता. पण अशा प्रयत्नास आवश्यक असलेली सहिष्णुता व संग्राहकता मुसलमानांच्या अंगीं परंपरेनें रुजली नसल्यामुळें अकबराचा प्रयत्न वायां गेला. उलट शतकानुशतकांच्या परंपरेमुळें हिंदूंच्या रक्तांत सहिष्णुता भिनली असल्यानें, शीख धर्म मुसलमानी प्रतिकाराच्या झंझावाताला तोंड देऊन बद्धमूलहि झाला. शीख धर्माच्या संस्थापकांनीं हिंदु धर्मांतील पुनर्जन्म व कर्मगति या तात्त्विक कल्पना कायम ठेवल्या, पण मुसलमानी धर्माला तोंड देण्याकरितां अवतारवाद, मूर्तिपूजा आणि जातिभेद यांचें उच्चाटन केलें आणि अशा रीतीनें एक नवीन संग्राहक धर्म बनविला. शीखपंथाचा संस्थापक गुरु नानक याच्या अंत्यविधीसंबंधीं अशी दंतकथा आहे कीं, त्याच्या मृतदेहाचें दफन करावें कीं दहन करावें याविषयीं त्याच्या हिंदु व मुसलमान भक्तवृंदांमध्यें तंटा पडला; आणि तंट्याचा निकाल लागेना तेव्हां असा चमत्कार झाला कीं, मृतदेहच एकाएकीं अंतर्धान पावला. या दंतकथेवरून दोन्ही समाजांचीं अंतःकरणें नानकानें सारखींच आकर्षिलीं होतीं एवढेंच अनुमान काढण्यास हरकत नाहीं. मुसलमानी धर्माशीं नित्य संघटण सुरू झाल्यावर सामान्य हिंदु लोक

मुसलमानी पीरांनाहि भजूं लागले; इतकेंच नव्हे, तर मुसलमानी देवता हिंदूंच्या पुराणांतहि येऊं लागल्या. बंगाली साहित्य-परिषदेनें सतराव्या शतकांतलें कांहीं काव्य प्रसिद्ध केलें आहे. त्यांत रामेश्वर, कृपाराम यांसारखे कांहीं ग्रंथकार आपल्या ग्रंथाच्या आरंभीं हिंदु देवतांबरोबर मुसलमानी देवतांनाहि नमन करतांना आढळून येतात; तसेंच सत्यनारायणाच्या कांहीं कथांमधून सत्यनारायण हा सत्यपीर या मुसलमानी स्वरूपांतहि वर्णिलेला आढळून येतो. जुन्या उपनिषदांच्या धर्तीवर एक अल्लोपनिषदाहि लिहिलें गेलें होतें हें बहुश्रुत वाचकांना अवगत असेलच.

या संग्राहक प्रवृत्तीचें आणखी एक व्यापक स्वरूप म्हणजे भिन्न-भिन्न प्रांतांतील पवित्र स्थानें एका सार्वदेशिक क्षेत्रमालिकेंत गुंफणें व त्या सर्वांची यात्रा करणें हें पुण्यप्रद ठरविणें हें होय. हिंदुसंग्राहक-बुद्धीनें हरिद्वारपासून रामेश्वरापर्यंत आणि द्वारकेपासून जगन्नाथपुरी-पर्यंत आडव्या-उभ्या देशांतील सर्व क्षेत्रें पवित्र स्थानें म्हणून आदरणीय ठरविलीं. ह्या क्षेत्रांत पुन्हा विशेष हा आहे कीं, एकच क्षेत्र हिंदु आणि बौद्ध अशा भिन्न पंथांना सारखेंच पूज्य व्हावें! क्षेत्रांतील क्षेत्र अशी जी काशी ती जशी हिंदूंना पूज्य तशीच जवळील बुद्धाच्या पदरजांनीं पवित्र झालेली सारनाथाची भूमि ही बौद्धांना पूज्य. गया हें तीर्थक्षेत्र बुद्धाची जन्मभूमि म्हणून बौद्धांना जसें परमपवित्र, तसें पूर्वजांना पिंड अर्पण करण्याचें स्थान म्हणून हिंदूंना पवित्र. सीलोन-मधील आदामचें शिखर या नांवानें जें स्थान सध्यां ओळखलें जातें तें हिंदु, बौद्ध व मुसलमान या सर्वांना सारखेंच पवित्र आहे. तेथें विष्णुपदहि आहे आणि बुद्धपदहि आहे. राजगृह हें जसें तेथील सप्तपर्णीगुहा वगैरेमुळें बौद्धांना आदरणीय आहे तसेंच तें जरासंधाची भूमि म्हणून हिंदूंनाहि कौतुकभूमि आहे.

## उग्रमंगल महादेव

संग्राहकबुद्धीची सर्वांत कठीण कामगिरी म्हणजे परकीय दैवतें

स्वीकारणें ही होय. आर्य आणि अनार्य एकत्र नांदू लागल्यावर अनार्यांचीं दैवतें स्वीकारण्याचा प्रश्न आर्यांपुढें प्रामुख्यानें असला पाहिजे. अनार्यांचा प्रमुख देव शिव व त्याचें प्रतीक लिंग. या देवांच्या उपासकांचा वैदिककाळीं शिश्नदेव म्हणून उपहास करण्यांत येत असे. पण दोन्ही समाजांना एकत्र नांदणें अपरिहार्य ठरल्यावर व विशेषतः आर्यांनीं अनार्य स्त्रियांशीं विवाह करण्याचा उपक्रम सुरू केल्यावर, अनार्यांच्या दैवतांची पूजा घरातच शिरली असली पाहिजे. पण एकेकाळीं या देवतेविषयीं वैदिक आर्यांची काय भावना होती व तिचा स्वीकार करण्यास काय खळखळ माजली असली पाहिजे याचें चित्र दक्ष-यज्ञाच्या कथेंत स्पष्ट वठलेलें आढळतें. दक्षानें यज्ञ केला त्या प्रसंगीं सर्व देवांना हविर्भाग घेण्यास आवाहन केलें. फक्त शिवाला मात्र मुद्दाम टाळलें. हें शिवाला कळलें तेव्हां तो रागानें संतप्त होऊन दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस करण्यास निघाला. इकडे दक्ष हरिणाचें रूप धारण करून पळूं लागला. शिव पाठीमागें धावला. धावतांना मध्यें आलेल्या सवित्याचे त्यानें हात उपटले, पूषाचें थोबाड फोडलें, भगाचे डोळे काढले; असा मोठा उच्छेद मांडला. अंतीं दक्षानें शिवास हविर्भाग देण्याचें कबूल करून संतुष्ट केलें. एकदां या दैवताला प्रवेश मिळाल्यावर पुढें तर त्यानें एवढें स्थान पटकाविलें कीं, तो देवांचा देव, सर्वश्रेष्ठ महादेव होऊन बसला! महाभारतांत शिवसहस्त्रनाम आलें आहे. त्यांत या देवतेचीं चरुचेली, मिलीमिली अशीं अनार्य नांवेंही स्वीकारण्यांत आलीं. आणि सर्वांत म्हणजे शिवाची पूजा करण्याच्या वृत्तीचा अधिकार अनार्य गुरव यांस आहे हेंहि मान्य करण्यांत आलें. श्रीशैल पर्वतावर तर अशी रूढि आहे, कीं पारिया नांवाच्या निकृष्ट गणल्या गेलेल्या लोकांनीं प्रथम पूजा केल्यावरच मग ब्राह्मणादिकांनीं देवालयांत प्रवेश करावयाचा. अनार्यांचा हा देव स्वीकारतांना वैदिक वाङ्मयांत आधींच असलेला उग्र स्वरूपी देव जो रुद्र त्याची सांगड घालण्यांत आली. वेदामध्येंच रुद्र ही उग्र

स्वरूपाची देवता आहे. या देवतेशीं अनार्यांचा शिवाचा मिलाफ होऊन स्मशानवासी, नरमुंडमालाधर, पण देवाधिदेव व उदारधी असें विरोधाभासात्मक स्वरूप तिला प्राप्त झालें.

असो. वरील धावत्या वर्णनावरून आजच्या आपल्या संस्कृतींत भिन्नभिन्न वंशांच्या समाजांचे आचारविचार, देवदैवतें, शास्त्रविद्या यांचा कसा मिलाफ करण्यांत आलेला आहे, व तो करीत असतां संग्राहकता व सहिष्णुता या वृत्ति कशा रुजल्या आहेत हें लक्षांत येईल. खंडतुल्य अशा या आपल्या देशांतील अफाट समाजाला एका सूत्रांत गोवण्याची ही कामगिरी सहजसाध्य नव्हती. गंगा-यमुनेच्या मधला चिमुकला दोआब येवढीच काय ती पवित्रभूमि येथून सुरुवात करून अंतीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा सर्व देश हा पवित्र होय असें ठरविण्यांत आलें; येवढेंच नव्हे, तर ती कल्पना मनांत रुजावी म्हणून व देशाची प्रत्यक्ष ओळख व्हावी म्हणून यात्रेमध्यें भिन्नभिन्न स्थलींच्या सप्तपुरी, बारा ज्योतिर्लिंगें, वगैरे गोवून दिल्या. भिन्नभिन्न समाजांना कधीं विश्वामित्राचे पुत्र म्हणून, कधीं व्रात्य म्हणून, कधीं संकरोत्पन्न म्हणून एकसमाजसूत्रांत ओवण्यांत आलें. देवदेवतांच्या बाबतींत तुलसी, अश्वत्थ यांसारख्या वृक्षदेवता; नाग, गायत्री सारख्या पशुदेवता असल्यांचा समावेश केला. अधिकारभेदाच्या प्रमेयानें भिन्न तत्त्वज्ञानपंथाचें एकीकरण केलें. प्रांतोप्रांतीं निरनिराळ्या भाषा चालू असतांहि अखिल भरतखंडांतील सुशिक्षितांची नागर भाषा म्हणून संस्कृत भाषेची निष्ठेनें जोपासना करण्यांत आली. आणि हा एकीकरणाचा प्रयोग चालू असतां, समाजधारणेचें एक श्रेष्ठ तत्त्व जें सहिष्णुता ती सहिष्णुता वृत्ति जगांत अन्यत्र कोठेंहि नसेल अशी खोल रुजविण्यांत आली. ही कामगिरी बिनमोल होय....पण...

होय. जीभ अडखळते खरी. काय असेल तें असो, निर्भेळ सद्‌गुण असा जगांत आढळत नाहीं. आढळतें तें गुणावगुणांचें नेहमीं मिश्रण झालेलें आढळतें. एखाद्या गुणाचें संवर्धन करीत असतां त्याच्याशीं संलग्न

असलेल्या दुर्गुणांचेंहि संवर्धन न कळत केलें जावें ही मोठी मनाला टोचणारी गोष्ट होय. आपणांमध्यें सहिष्णुतावृत्तीची योग्य जोपासना करण्यांत आली हें खरें; पण त्याबरोबरच सत्याचा आग्रह धरण्याची वृत्ति नरमावली हें कटुसत्य मान्य केलें पाहिजे. असत्याचा आग्रह अयोग्य असेल; पण अंतःकरणाला पूर्णपणें पटलेल्या सत्याचा आग्रह धरणें, त्याच्याकरितां जननिंदा सोसण्याची किंवा सर्वस्व अर्पण करण्याची तयारी असणें या वृत्तीनें समाजाची प्रगति होत असते. सहिष्णुतेनें समाजांतील घर्षण नाहींसें होतें, पण या सहिष्णुतेच्या वृत्तीला सत्याग्रही वृत्तीची जोड नसेल तर समाजाला स्थिरावस्था प्राप्त होते. आणि तीच अवस्था उत्तर कालीं आपल्या संस्कृतीला प्राप्त झाली. पूर्वाचार्यांनीं अगदीं परस्पर विरुद्ध मतें प्रतिपादलीं असलीं तरी, त्या सर्वांचा कसा तरी समन्वय करावयाचा हा दंडक पडून गेला. धर्मशास्त्र आणि कला यांच्या क्षेत्रांतील द्रष्टे पूर्वींच होऊन गेले, त्यांनीं घालून दिलेले नियम पाळणें एवढेंच आपलें काम अशी वृत्ति बळावूं लागली. राजपद हें पूर्वसुकृताचें फळ मानलें जाऊन सामान्य जनता राजकारणाविषयीं उदासीन झाली. संग्राहकवृत्तीमुळें भिन्नभिन्न समाज एकत्र नांदूं शकले हें जितकें खरें तितकेंच हेंहि खरें कीं ते एकत्र नांदले तें, एकमेकांशीं समरस होऊन नांदले असें नव्हे. भिन्न समाज एकत्र येतात तेव्हां ते तत्काळ एकरूप होणें अशक्यच असतें. कांहीं काल ते स्वतंत्र जातीच्या रूपानें रोटीबंद, बेटीबंद असेंच राहणें स्वाभाविक असतें. मात्र कालांतरानें परस्परसहवासानें त्यांच्या आचारविचारांतील अंतर कमी होत जाऊन ते एकरूप व्हावयास पाहिजेत; पण जातीची जन्माशीं सांगड घातली गेल्यानें ही एकीकरणाची क्रिया कायमची स्थगित झाली. अशा समाजांतील विविध गट शेजारीं शेजारीं सहिष्णुतेनें नांदले. तरी त्या समाजांत जुटीची पिळदार भावना निर्माण होत नाहीं, विद्या आणि कला या आपल्या गटांतच राखून ठेवण्याची वृत्ति माजल्यानें ज्ञानाचा विकास थांबतो, सांस्कृतिक चैतन्याला मरगळ येते आणि तरतरीत वृत्तीच्या परकीयांशीं प्रसंग आला असतां हा समाज दुर्बल ठरतो. आपल्या समाजाला ही ग्लानीची अवस्था कशी प्राप्त झाली, हेंच आतां पुढील प्रकरणीं पाहूं. म्हणजे पूर्वींची उत्साही वृत्ति पुनः फुलविणें कसें आवश्यक आहे हें स्पष्ट होऊं लागेल.

---

# प्रकरण बारावें

# संस्कृतीचा राजकीय तट कोसळूं लागला

आतांपर्यंत आपल्या पूर्वजांची ऐश्वर्योपासना, त्यांचा विश्वसंचार, त्यांची लोकशाही, त्यांची संग्राहक व सहिष्णुवृत्ति यांचें जें वर्णन केलें तें पूर्वजांच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन पोकळ अभिमानाचें भरतें आणण्याकरितां नव्हे हें ध्यानीं आलें असेलच. तर हा पराक्रम उत्तरकाळीं झाकळून गेल्यानें त्याची स्मृति जागृत करावी व तो पुन्हा स्वतेजानें झळकूं लागेल याची मनोभूमिका तयार व्हावी म्हणून. याच कारणास्तव इतिहासाला विचारीत ज्या पद्धतीनें आपण आतांपर्यंत स्वाभिमानाला स्फुरण देणाऱ्या कार्यक्षेत्रांतून धावता संचार केला, त्याच पद्धतीनें आतां उत्तरकालीन पडत्या कालच्या क्षेत्राची धूळ भेट घेऊं या. म्हणजे एके काळीं जगताचें विद्यापीठ म्हणून मिरविणारी आपली मायभूमि आज हीन दीन कां झाली व पाश्चात्य संस्कृतीशीं टक्कर द्यावयाची असल्यास आपणांतील पूर्वीचे कोणते गुण तिनें पुन्हा उजळले पाहिजेत ह्याचा कांहींसा उमज पडेल.

या विषयाकडे वळतांना अगदीं प्रथमच लक्ष वेधलें जातें तें संस्कृतीच्या राजकीय अंगाकडे. आजच्या आपल्या दुर्बलावस्थेंतील मनाला टोचणारें प्रमुख शल्य म्हणजे राजकीय स्वातंत्र्याचा अथवा स्वराज्याचा अभाव हें होय. शिवाय कोणत्याही संस्कृतीचें व समाजघटनेचें राजकारण हें संरक्षक कवच आहे. तें शाबूत नसेल तर आंतील भागांना नेहमीं टोचा सहन कराव्या लागतील. संस्कृतीचा प्रवाह संथ व निर्मल वाहत राहावयाचा असल्यास तिचे संरक्षक तट जें राजकारण तें कणखर अभेद्य राहिलें पाहिजे, कोसळून उपयोगी नाहीं. तें कसें कोसळूं लागलें इकडेच आतां प्रथम वळूं या.

प्रथमच हें सांगितलें पाहिजे कीं, कोणत्याहि कालखंडाकडे नजर टाकली तरी शौर्याचा लोप झाला होता असें आढळत नाहीं; शौर्य भरपूर होतें; पण या शौर्याच्या वाफेला स्वाभिमान, शिस्त, संयम, जागरूकता, मुत्सद्देगिरी यांनीं कोंडल्यानें प्रचंड शक्ति निर्माण होत असते. हें करण्याचें तंत्र मात्र शिथिल होत चाललें होतें.

या शैथिल्यावस्थेचा काल गेल्या सुमारें हजार वर्षांचा मानतां येईल. येवढ्या दीर्घ कालखंडांत आपल्या संस्कृतीची अवस्था शेवाळलेल्या जलाशयाप्रमाणें झालेली आहे. या स्थिरावस्थेला प्रारंभ आठव्या शतकापासून सामान्यपणें झाला असें मानण्यास हरकत नाहीं. या कालखंडांतील हर्षापासून मुसलमानी स्वाऱ्यांपर्यंतच्या कालांत कनोजच्या मिहिरभोज व धारचा पंडितराज भोज वगैरे कांहीं प्रथितयश राजे होऊन गेले. भोजांच्या दरबारीं वाङ्मयकलादींना चांगलाच बहर आला. याच कालांत अनेक रजपूत घराणीं उदयास आलीं. त्यांची हातावर शिर घेऊन लढण्याची धाडसी व त्यागी वृत्ति इतिहासांत अमर होऊन राहिलेली आहे. हें शौर्य वायां गेलें असेंहि नव्हे. युरोपांत सर्वत्र अप्रतिहत संचार करणाऱ्या मुसलमानांच्या टोळधाडीला सिंधू नदीवर कांहीं काळ तरी थोपविण्यांत आलें तें या रजपुती शौर्यामुळेंच. हा काळहि थोडाथोडका नव्हे, तर चांगला चार पांच शतकांचा काळ होय. हिंदुस्थानावर मुसलमानांची पहिली स्वारी झाली ती सिंधमधील महंमद कासीमची इ.स.७१२ मधील होय. आणि पृथ्वीराज चव्हाणाचा पराभव होऊन मुसलमानांचे पाय हिंदभूमींत कायमचे रोवले गेले ते इ. स. ११९२ मध्यें. एवढ्या मोठ्या म्हणजे सुमारें पावणेपांचशें वर्षांच्या काळांत मुसलमानी हल्ल्यांना अव्याहत तोंड कोणी दिलें असेल तर तें बाप्पा रावळ याच्या शूर बच्चांनीं. पण चारशें वर्षें झगडून का होईना, इस्लामी चांद भरतभूमींत रोवला गेला आणि रजपुती शौर्य त्याच्याखालीं गाडलें गेलें तें गेलेंच! परकीय हल्ले परतून लावण्याची धमक व कला हिंदूंना पूर्वीं अवगत

नव्हती असें नव्हे. यवन, शक, हूण वगैरे परकीयांनीं भरतभूमीवर पूर्वी अनेक हल्ले चढविले होते. कांहींनीं येथें कांहीं राज्येंहि केलीं. पण भारतीय संस्कृतीचा प्रवाह स्थिर व मंद होण्याइतकी त्यांची पकड कधींच घट्ट बसली नाहीं. कांहींचे हल्ले तात्काळ परतविले गेले व कांहीं परकीय राजांना आपल्या संस्कृतींत जिरविले गेले. पण हर्षानें जो हूणांचा हल्ला परतविला त्यानंतर परकीयांचा जोर जो वाढत गेला तो परत रेटण्याची धमक दिवसेंदिवस क्षीण होत गेली. बाराव्या शतकापर्यंत रजपुतांनीं चार-पांच शतकें टकरा दिल्या; पण अंतीं त्यांची धमक बोथट ठरली. रजपुतानंतर सतराव्या अठराव्या शतकांत मराठ्यांनीं पुनश्च नेटाचा प्रयत्न केला व मुसलमानी अंमल बहुतेक झुगारूनहि दिला. आणि हा लढा मराठे व मोगल यांमध्येंच राहतां तर कदाचित् मराठ्यांचें साम्राज्य अखिल भरतखंडभर पसरलें असतें. पण ही क्रिया अर्धीमुर्धी होते न होते तोंच त्यांची अशा जबरदस्त शत्रूशीं गाठ पडली कीं, त्याच्यापुढें मराठे शतक अर्धशतक-हि टिकाव धरूं शकले नाहींत. पौर्णिमेच्या रात्रीं चंद्रबिंब क्षितिजावर मिरवूं लागलें न लागलें तोंच त्याचा खग्रास व्हावा असा प्रकार झाला !

ही दुर्बल अवस्था, हें तमोयुग, अशा रीतीनें चांगलें दहा-बारा शतकांवर पसरलेलें आढळतें. या अंधकारांत मधून मधून कांहीं नरवीर, कांहीं पंडित, कांहीं महात्मे, चमकतांना आढळतात. पण त्यांच्या चमकण्यानें सभोंवतीं दाट पसरलेल्या अंधकाराची जाणीव मात्र तीव्र होते. महंमद गझनीच्या स्वाऱ्या सुरू होण्यापूर्वी सिंध, गुजराथ या सरहद्द प्रांतांवरील मुसलमानांच्या स्वाऱ्या सोडल्या असतां, बाकीच्या भरतखंडाला सुमारें पांच शतकें पूर्ण शांतता लाभलेली होती. हूणांच्या मिहिरगुलाचा पराभव इ. स. ५२८ मध्यें झाला व महंमद गझनीच्या स्वाऱ्या अकराव्या शतकांत सुरू झाल्या. या मधल्या शतकांत मध्यभरत-भूमीला परकीयांचा उपसर्ग मुळींच पोंचला नाहीं. पण या शांततेच्या

काळांत राजकीय संघटना दृढ होण्याऐवजीं शैथिल्यच माजलें. सम्राट् हर्षवर्धनासारखा प्रतापी राजा लुप्त झाल्यानंतर सर्वत्र लहान लहान राज्यें शिरजोर झालीं, व त्यांची नेहमींची एकमेकांतील यादवी सुरू झाली. येथून पुढें चार-पांच शतकें रजपूत वीर परकीयांशीं झुंजत राहिल्यानें सिंध व गुजराथ या सरहद्दीवरील प्रदेशापलीकडे इस्लामी चांद पोंचलेला नव्हता. बाकीच्या मध्यभारतांत परकीय उपसर्ग मुळींच पोंचत नव्हता. तथापि ह्या काळांत राजकीय संघटना करण्याइतका मोठा सम्राट् कोणी झाला नाहीं. पुढें मुसलमानी स्वाऱ्यांचे प्रथम हल्ले व नंतर स्थिरसत्ता सुरू झाल्यावर चौदाव्या शतकांत विजयानगर येथें व सतराव्या शतकांत महाराष्ट्रामध्यें स्वराज्यसंस्थापनेचे यशस्वी उद्योग झाले. पण बिजेची कोर दिसते न दिसते तोंच अंतर्धान पावावी तसा प्रकार या दोन्ही ठिकाणीं झाला.

ही अद्‌भुत घटना घडून आली कशी ?

## अवनतीची मीमांसा

शतकानुशतकें वैभवाच्या शिखरावर असलेले भारतीय हे अकराव्या शतकांत मुसलमानांच्यापुढें व पुन्हा एकोणिसाव्या शतकांत इंग्रजांपुढें हतबल कसे झाले हा प्रश्न जितका कुतूहलोत्पादक तितकाच अवघडहि आहे. तो अवघड असला तरी पाश्चात्यांची मगरमिठी जोंवर माने-भोंवतीं काचत आहे तोंवर कोणत्या दोषामुळें आपण हतप्रभ झालों व कोणत्या गुणामुळें पाश्चात्य विजयी झाले याची, जमेल तितकी मीमांसा करणें हें संस्कृति-संगमावरील विवेचनाचें एक अपरिहार्य अंग होऊन बसतें. या प्रश्नाचें उत्तर कोणत्या एखाद्या विशिष्ट उपपत्तीनें अथवा एखाद्या सूत्रमय कल्पनेनें देणें कठीण आहे. राष्ट्रांचे उत्कर्षा-पकर्ष हे क्षणिक, तात्कालिक घटनांनीं ठरत नसून त्यांचीं पाळेंमुळें भोंवतालच्या परिस्थितींतील स्थलकालांत दूरवर रुजलेलीं असतात. तीं उकलून पाहावयाचीं म्हणजे प्रत्यक्ष रणांगणावर चमकणारी क्षात्र-

संपत्ति जशी पारखावी लागते, तसेंच त्या क्षात्रसंपत्तीला जिवंत ठेवणारी सामाजिक घटना, आर्थिक व्यवहार व धर्मकल्पना ह्याहि पारखाव्या लागतात. या सर्वांचा एकसमयावच्छेदेंकरून विचार केला, व तो करूनहि पुन्हा आजच्या काळच्या कल्पना पूर्वींच्या काळीं लावण्याची चूक न करण्याविषयीं सावधगिरी बाळगली, तरच राष्ट्राच्या किंवा संस्कृतीच्या उन्नति-अवनतीची कांहीं स्थूल उपपत्ति बसवितां येईल. पैकीं दुसरी गोष्ट कठीण आहे हें कबूल केलें पाहिजे. कारण प्राचीन इतिहासाकडे पाहतांनाहि आजच्या कल्पना आपण सर्वस्वीं विसरूं शकत नाहीं. यामुळें कोणी कोणी तर असें प्रतिपादन करितात कीं, पूर्वजांचीं कृत्यें तेवढीं जशींच्या तशीं नुसतीं वर्णन करावीं, त्यांच्या गुणदोषमीमांसेंत शिरूं नये. पण नुसत्या कोरड्या निर्लेप घटनाच वर्णावयाच्या तर असला अळणी इतिहास लिहावयाचा कशाला व वाचावयाचा तरी कशाला? मागल्यास ठेच पुढचा शहाणा असा कांहीं हेतु इतिहासाच्या परिशीलनांत गृहीत धरलेलाच असतो. तरी आपल्या संस्कृतींत उत्पन्न झालेले दोष म्हणून जे आज आपणांस भासतात त्यांची चर्चा करण्यास कचरण्याचें कारण नाहीं.

राजकीय स्वातंत्र्य हें संस्कृतीचें संरक्षक कवच असल्यानें प्रथम त्याकडे लक्ष देऊं या.

भारतीय संस्कृतीविषयीं विपर्यस्त कल्पनांनीं घेरल्यामुळें पाश्चात्य पंडित केव्हां केव्हां मोठीं चमत्कारिक अनुमानें बांधीत असतात. सिंध-मधील उत्खननांत प्राचीन शहरांचे जे अवशेष आढळले आहेत त्यांत शहराभोंवतीं तटबंदी आढळली नाहीं त्यावरून गोल्ड नांवाच्या एकानें अनुमान काढलें कीं, यांच्यामध्यें युद्धें कधीं होतच नसावींत. पण हें तर मनुष्यस्वभावाशीं विसंगत दिसतें; तेव्हां पुढें तर्क असा चालविला कीं, फार प्राचीन कालींच या लोकांनीं अशी कांहीं युगत शोधून काढली असावी कीं, हिंसा म्हटली कीं मनाला स्वाभाविक अन्तःप्रेरणेनेंच शिसारी वाटावी. आपणां आधुनिकांमध्यें आपपरभाव

व व्यक्तिमत्व ह्यांची अतिरिक्त वाढ झाली आहे; पण भारतीय मनाची घडी अशी बसली होती कीं, त्यांत आपपरभावच लुप्त झाला होता. मग कोणी कोणाविरुद्ध लढावें? (जोड-स्टोरी ऑफ इंडियन सिव्हिलिझेन, पृ. १०५). हिंदुस्थानविषयक विचित्र कल्पनांचा नमुना येवढीच या तर्कप्रणालीची किंमत. अधिक उत्खननानंतर तटबंदीचा अवशेषहि उपलब्ध झाला आहे एवढें सांगितलें म्हणजे पुरे.

क्षात्रवृत्ति ही भारतीयांच्या रक्तामध्येंच नाहीं असें प्रतिपादन करण्याचा वरच्यासारख्यांचा एकंदरीनें रोख असतो. पण क्षात्रवृत्तीच हिंदूमध्यें कमी दर्जाची होती हें कारण मुळींच टिकण्यासारखें नाहीं. जिवाची बेपर्वा आणि सर्वस्वाचा त्याग हीं जीं अव्वल दर्जाच्या क्षात्रवृत्तीचीं लक्षणें, तीं रजपुतांच्या कोणत्याहि लढाईत उत्कटत्वानें पाहावयास मिळतील. किंबहुना, शेवटीं रजपुतांना हार खावी लागली असली तरी त्यांनीं सतत पांचशें वर्षें मुसलमानांचे अनेक हल्ले परतविले व अनेक वेळां त्यांना दातीं तृण धरावयास लावलें याची इतिहासाला चांगलीच दखलगिरी आहे. इस्लामची पहिली धाड हिंदुस्थानवर आदळली ती इस्लामी धर्माचें रक्त ऐन ताजें होतें त्या वेळीं. महंमद पैगंबर मक्केहून जिवानिशीं पळून मदिना येथें आला तेव्हांपासून म्हणजे इ. स. ६२२ पासून अरबांच्यामध्यें नवतेज संचरूं लागलें. या तेजानें बेहोष होऊन आणि लुटीच्या लालसेनें हपापून त्यांनीं हजारों मैल प्रदेश जिंकला व अवघ्या एका शतकांत म्हणजे इ.स.७१२ मध्यें महंमद कासीमनें सिंधवर स्वारी केली. त्याच्यानंतर येणाऱ्या जुनैदानें हिंदुस्थानांत दूरवर सैन्यें पाठविलीं. पण उज्जनीकडे जाणाऱ्या सैन्याला प्रतिहारांच्या नागभट्टानें धूळ चारली, आणि गुजराथेंतील मोहिमेचा बदामीच्या चालुक्यांचा मांडलिक पुलकेशी यानें धुव्वा उडविला व 'दक्षिणापथस्वाधारण' व 'अनिवर्तकनिवर्तयितृ' अशीं बिरुदें मिळविलीं. पुढील म्हणजे नवव्या शतकांत कनोजच्या प्रतिहारी घराण्यांत मिहिरभोज नांवाचा मोठा

पराक्रमी राजा होऊन गेला. त्याच्या कारकीर्दींत तर मुलतान आणि काबूल येथील इस्लामी राजांनीं त्याचें अधिराज्यत्व मान्य केलें होतें. पुढें दहाव्या शतकांत मथुरेच्या गहडवाल घराण्यांतील गोविंदचंद्रानें गझनीच्या अमीरांचा दोनदां पराभव केला. इतकेंच नव्हे, तर मुसलमान प्रजेवर त्यानें तुरुष्कदंड नांवाचा करहि बसविला. पंजाब व राजपुताना येथील चाहमान घराण्यापैकीं अर्णो राजानेंहि मुसलमानांस हात दाखविला. या विजयाचें स्मारक म्हणून बांधलेला तलाव आनासागर या नांवानें आजहि अजमीरास पाहावयास मिळतो. यानंतर इ. स. ११६४ मध्यें विशालदेव राजानें मुसलमानांचा पराभव केला. पुढें गझनीच्या शहाबुद्दीन घोरीच्या स्वाऱ्यांस सुरुवात झाली. त्या वेळींहि इ स.११७८ मध्यें अबूच्या पहाडाजवळ गुजराथच्या भीमदेव सोळंकीनें शहाबुद्दिनाला असा लोळविला कीं, त्यानें हाय घेऊन पुढें बारा वर्षें हिंदुस्थानचें नांव सोडून दिलें. बारा वर्षांनीं फितुरीचा फायदा घेऊन पुन्हा त्यानें स्वारी केली त्या वेळीं तर तो पृथ्वीराजाच्या तावडींतच सापडला.

चार-पांचशें वर्षांतील या त्रोटक जंत्रीवरून या कालांतहि भारतीयांची क्षात्रवृत्ति मलिन झाली नव्हती हें स्पष्टच आहे. तें अधिक स्पष्ट होण्याकरितां हेंहि आणखी लक्षांत घ्यावें कीं, ज्या या चार-पांच शतकांत भारतीयांनीं इस्लामियांना येथें थारा देऊं दिला नाहीं, त्याच चार-पांच शतकांत युरोपिअन राष्ट्रांना या इस्लामी घडाडीपुढें सर्वत्र गुडघे टेकावे लागले होते आणि बगदादपासून स्पेनपर्यंत इस्लामी चांद अप्रतिहत फडकतांना उघड्या डोळयांनीं पाहावा लागला होता. यावरून इस्लामी योद्ध्यांपेक्षां भारतीयांचें क्षात्रतेज अद्याप हीनप्रभ झालेलें नव्हतें हेंच दिसून येईल.

मुसलमानांची राहणी थंड हवेंतील म्हणून ते हाडापेरानें अधिक निकोप, त्यांचा आहार मांसयुक्त अतएव अधिक सकस व पौष्टिक वगैरे गोष्टींचा उल्लेखहि या पराभवमीमांसेंत करण्यांत येतो. पण

त्यांत फारसें तथ्य नाहीं हें, या मुसलमानांच्यापुढें, समान आहार-विहारांनीं युक्त असे जे युरोपियन ते टिकाव धरूं शकले नाहींत, एवढ्यावरूनच दाखवितां येईल. हिंदूंच्या गजदळापेक्षां मुसलमानांचें घोडदळ अधिक कार्यक्षम होतें हें विधानहि सामान्यतः खरें असलें तरी, इतिहासावरून पाहतां हिंदूंच्याजवळ घोडदळ नव्हतें असेंहि दिसत नाहीं. आणि देवदत्तपंत भांडारकर लिहितात कीं (ॲनल्स, खंड १०) मुसलमानांनीं हत्तीवर बहिष्कार घातल्याचेंहि आढळत नाहीं. कारण महंमद गझनीनें तार्तर इलखखान याचा पराभव केला तो सर्वस्वीं गजदळाच्या जोरावर. आणि वर उल्लेखिलेल्या चाहमान व सोळंकी राजांनीं मुसलमानांना चीत केलें तें घोडदळाच्या साहाय्यानें. गुर्जर म्हणजे कनोजचे प्रतिहार राजे यांच्याजवळचें घोडदळ तर एवढ्या श्रेष्ठ प्रतीचें होतें कीं, सुलेमान नांवाच्या व्यापाऱ्यानें इ. स. ८५१ मधील आपल्या प्रवासवृत्तांत कनोजच्या प्रतिहार राजांविषयीं लिहिलें आहे कीं, त्यांच्याजवळ उंट आणि घोडे अगणित असून इतकें उत्कृष्ट घोडदळ दुसऱ्या कोणा राजाच्या पदरीं नाहीं.

धार्मिक कडवेपणाचा मात्र थोडा फायदा मुसलमानांना मिळाला. लूट मिळेल तिचा एक ठराविक भाग सर्व सैनिकांत वाटून देण्यांत यावा असा इस्लामी सैन्यांत सामान्यतः दंडक असे. पण इस्लामी सैनिकांचा लुटीवर मुख्य डोळा असला तरी, धार्मिक भावनेचें तिला साहाय्य होत असे एवढें मात्र कबूल केलें पाहिजे. कारण मुसलमान हे प्रथम प्रथम तरी काफराच्या बाजूनें स्वतःच्या धर्मबांधवांविरुद्ध लढण्याचें नाकारीत. सिंधच्या दाहर राजाच्या हाताखालीं ५०० अरब लोकांची एक तुकडी असून तिचा नाइक अलाफी नांवाचा अरब होता. त्याला दाहरनें महमद कासीमविरुद्ध लढण्यास आज्ञा केली असतां त्यानें उलट जबाब दिला कीं, आम्ही मुसलमान असल्यानें इस्लामच्या सैन्याविरुद्ध आमची तरवार म्यानांतून बाहेर निघणार नाहीं ! ती निघेल तर आम्ही नरकांत जाऊं ! असें म्हणून

तो आपली तुकडी घेऊन निघून गेला (मध्ययुगीन भारत, भाग १ ला). तसेंच तालिकोटच्या लढाईत विजयनगरच्या रामरायाच्या फौजेंत मुसलमानी पथकें होतीं; त्यांनीं तर आयत्या वेळीं शत्रूस मिळून ज्याचें अन्न खाल्लें होतें त्याला सपशेल तोंडघशीं पाडलें. स्वधर्मबांधवा-बरोबर लढणें हें नरकांत लोटणारें आहे अशी अहर्निश शिकवण मुसल-मानांना मिळे त्याचा परिणाम झाल्याविना कसा राहणार? पण मुसल-मानांची ही वृत्ति उमगल्यानंतरहि तिच्या प्रतिकारार्थ तत्सदृश शिकवण हिंदु धर्ममार्तंडांनीं आपल्या धर्मांत समाविष्ट केली नाहीं. सैनिकांना लढण्यास उत्साह वाटावा म्हणून 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं', 'रणांगणावर मृत्यु आला असतां स्वर्गलोक प्राप्त होतो' ही भगवद्गीतेंतील घोषणा जशी सापडते, किंवा अन्नदात्याच्याकरितां जो लढणार नाहीं त्याची उत्तर-क्रिया शास्त्रोक्त होणार नाहीं व तो नरकांत पडेल; 'नवं शरावं सलिलस्य पूर्णं सुसंस्कृतं दर्भकृतोत्तरीयं। तत्तस्य मा भून्नरकं च गच्छेद्यो भर्तृपिंडस्य कृते न युद्धेत्।' (चाणक्य १०।३) अशा प्रकारची शिकवण जशी पूर्व-वाङ्मयांत सापडते, तशी इस्लामी अनुभवानंतर स्वधर्मीयांविरुद्ध लढणें हें पाप होय अशी नवी शिकवण समाविष्ट व्हावयास हवी होती. जीवन-कलहांत टिकाव धरावयाचा तर ज्यांच्याशीं कलहाचा प्रसंग येईल त्यांचें सामर्थ्य, शस्त्रांचें आणि मनोवृत्तीचें, ज्या प्रकारचें असेल त्याला पुरून उरेल असें आपलें सामर्थ्य सिद्ध करावयास हवें होतें, पण तें झालें नाहीं.

## स्थायिक विरुद्ध भुरटे

धार्मिक कडवेपणा सोडला तर जो एक दुसरा कडवेपणा या आरब, पठाण, तार्तर, अफगाण वगैरे लोकांच्या अंगीं होता तो तर अधिक विचारार्ह आहे. या कडवेपणाला भटक्या, लुटारू, पोटार्थी, बेफाट लोकांचा रानवट कडवेपणा म्हणतां येईल. मध्यआशियामध्यें एके काळीं अशा लोकांचा एक मोठा जमाव तयार झाला होता. या लोकांना विशिष्ट अशी संस्कृति नव्हती, विशिष्ट परंपरा नव्हती. कलाकौशल्य किंवा

व्यापार-उद्योग वगैरेंत रमणाऱ्या स्थिर जीवनाची आवड नव्हती, नीति-अनीतीच्या कल्पनांचीं बंधनें नव्हतीं. मुसलमानी धर्माचा ते अभिमान बाळगीत तो फक्त लुटीला आणि क्रौर्याला समर्थनपर म्हणून. महंमद कासीमला सिंधमधील लोकांनीं आपला जीव वांचविण्याबद्दल विनवणी केली तेव्हां तो स्पष्ट उद्गारला कीं, "माझ्या धर्माची आज्ञा आहे ती कत्तल करण्याची, जीव वांचविण्याची नव्हे." या लोकांचा खरा अल्ला म्हणजे तरवार, खरा धर्म क्रौर्य, खरें जीवन म्हणजे लूट! जिकडे लूट मिळेल तिकडे टोळधाडीसारखी धाव घ्यावयाची ही वृत्ति. लूट भरपूर असेल तर तिकडेच लूट संपेपर्यंत रमावें. परत अमुक देशाला यावयाचें असें मातृभूमीच्या कल्पनेचें बंधन नाहीं. राज्य स्थापण्यास सापडलें तर तेथेंच बैठक मारावी, नाहीं सापडलें तर लूट करावी. नित्य नवी लूट कोठें मिळेल तिकडे दृष्टि. स्थिर, बैठ्या आयुष्याचें पूर्ण वावडें, उद्यांची फिकीर नाहीं, प्राणाची पर्वा नाहीं अशी नंगी वृत्ति. मध्यआशियाच्या पठारावरून हिंदुस्थानांत उतरणारे लढवय्ये आरब, अफगाण या प्रकारच्या नंग्या, लुटारू, पोटभरू वृत्तीचे होते. आरब इराणांतून बाहेर पडले, ते त्यांच्या डोंगराळ राकट मुलखांत अन्न आणि पाणी या दोहोंचीहि टंचाई होती म्हणून. खलीफाच्या अमलाखालीं इस्लामी संस्कृतीला थोडें स्थिरपणाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. पण तेथून बाहेर पडून हिंदुस्थानांत नशीब काढण्याकरतां येणारे वीर हे प्रायः लुटारू आणि नंग्या वृत्तीचे होते. आणि या नंग्या वृत्तीच्या जोडीला त्यांच्यांत लष्करी शिस्त होती आणि भडिमार यंत्रें, जळते बाण व बाबरच्या काळीं तोफखाना अशीं हत्यारें होतीं.

अशा नंग्या लोकांशीं सामना द्यावयाचा झाल्यास मातबर संस्कृतीच्या राष्ट्राला मोठेंच अवघड होऊन बसतें. निर्लज्ज फटक माणसाशीं गाठ पडली म्हणजे संभाविताला त्याच्यापुढें हात टेकावे लागतात, किंवा गांवकीमध्यें प्रामाणिक व नेकीच्या माणसांना गांवगुंडांच्यापुढें नमतें घ्यावें लागतें हा व्यक्तीच्या व्यवहारांतला अनुभव सर्वांना

असतोच. हाच अनुभव उपटसुंभ, भुरट्या लष्करी टोळ्यांशीं प्रसंग आला असतां प्रतिष्ठित राष्ट्राला येतो.

हा अनुभव जसा हिंदूंना आला तसा तो रोमन राष्ट्रालाहि पूर्वी आला होता. इसवी सनाच्या चौथ्या शतकांत रोमवर उत्तरेकडील ज्या टोळ्या हल्ले चढवूं लागल्या, त्या रोमन संस्कृतीशीं तुलना करतां, ज्यांना रानटी म्हणतां येईल अशा भुरट्या लुटारू लोकांच्याच होत्या. त्यांच्यापुढें मातबर अशा रोमन राष्ट्राचा टिकाव लागला नाहीं. प्रचंड राजरस्ते, मैल मैल लांब कालवे, विलासी प्रासाद, विस्तीर्ण साम्राज्य, सुव्यस्थित कायदेकानू ज्यांत आहेत अशी संस्कृति त्यांनीं हजार वर्षांच्या परिश्रमानें उभारली होती. पण उत्तरेकडून जर्मनीवर कोसळणाऱ्या रानटी हल्ल्यांपुढें रणांगणावर ते टिकाव धरूं शकले नाहींत. हजार वर्षें जगाला दरारा दाखविणारें रोम या रानटी लोकांच्या भक्ष्यस्थानीं कसें पडलें याचीं अनेक कारणें इतिहासकारांनीं दिलेलीं आहेत. ती कारणपरंपरा आपणांस येथें पाहावयास नको, तर लढाई आणि लुटारूपणा यांतच निढावलेल्या रांगड्यांपुढें सुसंस्कृत रोमन राष्ट्राला हार खावी लागली एवढेंच पाहावयाचें आहे. गिबन लिहितो कीं, दारिद्र्य आणि प्राणाची बेपर्वा या कारणानें या रांगडे लोकांत एक प्रकारचें सैतानी शौर्य संचारत असतें. त्याचा प्रतिकार करावयाचा तर आपलें लष्करी सामर्थ्य व युद्धपद्धति सुधारल्याशिवाय गत्यंतर नाहीं. त्याच्याकडे ज्यांनीं दुर्लक्ष केलें त्यांना या रांगड्यांचा उपद्रव निमूटपणें सोसावा लागला.

रांगड्यांच्या आक्रमणाचें भय शास्त्रीय प्रगतीनंतर आतां उरलेलें नाहीं. पण रोमवर पूर्वी कोसळली तशी आपत्ति पुन्हा युरोपियन संस्कृतीवर कोसळली तर काय होईल ? पुन्हा रानटी लोकांच्या टोळ्या युरोपवर धडकूं लागल्या तर युरोपची संस्कृति पूर्वीच्या रोमन संस्कृतीसारखीच त्यांच्या भक्ष्यस्थानीं पडेल काय ? असा एक काल्पनिक प्रश्न उपस्थित करून गिबन लिहितो कीं, " यूरोपची स्थिति आतां इतकी

पालटली आहे कीं, पूर्वीसारखा एखादा रांगडा तार्तर वीर आतां दिग्विजय करीत चालून आला तर त्याला रशियांतील दणकट शेतकरी जर्मनींतील बलाढ्य सैनिक, फ्रान्समधील शूर सरदार आणि इंग्लंडांतील निधडी जनता, सर्वांशीं सामने देत यावें लागेल. आणि युरोपला चेपीत चेपीत अटलांटिक महासागरापर्यंत तो आलाच तर दहा हजार बोटींत बसून युरोपिअन लोक या रांगड्यांच्या दृष्टिपार अमेरिकेंत जातील व तेथें आपल्या संस्कृतीचा विस्तार करतील. पण भौतिक शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीमुळें युद्धकला इतकी आमूलाग्र बदलली आहे कीं, रानटी लोकांच्या हल्ल्यांपासून युरोप आतां अगदीं निर्वेध झाला आहे. कारण युरोपचा पराभव व्हावयाचा तर तो युरोपिअनांसारख्या शास्त्रपारंगत राष्ट्राकडूनच तो होऊं शकेल. म्हणजे युरोपचा पराभव करण्यापूर्वी तें राष्ट्र रानटी असूंच शकणार नाहीं." ( Europe is secure from any future irruptions of Barbarians; since before they can conquer they must cease to be Barbarians. )

गिबननें लिहिल्याप्रमाणें सुदैवानें युरोपिअन संस्कृतीला आतां अशिक्षित रांगड्यांची भीति उरलेली नाहीं. पण सुशिक्षित युरोपिअन रांगड्यांच्या टोळधाडेची भीति इतर राष्ट्रांच्यापुढें येऊन बसली आहे त्याची वाट काय? गिबननें वरील मजकूर लिहिला तो १७९७ मध्यें म्हणजे पेशवाईच्या अखेर. योगायोग असा कीं तिकडे गिबन युरोपिअन संस्कृति रानटी लोकांच्या हल्ल्यांपासून निर्धास्त झाली म्हणून समाधानाचा सुस्कारा टाकीत होता, आणि त्याच वेळीं त्याचे सुशिक्षित रानटी देशबांधव हिंदी संस्कृतीचा अपहार करण्यांत गुंतले होते! आपला चालू मुद्दा एवढाच कीं, पूर्वी रानटी रांगड्यांपुढें सुसंस्कृत रोमन राष्ट्राला जसे हात टेकावे लागले तसेच हिंदूंनाहि या इस्लामी रांगड्यांपुढें टेकावे लागले.

## जागरूकतेचा अभाव

पण पराभव कां सोसावा लागला? तर रांगड्या, कपटी, क्रूर, विश्वासघातकी अशांशीं लढतांना नुसतें शौर्य पुरें पडत नाहीं. त्यास जागरूकतेची जोड द्यावी लागते. हिंदूंचें शौर्य वायां जाण्याच्या अनेक कारणांपैकीं हें एक प्रमुख कारण सांगतां येईल. या मुद्द्याच्या अधिक खोलांत शिरलें म्हणजे एकंदर राजकारणच भोंगळ झालें होतें असें आपणांस आढळून येईल. महमूद गझनीचीच गोष्ट घ्या. त्यानें एक नाहीं, दोन नाहीं तर चांगल्या सतरा स्वाऱ्या हिंदुस्थान-वर केल्या! इतक्या स्वाऱ्या करण्याची त्यानें उमेद धरावी हीच आधीं अचंब्याची गोष्ट नव्हे काय? पहिल्या एक-दोन स्वाऱ्या कदाचित् भारतीयांना अचानक वाटल्या असतील किंवा उपेक्षणीयाहि वाटल्या असतील. पण सालोसाल वळवाच्या सरीसारखें मुसलमानी सैन्य जणूं अस्मानांतून उतरल्याप्रमाणें उतरावें, हजारों हिंदूंची त्यानें कत्तल करावी, अगणित जडजवाहीर लुटून न्यावें, आणि बेसावधपणा-मुळें व गाफिलपणामुळें हिंदूंना नुसतें बोटें चावीत किंवा मोडीत बसावें लागावें याचा ग्रंथ कसा लावावयाचा? इतक्या स्वाऱ्या झाल्या तरी त्यांच्या प्रतिकाराची योजना करतां येऊं नये किंवा स्वारी केव्हां येऊन थडकेल याची नुसती वार्ता कळण्याचीहि दक्षता बाळगूं नये या-परतें आश्चर्य कोणतें? मागच्या महायुद्धांत जर्मनीनें विषारी धुराचा प्रथमच प्रयोग केला तेव्हां संयुक्त सैनिक इतके भेदरून गेले होते म्हणतात कीं, या गोष्टीचा प्रतिकार करण्याची कांहीं युक्ति शास्त्रवेत्त्यांना न सुचती तर सैनिकांचा आत्मविश्वास खचला असता आणि युद्धाचा शेवट निराळाच झाला असता. प्रसंग आणीबाणीचा होता. विषारी धुराचें अस्त्र सर्वस्वीं नवें होतें. त्याच्या स्वरूपाची कल्पना संयुक्त सैन्यांतील शास्त्रज्ञांना आगाऊ कांहींच नव्हती. पण शास्त्रज्ञ हताश होऊन अस्मानाकडे डोळे लावून बसले नाहींत तर हें अस्त्र जर्मनीनें

फेकण्यास सुरुवात केल्यापासून अवघ्या महिन्याच्या आंतच त्यावरील तोडगा शास्त्रज्ञांनीं बसविला व अंगावर येणाऱ्या अपयशाला जोराचा ठोसा लगाविला! चालू युद्धांत जर्मनीनें हवाई छत्र्यांनीं सैन्य नेण्याची युक्ति काढतांच वर्षाच्या आंत इंग्लंडनें तोच प्रयोग इटलीवर केला ही आठवण ताजीच आहे. महमूद गझनीच्या स्वाऱ्या तर वर्षानुवर्षे चालल्या होत्या. मग त्याच्या प्रतिकाराची योजना सुचूं नये याचा अर्थ काय? महमूद गझनीच्यापूर्वी सबक्तगिनानें हिंदूंना दोन-तीनदां पराभव चारलाच होता. नंतर महमुदाच्या वार्षिक स्वाऱ्या सुरू झाल्या! पावसाळा संपला कीं गझनींतून बाहेर पडावें, दोन तीन महिन्यांत हिंदुस्थानांतील समृद्ध प्रांतांत उतरावें, आणि अचानक छापा घालून हिंदूंनीं वर्षभर जमा केलेली दौलत हातोहात पळवावी असा क्रम त्यानें कित्येक वर्षे बिनबोभाट चालविला होता. १०१९ मध्यें त्यानें कनोजवर स्वारी केली तेव्हां त्या शहराचे सर्व सात कोट एका दिवसांत त्याला जिंकतां आले. या वेळच्या कनोजच्या राजाचें नांव होतें राजपाल. त्यानें राज्यपालन केलें तें असें कीं, महमूद येतांच त्याला सपशेल शरण जाऊन कनोज सोडून इतरत्र राहण्याचें कबूल केलें! पुढचाहि प्रकार ऐकण्यासारखा आहे. राजपालाचा हा नामर्दपणा पाहून इतर हिंदूंना चीड आली व त्यांपैकीं कांहीं राजे चंदेलच्या गंड राजाच्या हाताखालीं एकत्र होऊन राजपालावर स्वारी करून त्याला त्यांनीं कंठस्नान घातलें. महंमुदाला हा वृत्तान्त कळला तेव्हां आपल्या मांडलिकाला मारलें म्हणून तो संतापला व या प्रकाराचा सूड उगविण्याकरितां त्यानें पुढच्याच वर्षी चंदेलीच्या गंड राजावर स्वारी केली. गंडानें प्रचंड सेना तयार केली, पण महमूद प्रत्यक्ष रणांगणावर येतांच मात्र राजपालावर शूरत्व गाजविणाऱ्या या गंडानें हातपाय गाळले आणि हत्ती, खजिना, डेरे वगैरे सर्व रणांगणावरच सोडून त्यानें तेथून पळ काढला!

अल्लाउद्दिनानें १२९३ मध्यें देवगिरी जिंकली ती देवगिरीकरांच्या

अशाच गाफीलपणानें. अलाउद्दीन दक्षिणेवर स्वारी करणार याची कल्पना रामदेवाला होती इतकेंच नव्हे, तर त्याला रोखून धरण्याकरितां त्यानें आपला मुलगा बिंबदेव यास गुजराथच्या मोहिमेवर पाठविलाहि होता. पण एवढें केल्यावर मात्र रामदेवराव निश्चित बसला असें दिसतें. कारण अल्लाउद्दीन यावयाचा तो आलाच पण प्रत्यक्ष देवगिरीच्या तटाखालीं तो येऊन थडकेपर्यंत राजाला त्याची वार्ताहि नव्हती. ती कळली तेव्हां तो नेहमींप्रमाणें देवदर्शनास चालला होता म्हणे. आठ हजार स्वारांनिशीं अल्लाउद्दीन उत्तरेहून थेट देवगिरीपर्यंत येतो आणि राजधानीच्या तटापर्यंत येईपर्यंत राजाला वार्ता नसतें हें पाहून देवाला तरी काय वाटलें असेल? हेरांची पद्धतीच बंद झाली होती काय? हेर हे राजाचे डोळे होत असें कौटिल्य व कालिदास कंठशोष करून सांगतात. रामदेवराव हा या दृष्टीनें आंधळाच म्हटला पाहिजे. बरें, या स्वारीनें देवगिरीचे राजे शहाणपण शिकले असेंहि नाहीं. बारा वर्षांची खंडणी थकल्यामुळें अल्लाउद्दिनानें मलीक काफर यास पुन्हा देवगिरीवर पाठविलें. या वेळीं मागचा वचपा काढण्याचें तर बाजूसच राहिलें, पण रामदेवरावानें मांडलिकत्व कबूल केलें व दिल्लीसहि गेला. फिरून सहासात वर्षांनीं मलिककाफरानें रामदेवरावाच्या मुलास ठार केलें. या सर्व प्रकरणाचा अर्थ भोंगळपणा अथवा जागरूकतेचा अभाव याशिवाय कसा लावावयाचा.

## भोळसट औदार्य

भोंगळपणाचा दुसरा प्रकार म्हणजे राजनीतीच्या भोळसट, अव्यवहार्य कल्पनांचा. दिल्लीचें सिंहासन मुसलमानांच्या हातीं ज्या हिंदु राजाच्या हातून गेलें त्या पृथ्वीराजाच्या वर्तनाची मीमांसा या प्रकरणीं सहजच सुचण्यासारखी आहे. शहाबुद्दिनाला दिल्लीचें सिंहासन बळकावतां आलें तें पृथ्वीराजाला विश्वासानें कंठस्नान घालून बळकावतां आलें. पण पृथ्वीराजानें मनांत आणलें असतें तर उलट

हाच प्रयोग शहाबुद्दिनावर करण्यास वर्षापूर्वीच पृथ्वीराजास परिस्थिति सर्वस्वीं अनुकूल होती. विश्वासघात करण्याचेंहि कारण नव्हतें. कारण वर्षापूर्वीच प्रत्यक्ष रणांगणावरच पृथ्वीराजानें शहाबुद्दिनाला जिंकलें होतें. त्याचा कायमचा निःपात करण्यांत विश्वासघातहि नव्हता. पण शरण आलेल्यास अभय देणें हें जें आदर्श क्षत्रियाचें कर्तव्य त्या स्वर्गीय उच्चतर किंवा फाजील अहंकाराच्या भरीं पडून पृथ्वीराजानें शहाबुद्दिनाची गय केली. आणि याचा परिणाम काय झाला? तर याच शहाबुद्दिनानें वर्षाच्या आंतच आपल्या उदार, सरल मनाच्या जीवदात्याची स्वर्गांत रवानगी केली! मेवाडचा राणा कुंभ यानेंहि मेवाडचा सुलतान महमूद यास कैद करून चितोडास ठेवलें होतें, पण त्यानेंहि मांडलिकत्व कबूल केल्यावर शत्रूस सोडून दिलें.

असल्या घटनेचा विचार करतांना मन दिङ्मूढ होऊन जातें. पृथ्वीराजानें केलें तें बरोबर केलें कीं त्यानें चूक केली? क्षत्रियाचा जो उच्चतम धर्म म्हणून तो समजत होता त्या आदर्शाप्रमाणें प्रत्यक्ष व्यवहारांत वागण्यांत त्यानें पाप केलें कीं पुण्य केलें? शरण आलेल्यास अभय देणें हा आदर्श क्षत्रियाचा परमोच्च धर्म होय ही जी शिकवण परंपरेनें त्याच्या मनावर बिंबलेली होती, ती त्यानें कृतींत उतरविली ही त्याची थोरवी कीं मूर्खता? पुढील बऱ्यावाईट परिणामाविषयीं पर्वा न करितां नीतीच्या उच्च ध्येयाशीं तो एकनिष्ठ राहिला म्हणून त्याचे गुण गावे कीं अव्यवहार्य नीतितत्त्वाच्या नादीं लागून राष्ट्रघातकी व्यवहार करण्याचा भोळसटपणा केला म्हणून त्याच्या नांवानें खडे फोडावे?

एकंदर घटनेचा विचार करतां या बाबतींत असें स्पष्ट म्हणावेंसें वाटतें कीं, पृथ्वीराजानें मानीव नीतिकल्पनांना स्वतः बळी पडून आपल्या राष्ट्राचाहि बळी दिला! त्यानें पाप केलें तें जाणूनबुजून मुळींच नव्हे. उलट, त्याच्या समजुतीप्रमाणें इतकेंच नव्हे, तर त्या काळच्या प्रचलित समजुतीप्रमाणेंहि त्यानें नीतीचा आदर्शपाठ दिला.

त्याच्या हातून चूक झाली ती त्याला उमगण्यासारखी नव्हतीच मुळीं. पण राष्ट्राच्या भवितव्याचा विचार करतांना पृथ्वीराजाच्या व्यवहाराला चूक न म्हणावें तर काय म्हणावें? पृथ्वीराजाच्या वर्तनाचा दुसराहि हेतु संभवतो तो म्हणजे विजयी जेत्याचा दुर्दम आत्मविश्वास हा होय. एतद्विषयीं 'रजपूत राज्याचा उदय व ऱ्हास' या ग्रंथांत ह. वा. देशपांडे लिहितात कीं, एखाद्या मांत्रिकानें विषारी सापाला सोडावें व धरावें तशीच महत्त्वाकांक्षी जेत्यांची प्रवृत्ति असते (पृ. २१७). पण त्यांनींच पुढें म्हटल्याप्रमाणें असला मांत्रिक शेवटीं बळी पडतो आणि तो मांत्रिक राष्ट्रनेता असेल तर त्याच्या पाठोपाठ राष्ट्र बळी पडतें. शत्रूला नामोहरम करून सोडून देण्यांत जेत्याचें अहंकारदर्पानें समाधान होत असेल; पण असला प्राणघातक खेळ राष्ट्राच्या नशीबाशीं खेळणें योग्य होईल का हाच खरा मुद्दा आहे. तत्सम उदाहरणें म्हणून नेपोलियन व शिवाजी यांचा देशपांडे यांनीं निर्देश केला आहे. म्हणजे नेपोलियन व शिवाजी हे हातीं गवसले असतां त्यांना त्यांच्या शत्रूंनीं ठार केलें नाहीं. मग पृथ्वीराजालाच दोष कां द्यावा असा देशपांड्यांच्या विवेचनाचा रोख आहे. पण नेपोलियनला हेलना बेटांत मृत्यूपर्यंत डांबून टाकलें होतें आणि शिवाजी चोरावर मोर झाला नसता तर त्यालाहि कदाचित् जन्मभर बंदिवासांत खितपत पडावें लागलें असतें. दोन्ही उदाहरणांत डिवचलेल्या सर्पाला मोकळें सोडलें नाहीं हीच महत्त्वाची बाब. पृथ्वीराजाच्या एका चुकीमुळें हिंदुपदपादशाही नष्ट झाली असें म्हणण्याचा हेतु नाहीं; तर पृथ्वीराजासारख्याच्या व्यवहारांत दिसून येणाऱ्या भोळसट मनोवृत्तीकडे येथें लक्ष वेधावयाचें आहे. त्याची चूक ही कीं नीतिनियम हे एकेरी, एकांतिक आहेत असें मानणें ही होय. नीतिनियम हे समाजस्थैर्याकरितां आहेत. यामुळें एकंदर स्थैर्य कशानें लाभेल याचा विचार करून सज्जन आणि दुर्जन यांच्याशीं वागण्यांत तरतमभाव ठेवावा लागतो. याचाच अर्थ नीतिनियमांना व्यवहारांत मुरड घालावी

लागते हा होय. आणि ही मुरड घालावयाची ती नीतीचे कडक नियम व्यवहारांत पाळण्याची धमक नसते म्हणून दुबळेपणावर पांघरूण घालण्याकरितां घालावयाची असेंहि नव्हे; तर ती मुरड घातली नाहीं तर नीतीचा उद्देशच नासून जातो म्हणून. पृथ्वीराजासारख्यांच्या भोसळट मनोवृत्तींत हा विवेक राहत नाहीं. म्हणूनच त्यांचा व्यवहार अविवेकी अथवा चूक म्हणावा लागतो.

## कार्याकार्यविवेक

याचा अर्थ भारतीयांनीं आपल्या शत्रूप्रमाणें नीतिमुर्दाडच बनावयास पाहिजे असा नव्हे. 'यतो धर्मस्ततो जयः' ही भारतीयांची कल्पना खोटी नाहीं. अनीतीचा अवलंब कांहीं काळ यशस्वी झाला तरी अंतीं स्वतःवर उलटल्याशिवाय राहत नाहीं. जारण-मारणादि अभिचारोपाय दुसऱ्यावर करणारे अंतीं स्वतःच त्याला बळी पडत असतात. 'यतो धर्मस्ततो जयः' या तत्त्वाची कांस धरण्यांत पृथ्वीराजाची चूक नव्हती; तर धर्माचा अर्थच त्याला बरोबर लावतां आला नाहीं. शरण आलेल्यास अभय द्यावें हा धर्म त्याला आठवला. पण, त्याबरोबर दुसराहि एक धर्म आहे तो मात्र कां आठवला नाहीं ? जो धर्म शरणागतास अभय देण्यास सांगतो तोच धर्म आततायीला जिवंत सोडूं नये असेंहि सांगतो ना ? मग पहिल्या सूत्राची तेवढी आठवण व्हावी व दुसऱ्याची पार विस्मृति पडावी यावरून हेंच निष्पन्न होतें कीं, धूर्त, कपटी, उरफाट्या काळजाच्या शत्रूशीं प्रसंग असतां कसें वागावें याची खरी नीति, व्यवहारकुशल नीति, मनूनें उपदेशिलेली नीति, कृष्णानें प्रतिपादलेली नीति, पांडवांनीं आचरलेली नीति, यांविषयीं पृथ्वीराजाच्या मनांत घोटाळा उडाला होता. खऱ्या धार्मिक वृत्तीची जागा भोळसट बेसावधगिरीनें पटकावली होती. शरणार्थी व आततायी यांतील भेद ओळखणाऱ्या दृष्टीला मांद्य आलें होतें. यामुळें ज्यांच्याशीं झुंजावयाचें त्यांना पुरून उरेल असेंच धोरण

आखलें जावयास हवें होतें तें गेलें नाहीं. राक्षसतागडीच्या लढाईंत ९६ वर्षांचा जख्ख म्हातारा रामदेवराव शत्रूच्या हातीं पडला तेव्हां हुसेन निजामशहानें त्याचें मुंडकें उडविण्यास कमी केलें नाहीं. आणि वर उद्गारला 'मीं तर सूड उगवला; आतां अल्ला माझें कांहींहि करो!' (फरगॉटन एम्पायर, पृ. २०५). असल्या उरफाट्या काळजाच्या वृत्तीच्या लोकांशीं संबंध होता. त्यांचा प्रतिकार करावयाचा तर त्यांना याद राहील अशीच कठोर वृत्ति स्वीकारली पाहिजे. शिवाय ही वृत्ति पृथ्वीराजाच्या एकाच उदाहरणांत आढळती तर त्याच्या विवेचनास महत्त्वच आलें नसतें. एका राजाच्या एका चुकीमुळें मुसलमानांचें खूड दिल्लीच्या सिंहासनावर चिकटलें असें कधींच म्हणतां येणार नाहीं, तर भारतीयांच्या हातून अनेक वेळां चुका घडल्या ही महत्त्वाची बात होय.

पृथ्वीराजानें शहाबुद्दिनाच्या बाबतींत तो तावडींत सापडला असतां त्याला सोडून देण्याचा जो भोंगळ उदारपणा दाखविला तसाच उदारपणा त्याच्या पूर्वीं सहा शतकें गुप्तसम्राटांपैकीं बालादित्यानेंहि सहाव्या शतकांत (सन ५२८ मध्यें) दाखविलेला आढळून येतो. पांचव्या शतकाच्या शेवटीं व सहाव्या शतकाच्या प्रथमार्धांत हूणांनीं माळव्यांत व काश्मीरमध्यें साम्राज्य थाटलें होतें. हे हूण राजे आपणांस महाराजाधिराज असें म्हणवीत. या हूणांपैकीं मिहिरगुल हा राजा अत्यंत राक्षसी वृत्तीचा व उरफाट्या काळजाचा म्हणून प्राचीन भारतीय इतिहासांत प्रसिद्ध आहे. त्याच्या सैतानी लीलांनीं संतापून अनेक हिंदु राजे एकत्र झाले व बालादित्याच्या सेनापतित्वाखालीं त्यांनीं मिहिरगुलाचा सपशेल पराभव केला. पण हातीं गावला असतां त्याचा पुरा निःपात न करतां बालादित्यानें त्याला सोडून दिलें. पुढें तो पळून काश्मिरांत गेला आणि तेथेंहि त्याला एका हिंदु राजानेंच पुन्हा आश्रय दिला आणि या उपकाराची

फेड मिहिरगुलानें कशी केली ? तर त्या राक्षसानें त्या उपकारकर्त्या हिंदु राजाला लवकरच स्वर्गांत रवाना केलें !

बालादित्यानें क्रूरकर्म्या मिहिरगुलाला जीवदान कां व कसें दिलें याची हकीकत चिनी प्रवाशी युवानच्वंग यानें दिली आहे. प्रकार असा झाला कीं, बालादित्याच्या मातेला सामुद्रिकाचा छंद होता. मिहिरगुल हा मोठा देखणा आणि हुशार आहे असें तिच्या कानांवर गेलें होतें; तेव्हां असला माणूस फाशीं जाणार हें ऐकून ती आपल्या पुत्राला म्हणाली, 'यानें पुष्कळ पातकें केलीं आहेत हें खरें, पण याच्या पापाचा घडा अद्याप भरलेला नाहीं. आज जर तूं याला फाशीं दिलेंस तर बारा वर्षें त्याचा चेहरा सारखा तुला भेडसावीत राहील. त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून पाहतां तो एका छोटया प्रांताचा राजा व्हावा अशी त्याची ललाटरेषा मला सांगते. तर त्याला सोडून द्यावेंस हें बरें." मातृभक्त बालादित्याचें मन मातेच्या या उदारबुद्धीनें पाझरलें. त्यानें मिहिरगुलाला सोडून दिला इतकेंच नव्हे, तर त्याचा एका राजकन्येबरोबर विवाह करून दिला ! ( बील–वेस्टर्न रेकर्ड्स, खंड १, पृ. १७१ ). पुढें या मिहिरगुलानें काय गुण उधळले ते वर सांगितलेच आहेत. चिनी प्रवाशाच्या या हकीकतींत सांगोवांगीचा भाग असणारच; पण भावार्थ खोटा मानण्याचें कारण नाहीं.

हिंदूंच्या या भोंगळ मनोवृत्तीचें मर्म खुद्द महमदी ग्रंथकारांनाहि उमगून चुकलें होतें. तें कसें हें समजून घ्यावयाचें असल्यास महमद गझनीचा समकालीन अल्बेरुणी याचा ग्रंथ पाहा. हिंदूंच्या नीतिमत्तेविषयीं तो लिहितो कीं, "हिंदूंची नीतिमत्ता ही खिस्त्यांच्या नीतिमत्तेप्रमाणेंच सत्य आणि अहिंसा यांवरच उभारलेली आहे. डाव्या गालांत मारली तर उजवा पुढें कर हेंच त्यांतील तत्त्व. खरोखर केवढी भव्य कल्पना ही ! पण लोकांना हा वेदान्त कळेल तर ना ? त्यांना फक्त पाठीवर कोरडे ओढलेले तेवढे समजतात. आणि खरें सांगावयाचें म्हणजे कॉन्स्टंटाइन बादशहानें खिस्ती धर्म स्वीकारल्यापासून खिस्ती

धर्मानें चाबूक आणि तरवारच नेहमीं हातीं वागविली आहे आणि तेंच बरोबर. कारण त्याविना राज्य करणेंच अशक्य! (प्र. ७१)"

## चाणक्यनीतीविषयीं गैरसमज

राजकारणांतील मुत्सद्देगिरीला आलेल्या या मरगळीचीं पाळेंमुळें फार लांबवर पोंचलेलीं आढळतात. तिचें एक महत्त्वाचें गमक म्हणजे 'अर्थशास्त्र' ह्या सुप्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता जो आर्य चाणक्य त्यानें प्रतिपादिलेल्या राजनीतीबद्दल निष्कारण गैरसमज विचारवंतांमध्येंहि पसरूं लागला होता हें होय. प्राचीन आर्यावर्तांतील बुद्धिवंतांची गणना करण्याचा प्रसंग आला असतां त्यांच्या नामावलींत ज्याचा अवश्यमेव समावेश करावा लागेल अशा तोलाचा हा महापुरुष होऊन गेला. एका उदयोन्मुख व धाडसी राजपुत्राला हाताशीं धरून नंद राजांचें समूळ उच्छेदन करणारा व त्याला अफगाणिस्तानापासून बंगालपर्यंत पसरलेलें विस्तीर्ण साम्राज्य मिळवून देणारा अशा प्रकारचा कर्तृत्ववान् पुरुष जगाच्या इतिहासांत अन्यत्र क्वचितच आढळेल. याच पुरुषानें राजनीतीचें विवरण करणारा 'अर्थशास्त्र' नांवाचा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिलेला आहे. ह्या ग्रंथामध्यें ज्या राजाला शत्रूंचा निःपात करून सम्राट् व्हावयाचें आहे त्यानें शत्रूंशीं, मित्रांशीं, प्रधानांशीं, आणि प्रजाजनांशीं कोणत्या धोरणानें वागावें याची अत्यंत निर्भीड आणि व्यावहारिक अशी चर्चा केली आहे. या चर्चेमध्यें अनेक ठिकाणीं राजानें अवश्य वाटल्यास कपटाचा आणि क्रौर्याचा निःशंकपणें अवलंब करावा असें प्रतिपादन केलेलें आहे. जग जोंपर्यंत कपटानें वागत आहे तोंवर, साम्राज्य वाढविण्याचा हव्यास बाळगणाऱ्या महत्त्वाकांक्षी राजानें जगाचें कपटी रूप ओळखून कपट्यांचा काटा कपटानेंच काढण्यास शिकलें पाहिजे अशा प्रकारची चाणक्याची भूमिका होती.

कालांतरानें चाणक्याच्या या भूमिकेविषयीं विद्वानांना आणि

विचारवंतांनाहि भूल पडली व चाणक्यनीति ही कांहीं तरी अघोरी नीति आहे अशी त्यांनीं आपली समजूत करून घेतली. चाणक्याच्या अर्थशास्त्र ग्रंथाची राजेलोकांच्या भोंवतीं घोटाळणाऱ्या मूर्ख व तोंडपुज्या लोकांकडून कशी चेष्टा केली जात असे याचें वर्णन दंडीनें आपल्या दशकुमारचरित्रामधील एका पात्राच्या तोंडीं घातलें आहे. विदर्भ देशाचा अवंतिवर्मा नांवाचा एक राजा होता. तो बुद्धीनें तरतरीत होता. पण दंडनीति अथवा राजनीति या शास्त्राविषयीं त्याला फारसा आदर नव्हता; हें पाहून त्याचा वृद्ध अमात्य वसुरक्षित याला फार वाईट वाटे. त्यानें राजाला एके दिवशीं एकांतांत गाठून राजशास्त्र पढल्यानें राजाला कशी दिव्यदृष्टि प्राप्त होते हें कळकळीनें समजावून सांगितलें. राजावर त्याचा परिणामहि झाला. पण विहारभद्र नांवाचा एक त्याचा खुषमस्कऱ्या जवळच बसलेला होता त्यानें अमात्य निघून गेल्यानंतर वृद्ध अमात्याच्या उपदेशाची व दंडनीतीची उपरोधिक भाषेत थट्टा करण्यास आरंभ केला. हा विहारभद्र खुषमस्कऱ्यांचा गाळीव नमुना असून 'बाह्यनारीपरायण' व 'पैशून्यपंडित' होता. तो कावेबाजपणानें गोड हसून म्हणाला, "महाराज काय ऐकतां या धूर्त वृद्धाचा उपदेश? अहो, आचार्य विष्णुगुप्त चाणक्याची शट्साहस्रीसंहिता पठन करून करावयाचें काय? हें शास्त्र शिकून अगदीं पहिलीच गोष्ट कळणार ती हीच ना, कीं राजानें आपल्या बायकापोरांवरदेखील विश्वास टाकूं नये म्हणून? पोट भरावयाचें झालें तर किती भाताला किती तांदूळ लागतील आणि तेवढें रांधण व्हावयास इंधन किती लागेल तें अगदीं मोजून-मापून तोलून घ्यावें असें सांगणारें हें किचकट शास्त्र! त्या शास्त्रांत आखून दिलेल्या दिनचर्येप्रमाणें वागावयाचें तुम्हीं ठरविलेंत, तर इतके व्याप तुमच्या पाठीस लागतील, कीं सूर्य उगवला केव्हां व मावळला केव्हां याचें भानहि तुम्हांस राहणार नाहीं. सकाळीं उठून मुखमार्जन झालें नाहीं तोंच, अध्यक्ष जमाखर्च सादर करणार तो ऐकावयाचा, आणि

त्या जमाखर्चांत चाणक्यानें द्रव्यापहाराचे चाळीस प्रकार वर्णिलेले आहेत तर त्याचे या धूर्त अध्यक्ष किंवा कारभारी यांनीं आपल्या सुपीक मेंदूतून चाळीस हजार प्रकार केलेले असावयाचे! दुसऱ्या प्रहरांत लोकांच्या कंटाळवाण्या फिर्यादीअर्यादी ऐकावयाच्या; तिसऱ्या प्रहरांत स्नान-भोजन करावयाचें! पण त्यांत अन्न विषमिश्र नाहीं ना? म्हणून नेहमीं भिऊन वागावयाचें. त्यानंतर रात्रीं अगदीं उशिरां निजे-पर्यंत—संध्याकाळची घटका-दीड घटका काय करमणुकींत जाईल तेवढी सोडून—नानाप्रकारचीं राजकीय कारस्थानें व खलबतें करण्यांत वेळ घालावावयाचा; आणि नंतर निद्रासुख घ्यावयाचें. पण अनेक चिंतांनीं विव्हल झालेल्या या दुर्दैवी प्राण्याला निद्रासुख तरी कुठलें लाभणार? तेव्हां महाराज, चाणक्यशास्त्र शिकण्याचा हा विचारच तुम्ही सोडून द्या. आणि मी म्हणतों कीं, ज्यांना शास्त्रकार शास्त्रकार म्हणून मान दिला जातो ते शुक्र, अंगीरस, विशालाक्ष वगैरेनीं तरी शास्त्रांतल्या सर्व गोष्टी व्यवहारांत उतरविल्या होत्या का? आणि महाराज, तुम्हांला काय कमी आहे? हजारों हत्ती तुमच्या दारांत झुलताहेत, जामदारखाना रत्नांनीं भरलेला आहे, अप्सरांप्रमाणें रमणी अंतःपुरांत आहेत, तेव्हां हे सर्व भोग सोडून राजनीतिशास्त्र पठन करण्याचा कसला विचार करतां!" या मिष्ठास भाषणाचा राजावर काय परिणाम झाला असेल हें सांगावयास नकोच. राजानें आनंदानें उठून खुषमस्कऱ्याचा हात धरून म्हटलें, "बाबा विहार-भद्रा, तूंच माझा खरा गुरु!" (द्वितीयपीठिका अष्टमोच्छ्वासः)

वरील भाषण दंडीनें एका हलकट खुषमस्कऱ्याच्या तोंडीं घातलें असल्यानें खुद्द दंडीला चाणक्यनीतीविषयीं अनादर वाटत नसेल. पण चाणक्यनीतीविषयीं विपर्यस्त ग्रह पसरूं लागले होते हें दंडीनंतर थोडक्याच कालांत होऊन गेलेल्या बाणभट्ट व भवभूति यांच्या उद्‌गारांवरून स्पष्ट दिसतें. 'कादंबरी'चा कर्ता बाणभट्ट राजचरित वर्णन करितांना लिहितो कीं, 'अमानुष क्रौर्याचा उपदेश करणारें

कौटिल्यशास्त्र ज्यानें प्रमाण मानलें आहे अशा राजेलोकांना न्याय्य व अन्याय्य असला विचार सुचणार कोठून?' (किं वा तेषां साम्प्रतं येषाम् अतिनृशंसप्रायोपदेशनिर्घृणं कौटिल्यशास्त्रं प्रमाणम्।) बाणाच्यानंतर एका शतकानें होऊन गेलेला कविवर्य भवभूति यानेंहि आपल्या 'मालतीमाधव' ह्या नाटकामध्यें 'कौटिल्याच्या नीतिशास्त्रांत निष्णात असलेल्यांच्या हृदयांत अपत्यस्नेहाला तरी जागा कुठली सापडणार' असे उद्‌गार काढले आहेत. (कुतोऽपत्यस्नेहः कुटिलनयनिष्णातमनसाम्।) बाणाच्या आणि भवभूतीच्यानंतर राजनीतिशास्त्रावर ग्रंथ होण्याचें बंद झालें असें नाहीं. पण चाणक्यनीति म्हणजे कुटिलनीति असें कायमचें समीकरण मात्र बनून गेलें. यामुळेंच बहुधा चाणक्याचा अर्थशास्त्र हा सुप्रसिद्ध ग्रंथ विचारवंतांच्या अभ्यासाचा विषय न होतां अनास्था आणि अज्ञान यांच्या सांदीकोपऱ्यांत धूळ खात पडला. चाणक्याच्या ग्रंथाची व त्यांतील कुटिल नीतीची निंदा होऊं लागली म्हणून राजेलोक मोठे उदार महात्मे किंवा धार्मिक बनले अशांतला मुळींच भाग नाहीं. त्यांच्या सैतानी लीला मागें 'आसुरी भारत' या सहाव्या प्रकरणांत वर्णिल्याच आहेत. स्वतःच्या विलासी वृत्तीचे चोजले पुरविण्याकरितां क्रौर्याचा अंगीकार करण्याची त्यांना दिक्कत वाटत नव्हती. **पण राजव्यवहारांत आततायी शत्रूशीं झुंजतांना क्वचित् अपरिहार्य ठरणाऱ्या व अवश्य असणाऱ्या क्रूराचाराच्या पाठीमागचें तत्त्वज्ञान मात्र चाणक्याच्या ग्रंथाबरोबरच लोपलें होतें.**

चाणक्याचा मूळ अर्थशास्त्र ग्रंथ जो लक्षपूर्वक वाचील त्याच्या मनांत चाणक्याचें तत्त्वज्ञान हें क्रौर्याकरितां क्रौर्य या तत्त्वावर अधिष्ठित झालेलें नसून, ज्याला राज्य करावयाचें आहे, अफाट जनसमुदायावर सत्ता चालवावयाची आहे, त्याला क्रौर्याचा अवलंब करणें कित्येक प्रसंगीं आवश्यक ठरतें असें प्रतिपादन करणारें आहे याविषयीं तिळमात्र शंका राहणार नाहीं. राज्यकारभार हाकावयाचा तो अन्यायानें, जुलमानें, क्रौर्यानें, कपटानें, हाकावा असा उपदेश

चाणक्यानें केलेला नाहीं. राज्यशास्त्राचें मुख्य सूत्र म्हणजे सदाचार आणि न्याय असेंच चाणक्यहि मानतो. पण जगांत दुष्टपणा जोंवर भरलेला आहे तोंवर त्या दुष्टपणाचा प्रतिकार करतांना क्रौर्याचा व कपटाचा अवलंब करावा लागला, तर राजानें कचरून उपयोगी नाहीं अशी चाणक्याची शिकवण आहे. शासनकर्ता हा नेहमीं बलिष्ठ व समर्थच असला पाहिजे. आपलें सामर्थ्य व बल कोणत्याहि कारणानें क्षीण होणार नाहीं याविषयीं त्यानें नेहमीं दक्ष असलें पाहिजे. तें सामर्थ्य टिकविण्याकरितां व वाढविण्याकरितां, प्रसंगविशेषीं क्रूर व अन्याय्य अशा उपायांची योजना करावी लागली तर, अशा वेळीं असले उपाय योजणें हें सत्ताधीशाचें एक कटु पण आवश्यक कर्तव्य होय असें मानून, त्या उपायांची योग्य वेळीं योजना केली पाहिजे. पण असले उपाय आपत्कालीं आणि अपरिहार्य ठरतील तेव्हांच योजावयाचे असतात हें सांगण्यास चाणक्य विसरलेला नाहीं. एरवीं राज्यकारभाराचें नेहमींचें धोरण सत्य व न्याय्य अशा तत्त्वांवरच अधिष्ठित असलें पाहिजे असेंच त्यानें प्रतिपादन केलें आहे. विस्तारभयास्तव त्याचा प्रपंच न करतां त्याच्या ग्रंथांतील 'विद्याविनीतो राजाहि प्रजानां विनये रतः। अनन्यां पृथिवीं भुङ्क्ते सर्व भूतहितेरतः'॥ (अध्याय ५) येवढाच श्लोक उद्धृत करतों.

## चाणक्याचा पाश्चात्य अवतार

आर्य चाणक्याची युरोपमधील १६ व्या शतकांतील सुप्रसिद्ध इटॅलियन मुत्सद्दी मॅकिआव्हेली ह्याच्याशीं नेहमीं तुलना करण्यांत येते. या मुत्सद्दयालाहि चाणक्याप्रमाणेंच कुटिलनीतिप्रवीण म्हणून मानण्यांत येतें. शेक्सपिअरनें आपल्या 'सहावा हेन्री' या नांवाच्या नाटकामध्यें मॅकिआव्हेली याचा उल्लेख केला आहे तो, खुनी मॅकिआव्हेली म्हणूनच केला आहे. या दोन्हीहि मुत्सद्दयांच्या तत्त्वज्ञानाविषयीं युरोपांत व

हिंदुस्थानांत सारखाच गैरसमज पसरलेला आहे. चाणक्याप्रमाणेंच मॅकिआव्हेलीनेंहि आपला राजनीतीवरचा ग्रंथ लिहिला तो राजनीतीचा साक्षात् व्यावहारिक अनुभव घेऊनच. फ्लोरेन्स येथील लोकशाही राज्यांत चौदा वर्षें तो मोठ्या हुद्द्यावर होता. या अवधींत परकीय दरबारशीं होणारा सर्व पत्रव्यवहार व तहनामे यांचे मसुदे लिहिणें वगैरे कामें त्याच्याकडे असत. उतारवयांत त्याला आपल्या नोकरीला मुकावें लागलें, आणि नंतरच त्यानें आपला सुप्रसिद्ध 'प्रिन्स' नांवाचा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथामध्यें क्रौर्य आणि कपट यांचा अनेक ठिकाणीं उघडपणें पुरस्कार केलेला आहे. पण त्याच्या पाठीशीं असलेलें तत्त्वज्ञान समजुन घेतलें पाहिजे.

चुकीच्या युद्धनीतीचा अवलंब केल्यामुळें इटली देशाची कशी दुर्दशा झाली याचें बाराव्या प्रकरणांत मॅकिआव्हेलीनें वर्णन केलेलें आहे तें मार्मिक आहे. रोमन साम्राज्य लयाला गेल्यानंतर इटलीमध्यें अनेक छोट्या संस्थानांचें राज्य सुरू झालें होतें. हीं बहुतेक संस्थानें प्रजासत्ताक पद्धतीचीं होतीं. पूर्वींचे सरदार जुलूम करीत म्हणून त्यांची सत्ता मोडून काढून लोकांनीं लोकशाही स्थापन केली होती. असें करण्यांत त्यांना धर्मगुरु पोप याची आंतून फूसहि असे. यामुळें पोपच्या धार्मिक मतांची छाप जनतेवर फार दाट पडलेली होती. या अमदानींत राज्यकारभारांतील डावपेचांऐवजीं दया आणि धर्म यांचेंच स्तोम माजविण्यास सुरुवात झाली. याचा परिणाम असा झाला कीं, परकीयांच्या स्वाऱ्यांपुढें इटलीचें सैन्य निष्प्रभ ठरलें. मॅकिआव्हेली लिहितो, "रणांगणावर सेनापति मुख्य चिंता वाहत ती म्हणजे आपल्या सैनिकांना कमींत कमी उपसर्ग कसा पोंचेल याविषयींची. शत्रूचे सैनिक तावडींत सापडले तरी ते त्यांना सोडून देत. त्याबद्दल खंडणीहि घेत नसत. एखाद्या शहराला वेढा घातला तरी, रात्रीं-अपरात्रीं छापा घालणें हें ते पाप समजत. आणि हिंवाळा सुरू होऊन कडाक्याची थंडी पडूं लागली कीं तडक राजधानीला परत येत.

ही लढाईची शिस्त! आणि हेतु काय, तर गरीब सैनिकांना तकलीफ पडूं नये हा होय. या सर्वांचा परिणाम शेवटीं व्हावयाचा तोच झाला. तो इतकाच, कीं इटलीच्या पायांत दास्याच्या शृंखला पडल्या आणि सगळीकडे तिचें नांव बद्दू झालें!" (प्रकरण १२). राजानें प्रसंग-विशेषीं कपटाचा आश्रय करावा असें जें प्रतिपादन केलें आहे त्याचा खुलासा मॅकिआव्हेलीनें स्वतः पंधराव्या प्रकरणांत केला आहे, तो विशेष मनन करण्यासारखा आहे. तो लिहितो, "राजानें आपल्या इष्टमित्रांशीं व प्रजेशीं कशा प्रकारें वागावें या विषयावर पुष्कळांनीं लिहिलेलें आहे. पण माझी या बाबतींतील मतें थोडींशीं निराळीं आहेत. ज्यांनीं या विषयावर आजवर लिहिलें आहे त्यांनीं राजा हा कल्पित आदर्श सृष्टींत वावरतो आहे असें गृहीत धरून लिहिलें आहे. पण मी लिहिणार आहे तें आजच्या आपल्याभोंवतीं पसरलेल्या लौकिक व सत्यसृष्टींतील राजांविषयीं. लोकांचे आचार-विचार कसे असावेत आणि व्यवहारांत ते प्रत्यक्ष कसे असतात यां-मध्यें जमीनअस्मानाचा फरक असूं शकतो. आणि ह्या अंतराकडे जो भोळसटपणानें डोळेझाक करील तो आपल्या नाशास मात्र कारणीभूत होईल. अंवतींभंवतीं सर्वत्र कापट्य व क्रौर्य पसरलें असतां एखाद्यानें हळवेपणानें जगांत वागायचें ठरविलें तर त्याला अनुभव येईल तो कटु कडवट असाच येईल. म्हणून शहाण्या राजानें काळ, वेळ, परिस्थिति पाहून मार्दव आणि काठिण्य या दोन्हींचाहि जरूर पडेल तसा उपयोग केला पाहिजे."

चाणक्याच्या अर्थशास्त्रांतील मुख्य सूत्रहि वरीलप्रमाणेंच होय. चाणक्यानें आपला ग्रंथ लिहिला तो काल्पनिक आदर्श राजाच्या उपयोगीं पडावा म्हणून नव्हे, तर अनेक दुर्गुणांनीं भरलेल्या व्यावहारिक सृष्टीमध्यें वावरणाऱ्या राजांच्या उपयोगीं पडावा म्हणून. आणि या व्यावहारिक जगांत वागावयाचें म्हणजे सत्ताधीशाला क्रौर्य व कापट्य यांचा उपयोग न करणें अपरिहार्य होतें. सर्व जनतेची नीतिमत्ताच जेव्हां उच्च

दर्जाची होईल, तेव्हां असल्या उपायांचा अवलंब करण्याचें कारण उरणार नाहीं. पण दुष्टपणा, क्रौर्य, विश्वासघात हे दुर्गुण समाजांत जोंवर उघडमाथ्यानें वावरत आहेत तोंवर शासनकर्त्यांनें पढिक नीति-नियमनांचा जप करीत भोळसटपणानें वागणें हें अंतीं घातक ठरेल. चाणक्यानें अभिचाराचे आणि क्रूराचाराचे जे अनेक प्रयोग सांगितले आहेत, ते या प्रयोगांचा विनियोग राजानें हवा तेव्हां करावा या भावनेनें नव्हे, तर शत्रूनें असे प्रयोग केले असतां आपल्याला ते उलट-वितां यावेत म्हणून. ज्याला राज्य करावयाचें आहे त्यानें जगांतील सर्व सुष्टदुष्ट प्रकार नीट समजावून घेतले पाहिजेत. जरूर पडल्यास काट्यानें काटा काढण्याची किंवा चाणक्यानें व महाभारतकारानें योजलेली उपमा द्यावयाची तर एका बेलफळानें दुसरें बेलफळ फोडण्याची जागरूकता राखली पाहिजे, यावर चाणक्याचा मुख्य कटाक्ष आहे.

## घरबुडवी मनोवृत्ति

परकीयांशीं वागतांना चुकीच्या युद्धनीतिविषयक कल्पनेच्या जोडीला आपसांतील फूट व सामान्य जनतेंतील राजकारणाविषयींचें औदासीन्य हीं भरीस भर म्हणून नांदत होतीं.

पेशवाईच्या शेवटच्या काळांत शिंदे-होळकरादि सरदार एकमेकांशीं कसे लढले आणि परक्यांना त्यांनीं स्वतःच्या घरांत कसें शिरूं दिलें हा इतिहास सुप्रसिद्ध आहे. इतिहासाचा प्राचीन चित्रपट अवलोकन करूं लागलें तर, या परधार्जिणेपणाचे, आत्मशून्यतेचे, अंतःकलहाचे आणि यादवीचे मासले फार प्राचीन कालापासून दिसून येतील. प्राचीन इतिहासांतील शिकंदराची स्वारी ही, आर्यांची येथील स्थिरस्थावर झाल्यावर परकीयांनीं हिंदुस्थानच्या दरवाजावर मारलेली महत्त्वाची थाप होय. या प्रसंगीं पोरस-शिकंदराचा जो सामना झाला त्यांत इतिहास सांगतो कीं, तक्षशिलेचा राजा अंभी हा शिकंदराच्या

बाजूनें आपलाच देशबंधु जो पोरस त्याच्याविरुद्ध लढला. यानंतर शकांच्या स्वाऱ्या झाल्या. त्यांत मिनँडर राजाला येथील बौद्धधर्मीयांची मदत झाली असावी. मिनँडरनें बौद्धधर्म स्वीकारला आणि बौद्धांनीं त्याला मिलिंद बनवून, त्याची परकी कुळी विसरून, बौद्धधर्माचा आधारस्तंभ म्हणून त्याचा जयजयकार केला. बौद्धांची आणि वैदिकांची जी स्पर्धा कित्येक शतकें चालू होती, त्यांत बौद्धांनीं परकीय चिन्यांची मदत घेतली असावी असें अनुमान भविष्यपुराणांतील कांहीं श्लोकांवरून निघण्यासारखें आहे. त्या पुराणांत वर्णन केलें आहे कीं, बौद्धलोक चीन देशांत गेले ( चीनदेशमुपागम्य युद्धभूमिमकारयत् ); आणि तेथील राजाच्या साहाय्यानें त्यांनीं हाहा नांवाच्या नदीच्या तीरावर आर्य लोकांशीं मोठें युद्ध केलें. पण त्यांत त्यांना असा मार खावा लागला, कीं पुन्हा म्हणून आर्य राष्ट्राच्या भानगडींत पडावयाचें नाहीं अशी त्यांनीं शपथ घेतली. "सर्वैश्च बौद्धवृन्दैश्च तत्रैव शपथं कृतम्। आर्यदेशं न यास्यामः कदाचित् राष्ट्रहेतवे।" ( सावरकर-हिंदुत्व, पृ. २४ )

लहानमोठीं राज्यें देशभर पसरलेलीं असून त्यांच्यांत परस्पर-आक्रमणविषयक युद्धें नेहमीं चालू असत; व तें स्वाभाविक असून हिंदुस्थानसारख्या खंडतुल्य देशांत तो दोष म्हणतां येणार नाहीं. मात्र परकीयांच्या आक्रमणप्रसंगींहि यादवी विसरली जात नसे हा दोष होय. राजकीय दृष्ट्या या सर्वांचा एक गट नसला तरी सांस्कृतिक दृष्ट्या सिंधूपासून समुद्रापर्यंत पसरलेला अफाट देश हा एकराष्ट्र होय ही भावना उत्पन्न झालेली नव्हती असेंहि नव्हे. असें असतांहि म्हणजे ही सांस्कृतिक एकत्वाची भावना दृढमूल झालेली असूनहि, परकीयांचा हल्ला आला असतां आपापसांतील राजकीय चुरस विसरून परक्यास एकजुटीनें तोंड देण्याची भावना मात्र उदित झाली नाहीं. इतकेंच नव्हे तर परक्यांना साहाय्य करण्याची खंत बाळगली गेली नाहीं हें आश्चर्य होय! परकीयांच्या स्वाऱ्या

अनेक प्रतापी सम्राटांनीं परतवून लावल्या. पण असा पराक्रमी सम्राट् गाजत नसेल तेव्हां अनेक लहान राजांनीं एकत्र जूट केल्याचें आढळत नाहीं. आढळतो तो उलटाच प्रकार. म्हणजे, हिंदूनें हिंदूच्याविरुद्ध परक्याच्या बाजूनें लढण्याचा! इ. स. ७१२ मध्यें सिंधप्रांत काबीज केला गेला तो फंदफितुरीच्या जोरावरच. कासीमचें सैन्य सिंधूच्या परतीरावर आलें तेव्हां ती अफाट नदी उतरून पैलतीरीं कसें जावयाचें हीच त्याला आधीं चिंता पडली. पण त्याची चिंता हरण कोणी केली? तर एका हिंदु जहागिरदारानेंच! सिंधूच्या पात्रांत एक लहानसें बेट असून त्यावरील अधिकारी कोणी मोक्वा बसैया नांवाचा होता. याचें आणि सिंधचा राजा दाहर याचें बरें नव्हतें. कासीमला हें मोठेंच घबाड सापडलें. त्यानें मोक्वाला त्या बेटाचा राजा करण्याचें लिहून दिलें मात्र, तोंच मोक्कानें स्वतः होड्या, वाटाड्ये वगैरे पटवून कासीमला आपल्या हातानें आपल्या घरांत घेतलें. दाहरचा पराभव झाला हें सांगावयास नकोच. पुढेंहि आरब वगैरेसारख्या परकीयांनीं स्वाऱ्या केल्या तेव्हांहि मोक्वानें त्यांना उत्साहानें साहाय्य करून परधार्जिणेपणाचा मोका वायां जाऊं दिला नाहीं. नवव्या शतकांत उत्तरेस प्रतिहार आणि दक्षिणेस राष्ट्रकूट अशीं दोन बलाढ्य राज्यें होतीं. उत्तरेच्या प्रतिहारांचा दरारा एवढा होता कीं, मुलतानचे मुसलमानी राजे त्यांचे मांडलिक बनले होते. पण प्रतिहारी आणि राष्ट्रकूट यांचें बिनसलें तेव्हां मुसलमान स्वतंत्र होऊं पाहूं लागले असतां, राष्ट्रकूटांची त्यांना सहानुभूति मिळाली आणि प्रतिहारांच्या शत्रूचा धर्म म्हणून इस्लामी धर्मास राष्ट्रकूटांच्या दरबारीं मान मिळूं लागला. पृथ्वीराजानें शहाबुद्दिनाला चारी मुंड्या चीत करून हाकून लावला असतां पुन्हा बारा वर्षांनीं त्यानें स्वारी करण्याची उमेद बाळगली तीहि घरभेद्यांच्या साहाय्यानेंच. या वेळीं पंजाबचे चाहमान आणि मथुरेचे गहडवाल यांचें कांहीं कारणानें बिनसलें; आणि अविवेकी जयचंद गहडवाल यानें शहाबुद्दीन महंमद यास स्वारी

करण्याविषयीं गुप्तपणें निरोप पाठविला. महंमद खिलजीनें विक्रमशिला येथील विद्यालय बेचिराख केलें. त्याला त्या वेळीं विद्यालयाची माहिती पुरविण्याचें काम बौद्ध भिक्षूंनींच केलें असें बौद्ध इतिहासकार तारानाथ म्हणतो. अल्लाउद्दिनानें देवगिरीवर हल्ला केला तेव्हां तेथेंहि अंतस्थ कलहानेंच त्याला हात दिला. रामदेवरावाच्या कारकीर्दींत मानभावांचें स्तोम इतकें माजलें, कीं त्यांच्यापैकीं कांहींनीं शेफारून जाऊन सनातनींच्या देवालयांतील रुद्रलिंगें उपटून टाकिलीं. ब्राह्मणांनीं राजावर गहजब केला तेव्हां कोपवश होऊन राजाच्या हातून ब्राह्मणवधाचें पातक घडलें. या प्रकारामुळें सर्व जनतेच्या मनांत राजाविषयीं अढी बसून गेली, आणि परचक्र आलें असतांहि ते उदासीनच राहिले.

## परधार्जिणी राजनिष्ठा !

मुसलमानांचें राज्य तेथें स्थिर झाल्यावर राजकीय दृष्टीला अधिकच मांद्य येत चाललें. आणि पातशाहीपद हें मोगलांचेंच असें मानण्याइतकी विकारास घरंगळती लागली. शिवाजीच्या दृष्टीवर तें झापड घालूं शकलें नाहीं यांतच शिवाजीचें अलौकिकत्व आहे. पण त्याच्याच घराण्याच्या दुसऱ्या शाखेचा म्हणजे मुधोळच्या घोरपड्यांचा इतिहास उघडून पाहा. भोसले-घोरपडे घराण्याचा मूळपुरुष सुजनसिंह हा दक्षिणेंत आला तोच मुळीं अशा कल्पनेनें, कीं मुसलमानांचें राज्य झालें तें ईशसंकल्पानुसारच झालें. त्याविरुद्ध लढणें हे देवाशीं लढण्यासारखें असून, अन्यत्र पळून जाणें हाच योग्य मार्ग ! पळून दक्षिणेंत आला तोहि स्वतंत्र राज्य कमविण्याकरितां नव्हे; तर जो पदरीं ठेवील त्याच्या चरणीं तरवार अर्पण करण्याकरितां. दक्षिणेंतील मुसलमानांचें बहामनी राज्य भरभराटीस आलें तें अशा शूर हिंदु तरवारबहाद्दरांच्या जोरावरच. त्यांच्यांत शौर्य पूर्वीसारखेंच धगधगत होतें पण स्वत्वाची जाणीव नष्ट झाली होती. खुद्

सुजनसिंहाच्या वंशजांनीं निधड्या छातीनें व शूरपणानें लढण्याची परंपरा अखंड चालविली व अनेक वेळां आपल्या धन्याचें प्राणरक्षण केलें. पण तो धनी परका! शौर्य गाजवावयाचें म्हणजे शौर्याकरितां शौर्य अशा बाण्यानें गाजवावयाचें. कशाकरितां आणि कोणाकरितां याचा विचारच नाहीं. लढाईच्या पद्धतींतहि असाच एककल्लीपणा. घोरपड्यांच्या युद्धपद्धतीविषयीं मुधोळच्या बखरकारानें लिहिलें आहे कीं, "या लोकांचा संप्रदाय असा आहे कीं, तरवार, खंजीर हींच आयुधें फक्त वापरावयाचीं. याशिवाय अग्निवर्षाव करणाऱ्या दुसऱ्या आयुधांना हात लावावयाचा नाहीं! बाणांनीं आणि बंदुकांनीं शत्रूचा नाश करणें हें मर्दाचें काम नाहीं. असे हे लोक समजत!" एवढ्या शौर्याला स्वत्वाची भूल पडावी यापरतें मनोव्यामोहाचें अधिक शोचनीय उदाहरण कोणतें सापडणार? शिवाजीनें आपल्या स्वातंत्र्ययुद्धास हातभार लावण्याबद्दल घोरपड्यांना विनंति केली तेव्हां घोरपड्यांनीं विजापूरकरांशीं असलेल्या स्वामिनिष्ठेची सबब सांगितली! पण एक मुसलमान धनी सोडून दुसरा मुसलमान धनी स्वीकारतांना मात्र स्वामिनिष्ठा आडवी येत नसे. बहामनी राज्य ढासळूं लागल्यावर या घोरपड्यांनीं विजापूरचा आश्रय केला. तेव्हां मात्र बहामनीशीं असलेली स्वामिनिष्ठा त्यांना गुंडाळून ठेवतां आली. बरोबरच आहे. दुसरा धनी तरी परकीयच ना? कोणीकडून कोणा तरी परकीयाशीं स्वामिनिष्ठ असलें म्हणजे झालें! या खुळचट कल्पनेनें याच घोरपड्यांनीं मुसलमानांच्या सांगण्यावरून शहाजीला कैद केलें व शिवाजीविरुद्ध विजापूरकरांशीं स्वामिनिष्ठा जागविली. यावरून शिवाजीच्या मावळ्यांच्या भावनांशेजारीं त्याच कालीं इतरांच्या मनांत कसल्या भावना नांदत होत्या याची कल्पना येते.

आणि या भावना शिवाजीच्या वेळेपर्यंतच होत्या असेंहि नाहीं. शिवाजीच्या वेळीं स्वातंत्र्याचें रोपटें नुकतें कोठें दिसूं लागलें होतें. तें वाढेल, मोठें होईल याची खात्री नव्हती. पण पुढें पेशवाईत त्याचा

वटवृक्ष बनल्यावरहि परधार्जिणेपणाची भावना नष्ट झाली नाहीं, देशप्रेमाची भावना रुजली नाहीं आणि राष्ट्राचें व संस्कृतीचें नष्टचर्य संपलें नाहीं. ब्रिटिशांचा चंचुप्रवेश पेशवे-दरबारांत राघोबानें आपल्या हातानें कसा करून दिला हें सर्वश्रुतच आहे. दुसरा प्रकार व्यापाऱ्यांचा. फंदफितुरीच्या धंद्यावर सावकारी करून लक्षाधीश होणाऱ्या एका गुप्त नांवाच्या जैन पेढीवाल्यांची हकीकत प्रो. शेजवलकर यांनीं भा. त्रैमासिक वर्ष ६, यांत दिली आहे. या पेढीवाल्यांनीं आपल्याच बांधवांविरुद्ध ब्रिटिशांना कसें साहाय्य केलें हें ब्रिटिशांनीं या पेढीवाल्यांना वेळोवेळीं दिलेल्या शिफारसपत्रांवरूनच दाखविलें आहे. उदाहरणार्थ, ग्वालेरचा किल्ला घेणारा सेनापति लिहितो कीं, "ग्वालेरचा किल्ला सर्व बाजूंनीं उंच, जवळ जवळ अभेद्य होता. आमच्या कार्यांत महाराजाधिराज सवाई सिकंदर स्वरूपचंद गुप्तांचें साहाय्य नसतें तर तो किल्ला आम्हांस सर करतां न येता. किल्ल्यावर जाण्यास एक गुप्त चोरवाट होती; ती अत्यंत प्रयासानें समजून घेऊन त्यांनीं आम्हांस कळविली. यामुळें आम्हीं विनाश्रम किल्ला ताब्यांत घेतला." ही पेढी अत्यंत श्रीमान् होती. त्यांनीं मंदिरें उभारलीं होतीं, धर्मादाय केला होता. आणि आपल्या या धर्मांत व्यत्यय येणार नाहीं याबद्दल ब्रिटिशांच्याकडून अभिवचन घेतलें होतें! **पण स्वबांधवांविरुद्ध परकीयांना साहाय्य करणें हा धर्माचा खून आहे याची त्यांना कल्पनाहि नव्हती !**

पाश्चात्यांचें आक्रमणशील स्वरूप पेशवाईत व त्याच्या पूर्वींहि उमगलें नव्हतें असें नव्हे. १७८० सालीं पुरुषोत्तम महादेव हा पाटीलबुवास लिहितो—"पत्रीं आज्ञा कीं इंग्रेज बलवान नजीबखान यांनीं होऊं न द्यावें. वजीर सुजाय उद्दौला यांचे घरांत पाय इंग्रजाचा शिरला असतां सारेंच हाताखालीं घातलें हें त्यास न समजलेंसें नाहीं" (इतिहाससंग्रह). अर्थात् कावा ओळखला नव्हता असें नव्हे. यापूर्वींहि पुष्कळ वर्षें ओळखलें होतें. याच्यापूर्वीं ६४ वर्षें

म्हणजे सन १७१६ मध्यें लिहिल्या गेलेल्या आज्ञापत्र नांवाच्या सुप्रसिद्ध निबंधाच्या लेखकानें स्पष्टपणें ओळखलें होतें. पण त्याचा प्रतिकार मात्र झाला नाहीं. आज्ञापत्राचा लेखक साहुकारांना सरकारनें सर्व प्रकारच्या सवलती द्याव्या याचें विवेचन करीत असतां लिहितो, “ साहुकारांमध्यें इंग्रजादि टोपीकर हेही लोक साहुकारी करतात. पण ते वरकड साव-कारासारखे नव्हत. त्यांचे खावंद प्रत्येक राज्यच करीत आहेत. राज्य करणारास स्थळलोभ नाहीं असें काय घडों पाहतें ? त्यास ही हट्टी जात, हातास आले स्थळ मेल्यानेही सोडावयाचे नव्हेत. त्यास केवळ नेहमी जागा देऊं नये. कदाचित् जागा देणे झाली तर खाडीचे मोवारीं (तोंडीं) समुद्रतीरी न द्यावी. तसे ठिकाणीं जागा दिल्यानें आरमार पाठीशीं घालून त्या बंदरी नूतन किल्लाच निर्माण करणार. तेव्हां इतके स्थळ राज्यातून गेले. याकरितां जागा देणेच तर लांब खाडीकाठीं द्यावी. त्यास इमारतीचे घर बांधो देऊं नये. या प्रकारें राहिले तर बरें; नाहीं तर याविणें प्रयोजन नाहीं.” यापेक्षां अधिक स्पष्ट ती कल्पना काय असावयाची ? म्हणजे कळत होतें पण वळलें मात्र नाहीं. म्हणजे दिल्लीचे बादशहा किंवा मराठे यांपैकीं कोणीहि या प्रकाराचा निक्षून बंदोबस्त करूं शकले नाहींत. उलट ज्यांना वळलें त्यांनीं काय केलें तें पाहा म्हणजे फरक तत्काळ लक्षांत येईल.

## जपानचा दाखला

आमच्यावर आला तसलाच प्रसंग आमच्या जपानी बंधूंवर आला होता. पण ते त्यांतून सहीसलामत वांचले; वांचले नव्हे तर चांगले बलिष्ठहि झाले हें आज आपण पाहतोंच आहोंत. पण हें झालें कसें हें पाहणें उद्बोधक आहे. सोळाव्या शतकांत १५४२ सालीं म्हणजे शिवाजीच्या काळापूर्वी पाश्चात्य मिशनऱ्यांनीं जपानमध्यें शिरकाव करून घेतला आणि थोड्याच अवधींत कांहीं लाख जपानी लोकांना प्रभु

येशूचें भगत बनविलें. या मिशनऱ्यांचा पांढरा पाय कायमचा रोवला गेला असता तर त्यांच्या पावलावर पाऊल टाकून सैनिक आले असते आणि जपानी राष्ट्राच्या मानगुटीवर पश्चिमेकडील पांढरें भूत बसलें असतें हें भविष्य निश्चित होतें. मग हें टळलें कसें? तें टळण्याकरितां जपाननें काय केलें हें सांगतांना टॉनबी हा आपल्या 'स्टडी ऑफ हिस्टरी' या ग्रंथांत (खंड ४, पृ. ९१) लिहितो कीं, "जपाननें उपाय अमलांत आणला तो हा कीं, एक वटहुकूम काढून सर्व पाश्चात्य मिशनरी आणि व्यापारी यांना एकजात जपानबाहेर हाकून देण्यांत आलें आणि पुन्हा कोणी देशांत पाऊल टाकील तर त्याला प्राणास मुकावें लागेल असें फर्माविलें!" आणि मिशनऱ्यांनीं लाखों बाटगे निर्माण करून ठेवले होते त्यांचें काय केलें? त्यांचाहि निकाल लावणें आवश्यक होतें. कारण तो अस्तनींतील निखारा होता तर या बाटग्यांना दयामाया न दाखवितां त्यांचीं पाळेंमुळेंहि खणून काढलीं. इतकीं कीं जपानमध्यें फिरंग्यांनीं प्रथम १५४२ मध्यें प्रवेश केला, पण शंभर वर्षांनंतर जपानी बेटावर औषधालाहि फिरंगी राहिला नाहीं. येवढ्यानें तात्कालिक अरिष्ट टळलें, आणि पुढें दोनशें वर्षें जपाननें योगनिद्रेंत घालविलीं. पण १८५३ मध्यें त्यानें डोळे उघडले तेव्हां संहारक शस्त्रांनीं सुसज्ज असलेले पाश्चात्य एकदां पिटाळून लाविले तरी पुन्हा दारावर ठोठाविल्याशिवाय राहणार नाहींत हें जपानला कळून आलें. आणि त्या वेळींहि गाफील न राहतां त्यांनीं ताबडतोब उपाय अमलांत आणला तो म्हणजे पाश्चात्यांचें शास्त्रीय ज्ञान आत्मसात् करण्याचा. तो उपाय अमलांत आणला म्हणूनच ते आज पाश्चात्य राष्ट्रांवरहि गुरगुरूं शकतात. देवगुरूचा पुत्र कच याच्या कालापासून चालत आलेला हा मार्ग आहे. दैत्य प्रबळ होतात ते संजीवनी विद्येमुळें; हें मर्म लक्षांत येतांच देवांनीं उपाय योजला तो म्हणजे दैत्यांची विद्या हस्तगत करणें हा होय. भारतीयांनीं हें केलें नाहीं म्हणूनच

त्यांना आपलें राजकीय मरण उघड्या डोळ्यांनीं पाहण्याची नामुष्की पत्करावी लागली.

विद्येच्या हेळसांडीचा हा मुद्दा पुढें पाहूं. प्रस्तुत मुद्दा म्हणजे राजकारणांत फंदफितुरी जी माजली या बाबतींत मुख्य गोष्ट सांगावयाची ही कीं, राजकारण हें कांहीं व्यक्तींची वा कुलांची मिरासदारी होऊन बसलें. फंदफितुरीचें भूत आपल्याच देशांत नाचतांना आढळतें असें नाहीं. कोणत्याहि देशाच्या इतिहासांत त्याचे प्रताप दाखवितां येतील. पण राष्ट्रांतील बहुजनसमाजामध्यें राष्ट्रीय वृत्ति जागरूक असलीं, राजकारणाशीं त्यांचा नित्याचा संबंध असला म्हणजे फितुरीला चोहोंकडून जेरबंद बसतात. पण आपल्या देशांत राजकारण हें सरदार-दरकदारांचें खेळणें होऊन बसलें व सामान्य जनता राजकारणाविषयीं उदासीन राहिली.

देशभक्तीचा उदय होण्यास देशांतलि बहुजनसमाजाला राजकारणांत आत्मीयता वाटावी लागते. राजकारण हें एका विशिष्ट वर्गाचें किंवा एखाद्या विशिष्ट कुलाचें काम होय, ही कल्पना राष्ट्रीयत्वाला, देशप्रेमाला बाधक होते. दोन हजार वर्षांपूर्वी मेग्यास्थेनिसनें येथील लोकांचें वर्णन केलें कीं, राज्यक्रांतीचा उपसर्ग येथील शेतकरीवर्गाला कधींच पोंहोचत नाहीं. शेजारीं तुमुल युद्ध चाललें असलें तरी, शेतकरी आपलें औत धीमेपणानें हाकीत असतो. राजा कोणी का असेना, जो मागेल त्याला कर द्यावयाचा व उरेल त्यांत मीठभाकरी भागवावयाची ही त्याची समाधानी वृत्ति. मेग्यास्थेनिसनें वर्णन केलें तें हिंदूंचा शांतताप्रियतेचा गुण घेण्याच्या इच्छेनें. पण तो जितका गुण त्याच्यापेक्षां जास्त दोषच ठरला आहे. राजकारणाच्या उलाढाली चालत त्या फक्त चळवळ्ये व लढवय्ये लोकांचा जो एक लहानसा वर्ग असे त्यांच्यामध्यें चालत. राज्यसंपादनाची लालसाहि यांच्यामध्येंच आणि राज्य गेल्याची खंत बाळगावयाची तीहि यांनींच. वाणी-उदमी किंवा शेतकरी-हेटकरी यांच्या दृष्टीनें राज्यक्रांति म्हणजे सोमाचें राज्य गोमाच्या हातीं जाणें

एवढेंच. घरमालकानें घर दुसऱ्याला विकल्याबद्दल भाडेकऱ्याला जितका हर्षामर्ष व्हावयाचा तितकाच राज्यक्रांति झाली म्हणजे साळ्या-माळ्याला! राजवाड्यांतील पहिले बिऱ्हाड बदलून दुसरें बिऱ्हाड राहावयास आलें जणूं! महाभारतकारानें प्रजेच्या या मनोवृत्तीचें वर्णन केलें आहे कीं, प्रजा म्हणजे दुभत्या गाई. कोणीहि त्यांची धार काढावी. जो आंबोण घालील त्याला पान्हा सोडावयाचा एवढें माहीत! राज्ययंत्र क्षत्रियांच्या अथवा सरदार-दरकदारांच्या हातून वाण्या-उदम्यांच्या हातीं येणें ही शासनसंस्थेच्या विकासांतील अवस्था आपल्या देशांत अद्याप आलेली नव्हती.

राज्यक्रांत्या देशी राजांमध्येंच होत तोंवर त्या क्रांतीनें प्रजेच्या सामाजिक जीवनांत फारसा फरक पडत नसे. राजाच्या वैयक्तिक स्वभावामुळें दंडशासनांत काय गरमनरमपणा होईल तेवढाच. बाकी एकाला कर द्यायच्याऐवजीं दुसऱ्याला कर दिला म्हणजे राजकारणांतील प्रजेची जबाबदारी संपे. चक्रवर्ती राजे दिग्विजय करीत तेव्हांहि ते दुसऱ्या राजांना आपलें स्वामित्व मान्य करण्यास लावण्याची मात्र महत्त्वाकांक्षा बाळगीत. राज्य खालसा करण्याची फारशी प्रथा नसे. तर जिंकलेल्या राजाला त्याच्या गादीवर पुन्हा स्थापन करण्याचीच पद्धत असे. त्यामुळें सामान्य प्रजा ही नित्याचें राजकारण आणि नैमित्तिक राज्यक्रांति या दोहोंविषयीं उदासीन असे.

## मिथिला जळेना का

राज्यांत चाललेल्या घडामोडींविषयीं सामान्य जनता कशी उदासीन असे याचें राजतरंगिणीकारानें मार्मिक वर्णन केलें आहे. तो लिहितो कीं, "पेन्शनींत निघालेले वृद्ध कामगार, शिष्यांकरवीं पाठ खाजवून घेत बसलेले आचार्य, मंदिरांतील वतनी नाटकशाळा, लोकांच्या ठेवी पचवून ढेकर देत पुराण-श्रवणाला बसलेले सावकार, प्रायोपवेशनाचेंच शस्त्र माहीत असलेली भिक्षुक मंडळी, आणि वेळीं-अवेळीं

राजद्रोहाच्या गोष्टी सांगणारे रिकामटेकडे, या सर्व लोकांना राज्यावर आपत्ति आल्याची खंत तर नसेच उलट त्यांना त्यांत आनंदच वाटे." (मा. लेलेकृत भाषांतर). या परिस्थितीचें एक कारण असें असे कीं, राजेलोक प्रजाजनांना विश्वासांत असे क्वचितच घेत. राज्य हें आपलें व्यक्तीच्या मिरासदारीचें पूर्वसुकृतानें लाभलेलें किंवा मनगटाच्या जोरावर मिळविलेलें अशा प्रकारची समजूत रूढ झालेली होती. राजाचा आणि प्रजेचा संबंध यावयाचा तो फक्त प्रजेकडून जास्तींत जास्त कर पिळून घ्यावयाच्या वेळीं. दहाव्या शतकांत काश्मिरांत एकदां असाच भयंकर दुष्काळ पडला होता. वितस्ता नदीचें पात्र सडलेल्या नासलेल्या प्रेतांच्या राशींनीं झाकून गेलें होतें, आणि सर्व देश अस्थि पसरलेल्या स्मशानासारखा दिसूं लागला होता. कल्हण लिहितो कीं, "अशाहि स्थितींत मंत्रिलोक आपल्याजवळचें शिल्लक असलेलें धान्य अतिशय महाग दरानें विकून अधिकाधिक गबर होत होते. आणि खुद्द राजाविषयीं बोलावयाचें तर, आधींच निःसत्त्व झालेल्या प्रजेला जो जास्तींत जास्त पिळून काढी अशालाच मंत्रि-पदावर तो मुक्रर करीत होता." काश्मिरांतल्या पहाडांतील लोक हे मोठे काटक होत. त्यांचा योग्य सन्मान करून त्यांची उत्तम सेना तयार केली असती तर परकीयांना टक्कर देणें काश्मीरनरेशांना कठीण नव्हतें. पण त्यांचा मित्रत्वानें उपयोग करून घेण्याऐवजीं ते लोक नाठाळ म्हणून त्यांना कठोरपणानेंच वागविलें जाई. पेशवाईतहि मराठे मावळ्यांना उष्टीं-खरकटीं काढण्याचें काम सांगून पठाण गाड्यांना शिपाईगिरीवर नेमण्याचें घातकी धोरण चालू होतें! दिग्विजयाला निघण्यापूर्वीं आपल्या गैरहजेरींत राज्यव्यवस्था कशी ठेवली जाई याविषयीं, ललितादित्य नांवाच्या राजानें आपल्या मंत्रिमंडळाला जो कानमंत्र दिला त्यावरून एतद्विषयक धोरण कळून येतें. तो म्हणाला, "या पहाडी लोकांना वठणीला आणणें आणि तेंहि विशेषतः संपन्न असतील तर फारच कठीण पडतें; म्हणून ते दोषीनिर्दोषी कसेहि

असले तरी नेहमीं त्यांना शिक्षा ठोठावीत असावें. त्यांच्यापाशीं वर्षभर पुरेल इतकीच खाण्यापिण्याची सामग्री आणि शेतीला अवश्य तेवढींच गुरेंढोरें राहूं द्यावीं. याहून अधिक राहूं दिल्यास ते प्रबल होऊन उपद्रव देऊं लागल्याशिवाय राहणार नाहींत. ह्या खेडवळांना जर का पांघरायला लोकरीचा उबदार कपडालत्ता, खावयाला मिष्टान्न, बसायला घोडे, आणि शेजेला सुंदर तरुणी, असल्या गोष्टी मिळूं लागल्या तर प्रजेचें दुर्दैव ओढवलेंच म्हणून समजावें." ललितादित्याच्या या उद्गारांवरून त्या काळचें राज्ययंत्राचें स्वरूप नीट लक्षांत येईल. तें म्हणजे हेंच कीं राजा, त्याचें मंत्रिमंडळ, आणि त्याचे खुषमस्करे एवढ्यांचेंच जणूं काय तें राज्य! बाकीच्या प्रजेनें फक्त मागेल तेव्हां आणि मागेल तितका कर राजास द्यावा तेवढा! राजघराण्यांत हमेश घडून येत असलेले खून, रक्तपात, वगैरे राक्षसी प्रकार, प्रजेनें नुसतें उघड्या डोळ्यांनीं पाहावे. पण राजा बेशिस्त वागूं लागला, अन्याय, जुलूम करूं लागला, तर त्याला जाब विचारण्याचा आपला हक्क आहे ही जाणीवच प्रजेमध्यें नष्ट झालेली होती. राज्याभिषेकप्रसंगीं प्रत्येक नवा राजा 'मी प्रजेचें न्यायानें पालन करीन' अशा प्रकारची शपथ वेदमंत्रपूर्वक घेत असे. पण या शपथेचा मंत्रघोष हवेंत विरून जाण्याच्या आधींच राजाला त्या शपथेचें विस्मरण पडे. या राज्याभिषेकप्रसंगीं हजारों प्रजाजन हजर असत, त्यांनीं ती शपथेची गंभीर घोषणा ऐकलेली असे, पण शपथेची कठोर आठवण राजास करून देतां येईल असा आत्मविश्वास उत्पन्न होण्याइतका, राज्ययंत्राशीं त्यांचा संबंधच येत नसे. यामुळें राजा चांगला निघणें किंवा वाईट निघणें हें केवळ आपलें भाग्य किंवा दुर्दैव, राजा अनन्वित जुलूम करूं लागला तर तो आपल्याच प्रारब्धाचा भोग असें म्हणून कपाळावर हात मारून निराशेचे सुस्कारे टाकणें एवढेंच काय तें आपल्या हातीं असें प्रजा मानीत असे. यामुळें एक राजा गेला काय आणि दुसरा आला काय दोहोंचेंहि सुहेरसुतक जनतेला कांहींच नसे. राजा जनकाची सुप्रसिद्ध उक्ति

थोड्या निराळया अर्थानें सर्व प्रजेला लागू होती ती म्हणजे 'मिथिलायां प्रदग्धायां न मे दह्यति किंचन' !

या राजकारणविषयक उदासीन वृत्तीनेंच तेवढें भागलें नाहीं, तर एकंदर जीवनाविषयक तत्त्वज्ञानच शिथिल झालें होतें. प्रारब्धवादाचें तिमिर वाढूं लागलें होतें. विचार-स्वातंत्र्याचें तेज लोपूं लागलें होतें. पूर्वींच्या प्रकरणांतून वर्णिलेल्या चौकसपणा, जागरूकता, संग्राहकता या वृत्ति दुर्बल झाल्या होत्या आणि पोकळ व अंध अभिमान बळावूं लागला होता. यामुळें एके काळीं पुढारलेले आपण पाश्चात्यांच्या मागें पडलों ते कायमचे. मागें पडावयास नको असेल तर लोकशाहीची आवड, परकीयांपासूनहि विद्या स्वीकारण्याची संग्राहकता, जगभर संचार करून येणारी जागरूकता, प्रयत्नवादावर विश्वास, जीवनाकडे निर्भीडपणें पाहण्याचें धैर्य वगैरे रूपानें दिसून येणारी आपली पूर्वींची परंपरा पुन्हा वाहती केली पाहिजे. तरच संस्कृतिसंगमावरील भोवऱ्यांत आपल्या संस्कृतीचा प्रवाह लुप्त न होतां जागतिक संस्कृतींशीं संलग्न होऊन पण स्वतःचें वैयक्तिक कामगिरीरूप वैशिष्ट्य कायम ठेवून तो अखंड चालू राहील. पण तसें होण्यास त्यावरील चुकीच्या तत्त्वज्ञानाचें माजलेलें शेवाळें दूर केलें पाहिजे. तरी आतां हें तत्त्वज्ञानच कसें विकृत झालें होतें हें पाहूं या.

## प्रकरण तेरावें

# विचारदौर्बल्याचें शेवाळें

राजकारण हें समाजाचें संरक्षक कवच होय, म्हणून त्याचा विचार स्वतंत्रपणें मागील प्रकरणीं केला. त्यांत कार्याकार्यविवेक कसा सुटत चालला होता हें पाहिलें. आतां या प्रकरणीं संस्कृतीच्या सर्वच क्षेत्रांत कार्याकार्यविवेक अथवा स्वतंत्र विचार करूं शकणारी प्रज्ञा ही कशी ढिली होत चालली होती इकडे नजर देऊं. राजकीय क्षेत्रांत आम्ही पराभूत झालों तें लहरी दैवघटनेनें नव्हे, तर आमच्याच नादानपणामुळें व विवेकदौर्बल्यामुळें हें पाहिलें. पण ह्या विवेकदौर्बल्याचे परिणाम राजकारणांत ठळकपणें दिसत असले तरी त्याचीं पाळेमुळें फार खोलवर दडलेलीं असतात. तीं राष्ट्राच्या मनोवृत्तींत रुतलेलीं असतात. तसाच प्रकार आपल्या संस्कृतीचा झालेला आढळतो. तो म्हणजे कांहीं काळ जोमदार रीतीनें तिचा प्रवाह वाहिल्यावर तिची गति मंद झाली आणि तिच्यावर अंधःश्रद्धेचें शेवाळें माजूं लागलें.

विचारस्वातंत्र्य हें प्रगतिपर संस्कृतीचें चैतन्य होय. हें चैतन्य जेव्हां कोळपूं लागलें तेव्हां आम्ही मरगळूं लागलों आणि स्पर्धेत मागें पडलों.

चैतन्याला ओहोटी लागण्याचा हा काल चांगला हजार वर्षांवर मानतां येईल. भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनीं आपल्या 'मध्ययुगीन भारत' या सुप्रसिद्ध ग्रंथांत हर्षवर्धनाच्या निधनानंतर मध्ययुगाला सुरुवात होते असें धरलें आहे. जयचंद विद्यालंकार (भारतीय इतिहास की रूपरेखा) यशोधर्म्याच्या मृत्यूनंतर म्हणजे आणखी एक शतक (इ. स. ५४०) मागें धरतात. ऐतिहासिक विवेचनांत अशा

प्रकारची कालमर्यादा स्थूलमानानेंच धरावयाची असते हें सांगावयास नकोच. मध्ययुगीन कालाच्या किंवा संस्कृतीच्या स्थिरावस्थेच्या दर्शक म्हणून ज्या चार-दोन गोष्टी पुढें सांगण्यांत येणार आहेत, त्या अमुक एका शतकांत एकदम अवतीर्ण झाल्या असें नव्हे. वर्षाकालाच्या सुरुवातीला आकाशांत काळेंकुट्ट मेघडंबर येऊन विजा चमकूं लागल्या म्हणजे वर्षाकाल सुरू झाला असें आपण म्हणतों, पण हे मेघ निर्माण होण्याची तयारी आधीं कित्येक महिने चालू असते. तोच न्याय येथें लागू करावयाचा तर, विचाराच्या स्थिरावस्थेची सुरुवात म्हणून हर्षवर्धनाच्या नंतरचा काल हा एक ठळक प्रारंभस्थान म्हणून मानण्यास हरकत नाहीं. येथून पुढच्या हजार-बारारों वर्षांच्या काळाचें प्रमुख लक्षण म्हणजे **प्रारब्धवादाची पकड व विचारस्वातंत्र्याचा लोप** हें होय.

## प्रारब्धवादाची पकड

पैकीं पांगळ्या प्रारब्धवादाची पकड कल्हणासारख्या इतिहासकारावर बसावी हें दुर्दैव. कल्हणानें आपला इतिहासग्रंथ समाप्त केल्यानंतर थोड्या काळाच्या आंतच काश्मीरचें राज्य मुसलमानांच्या भक्ष्यस्थानीं पडलें; आणि काश्मिराबाहेरील इतर प्रांतांतहि तोच प्रकार घडला. तो कां घडला याच्या अनेक कारणांपैकीं एक प्रमुख कारण म्हणजे प्रारब्धवादांत प्रकट होणारें राष्ट्राचें मनोदौर्बल्य हें होय. त्याची योग्य कल्पना कल्हणाच्या उद्‌गारांवरून चांगली येईल. अनेक राजवटींचा उदयास्त वर्णन केल्यावर या इतिहासकाराच्या मनावर जो ठसा उमटला तो असा कीं, जगांतील सर्व व्याप व वैभव क्षणभंगुर आहे. ग्रंथारंभींच तो लिहितो कीं, "अखिल जीवमात्र हें क्षणभंगुर आहे हें ज्या सज्जनांना पटलेलें असतें त्यांना कोणता रस आवडत असेल, तर तो शांतरस होय. आणि तोच अनेक ऐतिहासिक उलाढालींनीं भरलेल्या माझ्या या ग्रंथांत प्रधान रस आहे !"

या भूमिकेवरूनच तो इतिहासाकडे पाहत असल्यानें जेथें जेथें

राजांच्या अनन्वित जुलमी कृत्यांचें वर्णन करण्याचा प्रसंग येईल, तेथें तेथें प्रजेचें दुर्दैव किंवा ईश्वरी कोप असल्या शब्दांचाच जप करतांना तो आढळतो. काश्मीरचें सिंहासन एके काळीं मिहिरगुल नांवाच्या एका परकीय राजानें बळकाविलें होतें. हा राजा अत्यंत जुलमी व क्रूरकर्मा म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्याविषयीं कल्हण तळतळून लिहितो, "इतक्य अनन्वित जुलूम करणाऱ्या राजाचा प्रजेनें खूनच पाडावयास हवा होता." मग कां पाडला नाहीं? कल्हण याचें जें उत्तर देतो तें तत्कालीन विचारवंताच्या मनोवृत्तीवर चक्क प्रकाश पाडणारें आहे. तो लिहितो, "या राजाचा खून पाडला गेला नाहीं याचें कारण, या देशांतील उग्रदेवता त्याचें रक्षण करीत असाव्या हेंच असलें पाहिजे." किती विक्षिप्त कल्पना! सर्व तऱ्हेचीं घोर पातकें करणाऱ्या राजाचें रक्षण म्हणे देवता करीत होत्या! राज्यकारभारांत स्वतःस कांहींहि हलवितां येत नाहीं या निराशेनें काळवंडलेल्या मनाचे हे विकृत उद्गार होत एवढाच याचा अर्थ! राजेलोकांनीं आपल्या बांधवांना कंठस्नान घातलें तरी तें देखील उग्रदेवता सौम्यपणानें पाहत, पण उलट प्रजेनें हात उगारला कीं मग मात्र, राष्ट्रांतील सर्व देवतांचें उग्र तेज प्रकट होऊन इहलोकींची महती-देवता जी राजा, तिचें रक्षण करण्याकरितां तिच्याभोंवतीं एक अभेद्य वलय निर्माण करीत! कारण राजा म्हणजे साक्षात् ईश्वराची विभूति, आणि त्याला प्राप्त झालेलें ऐश्वर्यपद हें पूर्वींच्या अनंत जन्मींच्या सुकृताचें फल; तेव्हां त्यानें कितीहि जुलूम केला तरी तें ईश्वरीसूत्र, ती विधिघटना, तो कर्मविपाक, असें म्हणून तो निमूटपणें सोसावा हीच विचारसरणी सर्वत्र पसरलेली. या प्रकारांत फरक पडावयाचा असल्यास तो दगडाधोंड्याचीं दैवतें घडवून आणतील तेव्हां. आपण हाडामांसाचीं चालतीं बोलतीं माणसें हें परिवर्तन घडवून आणूं ही धमकच नष्ट झाली होती. चक्रवर्मा नांवाचा एक राजा होता. त्यानें एका चांडाळीला आपली पट्टराणी केली. त्यासंबंधानें कल्हण लिहितो कीं, "खरोखर या काळीं

आपल्या या काश्मीरमंडळांत प्रखर आणि जागतीं दैवतें राहतच नसावींत. तीं राहत असतीं तर त्यांच्या मंदिरांत चांडाळीचा प्रवेश कधींच होता ना!" एकूण जागृत दैवतें काय करतील त्यावर भिस्त! काश्मीरचा हर्षराजा हा एक प्रतापशाली राजा होऊन गेला. पण तोहि आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं सैतानी चाळे करूं लागला. त्याच्यासंबंधानें कल्हण लिहितो कीं, "या थोर राजाच्या हातून अनान्वित चुका घडत त्या भूतसंचारामुळेंच असाव्यात. त्याची जन्मकुंडलीच वाईट. त्याच्या कुंडलींत लग्नीं कर्क रास, पंचमस्थानीं मंगळ व शनि, षष्ठयस्थानीं बुध व गुरु, सप्तमांत शुक्र व सूर्य, आणि दशमांत चंद्र होता. असल्या योगावर जन्मलेले राजे कौरवांप्रमाणें स्वकुलनाशक निपजतात हें संहिताकारांनीं स्पष्ट सांगितलेंच आहे!" दोन-तीन हजार वर्षांच्या दीर्घ कालखंडांतील अनेक राजांच्या उत्कर्षापकर्षांचें वर्णन करणाऱ्या या इतिहासकाराच्या मनावर ऐहिक वैभवाच्या क्षणभंगुरत्वाचा ठसा उमटला तर नवल नाहीं! पण अनेक राजांच्या अन्यायी लीलांचें अनेकवार चिडून, वैतागून वर्णन करण्याचा प्रसंग आला असतांहि अन्यायी राजसत्ता नष्ट कशी करतां येईल याविषयींची कल्पना मात्र त्याला स्फुरलेली दिसत नाहीं. वेळीं-अवेळीं तो फक्त विधिघटनेचेंच तुणतुणें वाजवितांना आढळून येतो. राजकारणाकडे कठोर विवेकवादाच्या दृष्टीनें पाहण्याची धमक ओसरलेली होती. नक्षत्रें आणि कुंडल्या पाहत बसणाऱ्यांना चाणक्यानें मूर्खांत काढलें होतें, तर अकराव्या-बाराव्या शतकांत कल्हणासारखा चोकस इतिहासकारहि नक्षत्रांचें आणि कुंडल्यांचें महत्त्व गाऊं लागला होता. एके ठिकाणीं तर तो स्पष्ट लिहितो कीं, "प्रजेच्या प्रारब्धानुसारच तिला सुष्ट किंवा दुष्ट राजा मिळत असतो. कांहीं वृक्षांना मेघांकडून अमृतजल मिळतें आणि कांहींना त्याच मेघांतून अशनिप्रपात मिळतो, हें त्यांच्या पूर्वसुकृताचें फळ होय!" तात्पर्य

विवेकवादाचें चैतन्य लोपूं लागलें होतें, त्यामुळें राष्ट्राचें सर्वच क्षेत्रांतील व्यापव्यवहार शिथिल, भोळसट होऊं लागले.

## पुराणप्रियता

या कालांत शास्त्र, कला, वाङ्मय, धर्म, तत्त्वज्ञान या सर्व प्रांतांत बुद्धिमान् पुरुष चमकले नाहींत असें नव्हे. पण कोणत्याहि बौद्धिक प्रांतांत मूलगामी नवे स्वतंत्र असे विचार मांडले गेले नाहींत. या कालानंतर स्मृति होण्याचें बंद पडलें. आठव्या शतकांतला पद्यमय देवल-स्मृतीचा कर्ता हा शेवटला स्मृतिकार होऊन गेला. त्यानंतरचे सर्व धर्मशास्त्रकार हे निबंधकार होत. त्यांनीं नवीन स्मृति न रचितां जुन्या स्मृति ह्या अनुल्लंघनीय मानल्या आणि त्यांतहि एकमेकांशीं विरुद्ध असणाऱ्या सर्वच स्मृति प्रमाण मानून त्या सर्वांचा समन्वय करण्याचें काम आपल्या शिरावर घेतलें. हिंदुस्थानसारख्या खंडतुल्य देशांतील अनेकविध समाजांना सांस्कृतिक दृष्ट्या एका सूत्रांत गोवावयाचें तर निरनिराळ्या काळीं आणि निरनिराळ्या स्थलीं प्रचलित असलेल्या आचाराविचारांचा समन्वय करणें इष्ट होतें हें नाकबूल करतां येणार नाहीं. पण हा समन्वय करतांना जुन्या काळच्या सर्व स्मृति ह्या नव्या काळावर बंधनभूत आहेत हें जें मूलभूत गृहीतकृत्य म्हणून स्वीकारलें गेलें, तें प्रारंभीं समन्वयाच्या दृष्टीनें सोइस्कर असलें तरी अंतीं विचार-स्वातंत्र्याला मारक ठरलें. जुन्याबद्दल अभिमान कितीहि प्रखर असला तरी, काल कांहीं कोणाकरितां थांबत नाहीं. नव्या गरजा उत्पन्न होतच असतात, नव्या अडचणी टोचत असतात, नवे अनुभव येत असतात व त्याला अनुसरून आचारविचारांची नवी मांडणी करणें जरूर पडते. तशी मांडणी या काळांतहि थोडीबहुत करण्यांत आलीच आणि त्याचें एक ठळक उदाहरण म्हणजे कलिवर्ज्यांची यादी हें होय. पण हे फेरफार करीत असतांना त्यांनीं जी भूमिका स्वीकारली ती मात्र

अशी कीं, काल वाईट येत चालला, पूर्वींच्या लोकांचें तेज आपणांत राहिलें नाहीं, त्यांना अनेक गोष्टी पचत, त्या आपणांस आतां पचणार नाहींत तेव्हां युगऱ्हासानुरूप आपल्याला आचारविचार बदलले पाहिजेत. ही भूमिका स्वीकारण्यांत पूर्वींच्यांचा मान राखला जातो व आपणाकडे कमीपणा घेतल्यामुळें विनयहि शोभून दिसतो. पण हा विनय प्रमाणाबाहेर गेल्यास विचारस्वातंत्र्य कोळपतें व मन खुरटें होतें. तें कसें हें दृक्प्रत्ययसिद्ध असें जें ज्योतिषशास्त्र त्यांतहि प्रामाण्याचें बंड माजलें यावरून लक्षांत येईल. दीक्षितांच्या ग्रंथास लिहिलेल्या प्रशंसनांत वैद्य उद्गारतात कीं, 'बहुतेक ज्योतिषाचार्यांनीं 'प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं' हा सिद्धान्त मानून आपल्या नांवानें ग्रंथ लिहिले. पण आपल्या दुर्दैवानें सूर्यसिद्धान्तकारानें मात्र आपली माहिती साक्षात् सूर्यापासून सांगितली अशी थाप आपल्या ग्रंथांत दिली आणि तेव्हांपासून ज्योतिषांत शब्दप्रामाण्याचें बंड सुरू झालें आणि शास्त्राची वाढ खुंटली.' या शास्त्रांतील अंधःश्रद्धेविषयीं खुद्द दीक्षित लिहितात, 'वेदांगज्योतिष सांप्रत जें वैदिकांच्या पाठांत आहे त्याविषयीं एक मोठा चमत्कार आहे. तो असा कीं, अर्थाकडे लक्ष दिलें तर वैदिकांच्या पाठांतल्या पुष्कळ श्लोकांत कांहीं कांहीं अशुद्धें आहेत; आणि असें असून सर्व ब्राह्मणांच्या तोंडीं सर्व देशभर एक पाठ ! आणि या पाठाची योग्यता साक्षात् वेदाप्रमाणें मानण्यांत येते ! ( पृ. ७१ )

## प्रतिनिविष्ट पंडित

या कालांत परमुलखांतील मुशाफरी खुंटल्यानें विद्येच्या बाबतींत बाहेरून कांहीं घेण्यासारखें आहे ही कल्पनाहि उरली नाहीं. अनेक शतकें शास्त्र, विद्या, कला वगैरेच्या क्षेत्रांत अखिल जगताच्या आघाडीवर मिरविल्यामुळें आमच्या पंडितांची दृष्टि स्वतःच्या ज्ञानानेंच दिपून गेली आणि ते आपल्याच मानीव जगांत मिरवूं लागले. भोंवतालच्या

सत्यसृष्टीशीं ते पारखे होऊं लागले. हे पंडित प्रायः राजाश्रयावर गबर होत आणि आपल्या आश्रयदात्याच्या औदार्याचें व आपल्या विद्वत्तेच्या वैभवाचें अतिरिक्त वर्णन करण्यांतच गढून गेलेले असत. मासला म्हणून मिताक्षरेच्या शेवटीं विज्ञानेश्वरानें स्वतः-विषयीं व आपल्या आश्रयदात्याविषयीं जे उद्‌गार काढले ते पाहा : " आमच्या कल्याणनगरासारखें ( दक्षिण हैदराबादेजवळील ) नगर अखिल अवनीतलावर आज दुसरें कोठेंहि नाहीं, पूर्वी झालें नाहीं, पुढें होणार नाहीं. आणि या नगरींतील श्रीविक्रमासारखा पृथ्वीपति दुसरा पाहावयास सापडणार नाहीं, कीं ऐकावयास मिळणार नाहीं. आणि या त्याच्या पदरीं असलेला पंडित जो विज्ञानेश्वर त्याला तर दुसऱ्या कोणाची उपमाच नाहीं. कल्पवृक्षाच्या तोलाची ही त्रिपुटी कल्पांतापर्यंत नांदो ! "

महंमद गझनीच्याबरोबर हिंदुस्थानांत आलेला हुशार आणि चौकस बुद्धीचा मुस्लीम पंडित अल्बेरुणी यानें आमच्या संस्कृतींत उत्पन्न झालेला हा दोष अचूक हेरला होता. आपल्या ग्रंथाच्या आरंभींच हिंदुस्थानांतील लोकांच्याकडून जरूर ती माहिती मिळविण्याच्या मार्गांतील अडचणींचें वर्णन त्यानें केलें आहे. त्यांत हिंदु पंडितांच्या प्रतिनिविष्टतेविषयीं तो लिहितो, " हिंदु लोकांना असें वाटतें कीं, जगांत त्यांच्या देशासारखा देश नाहीं, त्यांच्यासारखें राष्ट्र नाहीं, त्यांच्या राजासारखे राजे नाहींत, धर्मासारखा धर्म नाहीं, आणि शास्त्रासारखें शास्त्र नाहीं. अहंकार, प्रतिनिविष्टता, वृत्तीचा ताठरपणा हे सर्वच त्यांच्यांत भरलेले आहेत. त्यांना असें वाटतें कीं, जगांत जर कोठें शास्त्र, विद्या, कला असतील, तर त्या फक्त आपल्या देशांत. तुम्हीं जर खुरासानमधील किंवा पर्शियामधील विद्वानांच्याविषयीं त्यांच्याशीं बोलणें काढलेंत, तर ते तुम्हांला तत्काळ मूर्खांत काढतील. ते जर थोडेसे बाहेरच्या देशांत फेरफटका करून येतील तर त्यांना आपली चुकी तात्काळ लक्षांत येईल. पण ते देशाबाहेर पाऊल टाकून

इतरांच्यांत मिसळतील तेव्हां ना! त्यांचे पूर्वज कांहीं असल्या खुरट्या वर्तनाचे नव्हते. त्यांचा एक प्राचीन विद्वान् ज्योतिषी वराहमिहिर यानें लिहिलें आहे कीं, ग्रीक लोक हे पवित्र नसले तरी त्यांनीं ज्ञानांत इतरांच्यापेक्षां वरचढ केली असल्यानें त्यांच्याविषयीं पूज्यभाव बाळगिला पाहिजे."

परकीय प्रवाशानें केलेलें हें रोगनिदान यथार्थ होतें. पूर्वीसारखा विश्वसंचार चालूं राहिला असता, धर्मोपदेशक या नात्यानें, सौदागर या नात्यानें पूर्वीसारख्या त्रिखंडांतील मुशाफरी सुरू असत्या, तर परदेशांत चाललेल्या नव्या प्रयोगांची दखलगिरी राहिली असती. पण धाडसी मुशाफरीला प्रोत्साहन देणारा सामाजिक व आर्थिक व्यवहारांतील लवचिकपणा नष्ट झाल्यामुळें असो वा कोणत्याहि कारणामुळें असो, ही मुशाफरी दहाव्या शतकानंतर बंद पडली. यामुळें युरोपमध्यें पंधराव्या सोळाव्या शतकापासून पुढें विद्येच्या अनेक क्षेत्रांत जी विलक्षण जागृति झाली त्याच्याविषयीं नुसती पुसट कल्पनाहि आमच्याकडील पंडितांना आली नाहीं. आपल्याच तेजानें दिपून गेलेले आमचे पंडित फक्त त्या त्या विषयावरील पूर्वाचार्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांवर टीका, उपटीका, उपोपटीका लिहून पूर्वाचार्यांच्या शब्दांचा कीस काढण्यांत धन्यता मानूं लागले. युरोपमध्यें मध्ययुगीन कालांत हाच प्रकार झाला होता. या काळांतले पाश्चात्य पंडित प्राचीन होमरचें काव्य कसे पिंजीत बसले होते याचें 'हिस्टरी ऑफ् क्रिटिसिझम्'चा लेखक सेंट्स्बरी वर्णन करितो कीं, "In scholia on Homer we have thrice, nay thirty times decocted essense of the critical study of generations, centuries, millenia. We have comment on comment of annotated annotation." (खंड १ ला) असाच प्रकार आमच्याकडेहि झाला. शंकराचार्यांसारख्या अव्वल दर्जाच्या तत्त्वज्ञान्यानेंहि स्वतंत्र ग्रंथ न लिहितां प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहून

त्यांची एकवाक्यता करून आपलें तत्त्वज्ञान त्यांच्या मुखांतून वदविलें. ही परंपरा आठव्या शतकांतल्या शंकराचार्यांपासून जी सुरू झाली, ती विसाव्या शतकांतल्या टिळकाचार्यांपर्यंत अखंड राहिली. हजार वर्षे चालत आलेली आपली ही परंपरा ओळखूनच टिळकांनींहि आपलें कर्मयोगाचें तत्त्वज्ञान स्वतंत्र ग्रंथरूपानें न मांडतां गीतेवरील भाष्याच्या रूपानें मांडलें.

आठव्या शतकानंतर विद्येच्या सर्व शाखोपशाखांत ही स्थिति आढळून येते. न्यायशास्त्राचें उदाहरण घ्या. प्रथम दर्शनकार गौतम यानें सूत्रें रचिलीं, त्यांवर वात्स्यायनानें भाष्य लिहिलें, या भाष्यावर बौद्धांच्याकडून जी टीका झाली ती खोडण्याकरितां उद्योतानें भाष्यवार्टिका लिहिली. पुढें कांहीं कालानें या वार्टिकेवर वाचस्पति मिस्रानें वार्तिक-तात्पर्यटीका रचिली. या तात्पर्यटीकेवर पुन्हा उदयनानें तात्पर्य-टीकापरिशुद्धि निर्माण केली. ह्या टीकेवर पुन्हा 'न्यायनिबंधप्रकाश', त्यावर आणखी 'वर्धमानेन्दु', पुन्हा वर्धमानेन्दुचा प्रकाश खुलविण्याकरितां 'तात्पर्यमंडन'. अशा रीतीनें पुटावर पुटें चढून गेलीं (दासगुप्त-भारतीय तत्त्वज्ञान). पण आमूलाग्र विचार या पुटांच्याखालीं गुदमरून गेला.

## विचार-स्वातंत्र्याचा लोप

विचारस्वातंत्र्य कसें लोपूं लागलें होतें याचीं अनेक शास्त्रांतील उदाहरणें देतां येतील. पैकीं दृक्प्रत्ययनिष्ठ जें ज्योतिषशास्त्र त्यांतील विशेष रोचक होत. त्यांतील संपातचलन व ग्रहण हे दोन विषय पाहूं. आधुनिक खगोलविज्ञानाच्या मतानें संपाताचें विलोम-गतीनें संपूर्ण भ्रमण होतें असें मानलें जातें.* आपल्या ज्योतिषा-

* वर्षांतील ज्या दिवशीं दिवस-रात्र सारखीं असतात त्या दिवशीं सूर्य ज्या स्थानीं असतो त्यास संपात म्हणतात. हें स्थान विलोम-गतीनें म्हणजे कृत्तिका, भरणी, आश्विनी अशा रोखानें हळूहळू सरकत

चार्यांतहि हें संपूर्ण भ्रमण मानणारा मुंजाल नांवाचा आचार्य दहाव्या शतकांत होऊन गेला. पण मुंजालाचें मत खरें मानलें तर श्रुतींतील अमक्या मासांत अमुक ऋतु येतो या वचनाला विरोध येतो; म्हणून भास्कराचार्यांचा सतराव्या शतकांतील टीकाकार मरीचिकार मुनीश्वर यानें मुंजालास दोष दिला व संपाताचें आंदोलन मानणेंच योग्य असें ठरविलें. त्यावर दीक्षित लिहितात 'मरीचिकारांनीं मुंजालास दोष दिला तो त्याच्या दृष्टीनें ठीक आहे. पण संपाताची प्रदक्षिणा पूर्ण होणें न होणें हें आपल्या हातीं नाहीं हें मरीचिकाराच्या लक्षांत आलेलें नाहीं ! (पृ. ३३२). स्मृतिपुराणादि ग्रंथांतून वर्णिलेली युगगणनेची पद्धतीहि ज्योतिषशास्त्रास संमत नाहीं. पण ती स्मृतिप्रणीत असतांहि रोमकसिद्धान्त नांवाच्या ग्रंथाच्या कर्त्यानें स्वीकारली नाहीं म्हणून ब्रह्मगुप्ताचार्यानें त्यावर ठपका दिला आहे. तो लिहितो : "युगमन्वंतर-कल्पाः कालपरिच्छेदकाः स्मृतावुक्ताः। यस्मान्नरोमके ते स्मृतिबाह्यो रोमकस्तमात्॥" (पृ. १५५)

याच ब्रह्मगुप्तानें ग्रहणांच्याविषयीं दुसऱ्या एका आचार्याच्या शास्त्रीय विचारसरणीची कशी थट्टा केली आहे हें पाहण्यासारखें आहे. पांचव्या शतकांत आर्यभट्ट नांवाचा एक कुशाग्र बुद्धीचा ज्योतिषी आपणांत होऊन गेला. बहुतेक ज्योतिषी असें मानीत कीं, आकाशांतील सूर्यचंद्रादि तेजोगोल पूर्वेकडून पश्चिमेकडे जातांना रोज दिसतात

---

जात असतें. पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं फिरत असतां तिच्या आंसाचें टोक उत्तर ध्रुवाकडे रोकलेलें असतें. पण चंद्राच्या आकर्षणामुळें तें स्थिर राहत नसून ध्रुवाभोंवतीं अत्यंत सूक्ष्मगतीनें शेंकडों वर्षांत लहानशा वर्तुलाकार कक्षेंत फिरत असतें. याचा परिणाम संपातावर होतो. सायनवादी हे चलमान संपात हें वर्षाचें आरंभस्थान मानतात. त्यामुळें ऋतुमान व महिने यांत फरक होत नाहीं. निरयनवादी आरंभस्थान अचल मानतात, त्यामुळें कालांतरानें ऋतुचर्येंत फरक पडतो.

तो भ्रम नसून तें त्यांचें वास्तविक भ्रमणच होय. आर्यभट्ट हा एकच एक ज्योतिषी मात्र असा होऊन गेला, कीं ज्यानें हें सामान्य मत चुकीचें ठरविलें. सूर्यचन्द्रादिकांचें भ्रमण हें वास्तविक नसून पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं फिरते त्यामुळें उत्पन्न झालेला दृक्भ्रम होय असें त्यानें निःसंदिग्धपणें प्रतिपादन केलें.* अनुलोमगतिः नौस्थः पश्यत्यचलं विलोमगं यद्वत् । अचलानि भानि तद्वत् समपाश्चिमगानि लङ्कायाम् ॥ पण नंतरच्या ग्रंथकारांनीं त्याला जवळजवळ मूर्खांत काढलें. येथें 'मूर्खांत काढले' हे शब्द मी अतिशयोक्तीनें लिहीत नाहीं; कारण सातव्या शतकांतील ब्रह्मगुप्त यानें आर्यभट्टाविषयीं असें टाकून लिहिलें आहे कीं, या आर्यभट्टानें इतक्या चुका केलेल्या आहेत कीं, त्यांची गणती करणें अशक्य आहे. 'आर्यभट्टदूषणानाम् संख्यां वक्तुं न शक्यते !' तो विचारतो, पृथ्वी जर खरोखर फिरत असती तर तिच्यावरचे डोंगर-पर्वत ढासळले नाहींत कसे? "आवर्तनं उर्व्याः चेत् न पतन्ति समुच्छ्रयाः कस्मात् ।" दुसरा एक लल्ल नांवाचा ग्रंथकार शंका प्रदर्शित करितो कीं, पृथ्वी जर फिरत असती तर सूर्योदयीं घरट्याबाहेर पडलेल्या पक्ष्यांना सायंकालीं आपलीं घरटीं कशीं सापडलीं असतीं ? 'यदि च भ्रमति क्ष्मा तदा स्वकुलायं कथमाप्नुयुः खगाः' (दीक्षित–पृष्ठें १९९, १९७, २२८). याच ब्रह्मगुप्ताला, अल्बेरुणीच्या हकीकतीवरून पाहतां, ग्रहणें हीं राहूकेतूनें चंद्रसूर्य ग्रासल्यामुळें लागतात असलें अशास्त्रीय मत आग्रहानें प्रतिपादन करावें लागलें. यावरून शब्दप्रामाण्याचा पारा कसा चढत चालला होता हें कळून येतें. ब्रह्मगुप्ताच्यापूर्वी होऊन गेलेल्या ज्योतिष्यांना चंद्रग्रहण हें पृथ्वीच्या छायेमुळें होतें ह्या शास्त्रीय सत्याचा

---

* मागें सातव्या प्रकरणांत पृ. १४५, ओळ १५ येथें पृथ्वी 'सूर्याभोंवतीं फिरते' असें चुकून पडलें आहे, तरी त्या ठिकाणीं 'स्वतःभोंवतीं फिरते' असें वाचावें.

शोध लागलेला होता. कविकुलगुरु कालिदास यानें 'रघुवंशां'त उपमा म्हणून या शास्त्रीय शोधाचा, सीतेवरील निष्कारण आरोपाचा फोलपणा दाखविण्यासाठीं कसा समर्पक उपयोग करून घेतला होता हें सुशिक्षित वाचकांना सांगावयास नकोच. म्हणजे या शास्त्रीय शोधाचें ज्ञान कविलोकांत पसरलें असतांहि ब्रह्मगुप्ताला राहूकेतूंनाच पाठीशीं घालावें लागलें. यासंबंधींचें ब्रह्मसिद्धान्ताच्या पहिल्या प्रकरणांतील अवतरण अल्बेरुणीनें आपल्या ग्रंथांत घेतलें आहे. त्या अवतरणांत म्हटलें आहे, " कांहीं लोक म्हणतात कीं ग्रहणें हीं राहू-केतूमुळें लागत नाहींत. पण हा निव्वळ मूर्खपणा होय. वेद हे साक्षात् ब्रह्मदेवाच्या मुखांतून निसृत झालेले. ते म्हणतात कीं, ग्रहणें राहूकेतूंच्या ग्रासामुळें लागतात. स्मृतिकार मनु, ब्रह्मपुत्र गर्ग, यांचाहि असाच अभिप्राय आहे. पण या वेदप्रणीत व सुप्रतिष्ठित मताच्या विरुद्ध वराहमिहिर, श्रीशेण, आर्यभट्ट, विष्णुचंद्र प्रतिपादन करीत आहेत कीं, ग्रहणाशीं राहूकेतूंचा काडीमात्र संबंध नाहीं म्हणून. आतां हें जर खरें असेल तर ग्रहणाच्या काळीं ब्राह्मणलोक अंगाला गरम तेल लावतात व शास्त्राज्ञेनुसार धर्मकृत्यें करितात तीं फुकट म्हणायचीं ! ग्रहणाविषयींची त्यांची कल्पना जर खोटी असेल तर त्यांच्या धार्मिक कृत्यांचें फल त्यांना स्वर्गांत कसें मिळूं शकेल ? म्हणून वेद आणि मनुसंहिता अशा प्रमाणग्रंथांच्या विरुद्ध जातील असलीं मतें, वरीलसारख्या ग्रंथकारांनीं मांडण्याचें सोडून द्यावें हाच उत्तम मार्ग. कारण वेद, स्मृति आणि संहिता यांत जें जें आलेलें आहे तें सर्व सत्य होय." Everything which is in Veda, Smriti and Samhita is true. (साचौ, खंड २, पृ. १११). ब्रह्मगुप्तानें ज्या गर्गाचा उल्लेख केला आहे त्या गर्गाची दृष्टि किती विशाल होती हें म्लेंच्छांपासूनहि ज्ञानग्रहण करण्यास तो तयार होता याविषयीं दहाव्या प्रकरणांत 'म्लेंच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रं इदं स्थितम् ।' हा जो श्लोक दिला आहे त्यावरून दाखविलेंच आहे. यावरून

ब्रह्मगुप्ताच्या कालानंतर स्वतंत्र विचाराचे वारे उलटे वाहूं लागले असें दिसतें. पाश्चात्य गॅलिलिओप्रमाणें खुद्द ब्रह्मगुप्ताला कदाचित् छळहि सोसावा लागला असेल आणि म्हणून त्यानें शास्त्रीय सत्य दडपून टाकून रूढ मताला मुजरा केला असेल. सूर्यावरील डाग स्पष्टपणें दुर्बिणींतून पाहिलें असतांहि व तें पाहिल्याचें प्रकटपणें प्रतिपादन केल्यावरहि अंतीं धर्माचार्यांच्या छळाला कंटाळून आपलें मत भ्रामक होय असें गॅलिलिओनें दीनवाणें जाहीरपणें कबूल केलें, तसाच प्रकार ब्रह्मगुप्ताच्या बाबतींतहि झाला असावा. कारण अल्बेरुणी लिहितो : "मला तर वाटतें कीं, ब्रह्मगुप्तासारख्या कुशाग्र बुद्धीच्या ज्योतिष्यानें वरीलसारख्या रूढ मताचें समर्थन जेव्हां केलें, तेव्हां साक्रेटिसासारखी त्याच्यावर कांहीं तरी मोठी आपत्ति आलेली असावी. त्यानें ब्रह्मसिद्धान्त रचिला तेव्हां तो अवघा तीस वर्षांचा होता. त्याच्यावर खरोखरच कांहीं आपत्ति आली असेल तर त्याला अधिक दूषण न देतां मी हा विषय येथेंच सोडून देतों" (पृ. ११२). उत्तरकालीं त्यानें शास्त्र आणि रूढि यांचा मेळहि घातला. ब्रह्मसिद्धांताच्या गोलाध्यायाचा उल्लेख करून दीक्षित लिहितात कीं, 'चंद्रग्रहणीं भू-छायेमध्यें आणि सूर्यग्रहणीं चंद्रामध्यें प्रवेश करून राहू चंद्रसूर्यांस आच्छादतो असें ब्रह्मगुप्तानें सांगितलें आहे' (पृ. ४४३).

सॉक्रेटिसानें मृत्यु स्वीकारला, पण मतें सोडलीं नाहींत. यामुळें त्याचें नांव ग्रीसच्या इतिहासांत अजरामर होऊन राहिलेलें आहे. गॅलिलिओनें धर्मच्छळापुढें नमतें घेतलें तरी त्याच्या पश्चात् धर्ममतांना धूप न घालतां शास्त्रीय सत्याची निष्ठेनें जोपासना करणारी परंपरा युरोपमध्यें निर्माण झाली. तशी परंपरा आपल्याकडे मात्र दुर्दैवानें निर्माण झाली नाहीं. हें दर्शविण्याकरितांच ज्योतिषशास्त्रांतील थोडा तपशील येथें दिला आहे. भारतीयांची धार्मिक वृत्ति ही उदार व सहिष्णु कशी होती हें आपण मागें पाहिलेंच आहे. त्यामुळें वेदांना शेलक्या शिव्या

मोजणारा चार्वाक याचाहि छळ झाल्याचें आढळत नाहीं. पण हेंहि नमूद केलें पाहिजे कीं, येथें नवीन विचाराकरितां झगडणारे वीरहि आढळत नाहींत. सातव्या शतकानंतर तर विवेकवादी तर्कनिष्ठ विचारप्रवाह आटत जाऊन अंधश्रद्धेचें वैराण वाळवंट सगळीकडे पसरूं लागलें व गूढविद्येचें बंड माजलें. साक्षी-पुराव्यांचें सत्यासत्य ठरविण्याच्या बाबतींत दिव्य करण्याच्या पद्धतीस तेजी आली. सर्वत्र धर्मभोळेपणाचें वातावरण पसरलें. सन ११२३ च्या सुमारास गांगेयदेव नामक राजानें मुक्ति मिळविण्या-करितां आपल्या शंभर स्त्रियांसह गंगेमध्यें उडी घेतली असें त्याच्या मुलानेंच एका ताम्रलेखांत लिहून ठेविलें आहे! (काणे—धर्मशास्त्र-विचार, पृ. २०५). शत्रूवर जय मिळविण्याच्या बाबतींतहि पुराण-ग्रंथांतून जारणमारणाचे मंत्र सविस्तर देण्यांत येऊं लागले. दहाव्या-अकराव्या शतकांतील 'अग्निपुराण' हा एक ज्ञानकोशच आहे. त्यांत 'सर्वदा जप होमाद्यैः पाठाद्यैश्च रणे जयः' असा सिद्धान्त मांडून ॐ मारय ॐ छिंद असले शत्रूला मारण्याचे मंत्र दिलेले आहेत. (अ. १३५). राजेलोक असल्या गोष्टींवर विश्वसून सैन्य सजविण्याच्या कर्तव्याकडे सर्वथा दुर्लक्ष करीत असें येथें सांगावयाचें नाहीं. पण सर्वसाधारण जनतेवर विवेकवादापेक्षां गूढवादाची छाया दाट पसरत चालली होती एवढेंच दिग्दर्शित करावयाचें आहे.

उदाहरणार्थ, देशावर परचक्र आलें तर देशांतील जागतीं दैवतें आपलें रक्षण करतील अशा कल्पना जनतेंत पसरत. महंमद कासीमनें सिंधमधील देबाल शहराला वेढा दिला. त्या शहरांत देवाचें मंदिर असून त्यामध्यें उंच ध्वज फडकत असे. ह्या ध्वजा-संबंधीं लोकांची अशी भोळसट समजूत होती कीं, मंदिराचा हा उंच ध्वज जोंवर वाऱ्यावर फडफडतो आहे तोंवर देबाल शहराला कोण-त्याहि प्रकारचा धोका नाहीं. महंमुदाला याचा सुगावा लागतांच त्यानें पहिली गोष्ट केली ती हीच कीं, त्यानें आपला मोर्चा या

मंदिराकडे वळविला व आपल्या मडिमारयंत्राचा मारा करून मंदिराचें शिखर व त्यावरील ध्वज हीं जमीनदोस्त केलीं. शहरवासीयांचा उत्साह खचला हें सांगावयास नकोच. (म. भारत, खंड १)

## सामाजिक तत्त्वज्ञानाची विकृति

या कालांत समाजधारणात्मक तत्त्वज्ञान विकृत होऊं लागलें. जातिभेदाचीं बंधनें अधिक कडक झालीं. निरनिराळ्या जातींत पूर्वी अन्नोदक व्यवहार होत असे तो बंद पडून सोवळ्या-ओवळ्याचें बंड मर्यादेबाहेर वाढलें. बंधनें कडक झाली म्हणून आचार सुधारला असें नाहीं. कुमारिलभट्टांनीं आचारव्यतिक्रमाचीं उदाहरणें म्हणून 'अद्यत्वेपि मथुरा-निवासी ब्राह्मणीनां सुरापानम्' व ब्राह्मण लोक घोडे, उंट, खेचरें, सिंह यांचा व्यापार करितात म्हणून निर्देश केला आहे. (जै. १-१-३ वरील तंत्र वार्तिक). उच्चवर्णीयांनीं उजळ माथ्यानें व्यापारांत भाग घेतला असता तर वैश्यवृत्ति सुधारली असती. तेंहि झालें नाहीं. आठव्या शतकांतील देवल स्मृतिकारानें बलात्कारानें बाटविल्या गेलेल्या स्त्रीपुरुषांना शुद्धिसंस्कार करून पुन्हा जातींत प्रविष्ट करावें असें प्रतिपादिलें होतें. पण अकराव्या शतकांतील अल्बेरुणी लिहितो कीं, 'शुद्धीचें प्रायश्चित्त सांगितलें असलें तरी व्यवहार पाहिला असतां बाटलेल्यांना पुन्हा पहिल्या जातींत प्रविष्ट केलें जात नसे. पुष्कळ वेळां त्याची स्वतंत्र जात होई.' या व रोटीबेटी व्यवहाराच्या कडक बंदीमुळें पोटजातींची संख्या अतोनात वाढली. जुलुमानें बाटविलेल्यांना परत न घेण्यांत आपण आपल्या राष्ट्राचें संख्याबल खच्ची करीत आहोंत याची जाणीव नष्ट झाली. 'रजसा शुद्ध्यते नारी विमलं कांचनं यथा' असलीं वचनें मागें पडून कलिवर्जाच्या कल्पनेप्रमाणें बलात्कारानें दूषित झालेल्याहि स्त्रीचा स्वीकार करणें निषिद्ध ठरविलें. 'बलात्कारादि दुष्टस्त्रीसंग्रहो विधिमोदितः' समुद्रयान करणें हें पाप मानण्यांत येऊं लागलें. मलबार

किनाऱ्यावरील राजांना पूर्वापार चालत आलेला समुद्रावरील व्यापार हातीं ठेवावयाचा होता; पण समुद्रयान करणें हें तर शास्त्रानें निषिद्ध ठरविलें. तेव्हां त्यांनीं अशी विक्षिप्त तोड काढली कीं, प्रत्येक हिंदु कुटुंबांतील एकेका व्यक्तीनें इस्लाम धर्म स्वीकारावा आणि दर्यावर्दीपणा चालवावा! असल्या तर्कदुष्ट विचारसरणीनें आपण आपल्या शत्रूंचें संख्याबल वाढवीत आहोंत याची ह्या राजे लोकांना कल्पनाहि नसावी हें आश्चर्यच होय. असाच प्रकार मध्यप्रांतांत हलवी नांवाची जात आहे त्यांच्यासंबंधीं आढळतो. त्यांच्यांत अशी चाल आहे असें म्हणतात कीं, या जातींत जी अनौरस संतति निर्माण होते ती मुसलमानांस अर्पण करण्यांत येते. जुलूमजबरदस्तीनें बाटविण्याचा प्रयत्न परधर्मीय करीतच होते. त्यांत ही आणखी भर. बाटलेल्यांना परत घेण्याची तर आवश्यकताहि उमगेनाशी झाली. विहिरींत पाव टाकून सबंध खेडें बाटलें तर तेवढ्यानेंहि तें कायमचें बाटलें गेलें असें मानण्यापर्यंत समाजधारणेच्या तत्त्वज्ञानाची अधोगति झाली.

धार्मिक बाबतींतहि सोवळ्या-ओवळ्याचें, व्रतवैकल्याचें आणि शुभाशुभ मुहूर्तांचें बंड माजत चाललें. बुद्ध भिक्षु आणि भिक्षुणींना नैष्ठिक ब्रह्मचर्यानें राहण्याची आज्ञा असे. पण आळशीपणामुळें आणि पोटभरूपणामुळें संघांत शिरलेल्या असंख्य भिक्षु-भिक्षुणींना, योग्यांनाहि कठीण असा मनोनिग्रह साध्य होणें दुर्घटच होतें. यामुळें मठांतून गुप्त अनाचार तर माजलेच, पण या अनाचाराला उघडपणें मिरवितां यावें म्हणून तांत्रिक पंथांतील जो वाममार्ग त्याचें तत्त्वज्ञान निर्माण झालें. त्या पंथांतील पापमय मद्यमैथुनादि पंच'मकारां'ना पुण्याचीं साधनें म्हणून मिरवितां येऊं लागलें. 'प्रज्ञोपायविनिश्चयसिद्धि'सारख्या तंत्र ग्रंथांतून "जनयित्रीं स्वसारं च स्वपुत्रीं भागिनेयिकां। कामयन्तत्त्वयोगेन लघु सिध्येति साधकः" ॥ असलीं बाष्कळ मतें उघडपणें मांडण्यांत येऊं लागलीं. (गंगापुरातत्वांक, पृ. २१९) वैदिक धर्मीयांनींहि हा प्रकार अन्य तऱ्हेनें मान्य केला. यांच्यामध्यें मधुरपंथ आणि पुष्टिमार्ग निर्माण

झाले आणि त्यांनीं आध्यात्मिक रूपकाच्या सबबीवर राधाकृष्णांच्या कामुक लीलांचें अमर्याद वर्णन करण्यास सुरुवात केली. अकराव्या शतकांतील जयदेवाचें गीतगोविंद हें नादमाधुर्य आणि भावोत्कटता या दृष्टींनीं एक श्रेष्ठ दर्जाचें काव्य आहे. पण यांतील भाव म्हणजे उत्तान शृंगार असून तोहि परस्त्रीविषयक आहे याची जाणीव या काव्याचें रसग्रहण करीत असतां मनाला टोचल्याशिवाय राहत नाहीं. राधा म्हणजे आत्मा आणि कृष्ण म्हणजे परमात्मा असें कितीहि निक्षून सांगितलें व राधेचें प्रेम हें शुद्ध निष्कामभक्तीचें प्रतीक होय असें कितीहि बजावलें तरी असल्या प्रेमाचें प्रतीक म्हणून उत्तान वैषयिक शृंगाराचें वर्णन करावें हें विकृत मनोवृत्तीचेंच लक्षण होय.

## नाटकांतील प्रतिबिंब

अकराव्या शतकांतील कृष्णमित्र नांवाच्या एका यतीनें प्रबोध-चंद्रोदय नांवाचें एक वेदांतपर रूपकात्मक नाटक लिहिलें आहे. त्यांत त्या वेळच्या कांहीं धार्मिक पंथांतील आचारांचें जें वर्णन आलें आहे तेंही त्या काळच्या धर्माच्या प्रांतांत माजलेल्या वैचारिक अराजकतेचें निदर्शक आहे. नाटकाच्या तिसऱ्या अंकांत शांति आणि करुणा या दोन स्त्रिया आपली मैत्रीण जी श्रद्धा तिच्या शोधाकरितां निरनिराळ्या पंथांच्या मठांतून तपास करीत हिंडतात असें दाखविलें आहे. त्या दिगंबरांच्या मठाजवळ आल्यावर त्यांना एक क्षपणक भेटतो. तो ओंगळ चिखलानें माखलेला, डोक्याचे केस उपटून काढलेला, आणि मोरपिसें हातांत घेऊन नागडाउघडा नाचणारा असा प्रवेश करतो. तो आकाशाकडे पाहून म्हणतो, "ॐ प्रभो अलिहन्ताणम्।--" आत्मा विमल आहे, आणि त्याचें ज्ञान ऋषींची सेवा केल्यानें होतें. आतां ही सेवा कशी करावयाची म्हणतां? तर सांगतों ऐका. त्यांना घरीं बोलवून उत्तमोत्तम पक्वान्नांचें भोजन घालावें आणि ते स्त्रियांशीं रंगून गेले तरी आपल्या मनाची शांति ढळूं देऊं नये– ईर्ष्यामलं न कार्यं ऋषीणां दारान्रममाणानाम्" त्यानंतर

शांति आणि करुणा ह्या बुद्ध भिक्षूंच्या मठाकडे वळतात. तेथें त्यांना बुद्ध भिक्षूंचे विचार ऐकावयास सापडतात. तेथील बुद्ध भिक्षु म्हणतो, "अहो, हा सौगत धर्म सर्व श्रेष्ठ आहे. ह्यांत भोग आणि मोक्ष ह्या दोहोंचीहि चंगळ आहे. या धर्मांत सधन श्रेष्ठींच्या सुंदर स्त्रिया आणि मिष्टान्न भोजन यांच्या संगतींत चांदण्या रात्रीं मोठ्या मजेंत जातात! असें पाहा, संसार क्षणिक आहे, आत्मा क्षणिक आहे म्हणून भिक्षूंनीं स्त्रियांच्याकडे वाईट नजरेनें पाहिलें तरी चित्तांत मत्सराला थारा देऊं नये. कारण मत्सर हें मनाचें मालिन्य होय." नंतर शांति आणि करुणा ह्या कापालिकांच्या आश्रमाकडे वळतात. तेथें त्यांना एक नररुंडमाला धारण करणारा कापालिक भेटतो. तो आपल्या पंथांतील उपासनेचें महत्त्व दिगंबर आणि भिक्षु यांना पटवून देतांना वर्णन करितो कीं, "आमचा धर्म कोणता म्हणून विचारतां? तर आम्ही महाभैरवाची पूजा करितों, आणि ती कशी? तर जित्या माणसाचा कंठनाल चिरून, त्यांतून चिळकांड्याप्रमाणें उडणाऱ्या रुधिराचे आम्ही बलिदान करितों! आणि मृताच्या कवटीच्या चषकांत सुरेचा नैवेद्य समर्पण करितों! आमचा पंथ हा भोगाचा पंथ आहे. आमचा देवाधिदेव जो चंद्रचूड तो पार्वतीसमागमें नेहमीं कैलासावर क्रीडा करीत असतो." नंतर हा कापालिक तो भिक्षु, व दिगंबर यांना आपला महाप्रसाद म्हणजे दारू प्यावयास देतो व ते ती यथेच्छ पिऊन तर्र होऊन आनंदानें नाचूं लागतात.

हें वर्णन एका नाटकांतलें आहे आणि तेंहि एका प्रतिपक्षीयानें केलेलें आहे. त्यामुळें तें अतिरंजित आहे हें उघड होय. हें त्या काळाचें प्रतिनिधिरूप म्हणून घेतांना अतिशयोक्ति गाळूनच स्वीकारलें पाहिजे. पण याच काळांत धार्मिकांनीं कृष्णराधेच्या लीला वर्णाव्या, काव्यमीमांसकांनीं ध्वनिकाव्य अथवा उत्तम काव्य यांचीं उदाहरणें म्हणून अनैतिक शृंगाराचीं वर्णनें एकजात द्यावीं, कवींनीं दानपत्राच्या प्रारंभीं ईशस्मरण करावयाचें तेंहि

अकुंठोत्कंठवैकुंठकंठपीठलुठत्करः । संरंभः सुरतारंभे स श्रियः श्रेयसेस्तु वः ' असल्या कामुक वर्णनानें करावें, या सर्व गोष्टी साकल्यानें एकत्र घेतल्या असतां राष्ट्राची विवेकवादी बैठक भंग होऊन बुद्धीचा तोल जाऊं लागला होता असें स्पष्ट दिसतें. एका बाजूला वर्षांचे बारा मास आणि दिवसाचे तिन्ही त्रिकाळ पुरून उरतील इतकीं देहदंडन करणारीं व्रतवैकल्यें आणि दुसऱ्या बाजूला धर्माच्या नांवाखालीं आणि काव्याच्या नांवाखालीं भोगलालसेची तृप्ति करणारे विविध प्रकार हें राष्ट्राची विवेकबुद्धि घसरूं लागल्याचें दर्शक होय. युरोपमध्येंहि अंधश्रद्धेचें तमोयुग दाट माजलें होतें. पण पंधराव्या सोळाव्या शतकानंतर त्याच्या बुद्धीला लागलेलें ग्रहण सुटलें आणि आपल्याकडे दिवसेंदिवस खग्रास होत चाललें असा एकंदरींत प्रकार झाला. कृष्णमिश्रानंतर दोन शतकांनीं ज्ञानेश्वराच्या काळीं आमच्याकडे व्यवहारनिपुण हेमाद्रि व्रतवैकल्यांचा याद्या तयार करीत होता, तर त्याच काळीं पाश्चात्यांत उपाध्याय वृत्तीचा रॉजर बेकन हा शास्त्रीय प्रयोगाचें महत्त्व लोकांना पटवीत होता आणि शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर माणसाला हवेंतून उडतांहि येईल असें भविष्य वर्तवीत होता.

या तमोयुगापूर्वी श्रद्धेचा आणि विवेकाचा असे दोन्हीहि प्रवाह जोरकसपणें वाहत होते. संन्यास, गूढवाद, मायावाद, प्रारब्धवाद, यांचा एक प्रवाह व विजिगीषा, कर्मस्वातंत्र्य, विवेकवादित्व, यांचा दुसरा प्रवाह, हे दोन प्रवाह कांहीं काल जोमदार पण अलगपणें वाहत होते. आश्रमपद्धतीचा पुरस्कार करून या दोन्ही प्रवाहांतील विरोध काढून टाकणें शक्य होतें. स्मृतिकारांनीं तसा प्रयत्नहि केला. मनूनें असा सिद्धांत मांडला कीं, सामाजिक ऋण फेडल्याखेरीज मोक्षमार्गाकडे माणसानें वळूं नये. ( ऋणानि त्रीणि अपाकृत्य मनो मोक्ष्ये निवेशयेत् ! ) इतकेंच नव्हे तर ऋणांची फेड न करितां मोक्षाच्या मार्गाला लागणाराचा अधःपात होतो असें ठणठणीतपणें बजावण्यासहि त्यानें

कमी केलें नाहीं. (अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यधः) पण स्मृतिकारांच्या या प्रयत्नालाहि यश आलें नाहीं, आणि शेवटीं विवेकवादाचा प्रवाह आटत गेला, आणि गूढवादाचा आणि अंधश्रद्धेचा फोफावत गेला. भागवत-पुराणकारानें तर भगवद्भक्ताला ऋणत्रयहि बंधनकारक नाहीं असें उघडपणें प्रतिपादण्यास कमी केलेलें नाहीं. (११-५-३७). जेते वैदिक आर्य व जित वेदबाह्य अनार्य यांच्या दीर्घ झगड्याला शेवटीं हें स्वरूप आलें ! जितांची वृत्ति ही स्वभावतःच नैराश्यमय दुःखवादी,संन्यासपर अशी बनते. ती दीर्घ काल टिकल्यास तिच्या समर्थनपर असें तत्त्वज्ञान निर्माण होतें. या जितांच्या वेदबाह्यांच्या तत्त्वज्ञानानें उत्तरकालीं वैदिक जयिष्णु तत्त्वज्ञानाला खाऊन टाकलें. महाभारतांतील संन्यास व अहिंसा यांचे प्रवक्ते विदुर, धर्म, व्याध, तुलाधार हे वेदबाह्य शूद्र होत. वेदबाह्यांशीं मिळतें घेतां घेतां वैदिक जयिष्णु वृत्ति पूर्ण नरमावली. इतकी कीं, शेवटीं सर्वच पंथ,वेदांती, बौद्ध, आणि जैन हे सर्वच असें प्रतिपादूं लागले कीं, संन्यासाकडे आणि मोक्षमार्गाकडे व्यक्तीनें हवें तेव्हां वळावें. ज्या दिवशीं किंवा ज्या क्षणीं विरक्ति उत्पन्न होईल त्या क्षणीं संन्यास घ्यावा किंवा संघांत शिरावें. अपरिपक्व बुद्धीचे लोक संघांत आणि मठांत शिरल्यामुळें त्यांत अनाचार माजला. यावर तोड म्हणून बालवयांतच संसारांत जखडून टाकण्याकरितां स्मृतिकारांनीं बालविवाहाचा पुरस्कार केला. या पुरस्कारानें अकालीं भिक्षु व भिक्षुणी होण्याच्या प्रथेस थोडा पायबंद बसला असेल, पण निर्भीड विवेकवादाची भूमिका जी एकदां ढासळली ती सावरली नाहीं.

मंत्रतंत्र, जादूटोणा, यांचे प्रकार अथर्ववेदाइतके जुने आहेत, पण त्यांचा प्रसार जाणत्यांनीं आणि श्रेष्ठांनीं केलेला नव्हता. चाणक्याच्या काळीं असले प्रकार सामान्य जनतेंत रूढ होते. देवतेची मोठी पोकळ मूर्ति करून तिच्या आंत लपून बसून देवता बोलते आहे असें भासविणें, वारुळांत आधींच सोनें पुरून

ठेवून वारुळांतील नागाच्या आराधनेनें प्राप्त झालें आहे असें दाखविणें, अंगाला लखलखणारीं रसायनें चोपडून नदींत वा सरोवरांत उभें राहून वरुण राजा आहोंत असें भासविणें, असले प्रकार चाणक्यानें वर्णन केले आहेत. पण ते कशाकरितां ? तर धूर्त राजानें या सर्व साधनांचा उपयोग मूढ व अज्ञ जनतेला फसविण्याकरितां करावा म्हणून ! फलज्योतिष, मुहूर्तविद्या वगैरेंवरहि त्याचा विश्वास नव्हता. धूर्त राजांनीं स्वतःचा बडेजाव राखण्याकरितां व लोकांना भूल पाडण्याकरितां या विद्यांचा अवश्य उपयोग करावा पण स्वतः मात्र याच्या नादीं लागू नये. नक्षत्रांच्या नादीं लागणाऱ्यापासून ऐश्वर्य दूर जातें असें त्यानें स्पष्ट प्रतिपादन केलें आहे. ( नक्षत्रं अतिपृच्छन्तं बालं अर्थः अतिवर्तते । ) पण पुढें पुढें हें विवेकवादी धोरण मागें पडून अंधश्रद्धा जोरावत चालली. गुप्तांच्या काळीं पुराणांना आधुनिक संस्करण प्राप्त झालें असें मानण्यांत येतें. या पुराणामध्यें चाणक्यानें भोळसटपणाच्या म्हणून झिडकारलेल्या सर्व भोळसट समजुतींचा जणूं कांहीं उत्साहानें पुरस्कार करण्यांत आला. या पुराणकारांनीं वंशानुचरित वर्णनाचे अनुषंगानें जुन्या इतिहासाचें थोडेंबहुत रक्षण केलें हें खरें, तसेंच अग्निपुराणासारख्या कांहीं पुराणांनीं नानाविद्यांचा संग्रह केला हेंहि खोटें नाहीं, पण हा भाग सोडून दिला तर बाकीचा निरनिराळ्या क्षेत्रांच्या वर्णनांनीं आणि उपास्यदेवतेसंबंधींच्या अतिरंजित कथांनीं भरलेला आहे. यामुळें धार्मिक भावनेला अवास्तव महत्त्व प्राप्त होऊन शास्त्र, विद्या, कला, यांच्या जोपासनेला तात्त्विक दृष्ट्या मूल्य कमी देण्यांत येऊं लागलें.

## व्यावहारिक शास्त्रांची हेळसांड

जातिभेदाचीं बंधनें दृढ होत गेल्यानें निरनिराळ्या हरहुन्नरींच्या विद्यांकडे श्रेष्ठवर्णाचे लोक दुर्लक्ष करूं लागले. बाणाच्या काळापर्यंत म्हणजे सातव्या शतकापर्यंत मिश्र विवाह चालू होते. अकराव्या

शतकांतल्या राजतरंगिणीकारानें मात्र ते सर्वस्वीं निषिद्ध ठरविले आहेत. ब्राह्मण व क्षत्रिय यांचा अनुलोम विवाहहि त्यानें त्याज्य ठरविला. (७–१२). वैद्यकीसारखा अत्यंत समाजोपकारक असा धंदा हाहि निकृष्ट मानण्यांत येऊं लागला. 'चिकित्सितात् पुण्यतमं न किंचिदपि सुश्रुम' अशी ज्या धंद्याविषयीं सुश्रुतांत यथार्थ स्तुति आहे त्या धंदेवाइका-विषयीं औशनस स्मृतीनें 'नृपायां विप्रतः चौर्यात् संजातो यो भिषक् स्मृतः' असलें मुर्दाड विधान केलें आहे. असले सर्व प्रकार युरोपांत झाले पण ते लोक त्यांतून बाहेर पडले. पण आम्ही मात्र गुरफटूनच राहिलों आणि शास्त्रविद्याकलादिकांत मागसत चाललों. एकटें ज्योतिष-शास्त्र घेतलें तर पूर्वींच्यांत व आतांच्यांत केवढें अंतर पडलें आहे हें आपल्या प्राचीन ज्योतिषशास्त्राचा ज्यांनीं आमूलाग्र अभ्यास केला आहे त्या विद्वद्वर्य दीक्षित यांच्या तोंडूनच ऐकावें. ते लिहितात— " कोपर्निकसाचा ग्रंथ शक १४६५ मध्यें झाला त्याच्या पूर्वी आमच्या देशांतील व युरोपांतील ज्योतिष सारख्याच स्थितींत होतें म्हटलें तरी चालेल. मात्र आमचें युरोपच्याप्रमाणें वर्धमान स्थितींत नव्हतें. कोपर्निकसाच्यापूर्वी नुकतेच आमच्या देशांतील शोधक ज्योतिषी पितापुत्र केशव दैवज्ञ आणि गणेश दैवज्ञ होऊन गेले. पण कोपर्निकसापासून युरोपांतल्या ज्योतिषशास्त्राचें इतकें स्थित्यंतर झालें आहे कीं, पूर्वीचें आणि नंतरचें यांस अनुक्रमें वटवृक्षाचा नुकताच उगवलेला रोपा आणि अनेक शतकें वाढून आपल्या छायेंत हजारों जीवांस आश्रय देणारा अतिभव्य वटवृक्ष यांची उपमा शोभेल " ( पृष्ठ ५२२ ). युरोपमध्यें कोपर्निकसापासून पुढें भौतिक-शास्त्रांना विलक्षण बहर आला व आम्ही मात्र आमच्या जुन्या ज्ञानाच्या चाकोरींत घाणा घालीत बसलों. राधामाधवचंपूच्या प्रस्तावनेंत राजवाडे लिहितात कीं, " शहाजीच्या हयातींत युरोपांत डेकार्ट, बेकन इत्यादि विचारवंत सृष्टपदार्थ-संशोधनकार्याचे वाली जारीनें पंचभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहन करीत

होते आणि आपल्याकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन इत्यादि संत पंचमहाभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारांत राष्ट्राला नेऊन मुक्त करण्याच्या खटपटींत होते. अशांना स्क्रू, टांचणी, बंदूक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यांत नवल कसलें ?" (पृ. १०७)

पाश्चात्यांचें आजचें श्रेष्ठत्व हें त्यांच्या भौतिक शास्त्रांतील प्रगतींत आहे. ज्याचें शास्त्र त्याचें शस्त्र, आणि ज्याचें शस्त्र त्याचें राज्य ही प्रणाली अपरिहार्य आहे. शिवाय शास्त्रानें नुसत्या शस्त्रालाच तीक्ष्णता येते असें नव्हे, तर तें शस्त्र वापरणाऱ्या बुद्धीलाहि येते. शास्त्राच्या उपासनेनें बुद्धीला शिस्त लागते, वृत्तीला निर्भयपणा येतो, अंतःकरणांत आत्मविश्वास बाणूं लागतो. याचा साकल्यानें परिणाम म्हणजे शास्त्रवेत्त्यांची संकृति उन्नतीच्या मार्गाला लागते. मुसलमानांच्या पुढें हिंदूंना नामोहरम व्हावें लागलें तरी त्यांची संस्कृति हिंदूंच्यापेक्षां श्रेष्ठ नव्हती. लुटीकरितां एकजुटीनें प्राणांची पर्वा न करितां शत्रूवर तुटून पडणें एवढी एक गोष्ट सोडली तर शास्त्र, विद्या, कला, धर्म यांपैकीं कोणत्याच बाबतींत त्यांच्याजवळून शिकण्यासारखें कांहींच नव्हतें. यामुळें शिवाजीनें त्यांच्याच तोडीची शिस्त व संघटना निर्माण करितांच तो औरंगजेबाच्या प्रबल सेनेलाहि पुरून उरला. पण मोंगल आणि मराठे या दोघांचे सामने खेळले जात असतां पाश्चात्य राष्ट्रांत एक नवीन अपूर्व अशी शक्ति निर्माण होत होती. त्या शक्तीपुढें लवकरच मोगल व मराठे दोघेहि निष्प्रभ ठरले.

## पाश्चात्यांचें बलस्थान

हे पाश्चात्य कडवे लढवय्ये आहेत, अत्यंत धूर्त आणि कावेबाज आहेत. त्यांचें आरमार बलिष्ठ आहे, आधीं वखार घालतात आणि पाहतां पाहतां त्या वखारीचा अभेद्य किल्ला बनून जातो हें चाणाक्षांनीं ओळखिलें होतें. पेशवाईत ओळखलें होतें एवढेंच नव्हे तर 'आज्ञापत्रकारा'च्या काळीं म्हणजे राजारामाच्या वेळींहि ओळखिलें गेलें होतें. पाश्चात्य

हे बलिष्ठ आहेत, युद्धविद्येंत विशारद आहेत, हें हिंदु आणि मुसलमान या दोघांनींहि ओळखिलें होतें. महादजी शिंद्यानें कवायती फलटणी तयार करण्याकरितां फ्रेंच ऑफिसर नेमला होता व चितोडच्या वेढयांत मुसलमानांचा तोफखाना पोर्तुगीज गोलंदाज चालवीत होते हें सुशिक्षितांना सांगावयास नकोच. त्यांचीं शस्त्रेंहि आपणांपेक्षां अधिक संहारक, अधिक अचूक होतीं हें पटलेलें होतें; तथापि दारूगोळा तयार करण्याचे व तोफा ओतण्याचे कांहीं प्रयत्न येथें झाले असले तरी शिवाजीच्या वेळेपासून पेशवाईपर्यंत तोफा आणि बंदुका पाश्चात्त्यां-पासून विकत घेण्याचाच प्रघात असे. अर्थात् ज्या शत्रूशीं सामना द्यावयाचा, त्याच्याकडूनच संहारक शस्त्रें विकत घेण्याचा लाचारपणा करणारास जय कितपत मिळणार हें वर्तविण्यास कुंडली मांडण्या-ची आवश्यकताच नाहीं. पण हा लाचारपणा स्वीकारल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. कारण भौतिक शास्त्रांची अक्षम्य हेळसांड झालेली होती. फिरंग्यांकडून शस्त्रें विकत घेऊनहि त्यानें करामत काय होई याचें खरे शास्त्र्यांनीं वर्णन केलें आहे कीं, " आमच्या फौजांचे मोर्चे एखाद्या किल्ल्यास बसले म्हणजे मोर्च्यांत गोलंदाजांनीं एकदां तोफेचा बार काढून पुनः बार भरून ठेवावा, मग चिलीम ओढावी, घटका दोन घटका गप्पागोष्टी कराव्या, इकडे तिकडे थोडें हिंडावें, मग तोफेजवळ जाऊन भरलेला बार सोडावा व दुसरा भरून ठेवावा. पुनः चिलीम, गप्पा वगैरे प्रकार व्हावे; याप्रमाणें सायंकाळपर्यंत दहा-पांच बार काढून तोफ तळावर आणून पोंचती केली म्हणजे संपला रोजगार. या लिहिण्यांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं. इंग्रज प्रेक्षकांनीं जें लिहून ठेवलें व जुना पत्रव्यवहार आम्हीं जो वाचला आहे त्यावरून अशीच वहिवाट असल्याचें अनुमान निघतें." ('मराठे-इंग्रज' प्रस्तावना)

पाश्चात्यांचें बळ त्यांच्या श्रेष्ठ शस्त्रांत व शिस्तींत आहे हें हिंदूंनीं ओळखिलें होतें. पण त्यांचीं श्रेष्ठ शस्त्रें आणि श्रेष्ठतर शिस्त या

दोहींच्याहि पाठीशीं असणारें त्यांचें खरें बळ ओळखिलें गेलें नव्हतें. हें त्यांचें श्रेष्ठतम बल त्यांच्या शास्त्रीय प्रगतींत होतें. दिल्लीचें तख्त फोडण्याचा भीम पराक्रम करणारे सदाशिवरावभाऊ आमच्यांत होते पण यःकश्चित् घड्याळ करणारा जिनगर आमच्यांत नव्हता. इंग्रज हे शत्रूचें सैन्य दहापांच मैलांवर असतां आपल्या दुर्बिणींतून न्याहळीत होते तर आम्ही नक्षत्रांकडे पाहून ज्योतिष्यांना मुहूर्त विचारीत होतों, एकनाथी भागवताची एकेक प्रत चार महिने खपून आम्ही हातानें लिहून काढीत होतों तर त्याच वेळीं स्टीफन्सन् हा आपल्या ख्रिस्तपुराणाच्या शेंकडों प्रति छापखान्यांतून छापून काढून गोरगरिबांना वाटीत होता. पाश्चात्यांचें हें शास्त्रीय प्रगतींतील मर्म आम्हीं ओळखिलें नव्हतें. आम्ही दिल्लीन्द्रपदलिप्सवः होतों. आमची नजर बादशाही सिंहासनावर खिळलेली होती. आणि या सिंहासनावर अधिष्ठित झालेले मुसलमान सुलतान आमच्यापेक्षां विद्येमध्यें कोणत्याहि रीतीनें पुढारलेले नव्हते. पण जगांत इतर राष्ट्रें पुढारलेलीं होतीं त्याची काय वाट ? त्याची दखलगिरी आम्हीं बाळगिली नाहीं हाच आमचा घोर प्रमाद. पेशवाईच्या अखेरीस पुण्यास देवीची सांथ उद्भवली. तिचा प्रतिकार यशस्वी रीतीनें कसा करावा हें आम्हांस माहीत नव्हतें. पण शेजारच्या रेसिडेन्सींत गोरे लोक राहत होते, त्यांनीं देवीची लस टोचून घेतली आणि त्यांपैकीं कोणी दगावलाहि नाहीं. पुण्यांतील लोकांना हें वृत्त कळलें तेव्हां रेसिडेन्सींतील गोऱ्या डॉक्टरला मुद्दाम पाचारण करून हजारों लोकांनीं त्याच्याजवळून लस टोचून घेतली. नाना फडणिसाच्या कारकीर्दींत एक पूल बांधावयास काढला असतां नदीचें पाणीच हटेना. झालें ! आमच्या इंजिनियरांनीं हातपाय गाळले. मांत्रिक-तांत्रिकांनीं जलदेवतेला प्रसन्न करण्याकरितां तोडगे केले; पण शास्त्रीय उपाय योजण्याचें सोडून अर्थशून्य बडबड करणाऱ्या या मांत्रिकांकडे पाहून जलदेवता मनांत फक्त हसली असावी. शेवटीं नाना फडणिसानें केलें काय तर बेकर

नांवाच्या इंग्रज इंजिनियरला बोलावणें धाडलें; आणि तो आल्यावर कृष्णाचा स्पर्श होतांच यमुनेनें वाट द्यावी त्याप्रमाणें बेकरच्या शास्त्रीय यंत्रांचा स्पर्श होतांच जलदेवतेनें सुखानें पूल बांधू दिला! इंग्रज लोक हे असल्या विद्येंत आपल्यापेक्षां पुढारलेले आहेत हें नाना फडणिसासारख्यांना कळून चुकलें होतें. पण ही विद्या आपण आत्मसात् केली पाहिजे याची आवश्यकता मात्र त्यांना पटल्याचें दिसत नाहीं.

## जगाचें अक्षम्य अज्ञान

त्याचें एक कारण म्हणजे हिंदूंचा विश्वसंचार थांबला होता व ते कूपमंडूकवृत्तीचे झाले होते. या वृत्तीचें उत्तम निदर्शक उदाहरण म्हणजे त्यांचें भूगोलाचें ज्ञान होय. नाना फडणीस त्यांतल्या त्यांत चौकस व जागृत बुद्धीचा मुत्सद्दी असल्यानें हरतऱ्हेच्या ज्ञानाचा सवाई माधवराव पेशव्यांच्या शिक्षणक्रमांत समावेश करावा असें त्यास वाटे. पण त्या काळीं खुद्द हिंदूंचें भूगोलविषयक ज्ञान हिंदुस्थानच्या बाहेरील प्रांताविषयीं सर्वस्त्रीं शून्याकार होतें. पुस्तुंतुनिया, रोम, वगैरे कांहीं तुरळक नांवें त्यांच्या कानांवरून गेलीं असतील तेवढींच. पण बाकीच्या जगाची त्यांना कल्पनाहि नव्हती. नाना देशींचे नाना सौदागर, हरतऱ्हेचे, हरहुन्नरीचे जिन्नस विकावयास घेऊन आपल्या बंदरीं येत. तसले पदार्थ तयार करण्याची कारागिरी आपल्याकडे नाहीं याची अस्पष्ट जाणीव असे. पण परकीय सौदागर जेथून येतात त्या सातासमुद्रांपलीकडे कोणते देश आहेत, तेथें शास्त्र, विद्या, कला, कोणत्या दशेप्रत आलेल्या आहेत याची कधीं चौकशीच केली गेली नाहीं. नाना फडणिसाला वाटलें कीं, सवाई माधवरावाकरितां आपण एक भूगोल तयार करावा. पण आपल्या देशांत ही विद्या पूर्ण लुप्त झालेली. म्हणून डॉ. फिन्डले नांवाच्या एका फिरंग्यापासून एक भूगोल त्यानें तयार करवून घेतला. बरें भूगोल तयारच करावयाचा तर फिन्डलेकडून नुसती माहिती मिळवून घेऊन आपल्याकडील एखाद्या हुशार पंडिता-

करून तो लिहून तर काढावा ! तसें न करितां ऐनाजिनसी फिन्डलेलाच लिहावयास सांगितला आणि फिन्डलेनेंहि त्याचा भरपूर फायदा करून घेतला. इंग्रजांची विलायत रूमस्थानानजीक आहे, रूमचा बादशहा मुख्य असून दिल्ली वगैरे त्याचे सुभे आहेत असल्या भाकडकथा सांगून भूगोलवर्णनाच्या या चोपड्यांत इंग्रज हिंदुस्थानांत आले ते दैवीयोजनेनेंच आले असा प्रचारात्मक मजकूरहि दडपून देण्यांत आला आहे. “ हिंदूंचीं कलियुगाचीं पांच हजार वर्षें भरत आलीं आणि तरवी सघीन्ही आली असे योग एकत्र होऊन दिवसेंदिवस धर्माचा उच्छाद व्हावा यास्तव इंग्रजी लोकांत ईश्वरी शक्ति जास्त होऊन हिंदु व मुसलमान यांचा गर्वपरिहार होऊन इंग्रजांचा व्याप पृथ्वीवर होऊं लागला.” असला हा भूगोल सवाई माधवरावासारख्या श्रेष्ठ पदाधिष्ठित व्यक्तीला नाना फडनविसानें खरोखरच शिकावयास दिला असेल असें मानणें कठीण आहे. पण असला एक कागद दसरीं सापडला आहे येवढें मात्र खरें. त्यांतील भावार्थ जो आपल्या लोकांचें भूगोलविषयक अज्ञान तें खोटें नाहीं. संजीवनी विद्या हरण करण्याकरितां देवांचा गुरु जो बृहस्पति यानें आपल्या साक्षात् पुत्राला शत्रूच्या गोटांत पाठविलें हा पुराणांतरीचा प्रकार नाना फडणिसादि मुत्सद्दी पुराणांत वाचीत होते; पण तो दाखला आजकालहि व्यवहारांत आणला पाहिजे ही जाणिव त्यांना पटली नाहीं. इंग्रज हे शास्त्रविद्येंत आपल्यापेक्षां पुढारलेले आहेत हें त्यांना दिसत होतें. तोफा व दारूगोळा तयार करण्याच्या विद्या थोड्याबहुत ते त्यांच्यापासून शिकत होते. पण या विद्यांच्या पाठीमागें असलेल्या शास्त्रीय प्रगतीची यथार्थ कल्पना त्यांना झालेली नव्हती. ती होणें तर शेंपन्नास तल्लख बुद्धीचे विद्वान् आणि कारागीर विलायतेस पाठवावयास हवे होते. जपाननें हें मर्म ओळखलें आणि म्हणूनच अवघ्या पन्नास वर्षांच्या मुदतींत शास्त्रीय प्रगतींत आपलें राष्ट्र पाश्चात्य राष्ट्रांच्या

मालिकेंत आणून बसाविले. आम्हीं हें मर्म ओळखलें नाहीं म्हणून पाश्चात्यांच्या आहारीं गेलों.

आम्हीहि विद्येला प्रोत्साहन देत होतों; पण तें कसें तर पर्वतीच्या तळाशीं चातुर्मासांत भटभिक्षुक आणि शास्त्री यांचा मोठा रमणा भरवून त्यांना ओंजळी ओंजळीनें रुपये देत होतों. ह्या दक्षिणेचा फायदा मिळे तो पाठशाळेंत घोकून शिकलेल्या वैदिकांना व शास्त्र्यांना. या रमण्यांत दक्षिणा वाटून कोणकोणत्या विद्या पढलेल्या लोकांची संभावना केली जात असे त्याची एक यादी सापडली आहे; तींत आश्वलायन दशग्रंथी, आपस्तंब पंचग्रंथी, तेलंग जटापाठी, काण्व क्रमपाठी, व्याकरणकौस्तुभ पढलेले, नैय्यायिक भावानंदी जाणणारे, काव्यपाठी माघान्त काव्य पढविणारे, अलंकारी कुवलयानंद पढविणारे अशा विद्यावंतांचीं नांवें आहेत ( भूतावर भ्रमण, पृ. १५८. ) या यादीमध्यें साक्षात् व्यवहारोपयोगी अशा एकाच धंदेवाइकाचें नांव आढळतें; तें म्हणजे 'वैद्य शाङ्र्गधर पढविणारे व रसायनक्रिया जाणणारे'. यादींतील इतर विद्वानांना आश्रय द्यावयास नको होता असें मला म्हणावयाचें नाहीं हें सांगावयास नकोच. अनुत्पादक अशा ज्या ज्या विद्या आहेत त्या जिवंत राहावयाच्या तर त्या धनिकांच्या उदार आश्रयावर राहूं शकतील. पण या धंद्याविषयीं जशी आस्था बाळगिली जात असे तशी राष्ट्रांतील उत्पादक धंद्यांना ऊर्जितावस्था आणण्याविषयीं दिसून येत नाहीं. तात्पर्य, आर्थिक व्यवहारांतहि भोंगळपणा शिरला होता.

एके काळीं आम्ही पाश्चात्यांप्रमाणें विश्व पालथें घालीत होतों हें आपण मागें आठव्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. तो दंडक चालू राहिला असतां तर डोळ्यांवर झापड आली नसती, जागृतपणा तेवत राहिला असता. समाज-बुद्धीला मरगळ आल्यामुळें असो किंवा आर्थिक विकासाला योग्य वाव न मिळाल्यामुळें असो, कसेंहि असो, ( या कारणांची मीमांसा करितां येण्यास प्राचीन इतिहासाची मशागत

आज झाली आहे त्यापेक्षां पुष्कळ अधिक झाली पाहिजे.) पण सातव्या-आठव्या शतकानंतर हें सर्व गाडें पालटलें. विश्वसंचार तर थांबलाच. पण मनाची उभारीहि लवूं लागली; विचारस्वातंत्र्याचें तेज मावळलें; विज्ञानोपासनेची उपासमार झाली; आणि संस्कृतीला एकंदरींत स्थिरावस्था प्राप्त झाली. पाश्चात्यसंस्कृतीलाहि असल्या अवस्थेंतून कित्येक शतकें जावें लागलें. पण शेवटीं या तिमिरावस्थेंतून ते बाहेर पडले आणि आम्ही मात्र अद्याप चांचपडत आहोंत ! आपल्या संस्कृतिसंपदेंतील ही उणीव आतां आम्हीं ओळखिली आहे. आणि म्हणूनच निकटच्या भावी कालांत ही उणीव आपण भरून काढूं, व जागतिक राष्ट्रमालिकेंत आपलें पूर्वीचें मानाचें स्थान पुन्हा एकदां मिळवूं असें अनुमान काढणें अवास्तव होणार नाहीं. आतां शेवटीं ही विचारसरणीच चुकीची आहे असें म्हणणारांची धूळभेट घेऊन समारोप करूं.

# प्रकरण चौदावें

# संस्कृतिगंगेचा पुनश्च जोरकस प्रवाह!

आपल्या संस्कृतीचा मूळचा जोरकस प्रवाह कालांतरानें दुबळा कसा झाला व त्यावर अंधश्रद्धेचें शेवाळें कसें माजलें हें मागील प्रकरणीं आपण पाहिलें. शेवाळें माजलेल्या या संचितावस्थेंत हा प्रवाह आज कित्येक शतकें रुद्ध होऊन बसला होता. त्याला आतां काल-गतीनें पाश्चात्य संस्कृतीच्या संघर्षानें जोराचा धक्का दिला आहे. या धक्क्यानें जागे होऊन अंधश्रद्धेचें शेवाळें झाडून जर आपण टाकूं, आणि प्रवाह रुद्ध करणाऱ्या जाचक आचार-विचाराचे धोंडे बाजूला जर सारूं तर आपली संस्कृतिगंगा पुनश्च आपल्या विमल प्रभावी रूपानें वाहूं लागेल, आणि जागतिक संस्कृतीच्या भंडाऱ्यांत स्वतःची म्हणून कांहीं भर अभिमानानें टाकूं शकेल.

जागतिक संस्कृतीची उंची जेणेंकरून वाढेल असें आमच्या-जवळ देण्यासारखें नाहीं असेंहि नाहीं. पाश्चात्य संस्कृतीच्या संघर्षानें व आक्रमणानें आमच्यांतले दोष आम्हांला जाणवूं लागले आहेत. प्रगतीच्या शर्यतींत कांहीं बाबींत त्यांनीं आमच्यापुढें आघाडी मारली आहे हें आम्हांला कळून चुकलें आहे. आम्ही विद्येची हेळसांड करून मिथ्याभिमानाच्या रंगणांत फिरत राहिलों हें पटूं लागलें आहे. ही हेळसांड टाकून पुनश्च पूर्वीची उत्साही वृत्ति उजळली पाहिजे हें उमगूं लागलें आहे. पण आजहि प्रत्येक बाबींत पाश्चात्यांच्या पायाशीं धूळपाटी घेऊन बसण्याची आम्हांस आवश्यकता आहे असें नाहीं. मनाला शाश्वत शांतीची जोड मिळवून देणारी अध्यात्मविद्या घ्या. या विद्येकरितां आम्हांला काय पाश्चात्यांच्या पाठशाळांत गेलें पाहिजे?

मुळींच नको. साक्षात् मृत्यूशीं धीटपणानें चर्चा करणाऱ्या आपल्या नचिकेताचें तत्त्वज्ञान आम्हांलाच नव्हे तर इतरांनाहि पुरून उरेल. सार्वजनिक आरोग्याचे व स्वच्छतेचे धडे पाश्चात्यांपासून शिकावे म्हणतां? सुतराम् नको. सोवळ्या-ओवळयाचा आम्हीं अतिरेक केला असेल; पण प्रातर्विधीकरितां जलाचा उपयोग न करणारे पाश्चात्य आम्हांस शुचिर्भूतपणा काय शिकविणार? सामाजिक जीवनांत स्त्रियांना प्रतिष्ठित स्थान देणें हें एक पाश्चात्य संस्कृतीचें लक्षण समजण्यांत येतें. पण याहि बाबतींत दोन्ही संस्कृतींचा शतकानुशतकांचा आचार पाहिल्यास स्त्रियांच्याकडे उदार दृष्टीनें पाहण्याच्या बाबतींत भारतीयांनींच दोन गोष्टी पाश्चात्यांना सांगाव्या अशी स्थिति आहे. अगदीं अलीअलीकडे पर्यंत म्हणजे १९१४–१८ च्या महायुद्धापर्यंत इंग्लंडमधील प्रतिष्ठित विद्यापीठें हीं स्त्रियांना पदवी देत नसत व त्यांना वकिलीसारख्या धंद्यांची सनद देत नसत हें सांगितलें तर खरें सुद्धां वाटणार नाहीं. उलट आपल्या देशांत घोषा, लोपमुद्रादि सूक्तकार स्त्रियांची व भरसभेंत पतीशीं वेदान्त विषयावर चर्चा करणाऱ्या गार्गीसारख्या विदुषी स्त्रियांची परंपरा फार प्राचीन कालापासून आहे. विवाहाचें वय झाल्यावरहि गृहिणीपदाची जोखीम न स्वीकारतां बराच काल विद्येच्या उपासनेंत घालविणाऱ्या स्त्रिया असत; त्यांना ब्रह्मवादिनी स्त्रिया असें स्वतंत्र नांव हारीत स्मृतीमध्यें दिलें आहे (द्विविधः स्त्रियः ब्रह्मवादिन्यः सद्योद्वाहाश्च). यांपैकीं कांहीं, विद्यालयांतून अध्यापनाचें कामहि करीत व उपाध्याय पत्नीहून त्यांचें स्थान स्वतंत्र दर्शविण्याकरितां पहिल्यांना उपाध्यायानी म्हणून दुसऱ्यांना-उपाध्याया असें म्हणत. पुरुषाप्रमाणें स्त्रियांचीं उपनयनेंहि एके काळीं होत असत. तो प्रकार पुढें बंद पडला तरी गाथासप्तशतींत ज्यांचीं कवनें घेतलेलीं आहेत अशा रेवा, माधवी वगैरे कवयित्री व राजशेखराची पत्नी अवंतिसुंदरी अशा विदुषी याची परंपरा सुरू होती; ही परंपरा पाहून पाश्चात्य पंडितांना अचंबा वाटला तर आश्चर्य नाहीं.

'सेक्शुअल लाइफ इन् एन्शंट इंडिया' या ग्रंथाचा कर्ता मेयर गार्गी-संबंधीं लिहितो, वेदान्तासारख्या विषयावर एका स्त्रीनें भरसभेमध्यें धीटपणें चर्चा करावी हा प्रकार आमच्या ॲरिस्टॉटल किंवा प्लेटोलाहि किती हास्यास्पद वाटला असता ! आणि मध्ययुगांतील धर्मोपदेश-कांना ? ते तर आपल्या सभांमधून गंभीरपणें चर्चा करीत होते कीं स्त्रियांना आत्मा आहे असें मानावें कीं न मानावें !!' ( खंड १, पृ. ४४० ). असो. कुटुंबांतील गृहिणीच्या दर्जाची महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचें आर्थिक स्वातंत्र्य हें होय. या बाबतींत तर पाश्चात्यांनाच मान खालीं घालावी लागेल. कारण विवाहित स्त्रीला स्वतःचें स्त्रीधन ठेवण्याचा हक्क खुद्द इंग्लंडमध्यें पन्नास वर्षांपूर्वींपर्यंत मिळालेला नव्हता, आणि आपल्याकडे याज्ञवल्क्याच्या काळापासून तो मान्य केलेला आहे.

आपल्या संस्कृतींतील वरीलपेक्षां अधिक महत्त्वाच्या बाबी म्हणजे सामाजिक ऋणाची कल्पना, आश्रमव्यवस्था व सहिष्णुता. माणूस जन्माला येतो तो समाजाचें ऋण घेऊनच येतो व तें त्यानें फेडलेंच पाहिजे ही एक आपल्या प्राचीन धर्मशास्त्रकारांनीं मांडलेली उदात्त कल्पना होय; आणि ती अमलांत आणण्याकरितां जीवनाचे चार भाग पाडून विद्येच्या काळीं विद्यार्जन, गृहस्थाश्रमांत संसारसुख, म्हातारपणीं वानप्रस्थाश्रम व अंतीं सर्वसंगपरित्याग अशी जीवनाची सुंदर, प्रमाणबद्ध मांडणी त्यांनीं केली होती. ही आश्रमसंस्था टिकली नाहीं हें दुर्दैव. समाजाचें ऋण फेडल्याशिवाय मोक्षमार्गाकडे वळणारा माणूस अधोगतीला जातो अशा खणखणीत वाणीनें स्मृतिकारानें बजावलें असतांहि संन्यासमार्गाचाच पगडा समाजावर बसला व सर्व-श्रेष्ठ आश्रमसंस्था नष्ट झाली. पण तिच्यांतील कल्पना ही एक चिरंतन उपकारक अशी कल्पना होय. तिसरी गोष्ट सहिष्णुवृत्तीची. ही वृत्ति भारतीयांनीं धर्माच्या प्रांतांत तरी कशी नमुनेदारपणें जागविली याचीं उदाहरणें मागें अकराव्या प्रकरणांत दिलींच आहेत. ह्याच सहिष्णु-

वृत्तीचा परिपोष जागतिक व्यवहाराच्या सर्व क्षेत्रांत झाला तर आजच्या जगाचा रंग सर्वस्वीं पालटेल. या बाबतींत धडा घालून देण्याची योग्य पात्रता कोणांत असेल तर ती भारतीय संस्कृतींतच आहे.

पण...पण राजकीय पारतंत्र्याच्या लोहशृंखलांनीं जखडून गेलेली आपली ही संस्कृति आज जगाला साहिष्णुतेचा उपदेश कोणत्या तोंडानें करणार ? तो उपदेश तिच्या तोंडून खणखणीत वाणीनें बाहेर पडावयाचा असेल तर तिला प्रथम आपल्या पायांतील पारतंत्र्याच्या बेड्या तोडाव्या लागतील. आणि त्या तोडावयाच्या तर ज्यांनीं त्या पायीं ठोकल्या त्यांचें सामर्थ्य त्यांच्या ज्या विद्येंत साठविलेलें आहे ती हस्तगत करावी लागेल. स्वतंत्र झाल्यावर व स्वतःस सामर्थ्य प्राप्त झाल्यावर त्या सामर्थ्याचा उपयोग परक्यांच्या पायांत बेड्या घालण्याकरितां आपण कधींहि करणार नाहीं हें साक्षात् कृतीनें सिद्ध करून जगताला तिला धडा घालून देतां येईल. पण तें होण्यास आजची दुर्बलावस्था ज्या कारणानें प्राप्त झाली आहे तें ओळखून भौतिक शास्त्रांची उपासना, सर्वेनः सुखिनः सन्तु हा समतावाद, व ऐहिक आपत्ति दूर करण्यास ऐहिक मार्गाचा अवलंब ह्या गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत.

दुर्दैवानें असा एक विचारवंताचा वर्ग आपणामध्यें आहे, कीं ज्यांना आपली आजची अवनति ही अवनतीच वाटत नाहीं ! आणि वाटलीच तर ती दूर करण्याचा उपाय म्हणजे ईश्वराच्या न्यायीपणावर भरवंसा ठेवून धार्मिक वृत्तीनें आयुष्य कंठीत बसणें येवढाच होय असें वाटतें !

## धर्मानुष्ठान हेंच स्वातंत्र्यसाधन

या पंथाच्या विचारसरणीचें दिग्दर्शन म्हणून 'नवयुगधर्म' व 'हिंदूंचें समाजरचनाशास्त्र' या दोन ग्रंथांतील मासलेवाईक उतारे पाहूं.

राजकीय स्वातंत्र्याकरितां आज आपल्या देशांत चालू असलेल्या लढ्याची पद्धति ही नवयुगधर्मकारांना सर्वस्वीं फोल वाटते. आजची चळवळ ही मानवी प्रयत्नांच्या अनुरोधानें चालविली जात आहे. तिच्यांत ईश्वरी कृपेचें आवाहन नाहीं. पण नवयुगधर्मकारांच्या मतें ईश्वरी कृपा संपादन करणें हीच चळवळीची खरी दिशा होय. ते लिहितात, "धर्म ही एक किमया आहे ही गोष्ट आजकाल लोक विसरले आहेत. आज जें राजकारणास महत्त्व प्राप्त झालें आहे तें योग्यच आहे असें जरी मानलें, तरी आज शें-दीडशें वर्षांचा जडलेला पारतंत्र्याचा राजयक्ष्मा दूर होण्यास सद्धर्मानुष्ठानावांचून दुसरा इलाज नाहीं. उपासनेच्या बळावांचून दुसरें बळ नाहीं; ईश्वरी कृपा संपादन करण्यापलीकडे दुसरा तरणोपाय नाहीं असें आम्हांस तरी स्पष्ट वाटत आहे! आंग्लविद्याव्याघ्रीचें दूध प्यालेल्या कित्येक प्रागतिक चळवळ्या वाघांनीं बारा हात उडी मारण्याच्या अवसानानें शेपट्या झाडाव्या, परंतु पुढें चारी बाजूंनीं मारलेले पोलादी गज पाहून त्यांवर गुरगुरत आपलीं नाकें घासून रग जिरवावी अशाच प्रकारच्या आजच्या साऱ्या राजकीय चळवळी परिणामीं दिसत आहेत. उघड्या डोळ्यांनीं प्राण जात नाहीं म्हणून कांहीं धडपड करावयाची इतकेंच! असले हे निराशेचे उद्‌गार सांगण्यास येवढी ग्रंथप्रवृत्ति नको होती असें कोणी म्हणेल; त्यास आम्हांस येवढेंच सांगावयाचें आहे कीं, आम्हीं निराशावादी नाहीं; प्रबल आशावादीच आहोंत. पण ईश्वर **करील तें खरें अशी आमची बळकट श्रद्धा आहे.** त्या ईश्वरी कृपेस पात्र होण्यासाठींच धर्मानुष्ठानाची आम्हांस जरूर आहे. (पृ. ७६४) ग्रंथकर्त्यानें आपलें प्रामाणिक मत स्पष्ट शब्दांत मांडलें आहे हें उघड आहे; म्हणून तितक्याच प्रामाणिकपणें आणि निःसंदिग्धपणें येथें सांगितलें पाहिजे कीं, राजकीय चळवळीची आज जगभर अवलंबिली जात असलेली लौकिक व्यावहारिक, मानवीप्रयत्ननिष्ठ, त्यागप्रधान अशी प्रणाली सोडून ईश्वर-कृपा संपादनाच्या अनुष्ठानप्रधान मार्गाला जर आपला देश लागेल तर

त्या चळवळीला यश येण्याची आशाच नष्ट होईल. सर्व शक्तिमान् ईश्वरानें मनांत आणल्यास काय वाटेल तें होईल हें तर खरेंच; पण मानवाला बुद्धीचें देणें दिलें असतांहि त्यानें त्याचा उपयोग करण्या-ऐवजीं केविलवाणेपणानें आपली करुणा भाकीत बसावें या दौर्बल्या-बद्दल ईश्वरालाहि मानवाचा तिटकारा वाटल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून ईश्वराच्या अमूर्त स्वरूपाची उपासना करीत बसण्यापेक्षां ईश्वराचें मूर्तस्वरूप जी सृष्टि तिचें रहस्य उकलण्याचा प्रयत्न करणारीं जीं भौतिक शास्त्रें त्यांची उपासना करणें हेंच समाजाच्या हिताचें होय.

## कोण म्हणतो आमची अवनति झाली!

आतां आपली अवनति झाली आहे हाच मुळीं भ्रम आहे, अशा प्रकारची विचारसरणी ऐकूं या. शास्त्रीय ज्ञानांत एके काळीं आपण उच्च स्थानावर होतों; पण कालांतरानें घसरत घसरत खालीं आलों ते पुन्हा शास्त्रीय ज्ञानाची कास धरल्याशिवाय आपण जगांतील श्रेष्ठ राष्ट्रमालिकेंत स्थान मिळवूं शकणार नाहीं असा आपला सूर आहे. पण आपण मागसलों हाच मुळीं भ्रम असून, आपल्या राष्ट्राचा नाश टाळण्याकरितां आपली प्रगति आपण होऊन जाणून-बुजून एका मर्यादेनंतर थांबविली असें कोणी प्रतिपादन केलें तर तुम्ही काय म्हणाल? हें प्रतिपादन काल्पनिक नसून 'हिंदूंचें समाजरचनाशास्त्र' या ग्रंथाच्या कर्त्यांनीं स्पष्ट शब्दांत मांडलेलें आहे. ते लिहितात कीं, "इतिहासांत तरी जेथें जेथें मानवी प्रगति तेथें तेथें नाश असा त्रिकालाबाधित सिद्धान्त दिसून येतो. प्रगति म्हटली कीं नाश ठेवलेलाच. हिंदु व चिनी लोकांनीं किंचित् **कालपर्यंत प्रगति केली व ते तेथें थांबले. ते समाज आज पृथ्वीच्या पाठीवर जिवंत आहेत.** ग्रीक आणि रोमन लोक सारखे प्रगति करीत गेले ते विनाश पावले!" (पृ. ४२). असें हें प्रतिपादन आहे!

किंचित् कालपर्यंत प्रगति करण्याची तरी आमच्या पूर्वजांना कां अवदसा आठवली कोणास ठाऊक! खरें म्हटलें तर एस्किमो किंवा नीग्रोप्रमाणें त्यांनीं वन्यावस्थेंत राहावयाचें होतें. किंबहुना पाशवी अवस्थेंतून वरच यावयाचें नव्हतें. कारण प्रगति म्हणजे नाश! पण या मताचा विचार करण्याचेंच कारण नाहीं, कां तर त्यांतील किंचित् काल प्रगति वगैरे सर्व कसें निराधार आहे व भारतीयांनीं हरएक शास्त्र-विद्या-कलांमध्यें कशी प्रगति केली होती हें मागें 'भारतीयांचीं ऐश्वर्योपासना' या प्रकरणीं मीं दिग्दर्शित केलेंच आहे.

रोमन व ग्रीक समाज नष्ट झाले असें म्हणण्याचीहि एक रूढि पडून गेली आहे. पण ते समाज नष्ट झाले म्हणजे काय झालें? त्यांचें साम्राज्य नष्ट झालें, राजकीय सत्ता कांहीं काळ परक्यांच्या ताब्यांत गेली, येवढेंच ना? पण त्यांची संस्कृति कांहीं नष्ट झाली नाहीं. तिची परंपरा युरोपियन संस्कृतीच्या रूपानें अद्याप अविच्छिन्न चालू आहे. ग्रीकांनीं संवर्धन केलेली सौंदर्याची आणि स्वातंत्र्याची आवड आणि रोमनांनीं उत्पन्न केलेली कायदे-कानूंतील शिस्त यांची परंपरा अद्यापिहि चालू आहे. रोमविषयीं बोलावयाचें तर रोमन लोकांना परकीय असा शार्लमेन राजा रोमच्या गादीवर बसला हें खरें; पण त्यानें रोमन पोपकडून आपणांस राज्याभिषेक करून घेण्यांत धन्यता मानली. मग रोमन समाज नष्ट झाला हें म्हणण्यांत स्वारस्य काय? पुढेंहि कित्येक शतकें रोमचें राजकीय वर्चस्व खालावलें तरी धार्मिक वर्चस्व गाजतच होतें. आणि ग्रीकांविषयीं बोलावयाचें तर विद्येचें पुनरुज्जीवन युरोपांत झालें तेव्हां ऋषितुल्य मान कोणाला मिळूं लागला असेल तर तो ग्रीकांनाच. आपल्या महर्षि शास्त्रकारांना जो मान दिला जाई तोच आरिस्टॉटलला युरोपांत मिळे. त्याच्या वचनाच्या विरुद्ध 'ब्र' काढणारास पाखंडी गणण्यांत येई. मग ग्रीक व रोमन समाज नष्ट झाले या उक्तीचा अर्थ काय! राजकीय

श्रेष्ठत्वाची जोड मिळाली असती तर ग्रीक व रोमन विद्येला अधिक जोर चढला असता येवढेंच. राजकीय स्वातंत्र्य कांहीं काल नष्ट झालें येवढ्या अर्थी ते समाज विनाश पावले असें म्हणावयाचें तर हिंदुस्थानची व चीनची तीच गत आहे. अर्थात् ग्रीक व रोमन समाज नष्ट झाले हा एक पोकळ वाक्प्रचार होऊन बसला आहे. क्रीट, सुमेर, मेक्सिको येथील समाज नष्ट झाले असें कदाचित् म्हणतां येईल. कारण त्या संस्कृतीचा साक्षात् वारस म्हणविणारा समाज आज उभा नाहीं. परंपरेनें वारस सर्व जगच आहे पण तेथील लेख सांपडले तर तें अविच्छिन्न परंपरेच्या बळावर वाचील असा समाज हयात नाहीं. ग्रीक व रोमन संस्कृतीचा प्रकार असा मुळींच नाहीं. वैदिक वाङ्मय जितक्या भक्तिभावानें आपल्या देशांत जतन केलें जात आहे तितक्याच भक्तिभावानें ॲरिस्टॉटल प्लेटो, होमर यांचे ग्रंथ पाश्चात्य देशांत अभ्यासिले जातात. अर्थात् ग्रीक संस्कृतीनें युरोपच्या एका कोपऱ्यांतल्या लहानशा बेटांतून बाहेर पडून सर्व युरोप व्यापलें येवढाच त्याचा अर्थ. शिवाय खुद्द त्या बेटांतहि आपल्या जुन्या संस्कृतीचा अभिमानी असा समाज उभा आहेच. परकीय बलिष्ठ राजकीय सत्तेपुढें त्यांना कांहीं काल नमावें लागलें तेंहि प्रगतीमुळें नव्हे तर त्यांच्यांत उत्पन्न झालेल्या दोषांमुळें. या दोषांचा आणि प्रगतीचा साहचर्यभाव मुळींच नाहीं. अर्थात् प्रगति म्हणजे नाश हा सिद्धान्तच तर्कदुष्ट आहे.

## विपत्ति हीच खरी संपत्ति !

याच ग्रंथकारांनीं दुसरें एक प्रमेय मांडलें तें तर फारच लोकविलक्षण आहे. तें म्हणजे विपन्नावस्थेंतच मानवी संस्कृति शुद्धावस्थेंत राहते हें होय. अर्थात् आजची विपन्नावस्था दूर करून जीवन अधिक सुखमय करण्याचा प्रयत्न करणें हें परिणामीं घातकी होय असें त्यांचें प्रतिपादन आहे. ते म्हणतात : 'आम्हांला असें वाटतें कीं, सृष्टीचा नियम जो दुःखशोकांत

मानवाची शुद्धावस्था राहणें तो डोळ्यांपुढून सरून मानव हा सुख हें आपलें ध्येय मानून चालूं लागला म्हणजे हळूहळू त्याची अधोगति होऊं लागते.' (पृ. १४६). चिनी लोकांनीं प्रगति केली नाहीं याबद्दल ग्रंथकाराला समाधान वाटत असून ते लिहितात, 'चिनी लोकांबद्दल स्टोडार्ड म्हणतो कीं, हजारों वर्षे अत्यंत दारिद्र्यांत आयुष्य घालविल्या कारणानें कोणत्याहि भयंकर परिस्थितींत जगणें हें चिनी मानवास जितकें शक्य आहे तितकें तें दुसऱ्या कोणालाहि नाहीं. नैसर्गिक निवडीचे नियम ज्या कोणाला कळत असतील तो असें म्हणेल. अशा परिस्थितींत आपले वंश टिकविण्याची आपल्यामध्यें जी हातोटी आहे ती नष्ट कशी होईल या विवंचनेनें तर आज आमचा जीवनक्रम सुधारण्याचे प्रयत्न चालू आहेत!" (पृ. २६७).

स्टोडार्ड व त्याचे समानधर्मे यांची ही विचारसरणी भ्रांतमनस्कांची आहे. युरोपांत भौतिक शास्त्रीय विज्ञानाची कल्पनातीत वाढ झाली आहे; पण त्या ज्ञानानें प्राप्त करून दिलेली सत्ता आणि मत्ता न्याय्यपणें वापरण्याची प्रामाणिक बुद्धीची वाढ मात्र त्या प्रमाणांत झालेली नाहीं; त्यामुळें 'विचारांचे भोवरे' या प्रकरणांत दिग्दर्शित केल्याप्रमाणें कांहीं पाश्चात्य पंडित भ्रांतचित्त झालेले आहेत, आणि यामुळें एकीकडे यंत्रशक्तीला शिव्याशाप देत, दुसरीकडे ज्या राष्ट्रांत ही यंत्रशक्ति बद्धमूल झाली नाहीं किंवा खरें बोलावयाचें तर स्टोडर्डच्याच जातभाईनीं स्वार्थी हेतूंनीं होऊं दिली नाहीं, त्या चीन व हिंदुस्थानांतील यंत्रपूर्व संस्कृतीचें पोकळ स्तुतिस्तोम गात सुटले आहेत. पण ही स्तुति पोकळ आहे, भ्रांतचित्ताची तरी आहे किंवा स्वार्थी मतलबी तरी आहे.

## ढोंगी स्तुतिपाठक

कांहीं वर्षांपूर्वी महात्मा गांधींनीं सामुदायिक सत्याग्रह करून प्रेमानें जग जिंकण्याचा ख्राइस्टप्रणीत प्रयोग हिंदु राजकारणांत सुरू केला

तेव्हां युरोप-अमेरिकेंतील अनेक ख्रिस्ती पंडितांनीं व धर्ममार्तंडांनीं 'साधु! साधु!' म्हणून माना डोलावल्या; कां न डोलावतील? ख्राइस्टनें उपदेशिलेल्या ह्या मार्गाचा प्रयोग प्रत्यक्ष व्यवहारांत करून पाहण्याची धमक यांपैकीं एकाहि पंडितांत किंवा धर्ममार्तंडांत नव्हती. तेव्हां हा प्रयोग हिंदुस्थानांतला एक महात्मा परस्पर करतो आहे, त्यांच्याकरितां हालअपेष्टा सोसाव्या लागणार त्या हिंदी जनता सोसणार आहे, आणि जय मिळाल्यास येशूच्या यशाचें तोंड उज्ज्वल होणार आहे; असली सुवर्णसंधि कोण दवडील? अर्थात् युरोप-अमेरिकेंतून महात्माजीवर अभिनंदनाचा वर्षाव झाला तर नवल कसलें? पण हीं अभिनंदनें पोकळ होतीं हें चालू युद्धांत स्पष्ट झालें आहे. याहि युद्धांत महात्माजींनीं इंग्लंडला संदेश पाठविला तो हा कीं, अग्निवर्षाव करीत हिटलर तुमच्यावर चाल करून आला तरी त्याच्यापुढें हात जोडून प्रेमानेंच त्याला जिंका. पण या संदेशाला पाठिंबा देण्यास आज एक तरी पंडित वा धर्ममार्तंड पुढें सरसावत आहे का? उलट हेच धर्माचार्य प्रेमधर्माऐवजीं शस्त्रधर्माचें समर्थन करूं लागले आहेत, आणि ज्या रशियाला तो धर्मलंड, भ्रष्ट म्हणून वाळींत टाकण्याचा कंठशोष त्यांनीं केला, त्याच रशियाचे गळ्यांत गळा घालणें हें पुण्यकर्म होय असें हे धर्माचार्य आज उघडपणें व्यासपीठावरून प्रतिपादन करूं लागले आहेत! हें त्यांचें धोरण चूक आहे असें मला म्हणवत नाहीं. ते व्यवहार जाणतात येवढाच त्याचा अर्थ; आणि म्हणूनच अशा व्यवहारज्ञ, धूर्त किंवा दुसऱ्या भोळसट, भ्रांतचित्त यांनीं केलेल्या आपल्या संस्कृतीच्या पोकळ स्तुतीपासून आपण चार पावलें दूर राहिलें पाहिजे.

या स्तुतिपाठकांच्या आहारीं जसें गेलें न पाहिजे तसेंच आपल्या संस्कृतीची निष्कारण खोटीनाटी निंदा करणाऱ्या दुराग्रही प्रतिनिविष्ट निंदकांच्याहिपासून चार पावलें दूर राहिलें पाहिजे. संस्कृतवाङ्मयाच्या दीर्घ अभ्यासानंतर दुराग्रही पंडितांची संख्या कमी होत

चालली आहे. आणि चाणक्याचा अर्थशास्त्र हा श्रेष्ठ ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून भारतीयांना वैभवविन्मुख व आंबटतोंड्ये म्हणून मोडून काढणें अशक्यच झालें आहे. मात्र दुर्दैवानें अज्ञान आणि दुराग्रह यांची परंपरा संपूर्ण अद्याप नष्ट झालेली नाहीं. अजूनहि हिंदुस्थान हा विचित्र चालीरीतींचा रानटी देश आहे असें समजून समाजशास्त्रीय प्रबंध नटविण्याकरितां हिंदुस्थानांतील काल्पनिक चालीरीतींचा अन्याय्य व उपमर्दकारक उल्लेख बेफिकीरपणें करण्यांत येत असतो. पन्नास-पाऊणशें वर्षांपूर्वी ज्या वेळेला हिंदुस्थानविषयीं माहिती देणारें वाङ्मय फारसें उपलब्ध नव्हतें त्या वेळीं असले उल्लेख कदाचित् खपले असते; पण अवघ्या नऊ-दहा वर्षांपूर्वीचा असला उल्लेख दाखविला तर काय म्हणाल? 'हिंदु सोशल इन्स्टिटयूशन्स' या पुस्तकांत (पृ. १४६) डॉ. वालावलकर यांनीं इटालियन विद्यापीठांतील एका पंडिताच्या ग्रंथांतील एक अवतरण घेतलें आहे. त्यांत तो हिंदु नीतिमत्तेविषयीं लिहितो : "हिंदुस्थानांतील कांहीं प्रान्तांत कर्जफेडीकरितां धनको हा ऋणकोची बायको गहाण म्हणून हक्कानें मागून घेतो. (मागून घेत असे असेंहि या पंडितानें म्हटलें नसून घेतो म्हणजे 'आज घेतों' असा वर्तमानकाळीं चक्क प्रयोग आहे!) आणि कर्ज फिटेपर्यंत तिचा उपभोग घेतो. कर्ज फिटल्यानंतरहि कांहीं काल ती धनकोजवळ राहिली तर कर्ज फिटल्यानंतर तिला जीं मुलें होतील त्यांपैकीं निर्मी तो ऋणकोला देऊन टाकतो!!" या प्रकांडपंडिताला ही माहिती कोठून मिळाली हें सैतान जाणे! अवघ्या दहा वर्षांपूर्वी लिहिलेला हा ग्रंथ! यावरून हिंदुस्थानविषयीं पंडितांमध्यें(?)हि केवढें अज्ञान आहे याची कल्पना येईल. असल्या बाष्कळ पंडितांकडे दुर्लक्ष केलेलेंच बरें!

सुदैवानें विद्येची एकनिष्ठपणें सेवा करणारे पंडितहि आढळतात. अशांच्याहि मुखांतून अज्ञानानें वा मिथ्याग्रहानें भारतीय संस्कृतीविषयीं जे विपरीत अभिप्राय प्रगट झाले आहेत त्यांचा उल्लेख मागील

अनेक प्रकरणांत मीं केला आहे व त्यांचा योग्य तो परामर्श घेण्यास-हि कमी केलें नाहीं. पण अशा पंडितांशीं मतभेद होण्याचा प्रसंग आला तरी त्यांच्या विद्येच्या निरलस एकनिष्ठ उपासनेबद्दल माझ्या मनांत आदरच आहे हें येथें स्पष्ट सांगून टाकतों. एक साधें उदाहरण म्हणून द्यावयाचें तर कोठें इंग्लंड, फ्रान्स आणि नॉर्वे हे देश आणि कोठें आपला महाराष्ट्र? पण आपल्या महाराष्ट्रांतील मराठी भाषेच्या व्याकरणाचा सूक्ष्म अभ्यास इंग्रज ग्रियरसन, फ्रेंच ज्युल् ब्लोक आणि नॉर्वेजियन स्टेन कोनों यांनीं करावा, आपण केला नसेल इतक्या कसोशीनें करावा, या त्यांच्या विद्येच्या लालसेचें कौतुक कोणाला वाट-णार नाहीं? किंबहुना आपल्या प्राचीन संस्कृतीचें जें ज्ञान, आपणांस आज हस्तगत झालें आहे तें उकरून काढण्यांत आजवर तरी पाश्चात्य पंडितांचाच घाम आमच्यापेक्षां अधिक गळाला आहे. पण कौतुक करीत असतांहि त्यांचे अपसिद्धांत आपण पारखून पारखूनच घेतले पाहिजेत. तसे ते पारखून घेण्याची चिकित्सक विवेचक बुद्धि जागृत झाली म्हणजे आपली पूर्वपरंपरा काय आहे, आज आपण प्रगतीच्या मार्गावर नक्की कोठें आहों व आपल्या पुढें गेलेल्यांच्या पासून आपणांस काय घ्यावयास हवें या सर्वांचा उमज पडेल.

## दोषपरिमार्जन

या दृष्टीनें पाहूं गेलें तर असें दिसून येईल कीं, आज आपण पाश्चात्यांच्या पाठीमागें पडलों आहों ते मुख्यतः भौतिक शास्त्राच्या हेळसांडीमुळें. ज्याचें शास्त्र त्याचें शस्त्र असा आजच्या युगाचा दंडक आहे; तेव्हां या शास्त्रांकडे दुर्लक्ष करून कोणत्याहि राष्ट्राला जीवन-कलहांत टिकाव धरतां येणार नाहीं. शिवाय या शास्त्रांच्या उपासनेनें नुसतें शस्त्रसंभाराचेंच सामर्थ्य वाढतें असें नव्हे तर आत्मप्रत्ययाचेंहि बल वाढतें. बुद्धि अधिक धीट, निर्भीड व आत्मविश्वासपूर्ण होते, जीविताकडे ती निर्भयपणें पाहूं लागते व जीवितांतील अडचणींचा

परिहार करण्याची धमक तिच्यांत उत्पन्न होते. शास्त्रीय शोधांनीं उपलब्ध करून दिलेल्या सामर्थ्यांचा योग्य विनियोग माणसाला जर पुढेंमागें करतां आला, तर आजच्या जगाचें रूप नितान्त पालटून जाईल. तें कसें त्याचा प्रपंच करण्याचें हें स्थल नव्हे. पण आज या सामर्थ्यांचा पाश्चिमात्य राष्ट्रें दुरुपयोग करीत आहेत या देखाव्यानें भांबावून न जातां, व यंत्रशक्ति व भौतिक विद्या यांच्या नांवानें करंटेपणानें बोटें मोडीत न बसतां, या नवोदित सामर्थ्यांच्या जोरावरच मानवी संसाराला नवीन रमणीय घाट देतां येईल, ही खूणगांठ मनाशीं बांधून त्या भौतिक विज्ञानाची उपासना करण्याचा वसा आपण जितक्या लवकर घेऊं तितका उत्तम. भौतिकशास्त्रांच्या उपासनेबरोबरच या उपासनेमुळें लाभणारें जें सामर्थ्य तें मूठभर लटपट्ये लोक बळकावून बसणार नाहींत; यास्तव सामर्थ्याचें केंद्र जें राजकीय सत्ता व औद्योगिक मत्ता हीं सर्व जनतेंत विभागली जातील अशा साम्यनिष्ठ समाजरचनेचा पुरस्कार केला पाहिजे. आणि ऐहिक संसार हा औट घटकेचा असला तरी परलोकाकडे डोळे लावून बसून या लोकीचा संसार कसा तरी संपवून टाकण्याची विरक्त वृत्ति टाकून देऊन "अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तिही लोक" ही आशावादी उत्साही वृत्ति स्वीकारली पाहिजे.

कांहींना येथें अशी शंका येईल कीं, हे प्रकार आपल्या पूर्वपरंपरेशीं विसंगत तर नाहींत ना? आपल्या समाजाची वृत्ति ही मूळपासूनच निवृत्तिपर आहे. आणि भौतिक शास्त्राच्या उपासनेनें सुखाचीं साधनें वाढविण्याऐवजीं मनोजय संपादून वासनाक्षय करणें हा अधिक श्रेष्ठ मार्ग होय असें आपण आजवर मानीत आलों आहों. शिवाय जन्मजात जातिभेदाची कल्पना आमच्या हाडींमांसीं खिळली असल्यानें, राजकारणांत काय किंवा समाजव्यवस्थेंत काय लोकशाहीचें किंवा समतेचें तत्त्व आपणांस मानवलेलें नाहीं. असा सर्व प्रकार असतांना पाश्चात्य

संस्कृतीच्या दिखाऊ वैभवानें दिपून जाऊन आपल्या पूर्वपरंपरेशीं विसंगत असे नवे प्रकार सुरू करणें हें अंतीं आत्मघातकीपणाचें तर होणार नाहीं? अशा प्रकारची शंका कांहीं कांहीं मनोवृत्तींना प्रामाणिकपणें डाचत असते. पण ती निराधार असते हें दाखविण्या-करितांच आपल्या प्राचीन इतिहासांतील आपली ऐश्वर्योपासना, आपला विश्वसंचार, आपली लोकशाही यांचें दिग्दर्शन मागील कांहीं प्रकरणांतून केलें आहे. आपली ही प्राचीन परंपरा सातव्या-आठव्या शतकांत हीनप्रभ होऊं लागली. त्यापूर्वींची वैदिक परंपरा जिला म्हणतां येईल ती तशी नव्हती. उत्तरकालीं मात्र असा विपरीत प्रकार झाला कीं, वैदिकांनीं वेदबाह्यांना जिंकलें तरी अंतीं जित आर्येतरांचा नैराश्यवाद व निवृत्तिपरता ह्यांनीं वैदिक जयिष्णु, आनंदी उत्साही वृत्तीला ग्रासून टाकलें. या ग्रस्त स्थितींत आज सुमारें हजार-बाराशेंवर वर्षें आपण गुरफटलों आहोंत. मध्यंतरीं पाश्चात्य राष्ट्रांनीं विद्येच्या प्रांतांत कल्पनातीत दौड मारली आहे. इतकी कीं, मागें 'भारतीयांची ऐश्वर्योपासना' या प्रकरणांत भारतीयांच्या अनेक शास्त्रांतील बुद्धिवैभवाचें व प्रगतीचें जें वर्णन केलें आहे तें तत्कालीन जगांत अत्यंत अभिमानास्पद वाटण्यासारखें असलें व बुद्धिवैभवाचें देणें फक्त ईश्वराच्या लाडक्या युरोपलाच मिळालेलें आहे असें मानणाऱ्या उर्मट पाश्चात्यांच्या नाकावर टिचण्यास उपयोगीं पडण्यासारखें असलें तरी त्या काळच्यापेक्षां आजची पाश्चात्यांची विद्या कल्पनेबाहेर वृद्धिंगत झाली आहे हें ध्यानीं घेतलें पाहिजे. तें नीट ध्यानीं घेतलें म्हणजे पूर्वपरंपरेचा योग्य अभिमान तर जागृत राहीलच, पण त्या अभिमानांत गुरफटून जाऊन आपण आलस्यांत घोरत पडणार नाहीं.

## यंत्रशक्तीचें आगमन

आलस्य झाडून टाकण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. अथवा आमच्या आलस्यनिद्रेंतून आम्ही खडबडून जागें व्हावें येवढी

जोराचीच थप्पड इंग्लंडनें आमचें स्वातंत्र्यसर्वस्व हरण करून दिलेली आहे ! कोणत्याहि पद्धतीनें का होईना पण जागृति आणणारी अशी ही क्रिया असल्यानें रानडे, लोकहितवादी वगैरेनीं दैवी योजना म्हणून तिचें स्वागत केलें. पण ही जागृति उत्पन्न होण्यास इंग्रजांच्या राजकीय आक्रमणाचीच आवश्यकता होती काय? समजा, इंग्रजांचे पाय आपल्या या मायभूमीकडे वळलेच नसते, तर आज आपण कोणत्या स्थितींत असतो? भौतिक शास्त्रांतील शोधांनीं निर्माण केलेल्या सुखसोयींपासून आपण अलिप्त राहूं शकलों असतों काय? युरोपमध्यें मोटारी आणि विमानें घरघर फिरूं लागलीं असतां आम्ही आमचीं भिमथडी तट्टेंच दामटीत बसलों असतों? तेथें बिजली चमचमूं लागली असतांहि आम्ही आमचे जुने-पुराणे हिलाल नाचवीत बसलों असतों? तेथें वाफेचे माग धडाडूं लागले तरी आम्ही नखाच्या भोकांतून सूत कांतीत बसलों असतों? तेथें यंत्रावर एका दिवसांत सतराशें साठ ग्रंथ छापले जात असतां आम्ही एका पोथीची नकल करण्यांत सत्राशें साठ दिवस मान मोडून घेत बसलों असतों? अथवा तेथें मिनिटास असंख्य गोळ्या फेकणाऱ्या बंदुका निर्माण होत असतां आम्ही आमच्या मावळ्यांचें विळे-कोयते घाशीत बसलों असतों काय? केव्हांहि नाहीं. राजकीय आक्रमण होवो वा न होवो, पाश्चात्यांनीं शास्त्रसामर्थ्यानें सिद्ध केलेल्या सर्व उपयुक्त चिजा आम्हांला त्यांच्यापासून घेणें प्राप्त होतें; स्वतः तयार करितां येत नसल्यानें मागतील ती जबर किंमत देऊन विकत घेणें प्राप्त होतें; नव्हे, आम्ही घेऊं लागलोंच होतों. बंदुकीचें महत्त्व शिवाजीच्या वेळेपासून कळून चुकलें होतें, पण ती बनविण्याची विद्या देशांत नसल्यानें फिरंग्यांपासून त्या आर्जवून विकत घ्याव्या लागत. आणि तेहि मग गिऱ्हाइकाचें अगतिकत्व ओळखून जुन्या बंदुकाहि नव्याच्या वर भावानें विकीत. घड्याळें आणि दुर्बिणी याहि चिजा अमोलिक आहेत हें पटलें होतें व आंग्र्यांनीं एखादें फिरंगी जहाज लुटून असल्या चिजा हस्तगत केल्या म्हणजे

त्या आंग्ल्यांपासून आपणांस मिळाव्या म्हणून मातबर सरदार आंग्ल्यांची अजीजी करीत होते. आम्ही फिरंग्यांचें औषध घेऊं लागलों होतों. त्यांनीं दिलेला चहा मोठा फर्मास म्हणून रुप्याच्या चहादाणींतून पिऊं लागलों होतों. सारांश, राजकीय आक्रमण झालें नसतें अशी कल्पना केली तरी व्यापारी आक्रमण अपरिहार्यच होतें. अर्थात् पाश्चात्यांकडून यंत्रें इकडे आल्याशिवाय राहिलीं नसतीं आणि यंत्रांबरोबर यंत्रांशीं संलग्न असणारी सर्व परिस्थिति येथें निर्माण झाल्याविना राहिली नसती.

पण कोणी म्हणेल परकीय मालावर कडक बहिष्कार घातला असता तर? तरीहि परिस्थिति बदलली नसती. मग राजकीय आक्रमण ठेवलेलेंच होतें ! कारण या पाश्चात्य व्यापाऱ्यांच्या पाठीशीं शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज अशी बलवत्तर लष्करीसत्ता होती. त्या सत्तेच्या जोरावर त्यांनीं आपला माल आमच्या माथीं मारलाच असता; आणि या शस्त्रास्त्रांपुढें आमचा टिकाव लागणें दुर्घटच नव्हे तर अशक्यच होतें. याला एकच पर्याय होता; तो म्हणजे व्यापारी आक्रमण सुरू झाल्यावर पाश्चात्यांची विद्या पुढारलेली आहे हें ध्यानीं येतांच तत्काळ ती विद्या हस्तगत करण्याच्या उद्योगास लागणें हा होय. हें आपल्या देशांत घडलें नाहीं. जपाननें हेंच केलें म्हणून तो आक्रमणाला बळी पडला नाहीं. जपानच्या उदाहरणावरून आणखी ही एक महत्त्वाची गोष्ट नीट पटेल ती ही कीं, पाश्चात्यांची विद्या किंवा त्यांच्या संस्था पौर्वात्य देशांत रुजणार नाहींत ही कल्पनाहि सर्वस्वीं भ्रामक होय. जपानच्या उदाहरणानें आणखी एक मिथ्याग्रह दूर होईल तो हा कीं, पाश्चात्य राष्ट्रांत भौतिक शास्त्रांची उपासना आणि लोकशाहीचे प्रयोग आज दोनतीन शतकें चालू आहेत; तेव्हां त्यांच्या खांद्याशीं खांदा भिडवून उभें राहण्यास आपणांसहि असा दीर्घ काल लागावा हा केवळ भ्रम होय. नवीन शोध लावण्याला जी दीर्घ तपश्चर्या लागते, तशी ती लागलेले शोध आत्मसात् करण्याला लागत

नाहीं. अवघ्या पन्नास-पाऊणशें वर्षांत पाश्चात्यांच्या तोंडीचा माल पाश्चात्यांच्या पेठेंत मांडून जपाननें हें प्रत्यक्ष सिद्धच करून दाखविलें आहे. तीच गोष्ट लोकशाही संस्थांची. मोर्लेनें हिंदुस्थानांत लोकशाहीची अगदीं अत्यल्प क्षुद्र अशी सुरुवात केली तेव्हां कांहींना वाटलें कीं, येवढीच मात्रा पचण्यास आपणास चारपांच पिढ्या लागतील. पण हा त्यांचा भ्रम होता हें आतां सांगावयास नकोच.

## धर्मभावनेस धक्का

आणखी एक शंका पुढें येऊन म्हणेल कीं, या नव्या विद्येनें आमची धर्मभावना तर उत्सन्न होणार नाहीं ना ? तसें असेल तर तिला दुरूनच नमस्कार केलेला बरा नाहीं का ? या बाबतींत पहिली गोष्ट अशी कीं, तिला दूर ठेवणें तुमच्या हातींच आतां राहिलेलें नाहीं. कायमचे दास्यांत राहूं, पण परकीयांच्या विद्या स्वीकारणार नाहीं असेंच म्हणावयाचें असेल तर गोष्ट निराळी. एरवीं पाश्चात्यांची विद्या हस्तगत केल्याविना जीवनकलहांत टिकाव लागणार नाहीं हें निश्चित. शंका पुन्हा म्हणेल, आमचें राज्य गेलें तरी चालेल, आमचें स्वातंत्र्य गेलें तरी चालेल, पण आम्ही आमचा धर्म व आमची संस्कृति ही टिकवून धरूं, तर हाहि सर्वस्वीं भ्रम होय. आक्रमणशील संस्कृतीपुढें दुबळी फुरंगटलेल्या वृत्तीची संस्कृति टिकाव धरूं शकत नाहीं. राजकीय स्वातंत्र्य हें संस्कृतीचें संरक्षक कवच होय असें मीं मागें म्हटलें आहे तें याच हेतूनें. नुसती भाषेची गोष्ट घेतलीत तर मुसलमानी आक्रमणामुळें मराठी भाषेवर केवढा परिणाम झाला तें ध्यानीं घ्या. घरींदारीं इतके इस्लामी शब्द घुसले आहेत कीं, त्यांची दाढी धरून ते मुद्दाम दाखवावेत तेव्हां परकी म्हणून ओळखले तर ओळखतात. आज घुसले यापेक्षां किती तरी अधिक घुसले असते. एकनाथासारख्या मराठीच्या अभिमान्याच्या वाङ्मयांतहि त्यानीं तोबा करून सोडला होता. पण

त्यांना पायबंद बसला तो शिवाजीच्या राजकीय वर्चस्वानें व त्याच्या राजव्यवहारकोशानें. शिवाजीचें हें धोरण पेशव्यांनीं पाळलें नाहीं तरी वाङ्मय-सेवकांची दृष्टि निवळली व संस्कृत शब्द योजण्याचा प्रघात वाढूं लागला. म्हणूनच भाषा अविंधमय होण्याची टळली. जी गोष्ट भाषेची तीच धर्माची. राजसत्ता पाठीशीं उभी असल्याशिवाय धर्मालाहि अवसान चढत नाहीं. विश्वामित्राचे यज्ञ निर्विघ्न पार पडेनात, तेव्हां विश्वमित्राला धनुर्धारी रामचंद्राचें साहाय्य घ्यावें लागलें हा प्राचीन दाखला विसरून कसें चालेल ? अर्वाचीन काळींहि जेथें इस्लामी आक्रमण दीर्घकाल नांदलें तेथील म्हणजे पंजाब प्रांतांतील हिंदूंना जुन्या धर्माला मुरड घालून शीख-पंथासारखा पंथ काढणें अपरिहार्य वाटलें. तेव्हां धर्मरक्षणाकरितांहि राजकीय स्वातंत्र्य हें अवश्य होय, हें विसरतां कामा नये. ‘बुडाला औरंग्या पापी’ व ‘उदंड जाहलें पाणी स्नानसंध्या करावया’ असे उद्‌गार समर्थांच्या मुखांतून निघाले त्यांतहि राजकीय सामर्थ्याच्या माहात्म्याचाच प्रतिध्वनि उमटलेला आहे. तात्पर्य, राजकीय स्वातंत्र्य हीच कांहीं संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची निशाणी नव्हे, भौतिक शास्त्रांच्या बाबतींत आम्हीं प्रगति केली नाहीं तेंच उत्तम केलें असल्या अपरिपक्व कल्पना उगाळण्याचें सोडून दिलें पाहिजे व चालू युगांतील भौतिक शास्त्रांची प्रभावी विद्या हस्तगत केली पाहिजे.

## जगताचें कल्याण

ही विद्या धार्मिक प्रवृत्तीला विघातक आहे हेंहि धर्म, याचा अर्थ समाजधारणापोषक नैतिक आचार विचार येवढाच घेतला तर खरें नाहीं, हा मुद्दा इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतरच्या पहिल्या पिढींतील जाणत्यांनींहि ओळखला होता. त्याचा दाखला म्हणून मराठी भाषेचे आद्य व्याकरणकार दादोबा तर्खडकर यांचा देतां येईल. त्यांनीं आपलें आत्मचरित्र अर्धेंमुर्धें लिहून ठेवलेलें प्रसिद्ध झालें आहे.

त्यांत त्यांनीं स्वतः इंग्रजी शिकून नांवलौकिक मिळविला याबद्दल त्यांच्यावर लोभ करणारे त्यांचे गुरुजी बापूशास्त्री शुक्ल यांनीं काय उद्गार काढले व त्याला त्यांनीं काय उत्तर दिलें हें वर्णिलें आहे. दादोबा लिहितात: "एकदां सुमारें पंचवीस वर्षांवर या शास्त्रीबोवांची माझी सुरतेंत गाठ पडली. तेव्हां ते मला म्हणाले, दाद्या, तुझें केलेलें व्याकरण मीं पाहिलें आणि मला फार संतोष झाला. तसे तुझे दुसरे गुण व विद्वत्तेचा स्तव ऐकून मला फार संतोष होतो. परंतु गड्या, तूं नास्तिक झालास रे! तुझी आपल्या धर्मावर निष्ठा नाहीं हें ऐकून मी दिलगीर आहे." म्यां नम्रतेनें म्हटलें, 'धर्माविषयीं जो आपण मला ठपका दिलात तो जर धर्माचा यथायोग्य अर्थ समजून दिला असलात तर तो मला लागत नाहीं;' मग त्याजवर शास्त्रीबोवा कांहींच फारसें बोलले नाहींत आणि आपल्या गुरूबरोबर वाद करावा हेंहि मला अगदीं आवडलें नाहीं." दादोबांचें हेंच समंजस धोरण डोळ्यांपुढें ठेवून पूर्वसंस्कारामुळें नव्या जमान्याकडे ज्यांना निर्विकार बुद्धीनें पाहतां येत नाहीं त्यांच्याशीं वाद घालीत न बसतां नव्या विद्येचें स्वागत करणें हें आपलें कर्तव्य होय. हें लिहीत असतांना नव्या विद्येचा दुरुपयोग केला असतां काय अनर्थ ओढवूं शकतो याची जाणीव युरोपांतील भीषण युद्धाच्या बातम्यांनीं रोज ताजी केली जात आहे. पण नव्या ज्ञानाचा सदुपयोग करण्याचा धडा जगताला आपण घालून देऊं अशी उमेद आपण कां धरूं नये? त्यांत आपणांस यश आलें तर आपलें व सगळ्या जगाचें कल्याण होणार आहे!

समाप्त

२.९३२

# ग्रंथकार नामसूचि

(आंकडे पृष्ठांचे)

## मराठी


आगरकर—सुधारकांतील निबंध १५,१६,३२,६६,१२५

आपटे द. वि.—मुधोळची बखर ३०८

काणे पां. वा.—धर्मशास्त्रविचार ३३०

केतकर, डॉ.—प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास २२१-२२३,२४३–४४

—भारतीयांचें समाजशास्त्र २६८

केळकर न. चिं.—समग्र केळकर २१८,२५७

केळकर य. न.—भूतावरील भ्रमण ३४४

कोसंबी धर्मानन्द—हिंदी संस्कृति व अहिंसा १३९

खरे वासुदेवशास्त्री ३४०

डॉ. गुणे—युरोपचा प्रवास ६८, ६९

गोखले गं. शं—'सह्याद्री'तील लेख १७६

गोविंदसुत—आधिभौतिक सुधारणा ३६, ३७

चिपळूणकर—निबंधमाला ९३, १२३

जाधव भास्करराव—विविधज्ञानविस्तारांतील निबंध २४९

जोशी गो. म.—हिंदूंचें समाज-रचना-शास्त्र ३८, ३५१, ३५३, ३५४

जोशी चिं. वि.—जातककथा ३१२

टिळक बा. गं.—केसरींतील निबंध, खंड ४ १२१,१२२

तर्खडकर दादोबा–आत्मचरित्र ३६३, ३६४

दीक्षित शं. बा.—भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास
१४५, २२७-२२९, ३२२, ३२६, ३२७, ३२९, ३३८

देशपांडे ह. वा.—रजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास २९३

पंतअमात्य—आज्ञापत्र ३१०, ३२९
पारसनीस—इतिहाससंग्रह ३०९
फडके, स. कृ.—नवयुगधर्म ३५०
राजवाडे—भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास ११४
—राधामाधवचंपू—प्रस्तावना ३३८
वैद्य चिं. वि.—महाभारतोपसंहार ९१
मध्ययुगीन भारत, खंड ३, २७०, खंड १, २८५, ३२२, ३३१
शेजवलकर—भा. इ. त्रैमासिकांतील लेख ३०९
सावरकर—हिंदुत्व ३८५

## संस्कृत

अग्निपुराण ३३०, ३३७
औषनसस्मृति ३३८
कल्हण—राजतरंगिणी (मराठी भाषांतर मा. लेले)
९८ ते १११, १२४, १२५, १९५, २८५, २९१, २९७
३०३, ३१३, ३१८ ते ३२०
कालिदास—रघुवंश १७४; २९१ मालविका. २५४
कुमारिल—तंत्रवार्तिक ३३१
कौशिकसूत्रकार १२८
कृष्णमित्र-प्रबोधचंद्रोदय ३३३, ३३४
भगवद्गीताकार ८५, ८६, २६७
चाणक्य—अर्थशास्त्र २७, ३९, ९३ ते ९५, १०३, ११५, ११६,
१२४, १९५, ३३६, ३५६
जयदेव—गीतगोविंद २७०, ३३३
दण्डी—दशकुमारचरित २९८-९९
बाण—हर्षचरित ९६, ९७, १२१, १२२, २५९, २९९
भवभूति—मालतीमाधव ३००

भोज —युक्तिकल्पतरु १५३, १५४
मनुस्मृति ३३५
मंजुश्रीमूलकल्प ९३, २५५
मेधातिथि—मनुभाष्य १५५
मनुस्मृति ८६
वात्स्यायन—कामशास्त्र ११६, १३९–१४१
विज्ञानेश्वर—याज्ञवल्क्य टीका ३२३
रसप्रकाशसुधाकर, रसरत्नसमुच्चय, रसेंद्रचिंतामणि } प्र. रे यांच्या ग्रंथांतील उतारे पृ. १४८, १४९
शुक्रनीतिसार १३


## इंग्रजी ग्रंथकार


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| Archer, W. I.—India and the Future | १४ |
| Alberuni—India ( Tr. Sachau ) | १३२, २९६, ३२३, ३२८, ३२९, ३३१ |
| Banerji Shastri, A.—Asur India | २३८ |
| Banerji, Gauranganath—Hellenism in India | २२४ |
| Beal—Western Records, Vol. I | २९६ |
| Beams—Comparitive Grammar | १७, १८ |
| Bhandarkar, Sir—Article ( B. B. R. A. S. ) | १३५ |
| Bhandarkar, D. R.—Article ( A. B. O. I. ) | २८४ |
| Bose, Phanidra—Indian Teachers in China | १६२ |
| Chamanlal— Hindu America | १७८ |
| Choudhari N.—Article ( Modern Review ) | २७१ |
| Colbrook—Eassys, Vol. II | १४४ |
| Coulton—Life in the Middle Ages, Vol. 4. | ७७ |
| Danzig—Number the Science of Language | १४३ |

Das Gupta—History of Indian Philosophy ३२५
Davis, Rhys—Budhist India २०, १५१
Dubash, Miss—Hindu Art १३३
Gibbon—Decline and Fall of Roman Empire २८७, ८८
Graves—History of Education १०
Ing, Dean—Outspoken Essays ५३
Jayaswal, Kashiprasad—Hindu Polity १८४ ते १९८
Joad, C. E. M.—Story of Indian Civilisation २८२
Keith—Classical Sanskrit Literature २७
Kern—Brihat Samhita २३०
Kumarswami, A.—Article ( A. O. J. ) २२६
Lajpatrai—Unhappy India ३३
Lecky—History of European Morals ७४
Levi—Pre-Aryan Antiquities २४६
Meyer—Sexual Life in Ancient India ३४८
Mecaulay—Minute on Education १०, ११, १९
—History of England ६७
Macdonell—History of Sanskrit Literature १९
Machiavelli—The Prince ( F. H. Morley ) ३०१, ३०३
Majumdar—Chanpa १६८
Marshall—Indus Civilisation, Vol. I २३७, ३८
Mayo, Miss—Mother India १०
Megasthenis—( Tr. Mc Crindle ) १४१, २०२, ३१२
Morgan—Social History of England ७०
Muller, Max—Ancient Sanskrit Literature
India, What Can It Teach Us ४७, १२५
—Biographical Essays २००
Peterson—Kadambari, Introduction २२
Pocock—India in Greece २२४
Radha Krishna—Eastern Religions and Western Thought २०९

Ranade R. D.—Mysticism in Maharashtra ८०
—Constructive Survey of Upanishds १२६
Rapson—Ed. Cambridge History of India, Vol. I २४
Rawlinson—Article in Legacy of India २०६
Ray, Sir P.— History of Hindu Chemistry १४९, २१६
Ruskin—Stones of Venice १२
Saintsbury—History of Criticism, Vol. I ३२४
Seal, Brajendranath—Positive Sciences of the Hindus १४६, २१४
Sewell—Forgotten Empire २९५
Shamshastri—Article ( A. B. O. I. ) २२८
Smith, Vincent—Early History of India ९८, २५५, २५७
—History of fine Art १७०
Stein—Introduction to Rajatarangini १२४
Toynbee—A Study of History, Vol. IV ३११, Vol.V २०४
Urwick—Message of Plato २०८
Vaidya, C. V.—Riddle of Ramayan १७८
Viswanath S. V.—Racial Synthesis २३३
Vitney—Surya Sidhanta-introduction २४
Walawalkar, Dr.—Hindu Social Institutions ३५६
Wadel—Egyption Civilisation १७५
Weber—History of Sanskrit Literature २२७
Wendel—Hinduism Invades America ४०-४१
Willobey—Political Theories of the Ancient World ९
Winternitz—History of Sanskrit Literature Vol. I. II ( Tr. Mrs. Ketkar ) २०९, २११, २१९
Woodroff—Is India Civilised? ४३
And others

# प्रा. द. के. केळकर कृत

# काव्यालोचन

" 'काव्यालोचना'सारखा ग्रंथ लिहिण्यास रोज चार तासांप्रमाणें निदान दोन वर्षांचें वाचन आणि एक वर्ष तरी लिहिण्यास मिळून तीन वर्षांचा अवधि धरला तर या हिशेबानें ग्रंथकाराला पांच हजार रुपयांइतकी प्राप्ति व्हावयास पाहिजे! असला ग्रंथ लिहिण्याची नुसती कल्पना सुचण्यासच आधीं बुद्धीची किती तरी कमावणी झाली असली पाहिजे."

—साप्ताहिक त्रिकाळ

" ज्या पुस्तकाचा मराठी भाषेला अभिमान वाटेल अशा प्रकारचें हें पुस्तक आहे."

—चित्रमयजगत्

" लेखकाचे परिश्रम, बुद्धिमत्ता व विषयप्रतिपादनकौशल्य या गोष्टी पुस्तकांतील कोणतींही चार पानें वाचलीं असतां कळून येतील."

—विविधज्ञानविस्तार

" काव्यालोचनकारानें अनेक ग्रंथांचा चांगला अभ्यास केला असावा. पण अंतिम सिद्धान्त मांडताना त्यानें स्वतःचे सिद्धान्त स्वतंत्र-बुद्धीनें मांडलेले आहेत."

—केसरी

" सर्व दृष्टींनीं परिपूर्ण असें हें पुस्तक मराठी टीकावाङ्मयास आपल्या अपूर्वतेनें भूषणभूत झालें आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं."

—लोकशिक्षण

# प्रा. द. के. केळकर कृत

# वादळी वारे

" पाश्चात्य शिक्षणानें इतर कोणतेहि परिणाम झालेले असोत, पण सुशिक्षित म्हणविणारेहि पाश्चात्यांच्या ओंजळीनें पाणी पिऊं लागले

आहेत. स्वतंत्र विचार करणारे असे लेखक एकंदरींत विरळाच. सुदैवानें प्रा. केळकर हे अशा विरळांपैकीं आहेत म्हणूनच त्यांच्या लेखाचें मोल विशेष आहे. ...सर्वच लेखांतील विचारसरणी व मांडणी कोणाच्याही मनाची पकड घेईल अशीच आहे. किंबहुना ग्रंथकाराच्या लेखनाचा हा एक विशेषच आहे. लेखांची भाषाही ओघवती व आवेशयुक्त असल्यानें पुस्तक एकदां हातीं घेतलें कीं, संपविल्याशिवाय बाजूला करावेंसें वाटत नाहीं.” —महाराष्ट्र

“सनातनी व सुधारक यांच्यांतील वादासंबंधीं ग्रंथकाराचे मौलिक विचार येथें पाहावयास मिळतील. मनोवेधक भाषासौष्ठवाबद्दल तर नवोपासकांना हा निबंधसंग्रह आदर्श वाटल्याशिवाय राहणार नाहीं.”

—केसरी

“—हा लेखसंग्रह वाचतांना विविध विषयांनीं नटलेला ‘माइंड इन् चेन्स’ व हक्स्लेचा ‘एसेज ऑफ ए बायालॉजिस्ट’ या संग्रहाची आठवण झाली. प्रो. केळकरांची लेखणी सर्व विषयांत सारखीच संचार करण्यास समर्थ आहे. वैचारिक प्रगतीच्या दृष्टीनें या ग्रंथाची सर्वत्र प्रसिद्धि होणें जरूर आहे.” —लोकमान्य

“प्रो. केळकरांनीं विविध विषयांचा परामर्श घेतलेला असून त्यांत त्यांचे मूलग्राही विवेचन, तर्कशुद्ध व मार्मिक विचारसरणी नि प्रवाही ओघवती भाषा वगैरे गुण प्रामुख्यानें दिसून येतात.” —ज्ञानप्रकाश

“काव्याच्या रम्य अंगोपांगांची चर्चा करणारे केळकर गाल्टन, मेंडेलच्या अनुवंशशास्त्राची चर्चा करूं लागलेले दिसतांच या ठिकाणीं रसिकता व तार्किकता यांचा मोहक मिलाफ झालासें वाटतें.”

—वाङ्मयशोभा

# मनोहर ग्रंथमालेचीं कांहीं प्रकाशनें

| | किंमत |
|---|---|
| समग्र केळकर–वाङ्मय | ५० रु. |
| तिरंगी नवमतवाद्–श्री. न. चिं. केळकर | १० आ. |
| विस्तवाशीं खेळ–प्रो. वा. म. जोशी | १ रु. |
| फ्रेंच राज्यक्रांति–श्री. न. चिं. केळकर | २ रु. |
| हास्य-विनोद-मीमांसा–श्री. न. चिं. केळकर | ४ रु. |
| सहारा–श्रीधर गो. देशपांडे | १ रु. |
| बलिदान–श्री. न. चिं. केळकर | २ रु. |
| राका–सौ. संजीवनी मराठे | १ रु. |
| प्रतारणा–प्रो. वि. पां. दांडेकर | १॥ रु. |
| संसार-सोपान–सौ. गिरिजाबाई केळकर | १ रु. |
| न्याहारी–श्री. वि. म. कुलकर्णी | १ रु. |
| वादळी वारे–प्रो. द. के. केळकर | २ रु. |
| उन्माद्–प्रो. ना. सी. फडके | २॥ रु. |
| बीजाङ्कुर–कवि शान्ताराम आठवले | १। रु. |
| दुसरी सावली–श्री. वि. वि. बोकील | २। रु. |
| कागदी विमानें–श्री. र. गो. सरदेसाई | १। रु. |
| बोकिलांच्या गोष्टी–श्री. वि. वि. बोकील | १ रु. |
| प्रदक्षिणा–( गेल्या १०० वर्षांतील मराठी वाङ्मयाचें समालोचन ) | २ रु. |
| गुप्त प्रायश्चित्त–प्रो. ना. सी. फडके | २॥ रु. |

RFFBK-0006132